



सत्यमेव जयते

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
# २०१३-१४







DES

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
# २०१३-१४


अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

# प्रस्तावना

'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' हे प्रकाशन राज्य विधानमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये सादर करण्यासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग दरवर्षी तयार करते. सदर प्रकाशन २०१३-१४ या वर्षासाठी तयार करण्यात आले असून मालिकेतील हा ५३ वा अंक आहे. या प्रकाशनात अर्थव्यवस्थेतील विविध सामाजिक-आर्थिक क्षेत्रांच्या स्थितीबाबतची माहिती व संदर्भासाठी आवश्यक त्या ठिकाणी निर्देशांक व स्थितीदर्शक कल देण्यात आले आहेत.

२. अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे या प्रकाशनात समाविष्ट केलेली काही आकडेवारी / अंदाज अस्थायी स्वरुपातील आहेत.

३. केंद्र व राज्य शासनाचे संबंधित विभाग व उपक्रम यांनी उपयुक्त माहिती या संचालनालयास वेळेत उपलब्ध करून दिल्यामुळे हे प्रकाशन तयार करणे शक्य झाले, त्याबद्दल हे संचालनालय त्यांचे आभारी आहे.

अ.दी. देव<br>
अर्थ व सांख्यिकी संचालक,<br>
महाराष्ट्र शासन

मुंबई

दिनांक : ४ जून, २०१४

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३-१४

## अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **राज्याचा संक्षिप्त आढावा** | १ |
| अ. | **दृष्टीक्षेपात महाराष्ट्र** | ३ |
| ब. | **महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती** | ६ |
| १. | **राज्य अर्थव्यवस्था** | ९ |
| २. | **लोकसंख्या** | १३ |
| ३. | **राज्य उत्पन्न** | २३ |
| ४. | **किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था**<br>किंमती<br>सार्वजनिक वितरण व्यवस्था | ३९ |
| ५. | **लोकवित्त** | ५७ |
| ६. | **संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार** | ७३ |
| ७. | **कृषि व संलग्न कार्ये**<br>कृषि<br>सिंचन<br>फलोत्पादन<br>पशुसंवर्धन<br>दुग्ध विकास<br>मत्स्यव्यवसाय<br>वने व सामाजिक वनीकरण | ८३ |
| ८. | **उद्योग आणि सहकार**<br>उद्योग<br>सहकार | ११३ |
| ९. | **पायाभूत सुविधा**<br>ऊर्जा<br>वाहतूक व दळणवळण | १३७ |
| १०. | **सामाजिक क्षेत्र**<br>शिक्षण<br>सार्वजनिक आरोग्य<br>महिला व बाल कल्याण<br>रोजगार व दारिद्र्य<br>गृहनिर्माण<br>पाणी पुरवठा आणि स्वच्छता<br>पर्यावरण संवर्धन<br>सामाजिक न्याय | १६१ |
| ११. | **मानव विकास** | २१९ |
| | **व्याख्या सूची** | २२१ |
| क. | **भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक** | २२६ |

# परिशिष्टे



| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. २.१** | जिल्हानिहाय लोकसंख्याविषयक निर्देशक - जनगणना २०११ | १७ |
| **परि. २.२** | जिल्हानिहाय साक्षरता दर, दशवार्षिक वृद्धिदर, घनता व स्त्री-पुरुष प्रमाण - जनगणना २०११ | १८ |
| **परि. २.३** | जिल्हानिहाय नि:शक्त, बेघर लोकसंख्येचे प्रमाण व कामगारांचा सहभाग दर - जनगणना २०११ | १९ |
| **परि. २.४** | जिल्हानिहाय अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी व कामगारांच्या वर्गीकरणानुसार प्रमाण - जनगणना २०११ | २० |
| **परि. २.५** | आर्थिक उपक्रमांनुसार कामगारांचे प्रमाण - जनगणना २०११ | २१ |
| **परि. ३.१** | औद्योगिक स्रोतांनुसार स्थूल राज्य उत्पन्न - चालू किंमतीनुसार | २८ |
| **परि. ३.२** | औद्योगिक स्रोतांनुसार स्थूल राज्य उत्पन्न - स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार | २९ |
| **परि. ३.३** | औद्योगिक स्रोतांनुसार निव्वळ राज्य उत्पन्न - चालू किंमतीनुसार | ३० |
| **परि. ३.४** | औद्योगिक स्रोतांनुसार निव्वळ राज्य उत्पन्न - स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार | ३१ |
| **परि. ३.५** | घटक खर्चावर आधारित देशांतर्गत स्थूल उत्पन्न व राष्ट्रीय स्थूल उत्पन्न- चालू किंमतीनुसार | ३२ |
| **परि. ३.६** | घटक खर्चावर आधारित देशांतर्गत स्थूल उत्पन्न व राष्ट्रीय स्थूल उत्पन्न- स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार | ३३ |
| **परि. ३.७** | घटक खर्चावर आधारित देशांतर्गत निव्वळ उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्न - चालू किंमतीनुसार | ३४ |
| **परि. ३.८** | घटक खर्चावर आधारित देशांतर्गत निव्वळ उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्न - स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार | ३५ |
| **परि. ३.९** | जिल्ह्यांतर्गत स्थूल/निव्वळ उत्पन्न आणि दरडोई जिल्हा उत्पन्न | ३६ |
| **परि. ४.१** | महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक | ४५ |
| **परि. ४.२** | महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक | ४६ |
| **परि. ४.३** | महत्त्वाच्या राज्यांसाठी ग्राहक किंमती निर्देशांक (केंद्रिय) | ४७ |
| **परि. ४.४** | महाराष्ट्र व अखिल भारतातील शेतमजुरांकरिता व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ४८ |
| **परि. ४.५** | औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ४९ |
| **परि. ४.६** | महाराष्ट्र राज्यातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ५० |
| **परि. ४.७** | महाराष्ट्र राज्यातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक | ५१ |
| **परि. ४.८** | अखिल भारतीय घाऊक किंमतींचे निर्देशांक | ५२ |
| **परि. ४.९** | महत्त्वाच्या किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढीचे दर | ५३ |
| **परि. ४.१०** | जिल्हावार शिधापत्रिकांची संख्या (३१.१०.२०१३) | ५४ |
| **परि. ४.११** | महाराष्ट्रातील अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानांना देण्यात आलेला तांदुळ व गहू | ५५ |
| **परि. ४.१२** | भारत सरकारकडून महाराष्ट्र राज्याला मिळालेले नियतन | ५५ |
| **परि. ४.१३** | जिल्हावार गोदामांची संख्या, क्षमता, रास्त भाव दुकानांची संख्या (जून, २०१३ पर्यंत) | ५६ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. ५.१** | महाराष्ट्र शासन : दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प | ६५ |
| **परि. ५.२** | महाराष्ट्र शासन अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील जमेतील कल | ६६ |
| **परि. ५.३** | महाराष्ट्र शासन अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील खर्चातील कल | ६७ |
| **परि. ५.४** | महाराष्ट्र राज्यातील कृषि क्षेत्रावरील करांपासून महसुली जमा | ६८ |
| **परि. ५.५** | वर्षभरातील कर्जे व इतर दायित्वे | ६९ |
| **परि. ५.६** | शासनाच्या उपभोग्य बाबींवरील अंतिम खर्च व भांडवल निर्मितीवरील खर्च | ७० |
| **परि. ५.७** | १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त झालेली अनुदाने व खर्च | ७१ |
| **परि. ६.१** | महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण, निमनागरी व नागरी / महानगर क्षेत्रातील सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज | ८० |
| **परि. ६.२** | जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना (२०१३-१४) | ८१ |
| **परि. ७.१** | राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, पिक आणि प्रति हेक्टर उत्पादन | १०२ |
| **परि. ७.२** | राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक | १०५ |
| **परि. ७.३** | राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी | १०६ |
| **परि. ७.४** | कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, वहितीचे एकूण क्षेत्र व सरासरी क्षेत्र | १०७ |
| **परि. ७.५** | राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र | १०९ |
| **परि. ७.६** | सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी | ११० |
| **परि. ७.७** | महाराष्ट्र राज्यातील पशुधन आणि कोंबड्या व बदके | १११ |
| **परि. ८.१** | महाराष्ट्र राज्यातील उद्योगांना वित्तीय संस्थांनी मंजूर केलेले व वितरित केलेले अर्थसहाय्य | १३० |
| **परि. ८.२** | महाराष्ट्र राज्यातील खनिजांचे उत्पादन | १३१ |
| **परि. ८.३** | भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक | १३२ |
| **परि. ८.४** | महाराष्ट्र राज्यातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी | १३३ |
| **परि. ८.५** | महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांची महत्त्वाची वैशिष्ट्ये | १३५ |
| **परि. ९.१** | राज्यातील विजेचा पुरवठा व वापर | १५७ |
| **परि. ९.२** | महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील) | १५८ |
| **परि. ९.३** | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील जिल्हानिहाय साध्य केलेली रूंदीनुसार रस्त्यांची लांबी | १५९ |
| **परि. ९.४** | महाराष्ट्र राज्यातील वापरात असलेली मोटार वाहने | १६० |
| **परि. १०.१** | राज्यनिहाय संयुक्त शिक्षण विकास निर्देशांक सर्व शाळा : सर्व व्यवस्थापन | २०२ |
| **परि. १०.२** | राज्यातील वर्ष २०१३-१४ मधील आरोग्य विज्ञान महाविद्यालये/ संस्थांची संख्या व त्यातील प्रवेशित विद्यार्थी | २०३ |
| **परि. १०.३** | राज्यातील वर्ष २०१३-१४ मधील तंत्र, कला शिक्षणाची महाविद्यालये /संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रवेश दिलेले विद्यार्थी | २०४ |
| **परि. १०.४** | महाराष्ट्र राज्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधा (सार्वजनिक आणि शासन सहाय्यित) | २०६ |
| **परि. १०.५** | महाराष्ट्र राज्याचे नमुना नोंदणी पाहणीवर आधारित जन्मदर, मृत्युदर, अर्भकमृत्युदर व एकूण जननदर | २०७ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. १०.६** | काम करणाऱ्या लोकांची जनगणना २०११ अनुसार आर्थिक वर्गवारी | २०८ |
| **परि. १०.७** | दृष्टिक्षेपात आर्थिक गणना १९९८ आणि २००५ | २०९ |
| **परि. १०.८** | प्रमुख उद्योग गटांनुसार आस्थापनांची आणि कामगारांची संख्या (आर्थिक गणना २००५) | २१० |
| **परि. १०.९** | महाराष्ट्र राज्यातील विविध उद्योगांतील रोजगार | २११ |
| **परि. १०.१०** | महाराष्ट्र राज्यातील चालू कारखाने व त्यांतील रोजगार | २१२ |
| **परि. १०.११** | राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या, अधिसूचित केलेली रिक्त पदे व भरलेली पदे | २१३ |
| **परि. १०.१२** | रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांच्या चालू नोंदवहीत ३१ डिसेंबर, २०१३ अखेर असलेल्या व्यक्तींची संख्या | २१४ |
| **परि. १०.१३** | महाराष्ट्र राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेली प्रकारानुसार कामे व त्यावरील खर्च | २१५ |
| **परि. १०.१४** | महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत रोजगार कार्यक्रमांची प्रगती | २१६ |
| **परि. १०.१५** | महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक विवाद ** | २१७ |

# राज्याचा संक्षिप्त आढावा

देशाचा पश्चिम व मध्य भाग व्यापलेल्या महाराष्ट्र राज्यास अरबी समुद्राचा ७२० किमी लांबीचा विस्तीर्ण सागरी किनारा लाभला आहे. पश्चिमेकडील सह्याद्री पर्वताच्या रांगा राज्याचा प्राकृतिक कणा असून उत्तरेस असलेल्या सातपुडा पर्वताच्या रांगा व पूर्वेस असलेल्या भामरागड - चिरोली - गायखुरी या डोंगररांगा राज्याच्या नैसर्गिक सीमा आहेत. राज्याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्य प्रदेश, पुर्वेस छत्तीसगढ, आग्नेयेस आंध्रप्रदेश, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा ही राज्ये आहेत.

राज्यात उष्ण कटिबंधीय मोसमी हवामान आहे. मार्चपासून सुरु होणारा, अंगाची लाहीलाही करणारा उन्हाळा जूनच्या सुरुवातीला पाऊस घेऊन येतो. पावसाळ्यातील हिरवळीत लपेटलेले उबदार आल्हाददायी वातावरण, ऑक्टोबरच्या त्रासदायक वातावरणानंतर येणाऱ्या हिवाळ्यात टिकून राहते. पश्चिम समुद्र तटावरुन येणाऱ्या पावसाळी ढगांमुळे सह्याद्रीच्या डोंगर रांगांवर ४०० सेंमी पेक्षा जास्त पाऊस पडतो. समुद्र किनारपट्टीवरील कोकणात मुसळधार पाऊस पडतो व तो उत्तरेकडे सरकताना कमी होत जातो. सह्याद्रीच्या पूर्वेला पश्चिम पठारावरील जिल्ह्यात ७० सेंमी एवढा अत्यल्प पाऊस पडत असून सोलापूर व अहमदनगर हे सर्वाधिक कोरडे जिल्हे आहेत. पूर्वेस विदर्भ व मराठवाड्याकडे सरकताना पावसाचे प्रमाण काहीसे वाढते.

भौगोलिक क्षेत्र (३.०८ लक्ष चौ.किमी) व लोकसंख्या या दोन्ही बाबतीत महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. राज्याची लोकसंख्या सुमारे ११.२४ कोटी (जनगणना २०११) असून ती देशातील एकूण लोकसंख्येच्या ९.३ टक्के आहे. राज्याचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून ४५.२ टक्के लोकसंख्या नागरी भागात राहते.

राज्यात ३५ जिल्हे असून प्रशासकीय सुविधेसाठी ते कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या सहा महसुली विभागात विभागले आहेत. जिल्हा स्तरावरील नियोजनासाठी राज्यात प्रभावी यंत्रणा कार्यरत आहेत. स्थानिक प्रशासनासाठी राज्याच्या ग्रामीण भागात ३३ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या व २७,८७३ ग्रामपंचायती आहेत, तर नागरी भागात २६ महानगरपालिका, २२० नगरपरिषदा, १२ नगरपंचायती व सात कटक मंडळे आहेत.

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी तसेच देशाची आर्थिक राजधानी असून जवळजवळ सर्वच प्रमुख निगम व वित्तीय संस्थांची मुख्यालये या शहरात आहेत. देशातील प्रमुख वायदे व भांडवली बाजार आणि विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्रे मुंबईत आहेत.

चालू किंमतींनुसार २०१२-१३ या वर्षाचे अंदाजित स्थूल राज्य उत्पन्न ₹ १३,२३,७६८ कोटी असून देशांतर्गत स्थूल उत्पन्नात राज्याचा सुमारे १४.१ टक्के हिस्सा आहे. राज्यातील औद्योगिक व सेवा या दोन्ही क्षेत्रांचा राज्य उत्पन्नात एकत्रित हिस्सा ८९.१ टक्के तर कृषि व संलग्न कार्ये या क्षेत्राचा हिस्सा १०.९ टक्के आहे.

राज्यातील २३१ लाख हेक्टर जमीन लागवडीखाली तर ५२.१ लाख हेक्टर वनांखाली आहे. सिंचनात वाढ व्हावी यासाठी अनेक सिंचन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. बिगर सिंचन क्षेत्रात पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम गतीने राबविण्यासाठी जलसंधारण अभियानाची स्थापना करण्यात आली आहे.

पशुसंवर्धन हे कृषि क्षेत्राशी संबंधीत महत्वाचे क्षेत्र आहे. देशातील पशुधन व कुक्कुटपालन यामध्ये राज्याचा हिस्सा अनुक्रमे सात व १० टक्के आहे.

महाराष्ट्र सर्वात जास्त औद्योगिकीकरण झालेले राज्य असून भारतातील औद्योगिक क्षेत्रामध्ये राज्याने आपले आघाडीचे स्थान अबाधित राखले आहे. लघु उद्योगात हे अग्रेसर असून देशांतर्गत तसेच विदेशी संस्थांकडून औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्यात राज्याने सातत्य राखले आहे. मोटार वाहने उत्पादनाचे व माहिती तंत्रज्ञानाचे हे प्रमुख केंद्र आहे, तसेच मोठ्या प्रमाणावर विशेष निर्यातवृद्धी क्षेत्रे येथे स्थापित होत आहेत.

राज्याने प्राथमिक शिक्षणास महत्व दिल्यामुळे साक्षरता दरात सातत्याने सुधारणा होत आहे. जनगणना २०११ नुसार देशाच्या ७३ टक्के साक्षरता दराच्या तुलनेत राज्याचा साक्षरता दर ८२.३ टक्के होता. बारावीपर्यंतच्या मुलींना मोफत शिक्षण दिले जात असून राज्यात अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यवस्थापन क्षेत्रातील उच्च शिक्षणाच्या उत्कृष्ट संस्था आहेत.

भारताचा मानव विकास अहवाल २०११ नुसार देशाचा मानव विकास निर्देशांक ०.४६७ आहे व ०.५७२ च्या मानव विकास निर्देशांकासह राज्याचा देशात पाचवा क्रमांक आहे.

राज्यात २.४३ लाख किलोमीटर लांबी असलेले (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदेच्या देखभालीखालील) व सर्वदूर पसरलेले रस्त्यांचे जाळे आहे. येथील ९९ टक्क्यांपेक्षा जास्त गावे बारमाही व हंगामी रस्त्यांनी जोडलेली आहेत. भूपृष्ठीय वाहतूक सुविधा तसेच बंदरे व विमानतळांशी असणाऱ्या संपर्क व्यवस्थेमुळे राज्यात वाहतूकीची चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे. विजेची उच्च स्थापित क्षमता आणि निर्मितीमुळे गुंतवणुकीसाठी हे सर्वाधिक पसंतीचे राज्य बनले आहे.

हे राज्य प्रशासकीय क्षमता आणि नवीन धोरणे अंगिकारण्यासाठी प्रसिद्ध आहे. महिला धोरण राबविणारे तसेच महिलांच्या विकासासाठी 'महिला व बालकल्याण' या स्वतंत्र विभागाची स्थापना करुन अर्थसंकल्पीय तरतूद करणारे हे पहिले राज्य आहे. 'रोजगार हमी योजना' राबविणारे हे आद्यप्रवर्तक राज्य असून केंद्र शासनाने ही योजना अंगिकारली आहे.

महाराष्ट्र हे केवळ भौगोलिक सीमांनी रेखांकित केलेले राज्य नसून येथील जनतेने संघटितरित्या परिश्रमपूर्वक घडविलेले राज्य आहे. या राज्याची वैशिष्ट्यपूर्ण मराठी संस्कृती विकसित होण्यास नैसर्गिक तसेच सांस्कृतिक विविधता सहाय्यभूत झाली आहे. स्वत:ची अध्यात्मिक बैठक असलेले हे राज्य 'संतांची भूमी' म्हणून ओळखले जाते. राज्याने देशाच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात लक्षणीय भूमिका बजावली आहे.

अजंठा, वेरूळ व घारापुरीची लेणी, गेट वे ऑफ इंडिया आणि वास्तुशास्त्राच्या वैशिष्ट्यपूर्ण वास्तू जसे विहार व चैत्य यामुळे जगभरातील पर्यटक राज्याकडे आकर्षित होतात. मानव विकासास सहाय्यभूत ठरणाऱ्या प्रत्येक क्षेत्रात कार्य करणारी व्यक्तिमत्वे राज्यात उदयास आली आहेत. क्रीडा, कला, साहित्य व सामाजिक सेवा यामध्ये राज्याचे भरीव योगदान आहे. 'बॉलीवूड' नावाने जगप्रसिध्द असलेला चित्रपट उद्योग राज्यात स्थित आहे.

महाराष्ट्र हे या सर्व वैशिष्ट्यांमुळे सर्वोत्तम राज्य बनले आहे.

* * * * *

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| | बाब<br>(१) | १९६०-६१<br>(२) | १९७०-७१<br>(३) | १९८०-८१<br>(४) | १९९०-९१<br>(५) | २०००-०१<br>(६) | २०१०-११<br>(७) | २०१२-१३*<br>(८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **भौगोलिक क्षेत्र** - (हजार चौ.कि.मी.) | ३०६ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ |
| २. | **प्रशासकीय रचना -** | | | | | | | |
| | महसूली विभाग | ४ | ४ | ६ | ६ | ६ | ६ | ६ |
| | जिल्हे | २६ | २६ | २८ | ३१ | ३५ | ३५ | ३५ |
| | तहसील | २२९ | २३५ | ३०१ | ३०३ | ३५३ | ३५५@@ | ३५५@@ |
| | वस्ती असलेली गावे | ३५,८५१ | ३५,७७८ | ३९,३५४ | ४०,४१२ | ४१,०९५ | ४०,९५९ | ४०,९५९ |
| | वस्ती नसलेली गावे | ३,०१६ | २,८८३ | २,४७९ | २,६१३ | २,६१६ | २,७०६ | २,७०६ |
| | शहरे # | २६६ | २८९ | ३०७ | ३३६ | ३७८ | ५३४ | ५३४ |
| ३. | **जनगणनेनुसार लोकसंख्या** - (हजारात) | (१९६१) | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) | (२०११) |
| | एकूण | ३९,५५४ | ५०,४१२ | ६२,७८४ | ७८,९३७ | ९६,८७९ | १,१२,३७४ | १,१२,३७४ |
| | पुरुष | २०,४२९ | २६,११६ | ३२,४१५ | ४०,८२६ | ५०,४०१ | ५८,२४३ | ५८,२४३ |
| | स्त्रिया | १९,१२५ | २४,२९६ | ३०,३६९ | ३८,१११ | ४६,४७८ | ५४,१३१ | ५४,१३१ |
| | ग्रामीण | २८,३९१ | ३४,७०१ | ४०,७९१ | ४८,३९५ | ५५,७७८ | ६१,५५६ | ६१,५५६ |
| | नागरी | ११,१६३ | १५,७११ | २१,९९३ | ३०,५४२ | ४१,१०१ | ५०,८१८ | ५०,८१८ |
| | अनुसूचित जाती | २,२२७ | ३,१७७ | ४,४८० | ८,७५८ | ९,८८२ | १३,२७६ | १३,२७६ |
| | अनुसूचित जमाती | २,३९७ | ३,८४१ | ५,७७२ | ७,३१८ | ८,५७७ | १०,५१० | १०,५१० |
| | लोकसंख्या घनता (प्रती चौ.कि.मी.) | १२९ | १६४ | २०४ | २५७ | ३१५ | ३६५ | ३६५ |
| | साक्षरता प्रमाण (टक्के) | ३५.१ | ४५.८ | ५७.१ | ६४.९ | ७६.९ | ८२.३ | ८२.३ |
| | स्त्री-पुरुष प्रमाण<br>(स्त्रिया प्रति हजार पुरुष) | ९३६ | ९३० | ९३७ | ९३४ | ९२२ | ९२९ | ९२९ |
| | नागरी लोकसंख्येचे प्रमाण (टक्के) | २८.२२ | ३१.१७ | ३५.०३ | ३८.६९ | ४२.४३ | ४५.२ | ४५.२ |
| ४. | **राज्य उत्पन्न** - (चालू किंमतीनुसार)<br>(२००४-०५ च्या मालिकेप्रमाणे) | | | | | | | |
| | राज्य उत्पन्न (₹ कोटी) | २,२४९ | ५,७८० | १९,३७७ | ६८,८६१ | २,४३,५८४ | ९,५०,७७१ | ११,९६,७५४+ |
| | कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र (₹ कोटी) | ५८५ | १,०७८ | ३,७५६ | १२,३२६ | ३२,७११ | १,२२,९३२ | १,३६,०७५+ |
| | उद्योग क्षेत्र (₹ कोटी) | ५५३ | १,७३२ | ६,२२४ | २२,५५४ | ६४,९४२ | २,६३,५१२ | ३,०५,१२२+ |
| | सेवा क्षेत्र (₹ कोटी) | १,१११ | २,९६९ | ९,३९७ | ३३,९८१ | १,४५,९३१ | ५,६४,३२६ | ७,५५,५५७+ |
| | दरडोई राज्य उत्पन्न (₹) | ५७६ | १,१६८ | ३,११२ | ८,८११ | २८,५४० | ८४,८५८ | १,०३,९९१+ |
| ५. | **कृषि** - (क्षेत्र हजार हेक्टरमध्ये) | | | | | | | |
| | निव्वळ पेरणी क्षेत्र | १७,८७८ | १७,६६८ | १८,२९९ | १८,५६५ | १७,८४४ | १७,४०६ | उ. ना. |
| | पिकांखालील स्थूल क्षेत्र | १८,८२३ | १८,७३७ | १९,६४२ | २१,८५९ | २१,६१९ | २३,१७५ | उ. ना. |
| | स्थूल सिंचित क्षेत्र | १,२२० | १,५७० | २,४१५ | ३,३१९ | ३,८५२ | @ | @ |
| | *त्यापैकी* लाभ क्षेत्र^ | २२६$ | ४२२ | ७१८ | १,०७६$$ | १,७६४## | २,९५५## | २,४४८## |
| | स्थूल सिंचित क्षेत्राचे पिकांखालील एकूण स्थूल क्षेत्राशी प्रमाण (टक्के) | ६.५ | ८.४ | १२.३ | १५.२ | १७.८ | उ. ना. | उ. ना. |
| ६. | **प्रमुख पिकांखालील क्षेत्र** -<br>(हजार हेक्टरमध्ये) | | | | | | | |
| | तांदूळ | १,३०० | १,३५२ | १,४५९ | १,५९७ | १,५१२ | १,५१६ | १,५५७ |
| | गहू | ९०७ | ८१२ | १,०६३ | ८६७ | ७५४ | १,३०७ | ७८५ |
| | ज्वारी | ६,२८४ | ५,७०३ | ६,४६९ | ६,३०० | ५,०९४ | ४,०६० | ३,२९० |
| | बाजरी | १,६३५ | २,०३९ | १,५३४ | १,९४० | १,८०० | १,०३५ | ७८८ |
| | सर्व तृणधान्ये | १०,६०६ | १०,३२० | १०,९७६ | ११,१३६ | ९,८२४ | ८,९८५ | ७,४४० |
| | सर्व कडधान्ये | २,३४९ | २,५६६ | २,७१५ | ३,२५७ | ३,५५७ | ४,०३८ | ३,३२२ |
| | सर्व अन्नधान्ये | १२,९५५ | १२,८८६ | १३,६९१ | १४,३९३ | १३,३८२ | १३,०२३ | १०,७६२ |

* अस्थायी    उ. ना. - उपलब्ध नाही    @@ मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांमधील ३ तहसिल वगळून    # गणना शहरांसह

+ पहिले सुधारित अंदाज    @ सिंचन क्षमता व सिंचित क्षेत्र याचे अनुमान काढण्यासाठी डिसेंबर,२०१२ मध्ये विशेष तपास पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. ही आकडेवारी या समितीच्या अहवालाच्या शिफारशींच्या स्विकृतीनंतर उपलब्ध होईल.  $ १९६१-६२   $$ १९९१-९२   ## प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील कालव्यावरील, उपसा व धरणातून नदी नाल्यामध्ये सोडलेल्या तसेच लाभक्षेत्रातील विहिरीद्वारे प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र.

^ जलसंपदा विभागाकडून निर्मित लाभक्षेत्र

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब | | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१२-१३* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | ऊस क्षेत्र | १५५ | २०४ | ३१९ | ५३६ | ६८७ | १,०४१ | १,०६७ |
| | ऊस तोडणी क्षेत्र | १५५ | १६७ | २५८ | ४४२ | ५९५ | ९६५ | ९३५ |
| | कापूस | २,५०० | २,७५० | २,५५० | २,७२१ | ३,०७७ | ३,९४२ | ४,१८७ |
| | भूईमूग | १,०८३ | ९०४ | ६९५ | ८६४ | ४९० | ३९५ | २७१ |
| ७. | **प्रमुख पिकांचे उत्पादन -** | | | | | | | |
| | (हजार टनात) | | | | | | | |
| | तांदूळ | १,३६९ | १,६६२ | २,३१५ | २,३४४ | १,९३० | २,६९१ | ३,०५७ |
| | गहू | ४०१ | ४४० | ८८६ | ९०९ | ९४८ | २,३०१ | १,१९९ |
| | ज्वारी | ४,२२४ | १,५५७ | ४,४०९ | ५,९२९ | ३,९८८ | ३,४५२ | २,१०८ |
| | बाजरी | ४८९ | ८२४ | ६९७ | १,११५ | १,०८७ | १,१२३ | ५०२ |
| | सर्व तृणधान्ये | ६,७५५ | ४,७३७ | ८,६४७ | १०,७४० | ८,४९७ | १२,३१७ | ८,८५९ |
| | सर्व कडधान्ये | ९८९ | ६७७ | ८२५ | १,४४१ | १,६३७ | ३,०९६ | २,३६० |
| | सर्व अन्नधान्ये | ७,७४४ | ५,४१४ | ९,४७२ | १२,१८१ | १०,१३३ | १५,४१३ | ११,२१९ |
| | ऊस | १०,४०४ | १४,४३३ | २३,७०६ | ३८,१५४ | ४९,५६९ | ८५,६९१ | ७७,५९२ |
| | कापूस (रुई) # | १,६७३ | ४८४ | १,२२४ | १,८७५ | १,८०३ | ७,४७३ | ६,७९३ |
| | भुईमूग | ८०० | ५८६ | ४५१ | ९७९ | ४७० | ४७० | २८६ |
| ८. | **कृषि उत्पादनाचा निर्देशांक** @ - | - | - | - | १३६.५ | १२७.४ | २२३.८ | १९०.९१ |
| ९. | **कृषि गणना -** | | (१९७०-७१) | (१९८०-८१) | (१९९०-९१) | (२०००-०१) | (२००५-०६) | (२०१०-११) |
| | वहित खातेदारांची संख्या (हजारात) | - | ४,९५१ | ६,८६३ | ९,४७० | १२,१३८ | १३,७१६ | १३,६९९ |
| | वहित क्षेत्र (हजार हेक्टर्समध्ये) | - | २१,१७९ | २१,३६२ | २०,९२५ | २०,१०३ | २०,००५ | १९,७६७ |
| | वहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) | - | ४.२८ | ३.११ | २.२१ | १.६६ | १.४६ | १.४४ |
| १०. | **पशुधन गणना -** | (१९६१) | (१९६६) | (१९७८) | (१९८७) | (१९९७) | (२००७) | (२००७) |
| | एकूण पशुधन (हजारात) | २६,०४८ | २५,४४१ | २९,६४२ | ३४,२५५ | ३९,६३८ | ३५,९५५* | ३५,९५५* |
| | एकूण कोंबड्या-बदके (हजारात) | १०,५७७ | ९,९०२ | १८,७९१ | २४,८३९ | ३५,३९२ | ६४,७५६* | ६४,७५६* |
| | | | | | | | (२००३) | (२००३) |
| | ट्रॅक्टर | १,४२७ | ३,२७४ | १२,९१७ | ३४,५२९ | ७९,८९३ | १,०५,६११ | १,०५,६११ |
| ११. | **वन क्षेत्र** (चौ.कि.मी.) | ६३,५४४ | ६२,३११ | ६४,२२२ | ६३,७९८ | ६१,९३५ | ६१,९३९ | ६१,३६९* |
| १२. | **औद्योगिक गुंतवणूक -** | | | | | | (२०११-१२)$ | (२०१२-१३)$$ |
| | मंजूर प्रकल्प (संख्या) | - | - | - | - | - | १७,७७९ | १८,४०६ |
| | गुंतवणूक (₹ कोटी) | - | - | - | - | - | ९,५०,९७२ | १०,२१,६३३ |
| १३. | **वीज** - (दशलक्ष कि.वॅ.तास) | | | | | | | |
| | एकूण निर्मिती | ३,२६८ | ७,९२५ | १७,८६४ | ३६,४३० | ६१,२०९ | ८३,०१७ | ८८,१३९ |
| | एकूण वापर | २,७२० | ७,६५० | १४,०३४ | २९,९७१ | ४७,२८९ | ८७,३९६ | १,००,६६५ |
| | औद्योगिक वापर | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ३८,११० |
| | कृषि वापर | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | २०,९८४ |
| | घरगुती वापर | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४७ | २२,८३१ |

* अस्थायी # कापसाचे उत्पादन १७० किलोची एक गासडी याप्रमाणे हजार गासड्यांमध्ये

@ पाया - त्रैवार्षिक सरासरी १९७९-८२ = १०० $ ऑगस्ट, १९९१ ते सप्टेंबर $$ ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर

# दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१२-१३* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१४. बँका - (अनुसूचित वाणिज्यिक)** | | (जून,१९७१) | (जून, १९८१) | (जून, १९९१) | (जून, २००१) | (जून, २०१०) | (जून, २०१२) |
| बँक कार्यालये | उ.ना. | १,४७१ | ३,६२७ | ५,५९१ | ६,२९४ | ८,०३७ | ९,२५३ |
| | | | | (मार्च, १९९१) | (मार्च, २००१) | | |
| ग्रामीण लोकसंख्येसाठी बँक कार्यालये | उ.ना. | ४५० | १,३५५ | २,७४९ | २,२९४ | २,१७० | २,३६५ |
| **१५. शिक्षण+ -** | | | | | | | |
| प्राथमिक शाळा | ३४,५९४ | ४४,५३५ | ५१,०४५ | ५७,७४४ | ६५,९६० | ७५,६९५ | १,०२,१२८ |
| विद्यार्थी (हजारात) | ४,१७८ | ६,५३९ | ८,३९२ | १०,४२४ | ११,८५७ | १०,६२६ | १६,२२७ |
| माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकांसह) | २,४६८ | ५,३१३ | ६,११९ | १०,५१९ | १५,३८९ | २१,३५७ | १८,५०५ |
| विद्यार्थी (हजारात) | ८५८ | १,९८५ | ३,३०९ | ६,२६० | ९,२६७ | १०,७११ | ५,६२५ |
| **१६. आरोग्य -** | | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) | (२०१२) |
| रुग्णालये | उ.ना. | २९९ | ५३० | ७६८ | १,१०२ | १,३६८ | १,३९३ |
| दवाखाने | उ.ना. | १,३७२ | १,७७६ | १,८९६ | १,५४४ | ३,०१२ | ३,०८७ |
| दर लाख लोकसंख्येमागे खाटा | उ.ना. | ८८ | ११४ | १४४ | १०६ | १०३ | १०६ |
| | | | | | | | (२०१२) |
| जन्मदर @ | ३४.७ | ३२.२ | २८.५ | २६.२ | २०.७ | १६.७ | १६.६ |
| मृत्युदर @ | १३.८ | १२.३ | ९.६ | ८.२ | ७.५ | ६.३ | ६.३ |
| अर्भक मृत्युदर @ | ८६ | १०५ | ७९ | ६० | ४५ | २५ | २५ |
| **१७. वाहतूक -** | | | | | | | |
| रेल्वे मार्गाची लांबी (किलोमीटर) | ५,०५६ | ५,२२६ | ५,२३३ | ५,४३४ | ५,४५९ | ५,९८४ | ६,१०७ |
| एकूण रस्त्यांची लांबी (किलोमीटर) † | ३९,२४१ | ६५,३६४ | १,४१,१३१ | १,७२,९६५ | २,१६,९६८ | २,४१,७१२ | २,४३,१७२ |
| *त्यापैकी* पृष्ठांकित | २४,८५२ | ३५,८५३ | ६६,६१६ | १,३२,०४८ | १,७८,९९९ | २,२१,१८२ | २,२३,३८१ |
| मोटार वाहने (हजारात) | १०० | ३१२ | ८०५ | २,६४१ | ६,६०७ | १६,९९० | २०,८७२ |
| **१८. सहकार -** | | | | | | | |
| प्राथमिक कृषि पतसंस्था | २१,४०० | २०,४२० | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ | २१,२३८ |
| सभासद (लाखात) | २२ | ३८ | ५४ | ७९ | १०१ | १५० | १६८ |
| सहकारी संस्थांची एकूण संख्या | ३१,५६५ | ४२,५९७ | ६०,७४७ | १,०४,६२० | १,५८,०१६ | २,२४,३०६ | २,३०,६७३ |
| एकूण सभासद (लाखात) | ४२ | ८६ | १४८ | २६९ | ४३० | ५३० | ५८१ |
| सहकारी संस्थांचे एकूण खेळते भांडवल (₹ कोटी) | २९१ | १,४८९ | ५,२१० | २४,२८४ | १,३४,४४० | २,४८,४३४ | २,५८,७९९ |
| **१९. स्थानिक स्वराज्य संस्था -** | | | | | | | (२०१३-१४) $ |
| जिल्हा परिषदा | २५ | २५ | २५ | २९ | ३३ | ३३ | ३३ |
| ग्रामपंचायती | २१,६३६ | २२,३०० | २४,२८१ | २५,८२७ | २७,७३५ | २७,९१३ | २७,८७३ |
| पंचायत समित्या | २९५ | २९६ | २९६ | २९८ | ३२१ | ३५१ | ३५१ |
| नगर परिषदा | २१९ | २२१ | २२० | २२८ | २२८ | २२२ | २२० |
| महानगरपालिका | ३ | ४ | ५ | ११ | १५ | २३ | २६ |
| नगर पंचायत | - | - | - | - | ३ | ४ | १२ |
| कटक मंडळे | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ |

* अस्थायी  @ नमुना नोंदणी पाहणी  उ. ना. उपलब्ध नाही

† सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्ते  $ राज्य निवडणूक आयोगाच्या अहवालानुसार

\+ वर्ष २०११-१२ पासून सदर माहितीचा आधार बदलला असल्यामुळे सदर माहिती प्राथमिक शाळा (१ ते ८) व माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) (९ ते १२) या स्वरुपात प्राप्त झाली असून पूर्वीची माहिती प्राथमिक शाळा (१ ते ७) व माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) (८ ते १२) या स्वरुपात आहे. तसेच सदर माहितीचा आधार युडीआयएसई आहे.

## ब. महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती

| बाब<br>(१) | परिमाण<br>(२) | महाराष्ट्र<br>(३) | भारत<br>(४) | भारताशी तुलना (टक्केवारी)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| **१. लोकसंख्या (२०११)** | | | | |
| १.१ एकूण लोकसंख्या | हजारात | १,१२,३७४ | १२,१०,८५५ | ९.३ |
| (अ) पुरुष | -"- | ५८,२४३ | ६,२३,२७० | ९.३ |
| (ब) स्त्रिया | -"- | ५४,१३१ | ५,८७,५८५ | ९.२ |
| १.२ (अ) ग्रामीण लोकसंख्या | हजारात | ६१,५५६ | ८,३३,७४९ | ७.४ |
| (ब) ग्रामीण लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | टक्के | ५४.८ | ६८.९ | ... |
| १.३ (अ) नागरी लोकसंख्या | हजारात | ५०,८१८ | ३,७७,१०६ | १३.५ |
| (ब) नागरी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | टक्के | ४५.२ | ३१.१ | ... |
| १.४ स्त्री-पुरुष प्रमाण | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या | ९२९ | ९४३ | ... |
| १.५ लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धीदर (२००१-२०११) | टक्के | १६.० | १७.७ | ... |
| १.६ साक्षरता प्रमाण | -"- | ८२.३ | ७३.० | ... |
| १.७ अनुसूचित जाती व जमातींची लोकसंख्या | हजारात | २३,७८६ | ३,०५,९२४ | ७.८ |
| १.८ एकूण काम करणारे | -"- | ४९,४२८ | ४,८१,८८९ | १०.३ |
| १.९ भौगोलिक क्षेत्र (२०११) | लाख चौ.कि.मी. | ३.०८ | ३२.९ | ९.४ |
| **२. कृषि (२०१०-११)** | | | | |
| २.१ निव्वळ पेरणी क्षेत्र | हजार हेक्टर | १७,४०६ | १,४१,५७९ | १२.३ |
| २.२ पिकांखालील स्थूल क्षेत्र | -"- | २३,१७५ | १,९८,९६९ | ११.६ |
| २.३ स्थूल सिंचित क्षेत्र | -"- | उ.ना. | ८९,३६० | ... |
| २.४ स्थूल सिंचित क्षेत्राची एकूण पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी | टक्के | उ.ना. | ४४.९ | ... |
| २.५ प्रमुख पिकांखालील क्षेत्र (२००८-०९ ते २०१०-११ या वर्षाची सरासरी) | | | | |
| (१) तांदूळ | हजार हेक्टर | १,५०३ | ४३,४३९ | ३.५ |
| (२) गहू | -"- | १,१३७ | २८,४२६ | ४.० |
| (३) ज्वारी | -"- | ४,१०२ | ७,५६७ | ५४.२ |
| (४) बाजरी | -"- | ९७८ | ९,०९० | १०.८ |
| (५) एकूण तृणधान्ये | -"- | ८,६८२ | ९९,६८७ | ८.७ |
| (६) एकूण अन्नधान्ये (तृणधान्ये व कडधान्ये) | -"- | १२,१८३ | १,२३,६१३ | ९.९ |
| (७) ऊस क्षेत्र | -"- | ८९६ | ४,४९२ | १९.९ |
| तोडणी क्षेत्र | -"- | ८३० | उ.ना. | ... |
| (८) कापूस | -"- | ३,४९३ | १०,२५८ | ३४.१ |
| (९) भूईमूग | -"- | ३४५ | ५,८३३ | ५.९ |

उ.ना. उपलब्ध नाही

# महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती

| बाब | परिमाण | महाराष्ट्र | भारत | भारताशी तुलना (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| **३. पशुधन गणना** | | | | |
| ३.१ एकूण पशुधन (२००७) | हजारात | ३५,९५५ | ५,२९,६९८ | ६.८ |
| ३.२ व्हील ट्रॅक्टर्स (२००३) | -"- | १०६ | २,३६१ | ४.५ |
| ३.३ सिंचनाकरिता वापरलेली डिझेल इंजिने व इलेक्ट्रीक पंप (२००३) | -"- | १,१७४ | १५,६८४ | ७.५ |
| **४. वने** | | | | |
| ४.१ एकूण वन क्षेत्र (२०१२) * | चौ.कि.मी. | ६१,३६९ | ७,६९,५१२ | ८.० |
| **५. उद्योग** | | | | |
| ५.१ औद्योगिक गुंतवणूक $ | | | | |
| (अ) मंजूर प्रकल्प | संख्या | १८,४०६ | १,०२,१५७ | १८.० |
| (ब) प्रस्तावित गुंतवणूक | ₹ कोटी | १०,२१,६३३ | १,०५,२०,२३६ | ९.७ |
| ५.२ विदेशी थेट गुंतवणूक $$ | | | | |
| (अ) मंजूर प्रकल्प | संख्या | ४,२४६ | २०,६४३ | २०.६ |
| (ब) प्रस्तावित गुंतवणूक | ₹ कोटी | ९७,७९९ | ४,२५,८११ | २२.९ |
| **६. वीज (२०११-१२)** | | | | |
| ६.१ एकूण निर्मिती | दशलक्ष कि. वॅ. तास | ८९,४६५ | ९,२२,४५१ | ९.७ |
| ६.२ एकूण वापर | -"- | ९६,६४४ | ६,७२,९३३ | १४.४ |
| ६.३ (अ) औद्योगिक वापर | -"- | ३६,४८६ | २,४०,००० | १५.२ |
| (ब) औद्योगिक वापराची एकूण वापराशी टक्केवारी | टक्के | ३७.८ | ३५.७ | ... |
| **७. बँका** (अनुसूचित वाणिज्यिक) (मार्च, २०१३) | | | | |
| ७.१ बँक कार्यालये | संख्या | ९,७७४ | १,०४,६४७ | ९.३ |
| ७.२ बँक कार्यालये असलेली शहरे व गावे | -"- | २,६५७ | ३८,६५१ | ६.९ |
| **८. राज्य / राष्ट्रीय उत्पन्न (२०१२-१३)+** | | | | |
| ८.१ चालू किंमतीनुसार उत्पन्न | ₹ कोटी | ११,९६,७५४ | ८२,५५,९७८ | १४.५ |
| ८.२ चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न | ₹ | १,०३,९९१ | ६७,८३९ | ... |
| ८.३ घटक खर्चावर आधारित स्थूल राज्य उत्पन्न / देशांतर्गत स्थूल उत्पन्न | ₹ कोटी | १३,२३,७६८ | ९३,८८,८७६ | १४.१ |
| ८.४ दरडोई स्थूल राज्य उत्पन्न / देशांतर्गत स्थूल उत्पन्न | ₹ | १,१५,०२७ | ७७,१४८ | ... |

* अस्थायी     $ ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०१३     $$ ऑगस्ट, १९९१ ते मार्च, २०१२     + पहिले सुधारित अंदाज

१

# राज्य अर्थव्यवस्था

# १. राज्य अर्थव्यवस्था

## राज्य उत्पन्न

१.१ पूर्वानुमानानुसार २०१३-१४ च्या स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्नात ८.७ टक्के वाढ अपेक्षित आहे. कृषि व संलग्न कार्ये क्षेत्रात चार टक्क्यांची, उद्योग क्षेत्रात ८.८ टक्क्यांची व सेवा क्षेत्रात ९.३ टक्क्यांची वाढअपेक्षित आहे.

१.२ पहिल्या सुधारित अंदाजानुसार २०१२-१३ च्या स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्नात ६.२ टक्के वाढ होऊन ते ₹८,२५,८३२ कोटी झाले जे मागील वर्षी ₹ ७,७७,७९१ कोटी होते. चालू किंमतीनुसार २०१२-१३ चे स्थूल राज्य उत्पन्न ₹ १३,२३,७६८ कोटी असून ते मागील वर्षीपेक्षा १२.६ टक्क्यांनी अधिक आहे.

१.३ पहिल्या सुधारित अंदाजानुसार २०१२-१३ मध्ये निव्वळ राज्य उत्पन्न ₹ ११,९६,७५४ कोटी तर दरडोई निव्वळ राज्य उत्पन्न ₹ १,०३,९९१ इतके आहे.

## किंमती

१.४ एप्रिल ते डिसेंबर, २०१३ या कालावधीसाठी राज्यातील ग्रामीण व नागरी भागाचे सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक मागील वर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत अनुक्रमे १२.५ टक्क्यांनी व १२.० टक्क्यांनी वाढले.

१.५ अखिल-भारतीय घाऊक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष ते वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल, २०१३ मध्ये ४.८ टक्के होता. तो नोव्हेंबर, २०१३ मध्ये ७.५ टक्के इतका वाढला, जो मागील १४ महिन्यांतील सर्वोच्च दर होता. ‘खाद्य पदार्थ’ उपगटासाठी तो एप्रिल, २०१३ मधील ६.१ टक्क्यांवरुन नोव्हेंबर, २०१३ मध्ये १९.७ टक्के इतका वाढला. डिसेंबर, २०१३ मध्ये ‘सर्व वस्तुंसाठी’ आणि ‘खाद्य पदार्थ’ उपगटासाठी तो कमी होऊन ६.४ टक्के व १३.७ टक्के इतका झाला.

## लोकवित्त

१.६ राज्य शासनाची २०१३-१४ (सुधारित अंदाज) मधील महसुली जमा ₹ १,५८,४१० कोटी तर २०१२-१३ मध्ये ₹ १,४२,९४७ कोटी होती. कर महसूल आणि करेतर महसूल अनुक्रमे ₹ १,२६,९६१ कोटी आणि ₹ ३१,४४९ कोटी आहे. एप्रिल ते डिसेंबर, २०१३ या कालावधीत प्रत्यक्ष महसुली जमा ₹ १,०३,६१९ कोटी (सुधारित अंदाजाच्या ६५.४ टक्के ) होती.

१.७ तेराव्या वित्त आयोगाने राज्याला विशिष्ट कार्यासाठी सहाय्यक अनुदाने देण्याची शिफारस केली आहे. सहाय्यक अनुदानांपोटी २०१३-१४ मध्ये ₹ २,७३२ कोटी प्राप्त आहे. त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता दिलेले सर्वसाधारण मूलभूत अनुदान ₹ १,०८९ कोटी व सर्वसाधारण कार्यात्मक अनुदान ₹ १६९ कोटी यांचा समावेश आहे.

१.८ राज्य शासनाचा २०१३-१४ (सुधारित अंदाज) मधील महसुली खर्च ₹ १,६१,४२७ कोटी तर तो २०१२-१३ मध्ये तो ₹ १,३८,७३६ कोटी इतका आहे.

१.९ सन २०१३-१४ (सुधारित अंदाज) मध्ये महसुली तूट ₹ ३,०१७ कोटी, वित्तीय तूट ₹ २६,५६३ कोटी आणि ऋणभार ₹ २,७१,८४५ कोटी इतका आहे.

१.१० सन २०१३-१४ (सुधारित अंदाज) मधील वित्तीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १.८ टक्के तसेच ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १८.४ टक्के आहे जे तेराव्या वित्त आयोगाने ठरवून दिलेल्या एकत्रित वित्तीय सुधारणांच्या मर्यादेत आहे.

## संस्थांद्वारे वित्तपुरवठा

१.११ मार्च, २०१३ च्या अखेरीस बँकांतील एकूण ठेवी ₹ १७.८५ लाख कोटी, एकूण कर्ज ₹ १५.७६ लाख कोटी आणि कर्जाचे ठेवीशी असलेले प्रमाण ८८.३ टक्के होते.

१.१२ ३१ मार्च, २०१३ रोजी ६.९ लाख स्व-सहाय्यता गटांच्या ठेवी ₹ ५१३.७ कोटी होत्या. एकूण स्व-सहाय्यता गटांपैकी २.२० लाख स्व-सहाय्यता गटांकडे ₹ १,२२९ कोटीचे कर्ज थकीत होते. २०१२-१३ मध्ये ०.५५ लाख स्व-सहाय्यता गटांना ₹ ५७८ कोटी इतके कर्ज वाटप करण्यात आले.

१.१३ वित्तीय समावेशा अंतर्गत मार्च, २०१४ अखेरपर्यंत बँक सुविधा नसलेल्या ६३१ गावांमध्ये बँक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या व ७.८२ लाख 'नो फ्रिल' खाती उघडण्यात आली.

## कृषि व संलग्न कार्ये

१.१४ सन २०१३ मध्ये राज्यात सरासरीच्या १२४.६ टक्के इतका पाऊस पडला. राज्यातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांतील तालुके वगळून) १८६ तालुक्यांत सरासरीपेक्षा अधिक, १५३ तालुक्यांत सरासरीएवढा तर १६ तालुक्यांत अपुरा पाऊस पडला.

१.१५ सन २०१३-१४ च्या खरीप हंगामामध्ये १५०.३४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली असून ती मागील वर्षाच्या (१४६.९९ लाख हेक्टर) तुलनेत दोन टक्के जास्त आहे. मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्यांच्या व कडधान्यांच्या पिकांखालील क्षेत्रात अनुक्रमे एक टक्का व चार टक्के घट तर तेलबियांखालील क्षेत्रात २२ टक्के वाढ झाली आहे. तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया आणि कापूस यांच्या उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे २१ टक्के, पाच टक्के, तीन टक्के आणि ११ टक्के वाढ तर ऊसाच्या उत्पादनात तीन टक्के घट अपेक्षित आहे.

१.१६ सन २०१३-१४ च्या खरीप हंगामात पडलेल्या समाधानकारक पावसामुळे व रब्बी हंगामातील हवेतील ओलाव्यामुळे रब्बी हंगामातील क्षेत्रात मागील वर्षाच्या तुलनेत १५ टक्के वाढ झाली आहे. तृणधान्ये व तेलबिया पिकांखालील उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे ७६ टक्के व ३४ टक्के वाढ अपेक्षित आहे. कडधान्ये पिकांखालील क्षेत्रात झालेल्या वाढीमुळे कडधान्यांच्या उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत १११ टक्के वाढ अपेक्षित आहे.

१.१७ सन २०१३-१४ च्या द्वितीय पूर्व अंदाजांनुसार मागील वर्षीच्या तुलनेत अन्नधान्ये, तेलबिया आणि कापूस यांच्या उत्पादनात अनुक्रमे ३८ टक्के, पाच टक्के व ११ टक्के वाढ अपेक्षित आहे.

१.१८ वर्ष २०१२-१३ मध्ये वाणिज्यिक बँकांकडून ₹ ११,७७६ कोटी, प्रादेशिक ग्रामीण बँकांकडून ₹ १,४०१ कोटी आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक/जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका/भूविकास बँका यांचेकडून ₹ ११,०७६ कोटी रुपयांच्या पिक कर्जाचे वाटप करण्यात आले. तसेच सदर बँकांकडून अनुक्रमे ₹ ५,४४४ कोटी, ₹ ८७ कोटी आणि ₹ ८८३ कोटी रकमेच्या कृषि मुदत कर्जाचे वाटप करण्यात आले. सन २०१२-१३ मध्ये प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांकडून शेतकऱ्यांना ₹ ८,३२४ कोटींचे कर्जवाटप करण्यात आले. त्यापैकी, ₹ ४,७६१ कोटी रकमेची कर्जे अल्पभूधारक व सीमांतिक शेतकऱ्यांना देण्यात आली.

१.१९ शासकीय व सहकारी दुग्धसंस्थांद्वारे वर्ष २०१३-१४ मध्ये दैनिक सरासरी दूध संकलन ३९.२२ लाख लिटर होते, तर वर्ष २०१२-१३ मध्ये ते ४०.७४ लाख लिटर होते. वर्ष २०१२-१३ मध्ये दुधाचे एकूण उत्पादन ८७ लाख मे. टन होते.

१.२० सागरी व गोड्या पाण्यातील अंदाजित मत्स्य उत्पादन डिसेंबर, २०१३ अखेर अनुक्रमे ३.१० लाख मे. टन व १.०५ लाख मे. टन होते, तर २०१२-१३ मध्ये ते अनुक्रमे ४.४९ लाख मे. टन व १.३७ लाख मे. टन होते.

## उद्योग

१.२१ ऑगस्ट, १९९१ ते मार्च, २०१२ या कालावधीत राज्यात ₹ ९७,७९९ कोटी थेट विदेशी गुंतवणुकीच्या ४,२४६ प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्यापैकी, ४५ टक्के प्रकल्प पूर्ण झाले असून १० टक्के प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येत आहे व त्यातील गुंतवणूक अनुक्रमे ५१ टक्के व आठ टक्के आहे.

## सहकार

१.२२ ३१ मार्च, २०१३ रोजी सुमारे ५८१ लाख सभासद असलेल्या २.३१ लाख सहकारी संस्था कार्यरत होत्या. त्यापैकी, नऊ टक्के कृषि पतपुरवठा, १० टक्के बिगर-कृषि पतपुरवठा तर ८१ टक्के पणन, उत्पादन, उपसा जलसिंचन, विद्युत पुरवठा, पाणी पुरवठा, वाहतूक, सामाजिक क्षेत्र, इत्यादींमध्ये कार्यरत होत्या.

## ऊर्जा

१.२३ विजेची स्थापित क्षमता ३१ डिसेंबर, २०१३ रोजी २६,४९३ मेगावॅट होती. डिसेंबर, २०१३ अखेर ६६,३९६ दशलक्ष युनिटस् इतकी वीज निर्मिती झाली, जी मागील वर्षीच्या तत्सम कालावधी पेक्षा थोडी कमी होती. अक्षय उर्जेची स्थापित क्षमता ५,४५२ मेगावॅट होती व त्यापासून डिसेंबर, २०१३ अखेरपर्यंत ५,०२५ मिलियन युनिटसची वीज निर्मिती झाली. महापारेषण कंपनीची पारेषण हानी ४.१ टक्के होती. सन २०१२-१३ मध्ये महावितरण कंपनीची वितरण हानी १४.७ टक्के तर एकत्रित तांत्रिक व व्यावसायिक (एटी अँन्ड सी) हानी १८.७ टक्के होती.

## परिवहन

१.२४ मार्च, २०१३ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदेच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी (स्थानिक स्वराज्य संस्थांच्या देखभालीअंतर्गत रस्त्यांची लांबी वगळून) २.४३ लाख किमी इतकी होती. सुमारे ९९ टक्के पेक्षा जास्त गावे बारमाही वा हंगामी रस्त्यांनी जोडलेली होती तर २७८ गावे कोणत्याही रस्त्यांनी जोडलेली नव्हती.

१.२५ १ जानेवारी, २०१४ रोजी राज्यातील रस्त्यावर असणा-या वाहनांची एकूण संख्या २२८ लाख होती (दर लाख लोकसंख्येमागे २०,५०४ वाहने आणि प्रति किमी रस्ते लांबीला ९४ वाहने).

## सामाजिक क्षेत्र

१.२६ जनगणना २०११ नुसार, राज्याची एकूण लोकसंख्या ११.२४ कोटी असून स्त्रियांचे प्रमाण ४८.२ टक्के आहे. नागरी भागातील लोकसंख्येचे प्रमाण ४५.२ टक्के आहे. लोकसंख्येची दशवार्षिक वाढ जवळपास १६ टक्के आहे. राज्यातील स्त्री-पुरूष प्रमाण ९२९ असून ते ०-६ वर्षे वयोगटातील बालकांमध्ये ८९४ आहे. राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ८२ टक्के आहे.

१.२७ सन २०१२-१३ मध्ये मुलींसाठी शौचालये (कार्यरत) उपलब्ध असलेल्या शाळांची टक्केवारी ७७ इतकी होती. सन २०१२-१३ मध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध असणा-या शाळांची टक्केवारी ९८.४ इतकी होती.

१.२८ सन २०१२ मधील जन्म दर, अर्भक मृत्युदर व मृत्युदर हे अनुक्रमे १६.६, २५ व ६.३ होते, तर २०११ मध्ये हेच दर अनुक्रमे १६.७, २५ व ६.३ होते. सन २०१०-२०१२ या कालावधीत माता मृत्यू प्रमाण ८७ होते.

१.२९ इंदिरा आवास योजनेअंतर्गत सन २०१२-१३ मध्ये १,४५,७६४ घरे बांधण्यात आली. शहरी गरिबांकरिता मूलभूत सेवा आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत डिसेंबर, २०१३ पर्यंत अनुक्रमे ५९,१७७ व २६,०१४ सदनिका बांधण्यात आल्या.

१.३० पुरक पोषण आहार कार्यक्रमांतर्गत सन २०१२-१३ मध्ये ग्रामीण (आदिवासीसह) व नागरी भागातील लाभार्थ्यांची संख्या अनुक्रमे ६२.१० लाख आणि १२.२२ लाख होती.

१.३१ ३१ मार्च, २०१३ रोजी एलपीजी संच बसविण्यात आलेल्या वाहनांची संख्या १.४६ लाख तर सीएनजी संच बसविण्यात आलेल्या वाहनांची संख्या ३.२३ लाख होती.

१.३२ ‘भारत मानव विकास अहवाल-२०११’, नुसार भारतात राज्याचे स्थान पाचवे असून, त्याआधी अनुक्रमे केरळ, दिल्ली, गोवा व पंजाब या राज्यांचा क्रम लागतो.

* * * * *

२

# लोकसंख्या



# २. लोकसंख्या

२.१ भारताचे महानिबंधक यांनी प्राथमिक जनगणना गोषवारा, २०११ प्रकाशित केला आहे. राज्याची एकूण लोकसंख्या ११.२४ कोटी इतकी असून निवासी घरे २.३७ कोटी आहेत. जनगणना २००१ नुसार राज्याची लोकसंख्या ९.६९ कोटी इतकी होती व १.८८ कोटी इतकी निवासी घरे होती.

२.२ राज्याचा दशवार्षिक लोकसंख्या वृध्दीदर ६.७ टक्के अंकानी कमी झाला असून राष्ट्रीय पातळीवर तो ३.८ टक्के अंकांनी कमी झाला आहे. राज्यामध्ये दशवार्षिक लोकसंख्या वृध्दीदरात नोंदवली गेलेली ही सर्वाधिक घट आहे. राज्यांमध्ये कुटुंबाचा सरासरी आकार ४.६ असून राष्ट्रीय स्तरावर ४.९ इतका आहे. राज्याची विभागनिहाय लोकसंख्येची वैशिष्ट्ये तक्ता २.१ मध्ये दिली आहेत.

**आलेख २.१ : दशवार्षिक लोकसंख्या वृद्धीदर**




**तक्ता २.१ महाराष्ट्रातील विभागनिहाय लोकसंख्येची वैशिष्ट्ये**

| वैशिष्ट्ये | कोकण | नाशिक | पुणे | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | राज्य | भारत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लोकसंख्या (लाखात) | | | | | | | | |
| एकूण | २८६ | १८६ | २३४ | १८७ | ११३ | ११८ | १,१२४ | १२,१०९ |
| पुरुष | १५१ | ९६ | १२१ | ९७ | ५८ | ६० | ५८२ | ६,२३३ |
| स्त्रिया | १३५ | ९० | ११४ | ९० | ५५ | ५८ | ५४१ | ५,८७६ |
| ग्रामीण | ६३ | १२९ | १३८ | १३७ | ८१ | ६८ | ६१६ | ८,३३७ |
| नागरी | २२३ | ५७ | ९७ | ५१ | ३१ | ५० | ५०८ | ३,७७१ |
| अनुसूचित जाती | १८ | १७ | ३० | ३० | १९ | १९ | १३३ | २,०१४ |
| | (६.३) | (९.१) | (१२.८) | (१५.९) | (१६.९) | (१६.२) | (११.८) | (१६.६) |
| अनुसूचित जमाती | २० | ४३ | ५ | ७ | १२ | १७ | १०५ | १०४३ |
| | (७.०) | (२३.३) | (२.२) | (४.०) | (१०.९) | (१४.४) | (९.४) | (८.६) |
| स्त्री-पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रति '००० पुरुष) | ८९४ | ९३८ | ९४१ | ९३१ | ९४४ | ९६४ | ९२९ | ९४३ |
| बाल लिंग गुणोत्तर (वय ० ते ६ वर्षे) | ९२१ | ८७६ | ८८० | ८७० | ९०० | ९४१ | ८९४ | ९१९ |
| साक्षरतेचे प्रमाण (टक्के) (वय ७ वर्षे व त्यावरील) | | | | | | | | |
| एकूण | ८७ | ७८ | ८३ | ७६ | ८५ | ८५ | ८२ | ७३ |
| पुरुष | ९१ | ८५ | ८९ | ८५ | ९१ | ९० | ८८ | ८१ |
| स्त्रिया | ८२ | ७१ | ७६ | ६७ | ७९ | ७९ | ७६ | ६५ |
| लोकसंख्येची घनता (प्रति चौ.किमी) | ९३१ | ३२३ | ४०९ | २८९ | २४५ | २२९ | ३६५ | ३८२ |

आधार : भारताचे महानिबंधक

टीप: कंसातील आकडेवारी एकूण लोकसंख्येशी प्रमाण दर्शवितात.

## अनुसूचित जातींची लोकसंख्या

२.३ राज्यातील अनुसूचित जाती (अजा) प्रवर्गातील लोकसंख्या १.३३ कोटी असून त्यापैकी ०.७५ कोटी ग्रामीण भागांत व ०.५८ कोटी शहरी भागांमध्ये राहते. अजा प्रवर्गातील लोकसंख्या प्रत्यक्ष आकड्यात पुणे जिल्ह्यात सर्वाधिक (१२ लाख) असून नंदुरबारमध्ये ती सर्वात कमी (०.४८ लाख) आहे. राज्यातील अजा प्रवर्गाचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ११.८ टक्के असून २००१ मध्ये हे प्रमाण १०.२ टक्के होते. हे प्रमाण अकोला जिल्ह्यामध्ये सर्वाधिक (२०.८ टक्के) तर नंदुरबारमध्ये सर्वात कमी (२.९ टक्के) आहे.

## अनुसूचित जमातींची लोकसंख्या

२.४ राज्यातील अनुसूचित जमाती (अज) प्रवर्गातील लोकसंख्या १.०५ कोटी असून त्यापैकी ०.९० कोटी ग्रामीण भागांत व ०. १५ कोटी शहरी भागांमध्ये राहते. अज प्रवर्गातील लोकसंख्या प्रत्यक्ष आकड्यात नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक (१६ लाख) असून सिंधूदुर्गमध्ये ती सर्वात कमी (०.०७ लाख) आहे. राज्यातील अज प्रवर्गाचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ९.४ टक्के असून २००१ मध्ये हे प्रमाण ८.९ टक्के होते. हे प्रमाण नंदुरबार जिल्ह्यामध्ये सर्वाधिक (६९.३ टक्के) तर सांगलीमध्ये सर्वात कमी (०.७ टक्के)आहे.

## वयोगटानुसार लोकसंख्या

२.५ आर्थिक दृष्ट्या सक्रीय लोकसंख्येवर (१५ ते ५९ वर्षे) अवलंबून असलेले लोकसंख्येचे प्रमाण अवलंबन गुणोत्तर दर्शविते. राज्याच्या अवलंबन गुणोत्तरात २००१ मध्ये ६९१ च्या तुलनेत लक्षणीय घट होऊन ते २०११ मध्ये ५७८ झाले. राष्ट्रीय पातळीवर याच कालावधीत हे प्रमाण ७५२ वरुन ६५२ पर्यंत कमी झाले आहे. राज्यातील लोकसंख्येच्या वयाची मध्यमा २७.१ वर्षे (म्हणजे ५० टक्के लोकसंख्या २७ वर्षे व त्यापेक्षा कमी वयोगटातील आहे) असून भारतासाठी २४.९ वर्षे आहे. सन २००१ मध्ये राज्य व राष्ट्रीय पातळीवर तत्सम आकडेवारी अनुक्रमे २४.४ वर्षे व २२.७ वर्षे इतकी होती. वयोगटानुसार लोकसंख्येचे प्रमाण व स्त्री-पुरुष प्रमाण तक्ता २.२ मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता २.२ वयोगटानुसार लोकसंख्येचे प्रमाण व स्त्री-पुरुष प्रमाण**

| वयोगट (वर्षे) | लोकसंख्येचे प्रमाण | | स्त्री-पुरुष प्रमाण | |
|---|---|---|---|---|
| | २००१ | २०११ | २००१ | २०११ |
| ०-६ | १४.१ | ११.९ | ९१३ | ८९४ |
| ०७-१४ | १८.० | १४.८ | ९१८ | ८९७ |
| १५-२६ | २३.४ | २३.६ | ८६१ | ८९१ |
| २७-४९ | २९.४ | ३१.९ | ९२० | ९३५ |
| ५०-५९ | ६.३ | ७.८ | ९२२ | ९३३ |
| ६० + | ८.७ | ९.९ | १,१५० | १,११४ |
| **एकूण** | **१००.०** | **१००.०** | **९२२** | **९२९** |

आधार : भारताचे महानिबंधक

**आलेख २.२ : राज्यातील वयोगटानुसार लोकसंख्येचे प्रमाण**









## कामातील सहभागाचा दर

२.६ राज्यातील ४.९४ कोटी आर्थिक कार्यात सक्रीय असून त्यापैकी ४.३८ कोटी मुख्यत: काम करणारे तर ०.५७ कोटी सीमांतीक कामगार आहेत. मागील दहा वर्षांमध्ये राज्याचा कामातील सहभागाचा दर ४२.४ टक्क्यावरुन ४४ टक्के इतका झाला आहे. राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी काम करणा-यांचे प्रमाण पुरुषांमध्ये ५६ टक्के तर स्त्रियांमध्ये ३१.१ टक्के इतके आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये हे प्रमाण सर्वाधिक (५४.५ टक्के) असून मुंबई उपनगर मध्ये सर्वात कमी (३९.९ टक्के) आहे. महाराष्ट्राच्या कामातील सहभागाच्या दरातील दशवार्षिक बदल तक्ता २.३ मध्ये दर्शविले आहेत तर जिल्हानिहाय कामातील सहभागाचा दर परिशिष्ट २.३ मध्ये दिलेला आहे.

**तक्ता २.३ महाराष्ट्राच्या कामातील सहभागाच्या दरातील दशवार्षिक बदल**

| लिंग | जनगणना | | | |
|---|---|---|---|---|
| | २००१ | | २०११ | |
| | ग्रामीण | शहरी | ग्रामीण | शहरी |
| पुरुष | ५३.९ | ५२.४ | ५६.७ | ५५.२ |
| स्त्रिया | ४३.६ | १२.६ | ४२.५ | १६.८ |
| **एकूण** | **४८.९** | **३३.८** | **४९.८** | **३६.९** |

आधार : भारताचे महानिबंधक

## नि:शक्त व्यक्तींची लोकसंख्या

२.७ जनगणना २०११ नुसार राज्यातील नि:शक्त व्यक्तींची लोकसंख्या ३० लाख (२.६ टक्के) इतकी आहे जी जनगणना २००१ च्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे. प्रकारानुसार नि:शक्त लोकसंख्येचे प्रमाण तक्ता २.४ मध्ये दिले आहे. जिल्हानिहाय नि:शक्त लोकसंख्येचे प्रमाण परिशिष्ट २.३ मध्ये दिले आहे.

**तक्ता २.४ प्रकारानुसार नि:शक्त लोकसंख्येचे प्रमाण**

| प्रकार | एकूण | पुरुष | स्त्रिया | अजा | अज | ग्रामीण | नागरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अंध | १९.४ | १८.४ | २०.६ | २०.९ | २१.१ | १९.३ | १९.५ |
| कर्णबधीर | १६.० | १५.७ | १६.४ | १४.४ | १७.६ | १४.३ | १८.२ |
| मूक/वाचादोष | १६.० | १५.४ | १६.७ | ९.९ | ८.९ | १४.५ | १७.९ |
| पांगळे | १८.५ | २१.१ | १५.० | १९.५ | २०.५ | २१.८ | १४.३ |
| मंदबुध्दी | ५.४ | ५.३ | ५.५ | ५.४ | ५.० | ५.५ | ५.२ |
| मनोरुग्ण | २.० | १.९ | २.० | १.९ | २.० | २.० | १.९ |
| इतर | १७.२ | १६.५ | १८.२ | २२.४ | १९.० | १६.२ | १८.५ |
| एकाधिक | ५.५ | ५.६ | ५.५ | ५.६ | ६.१ | ६.४ | ४.५ |
| एकूण | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| (प्रत्यक्ष आकड्यात) | (२९,६३,३९२) | (१६,९२,२८५) | (१२,७१,१०७) | (४,०६,२७७) | (२,१६,७०६) | (१६,६६,१३५) | (१२,९७,२५७) |

आधार : भारताचे महानिबंधक

# झोपडपट्ट्यांमधील लोकसंख्या

२.८ जनगणना २०११ नुसार राज्यातील १.१८ कोटी लोकसंख्या झोपडपट्ट्यांमध्ये राहत असून देशातील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या एकूण लोकसंख्येपैकी सर्वाधिक प्रमाण (१८ टक्के) राज्यामध्ये आहे. राज्यातील शहरी लोकसंख्येशी झोपडपट्टी क्षेत्रामधील लोकसंख्येचे प्रमाण २३.३ टक्के असून २००१ मध्ये हे प्रमाण २७.३ टक्के होते. झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकसंख्येचा कामातील सहभागाचा दर ३८.१ असून तेथील पुरुष व स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ८९.३ व ७९.० इतके आहे. राज्यातील झोपडपट्टी क्षेत्रामधील स्त्री-पुरुष प्रमाण ८७२ इतके आहे. झोपडपट्ट्यांमधील राहणाऱ्या लोकसंख्येबाबत ठळक बाबी तक्ता २.३ मध्ये दिलेले आहे.

**तक्ता २.५ झोपडपट्ट्यांमधील राहणाऱ्या लोकसंख्येबाबत ठळक बाबी**

| वैशिष्ट्ये | जनगणना | |
|---|---|---|
| | २००१ | २०११ |
| लोकसंख्या (कोटीमध्ये) | १.११ | १.१८ |
| अजा लोकसंख्येचे प्रमाण | ११.५ | १५.७ |
| अज लोकसंख्येचे प्रमाण | २.५ | ३.१ |
| साक्षरतेचे प्रमाण | | |
| एकूण | ८०.९ | ८४.६ |
| पुरुष | ८७.६ | ८९.३ |
| स्त्रिया | ७२.३ | ७९.० |
| कामातील सहभागाचा दर | | |
| एकूण | ३४.९ | ३८.१ |
| पुरुष | ५३.७ | ५६.५ |
| स्त्रिया | १२.० | १७.० |
| स्त्री-पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रति '००० पुरुष) | ८२५ | ८७२ |

आधार : भारताचे महानिबंधक

* * * * *

# परिशिष्ट २.१

## जिल्हानिहाय लोकसंख्याविषयक निर्देशक
## जनगणना २०११

| अनु. क्र. | जिल्हा | एकूण कुटुंबे (हजारात) | एकूण लोकसंख्या (हजारात) | | | सरासरी कुटुंबाचा आकार | नागरी लोकसंख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | एकूण | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (९) |
| १ | मुंबई शहर | ६७४ | १,६८५ | १,४०१ | ३,०८५ | ४.६ | १००.० |
| २ | मुंबई उपनगर | २,१०६ | ५,०३१ | ४,३२६ | ९,३५७ | ४.४ | १००.० |
| ३ | ठाणे | २,५२९ | ५,८६५ | ५,१९५ | ११,०६० | ४.४ | ७७.० |
| ४ | रायगड | ६१२ | १,३४४ | १,२९० | २,६३४ | ४.३ | ३६.८ |
| ५ | रत्नागिरी | ३९७ | ७६१ | ८५४ | १,६१५ | ४.१ | १६.३ |
| ६ | सिंधुदुर्ग | २१० | ४१७ | ४३२ | ८५० | ४.० | १२.६ |
| ७ | नाशिक | १,२२३ | ३,१५७ | २,९५० | ६,१०७ | ५.० | ४२.५ |
| ८ | धुळे | ४०९ | १,०५४ | ९९७ | २,०५१ | ५.० | २७.८ |
| ९ | नंदुरबार | ३२४ | ८३३ | ८१५ | १,६४८ | ५.१ | १६.७ |
| १० | जळगाव | ९०४ | २,१९७ | २,०३३ | ४,२३० | ४.७ | ३१.७ |
| ११ | अहमदनगर | ९३० | २,३४३ | २,२०० | ४,५४३ | ४.९ | २०.१ |
| १२ | पुणे | २,१५२ | ४,९२४ | ४,५०५ | ९,४२९ | ४.४ | ६१.० |
| १३ | सातारा | ६५४ | १,५११ | १,४९३ | ३,००४ | ४.६ | १९.० |
| १४ | सांगली | ५९८ | १,४३६ | १,३८६ | २,८२२ | ४.७ | २५.५ |
| १५ | सोलापूर | ८७३ | २,२२८ | २,०९० | ४,३१८ | ४.९ | ३२.४ |
| १६ | कोल्हापूर | ८४० | १,९८१ | १,८९५ | ३,८७६ | ४.६ | ३१.७ |
| १७ | औरंगाबाद | ७५२ | १,९२४ | १,७७७ | ३,७०१ | ४.९ | ४३.८ |
| १८ | जालना | ३९२ | १,०११ | ९४८ | १,९५९ | ५.० | १९.३ |
| १९ | परभणी | ३६१ | ९४३ | ८९३ | १,८३६ | ५.१ | ३१.० |
| २० | हिंगोली | २२९ | ६०६ | ५७१ | १,१७७ | ५.१ | १५.२ |
| २१ | बीड | ५३६ | १,३४९ | १,२३६ | २,५८५ | ४.८ | १९.९ |
| २२ | नांदेड | ६६५ | १,७३० | १,६३१ | ३,३६१ | ५.१ | २७.२ |
| २३ | उस्मानाबाद | ३५१ | ८६२ | ७९६ | १,६५८ | ४.७ | १७.० |
| २४ | लातूर | ४८२ | १,२७३ | १,१८१ | २,४५४ | ५.१ | २५.५ |
| २५ | बुलढाणा | ५६२ | १,३३८ | १,२४९ | २,५८६ | ४.६ | २१.२ |
| २६ | अकोला | ३९६ | ९३२ | ८८२ | १,८१४ | ४.६ | ३९.७ |
| २७ | वाशिम | २५९ | ६२० | ५७७ | १,१९७ | ४.६ | १७.७ |
| २८ | अमरावती | ६४७ | १,४८१ | १,४०८ | २,८८८ | ४.५ | ३५.९ |
| २९ | यवतमाळ | ६४७ | १,४२० | १,३५२ | २,७७२ | ४.३ | २१.६ |
| ३० | वर्धा | ३१० | ६६८ | ६३२ | १,३०१ | ४.२ | ३२.५ |
| ३१ | नागपूर | १,०४२ | २,३८५ | २,२६९ | ४,६५४ | ४.५ | ६८.३ |
| ३२ | भंडारा | २७८ | ६०६ | ५९५ | १,२०० | ४.३ | १९.५ |
| ३३ | गोंदिया | २९२ | ६६२ | ६६१ | १,३२३ | ४.५ | १७.१ |
| ३४ | चंद्रपूर | ५३७ | १,१२४ | १,०८० | २,२०४ | ४.१ | ३५.२ |
| ३५ | गडचिरोली | २५० | ५४१ | ५३२ | १,०७३ | ४.३ | ११.० |
| **महाराष्ट्र राज्य** | | **२४,४२२** | **५८,२४३** | **५४,१३१** | **१,१२,३७४** | **४.६** | **४५.२** |

*आधार* - भारताचे महानिबंधक

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

## परिशिष्ट २.२

## जिल्हानिहाय साक्षरता दर, दशवार्षिक वृद्धिदर, घनता व स्त्री-पुरुष प्रमाण जनगणना २०११

| अनु. क्र. | जिल्हा | साक्षरता दर | | | दशवार्षिक वृद्धिदर (%) (२००१-२०११) | घनता (दर चौ.किमी व्यक्तींची संख्या) | स्त्री - पुरुष प्रमाण | बालकांमधील स्त्री-पुरुष प्रमाण (० -६ वर्षे वयोगट) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | मुंबई शहर | ९१.५ | ८६.५ | ८९.२ | (-)७.६ | १९,६५२ | ८३२ | ९१४ |
| २ | मुंबई उपनगर | ९२.९ | ८६.४ | ८९.९ | ८.३ | २०,९८० | ८६० | ९१३ |
| ३ | ठाणे | ८८.७ | ७९.८ | ८४.५ | ३६.० | १,१५७ | ८८६ | ९२४ |
| ४ | रायगड | ८९.१ | ७६.९ | ८३.१ | १९.३ | ३६८ | ९५९ | ९३५ |
| ५ | रत्नागिरी | ९०.९ | ७४.५ | ८२.२ | (-)४.८ | १९७ | १,१२२ | ९३६ |
| ६ | सिंधुदुर्ग | ९१.६ | ७९.८ | ८५.६ | (-)२.२ | १६३ | १,०३६ | ९२२ |
| ७ | नाशिक | ८८.२ | ७६.१ | ८२.३ | २२.३ | ३९३ | ९३४ | ८९० |
| ८ | धुळे | ७९.५ | ६५.८ | ७२.८ | २०.१ | २८५ | ९४६ | ८९८ |
| ९ | नंदुरबार | ७२.२ | ५६.५ | ६४.४ | २५.७ | २७७ | ९७८ | ९४४ |
| १० | जळगाव | ८५.४ | ७०.६ | ७८.२ | १४.९ | ३६० | ९२५ | ८४२ |
| ११ | अहमदनगर | ८६.८ | ७०.९ | ७९.१ | १२.४ | २६६ | ९३९ | ८५२ |
| १२ | पुणे | ९०.८ | ८१.१ | ८६.२ | ३०.४ | ६०३ | ९१५ | ८८३ |
| १३ | सातारा | ८९.४ | ७६.३ | ८३.९ | ६.९ | २८७ | ९८८ | ८९५ |
| १४ | सांगली | ८८.२ | ७४.६ | ८१.५ | ९.२ | ३२९ | ९६६ | ८६७ |
| १५ | सोलापूर | ८५.० | ६८.६ | ८७.० | १२.२ | २९० | ९३८ | ८८३ |
| १६ | कोल्हापूर | ८८.६ | ७४.२ | ८१.५ | १०.० | ५०४ | ९५७ | ८६३ |
| १७ | औरंगाबाद | ८७.४ | ७०.१ | ७९.० | २७.८ | ३६६ | ९२३ | ८५८ |
| १८ | जालना | ८१.५ | ६१.० | ७१.५ | २१.५ | २५४ | ९३७ | ८७० |
| १९ | परभणी | ८२.६ | ६३.६ | ७३.३ | २०.२ | २९५ | ९४७ | ८८४ |
| २० | हिंगोली | ८६.९ | ६९.० | ७८.२ | १९.३ | २४४ | ९४२ | ८८२ |
| २१ | बीड | ८५.६ | ६७.८ | ७७.० | १९.६ | २४२ | ९१६ | ८०७ |
| २२ | नांदेड | ८४.३ | ६६.२ | ७५.५ | १६.९ | ३१९ | ९४३ | ९१० |
| २३ | उस्मानाबाद | ८५.८ | ७०.५ | ७८.४ | ११.५ | २१९ | ९२४ | ८६७ |
| २४ | लातूर | ८४.४ | ६९.६ | ७७.३ | १८.० | ३४३ | ९२८ | ८८९ |
| २५ | बुलढाणा | ९०.५ | ७५.८ | ८३.४ | १५.८ | २६८ | ९३४ | ८५५ |
| २६ | अकोला | ९२.३ | ८३.५ | ८८.० | ११.३ | ३२० | ९४६ | ९१२ |
| २७ | वाशिम | ९०.५ | ७५.५ | ८३.२ | १७.३ | २४४ | ९३० | ८६३ |
| २८ | अमरावती | ९१.५ | ८३.१ | ८७.४ | १०.८ | २३७ | ९५१ | ९३५ |
| २९ | यवतमाळ | ८९.४ | ७५.९ | ८२.८ | १२.८ | २०४ | ९५२ | ९२२ |
| ३० | वर्धा | ९१.९ | ८१.८ | ८७.० | ५.२ | २०६ | ९४६ | ९१९ |
| ३१ | नागपूर | ९२.१ | ८४.५ | ८८.४ | १४.४ | ४७० | ९५१ | ९३१ |
| ३२ | भंडारा | ९०.४ | ७७.१ | ८३.८ | ५.६ | २९४ | ९८२ | ९५० |
| ३३ | गोंदिया | ९२.० | ७७.९ | ८५.० | १०.१ | २५३ | ९९९ | ९५६ |
| ३४ | चंद्रपूर | ८६.८ | ७३.० | ८०.० | ६.४ | १९३ | ९६१ | ९५३ |
| ३५ | गडचिरोली | ८२.३ | ६६.३ | ७४.४ | १०.६ | ७४ | ९८२ | ९६१ |
| **महाराष्ट्र राज्य** | | **८८.४** | **७५.९** | **८२.३** | **१६.०** | **३६५** | **९२९** | **८९४** |

*आधार* - भारताचे महानिबंधक

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

## परिशिष्ट २.३

## जिल्हानिहाय नि:शक्त, बेघर लोकसंख्येचे प्रमाण व कामगारांचा सहभाग दर
## जनगणना २०११

| अनु. क्र. | जिल्हा | एकूण लोकसंख्येशी प्रमाण | | | | | | कामातील सहभागाचा दर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नि:शक्त लोकसंख्या | | | बेघर लोकसंख्या | | | | | |
| | | पुरुष | स्त्री | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | मुंबई शहर | ३.४ | ३.० | ३.२ | ०.० | १.२ | १.२ | ६०.६ | १८.८ | ४१.६ |
| २ | मुंबई उपनगर | २.८ | २.४ | २.६ | ०.० | ०.२ | ०.२ | ५८.५ | १८.३ | ३९.९ |
| ३ | ठाणे | २.४ | २.१ | २.३ | ०.२ | ०.२ | ०.२ | ५७.३ | २१.७ | ४०.६ |
| ४ | रायगड | २.५ | २.० | २.३ | ०.३ | ०.२ | ०.३ | ५६.१ | २४.७ | ४०.७ |
| ५ | रत्नागिरी | २.४ | १.८ | २.१ | ०.३ | ०.१ | ०.३ | ५३.५ | ३६.० | ४४.२ |
| ६ | सिंधुदुर्ग | ३.१ | २.४ | २.८ | ०.२ | ०.२ | ०.२ | ५५.० | २७.२ | ४०.९ |
| ७ | नाशिक | २.१ | १.७ | १.९ | ०.२ | ०.२ | ०.२ | ५५.३ | ३४.५ | ४५.२ |
| १५ | दळणवळण | ४१,२२६ | ८४,४८४ | १,०५,८४३ | १,४०,३९९ | १,७५,४०२ | १,९२,०८२ | २,०३,७९६ |
| १६ | व्यापार, हॉटेल्स व उपाहारगृहे | ४,६४,७५० | ६,३६,२६७ | ६,७०,७२९ | ७,२२,६०५ | ८,०७,२३० | ८,११,६२१ | ८,४३,२०६ |
| १७ | बँका व विमा उद्योग | १,६८,११२ | २,७५,००३ | ३,१३,८२९ | ३,४९,६७५ | ४,०१,९११ | ४,५४,१४४ | ५,०८,०२७ |
| १८ | स्थावर मालमत्ता व राहत्या घरांची मालकी,व्यवसाय सेवा व विधी सेवा | २,२९,७६७ | ३,०२,६९८ | ३,३३,७९४ | ३,५९,५६४ | ३,८०,९३६ | ४,१९,७२० | ४,६३,२२७ |
| १९ | सार्वजनिक प्रशासन | १,४९,०२० | १,६८,१७५ | २,०६,५२१ | २,४७,१२५ | २,४४,२५३ | २,५४,००९ | २,६१,०९४ |
| २० | इतर सेवा | २,२३,७९१ | २,६३,७७२ | २,८२,०२८ | ३,०१,२३१ | ३,२४,९६० | ३,४०,४१० | ३,६१,६६४ |
| **२१** | **तृतीय क्षेत्र / सेवा (उप-बेरीज - १३ ते २०)** | **१४,५५,०२५** *(५४.९)* | **१९,६३,०१९** *(५६.६)* | **२१,५६,९७१** *(५८.५)* | **२३,८२,३६६** *(५९.६)* | **२६,१६,००३** *(६०.२)* | **२७,७४,७७३** *(६०.१)* | **२९,५७,९०२** *(६१.७)* |
| **२२** | **देशांतर्गत निव्वळ उत्पन्न एकूण - (६+११+२१)** | **२६,५१,५७३** *(१००.०)* | **३४,६९,००८** *(१००.०)* | **३६,८९,७७२** *(१००.०)* | **३,९४,१६५** *(१००.०)* | **४३,४८,२३२** *(१००.०)* | **४६,१९,६९६** *(१००.०)* | **४७,९४,२२७** *(१००.०)* |
| **२३** | **घटक खर्चावर आधारित परदेशातून प्राप्त निव्वळ उत्पन्न** | **(-) २२,३७५** | **(-) १७,१७९** | **(-)२५,३८४** | **(-)२७,७५७** | **(-)५४,६४७** | **(-)४६,३६७** | **(-)६५,४५२** |
| **२४** | **राष्ट्रीय निव्वळ उत्पन्न** | **२६,२९,१९८** | **३४,५१,८२९** | **३६,६४,३८८** | **३९,६६,४०७** | **४२,९३,५८५** | **४५,७३,३२९** | **४७,२८,७७६** |
| **२५** | **दरडोई राष्ट्रीय उत्पन्न (₹)** | **२४,१४३** | **३०,३३२** | **३१,७५४** | **३३,९०१** | **३६,२०२** | **३८,०४८** | **३८,८५६** |

*आधार* - केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, नवी दिल्ली

\+ पहिले सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज

टीप - कंसातील आकडे देशांतर्गत निव्वळ उत्पन्नाशी टक्केवारी दर्शवितात.

आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट ३.९

## जिल्ह्यांतर्गत स्थूल/निव्वळ उत्पन्न आणि दरडोई जिल्हा उत्पन्न

| अ. क्र. | जिल्हा | चालू किंमतीनुसार (₹ कोटी) | | | | स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार (₹ कोटी) | | | | चालू किंमतीनुसार दरडोई जिल्हा उत्पन्न (₹) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थूल जिल्हा उत्पन्न | | निव्वळ जिल्हा उत्पन्न | | स्थूल जिल्हा उत्पन्न | | निव्वळ जिल्हा उत्पन्न | | | |
| | | २०११-१२ ++ | २०१२-१३ + | २०११-१२ ++ | २०१२-१३ + | २०११-१२ ++ | २०१२-१३ + | २०११-१२ ++ | २०१२-१३ + | २०११-१२ ++ | २०१२-१३ + |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | मुंबई # | २,५२,८४५ | २,९०,६६१ | २,२९,२८८ | २,६३,६०२ | १,७८,३०४ | १,९१,९१० | १,६१,१६१ | १,७३,१६२ | १,४९,०७० | १,६७,७३६ |
| २ | ठाणे | १,५८,६११ | १,७९,४७८ | १,४१,६८८ | १,६०,३३७ | १,०९,६२४ | १,१६,५५२ | ९७,१५८ | १,०३,१३६ | १,४१,५६० | १,५७,३७३ |
| ३ | रायगड | ३४,३८३ | ३८,६८४ | २९,९२६ | ३३,६३२ | २२,८५५ | २४,०१९ | १९,५०७ | २०,४१५ | १,१९,२१५ | १,३२,६०७ |
| ४ | रत्नागिरी | १५,८०७ | १६,९४५ | १४,२९३ | १५,२३२ | १०,४७० | १०,७३९ | ९,३६३ | ९,५४३ | ७५,७५८ | ८०,०८६ |
| ५ | सिंधुदुर्ग | ९,५३७ | १०,४५३ | ८,८५५ | ९,६५६ | ५,८१९ | ६,१८८ | ५,३६९ | ५,६८३ | ९१,९६२ | ९९,५०३ |
| **कोकण विभाग** | | **४,७१,१८२** | **५,३६,२२२** | **४,२४,०५१** | **४,८२,४५८** | **३,२७,०७२** | **३,४९,४०८** | **२,९२,५५८** | **३,११,९४०** | **१,३७,९०२** | **१,५४,०८०** |
| ६ | नाशिक | ५३,८४६ | ६४,०४१ | ४८,५४५ | ५७,६९२ | ३४,४७८ | ३८,००० | ३०,६७५ | ३३,७२१ | ८३,४२६ | ९७,८९६ |
| ७ | धुळे | १३,८७२ | १५,६२४ | १२,६२० | १४,२२१ | ९,१०३ | ९,५८७ | ८,२०७ | ८,६४५ | ६४,७८० | ७२,२३० |
| ८ | नंदुरबार | ८,१४६ | ८,०५५ | ७,५६० | ७,४२८ | ४,६३९ | ४,५७९ | ४,२५५ | ४,१७८ | ५१,४६१ | ५०,१२४ |
| ९ | जळगाव | ३२,५७४ | ३५,१४९ | २९,५७५ | ३१,७२८ | २०,३३८ | २१,०४५ | १८,२९६ | १८,८२५ | ७०,११३ | ७४,३९४ |
| १० | अहमदनगर | ३५,४३० | ३८,७१० | ३२,३९४ | ३५,२५२ | २२,०४५ | २२,९२४ | १९,९४५ | २०,६५९ | ७१,०३९ | ७६,५७३ |
| **नाशिक विभाग** | | **१,४३,८६८** | **१,६१,५७९** | **१,३०,६९३** | **१,४६,३२१** | **९०,६०३** | **९६,१३६** | **८१,३७८** | **८६,०२८** | **७२,५५०** | **८०,३४१** |
| ११ | पुणे | १,३३,४३२ | १,४९,५०२ | १,१९,१७० | १,३३,३९० | ८८,६२७ | ९३,५६२ | ७८,०५७ | ८२,२०८ | १,३७,००१ | १,५०,९६९ |
| १२ | सातारा | २५,७९० | २८,३४१ | २३,५३८ | २५,७९८ | १६,७५४ | १७,४४० | १५,१५६ | १५,७३३ | ७४,९८९ | ८१,४८८ |
| १३ | सांगली | २५,८६० | २८,४९९ | २३,६५९ | २६,०१५ | १७,१२९ | १८,००३ | १५,५६८ | १६,३२८ | ८०,५०७ | ८७,६१५ |
| १४ | सोलापूर | ३४,७३३ | ३७,०७६ | ३१,९८८ | ३३,९८३ | २१,८६६ | २२,३२४ | १९,९७४ | २०,३०४ | ७२,१५० | ७५,७६९ |
| १५ | कोल्हापूर | ४०,८८७ | ४५,५७६ | ३७,३७१ | ४१,५५८ | २७,०९२ | २८,९११ | २४,५९५ | २६,२५० | ९२,४१४ | १,०१,६२२ |
| **पुणे विभाग** | | **२,६०,७०२** | **२,८८,९९५** | **२,३५,७२५** | **२,६०,७४४** | **१,७१,४६८** | **१,८०,३२०** | **१,५३,३५०** | **१,६०,८२२** | **१,०१,३७२** | **१,१०,७४२** |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ३.९ (समाप्त)

| अ. क्र. | जिल्हा | चालू किंमतीनुसार (₹ कोटी) | | | | स्थिर (२००४-०५) किंमतीनुसार (₹ कोटी) | | | | चालू किंमतीनुसार | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थूल जिल्हा उत्पन्न | | निव्वळ जिल्हा उत्पन्न | | स्थूल जिल्हा उत्पन्न | | निव्वळ जिल्हा उत्पन्न | | दरडोई जिल्हा उत्पन्न (₹) | |
| | | २०११-१२ ++ | २०१२-१३ + | २०११-१२ ++ | २०१२-१३ + | २०११-१२ ++ | २०१२-१३ + | २०११-१२ ++ | २०१२-१३ + | २०११-१२ ++ | २०१२-१३ + |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १६ | औरंगाबाद | ३३,७०४ | ३६,३६७ | ३०,०८० | ३२,३०१ | २१,७७८ | २२,२६३ | १९,१०२ | १९,४०५ | ८९,२९५ | ९४,७०२ |
| १७ | जालना | १५,०३९ | ११,७५२ | १४,००२ | १०,८२८ | ७,९८६ | ६,५९४ | ७,३२९ | ६,००५ | ७७,०२९ | ५९,०१० |
| १८ | परभणी | १०,३७४ | १२,३५३ | ९,६१४ | ११,४०८ | ६,२६२ | ६,९४२ | ५,७५२ | ६,३५० | ५४,६४५ | ६४,१०१ |
| १९ | हिंगोली | ५,२७१ | ६,४०२ | ४,९०३ | ५,९३६ | ३,१५९ | ३,५८० | २,९११ | ३,२८६ | ४४,३३५ | ५३,२०५ |
| २० | बीड | १३,९३९ | १४,६८९ | १२,८७७ | १३,४९५ | ८,३६९ | ८,५०३ | ७,६४५ | ७,७२२ | ५२,९७६ | ५५,००९ |
| २१ | नांदेड | १७,९३१ | २१,२५७ | १६,५९८ | १९,६१७ | ११,०९८ | १२,१०० | १०,१८९ | ११,०६३ | ५०,७७९ | ५९,४०३ |
| २२ | उस्मानाबाद | १०,४१४ | १०,३२० | ९,६५१ | ९,५०३ | ६,०५१ | ५,९५४ | ५,५४२ | ५,४२२ | ५७,९४६ | ५६,५५३ |
| २३ | लातूर | १४,६२५ | १७,७८७ | १३,५९५ | १६,४७९ | ८,७६१ | ९,७७६ | ८,०६६ | ८,९६३ | ५७,५४६ | ६९,०४७ |
| **औरंगाबाद विभाग** | | **१,२१,२९६** | **१,३०,९२५** | **१,११,३१९** | **१,१९,५६६** | **७३,४६५** | **७५,७११** | **६६,५३६** | **६८,२१६** | **६२,६१३** | **६६,५६१** |
| २४ | बुलढाणा | १३,९६५ | १५,९५८ | १२,८४४ | १४,६३२ | ८,९६२ | ९,३८४ | ८,१६९ | ८,५१६ | ५०,८६५ | ५७,३८३ |
| २५ | अकोला | १२,६९३ | १५,१३३ | ११,६५७ | १३,८६७ | ८,४४३ | ९,४३६ | ७,७०८ | ८,५८३ | ६१,३९८ | ७२,११८ |
| २६ | वाशिम | ८,७४१ | ९,१७९ | ८,०९५ | ८,४५४ | ४,८०६ | ४,५९१ | ४,३८८ | ४,१६५ | ७०,६०० | ७३,०६१ |
| २७ | अमरावती | १९,७३० | २३,७७० | १८,२१८ | २१,८९७ | १२,४६५ | १३,९३३ | ११,४२९ | १२,७२७ | ६०,४०० | ७१,७३२ |
| २८ | यवतमाळ | १६,४१४ | १९,५०० | १५,०७३ | १७,८५४ | १०,४१४ | ११,४९६ | ९,४६८ | १०,४०९ | ५४,४५३ | ६३,९०० |
| **अमरावती विभाग** | | **७१,५४५** | **८३,५३९** | **६५,८८७** | **७६,७०३** | **४५,०९२** | **४८,८४०** | **४१,१६२** | **४४,४००** | **५८,०२६** | **६६,८३६** |
| २९ | वर्धा | १०,२५७ | ११,८४४ | ९,४४४ | १०,८७० | ६,६६८ | ७,२१९ | ६,०८९ | ६,५६६ | ६६,९३० | ७६,२२३ |
| ३० | नागपूर | ५४,५८६ | ६२,२९१ | ४९,३६० | ५६,१९१ | ३७,१६१ | ३९,८८० | ३३,३९४ | ३५,७११ | ९९,९०२ | १,११,८६० |
| ३१ | भंडारा | ८,३०० | ९,५०३ | ७,६२९ | ८,७०४ | ५,२३६ | ५,६११ | ४,७६९ | ५,०९२ | ५९,९५५ | ६७,८१० |
| ३२ | गोंदिया | ७,७२५ | ८,९७३ | ७,१४४ | ८,२८२ | ४,९०७ | ५,२६१ | ४,५०५ | ४,८१५ | ५३,४५० | ६१,४६६ |
| ३३ | चंद्रपूर | १९,९७० | २३,१०२ | १७,८६२ | २०,६०९ | १२,८५९ | १४,०५६ | ११,३५८ | १२,३६५ | ७४,८४८ | ८५,३६३ |
| ३४ | गडचिरोली | ५,९८९ | ६,७९६ | ५,५७६ | ६,३०५ | ३,२६१ | ३,३९० | २,९८५ | ३,०८४ | ५२,०८७ | ५८,४६९ |
| **नागपूर विभाग** | | **१,०६,८२६** | **१,२२,५०९** | **९७,०१५** | **१,१०,९६२** | **७०,०९२** | **७५,४१६** | **६३,१०१** | **६७,६३३** | **७८,१२५** | **८८,२५३** |
| **महाराष्ट्र** | | **११,७५,४१९** | **१३,२३,७६८** | **१०,६४,६८९** | **११,९६,७५४** | **७,७७,७९१** | **८,२५,८३२** | **६,९८,०८६** | **७,३९,०४०** | **९३,७४८** | **१,०३,९९१** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

+ पहिले सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज # मुंबई (शहर + उपनगर) जिल्हा

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

४

# किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था



# ४. किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था

## किंमती

४.१ किंमती निर्देशांक हे उपभोग्य बाबींवरील खर्चाचे प्रतिनिधित्व करणा-या वस्तूंच्या किंमतीतील बदल मोजण्यासाठी वापरले जाणारे अर्थव्यवस्थेतील सर्वंकष परिमाण आहे. ग्राहक किंमती निर्देशांक (ग्राकिंनि) किरकोळ खरेदी करणाऱ्या ग्राहकाच्या दृष्टीकोनातून किंमतीतील बदल मोजून व्यक्तीवर पडणारा चलनवाढीचा प्रत्यक्ष बोजा दर्शवितो. घाऊक किंमती निर्देशांक (घाकिंनि) हा घाऊक स्तरावरील किंमतीतील बदल दर्शवित असून चलनवाढ मोजण्याचे प्रमुख साधन म्हणून वापरण्यात येतो.

## महाराष्ट्रातील किंमतीविषयक स्थिती

४.२ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेतर्फे ग्रामीण भागातील ६८ केंद्रांमधून १०६ वस्तू आणि नागरी भागातील ७४ केंद्रांमधून १२७ वस्तुंच्या साप्ताहिक किरकोळ किंमती संकलित केल्या जातात. या किंमतींच्या आधारे राज्याच्या ग्रामीण व नागरी भागाकरिता स्वतंत्रपणे मासिक ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३) तयार करण्यात येतात.

४.३ राज्यातील ग्रामीण व नागरी भागांच्या ग्राहक किंमती निर्देशांकात एप्रिल ते नोव्हेंबर, २०१३ या कालावधीत सातत्याने वाढ झाली आणि नंतर डिसेंबर, २०१३ मध्ये घट झाली. ग्रामीण व नागरी भागांचा एप्रिल ते डिसेंबर, २०१३ या कालावधीतील सरासरी निर्देशांक गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत अनुक्रमे १२.५ व १२.० टक्क्यांनी वाढला. निर्देशांकातील वाढ ही मुख्यत: 'भाजीपाला व फळे' आणि 'दूध व दुग्धजन्य पदार्थ' या उपगटांतील किंमतीतील वाढीमुळे झाली आहे. ग्राहक किंमती निर्देशांकांची ग्रामीण तसेच नागरी भागांसाठीची मालिका अनुक्रमे परिशिष्ट ४.१ व ४.२ मध्ये दिली आहे.

**आलेख ४.१ :ग्राकिंनि-ग्रामीण**




**आलेख ४.२ :ग्राकिंनि-नागरी**




४.४ ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल व डिसेंबर, २०१३ मध्ये ग्रामीण भागासाठी अनुक्रमे १२.७ टक्के व १०.४ टक्के होता, तर नागरी भागासाठी तो अनुक्रमे ११.३ टक्के व १०.१ टक्के होता. हा दर जुलै, २०१३ मध्ये सर्वात जास्त होता (ग्रामीण भागासाठी १४.० टक्के व नागरी भागासाठी १३.६ टक्के). ग्रामीण भागासाठी 'खाद्यपदार्थ' गटाचा वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल व डिसेंबर, २०१३ मध्ये अनुक्रमे १०.९ टक्के व ९.१ टक्के इतका, तर नागरी भागासाठी तो अनुक्रमे १०.५ टक्के व ९.१ टक्के इतका होता. ग्रामीण भागासाठी 'इंधन, शक्ती व दिवाबत्ती' गटाचा वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल व डिसेंबर, २०१३ मध्ये अनुक्रमे १६.१ टक्के व १५.१ टक्के इतका, तर नागरी भागासाठी अनुक्रमे १६.० टक्के व १६.३ टक्के इतका होता.

## अखिल भारतीय स्तरावर किंमतीविषयक स्थिती

४.५ अखिल भारतीय स्तरावर अखिल भारतीय ग्राकिंनि, शेत मजुरांकरिता ग्राकिंनि, ग्रामीण मजुरांकरिता ग्राकिंनि, औद्योगिक कामगारांकरिता ग्राकिंनि आणि घाऊक किंमती निर्देशांक असे पाच प्रमुख किंमती निर्देशांक आहेत. केंद्रिय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार, अखिल भारतीय व राज्य/केंद्रशासित प्रदेशातील ग्रामीण, नागरी तसेच एकत्रित असे वेगवेगळे मासिक ग्राहक किंमती निर्देशांक

(पायाभूत वर्ष २०१०) प्रकाशित करते. श्रम केंद्र, भारत सरकार इतर तीन ग्राकिंनि दरमहा संकलित व प्रकाशित करते. घाऊक किंमती निर्देशांक आर्थिक सल्लागार कार्यालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार दरमहा प्रकाशित करतात.

४.६ एप्रिल ते डिसेंबर, २०१३ या कालावधीतील केंद्रिय सांख्यिकी कार्यालयाने संकलित केलेले महाराष्ट्रासाठीचे ग्रामीण, नागरी व एकत्रित सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे १३३.६, १३०.८ व १३१.८ असे होते. प्रमुख राज्यांसाठी ग्राहक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.३ मध्ये देण्यात आले आहेत.

**आलेख ४.३ :महाराष्ट्रासाठी अखिल भारतीय ग्राकिंनि (एकत्रित)**




४.७ महाराष्ट्रासह देशातील २० राज्यांकरिता दरमहा शेतमजूर आणि ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष १९८६-८७) संकलित केले जातात. ह्या निर्देशांकांचा उपयोग कृषि क्षेत्रातील शेतमजुरीचा किमान दर निश्चित आणि सुधारित करण्यासाठी होतो. सदर निर्देशांक तयार करण्यासाठी भारतातील ६०० केंद्रांमधून किरकोळ किंमती गोळा केल्या जातात, त्यापैकी ५४ केंद्रे राज्यातील आहेत. शेतमजूर आणि ग्रामीण मजूरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांकांची मालिका परिशिष्ट ४.४ मध्ये दिली आहे. एप्रिल ते डिसेंबर, २०१३ करिता राज्यासाठी आणि अखिल भारतासाठी शेतमजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ७९३.३ आणि ७४६.७ असे होते, जे गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत अनुक्रमे ७.५ व १२.७ टक्क्यांनी जास्त होते. राज्यासाठी आणि अखिल भारतासाठी ग्रामीण मजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ७८८.० आणि ७४७.० असे होते, जे गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत अनुक्रमे ७.८ व १२.५ टक्क्यांनी जास्त होते.

**आलेख ४.४ : महाराष्ट्रासाठी शेत मजुरांकरिता ग्राकिंनि**




**आलेख ४.५ :महाराष्ट्रासाठी ग्रामीण मजुरांकरिता ग्राकिंनि**




४.८ औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांकाचा (औका-ग्राकिंनि) (पायाभूत वर्ष २००१) वापर प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रातील लक्षावधी कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा महागाई भत्ता ठरविण्यासाठी तसेच वर्गीकृत रोजगारातील किमान वेतन निश्चित व सुधारीत करणे यासाठी केला जातो. हा निर्देशांक देशातील औद्योगिकदृष्ट्या विकसित अशा निवडक ७८ केंद्रांमधील जीवनावश्यक वस्तु व सेवा यांच्या किरकोळ किंमतींवर आधारित आहे. एप्रिल ते डिसेंबर, २०१३ दरम्यानच्या कालावधीतील सरासरी औका-ग्राकिंनि गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत १०.७ टक्क्यांची वाढ दर्शविते. गटनिहाय अखिल भारतीय औका-ग्राकिंनि परिशिष्ट ४.५ मध्ये दिले आहेत.

**आलेख ४.६ :औद्योगिक कामगारांकरिता ग्राकिंनि व चलनवाढीचा दर (२०१३-१४)**



या ७८ केंद्रांपैकी राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर व नाशिक ही पाच केंद्रे आहेत. या केंद्रांसाठी औका-ग्राकिंनि परिशिष्ट ४.६ मध्ये दिले आहेत. सदर पाच केंद्रांव्यतिरिक्त राज्यातील जळगांव, नांदेड, औरंगाबाद, कोल्हापूर व अकोला या पाच केंद्रांसाठी श्रम आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून औका-ग्राकिंनि स्वतंत्रपणे तयार करण्यात येतात. राज्यातील या अतिरिक्त केंद्रांसाठी औका-ग्राकिंनि परिशिष्ट ४.७ मध्ये दिले आहेत.

## घाऊक किंमती निर्देशांक

४.९ घाऊक किंमती निर्देशांक 'प्राथमिक वस्तु', 'इंधन व शक्ती' आणि 'वस्तुनिर्माण' या विविध गटांतील महत्त्वाच्या वस्तुंच्या घाऊक किंमतीतील कल दर्शवितो. या तीन गटांचा भार अनुक्रमे २०.१२ टक्के, १४.९१ टक्के व ६४.९७ टक्के आहे. सर्व वस्तूंसाठी घाऊक किंमती निर्देशांक एप्रिल, २०१३ मधील १७१.३ वरुन डिसेंबर, २०१३ मध्ये १७९.६ इतका वाढला. याच कालावधीत 'प्राथमिक वस्तु' गटाच्या निर्देशांकात २२६.५ वरुन २४३.७ इतकी, 'इंधन व शक्ती ' या गटात १९३.७ वरुन २११.१ इतकी आणि 'वस्तुनिर्माण' गटात १४९.१ वरुन १५२.५ इतकी वाढ झाली.

४.१० घाऊक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल, २०१३ मध्ये ४.८ टक्के होता. तो नोव्हेंबर, २०१३ मध्ये ७.५ टक्के इतका वाढला, जो मागील १४ महिन्यांतील सर्वोच्च दर होता. या कालावधीत 'प्राथमिक वस्तु ' गटातील चलनवाढीचा दर ५.१ टक्क्यांवरून १५.३ टक्के इतका वाढला तर 'प्राथमिक वस्तु' गटातील 'खाद्य पदार्थ' उपगटाचा चलनवाढीचा दर एप्रिल,२०१३ मधील ६.१ टक्क्यांवरून नोव्हेंबर, २०१३ मध्ये १९.७ टक्के इतका वाढला. ही वाढ मुख्यत्वेकरून भाजीपाल्याच्या किंमतीतील वाढीमुळे झाली. डिसेंबर, २०१३ मध्ये सर्व वस्तुंसाठी व 'प्राथमिक वस्तु' गटासाठी चलनवाढीच्या दरात घट होऊन तो अनुक्रमे ६.४ व १०.८ टक्के झाला. डिसेंबर, २०१३ मध्ये 'प्राथमिक वस्तु' गटातील 'खाद्य पदार्थ' उपगटासाठीदेखील तो कमी होऊन १३.७ टक्के झाला.

**आलेख ४.७ :अखिल भारतीय घाकिंनि व ग्राकिंनि वर आधारित चलनवाढीचे दर (२०१३-१४)**




४.११ प्रमुख गटांसाठीचे वर्ष निहाय निर्देशांक व वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचे दर आलेख ४.८ व ४.९ मध्ये दर्शविण्यात आले आहेत. अखिल भारतीय घाऊक किंमती निर्देशांकाची मालिका परिशिष्ट ४.८ मध्ये दिली आहे तर महत्त्वाच्या किंमतींच्या निर्देशांकांवर आधारित चलनवाढीचे दर परिशिष्ट ४.९ मध्ये दिले आहेत.

**आलेख ४.८ :'प्राथमिक वस्तु' गटांसाठी घाकिंनि व चलनवाढीचे दर**




* डिसेंबर पर्यंत

**आलेख ४.९ :'वस्तुनिर्माण' गटांसाठी घा.किं.नि. व चलनवाढीचे दर**




* डिसेंबर पर्यंत

# सार्वजनिक वितरण व्यवस्था

४.१२ सार्वजनिक वितरण व्यवस्था केंद्र व राज्य शासन यांच्यातर्फे संयुक्तरित्या राबविली जाते. अन्नधान्याचे प्रापण, साठवणूक, वाहतूक आणि ठोक नियतन करणे ही केंद्र शासनाची तर रास्त भाव दुकानांच्या जाळयामार्फत ग्राहकांना अन्नधान्याचे वितरण करणे ही राज्य शासनांची जबाबदारी आहे. दारिद्र्य रेषेखालील (दारेखा) कुटुंबांची निश्चिती करणे, शिधापत्रिकांचे वाटप आणि रास्त भाव दुकानांचे संनियंत्रण हीदेखील राज्य शासनांची जबाबदारी आहे. रास्त भाव दुकानांद्वारे प्रामुख्याने गहू, तांदूळ, साखर आणि केरोसीन या वस्तूंचे वाटप केले जाते.

४.१३ रास्त भाव दुकान हे शिधापत्रिकाधारकांची सोय आणि भौगोलिक संरचना विचारात घेऊन सुरू करण्यात येते. राज्यात ३१ डिसेंबर, २०१३ रोजी ५०,३५३ रास्त भाव दुकाने कार्यरत होती. त्यापैकी २९ फिरती तर ५,५६९ रास्तभाव दुकाने आदिवासी भागात आहेत.

४.१४ गरजू कुटुंबांना जास्त धान्य पुरविण्यासाठी राज्य शासनाने १ मे, १९९९ पासून तीन रंगाच्या शिधापत्रिका वाटपाची योजना सुरु केली. शिधापत्रिकाधारकांचा जिल्हानिहाय तपशील परिशिष्ट ४.१० मध्ये देण्यात आला आहे.

## लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था

४.१५ लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ३५ किलो धान्य (गहू व तांदूळ), गहू ₹ पाच प्रति किलो व तांदूळ ₹ सहा प्रति किलो या दराने दारिद्र्य रेषेखालील (दारेखा) कुटुंबांना देण्यात येते. दारिद्र्य रेषेवरील (दारेव) (केशरी शिधापत्रिकाधारक) कुटुंबांना १५ किलो धान्य (गहू व तांदूळ), गहू ₹ ७.२० प्रति किलो आणि तांदूळ ₹ ९.६० प्रति किलो या दराने देण्यात येते. दारेखा व दारेव कुटुंबांसाठी अन्नधान्याचे नियतन व उचल अनुक्रमे तक्ता ४.१ व तक्ता ४.२ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ४.१ दारेखा कुटुंबांसाठी अन्नधान्याचे नियतन व उचल**

(लाख मे.टन)

| वर्ष | शिधापत्रिकांची संख्या ( लाखात ) | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नियतन | उचल | टक्केवारी | नियतन | उचल | टक्केवारी |
| २०११-१२ | ४२.७२ | ११.२६ | ८.८२ | ७८.३ | १२.१० | ९.५५ | ७८.९ |
| २०१२-१३ | ४३.२० | १०.४१ | ८.७१ | ८३.७ | ११.४४ | ९.४३ | ८२.४ |
| २०१३-१४+ | ४२.९५ | ६.१८ | ५.८५ | ९४.७ | ६.४६ | ६.२९ | ९७.४ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन +डिसेंबरपर्यंत

**तक्ता ४.२ दारेव कुटुंबांसाठी अन्नधान्याचे नियतन व उचल**

(लाख मे.टन)

| वर्ष | शिधापत्रिकांची संख्या (लाखात ) | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नियतन | उचल | टक्केवारी | नियतन | उचल | टक्केवारी |
| २०११-१२ | १३३.४७ | ३.१३ | २.०९ | ६६.८ | १५.९० | ७.०३ | ४४.२ |
| २०१२-१३ | १३९.५१ | ५.२३ | ३.२४ | ६२.० | १४.९१ | ८.०५ | ५४.० |
| २०१३-१४+ | १४४.५३ | ६.५५ | ४.५१ | ६८.९ | ८.०० | ६.३९ | ७९.९ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन +डिसेंबरपर्यंत

## अंत्योदय अन्न योजना

४.१६ राज्यात अंत्योदय अन्न योजना (अंअयो) १ मे, २००१ पासून सुरू करण्यात आली. या योजनेतंर्गत अंअयो शिधापत्रिका धारकांना ३५ किलो धान्य (₹ दोन प्रति किलो गहू व ₹ तीन प्रति किलो तांदूळ) पुरविले जाते. अन्नधान्याचे नियतन व उचल तक्ता ४.३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.३ अन्नधान्याचे नियतन व उचल**

(लाख मे.टन)

| वर्ष | शिधापत्रिकांची संख्या ( लाखात ) | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नियतन | उचल | टक्केवारी | नियतन | उचल | टक्केवारी |
| २०११-१२ | २२.९४ | ४.९७ | ४.५३ | ९१.१ | ४.८६ | ४.३८ | ९०.१ |
| २०१२-१३ | २५.४८ | ५.१० | ४.८१ | ९४.३ | ५.१० | ४.७० | ९२.२ |
| २०१३-१४+ | २४.७१ | ३.८३ | ३.६८ | ९६.१ | ३.८५ | ३.५७ | ९२.७ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन +डिसेंबरपर्यंत

## अन्नपूर्णा योजना

४.१७ अन्नपूर्णा ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना १ एप्रिल, २००१ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन अथवा राज्य निवृत्ती वेतन या योजनांतर्गत लाभ मिळत नसलेल्या ६५ वर्षे व त्यावरील निराधारांना अन्नपूर्णा योजनेअंतर्गत दरमहा १० किलो धान्य (गहू व तांदूळ) मोफत पुरविले जाते. अन्नधान्याचे नियतन व उचल तक्ता ४.४ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.४ अन्नधान्याचे नियतन व उचल**

('००० मे.टन)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतन | उचल | टक्केवारी | नियतन | उचल | टक्केवारी |
| २०११-१२ | ४.१० | २.९० | ७०.७ | ६.१० | ४.७० | ७७.० |
| २०१२-१३ | ३.३२ | ०.९८ | २९.५ | ५.७८ | १.८९ | ३२.७ |
| २०१३-१४ | २.३५ | १.५९ | ६७.७ | ३.७३ | २.०४ | ५४.७ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## धान्य हमी योजना

४.१८ राज्य शासन लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पिवळ्या शिधापत्रिकाधारकांना योग्य दर्जाचे धान्य निर्धारित भावात खात्रीशीररित्या उपलब्ध होण्याच्या उद्देशाने १०,६५३ गावांमध्ये धान्य वितरणाची सुधारित पध्दत (धान्य हमी योजना) राबवित आहे. या योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील व अंत्योदय लाभार्थ्यांना तीन महिन्यांचे धान्य आगाऊरित्या देण्यात येणार आहे. परंतु त्यासाठी किमान ६० टक्के पिवळ्या शिधापत्रिकाधारकांनी तहसिलदार/शिधावाटप अधिकारी यांच्याकडे लेखी मागणी करावी लागेल, तसेच या तीन महिन्यांच्या अन्नधान्याची किंमत आगाऊ जमा करावी लागेल.

## नियंत्रित (लेव्ही) साखर

४.१९ केंद्र शासनाने, एकूण साखर उत्पादनातील खुल्या बाजारात विकण्यात येणारी साखर व नियंत्रित (लेव्ही) साखर यांचे प्रमाण ९:१ असे निश्चित केले होते. अशा प्रकारे गोळा करण्यात आलेली नियंत्रित साखर सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना वितरित करण्यात येते. दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाधारक आणि त्यांची लोकसंख्या यानुसार दरमहा राज्य शासनाला सुमारे १३,९८८ मेट्रिक टन नियंत्रित साखरेचे नियतन केंद्र शासनाकडून प्राप्त होते. या व्यतिरिक्त ऑगस्ट आणि ऑक्टोबर- नोव्हेंबर, २०१३ मध्ये राज्याला सुमारे ४,५०७ मेट्रिक टन नियंत्रित साखरेचे नियतन प्राप्त झाले. सध्या नियंत्रित साखरेची किंमत ₹ १३.५० प्रति किलो आहे. नियंत्रित साखरेचे नियतन व उचल तक्ता ४.५ मध्ये देण्यात आले आहे. सदर योजना मे, २०१३ पासून बंद करण्यात आली आहे.

**तक्ता ४.५ नियंत्रित साखरेचे नियतन व उचल**

(लाख क्विंटल)

| वर्ष | नियतन | उचल | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०११-१२ | १७.६५ | १२.१७ | ६९.० |
| २०१२-१३ | १७.६७ | १२.५९ | ७१.३ |
| २०१३-१४+ | १३.४६ | ०५.२७ | ३९.२ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
+ डिसेंबरपर्यंत

## केरोसीन

४.२० एप्रिल, २०१३ पासून राज्यास प्रति माह सुमारे ०.६० लाख किलो लिटर इतके नियतन प्राप्त होते. सद्यस्थितीत मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात केरोसीनची किरकोळ किंमत ₹ १५.०५ प्रति लिटर आहे तर इतर जिल्ह्यांमध्ये ती ₹ १५.०५ ते ₹ १७.०० प्रति लिटर या दरम्यान आहे. केरोसीनचा गैरवापर टाळण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या केरोसीनचा रंग निळा करण्यात आला असून ते फक्त शिधापत्रिकाधारकांनाच देण्यात येते. केरोसीनची उचल नियतनाच्या १०० टक्के आहे. केरोसीनची मागणी व नियतन तक्ता ४.६ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ४.६ केरोसीनची मागणी आणि नियतन**

(लाख किलो लिटर)

| वर्ष | मागणी | नियतन |
|---|---|---|
| २०११-१२ | १४.९४ | १२.५९ |
| २०१२-१३ | १५.८७ | ९.५० |
| २०१३-१४ + | १५.९५ | ५.४७ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
\+ डिसेंबरपर्यंत

## अन्नधान्यासाठीचे अर्थसहाय्य

४.२१ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्याच्या वितरणासाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य, प्रतिकूल काळासाठी ठेवावयाच्या राखीव साठ्याच्या देखभालीचा खर्च आणि अन्नधान्य प्रापणासाठीची किंमत व विक्रीची किंमत यातील तफावतीमुळे राज्य शासनास सहन करावी लागणारी तूट यांना एकत्रितरित्या अन्नधान्यासाठीचे अर्थसहाय्य असे संबोधले जाते. सन २०१३-१४ साठी ₹ २४१.५५ कोटी अर्थसहाय्य अन्नधान्यासाठी देण्यात आले, तर सन २०१२-१३ साठी ते ₹ ३१०.१९ कोटी होते.

## गोदामे

४.२२ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करावयाच्या अन्नधान्याची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून करुन राज्य शासनाच्या मालकीच्या/भाड्याने घेतलेल्या गोदामात साठवणूक केली जाते. सन २०१३-१४ मध्ये राज्यात १,०२४ गोदामे उपलब्ध असून त्याची साठवणूक क्षमता ५.६२ लाख मेट्रिक टन आहे. त्यापैकी ०.७९ लाख मेट्रिक टन क्षमतेची १९२ गोदामे वापरासाठी अयोग्य असून ०.०६ लाख मेट्रिक टन क्षमतेची ११ गोदामे भाडे तत्वावर देण्यात आली आहेत. राज्य शासनाने ०.४८ लाख मेट्रिक टन क्षमतेची ११० गोदामे अन्नधान्याच्या साठवणूकीसाठी भाड्याने घेतली आहेत. जिल्हानिहाय गोदामांची संख्या व त्यांची क्षमता परिशिष्ट ४.१३ मध्ये देण्यात आली आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गोदामांच्या साठवणूक क्षमतेत वाढ करण्यासाठी नाबार्डच्या अर्थ सहाय्याने राज्य शासनाने ५.९५ लाख मे. टन साठवणूक क्षमता असणारी नवीन गोदामे बांधण्याच्या कामास सुरुवात केली आहे.

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३

४.२३ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ दि. ५ जुलै, २०१३ पासून अस्तित्वात आला. सध्या लाभ घेत असलेल्या अंत्योदय अन्न योजनेखालील सर्व कुटुंबांना प्रचलित निकषाप्रमाणे प्रतिमाह ३५ किलो धान्याचे वाटप चालू राहील. इतर पात्र लाभार्थ्यांना प्रति व्यक्ति प्रतिमाह पाच किलो याप्रमाणात धान्य मिळेल. या अधिनियमानुसार ₹ तीन प्रति किलो दराने तांदूळ, ₹ दोन प्रति किलो दराने गहू व ₹ एक प्रति किलो दराने भरडधान्य देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

४.२४ सदर अधिनियमानुसार राज्यातील ६२.३ टक्के (सुमारे सात कोटी) लोकसंख्या अनुदानित दराने धान्य मिळण्यास पात्र असणार आहे. यापैकी ७६.३ टक्के (सुमारे ४.७० कोटी) ग्रामीण व ४५.३ टक्के (सुमारे २.३० कोटी) नागरी लोकसंख्या आहे. राज्य शासनाच्या निर्णयानुसार शहरी भागाकरिता कमाल वार्षिक उत्पन्न ₹ ५९,००० व ग्रामीण भागाकरिता कमाल वार्षिक उत्पन्न ₹ ४४,००० असणाऱ्यांचा पात्र लाभार्थी म्हणून समावेश करण्यात येईल.

* * * * *

# परिशिष्ट ४.१
## महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००३)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी आणि तंबाखू | इंधन, वीज व दिवाबत्ती | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्व वस्तू | वार्षिक चलन वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **५२.८५** | **२.१५** | **१०.६७** | **८.५३** | **२५.८०** | **१००.००** | ... |
| २००४-०५ | १०४ | १०५ | १०३ | १०२ | १०२ | १०४ | ... |
| २००५-०६ | १०९ | १०९ | १०८ | १०३ | १०५ | १०७ | ३.८ |
| २००६-०७ | ११८ | ११७ | १३२ | १०५ | १०८ | ११६ | ७.८ |
| २००७-०८ | १२८ | १२६ | १७६ | १०७ | ११५ | १२८ | १०.३ |
| २००८-०९ | १४२ | १३९ | २३८ | ११० | १२५ | १४५ | १३.२ |
| २००९-१० | १६६ | १५६ | २६१ | १११ | १३६ | १६३ | १२.८ |
| २०१०-११ | १८४ | १७४ | २९७ | ११४ | १५० | १८१ | १०.९ |
| २०११-१२ | २०१ | २०५ | ३२६ | ११९ | १६२ | १९८ | ९.१ |
| २०१२-१३ | २२२ | २४३ | ३८३ | १२५ | १७२ | २१८ | १०.५ |
| २०१३-१४@ | २४६ | २६२ | ४३१ | १३० | १९१ | २४२ | १२.५ |
| एप्रिल, २०१३ | २३१ | २५६ | ४१० | १२९ | १८९ | २३१ | १२.७ |
| मे, २०१३ | २३७ | २५६ | ४०९ | १२९ | १९० | २३४ | १२.९ |
| जून, २०१३ | २४२ | २६१ | ४०८ | १३० | १९१ | २३७ | १३.८ |
| जुलै, २०१३ | २४९ | २६२ | ४१४ | १३० | १९२ | २४२ | १४.० |
| ऑगस्ट, २०१३ | २५६ | २६५ | ४१२ | १३१ | १९१ | २४५ | ११.६ |
| सप्टेंबर, २०१३ | २५१ | २६३ | ४५६ | १३१ | १९१ | २४७ | १२.७ |
| ऑक्टोबर, २०१३ | २५२ | २६३ | ४५९ | १३१ | १९१ | २४८ | १२.५ |
| नोव्हेंबर, २०१३ | २५२ | २६६ | ४५६ | १३२ | १९२ | २४८ | ११.८ |
| डिसेंबर, २०१३ | २४४ | २६८ | ४५६ | १३२ | १९२ | २४४ | १०.४ |

आधार - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

@ ९ महिन्यांची सरासरी

## परिशिष्ट ४.२
## महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००३)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी आणि तंबाखू | इंधन, वीज व दिवाबत्ती | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्व वस्तू | वार्षिक चलन वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **४५.८०** | **१.५४** | **१०.२८** | **७.५१** | **३४.८७** | **१००.००** | ... |
| २००४-०५ | १०५ | १०३ | १०३ | १०२ | १०४ | १०४ | ... |
| २००५-०६ | १०९ | १०७ | १०७ | १०३ | १०७ | १०८ | ३.२ |
| २००६-०७ | १२० | ११२ | १२४ | १०५ | ११० | ११५ | ७.२ |
| २००७-०८ | १२८ | १२१ | १६२ | १०६ | ११५ | १२५ | ८.७ |
| २००८-०९ | १४२ | १३४ | २२४ | १०९ | १२३ | १४१ | १२.९ |
| २००९-१० | १६५ | १४७ | २४५ | ११३ | १३१ | १५७ | ११.४ |
| २०१०-११ | १८६ | १६९ | २७८ | ११८ | १४३ | १७५ | ११.४ |
| २०११-१२ | २०१ | २०५ | २९७ | १२६ | १५४ | १८९ | ७.९ |
| २०१२-१३ | २२४ | २३३ | ३४९ | १३२ | १६० | २०८ | १०.१ |
| २०१३-१४@ | २५१ | २६० | ३९३ | १३६ | १७४ | २३० | १२.० |
| एप्रिल, २०१३ | २३४ | २५० | ३६७ | १३५ | १७० | २१८ | ११.३ |
| मे, २०१३ | २४२ | २५५ | ३६७ | १३५ | १७१ | २२२ | १२.० |
| जून, २०१३ | २५० | २५८ | ३६८ | १३६ | १७२ | २२६ | १३.० |
| जुलै, २०१३ | २५८ | २५९ | ३६८ | १३६ | १७३ | २३१ | १३.६ |
| ऑगस्ट, २०१३ | २५९ | २६० | ३६८ | १३६ | १७५ | २३२ | १०.३ |
| सप्टेंबर, २०१३ | २५४ | २६२ | ४२४ | १३६ | १७५ | २३६ | १२.३ |
| ऑक्टोबर, २०१३ | २५५ | २६४ | ४२४ | १३७ | १७६ | २३६ | १२.२ |
| नोव्हेंबर, २०१३ | २६२ | २६५ | ४२४ | १३८ | १७६ | २४० | १३.३ |
| डिसेंबर, २०१३ | २४७ | २६६ | ४२५ | १३८ | १७७ | २३३ | १०.१ |

आधार - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

@ ९ महिन्यांची सरासरी

## परिशिष्ट ४.३
## महत्त्वाच्या राज्यांसाठी ग्राहक किंमती निर्देशांक (केंद्रिय)

(एप्रिल -डिसेंबर )

| राज्ये | ग्रामीण | | | नागरी | | | एकत्रित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२-१३ | २०१३-१४ | % वाढ | २०१२-१३ | २०१३-१४ | % वाढ | २०१२-१३ | २०१३-१४ | % वाढ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| आंध्र प्रदेश | १२१.५६ | १३४.५६ | १०.६९ | १२०.७३ | १३४.५६ | ११.४५ | १२१.२१ | १३४.५४ | ११.०० |
| बिहार | १२२.१२ | १३६.२१ | ११.५४ | १२०.६९ | १३१.५० | ८.९६ | १२१.८९ | १३५.४३ | ११.११ |
| गुजरात | १२५.६९ | १३७.५६ | ९.४४ | १२०.८० | १३१.३८ | ८.७६ | १२३.०२ | १३४.१७ | ९.०६ |
| कर्नाटक | १२४.९९ | १३८.७३ | ११.०० | १२२.४१ | १३७.२१ | १२.०९ | १२३.६७ | १३७.९६ | ११.५५ |
| केरळ | १२१.४२ | १३४.३३ | १०.६३ | १२२.४९ | १३६.५४ | ११.४७ | १२१.७८ | १३५.०३ | १०.८९ |
| मध्य प्रदेश | १२४.०६ | १३६.६४ | १०.१५ | ११९.७४ | १३१.०८ | ९.४६ | १२२.२३ | १३४.२८ | ९.८५ |
| महाराष्ट्र | १२३.०८ | १३३.६० | ८.५५ | ११९.४३ | १३०.७७ | ९.४९ | १२०.७८ | १३१.८० | ९.१३ |
| पंजाब | ११८.६७ | १२८.३६ | ८.१६ | ११९.२४ | १२९.७९ | ८.८४ | ११८.९४ | १२९.०६ | ८.५० |
| राजस्थान | १२४.३४ | १३५.४६ | ८.९४ | ११९.६४ | १२९.६१ | ८.३३ | १२२.६३ | १३३.३३ | ८.७३ |
| तामिळनाडू | १२४.७९ | १३७.७० | १०.३५ | १२३.२६ | १३६.४८ | १०.७३ | १२३.९१ | १३७.०० | १०.५६ |
| उत्तरप्रदेश | १२३.९४ | १३५.६० | ९.४० | १२०.५४ | १३२.५७ | ९.९७ | १२२.८८ | १३४.६३ | ९.५७ |
| पश्चिम बंगाल | १२७.४८ | १३९.५० | ९.४३ | ११९.६९ | १३२.४४ | १०.६६ | १२४.०८ | १३६.४२ | ९.९५ |
| **अखिल भारत** | **१२३.३७** | **१३५.४३** | **९.७८** | **१२०.५१** | **१३२.५३** | **९.९८** | **१२२.१२** | **१३४.१८** | **९.८७** |

*आधार :* केंद्रिय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

टीप : प्रत्येक राज्यासाठी आयटेम बास्केट वेगवेगळी आहे.

## परिशिष्ट ४.४

## महाराष्ट्र व अखिल भारतातील शेतमजुरांकरिता व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष : १९८६-८७)

| वर्ष / महिना | शेतमजुरांकरिता ग्राहक किंमतींचा निर्देशांक | | | | ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमतींचा निर्देशांक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | | अखिल भारत | | महाराष्ट्र | | अखिल भारत | |
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| २०००-०१ | ३१६ | ३०५ | ३०३ | ३०५ | ३१६ | ३०५ | ३०३ | ३०७ |
| २००१-०२ | ३०७ | ३०३ | ३०२ | ३०९ | ३०८ | ३०४ | ३०३ | ३११ |
| २००२-०३ | ३२२ | ३१७ | ३१२ | ३१९ | ३२२ | ३१७ | ३१३ | ३२१ |
| २००३-०४ | ३४२ | ३३२ | ३२५ | ३३१ | ३४१ | ३३२ | ३२६ | ३३३ |
| २००४-०५ | ३५७ | ३४६ | ३३३ | ३३९ | ३५६ | ३४६ | ३३४ | ३४१ |
| २००५-०६ | ३६५ | ३६२ | ३४४ | ३५३ | ३६४ | ३६२ | ३४५ | ३५५ |
| २००६-०७ | ४०२ | ३९४ | ३७६ | ३८० | ४०० | ३९२ | ३७६ | ३८२ |
| २००७-०८ | ४३७ | ४२३ | ४०६ | ४०९ | ४३४ | ४२० | ४०६ | ४०९ |
| २००८-०९ | ४८४ | ४६४ | ४५२ | ४५० | ४८० | ४६० | ४५२ | ४५१ |
| २००९-१० | ५७४ | ५४० | ५२२ | ५१३ | ५७१ | ५३५ | ५२३ | ५१३ |
| २०१०-११ | ६३३ | ६०० | ५७२ | ५६४ | ६२९ | ५९५ | ५७३ | ५६४ |
| २०११-१२ | ७०४ | ६७६ | ६०२ | ६११ | ६९७ | ६६८ | ६०३ | ६११ |
| २०१२-१३ | ७७० | ७४४ | ६५८ | ६७२ | ७६३ | ७३७ | ६६० | ६७३ |
| २०१३-१४@ | ८२३ | ७९३ | ७३७ | ७४७ | ८१५ | ७८८ | ७३८ | ७४७ |
| एप्रिल, २०१३ | ७८७ | ७६४ | ६९५ | ७११ | ७८१ | ७५९ | ६९७ | ७११ |
| मे, २०१३ | ७९८ | ७७३ | ७०४ | ७१९ | ७९१ | ७६८ | ७०६ | ७२० |
| जून, २०१३ | ८१५ | ७८५ | ७१८ | ७२९ | ८०९ | ७८० | ७२० | ७३० |
| जुलै, २०१३ | ८२६ | ७९३ | ७३२ | ७४० | ८२१ | ७८९ | ७३४ | ७४१ |
| ऑगस्ट, २०१३ | ८४३ | ८०८ | ७४७ | ७५४ | ८३५ | ८०२ | ७४८ | ७५३ |
| सप्टेंबर, २०१३ | ८४३ | ८०९ | ७५२ | ७५९ | ८३३ | ८०२ | ७५३ | ७५९ |
| ऑक्टोबर, २०१३ | ८३७ | ८०५ | ७५९ | ७६६ | ८२७ | ८०० | ७५९ | ७६६ |
| नोव्हेंबर, २०१३ | ८३८ | ८०६ | ७७१ | ७७७ | ८२८ | ८०० | ७७२ | ७७७ |
| डिसेंबर, २०१३ | ८२२ | ७९७ | ७५२ | ७६५ | ८११ | ७९२ | ७५३ | ७६६ |

आधार - श्रम ब्युरो, भारत सरकार, सिमला

@ ९ महिन्यांची सरासरी

# परिशिष्ट ४.५

## औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००१)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी, तंबाखू व मादक पदार्थ | इंधन व दिवाबत्ती | निवास | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्वसाधारण निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **४६.१९** | **२.२७** | **६.४३** | **१५.२७** | **६.५८** | **२३.२६** | **१००.०** |
| २००५-०६ | ११५ | ११२ | १२३ | ११८ | ११० | १२० | ११७ |
| २००६-०७ | १२६ | ११६ | १३० | १२६ | ११४ | १२६ | १२५ |
| २००७-०८ | १३६ | १२८ | १३३ | १३१ | ११८ | १३१ | १३३ |
| २००८-०९ | १५३ | १३८ | १४४ | १३७ | १२२ | १४१ | १४५ |
| २००९-१० | १७६ | १५० | १४९ | १६६ | १२८ | १४९ | १६३ |
| २०१०-११ | १९४ | १६८ | १६३ | २०१ | १३६ | १५७ | १८० |
| २०११-१२ | २०६ | १९४ | १८८ | २२२ | १५५ | १६८ | १९५ |
| २०१२-१३ | २३० | २२३ | २१४ | २३८ | १७० | १८२ | २१५ |
| २०१३-१४@ | २५९ | २४७ | २२८ | २५२ | १८० | १९४ | २३५ |
| एप्रिल, २०१३ | २४५ | २४० | २२२ | २४६ | १७७ | १९१ | २२६ |
| मे, २०१३ | २४८ | २४२ | २२३ | २४६ | १७८ | १९० | २२८ |
| जून, २०१३ | २५५ | २४६ | २२४ | २४६ | १७९ | १९१ | २३१ |
| जुलै, २०१३ | २५९ | २४६ | २२६ | २५५ | १७९ | १९२ | २३५ |
| ऑगस्ट, २०१३ | २६२ | २४९ | २२६ | २५५ | १८० | १९४ | २३७ |
| सप्टेंबर, २०१३ | २६३ | २५० | २३० | २५५ | १८१ | १९६ | २३८ |
| ऑक्टोबर, २०१३ | २६८ | २५० | २३३ | २५५ | १८१ | १९६ | २४१ |
| नोव्हेंबर, २०१३ | २७३ | २५१ | २३२ | २५५ | १८२ | १९७ | २४३ |
| डिसेंबर, २०१३ | २६२ | २५२ | २३४ | २५५ | १८३ | १९८ | २३९ |

आधार - श्रम ब्युरो, भारत सरकार, सिमला

@ ९ महिन्यांची सरासरी

## परिशिष्ट ४.६

## महाराष्ट्र राज्यातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(केंद्रिय केंद्रे)

| वर्ष / महिना | मुंबई | | सोलापूर | | नागपूर | | पुणे | | नाशिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | | | | | | (पायाभूत वर्ष - २००१) |
| **भारांक** | **४८.९** | **१००.०** | **५४.७** | **१००.०** | **४३.१** | **१००.०** | **३९.८** | **१००.०** | **४१.४** | **१००.०** |
| २००५-०६ | ११५ | ११८ | ११३ | ११५ | ११५ | ११९ | १२० | ११९ | ११९ | ११८ |
| २००६-०७ | १२६ | १२८ | १२६ | १२७ | १३३ | १३४ | १३४ | १३० | १३१ | १२६ |
| २००७-०८ | १३६ | १३६ | १४९ | १४२ | १४६ | १४२ | १४५ | १३८ | १४० | १३२ |
| २००८-०९ | १५१ | १४८ | १५९ | १५१ | १६६ | १५५ | १६० | १५० | १५५ | १४२ |
| २००९-१० | १७३ | १६३ | १७६ | १६६ | १९२ | १८३ | १८३ | १६७ | १८३ | १६५ |
| २०१०-११ | १९१ | १७८ | १८९ | १८२ | २०५ | २०७ | २०३ | १८५ | २०२ | १८६ |
| २०११-१२ | २०८ | १९६ | २१४ | २०४ | २१६ | २२४ | २२६ | २०४ | २१६ | २०८ |
| २०१२-१३ | २३२ | २१८ | २२८ | २२० | २४४ | २४६ | २४७ | २२१ | २३३ | २२८ |
| २०१३-१४ @ | २६० | २४१ | २५६ | २४३ | २८४ | २६९ | २७९ | २४० | २६० | २४४ |
| एप्रिल, २०१३ | २४५ | २२९ | २४३ | २३३ | २५९ | २५६ | २६१ | २३० | २४३ | २३५ |
| मे, २०१३ | २४८ | २३१ | २४५ | २३४ | २७७ | २६४ | २६६ | २३२ | २५७ | २४२ |
| जून, २०१३ | २६० | २३८ | २४७ | २३५ | २८० | २६६ | २८२ | २४० | २५९ | २४३ |
| जुलै, २०१३ | २६१ | २४१ | २५२ | २४१ | २९१ | २७२ | २७८ | २३९ | २६४ | २४६ |
| ऑगस्ट, २०१३ | २६५ | २४४ | २५८ | २४४ | ३०४ | २७८ | २८८ | २४४ | २६९ | २४८ |
| सप्टेंबर, २०१३ | २६२ | २४४ | २५९ | २४५ | २९१ | २७४ | २८२ | २४२ | २६२ | २४७ |
| ऑक्टोबर, २०१३ | २७० | २४८ | २५८ | २४५ | २९६ | २७६ | २८२ | २४३ | २६१ | २४७ |
| नोव्हेंबर, २०१३ | २७१ | २४९ | २६८ | २५२ | २९१ | २७४ | २९० | २४६ | २६५ | २४८ |
| डिसेंबर, २०१३ | २६१ | २४४ | २७६ | २५६ | २६६ | २६४ | २८३ | २४६ | २६३ | २४४ |

आधार - श्रम ब्युरो, भारत सरकार, सिमला

@ ९ महिन्यांची सरासरी

# परिशिष्ट ४.७

## महाराष्ट्र राज्यातील निवडक केंद्रांमधील औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक

(राज्य केंद्रे)

| वर्ष / महिना | अकोला | | कोल्हापूर | | जळगाव | | नांदेड | | औरंगाबाद | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक | खाद्यपदार्थ गट | सर्वसाधारण निर्देशांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | | | | | (पायाभूत वर्ष - २००१) | |
| **भारांक** | **४५.८८** | **१००.०** | **४८.२२** | **१००.०** | **४७.७६** | **१००.०** | **४९.०५** | **१००.०** | **४०.७९** | **१००.०** |
| २००८-०९ | १३४ | १४४ | १५० | १४९ | १५१ | १५० | १५३ | १५४ | १४८ | १५० |
| २००९-१० | १५६ | १६१ | १६९ | १६४ | १७२ | १६७ | १६९ | १७४ | १७१ | १६४ |
| २०१०-११ | १७० | १७५ | १९१ | १८४ | १९५ | १८६ | १८७ | २०० | १८८ | १८३ |
| २०११-१२ | १८३ | १८८ | २१७ | २०७ | २१८ | २०६ | २१५ | २२७ | २१२ | २०६ |
| २०१२-१३ | २१० | २१६ | २३६ | २२६ | २४१ | २३० | २३२ | २५१ | २३९ | २३४ |
| २०१३-१४ @ | २३४ | २३८ | २५९ | २४५ | २६३ | २५१ | २५८ | २७३ | २६६ | २५७ |
| एप्रिल, २०१३ | २१७ | २२६ | २४२ | २३४ | २४८ | २४० | २४३ | २६३ | २५० | २४६ |
| मे, २०१३ | २२५ | २२९ | २४९ | २३८ | २५६ | २४३ | २४७ | २६५ | २६१ | २५० |
| जून, २०१३ | २३२ | २३३ | २५८ | २४२ | २६३ | २४७ | २५० | २६६ | २६७ | २५३ |
| जुलै, २०१३ | २३५ | २३६ | २६२ | २४६ | २६५ | २५१ | २६० | २७३ | २७० | २५९ |
| ऑगस्ट, २०१३ | २३८ | २४२ | २६३ | २४८ | २६५ | २५३ | २६५ | २७७ | २७२ | २६१ |
| सप्टेंबर, २०१३ | २४० | २४२ | २६२ | २४८ | २६६ | २५४ | २६५ | २७७ | २७१ | २६१ |
| ऑक्टोबर, २०१३ | २४१ | २४५ | २६७ | २५० | २६८ | २५६ | २६४ | २७८ | २७१ | २६२ |
| नोव्हेंबर, २०१३ | २४४ | २४६ | २६७ | २५० | २७० | २५७ | २६७ | २७९ | २७० | २६२ |
| डिसेंबर, २०१३ | २३५ | २४२ | २६० | २४७ | २६४ | २५४ | २६५ | २७९ | २६४ | २५९ |

आधार - कामगार आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

@ ९ महिन्यांची सरासरी

## परिशिष्ट ४.८

## अखिल भारतीय घाऊक किंमतींचे निर्देशांक

| वर्ष/ महिना | प्राथमिक वस्तू | इंधन, वीज, दिवाबत्ती व वंगण | वस्तुनिर्माण उत्पादने | सर्व वस्तू |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | (पायाभूत वर्ष - २००४-०५) |
| **भारांक** | **२०.१२** | **१४.९१** | **६४.९७** | **१००.००** |
| २००५-०६ | १०४.३ | ११३.६ | १०२.४ | १०४.५ |
| २००६-०७ | ११४.३ | १२०.९ | १०८.२ | १११.४ |
| २००७-०८ | १२३.९ | १२१.० | ११३.४ | ११६.६ |
| २००८-०९ | १३७.५ | १३५.० | १२०.४ | १२६.० |
| २००९-१० | १५४.९ | १३२.१ | १२३.१ | १३०.८ |
| २०१०-११ | १८२.४ | १४८.३ | १३०.१ | १४३.३ |
| २०११-१२ | २००.३ | १६९.० | १३९.५ | १५६.१ |
| २०१२-१३ | २२०.० | १८६.५ | १४७.१ | १६७.६ |
| २०१३-१४ @ | २४२.५ | २०२.९ | १५०.८ | १७७.० |
| एप्रिल, २०१३ | २२६.५ | १९३.७ | १४९.१ | १७१.३ |
| मे, २०१३ | २२७.३ | १९१.९ | १४९.३ | १७१.४ |
| जून, २०१३ | २३३.९ | १९४.७ | १४९.५ | १७३.२ |
| जुलै, २०१३ | २४०.३ | १९९.९ | १४९.९ | १७५.५ |
| ऑगस्ट, २०१३ | २५१.९ | २०४.७ | १५०.६ | १७९.० |
| सप्टेंबर, २०१३ | २५२.७ | २१०.६ | १५१.५ | १८०.७ |
| ऑक्टोबर, २०१३ | २५१.४ | २०९.८ | १५२.१ | १८०.७ |
| नोव्हेंबर, २०१३ | २५४.९ | २०९.६ | १५२.३ | १८१.५ |
| डिसेंबर, २०१३ | २४३.७ | २११.१ | १५२.५ | १७९.६ |

आधार - आर्थिक सल्लागारांचे कार्यालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

@ ९ महिन्यांची सरासरी

## परिशिष्ट ४.९

## महत्त्वाच्या किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढीचे दर

| वर्ष / महिना | चलन वाढीचे दर | | | |
|---|---|---|---|---|
| | अखिल भारतीय घाऊक किंमतीचा निर्देशांक # | औद्योगिक कामगारांसाठी अखिल भारतीय ग्राहक किंमतीचा निर्देशांक + | शेतमजुरांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतीचा निर्देशांक + | ग्रामीण मजुरांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतीचा निर्देशांक + |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २०००-०१ | ७.१३ | ३.८२ | (-) ०.३३ | ०.०३ |
| २००१-०२ | ३.६२ | ४.३१ | १.०९ | १.३३ |
| २००२-०३ | ३.३८ | ३.९८ | ३.१६ | ३.१३ |
| २००३-०४ | ५.४९ | ३.८५ | ३.९० | ३.७९ |
| २००४-०५ | ६.४८ | ३.८३ | २.६० | २.५८ |
| २००५-०६ | ४.४७ | ४.४१ | ३.८५ | ३.८५ |
| २००६-०७ | ६.५९ | ६.८३ | ७.८५ | ७.५२ |
| २००७-०८ | ४.७४ | ६.४० | ७.४५ | ७.१८ |
| २००८-०९ | ८.०५ | ९.०९ | १०.२३ | १०.१९ |
| २००९-१० | ३.८० | १२.३७ | १३.९१ | १३.७६ |
| २०१०-११ | ९.५६ | १०.४५ | १०.०० | १०.०१ |
| २०११-१२ | ८.९४ | ८.३९ | ८.१९ | ८.३५ |
| २०१२-१३ | ७.३६ | १०.४४ | १०.०३ | १०.१९ |
| २०१३-१४ @ | ६.१९ | १०.६६ | १२.६६ | १२.४६ |
| एप्रिल, २०१३ | ४.७७ | १०.२४ | १२.३२ | १२.१५ |
| मे, २०१३ | ४.५८ | १०.६८ | १२.७० | १२.५० |
| जून, २०१३ | ५.१६ | ११.०६ | १२.८५ | १२.६५ |
| जुलै, २०१३ | ५.८५ | १०.८५ | १२.८० | १२.६१ |
| ऑगस्ट, २०१३ | ६.९९ | १०.७५ | १३.२१ | १२.८९ |
| सप्टेंबर, २०१३ | ७.०५ | १०.७० | १२.७८ | १२.४४ |
| ऑक्टोबर, २०१३ | ७.२४ | ११.०६ | १२.६५ | १२.४८ |
| नोव्हेंबर, २०१३ | ७.५२ | ११.४७ | १३.४३ | १३.२७ |
| डिसेंबर, २०१३ | ६.४० | ९.१३ | ११.१९ | ११.१८ |

आधार - # आर्थिक सल्लागार , वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कार्यालय

\+ श्रम ब्युरो, भारत सरकार, सिमला

टीप - चलन वाढ दर = मागील वर्षाच्या तत्सम कालावधीतील निर्देशांकापेक्षा चालू कालावधीतील निर्देशांकात झालेली टक्केवारीतील वाढ

@ ९ महिन्यांची सरासरी

## परिशिष्ट ४.१०

## जिल्हावार शिधापत्रिकांची संख्या (३१.१०.२०१३)

| जिल्हा | पिवळी | | केशरी | अन्नपूर्णा | सफेद | एकूण शिधापत्रिका |
|---|---|---|---|---|---|---|
| | दारिद्र्य रेषेखालील | अंत्योदय अन्न योजना | दारिद्र्य रेषेवरील | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र | ३१,२७९ | १९,०४३ | ३२,५५,१५४ | ९,४६० | ७,७८,५५३ | ४०,९३,४८९ |
| ठाणे | १,५३,८२८ | १,४०,७१४ | ४,९२,३४८ | २,४०४ | ४०,७४९ | ८,३०,०४३ |
| रायगड | ९९,५६९ | ७३,४७६ | ३,८५,२०७ | १,७९८ | ९८,३४१ | ६,५८,३९१ |
| रत्नागिरी | ७२,६३७ | ४२,७८८ | २,५३,८५३ | ८१९ | ३८,३१४ | ४,०८,४११ |
| सिंधुदुर्ग | ४८,०१५ | २३,४५७ | १,३३,९५० | ५४० | २१,००३ | २,२६,९६५ |
| नाशिक | ३,०१,५२४ | १,७९,७४३ | ६,४१,००४ | ८११ | ७६,६३३ | ११,९९,७१५ |
| धुळे | १,४३,२६३ | ७६,४०८ | १,९८,४८२ | १,७१८ | ९,७१३ | ४,२९,५८४ |
| नंदुरबार | १,०४,३५४ | १,०५,९६५ | ९८,७६१ | १,३२३ | ८,३०२ | ३,१८,७०५ |
| जळगाव | २,१५,१९५ | १,३६,९२० | ४,७९,३१६ | २,००६ | ७०,५१२ | ९,०३,९४९ |
| अहमदनगर | २,५३,५४४ | ९६,५२३ | ५,३१,६५६ | १,९२१ | ५५,४८२ | ९,३९,१२६ |
| पुणे | १,५९,०६० | ७०,७९३ | १३,६४,७०९ | १,०३१ | १,६९,८२९ | १७,६५,४२२ |
| सातारा | १,३२,५८९ | ३६,०२८ | ४,६७,८९५ | १,७१५ | ५०,६६७ | ६८,८९४ |
| सांगली | ७८,७६७ | ३५,७४१ | ४,४३,७८६ | १,२५४ | ६८,१५३ | ६,२७,७०१ |
| सोलापूर | २,३२,६६१ | ८४,१८३ | ४,८६,०३६ | १,१०४ | ७६,००९ | ८,७९,९९३ |
| कोल्हापुर | १,५१,०६८ | ५६,८९७ | ६,०८,२५६ | ३७७ | ८०,७२५ | ८,९७,३२३ |
| औरंगाबाद | १,७८,५५६ | ६९,९७३ | ४,८९,९९७ | २,३६७ | ९,४१७ | ७,५०,३१० |
| जालना | १,१४,५५४ | ४२,९७९ | १,७२,५६० | २,२२४ | ५,४३२ | ३,३७,७४९ |
| परभणी | ७४,३२७ | ४४,४४३ | २,२५,४९५ | १,९३१ | २,९०१ | ३,४९,०९७ |
| हिंगोली | ६०,३५० | २७,३०९ | १,५७,७४८ | ९८४ | २,४५६ | २,४८,८४७ |
| बीड | २,३५,१९८ | ४३,०३१ | ३,६०,२७६ | २,८२५ | १४,०३५ | ६,५५,३६५ |
| नांदेड | १,४९,०१८ | ७६,५५० | ३,८७,५८६ | २,०२७ | ७,८६३ | ६,२३,०४४ |
| उस्मानाबाद | १,०६,६३९ | ३८,२०४ | २,०५,२०४ | ८४१ | ९,३७९ | ३,६०,२६७ |
| लातूर | ८६,८७८ | ४०,७७४ | २,९३,०४२ | १,९०८ | १५,७२१ | ४,३८,३२३ |
| बुलढाणा | १,४२,१४६ | ६४,४२८ | २,५३,१४१ | ३,५२७ | ९,२०२ | ४,७२,४४४ |
| अकोला | ९६,७७३ | ४४,६५४ | १,६६,९१२ | १,७८८ | १४,८७४ | ३,२५,००१ |
| वाशिम | ६९,६६४ | ३९,८४० | १,५७,०५३ | २,०१७ | १२,९९१ | २,८१,५६५ |
| अमरावती | १,७२,२९१ | १,२१,८२३ | २,६२,१४० | ३,२९१ | १४,२८८ | ५,७३,८३३ |
| यवतमाळ | १,३३,२५२ | १,३४,६३१ | २,४६,८७७ | ४,६९६ | ५,९९८ | ५,२५,४५४ |
| वर्धा | ४७,७७९ | ४३,०९४ | १,६९,९३६ | २,७६२ | ११,९९६ | २,७५,५६७ |
| नागपूर | १,३५,८२८ | १,००,२८२ | ६,५२,९८९ | ६,३०६ | ६४,९८५ | ९,६०,४९० |
| भंडारा | ७८,३४१ | ६३,२४९ | ९२,७२५ | ७६९ | १९,८९७ | २,५४,९८१ |
| गोंदिया | ८९,४७३ | ७५,५६१ | ८३,४५६ | १,६६६ | ७,४०१ | २,५७,५५७ |
| चंद्रपुर | १,०७,३३९ | १,३१,०६० | १,६७,१२४ | ८०२ | ३७,४७४ | ४,४३,७९९ |
| गडचिरोली | ३९,३६१ | ९०,७४२ | ६८,२९० | ० | ८,४०४ | २,०६,७९७ |
| **महाराष्ट्र** | **४२,९५,१२०** | **२४,७१,४०६** | **१,४४,५२,९६४** | **७१,०१२** | **१९,१७,६९९** | **२,३२,०८,२०१** |

आधार - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ४.११
## महाराष्ट्रातील अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानांना देण्यात आलेला तांदूळ व गहू

(लाख टनात)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई शिधावाटप क्षेत्र | इतर जिल्हे | एकूण (२) + (३) | मुंबई शिधावाटप क्षेत्र | इतर जिल्हे | एकूण (५) + (६) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| २००१-०२ (एकूण) | ०.०२ | ५.१६ | ५.१८ | ०.०५ | ८.४८ | ८.५३ |
| पैकी, लसाविव्य | ०.०२ | ५.०० | ५.०२ | ०.०४ | ८.२७ | ८.३१ |
| २००५-०६ (एकूण) | ०.०९ | ९.३७ | ९.४६ | ०.५५ | १४.९९ | १५.५४ |
| पैकी, लसाविव्य | ०.०७ | ९.२७ | ९.३४ | ०.१० | १४.३२ | १४.४२ |
| २००९-१० (एकूण) | ०.६७ | १४.०१ | १४.६८ | २.५० | १८.३७ | २०.८७ |
| पैकी, लसाविव्य | ०.१५ | १२.३५ | १२.५० | ०.०७ | १३.०७ | १३.१४ |
| २०१०-११ (एकूण) | ०.८७ | १४.६२ | १५.४९ | १.९९ | १९.४४ | २१.४३ |
| पैकी, लसाविव्य | ०.१३ | १२.७१ | १२.८४ | ०.०८ | १३.४१ | १३.४९ |
| २०११-१२ (एकूण) | ०.६४ | १४.९१ | १५.५५ | १.७४ | १९.४० | २१.१४ |
| पैकी, लसाविव्य | ०.१४ | १३.३० | १३.४४ | ०.०७ | १३.९४ | १४.०१ |
| २०१२-१३ (एकूण) | १.०१ | १५.५३ | १६.५४ | १.८५ | २०.२८ | २२.१३ |
| पैकी, लसाविव्य | ०.१४ | १३.३५ | १३.४९ | ०.०६ | १४.१६ | १४.२२ |
| २०१३-१४ (एकूण) (डिसेंबर, २०१३ पर्यंत) | १.१५ | ११.४२ | १२.५७ | १.०८ | १३.३४ | १४.४२ |
| पैकी, लसाविव्य | ०.०९ | ८.३४ | ८.४८ | ०.०२ | ८.९१ | ८.९३ |

## परिशिष्ट ४.१२
## भारत सरकारकडून महाराष्ट्र राज्याला मिळालेले नियतन

(लाख टनात)

| वर्ष | तांदूळ | गहू |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| २००१-०२ (एकूण) | ९.२३ | १७.१३ |
| पैकी, लसाविव्य | ६.५५ | १२.१६ |
| २००५-०६ (एकूण) | २७.४० | ४७.०४ |
| पैकी, लसाविव्य | १०.९० | १६.५४ |
| २००९-१० (एकूण) | १७.४१ | २९.१४ |
| पैकी, लसाविव्य | १३.३४ | १४.१० |
| २०१०-११ (एकूण) | १९.२० | ३२.१२ |
| पैकी, लसाविव्य | १४.६८ | १५.८५ |
| २०११-१२ (एकूण) | १९.३६ | ३२.८५ |
| पैकी, लसाविव्य | १६.२३ | १६.९६ |
| २०१२-१३ (एकूण) | २०.७४ | ३१.८५ |
| पैकी, लसाविव्य | १५.५१ | १६.९४ |
| २०१३-१४ (एकूण) (डिसेंबर, २०१३ पर्यंत) | १६.७९ | १८.८८ |
| पैकी, लसाविव्य | १०.०० | १०.५७ |

आधार - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

टीप - लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थे (लसाविव्य ) अंतर्गत आकडेवारीमध्ये अंत्योदय अन्न योजनेची आकडेवारी समाविष्ट केलेली आहे.

## परिशिष्ट ४.१३

## जिल्हावार गोदामांची संख्या, क्षमता, रास्त भाव दुकानांची संख्या

| जिल्हा | उपलब्ध गोदामे (जून, २०१३ पर्यंत) | | रास्त भाव दुकानांची संख्या (डिसेंबर, २०१३ पर्यंत) |
|---|---|---|---|
| | संख्या | क्षमता (मे.टन) | |
| (१) | (२) | (३) | (४) |
| मुंबई | १३ | ८,७२४ | ३,८३४ |
| ठाणे | ३८ | १७,००० | १,४०६ |
| रायगड | ६२ | २५,८०० | १,१४९ |
| रत्नागिरी | ४५ | १६,०५० | ७८१ |
| सिंधुदुर्ग | १४ | ६,५५० | ३९४ |
| नाशिक | २८ | १७,२०० | २,५५३ |
| धुळे | १७ | ७,५०० | ९८३ |
| नंदुरबार | २५ | १२,५०० | १,००९ |
| जळगाव | ३२ | १४,१०० | १,९२१ |
| अहमदनगर | ७६ | ५०,८५० | १,६३५ |
| पुणे | ४७ | ३४,००० | २,७४३ |
| सातारा | ४३ | १५,६४० | १,६९३ |
| सांगली | २९ | १३,७६० | १,२०५ |
| सोलापूर | ५३ | ३८,०२४ | १,६७६ |
| कोल्हापुर | २१ | ९,८५० | १,४४६ |
| औरंगाबाद | २७ | २६,१८८ | १,७७७ |
| जालना | २५ | १७,६५० | १,२८५ |
| परभणी | २१ | ९,३०० | १,१७६ |
| हिंगोली | ११ | ६,६०० | ७९५ |
| बीड | ३५ | २५,०५० | २,०१७ |
| नांदेड | ४१ | १६,३५० | १,९२९ |
| उस्मानाबाद | ३० | १७,००० | १,०६८ |
| लातूर | २७ | १९,७०० | १,३४८ |
| बुलढाणा | २० | ८,८०० | १,५३६ |
| अकोला | २१ | ११,६०० | १,०५२ |
| वाशिम | ११ | ७,१५० | ७७४ |
| अमरावती | २९ | ११,७५० | १,९०९ |
| यवतमाळ | ३५ | १७,५०० | २,००० |
| वर्धा | १४ | ९,७८५ | ८२६ |
| नागपूर | ४९ | २५,३२९ | १,८४७ |
| भंडारा | १६ | ९,५०० | ८८७ |
| गोंदिया | १९ | १२,४०० | ९९० |
| चंद्रपुर | २९ | १४,२०० | १,५१३ |
| गडचिरोली | २१ | ९,०५० | १,१८२ |
| **महाराष्ट्र** | **१,०२४** | **५,६२,४५०** | **५०,३३९** |

आधार - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

५

# लोकवित्त



# ५. लोकवित्त

## अर्थसंकल्प २०१३-१४

५.१ अर्थसंकल्प २०१३-१४ ₹ १८४ कोटीच्या महसुली अधिक्यासह सादर करण्यात आला. परंतु नैसर्गिक आपत्ती व वीज दरात सवलत यावर प्रामुख्याने झालेल्या खर्चामुळे सुधारित अर्थसंकल्प २०१३-१४ ₹ ३,०१७ कोटीची महसुली तूट दर्शवितो. मागील वर्षाच्या तुलनेत वर्ष २०१३-१४(सुअं) मध्ये एकूण जमा १७.९ टक्क्यांनी वाढल्या. वित्तीय तूट मागील वर्षाच्या तुलनेत ९३.३ टक्क्यांनी वाढली आहे. सदर तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या १.८ टक्के असून तेराव्या वित्त आयोगाने घालून दिलेल्या मर्यादेत राखण्यात आली आहे. दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प तक्ता ५.१ मध्ये व तपशील परिशिष्ट ५.१ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.१ दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प**

(₹ कोटी)

| बाब | २०११-१२ (प्रत्यक्ष) | २०१२-१३ (प्रत्यक्ष) | २०१३-१४ (सुअं) |
|---|---|---|---|
| महसुली जमा | १,२१,२८६ | १,४२,९४७ | १,५८,४१० |
| महसुली खर्च | १,२३,५५४ | १,३८,७३६ | १,६१,४२७ |
| महसुली तूट (२-१) | २,२६८ | (-)४,२११ | ३,०१७ |
| स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी | ०.२ | (-)०.३ | ०.२ |
| भांडवली जमा # | २१,८७८ | १४,७९८ | २७,५२८ |
| भांडवली खर्च # | १८,७१६ | १८,८१४ | २४,४२३ |
| एकूण जमा (१+४) # | १,४३,१६४ | १,५७,७४५ | १,८५,९३८ |
| एकूण खर्च (२+५) # | १,४२,२७० | १,५७,५५० | १,८५,८५० |
| अर्थसंकल्पीय तूट (७-६) | (-)८९४ | (-)१९५ | (-)८८ |
| वित्तीय तूट | १९,९६९ | १३,७४० | २६,५६३ |
| स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी | १.७ | १.० | १.८ |

*आधार*: वित्त विभाग, महाराष्ट्र शासन # कर्ज परताव्याच्या निव्वळ रकमा

सुअं - सुधारित अंदाज

## महसुली जमा

५.२ अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत महसुली जमा ११.१ टक्के इतक्या वार्षिक चक्रवाढ वृद्धीदराने (CAGR) वाढल्या. वर्ष २०१३-१४(सुअं) मध्ये एकूण महसुली जमा ₹ १,५८,४१० कोटी इतकी असून मागील वर्षाच्या तुलनेत १०.८ टक्के वाढ दर्शविते. महसुली जमा (प्रत्यक्ष) तक्ता ५.२ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ५.२ महसुली जमा (प्रत्यक्ष)**

(₹ कोटी)

| वर्ष | कर महसूल | करेतर महसूल @ | एकूण महसुली जमा |
|---|---|---|---|
| २००७-०८ | ५५,१२६ | २४,४५७ | ७९,५८३ |
| २००८-०९ | ६०,०४९ | २१,२२२ | ८१,२७१ |
| २००९-१० | ६७,३५४ | १९,५५६ | ८६,९१० |
| २०१०-११ | ८६,४४७ | १९,४२१ | १,०५,८६८ |
| २०११-१२ | १,००,९५२ | २०,३३४ | १,२१,२८६ |
| २०१२-१३ | १,१८,६४० | २४,३०७ | १,४२,९४७ |
| २०१३-१४ # | १,२६,९६१ | ३१,४४९ | १,५८,४१० |

*आधार*: वित्त विभाग, महाराष्ट्र शासन @ केंद्रीय अनुदानांसह

# सुधारित अंदाज

## कर महसूल

५.३ राज्याचा कर महसूल अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत १६.३ टक्के इतक्या वार्षिक चक्रवाढ वृद्धीदराने (CAGR) वाढला. मागील वर्षाच्या तुलनेत २०१३-१४(सुअं) मध्ये एकूण कर महसूल सात टक्क्याने वाढला. कर महसुलाचा २०१३-१४ च्या सुधारित अंदाजानुसार एकूण महसुली जमेत ८०.१ टक्के इतका वाटा आहे.

५.४ कर उद्धरण (Tax buoyancy) म्हणजे मागील वर्षाच्या तुलनेत कर महसुलातील शेकडा वाढ व स्थूल राज्य उत्पन्नातील शेकडा वाढ यांचे गुणोत्तर होय. हे गुणोत्तर एकपेक्षा जास्त असल्यास कर उद्धरण झाले असे समजण्यात येते. वर्ष २०१२-१३ मधील कर उद्धरण १.४ टक्क्यावरुन कमी होऊन २०१३-१४(सुअं) मध्ये ०.६ टक्के इतके झाले.

५.५ राज्याच्या कर महसुलातील प्रमुख हिस्सा असलेला स्वत:चा कर महसूल अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत १६.५ टक्के इतक्या वार्षिक चक्रवाढ वृद्धीदराने (CAGR) वाढला आणि २०१३-१४(सुअं) मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ६.७ टक्क्याने वाढला. स्वत:च्या कर महसुलाचा २०१३-१४ (सुअं) मध्ये एकूण महसुली जमेत व कर महसुलात अनुक्रमे ६९.७ टक्के व ८६.९ टक्के वाटा आहे. 'केंद्रीय करातील हिस्सा' मागील वर्षाच्या तुलनेत २०१३-१४(सुअं) मध्ये ९.२ टक्क्याने वाढला. स्वत:च्या कर महसुलाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण २०१२-१३ मध्ये ७.८ टक्के होते. हे प्रमाण २०१३-१४(सुअं) मध्ये कमी होऊन ७.५ टक्के झाले. एकूण कर महसूल (प्रत्यक्ष) तक्ता ५.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.३ एकूण कर महसूल (प्रत्यक्ष)**

(₹ कोटी)

| वर्ष | राज्याचा स्वत:चा कर महसूल | केंद्रीय करातील हिस्सा | एकूण |
|---|---|---|---|
| २००७-०८ | ४७,५२८ | ७,५९८ | ५५,१२६ |
| २००८-०९ | ५२,०३१ | ८,०१८ | ६०,०४९ |
| २००९-१० | ५९,१०६ | ८,२४८ | ६७,३५४ |
| २०१०-११ | ७५,०२८ | ११,४१९ | ८६,४४७ |
| २०११-१२ | ८७,६४८ | १३,३०४ | १,००,९५२ |
| २०१२-१३ | १,०३,४४८ | १५,१९२ | १,१८,६४० |
| २०१३-१४ # | १,१०,३७४ | १६,५८७ | १,२६,९६१ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन # सुधारित अंदाज

५.६. राज्याच्या स्वत:च्या कर महसुलात २०१३-१४(सुअं) मध्ये मूल्यवर्धित कराचा (व्हॅट) हिस्सा ५७.९ टक्के तर मुद्रांक व नोंदणी शुल्क आणि राज्य उत्पादन शुल्काचा हिस्सा अनुक्रमे १७.१ टक्के व ९.५ टक्के इतका आहे. वर्ष २०१२-१३ मधील मूल्यवर्धित करापासून मिळालेला महसूल ₹ ६०,०८० कोटी वरुन २०१३-१४(सुअं) मध्ये ₹ ६३,९२२ कोटी इतका वाढला व ही वाढ ६.४ टक्के आहे. राज्याच्या स्वत:च्या कर महसुलाचा तपशील परिशिष्ट ५.२ मध्ये दिला आहे.

५.७ वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्याला केंद्रीय करातील हिस्सा प्राप्त होतो. तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रीय करांतील (सेवाकरांव्यतिरिक्त) राज्यांना वितरणासाठी निश्चित केलेल्या राज्याच्या हिश्श्यात ४.९९७ टक्क्यांवरुन ५.१९९ टक्के इतकी वाढ झाली आहे. तसेच राज्याचा सेवा करांतील हिस्सा ५.०६३ टक्क्यांवरुन वाढून तो ५.२८१ टक्के झाला आहे. राज्याला केंद्रीय करांतील हिश्श्यापोटी २०१३-१४ (सुअं) मध्ये एकूण ₹ १६,५८७ कोटी हिस्सा प्राप्त झाला आहे.

## करेतर महसूल

५.८ करेतर महसुलात केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या अनुदानांचा ५५ टक्के पेक्षा जास्त हिस्सा आहे. केंद्र शासनाकडील अनुदानांचा करेतर महसुलातील २०१२-१३ मधील वाटा ५८.९ टक्क्यावरुन २०१३-१४(सुअं) मध्ये ५९.४ टक्के इतका वाढला. करेतर महसूल २०१३-१४(सुअं) मध्ये ₹ ३१,४४९ कोटी इतका आहे. वर्षनिहाय करेतर महसूल (प्रत्यक्ष) तक्ता ५.४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.४ वर्षनिहाय करेतर महसूल (प्रत्यक्ष)**

(₹ कोटी)

| वर्ष | व्याजाच्या जमा रकमा | इतर करेतर महसूल | केंद्रीय अनुदाने | एकूण करेतर महसूल |
|---|---|---|---|---|
| २००७-०८ | १,१७० | १५,७७८ | ७,५०९ | २४,४५७ |
| २००८-०९ | १,०१७ | ८,७७३ | ११,४३२ | २१,२२२ |
| २००९-१० | १,३४२ | ७,०११ | ११,२०३ | १९,५५६ |
| २०१०-११ | १,४२२ | ६,८०३ | ११,१९६ | १९,४२१ |
| २०११-१२ | १,३५९ | ६,८०९ | १२,१६६ | २०,३३४ |
| २०१२-१३ | २,४६५ | ७,५२० | १४,३२२ | २४,३०७ |
| २०१३-१४ # | ३,१४३ | ९,६१५ | १८,६९१ | ३१,४४९ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन # सुधारित अंदाज

## तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशी

५.९ वित्त आयोगाने केंद्रीय करातील हिश्श्याव्यतिरिक्त राज्यांना काही विशिष्ट हेतुंकरीता सहाय्यक अनुदाने देण्याची शिफारस केली आहे. यात स्थानिक स्वराज्य संस्था, एकमेवाव्दितीय ओळखपत्र (UID), न्याय प्रक्रिया सुधारणा, जिल्ह्यातील नाविन्यपूर्ण योजना, जिल्हा व राज्य सांख्यिकी प्रणालीत सुधारणा करणे आणि कर्मचारी व निवृत्तीवेतन विषयक माहितीकोष तयार करणे यासाठी सहाय्यक अनुदान यांचा समावेश आहे. या सहाय्यक अनुदानांपोटी राज्याला वर्ष २०१३-१४ मध्ये ₹ २,७३२ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली असून २०१४-१५ मध्ये ₹ ४,४१९ कोटी मिळणे अपेक्षित आहे. सहाय्यक अनुदाने परिशिष्ट ५.७ मध्ये देण्यात आली आहेत.

## महसुली खर्च

५.१० एकूण महसुली खर्चाबरोबरच विकास खर्चामध्येही दरवर्षी वाढ होत आहे. एकूण महसुली खर्चातील विकास खर्चाचे २०१३-१४(सुअं) मधील प्रमाण ६५.८ टक्के आहे. सामाजिक सेवा या क्षेत्राचा (शिक्षण, आरोग्य, रोजगार इ.) एकूण महसुली खर्चात

४५.९ टक्के व महसुली विकास खर्चात ६९.७ टक्के असा मोठा हिस्सा आहे. मागील वर्षाच्या तुलनेत २०१२-१३ मध्ये ११.२ टक्के असलेला विकासेतर महसुली खर्च २०१३-१४(सुअं) मध्ये वाढून १५.७ टक्के झाला आणि त्याचा महसुली खर्चातील वाटा जवळपास ३४ टक्के राहिला. महसुली खर्चाचा तपशील परिशिष्ट ५.३ मध्ये दिला आहे.

५.११ वेतन, मजुरी, निवृत्तीवेतन व व्याजप्रदाने हे महसुली खर्चाचे अनिवार्य तसेच प्रमुख घटक आहेत. कर्जवाढीमुळे व्याजप्रदानात सातत्याने वाढ होत असून २०१३-१४(सुअं) मध्ये ती १२ टक्क्याने वाढली आहेत. महसुली खर्चाची विभागणी (प्रत्यक्ष) तक्ता ५.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ५.५ महसुली खर्चाची विभागणी (प्रत्यक्ष)**

(₹ कोटी)

| वर्ष | वेतन व मजुरी | निवृत्ती वेतन | व्याज | इतर | एकूण महसुली खर्च |
|---|---|---|---|---|---|
| २००७-०८ | २२,८७९<br>(३५.३) | ४,६८२<br>(७.२) | १२,९३२<br>(२०.०) | २४,२८७<br>(३७.५) | ६४,७८०<br>(१००.०) |
| २००८-०९ | २४,४७८<br>(३२.३) | ६,३३१<br>(८.४) | १३,०२७<br>(१७.२) | ३१,८५८<br>(४२.१) | ७५,६९४<br>(१००.०) |
| २००९-१० | ३५,१९३<br>(३७.१) | ६,९४६<br>(७.३) | १४,८३८<br>(१५.६) | ३७,९३९<br>(४०.०) | ९४,९१६<br>(१००.०) |
| २०१०-११ | ४१,७४६<br>(३९.२) | ९,८८६<br>(९.३) | १५,६४८<br>(१४.७) | ३९,१७९<br>(३६.८) | १,०६,४५९<br>(१००.०) |
| २०११-१२ | ४५,४६७<br>(३६.८) | ११,६८२<br>(९.५) | १७,५०५<br>(१४.२) | ४८,९००<br>(३९.६) | १,२३,५५४<br>(१००.०) |
| २०१२-१३ | ५३,२९५<br>(३८.४) | १३,४३०<br>(९.७) | १९,०७६<br>(१३.७) | ५२,९३५<br>(३८.२) | १,३८,७३६<br>(१००.०) |
| २०१३-१४ # | ६०,६८७<br>(३७.६) | १५,६०८<br>(९.७) | २१,३७३<br>(१३.२) | ६३,७५९<br>(३९.५) | १,६१,४२७<br>(१००.०) |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन # सुधारित अंदाज

*टीप : कंसांतील आकडे महसुली खर्चाशी टक्केवारी दर्शवितात.*

## अर्थसहाय्य

५.१२ सामान्य जनतेला काही जीवनावश्यक वस्तू व सेवा किफायतशीर दरात उपलब्ध व्हाव्यात यासाठी व आर्थिक विकासास चालना देण्यासाठी शासन अर्थसहाय्य देते. वर्ष २०१२-१३ मध्ये ₹ ११,७३८ कोटी इतके अर्थसहाय्य प्राप्त झाले होते, तर २०१३-१४(सुअं) मध्ये ₹ १३,१४३ कोटी अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे. २०१३-१४(सुअं) मधील प्रमुख अर्थसहाय्ये पुढीलप्रमाणे आहेत :

- कृषि व यंत्रमागाचा वापर करणाऱ्यांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या. यांना भरपाईपोटी ₹ ५,२७६ कोटी.
- विशाल औद्योगिक प्रकल्पांसह औद्योगिक घटकांसाठी ₹ २,२५० कोटी.
- जेष्ठ नागरिक, विद्यार्थी, स्वातंत्र्य सैनिक, इत्यादीं सारख्या काही प्रवासी वर्गांना दिलेल्या प्रवास खर्चातील सवलतींमुळे होणाऱ्या तोट्याची भरपाई करण्याकरीता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास ₹ १,३५८ कोटी.
- अन्नधान्य वितरण आणि अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजना व तत्सम योजनांसाठी ₹ ३०० कोटी.

## कर वसुली

५.१३ आकारलेला परंतु वसूल न झालेला कर मागील वर्षाच्या तुलनेत १७.१ टक्क्यांनी वाढून २०११-१२ च्या अखेरपर्यंत ₹ ३२,५२१ कोटी इतका झाला. वर्ष २०११-१२ मध्ये एकूण आकारलेल्या करापैकी ७०.२ टक्के वादग्रस्त रकमा होत्या. एकूण ₹ ९,७०४ कोटी निर्विवाद रकमेपैकी ₹ ४,६०० कोटी कर पाच वर्ष व त्यापेक्षा जास्त काळ वसूल झालेला नाही.

५.१४ विक्री कर / मूल्यवर्धित कर (मोटार स्पिरिट व वंगण यावरील करांसह) व केंद्रीय विक्रीकर यांचा वसूल न झालेल्या करांमध्ये अनुक्रमे ७०.६ टक्के व २२.५ टक्के इतका वाटा आहे. आकारलेल्या परंतु वसूल न झालेला कर तक्ता ५.६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.६ आकारलेला परंतु वसूल न झालेला कर - २०११-१२**

(₹ कोटी)

| तपशील | वादग्रस्त | वादातीत | एकूण |
|---|---|---|---|
| मोटार स्पिरीट व वंगण यांवरील करांसह विक्रीकर / मूल्यवर्धित कर | १७,२०० | ५,७६७ | २२,९६७ |
| केंद्रीय विक्री कर | ४,६२८ | २,६९६ | ७,३२४ |
| व्यवसाय, व्यापार व रोजगारावरील कर | ४ | ५७७ | ५८१ |
| गौण खनिजे इ. | २४१ | ११० | ३५१ |
| विद्युत कर | ३७४ | ३२ | ४०६ |
| इतर | ३७० | ५२२ | ८९२ |
| एकूण | **२२,८१७** | **९,७०४** | **३२,५२१** |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## महसुली जमा २०१३-१४

५.१५ डिसेंबर, २०१३ अखेर, एकूण महसुली जमा २०१३-१४ सुधारित अंदाजाच्या ६५.४ टक्के इतकी होती, तर २०१२-१३ मध्ये याच कालावधीत ती ६७.४ टक्के इतकी होती. महसुली जमेचा तपशील तक्ता ५.७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.७ महसुली जमेचा तपशील**

(₹ कोटी)

| बाब | प्रत्यक्ष जमा # | | टक्के बदल | टक्केवारी $ |
|---|---|---|---|---|
| | २०१२ @ | २०१३ @ | | |
| **अ) कर महसूल (१ + २)** | **८३,६०९** | **९०,२३८** | **७.९** | **७१.१** |
| **१) स्वत:चा कर महसूल** (१ ते ९) | ७३,४९९ | ७८,६११ | ७.० | ७१.२ |
| १) मूल्यवर्धित कर | ४४,६५९ | ४६,०७३ | ३.२ | ७२.१ |
| २) मुंद्राक व नोंदणी शुल्क | १२,५३८ | १४,०५९ | १२.१ | ७४.६ |
| ३) राज्य उत्पादन शुल्क | ६,३१० | ६,९०४ | ९.४ | ६५.५ |
| ४) वीजेवरील कर व शुल्क | ३,०४४ | ३,३०६ | ८.६ | ५४.१ |
| ५) जमीन महसूल | ६६६ | ७५५ | १३.४ | ६१.५ |
| ६) वाहनांवरील कर | ३,६४४ | ३,७३३ | २.४ | ७६.२ |
| ७) उत्पन्न व खर्चावरील इतर कर | १,४२० | १,५४४ | ८.७ | ७९.४ |
| ८) माल व उतारुंवरील कर | ११८ | १,०८८ | ८२२.० | ८८.८ |
| ९)वस्तू व सेवा यांवरील इतर कर व शुल्क | १,१०० | १,१४९ | ४.५ | ६९.१ |
| **२) केंद्रीय करांतील हिस्सा** | १०,११० | ११,६२७ | १५.० | ७०.१ |
| **ब) करेतर महसूल (१ + २)** | **१२,७९६** | **१३,३८१** | **४.६** | **४२.५** |
| १) करेतर महसूल | ५,१३० | ६,०३६ | १७.७ | ४७.३ |
| २) केंद्रीय अनुदाने | ७,६६६ | ७,३४५ | (-)४.२ | ३९.३ |
| **एकूण ( अ+ब)** | **९६,४०५** | **१,०३,६१९** | **७.५** | **६५.४** |

*आधार:* # महालेखापाल यांचे कार्यालय, महाराष्ट्र @ डिसेंबरअखेर $ डिसेंबर,२०१३ अखेर प्रत्यक्ष जमेची २०१३-१४(सुअं) शी टक्केवारी

## महसुली खर्च २०१३-१४

५.१६ डिसेंबर, २०१३ अखेर राज्याचा एकूण महसुली खर्च ₹ ९५,३४७ कोटी म्हणजे सुधारित अंदाज २०१३-१४ च्या ५९.१ टक्के होता. त्यापैकी, योजनांतर्गत खर्च ₹ १०,७८२ कोटी (सुधारित अंदाज २०१३-१४ च्या ३६.२ टक्के) इतका होता. विकास खर्च आणि सामाजिक सेवांवर झालेला खर्च अनुक्रमे ₹ ६०,०८८ कोटी (सुधारित अंदाज २०१३-१४ च्या ५६.६ टक्के) व ₹ ४५,१५६ कोटी (सुधारित अंदाज २०१३-१४ च्या ६१ टक्के) इतका होता. वर्ष २०१३-१४ मध्ये एकूण महसुली खर्च ₹ १,६९,८०६ कोटी होणे अपेक्षित असून तो सुधारित अंदाजाच्या ५.२ टक्के जास्त असेल.

## खर्चाचे आर्थिक वर्गीकरण

५.१७ केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार अर्थ व सांख्यिकी संचालनालय शासनाच्या वार्षिक अर्थसंकल्पातील खर्चाचे आर्थिक प्रकारानुसार वर्गीकरण करते. याचा राज्य उत्पन्नाचे अंदाज वर्तविताना लागणा-या शासनाचा उपभोग्य बाबींवरील अंतिम खर्च, कर्जे, भांडवल निर्मिती याचे संकलन करताना उपयोग होतो.

५.१८ अर्थसंकल्प २०१३-१४ च्या आर्थिक वर्गीकरणानुसार २०१३-१४ मध्ये उपभोग्य बाबींवरील खर्च ₹ ५३,७५९ कोटी अपेक्षित असून तो मागील वर्षाच्या तुलनेत आठ टक्क्यांनी जास्त आहे. स्थूल भांडवल निर्मितीवरील २०१३-१४ मधील एकूण खर्च मागील वर्षाच्या तुलनेत २७.३ टक्क्याने वाढणे अपेक्षित आहे. तपशील परिशिष्ट ५.६ मध्ये दिला आहे.

## राज्य योजनेची प्रगती

५.१९ अकराव्या पंचवार्षिक योजनेचा मंजूर नियतव्यय ₹ १,६१,१२४ कोटी होता व ₹ १,३८,५२८ कोटी (८६ टक्के) इतका खर्च झाला. बाराव्या पंचवार्षिक योजनेसाठी ₹ २,७५,००० कोटी नियतव्यय प्रस्तावित असून तो अकराव्या पंचवार्षिक योजनेपेक्षा ७०.७

टक्क्यांनी जास्त आहे. वार्षिक योजना - नियतव्यय व खर्च तक्ता ५.८ मध्ये दिला आहे.

## वार्षिक योजना २०१३-१४

५.२० वार्षिक योजना २०१३-१४ साठी ₹ ४९,००० कोटी नियतव्यय निश्चित करण्यात आला असून त्यापैकी सर्वसाधारण जिल्हा योजनेसाठी ₹ ५,२०० कोटी नियतव्यय आहे. एकूण नियतव्ययापैकी अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ₹ ४,९९८ कोटी तर आदिवासी उपयोजनेसाठी ₹ ३,८१७ कोटी नियतव्यय आहे. वर्ष २०१३-१४ मध्ये सर्वाधिक ₹ २१,३१२ कोटी इतका नियतव्यय सामाजिक व सामूहिक सेवा या क्षेत्रासाठी मंजूर करण्यात आला असून त्या खालोखाल पाटबंधारे आणि पूरनियंत्रण क्षेत्रासाठी ₹ ९,५४८ कोटी मंजूर करण्यात आला. क्षेत्रनिहाय पंचवार्षिक व वार्षिक योजना तक्ता ५.९ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ५.८ वार्षिक योजना - नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | नियतव्यय | खर्च | खर्चाची नियतव्ययाशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००७-०८ | २०,२५० | १९,४२२ | ९५.९ |
| २००८-०९ | २५,००० | २१,०९० | ८४.४ |
| २००९-१० | ३५,९५८ | २७,७३१ | ७७.१ |
| २०१०-११ | ३७,९१६ | ३२,५७७ | ८५.९ |
| २०११-१२ | ४२,००० | ३७,७०८ | ८९.८ |
| २०१२-१३ | ४५,००० | ३५,८६७ | ७९.७ |
| २०१३-१४ | ४९,००० | ४८,०६१ $ | ९८.१ |

*आधार* : नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन $ अपेक्षित

**तक्ता ५.९ क्षेत्रनिहाय पंचवार्षिक व वार्षिक योजना**

(₹ कोटी)

| क्षेत्र | अकरावी पंचवार्षिक योजना खर्च | बारावी पंचवार्षिक योजना | | खर्च २०१२-१३ | २०१३-१४ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नियतव्यय | नियतव्यया-तील हिस्सा (टक्के) | | नियतव्यय | अपेक्षित खर्च |
| कृषि व संलग्न सेवा | ९,७१३ | २१,९१७ | ८.० | ३,५३१ | ४,०२५ | ५,५६१ |
| ग्रामविकास | ५,१५४ | ९,०८९ | ३.३ | १,४९९ | १,४६५ | १,८४० |
| विशेष क्षेत्र विकास | ७६७ | १,१४१ | ०.४ | १२४ | २१९ | ३३५ |
| पाटबंधारे आणि पूरनियंत्रण | ३४,६६४ | ४७,९९० | १७.५ | ६,४५६ | ९,५४८ | ९,४९५ |
| ऊर्जा | ९,७०९ | २०,६९५ | ७.५ | २,३७२ | ३,३७६ | ३,३१६ |
| उद्योग व खनिजे | ९४५ | २,१७५ | ०.८ | १९० | ४०३ | ४०४ |
| परिवहन | १६,६११ | ३३,८५५ | १२.३ | ४,२५६ | ५,२९२ | ५,५०६ |
| विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | ५५ | १६९ | ०.१ | ४७४ | ३४ | ३५ |
| सर्वसाधारण आर्थिक सेवा | २,४१८ | ३,३६४ | १.२ | ६४४ | ७५९ | ७१९ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | ५५,०७४ | १,२२,७७६ | ४४.६ | १५,११४ | २१,३१२ | १९,१२५ |
| सर्वसाधारण सेवा | २,७०७ | १०,९८९ | ४.० | १,१९८ | २,११२ | १,४६८ |
| इतर कार्यक्रम | ७११ | ८४० | ०.३ | १० | ४५६ | २५९ |
| **एकूण** | **१,३८,५२८** | **२,७५,०००** | **१००** | **३५,८६७** | **४९,०००** | **४८,०६१** |

*आधार* : नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन टिप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरीज जुळणार नाही

५.२१ अर्थसंकल्पित योजनांतर्गत व योजनेतर खर्च (केंद्रीय अनुदानांसह) (प्रत्यक्ष) तक्ता ५.१० मध्ये दिला आहे.

**तक्ता ५.१० अर्थसंकल्पित योजनांतर्गत व योजनेतर खर्च (केंद्रीय अनुदानांसह) (प्रत्यक्ष)**

(₹ कोटी)

| वर्ष | योजनांतर्गत खर्च | | | योजनेतर खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | महसुली | भांडवली | एकूण | | |
| २००७-०८ | १०,२८९ | ९,७०९ | १९,९९८ | ६२,१९६ | ८२,१९४ |
| २००८-०९ | १२,४२० | १३,२७२ | २५,६९२ | ७४,२८० | ९९,९७२ |
| २००९-१० | १६,७२४ | १५,१५५ | ३१,८७९ | ८५,९०२ | १,१७,७८१ |
| २०१०-११ | १७,१८५ | १६,०७१ | ३३,२५६ | ९७,७४९ | १,३१,००५ |
| २०११-१२ | २२,०३५ | १५,४७२ | ३७,५०७ | १,११,७२१ | १,४९,२२८ |
| २०१२-१३ | २४,५६८ | १५,७५५ | ४०,३२३ | १,२५,१४६ | १,६५,४६९ |
| २०१३-१४ # | २९,७८२ | २१,३०५ | ५१,०८७ | १,४६,१०१ | १,९७,१८८ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन # सुधारित अंदाज

## भांडवली जमा आणि भांडवली खर्च

५.२२ 'ऋण' (कर्जे व इतर दायित्वे) हा भांडवली जमेचा मोठा हिस्सा आहे. वर्ष २०१३-१४ च्या सुधारित अंदाजानुसार एकूण भांडवली जमा ₹ ३८,८६६ कोटी असून त्यापैकी अंतर्गत ऋण ₹ २७,७८८ कोटी आहे.

५.२३ 'महसुली लेख्याबाहेरील भांडवली खर्च' हा भांडवली खर्चातील मोठा हिस्सा असून दुसरा हिस्सा 'ऋण' (राज्य शासनाने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा आणि कर्जाची परतफेड) आहे. वर्ष २०१३-१४ च्या सुधारित अंदाजानुसार ₹ ३५,७६१ कोटी इतका भांडवली खर्च झाला असून तो एकूण खर्चाच्या १८.१ टक्के आहे. भांडवली जमा व भांडवली खर्च (प्रत्यक्ष) तक्ता ५.११ मध्ये दिले आहेत.

**आलेख ५.१ : केंद्रीय अनुदानांसह योजनांतर्गत खर्च**




## तुटीचा कल

५.२४ राज्य शासनाने २००५ मध्ये राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पिय व्यवस्थापन अधिनियम पारित केला आहे. त्यानुसार महसुली तूट २००८-०९ पर्यंत पूर्णपणे दूर करणे व वित्तीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या तीन टक्क्यांपर्यंत कमी करणे गरजेचे होते. तेराव्या वित्त आयोगाने २००९-१० ते २०१४-१५ या कालावधीकरिता राज्यांना घालून दिलेल्या वित्तीय एकत्रित सुधारणेची वाटचाल तक्ता ५.१२ मध्ये देण्यात आली आहे. त्यानुसार २०१४-१५ पर्यंत सर्व राज्यांची वित्तीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या २.४ टक्के व ऋणभार २४.३ टक्के इतका मर्यादित राहणे आवश्यक आहे. तेराव्या वित्त आयोगाने घालून दिलेल्या वित्तीय आरेखनानुसार राज्य वाटचाल करीत आहे.

**तक्ता ५.११ भांडवली जमा व भांडवली खर्च (प्रत्यक्ष)**

(₹ कोटी)

| वर्ष | भांडवली जमा | | भांडवली खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| | एकूण | त्यापैकी अंतर्गत ऋण | एकूण | त्यापैकी महसुली खर्चाबाहेरील भांडवली खर्च | त्यापैकी देशांतर्गत ऋणाची परतफेड |
| २००७-०८ | १,७१८ | १३,४३२ | १७,४१४ | ११,४१० | ४,६११ |
| २००८-०९ | १९,०६५ | २१,२२७ | २४,२७८ | १८,८७३ | ४,१२५ |
| २००९-१० | ३०,३८३ | २०,८१२ | २२,८६५ | १७,४२९ | ४,१७५ |
| २०१०-११ | २३,७३९ | १९,९२० | २४,५४६ | १७,९६३ | ५,६२४ |
| २०११-१२ | २८,३३६ | २४,१४६ | २५,६७४ | १७,८८० | ६,९५८ |
| २०१२-१३ | २१,८४२ | २१,३६६ | २६,७३३ | १७,३९८ | ७,९१९ |
| २०१३-१४ # | ३८,८६६ | २७,७८८ | ३५,७६१ | २२,६०४ | ११,३३८ |

*आधार* : वित्त विभाग, महाराष्ट्र शासन # सुधारित अंदाज

**आलेख ५.२ : वित्तीय एकत्रित सुधारणेकडे वाटचालीच्या सापेक्ष राज्याची प्रगती**




**तक्ता ५.१२ राज्यांची वित्तीय एकत्रित सुधारणेकडे वाटचाल**

(स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी)

| वर्ष | राजकोषिय तूट | ऋणस्थिती |
|---|---|---|
| २००९-१० | २.८ | २७.१ |
| २०१०-११ | २.६ | २६.६ |
| २०११-१२ | २.५ | २६.१ |
| २०१२-१३ | २.५ | २५.५ |
| २०१३-१४ | २.४ | २४.८ |
| २०१४-१५ | २.४ | २४.३ |

*आधार* - १३ वा वित्त आयोग, भारत सरकार

**आलेख ५.३ : तुटीचा कल**




**आलेख ५.४ : ऋणभार**




## ऋणस्थिती

५.२५ परतावा न केलेले कर्ज व इतर दायित्त्वे राज्य शासनावरील ऋणभार दर्शवितात. शासनाच्या वर्ष २००६-०७ मध्ये असलेल्या ₹ १,३३,७२२ कोटी इतक्या ऋणभारात प्रति वर्षी सरासरी १०.७ टक्के दराने वाढ होऊन २०१३-१४ च्या सुधारित अंदाजानुसार तो ₹ २,७१,८४५ कोटी झाला आहे. याच कालावधीमध्ये एकूण ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी असलेले २२.९ टक्के हे प्रमाण कमी होऊन १८.४ टक्के झाले आहे. ऋणभार व व्याज प्रदाने (प्रत्यक्ष) तक्ता ५.१३ मध्ये दिली आहेत.

५.२६ राज्याच्या देशांतर्गत ऋणाचे दोन मुख्य घटक म्हणजे खुल्या बाजारातील कर्जे व राष्ट्रीय अल्पबचत निधीचे रोखे हे असून त्यांचा राज्याच्या ऋणभारामधील वाटा सुमारे ७४.६ टक्के आहे. वर्ष २०१३-१४ च्या सुधारित अंदाजानुसार राज्याचे देशांतर्गत कर्ज ₹ २,०८,८१९.३९ कोटी (एकूण ऋणाच्या ७६.८ टक्के) असून, त्यापैकी खुल्या बाजारातील कर्जे ₹ १,२५,३२१.९२ कोटी आहेत. वर्ष २०१३-१४ मध्ये खुल्या बाजारातून ₹ २३,६७०.६४ कोटी इतके कर्ज घेणे अपेक्षित आहे. वर्ष २०१३-१४ च्या सुधारित अंदाजानुसार एकूण देशांतर्गत ऋण ₹ २७,७८७.९७ कोटी असून त्यापैकी ₹ १०,६०५.३१ कोटी इतकी रक्कम कर्जांच्या परतफेडीकरीता वापरण्यात येईल.

**तक्ता ५.१३ ऋणभार व व्याज प्रदाने (प्रत्यक्ष)**

(₹ कोटी)

| वर्ष | ऋणभार | व्याजाची परतफेड | कर्जाचे सरासरी मुल्य $ |
|---|---|---|---|
| २००७-०८ | १,४२,३८२ | १२,९३२ | ९.७ |
| २००८-०९ | १,६०,६७२ | १३,०२७ | ९.१ |
| २००९-१० | १,८१,४४७ | १४,८३८ | ९.२ |
| २०१०-११ | २,०३,०९७ | १५,६४८ | ८.६ |
| २०११-१२ | २,२५,९७६ | १७,५०५ | ८.६ |
| २०१२-१३ | २,४६,६९२ | १९,०७६ | ८.४ |
| २०१३-१४ # | २,७१,८४५ | २१,३७३ | ८.७ |

*आधार*: वित्त विभाग, महाराष्ट्र शासन # सुधारित अंदाज
$ दर साल दर शेकडा

टिप : कर्जाचे सरासरी मूल्य हे त्या वर्षातील व्याज प्रदानाचे त्याअगोदरच्या वर्षातील एकूण ऋणभाराशी असणारे शेकडा प्रमाण होय.

## शासकीय हमी

५.२७ राज्य शासनाने दिलेल्या विविध हमींची अदत्त रक्कम २०११-१२ च्या अखेरपर्यंत ₹ ११,३१४ कोटी इतकी होती. राज्याने मोठी हमी दिलेल्या विभागांमध्ये सहकार, पणन व वस्त्रोद्योग ( ₹ ३,४५२ कोटी ), सार्वजनिक बांधकाम ( ₹ २,०६६ कोटी ) यांचा समावेश होता. वर्ष २०११-१२ मध्ये शासनाने दिलेल्या हमी तक्ता ५.१४ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ५.१४ वर्ष २०११-१२ मध्ये शासनाने दिलेल्या हमी**

(₹ कोटी)

| विभागाचे नाव | वर्षाच्या प्रारंभीची अदत्त रक्कम | जादा दिलेल्या हमी | | वर्षात वगळलेल्या रकमा (मागणी केलेल्या रकमां व्यतिरिक्त) | वर्षात आवाहनीत व दिलेल्या रकमा | वर्षाअखेरीस अदत्त असलेल्या रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्षभरात | ठोक हमी देण्यात आल्यामुळे वर्षामध्ये प्राप्त झालेल्या कर्जाच्या रकमा तसेच सुधारित व्याज दरामुळे बदललेल्या रकमा | | | |
| कृषि व पदुम | २७६.७१ | ३३५.०० | ० | ४११.३४ | ०.३५ | २००.०२ |
| उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) | ११७.२४ | ० | ० | १०१.३७ | ० | १५.८७ |
| सामाजिक न्याय व विशेष सहाय्य # | २५२.४७ | ० | ७७.८८ | ६३.२० | ० | २६७.१५ |
| नगरविकास | २०६.८६ | ० | ० | ५.७३ | ० | २०१.१३ |
| उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) | २,२६१.२३ | ० | २९१.७१ | ९०२.९३ | ० | १,६५०.०१ |
| जलसंपदा | २,१८३.८९ | ० | ० | १,३५२.७० | ० | ८३१.१९ |
| सार्वजनिक बांधकाम | २,२८६.७६ | ० | ० | २२१.०९ | ० | २,०६५.६७ |
| महसूल व वन | २.१३ | ० | ० | ० | ० | २.१३ |
| आदिवासी विकास | ३०.३९ | ० | १.०४ | ०.८१ | ० | ३०.६२ |
| सहकार, पणन व वस्त्रोद्योग * | ४,२५६.९७ | ७३६.५५ | ० | १,४९१.११ | ५०.०० | ३,४५२.४१ |
| ग्रामविकास व जलसंधारण | ६९.८५ | ० | ० | ५१.८१ | ० | १८.०४ |
| पाणी पुरवठा व स्वच्छता | १,९४९.८७ | ० | ३.२२ | ४५०.९५ | ० | १,५०२.१४ |
| अल्पसंख्यांक विकास | २७.६८ | ३०.०० | ४.१९ | ३५.१९ | ० | २६.६८ |
| नियोजन | १,११८.८२ | ० | ० | ६७.६७ | ० | १,०५१.१५ |
| **एकूण** | **१५,०४०.८७** | **१,१०१.५५** | **३७८.०४** | **५,१५५.९०** | **५०.३५** | **११,३१४.२१** |

*आधार:* वित्त विभाग # प्रशासनिक विभागाबरोबर ताळमेळ घेण्यात येत आहे. * अस्थायी

टिप : आवाहनीत परंतु न दिलेल्या हमी निरंक आहेत.

* * * * *

# परिशिष्ट ५.१
## महाराष्ट्र शासन : दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प

(₹ कोटी)

| | बाब | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४# |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१.** | **महसुली जमा (अ + ब)** | ७९,५८३ | ८१,२७१ | ८६,९१० | १,०५,८६८ | १,२१,२८६ | १,४२,९४७ | १,५८,४१० |
| | अ) कर महसूल | ५५,१२६ | ६०,०४९ | ६७,३५४ | ८६,४४७ | १,००,९५२ | १,१८,६४० | १,२६,९६१ |
| | ब) कराव्यतिरिक्त महसूल | २४,४५७ | २१,२२२ | १९,५५६ | १९,४२१ | २०,३३४ | २४,३०७ | ३१,४४९ |
| **२.** | **महसूली खर्च त्यापैकी** | ६४,७८० | ७५,६९४ | ९४,९१६ | १,०६,४५९ | १,२३,५५४ | १,३८,७३६ | १,६१,४२७ |
| | अ) व्याज प्रदान | १२,९३२ | १३,०२७ | १४,८३८ | १५,६४८ | १७,५०५ | १९,०७६ | २१,३७३ |
| | ब) प्रशासकीय सेवा | ५,५०४ | ६,५६० | ८,१७३ | ९,७९८ | १०,८४८ | १२,४७२ | १४,८९३ |
| | क) निवृत्ती वेतन आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा | ४,२१५ | ५,१९९ | ६,२२९ | ८,९५७ | १०,५८१ | ११,६४९ | १२,८५८ |
| **३.** | **महसुली तूट (२ - १)** | (-)१४,८०३ | (-)५,५७७ | ८,००६ | ५९१ | २,२६८ | (-)४,२११ | ३,०१७ |
| **४.** | **भांडवली जमा त्यापैकी** | १,७१८ | १९,०६५ | ३०,३८३ | २३,७३९ | २८,३३६ | २१,८४२ | ३८,८६६ |
| | अ) कर्जाची वसूली | ७३३ | ५६० | ५१५ | ६४० | ५५९ | ८६३ | ८७७ |
| | ब) इतर भांडवली जमा | ० | १८ | २५ | १७ | ४५६ | ० | ० |
| | क) कर्जे व इतर दायित्वे | (-)३,७१७ | १४,३६३ | २६,०१८ | १८,३०८ | २०,८६३ | १३,९३५ | २६,६५१ |
| **५.** | **भांडवली खर्च** | १७,४१४ | २४,२७८ | २२,८६५ | २४,५४६ | २५, ६७४ | २६,७३३ | ३५,७६१ |
| **६.** | **एकूण जमा (१ + ४)** | ८१,३०१ | १,००,३३६ | १,१७,२९३ | १,२९,६०७ | १,४९,६२३ | १,६४,७८९ | १,९७,२७६ |
| **७.** | **एकूण खर्च (२ + ५)** | ८२,१९४ | ९९,९७२ | १,१७,७८१ | १,३१,००५ | १,४९,२२८ | १,६५,४६९ | १,९७,१८८ |
| **८.** | **आकस्मिकता निधीकडे विनियोजन** | ० | ० | ३५० | ८५० | ५०० | ८७५ | ० |
| **९.** | **अर्थसंकल्पीय तूट (७ - ६- ८)** | ८९३ | (-)३६४ | १३८ | ५४९ | (-)८९४ | (-)१९५ | (-)८८ |
| **१०.** | **वित्तिय तूट (९ + ४ क)** | (-)२,८२४ | १३,९९९ | २६,१५६ | १८,८५७ | १९,९६९ | १३,७४० | २६,५६३ |
| | **स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी** | | | | | | | |
| **१.** | **महसुली जमा (अ + ब)** | ११.६ | १०.८ | १०.२ | १०.१ | १०.३ | १०.८ | १०.७ |
| | अ) कर महसूल | ८.० | ८.० | ७.९ | ८.२ | ८.६ | ९.० | ८.६ |
| | ब) कराव्यतिरिक्त महसूल | ३.६ | २.८ | २.३ | १.९ | १.७ | १.८ | २.१ |
| **२.** | **महसूली खर्च त्यापैकी** | ९.५ | १०.० | ११.१ | १०.१ | १०.५ | १०.५ | १०.९ |
| | अ) व्याज प्रदान | १.९ | १.७ | १.७ | १.५ | १.५ | १.४ | १.४ |
| | ब) प्रशासकीय सेवा | ०.८ | ०.९ | १.० | ०.९ | ०.९ | ०.९ | १.० |
| | क) निवृत्ती वेतन आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा | ०.६ | ०.७ | ०.७ | ०.९ | ०.९ | ०.९ | ०.९ |
| **३.** | **महसुली तूट (२ - १)** | (-)२.२ | (-)०.७ | ०.९ | ०.१ | ०.२ | (-)०.३ | ०.२ |
| **४.** | **भांडवली जमा त्यापैकी** | ०.३ | २.५ | ३.६ | २.३ | २.४ | १.६ | २.६ |
| | अ) कर्जाची वसूली | ०.१ | ०.१ | ०.१ | ०.१ | ०.० | ०.१ | ०.१ |
| | ब) इतर भांडवली जमा | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| | क) कर्जे व इतर दायित्वे | (-)०.५ | १.९ | ३.० | १.७ | १.८ | १.१ | १.८ |
| **५.** | **भांडवली खर्च** | २.५ | ३.२ | २.७ | २.३ | २.२ | २.० | २.४ |
| **६.** | **एकूण जमा (१ + ४)** | ११.९ | १३.३ | १३.७ | १२.४ | १२.७ | १२.४ | १३.४ |
| **७.** | **एकूण खर्च (२ + ५)** | १२.० | १३.३ | १३.८ | १२.५ | १२.७ | १२.५ | १३.४ |
| **८.** | **आकस्मिकता निधीकडे विनियोजन** | ०.० | ०.० | ०.० | ०.१ | ०.० | ०.१ | ०.० |
| **९.** | **अर्थसंकल्पीय तूट (७ - ६- ८)** | ०.१ | ०.० | ०.० | ०.१ | (-)०.१ | ०.० | ०.० |
| **१०.** | **वित्तिय तूट (९ + ४ क)** | (-)०.४ | १.९ | ३.१ | १.८ | १.७ | १.० | १.८ |

आधार - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

\# सुधारित अंदाज

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट ५.२
## महाराष्ट्र शासन अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील जमेतील कल

(₹ कोटी)

| | बाब | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४# |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **(अ)** | **एकूण महसुली जमा (१ + २ + ३ + ४)** | **७९,५८३** | **८१,२७१** | **८६,९१०** | **१,०५,८६८** | **१,२१,२८६** | **१,४२,९४७** | **१,५८,४१०** |
| **(१)** | ***राज्याचा स्वत:चा कर महसूल (१ ते ९) -*** | **४७,५२८** | **५२,०३१** | **५९,१०६** | **७५,०२८** | **८७,६४८** | **१,०३,४४८** | **१,१०,३७४** |
| | (१) विक्रीकर | २६,७५३ | ३०,६८० | ३२,६७६ | ४२,४८३ | ५०,५९६ | ६०,०८० | ६३,९२२ |
| | (२) मुद्रांक व नोंदणी शुल्क | ८,५५० | ८,२८८ | १०,७७४ | १३,५१६ | १४,४०८ | १७,५४८ | १८,८५० |
| | (३) राज्य उत्पादन शुल्क | ३,९६३ | ४,४३४ | ५,०५७ | ५,९६२ | ८,६०६ | ९,२९७ | १०,५३५ |
| | (४) विजेवरील कर व शुल्क | २,६८८ | २,३९५ | ३,२८९ | ४,७३० | ४,८३१ | ५,८९६ | ६,१०८ |
| | (५) उत्पन्न व खर्च यावरील इतर कर | १,४८८ | १,५६१ | १,६१२ | १,६८६ | १,८३० | १,९६१ | १,९४४ |
| | (६) वाहनांवरील कर | २,१४३ | २,२२० | २,६८२ | ३,५३३ | ४,१३७ | ५,०२७ | ४,९०० |
| | (७) विक्रेय वस्तू व सेवा यावरील इतर कर व शुल्क | १,०४३ | १,०१५ | १,३२५ | १,४२३ | १,७०२ | १,८७४ | १,६६२ |
| | (८) माल व उतारुवरील कर | ३८८ | ८९२ | ९७७ | ६०० | ५७४ | ६९१ | १,२२५ |
| | (९) जमीन महसूल | ५१२ | ५४६ | ७१४ | १,०९५ | ९६४ | १,०७४ | १,२२८ |
| **(२)** | ***कराव्यतिरिक्त महसूल (१ + २) -*** | **१६,९४८** | **९,७९०** | **८,३५३** | **८,२२५** | **८,१६८** | **९,९८५** | **१२,७५८** |
| | (१) व्याजाच्या जमा रकमा | १,१७० | १,०१७ | १,३४२ | १,४२२ | १,३५९ | २,४६५ | ३,१४३ |
| | (२) इतर करांव्यतिरिक्त महसूल | १५,७७८ | ८,७७३ | ७,०११ | ६,८०३ | ६,८०९ | ७,५२० | ९,६१५ |
| **(३)** | ***केंद्रिय करांतील हिस्सा (१ ते ६) -*** | **७,५९८** | **८,०१८** | **८,२४८** | **११,४१९** | **१३,३०४** | **१५,१९२** | **१६,५८७** |
| | (१) निगम करांव्यतिरिक्त इतर उत्पन्नावरील कर | १,६१८ | १,६५१ | १,८९१ | २,३५९ | २,६६० | ३,२६७ | ३,७८० |
| | (२) निगम कर | २,४११ | २,६२९ | ३,३९४ | ४,४६३ | ५,२३६ | ५,४५७ | ५,५६४ |
| | (३) संपत्ती कर | ३ | २ | ८ | ९ | २० | ९ | १६ |
| | (४) जकात | १,४३६ | १,५३३ | १,१५४ | १,९९७ | २,३०७ | २,५२५ | २,७०३ |
| | (५) केंद्रिय उत्पादन शुल्क | १,३७१ | १,३३७ | ९३० | १,४५२ | १,४९३ | १,७१६ | १,८१८ |
| | (६) सेवा कर | ७५९ | ८६६ | ८७१ | १,१३९ | १,५८८ | २,२१८ | २,७०६ |
| **(४)** | ***केंद्र शासनाकडून सहायक अनुदाने*** | **७,५०९** | **११,४३२** | **११,२०३** | **११,१९६** | **१२,१६६** | **१४,३२२** | **१८,६९१** |
| **(ब)** | **एकूण भांडवली जमा (१ + २ + ३ + ४)** | **१,७१८** | **१९,०६५** | **३०,३८३** | **२३,७३९** | **२८,३३६** | **२१,८४२** | **३८,८६६** |
| **(१)** | ***सरकारी ऋण लेख्यांकडून जमा (अ + ब) -*** | **१३,७६१** | **२१,६१२** | **२१,५६४** | **२०,७४०** | **२४,४५३** | **२२,११७** | **३०,५१०** |
| | (अ) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण | १३,४३२ | २१,२२७ | २०,८१२ | १९,९२० | २४,१४६ | २१,३६६ | २७,७८८ |
| | (ब) केंद्र सरकारकडून कर्जे व आगाऊ रकमा | ३२९ | ३८५ | ७५२ | ८२० | ३०६ | ७५१ | २,७२२ |
| **(२)** | ***राज्य शासनाकडून कर्जे व आगाऊ रकमा (वसुली)*** | **७३३** | **५६०** | **५१५** | **६४०** | **५५९** | **८६३** | **८७७** |
| **(३)** | ***इतर भांडवली जमा (निव्वळ) ‡*** | **०** | **७५** | **२४** | **९** | **४६७** | **(-)१०** | **०** |
| **(४)** | ***लोक लेखा (निव्वळ) (अ + ब + क + ड)*** | **(-)१२,७७६** | **(-)३,१८२** | **८,२८०** | **२,३५०** | **२,८५८** | **(-)१,१२८** | **७,४७९** |
| | (अ) अल्पबचत, भविष्य निर्वाह निधी इ. (निव्वळ) | ६८५ | ८०४ | १,७९० | २,०२२ | २,२६० | २,१८८ | २,४७३ |
| | (ब) राखीव निधी (निव्वळ) (१ + २) | (-)११,७१७ | १९० | (-)३५१ | (-)१२६ | (-)४०० | ३८ | (-)६१५ |
| | (१) व्याजी | २४ | ४४ | ५१ | १०६ | ११४ | (-)१४१ | (-)३५९ |
| | (२) बिनव्याजी | (-)११,७४१ | १४६ | (-)४०२ | (-)२३२ | (-)५१३ | १७९ | (-)२५६ |
| | (क) नागरी ठेवी (निव्वळ) (१ + २) | १,८७६ | १,२४० | ३,५०२ | ६,२५९ | ४,५३२ | ६,४४२ | ६,२७५ |
| | (१) व्याजी | ४६८ | ७६८ | १,८९९ | ३,९४६ | ३,७३७ | ४,२६४ | ४,०६३ |
| | (२) बिनव्याजी | १,४०८ | ४७२ | १,६०३ | २,३१३ | ७९४ | २,१७८ | २,२१२ |
| | (ड) इतर | (-)३६२० | (-)५,४१६ | ३,३३९ | (-)५,८०५ | (-)३,५३४ | (-)९,७९५ | (-)६५४ |
| | **एकूण जमा (अ + ब)** | **८१,३०१** | **१,००,३३६** | **१,१७,२९३** | **१,२९,६०७** | **१,४९,६२३** | **१,६४,७८९** | **१,९७,२७६** |

आधार - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

‡ यात आंतरराज्यीय तडजोड (निव्वळ), आकस्मिकता निधीमध्ये केलेले विनियोजन (निव्वळ ) आणि आकस्मिकता निधी (निव्वळ) यांचा समावेश आहे.

\# सुधारित अंदाज

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट ५.३
## महाराष्ट्र शासन अर्थसंकल्प : महसुली व भांडवली लेख्यांवरील खर्चातील कल

(₹ कोटी)

| | बाब | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४# |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **(अ)** | **महसूली खर्च (१ + २)** | **६४,७८०** | **७५,६९४** | **९४,९१६** | **१,०६,४५९** | **१,२३,५५४** | **१,३८,७३६** | **१,६१,४२७** |
| **(१)** | **विकास खर्च (अ + ब + क)** | **४०,९३४** | **४९,१०९** | **६२,८४५** | **६८,७५५** | **८०,७०१** | **९१,०७०** | **१,०६,२५६** |
| | **(अ) सामाजिक सेवा (१ ते ८)** | **२६,७७३** | **३१,०५२** | **४१,००५** | **४८,२८२** | **५४,८१२** | **६२,०३९** | **७४,०४८** |
| | (१) शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती | १३,६४२ | १६,४४७ | २२,२०८ | २६,९४४ | २९,८७९ | ३३,८५७ | ३९,०६१ |
| | (२) आरोग्य व कुटुंब कल्याण | २,६९५ | ३,१०५ | ३,६९६ | ४,४७४ | ५,००२ | ५,९३६ | ७,०८१ |
| | (३) पाणीपुरवठा, स्वच्छता, गृहनिर्माण व नगरविकास | ५,०४४ | ४,४६० | ६,९३९ | ६,५०९ | ७,४३८ | ७,११४ | ८,३५६ |
| | (४) माहिती व ध्वनी प्रसारण | २७ | ३१ | ४० | ४७ | ४७ | ५७ | ७२ |
| | (५) अ.जा., अ.ज. व इ.मा.व. यांचे कल्याण | २,३९२ | ३,२०० | ४,१४५ | ४,५१८ | ५,११७ | ६,४१७ | ८,३२२ |
| | (६) कामगार व कामगार कल्याण | ४०२ | ५२८ | ५९९ | ६४६ | ७२१ | ७३० | ८३९ |
| | (७) समाज कल्याण व पोषण आहार | २,५२७ | ३,२३७ | ३,३२५ | ५,०७६ | ६,५४१ | ७,८५४ | १०,२०२ |
| | (८) इतर | ४४ | ४४ | ५३ | ६८ | ६८ | ७४ | ११५ |
| | **(ब) आर्थिक सेवा (१ ते ९)** | **१३,२३७** | **१६,८१३** | **२०,३७२** | **१९,२८५** | **२४,८६९** | **२७,५५१** | **२९,९०३** |
| | (१) कृषि व संलग्न सेवा | ३,४६८ | ६,४०३ | ६,४६० | ५,६३६ | ६,१४५ | ७,२१८ | ८,३०६ |
| | (२) ग्राम विकास | १,०६० | १,९८० | २,४९३ | २,२४३ | २,५२४ | ४,३९९ | ३,५२२ |
| | (३) विशेष क्षेत्र कार्यक्रम | ३३ | ३१ | २८ | ५९ | ४४ | ४८ | ३६ |
| | (४) पाटबंधारे व पूर नियंत्रण | १,६४८ | १,९३९ | २,३४० | २,५२२ | २,७०१ | २,५७४ | २,९४१ |
| | (५) ऊर्जा | ३,४११ | २,८०८ | ४,१३८ | ३,६१९ | ५,५२७ | ५,४७१ | ५,७६५ |
| | (६) उद्योग व खनिजे | १,०४३ | ६८२ | ९९८ | ८७० | २,५४६ | २,६०० | २,६५२ |
| | (७) वाहतूक आणि दळणवळण | २,२५४ | २,६९१ | ३,२२७ | ३,४१८ | ४,१९९ | ४,२१६ | ५,१६२ |
| | (८) विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | २६ | ४२ | ७२ | ६१ | ६७ | ७२ | ७९ |
| | (९) सर्वसाधारण आर्थिक सेवा | २९४ | २३७ | ६१६ | ८५६ | १,११६ | ९५३ | १,४४० |
| | **(क) स्थानिक संस्था आणि पंचायत राज्य संस्था यांना सहायक अनुदाने व अंशदाने** | **९२४** | **१,२४४** | **१,४६८** | **१,१८८** | **१,०२०** | **१,४८१** | **२,३०५** |
| **(२)** | **विकासेतर खर्च (अ + ब)** | **२३,८४६** | **२६,५८५** | **३२,०७१** | **३७,७०४** | **४२,८५३** | **४७,६६६** | **५५,१७१** |
| | **(अ) सर्वसाधारण सेवा (१ ते ५)** | **११,०८१** | **१३,६८६** | **१७,१२९** | **२१,१५५** | **२४,३४०** | **२७,३४६** | **३२,२०६** |
| | (१) राज्यांची अंगे | ५४१ | ६४१ | १,१४९ | १,०८८ | १,२४९ | १,२६६ | १,७४२ |
| | (२) करवसुली खर्च | ७४३ | १,१९४ | १,४८६ | १,२२१ | १,५७० | १,८५३ | २,५१० |
| | (३) प्रशासकीय सेवा | ५,५०३ | ६,५६० | ८,१७३ | ९,७९८ | १०,८४८ | १२,४७२ | १४,८९३ |
| | (४) निवृत्ती वेतन आणि संकीर्ण सर्वसाधारण सेव | ४,२१५ | ५,१९९ | ६,२२९ | ८,९५६ | १०,५८१ | ११,६४९ | १२,८५८ |
| | (५) राखीव निधीकडे हस्तांतरण | ७९ | ९२ | ९२ | ९२ | ९२ | १०६ | २०४ |
| | **(ब) ऋण सेवा** | १२,७६५ | १२,८९९ | १४,९४२ | १६,५४९ | १८,५१३ | २०,३२० | २२,९६५ |
| **(ब)** | **भांडवली खर्च (१ + २)** | **१७,४१४** | **२४,२७८** | **२२,८६५** | **२४,५४६** | **२५,६७४** | **२६,७३३** | **३५,७६१** |
| **(१)** | **विकास खर्च (अ + ब)** | **१२,७१५** | **२०,१५४** | **१८,६९०** | **१८,९२२** | **१८,७१६** | **१८,८१४** | **२४,४२३** |
| | (अ) महसुली लेख्याबाहेरील भांडवली खर्च | ११,४९० | १८,८७३ | १७,४२९ | १७,९६३ | १७,८८० | १७,३९८ | २२,६०४ |
| | (ब) राज्य शासनाने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा | १,२२५ | १,२८१ | १,२६१ | ९५९ | ८३६ | १,४१६ | १,८१८ |
| **(२)** | **विकासेतर खर्च (अ + ब + क) (सरकारी ऋणाची परतफेड)** | **४,६९९** | **४,१२४** | **४,१७५** | **५,६२४** | **६,९५८** | **७,९१९** | **११,३३८** |
| | (अ) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण | ४,२८६ | ३,७०४ | ३,३९८ | ४,२९१ | ५,८३८ | ६,३५१ | १०,६०५ |
| | (ब) केंद्र शासनाकडून घेतलेली कर्जे व आगाऊ रकमा | ४१३ | ४२० | ४२७ | ४८३ | ६२० | ६९३ | ७३३ |
| | (क) आकस्मिकता निधीकडे विनियोजन | ० | ० | ३५० | ८५० | ५०० | ८७५ | ० |
| | **एकूण खर्च (अ + ब)** | **८२,१९४** | **९९,९७२** | **१,१७,७८१** | **१,३१,००५** | **१,४९,२२८** | **१,६५,४६९** | **१,९७,१८८** |

आधार - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

\# सुधारित अंदाज

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

# परिशिष्ट ५.४
## महाराष्ट्र राज्यातील कृषि क्षेत्रावरील करांपासून महसुली जमा

(₹ लाख)

| अ. क्र. | तपशील | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४# |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | कृषि उत्पन्नावरील कर | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | जमीन महसूल / कर -सर्वसाधारण वसुली | २०,५२८ | २२,७५५ | ३१,८७७ | ३३,५५२ | ३८,८३४ | ३७,५५७ | ४०,७८६ |
| ३ | महाराष्ट्र कर (सुधारणा) अधिनियम, १९७५ अन्वये फेरबदल केलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणी यामध्ये वाढ करण्याबाबत अधिनियम, १९७४ च्या कलम ३ नुसार जमीन महसुलातील वाढ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | रोजगार हमी योजनेकरिता जमीन महसुलातील वाढ | ७५८ | ९७५ | १,६८० | ८६८ | १,३६७ | १,४७२ | १,८७९ |
| ५ | जमिनीवरील पट्टी व उपकर | ७,४५० | ७,७३२ | ८,५४३ | ९,८८४ | ९,४०० | ९,७९७ | १४,४३० |
| ६ | ऊस खरेदीवरील कर | ३४६ | ११,५०३ | १२,२९७ | ८,१८९ | १५,९५५ | १३,३८४ | २०,६०० |
| ७ | ऊस (विनियमन, पुरवठा आणि खरेदी, नियंत्रण) अधिनियमाखालील जमा रकमा | १ | ८१ | २३६ | ० | १ | ० | ० |
| ८ | शिक्षण उपकर अधिनियम - | | | | | | | |
| | (अ) वाणिज्यिक पिकांखालील शेत जमिनीवरील विशेष आकारणी | ४६७ | ७२१ | १,१३० | १,५४८ | १,१७३ | १,५४९ | १,४७० |
| | (ब) जलसिंचित कृषि जमिनीवरील रोजगार हमी उपकर | १८५ | १६९ | २४७ | ४२९ | ३८३ | ४७२ | २०१ |
| | (क) महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणी अधिनियम, १९७४ खालील विशेष आकारणीत वाढ | ११ | १३९ | ३८ | १३ | २१ | ४२ | २३ |
| | **एकूण** | **२९,७५२** | **४४,०७५** | **५६,०४८** | **५४,४८३** | **६७,१३४** | **६४,२७३** | **७९,३८९** |

आधार - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

\# सुधारित अंदाज

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

# परिशिष्ट ५.५
## वर्षभरातील कर्जे व इतर दायित्वे

(₹ कोटी)

| | बाब | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४# |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **(एक)** | **ऋण प्राप्ती (१ + २ + ३) (व्याजी)** | **१०,२३९** | **१९,१०४** | **२१,४७९** | **२२,०४०** | **२४,१०६** | **२१,३८३** | **२५,३४९** |
| | १) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण (निव्वळ) | ९,१४६ | १७,५२३ | १७,४१४ | १५,६२९ | १८,३०८ | १५,०१५ | १७,१८३ |
| | २) केंद्र शासनाकडून कर्जे व आगाऊ रकमा (निव्वळ) | (-)८३ | (-)३५ | ३२५ | ३३७ | (-)३१४ | ५८ | १,९९० |
| | ३) व्याजी गटबंधने (अ + ब + क) | १,१७६ | १,६१६ | ३,७४० | ६,०७४ | ६,११२ | ६,३११ | ६,१७६ |
| | अ) भविष्य निर्वाह निधी (निव्वळ) | ६८४ | ८०४ | १,७९० | २,०२२ | २,२६० | २,१८८ | २,४७३ |
| | ब) राखीव निधी (निव्वळ) | २४ | ४४ | ५१ | १०६ | ११४ | (-)१४१ | (-)३५९ |
| | क) नागरी ठेवी (निव्वळ) | ४६८ | ७६८ | १,८९९ | ३,९४६ | ३,७३७ | ४,२६४ | ४,०६३ |
| **(दोन)** | **ऋण प्राप्ती (१ + २) (बिनव्याजी)** | **(-)१३,९५६** | **(-)४,७४१** | **४,५३९** | **(-)३,७३२** | **(-)३,२४२** | **(-)७,४४८** | **१,३०२** |
| | १) लोकलेख्यातील निव्वळ जमा @ | (-)१३,९५२ | (-)४,७९८ | ४,५४० | (-)३,७२४ | (-)३,२५४ | (-)७,४३८ | १,३०२ |
| | २) इतर भांडवली जमा (निव्वळ)$ | (-)४ | ५७ | (-)१ | (-)८ | ११ | (-)१० | ० |
| | **एकूण कर्जे व इतर दायित्वे (एक + दोन)** | **(-)३,७१७** | **१४,३६३** | **२६,०१८** | **१८,३०८** | **२०,८६३** | **१३,९३५** | **२६,६५१** |

आधार - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

@ लोकलेख्याच्या निव्वळ प्राप्तीमध्ये राखीव निधी, ठेवी, निलंबन व संकीर्ण आणि वित्त प्रेषणे लेखा यांचा अंतर्भाव आहे.

$ यामध्ये आंतरराज्यीय तडजोड (निव्वळ), आकस्मिकता निधीमध्ये केलेले विनियोजन (निव्वळ) आणि आकस्मिकता निधी (निव्वळ) यांचा समावेश आहे.

# सुधारित अंदाज

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट ५.६
## शासनाच्या उपभोग्य बाबींवरील अंतिम खर्च व भांडवल निर्मितीवरील खर्च

(₹ कोटी)

| खर्च | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३# | २०१३-१४## |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **अ. उपभोग्य बाबींवरील खर्च** | | | | | | | |
| १ कर्मचाऱ्यांची भरपाई (१.१ +१.२) | १३,२०८ | १४,७७१ | १८,३२२ | २३,७८८ | २६,३५५ | ३१,९२७ | ३५,५४१ |
| १.१ वेतन आणि मजूरी | ९,५३३ | १०,२४४ | १२,९१५ | १४,८९८ | १५,७६१ | १८,७९० | २१,५०९ |
| १.२ निवृत्तीवेतन | ३,६७५ | ४,५२७ | ५,४०७ | ८,८९० | १०,५९४ | १३,१३७ | १४,०३३ |
| २ वस्तू आणि सेवांची निव्वळ खरेदी (२.१ + २.२ -२.३) | ७,०७७ | ७,६०७ | ९,९९२ | ११,७३५ | १४,०४१ | १७,८६६ | १८,२१८ |
| २.१ खरेदी | ६,२१५ | ६,११७ | ८,६१४ | १०,२३१ | १२,८७६ | १६,१०८ | १६,९७३ |
| २.२ देखभाल | २,२०७ | २,५४५ | २,९३८ | ३,४६५ | ३,०८८ | ४,०१८ | ३,७०८ |
| २.३ वजा विक्री | १,३४५ | १,०५५ | १,५६० | १,९६१ | १,९२३ | २,२५९ | २,४६४ |
| **एकूण उपभोग्य बाबींवरील खर्च** | **२०,२८५** | **२२,३७८** | **२८,३१४** | **३५,५२३** | **४०,३९६** | **४९,७९३** | **५३,७५९** |
| **ब. भांडवल निर्मितीवरील खर्च** | | | | | | | |
| १. इमारती | १,१०३ | १,२६९ | १,१३९ | १,०९२ | १,७५८ | २,३५७ | ३,३९४ |
| २. रस्ते व पूल | ९७९ | १,७२३ | २,९७४ | २,३४७ | २,७४२ | २,८४४ | २,७६२ |
| ३. इतर भांडवली खर्च | १,९९२ | २,२७० | २,४४८ | २,८९७ | ३,४७७ | ४,३४४ | ६,३९९ |
| ४. दळणवळणाची साधने | ५८ | ८२ | ६३ | १७१ | ५५ | २२५ | १४६ |
| ५. यंत्रसामग्री आणि साधनसामग्री | ४२८ | ६५० | ७०४ | ४७२ | ४५४ | ९१७ | ९०२ |
| ६. लागवडीखालील मत्ता | ८२ | ४४ | ८६ | ० | ० | ० | ० |
| ७. पशुधन | २ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **८. एकूण भांडवल निर्मितीवरील खर्च (१ ते ७)** | **४,६४४** | **६,०३८** | **७,४१४** | **६,९७९** | **८,४८५** | **१०,६८७** | **१३,६०३** |
| ९. साठ्यातील बदल | ० | १ | (-) ७ | (-)२ | २ | ३ | २ |
| **१०. स्थूल भांडवल निर्मितीवरील खर्च (८+९)** | **४,६४४** | **६,०३९** | **७,४०७** | **६,९७७** | **८,४८७** | **१०,६९०** | **१३,६०५** |

आधार - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

# सुधारित अंदाज ## - अर्थसंकल्पिय अंदाज

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

# परिशिष्ट ५.७
## १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त झालेली अनुदाने व खर्च

(₹ कोटी)

| अ. क्र. | खर्च | २०११-१२ | | २०१२-१३ | | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त | खर्च @ | प्राप्त | खर्च @ | प्राप्त | अपेक्षित |
| (१) | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | |
| १. | पंचायत राज संस्था | ९४५.६६ | ७५९.३९ | १,३३८.२० | १,३५८.६४ | ९६९.४९ | १,६३६.१२ |
| २. | नागरी स्वराज्य संस्था | ५६०.४९ | ६१०.०२ | ६६९.७१ | ६२०.१७ | ४१७.७१ | ९४५.४८ |
| ३. | विशेष क्षेत्र मुलभूत अनुदान | ७.९० | ७.९० | ७.९० | ७.९० | ७.९० | ७.८८ |
| ४. | विशेष क्षेत्र कार्यात्मक अनुदान | ०.०० | ०.०० | ७.९० | ०.०० | ०.०० | ७.८८ |
| ५. | राज्य आपत्ती मदत निधी (केंद्रीय हिस्सा) | ३४८.६१ | ५०६.३३ | ३६६.०५ | ३५७.३२ | ३८४.३५ | ४०३.५६ |
| ६. | क्षमता निर्मितीसाठी अनुदान | ५.०० | ०.०० | ५.०० | ०.०० | ०.०० | ५.०० |
| ७. | मुलभूत शिक्षणासाठी अनुदान | १४०.०० | १४०.०० | १४९.०० | १४९.०० | १५९.०० | १६५.०० |
| ८. | वनांसाठी अनुदान | ३८.७० | ४४.०४ | ७७.४० | ७७.११ | ७७.४० | ७७.४० |
| ९. | एकमेवाव्दीतीय ओळखपत्रासाठी (UID) प्रोत्साहनात्मक अनुदान | ०.०० | १.२० | ०.०० | ०.०० | ०.०० | ६३.४८ |
| १०. | न्याय प्रक्रिया सुधारण्यासाठी अनुदान | ५४.२७ | ३३.१२ | २.९८ | २५.३० | ०.०० | १०८.५३ |
| ११. | नाविन्यपूर्ण कल्पनांसाठी जिल्हा निधी अनुदान | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | १७.५० | ७.०० |
| १२. | राज्य व जिल्हा सांख्यिकी प्रणालीत सुधारणा करण्यासाठी अनुदान | ७.०० | ०.०० | ०.०० | ०.०२ | ०.०० | ७.०० |
| १३. | कर्मचारी व निवृत्ती वेतन विषयक माहितीकोषासाठी अनुदान | ०.०० | ३.६८ | ०.०० | २.४९ | ०.०० | ०.०० |
| १४. | जलक्षेत्र | ९२.०० | ७६.४७ | ९२.०० | ९.१७ | ०.०० | ९२.०० |
| १५. | रस्ते व पूल यांचे परिरक्षण | ४७०.०० | ३११.०१ | ५०४.०० | ५४५.४७ | ५४५.०० | ५८४.०० |
| १६. | राज्याचा विविध गरजा | २८३.९७ | १९४.४१ | २३२.०० | २५०.७१ | ५५.७५ | ३०८.७५ |
| १७. | अर्भक मृत्यू दर | ०.०० | ०.०० | १३३.०८ | ०.०० | ९८.२७ | ०.०० |
| | **एकूण** | **२,९५३.५९** | **२,६८७.५७** | **३,५८५.२२** | **३,४०३.३०** | **२,७३२.३७** | **४,४१९.०८** |

आधार - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

@ संबंधित विभाग

६

# संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार



# ६. संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार

६.१ वित्तीय संस्थांच्या प्रगतीमध्ये देशाचा आर्थिक विकास प्रतिबिंबित होतो. पूर्वी ऋणको व धनको यांच्यामधील वित्तीय मध्यस्थ म्हणून केवळ बँकाच कार्यरत होत्या. कालांतराने बिगर बँकींग वित्तीय संस्था, म्युचुअल फंडस्, विमा कंपन्या व संयुक्त भांडवली संस्था याही वित्तीय मध्यस्थ म्हणून भूमिका बजावू लागल्या. सन १९९१ पासून विविध सुधारणा अंगिकारण्यात येऊन वित्तीय संस्थांमध्ये व्यापक बदल घडण्यास सुरूवात झाली व भारतीय वित्तीय प्रणाली जागतिक स्पर्धेस तोंड देण्यासाठी खुली करण्यात आली.

## अनुसूचित वाणिज्यिक बँका

६.२ बँकींग प्रणालीमध्ये अनुसूचित व बिगर अनुसूचित बँकांचा समावेश आहे. अनुसूचित बँका या अनुसूचित वाणिज्यिक बँका व अनुसूचित सहकारी बँका अशा गटात विभागल्या आहेत. अनुसूचित वाणिज्यिक बँकांमध्ये भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका, राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी क्षेत्रातील बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व विदेशी बँका यांचा समावेश आहे. अनुसूचित सहकारी बँकांबाबतची माहिती ह्या प्रकाशनातील 'उद्योग व सहकार' या प्रकरणामध्ये दिली आहे. मार्च, २०१३ अखेर अनुसूचित वाणिज्यिक बँकांची ९,७७४ बँकींग कार्यालये होती. त्यापैकी, सुमारे ७५ टक्के कार्यालये ही निम-नागरी व नागरी भागात कार्यरत होती. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज तक्ता ६.१ मध्ये दिले आहेत, तर याबाबतची श्रृंखला परिशिष्ट ६.१ मध्ये दिली आहे.

**आलेख ६.१ : अनुसूचित वाणिज्यिक बँकांचे कर्ज ठेवी प्रमाण**




**तक्ता ६.१ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज**

(३१ मार्च रोजी)

| विवरण | २०१२ | | | | २०१३ | | | | मागील वर्षाच्या तुलनेत एकूणशी शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | निम-नागरी | नागरी | एकूण | ग्रामीण | निम-नागरी | नागरी | एकूण | |
| बँकींग कार्यालयांची संख्या | २,३३८ | १,८५८ | ४,८५७ | ९,०५३ | २,५१९ | २,०६६ | ५,१८९ | ९,७७४ | ८.० |
| ठेवी (₹ हजार कोटी) | ३४.४ | ५८.६ | १,५००.७ | १,५९३.७ | ४१.१ | ७०.० | १,६७३.९ | १,७८५.० | ६.६ |
| कर्ज (₹ हजार कोटी) | २६.७ | ३१.८ | १,३२९.३ | १,३८७.८ | ३१.५ | ४१.१ | १,५०३.८ | १,५७६.४ | १३.६ |
| कर्ज ठेवी प्रमाण (टक्के) | ७७.५ | ५४.३ | ८८.६ | ८७.१ | ७६.६ | ५८.७ | ८९.९ | ८८.३ | - |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

६.३ मार्च, २०१३ अखेर भारतातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकूण बँकींग कार्यालयांपैकी सुमारे आठ टक्के कार्यालये राज्यात कार्यरत होती. भारतातील या बँकांच्या एकूण ठेवी व कर्ज यामध्ये सर्वाधिक म्हणजे अनुक्रमे १५ टक्के व २३ टक्के हिश्श्यासह राज्याने आपले अग्रस्थान अबाधित राखले आहे. राज्यातील कर्ज ठेवी प्रमाण ८८.३ टक्के होते, तर भारताकरिता हेच प्रमाण ७८.९ टक्के होते.

६.४ अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकूण ठेवी व कर्जामध्ये राष्ट्रीयीकृत बँकांचा अनुक्रमे सुमारे ५४ टक्के व ५१ टक्के हिस्सा होता, तर खाजगी बँकांचा अनुक्रमे २३ टक्के व २४ टक्के हिस्सा होता. भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका यांचे कर्ज ठेवी प्रमाण सर्वाधिक (१११.१ टक्के) होते. अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या दरडोई ठेवी व दरडोई कर्ज अनुक्रमे ₹ १,५४,२८६ व ₹ १,३६,२६० इतके होते. भारतासाठी तत्सम आकडेवारी अनुक्रमे ₹ ५६,३८० व ₹ ४४,०२८ इतकी होती. बँक गट निहाय अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज तक्ता ६.२ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ६.२ बँक गटनिहाय अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज**

(३१ मार्च रोजी)

| बँक गट | २०१२ | | | | २०१३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बँक कार्यालयांची संख्या | ठेवी (₹ हजार कोटी ) | कर्ज (₹ हजार कोटी ) | कर्ज ठेवी प्रमाण (टक्के) | बँक कार्यालयांची संख्या | ठेवी (₹ हजार कोटी ) | कर्ज (₹ हजार कोटी ) | कर्ज ठेवी प्रमाण (टक्के) |
| भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका | १,४९० | २०९.८ | २२२.३ | १०६.० | १,६४१ | २४६.२ | २७३.५ | १११.१ |
| राष्ट्रीयीकृत बँका | ५,२७३ | ८७०.३ | ७२५.६ | ८३.४ | ५,६१५ | ९६५.४ | ८०१.१ | ८३.० |
| विदेशी बँका | ९० | १५१.९ | ९८.३ | ६४.७ | ९१ | १५१.७ | ११६.४ | ७६.७ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | ६३० | ५.६ | ३.३ | ५८.९ | ६५० | ६.२ | ४.३ | ६९.३ |
| खाजगी बँका | १,५७० | ३५६.१ | ३३८.३ | ९५.० | १,७७७ | ४१५.५ | ३८१.२ | ९१.७ |
| **एकूण** | **९,०५३** | **१,५९३.७** | **१,३८७.८** | **८७.१** | **९,७७४** | **१,७८५.०** | **१,५७६.५** | **८८.३** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

६.५ सन २०१२ मध्ये चालू खात्यात सुमारे ५९ टक्क्यांची घट झाली तर बचत खाते व मुदत ठेवी खाते यामध्ये अनुक्रमे सुमारे २६ टक्के व २८ टक्क्यांनी वाढ झाली. खाते प्रकारानुसार अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी तक्ता ६.३ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ६.३ खाते प्रकारानुसार अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी**

(३१ मार्च रोजी)

| खाते प्रकार | २०११ | | २०१२ | |
|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या (हजारात) | ठेवी (₹ हजार कोटी ) | खात्यांची संख्या (हजारात) | ठेवी (₹ हजार कोटी) |
| चालू | ९,०९३ | २१२.५ | ३,७०७ | १७५.७ |
| बचत | ५८,८१० | २१२.२ | ७४,३९३ | २०५.६ |
| मुदत ठेवी | १७,४४८ | १,०२८.६ | २२,२६५ | १,१४८.५ |
| **एकूण** | **८५,३५१** | **१,४५३.३** | **१,००,३६५** | **१,५२९.८** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

६.६ भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार, सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास कर्ज देणे बंधनकारक आहे. अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास दिलेल्या एकूण कर्जापैकी सर्वाधिक (३९ टक्के) येणे कर्ज लघु उद्योग घटकांकडील होते, तर त्याखालोखाल गृहनिर्माण क्षेत्राकडील (२९ टक्के) होते. अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास दिलेल्या कर्जांपैकी येणे कर्जांची विभागणी तक्ता ६.४ मध्ये दिली आहे.

६.७ एकूण येणे कर्जापैकी, सुमारे ५७ टक्के कर्ज ही राष्ट्रीयीकृत बँकांकडील

**तक्ता ६.४ अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास दिलेल्या कर्जांपैकी येणे कर्जांची विभागणी**

(मार्चच्या शेवटच्या शुक्रवारी)

| प्राधान्य क्षेत्र | २०१२ | | २०१३* | |
|---|---|---|---|---|
| | खात्यांची संख्या (हजारात) | येणे कर्ज (₹ हजार कोटी) | खात्यांची संख्या (हजारात) | येणे कर्ज (₹ हजार कोटी) |
| कृषि व संलग्न कार्ये | ३,१४९ | ५४.८ | ३,५०६ | ५७.४ |
| लघु उद्योग@@ | १,०३७ | १००.६ | १,४२० | ११६.१ |
| गृहनिर्माण | ८३७ | ८०.० | ८३६ | ८७.० |
| स्व-सहाय्यता गट $ | १८६ | १.६ | १११ | ०.९ |
| इतर प्राधान्य क्षेत्र # | १५६ | ३.९ | १६५ | १४.३ |
| निर्यात कर्ज @ | ३ | २७.४ | १ | १९.४ |
| **एकूण** | **५,३६८** | **२६८.३** | **६,०३९** | **२९५.१** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक * अस्थायी @ केवळ विदेशी बँकांनाच लागू (लघुउद्योगांव्यतिरिक्त)

$ सूक्ष्म कर्ज (स्व-सहायता गट/सह दायित्व गट यांची कृषि व संलग्न कार्येकरिताची कर्ज वगळून)

# शिक्षण व राज्य पुरस्कृत अजा / अज संघटनांना देण्यात आलेली कर्जे मिळून

@@ मध्यम उद्योगांना देण्यात आलेली कर्जे

(भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका वगळून) होती. अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील येणे कर्ज तक्ता ६.५ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ६.५ अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील येणे कर्ज**

(३१ मार्च रोजी)

| बँक गट | येणे कर्ज (₹ हजार कोटी) | |
|---|---|---|
| | २०११ | २०१२ |
| भारतीय स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका | १८५.८ | २२०.८ |
| राष्ट्रीयीकृत बँका | ६२५.० | ७१६.७ |
| विदेशी बँका | ७५.३ | ८६.९ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | २.५ | ३.१ |
| खाजगी बँका | २०१.१ | २३४.५ |
| **एकूण** | **१,०८९.७** | **१,२६२.०** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

६.८ एकूण येणे कर्जापैकी सर्वाधिक (२८ टक्के) येणे कर्ज ही वस्तुनिर्माण क्षेत्रातील घटकांकडील होती. वैयक्तिक कर्ज तसेच व्यापार क्षेत्राकडील येणे कर्जाची टक्केवारी प्रत्येकी सुमारे ११ होती. अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील क्षेत्रनिहाय येणे कर्ज तक्ता ६.६ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ६.६ अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील क्षेत्रनिहाय येणे कर्ज**

(३१ मार्च रोजी)

| क्षेत्र | येणे कर्ज (₹ हजार कोटी) | | मागील वर्षीच्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०११ | २०१२ | |
| कृषि व संलग्न कार्ये | ३७.६ | ४४.० | १७.० |
| खाण व दगड खाणकाम | १४.१ | १३.७ | (-)२.८ |
| वस्तुनिर्माण | ३०३.१ | ३५७.२ | १७.८ |
| वीज, वायू व पाणीपुरवठा | ३१.१ | ४८.८ | ५६.९ |
| बांधकाम | ११७.४ | १२२.३ | ४.२ |
| परिवहन | ५५.० | ५३.८ | (-)२.२ |
| व्यावसायिक व इतर सेवा | १०९.४ | १०८.९ | (-)०.५ |
| व्यापार | ७९.९ | १३२.३ | ६५.६ |
| वैयक्तिक कर्जे | १२१.३ | १३५.८ | १२.० |
| इतर | २२०.८ | २४५.२ | ११.१ |
| **एकूण** | **१,०८९.७** | **१,२६२.०** | **१५.८** |

*आधार:* भारतीय रिझर्व्ह बँक

## वार्षिक कर्ज योजना

६.९ बँक ऑफ महाराष्ट्र ही राज्यातील कर्ज योजनेचे संनियंत्रण करणारी निमंत्रक बँक आहे. सन २०१३-१४ साठी राज्याची वार्षिक कर्ज योजना ₹ एक लाख कोटीची असून ती मागील वर्षापेक्षा ६१ टक्क्यांनी अधिक आहे. वार्षिक कर्ज योजनेंतर्गत प्रत्येकी सुमारे ४४ टक्के इतके कर्ज 'कृषि व संलग्न कार्ये' आणि 'ग्रामीण कारागीर, ग्राम व कुटीर उद्योग आणि लघु उद्योग' या क्षेत्रांसाठी वितरीत करण्यात आले. वार्षिक कर्ज योजनेंतर्गत राज्यात वितरीत केलेले कर्ज तक्ता ६.७ मध्ये तर जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना परिशिष्ट ६.२ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ६.७ वार्षिक कर्ज योजनेंतर्गत राज्यात वितरीत केलेले कर्ज**

(₹ हजार कोटी)

| क्षेत्र | २०१२-१३ | | | २०१३-१४ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लाभधारक (लाखात) | लक्ष्य | साध्य + | लाभधारक + (लाखात) |
| कृषि व संलग्न कार्ये | ३८.२ | ३०.७ (८०.४) | २८.८ | ५०.१ | २६.९ (५३.७) | २९.३ |
| ग्रामीण कारागीर, ग्राम व कुटीर उद्योग आणि लघु उद्योग | ७.४ | ८.३ (११२.२) | ०.८ | २१.६ | २६.९ (१२४.५) | ५.६ |
| इतर क्षेत्रे | १६.६ | १७.४ (१०४.८) | २१.७ | २८.३ | ६.८ (२४.०) | ०.७ |
| **एकूण** | **६२.२** | **५६.४ (९०.७)** | **५१.३** | **१००.०** | **६०.६ (६०.६)** | **३५.६** |

*आधार* : बँक ऑफ महाराष्ट्र, राज्यस्तरीय बँकर्स समितीचे निमंत्रक + सप्टेंबरपर्यंत

टीप : कंसातील आकडे साध्याची लक्ष्याशी टक्केवारी दर्शवितात.

## सूक्ष्म वित्तपुरवठा

६.१० सूक्ष्म वित्तपुरवठा म्हणजे गरिबांना त्यांचे उत्पन्नस्तर वाढेल व पर्यायाने त्यांचे जीवनमान सुधारेल या हेतुने अतिशय अल्प स्वरूपाची बचत, कर्ज आणि वित्तीय सेवा पुरविणे होय. 'स्व-सहाय्यता गट दुवा कार्यक्रम' अंतर्गत, स्व-सहाय्यता गटांना वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि सहकारी बँका यांचेकडून थेट वित्त पुरवठा करण्यात येतो. स्व-सहाय्यता गटांची ३१ मार्च, २०१३ रोजी एकूण संख्या सुमारे ६.९ लाख इतकी होती व त्यापैकी, ७२ टक्के हे केवळ महिला स्व-सहाय्यता गट होते. स्व-सहाय्यता गटांच्या एकूण बचतीमध्ये, महिला स्व-सहाय्यता गटांद्वारे झालेल्या बचतींचा हिस्सा सुमारे ७२ टक्के होता. स्व-सहाय्यता गटांच्या ठेवी, कर्जवाटप व थकीत कर्ज तक्ता ६.८ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ६.८ स्व-सहाय्यता गटांच्या ठेवी, कर्जवाटप व थकीत कर्ज**

(३१ मार्च, २०१३ रोजी)

| विवरण | बँक प्रकार | एकूण स्व-सहाय्यता गट | | एकूण पैकी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना स्व-सहाय्यता गट | | फक्त महिलांचे स्व-सहाय्यता गट | |
| | | संख्या | रक्कम (₹ कोटी) | संख्या | रक्कम (₹ कोटी) | संख्या | रक्कम (₹ कोटी) |
| **ठेवी** | **एकूण** | **६,८७,७१७** | **५१३.७१** | **१,७४,४३९** | **८५.९६** | **४,९३,०५०** | **३२९.९९** |
| | सहकारी | ३,०१,३३४ | २०५.७८ | ४१,६५९ | २८.६७ | १,९६,५३० | ११६.८० |
| | प्रादेशिक ग्रामीण | ८९,०४४ | ६४.४४ | १७,०२० | ८.८७ | ७७,२४८ | ५३.७८ |
| | खाजगी वाणिज्यिक | १६,०७२ | १६.३२ | १,०७७ | ०.०० | १६,०७२ | १६.३२ |
| | सार्वजनिक वाणिज्यिक | २,८१,२६७ | २२७.१७ | १,१४,६८३ | ४८.४२ | २,०३,२०० | १४३.०९ |
| **कर्जवाटप @** | **एकूण** | **५४,७४९** | **५७८.०७** | **१२,३६४** | **१३९.९४** | **३८,६१८** | **४०८.७०** |
| | सहकारी | १३,६६६ | ९२.६९ | १,९६८ | २४.१७ | ८,९४३ | ५४.०८ |
| | प्रादेशिक ग्रामीण | ८,६९५ | ९६.१५ | १,२६२ | १४.४९ | ७,९१५ | ८९.३९ |
| | खाजगी वाणिज्यिक | ९,२४८ | ९८.५९ | १५ | ०.२३ | ९,२४८ | ९८.५९ |
| | सार्वजनिक वाणिज्यिक | २३,१४० | २९०.६४ | ९,११९ | १०१.०५ | १२,५१२ | १६६.६४ |
| **थकीत कर्ज** | **एकूण** | **२,१९,६५१** | **१,२२९.०१** | **७४,९९८** | **४७८.४८** | **१,५६,६९२** | **८८१.५४** |
| | सहकारी | ६२,९११ | १५५.११ | १०,३६९ | ६६.२४ | ३८,६८७ | ८७.१६ |
| | प्रादेशिक ग्रामीण | ३८,५७९ | २२८.०८ | ११,०५२ | ४७.२८ | ३२,७०९ | १९१.०६ |
| | खाजगी वाणिज्यिक | १०,९०१ | ८९.४२ | ९७ | ०.७७ | १०,९०१ | ८९.४२ |
| | सार्वजनिक वाणिज्यिक | १,०७,२६० | ७५६.४० | ५३,४८० | ३६४.१९ | ७४,३९५ | ५१३.९० |

*आधार* : नाबार्ड @ वर्ष २०१२-१३ मधील

## वित्तीय समावेश

६.११ वित्तीय स्थैर्य हे प्रामुख्याने वित्तीय समावेश व वित्तीय साक्षरता यावर अवलंबून असते. वित्तीय समावेश व वित्तीय साक्षरता यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी भारत सरकारने वित्तीय स्थैर्य व विकास परिषद स्थापन केली आहे. सध्या राबविण्यात येत असलेल्या वित्तीय समावेश योजनेचे अधिक सक्षमीकरण करण्यासाठी, भारतीय रिझर्व्ह बँकेने उच्च स्तरीय वित्तीय समावेश सल्लागार समिती गठित केली आहे. या समितीच्या निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून बँकांनी खालील प्रकारची उपाययोजना केली आहे.

- 'नो फ्रील खाती ' उघडणे
- आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी. द्वारे सहज व जलदरितीने निधीचे समायोजन
- कमी व्याज दराने कर्ज
- आपतकालीन कर्ज सुविधा (अधिकर्ष सुविधा)
- स्व-सहाय्यता गट दुवा कार्यक्रम

६.१२ वित्तीय समावेशांतर्गत एकूण १,२४७ गावांसाठी तरतूद करण्यात आली. त्यापैकी, ३१ मार्च, २०१४ पर्यंत ६३१ गावांमध्ये सुविधा उपलब्ध करण्यात आल्या व ७.८२ लाख 'नो-फ्रील' खाती उघडण्यात आली.

## ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी

६.१३ भारत सरकारने ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी राज्य शासन व राज्य मालकीची महामंडळे यांना अल्प दराने कर्ज पुरवठा करण्यासाठी ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीची (ग्रापासुविनि) स्थापना केली आहे. ग्रापासुविनि अंतर्गत एकूण ३१ कार्यांसाठी मदत पुरविली जाते. यापैकी, २२ कृषी व संलग्न कार्याशी, सात सामाजिक क्षेत्राशी व दोन ग्रामीण दळणवळणाशी संबंधित आहेत. ग्रापासुविनि १ ते १४ (सन २००८-०९) अंतर्गत एकूण १७,९०५ प्रकल्प मंजूर झाले होते व त्यासाठी ₹ ५,०४९ कोटी इतके कर्ज वितरीत करण्यात आले. एकूण मंजूर प्रकल्पांपैकी ८,६४४ प्रकल्प हे सिंचन, ९,०३५ दळणवळण (रस्ते व पूल) आणि २२६ पेयजल पुरवठ्याचे होते. ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीअंतर्गत मंजूर प्रकल्प व वितरीत झालेले कर्ज तक्ता ६.९ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ६.९ ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीअंतर्गत मंजूर प्रकल्प व वितरीत केलेले कर्ज**

(₹ कोटी)

| ग्रापासुविनि | मंजूर प्रकल्पांची संख्या | वितरित केलेले कर्ज |
|---|---|---|
| १ ते १४ (१९९५ ते २००९) | १७,९०५ | ५,०४९ |
| १५ (२००९-१०) | ५,९३४ | ७५७ |
| १६ (२०१०-११) | ६६० | ६६७ |
| १७ (२०११-१२) | १,५२८ | ७४७ |
| १८ (२०१२-१३) | ८२७ | १९४ |
| १९ (२०१३-१४) | ६४४ | ५८ |
| **एकूण** | **२७,४९८** | **७,४७२** |

*आधार* : नाबार्ड

## संयुक्त भांडवली संस्था

६.१४ संयुक्त भांडवली संस्था विविध संलग्न उद्योग, व्यापार व व्यापाराशी संलग्न उद्योगांना प्रोत्साहन देतात. मार्च, २०१३ अखेर भारतातील एकूण ८,८३,६११ संयुक्त भांडवली संस्थांपैकी, सुमारे २० टक्के संस्था राज्यात कार्यरत होत्या. भरणा केलेल्या एकूण भांडवलामध्ये या संस्थांचा हिस्सा २२ टक्के होता. संयुक्त भांडवली संस्थांचे भरणा केलेले भांडवल तक्ता ६.१० मध्ये दिले आहे.

**तक्ता ६.१० संयुक्त भांडवली संस्थांचे भरणा केलेले भांडवल**

(३१ मार्च रोजी)

| बाब | २०१२ | | | | २०१३* | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | | भारत | | महाराष्ट्र | | भारत | |
| | संस्थांची संख्या | भरणा केलेले भांडवल (₹ हजार कोटी) | संस्थांची संख्या | भरणा केलेले भांडवल (₹ हजार कोटी) | संस्थांची संख्या | भरणा केलेले भांडवल (₹ हजार कोटी) | संस्थांची संख्या | भरणा केलेले भांडवल (₹ हजार कोटी) |
| खाजगी | १,४७,६५३ | १४३.२ | ७,३८,३३१ | ५७७.९ | १,६२,६५९ | १६१.७ | ८,१८,७८१ | ६६३.३ |
| सार्वजनिक | ११,१५९ | २२५.४ | ६२,४३० | १,०४५.७ | ११,४८९ | २४७.३ | ६४,८३० | १,१६२.७ |
| **एकूण** | **१,५८,८१२** | **३६८.६** | **८,००,७६१** | **१,६२३.६** | **१,७४,१४८** | **४०९.०** | **८,८३,६११** | **१,८२६.०** |

*आधार* : कॉर्पोरेट कार्य मंत्रालय, *भारत सरकार*     * अस्थायी

## भांडवली बाजार

६.१५ भांडवली बाजाराची बचतीस प्रोत्साहन देऊन उत्पादनक्षम गुंतवणुकीकडे वळविण्यात महत्त्वाची भूमिका आहे. राज्यात मुंबई शेअर बाजार व राष्ट्रीय शेअर बाजार हे प्रमुख शेअर बाजार कार्यरत आहेत. याशिवाय, ओटीसी एक्स्चेंज ऑफ इंडिया, इंटर कनेक्टेड स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड, युनायटेड स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड, पुणे स्टॉक एक्स्चेंज लिमिटेड व एमसीएक्स् स्टॉक एक्स्चेंज लिमिटेड असे पाच शेअर बाजार कार्यरत आहेत.

## प्राथमिक बाजार

६.१६ सन २०१२-१३ मध्ये राज्यात २३ समभागांद्वारे (१६ सार्वजनिक व सात हक्क समभाग) ₹ ३,६८३ कोटींची तर मागील वर्षी ₹ ६,०८० कोटींची उलाढाल झाली. सन २०१३-१४ मध्ये जानेवारी, २०१४ अखेरपर्यंत राज्यात १३ समभागांद्वारे (१० सार्वजनिक व तीन हक्क समभाग) ₹ २,४०७ कोटींची उलाढाल झाली.

## दुय्यम बाजार

६.१७ राष्ट्रीय शेअर बाजार व मुंबई शेअर बाजारात सन २०१२-१३ मध्ये उलाढाल झालेल्या एकूण समभागांचे भांडवली मूल्य अनुक्रमे ₹ ६२,३९,०३५ कोटी व ₹ ६३,८७,८८७ कोटी इतके होते. सन २०१३-१४ मध्ये सप्टेंबर अखेरपर्यंत राष्ट्रीय शेअर बाजार व मुंबई शेअर बाजारात उलाढाल झालेल्या एकूण समभागांचे मूल्य अनुक्रमे ₹ ६१,९१,६२६ कोटी व ₹ ६३,८६,१३४ कोटी इतके होते. राष्ट्रीय व मुंबई शेअर बाजाराची उलाढाल तक्ता ६.११ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.११ शेअर बाजारातील उलाढाल**

(₹ हजार कोटी)

| शेअर बाजार | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४+ |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय | २,८१०.९ | २,७०८.३ | २,५३१.८ |
| मुंबई | ६६७.५ | ५४८.८ | ४५९.५ |

आधार : सेबी + फेब्रुवारीपर्यंत

## म्युच्युअल फंड

६.१८ अनेक गुंतवणुकदारांना त्यांची संसाधने एकत्रित करून समभाग, वस्तू व इतर रोखे खरेदीस सहाय्य करणारे म्युच्युअल फंड हे गुंतवणुकीचे साधन आहे. फेब्रुवारी, २०१४ अखेर राज्यात ४५ तर देशात ५० म्युच्युअल फंड कार्यरत होते. म्युच्युअल फंडाद्वारे झालेली उलाढाल तक्ता ६.१२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१२ म्युच्युअल फंडाद्वारे झालेली उलाढाल**

(₹ हजार कोटी)

| वर्ष | नवीन म्युच्युअल फंड | अस्तित्वातील म्युच्युअल फंड |
|---|---|---|
| २०११-१२ | १२१.४ | ६,६९८.३ |
| २०१२-१३ | ८६.२ | ७,२०१.७ |
| २०१३-१४+ | ६५.४ | ७,१२०.७ |

*आधार* : भारतातील म्युच्युअल फंड संघटना + डिसेंबरपर्यंत

## विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्र

६.१९ किरकोळ गुंतवणुकदारांना सुलभ व्हावे म्हणून मल्टी कमोडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एमसीएक्स) नॅशनल कमोडिटी अँड डेरिव्हेटिव्हज् एक्स्चेंज लिमिटेड (एनसीडीईएक्स) व नॅशनल मल्टी कमोडिटी एक्स्चेंज (एनएमसीई) ही तीन विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्र कार्यरत आहेत. मल्टी कमोडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एमसीएक्स) व नॅशनल कमोडिटी अँड डेरिव्हेटिव्हज् एक्स्चेंज लिमिटेड (एनसीडीईएक्स) यांची उलाढाल तक्ता ६.१३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१३ एमसीएक्स व एनसीडीईएक्स यांची उलाढाल**

(₹ हजार कोटी)

| विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्र | विक्रेय वस्तूंची संख्या | | उलाढाल | |
|---|---|---|---|---|
| | २०११-१२ | २०१२-१३ | २०११-१२ | २०१२-१३ |
| एमसीएक्स | ४७ | ४१ | ३१,१९४ | २९,७६२ |
| एनसीडीईएक्स | ४४ | ३० | १,८१० | १,५९८ |

*आधार* : एमसीएक्स व एनसीडीईएक्स

## विमा

६.२० विम्याद्वारे ग्रामीण व नागरी भागातील उद्योग व व्यक्तींना सुरक्षा कवच मिळते. तसेच विकास कामासाठी लागणारा दीर्घकालीन निधीसुद्धा निर्माण होतो. भारतीय जीवन विमा निगम सहित एकूण २४ जीवन विमा कंपन्या कार्यरत आहेत. एप्रिल, २०१३ मध्ये विदेशी थेट गुंतवणुकीखालील विमा क्षेत्रातील मर्यादा २६ टक्क्यांवरून ४९ टक्क्यांपर्यंत नेल्यानंतर विमा कंपन्यामध्ये स्पर्धा वाढली व त्यामुळे अधिक चांगली ग्राहक व विक्री पश्चात सेवा, गरजेनुरूप व नाविन्यपूर्ण योजना आणि लवचिकता यांवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. भारतीय जीवन विमा निगमचा राज्यात ₹ ७,६३१ कोटींचा व्यवसाय झाला, जो राज्यातील जीवन विमाबाबतच्या एकूण व्यवसायाच्या ७० टक्के होता. नव्याने काढण्यात आलेल्या वैयक्तिक जीवन विमा पॉलिसी तक्ता ६.१४ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ६.१४ नवीन वैयक्तिक जीवन विमा पॉलिसी**

(₹ कोटी)

| विवरण | | २०११-१२ | | २०१२-१३ | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या (हजारात) | हप्ता | संख्या (हजारात) | हप्ता |
| महाराष्ट्र | खाजगी # | १,१९३ | ३,५६३ | ९५९ | ३,३२६ |
| | जीविनि | ३,९७५ | ७,१७७ | ४,०४६ | ७,६३१ |
| | **एकूण** | **५,१६८** | **१०,७४०** | **५,००५** | **१०,९५७** |
| भारत | खाजगी # | ८,४३६ | २२,०३४ | ७,३९९ | २०,३०७ |
| | जीविनि | ३५,७२५ | ४२,७३८ | ३६,७५५ | ४१,९३४ |
| | **एकूण** | **४४,१६१** | **६४,७७२** | **४४,१५४** | **६२,२४१** |

*आधार* : विमा नियामक व विकास प्राधिकरण जीविनि - जीवन विमा निगम

# बिर्ला सनलाईफ, अविवा, एगन रेलिगेयर, इत्यादि संस्थांचा समावेश

६.२१ भारतात चार सार्वजनिक, २१ खाजगी क्षेत्रातील व दोन विशेष बिगर जीवन विमा संस्था कार्यरत आहेत. सन २०१२-१३ मध्ये बिगर जीवन विमा पोटी प्राप्त झालेल्या स्थूल विमा हप्त्याच्या रकमेत १८ टक्के वाढ झाली. बिगर जीवन विमा अंतर्गत, आरोग्य विम्यापोटी सर्वाधिक (२८ टक्के) हप्ता गोळा झाला. त्या खालोखाल मोटार (स्व हानी) (१८ टक्के) व अग्नी विमा (१३ टक्के) यावर हप्ता गोळा झाला. राज्यात क्षेत्रनिहाय बिगर जीवन विम्यापोटी प्राप्त झालेले स्थूल उत्पन्न तक्ता ६.१५ मध्ये दिलेआहे.

**तक्ता ६.१५ क्षेत्रनिहाय बिगर जीवन विम्यापोटी प्राप्त झालेले स्थूल उत्पन्न**

(₹ कोटी)

| वर्ष | अग्नी | मरीन (कार्गो) | मरीन (हल) | अभियांत्रिकी | मोटार (स्व हानी) | मोटार (तृतीय पक्ष) | दायित्व विमा | वैयक्तिक अपघात | आरोग्य विमा | पीक विमा | इतर सर्व संकीर्ण# | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०११-१२ | १,६६० | ५४५ | ६७० | ५७३ | २,२९४ | १,४४२ | ३९९ | ३७८ | ३,६८२ | २०८ | १,५२० | १३,३७१ |
| २०१२-१३ | १,९९० | ५५७ | ६९६ | ५६७ | २,७६५ | १,८७२ | ४७० | ५२८ | ४,३७३ | ३०६ | १,६७० | १५,७९४ |

*आधार* : विमा नियामक व विकास प्राधिकरण

# कर्ज विमा, विदेशी वैद्यकीय विमा, इत्यादींचा समावेश

* * * * *

# परिशिष्ट ६.१
# महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण, निमनागरी व नागरी / महानगर क्षेत्रातील सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज

(₹ कोटी)

| वर्ष | वर्षाच्या जून महिन्यातील अखेरच्या शुक्रवारची स्थिती | | | | | | एकूण ठेवी | एकूण कर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | | निमनागरी | | नागरी / महानगर | | | |
| | ठेवी | कर्ज | ठेवी | कर्ज | ठेवी | कर्ज | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १९७१ | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | उ. ना. | १,४६० | १,२९१† |
| १९८१ | ३०९ | २२६ | ७१४ | ३८४ | ६,५६८ | ५,३२१ | ७,५९० | ५,९३१ |
| १९९१ | १,७०१ | १,३५७ | २,३४७ | १,३५४ | ३६,१८१ | २६,९३६ | ४०,२३० | २९,६४७ |
| २००१ | ६,७६९ | ५,०२९ | १०,०३४ | ४,१३८ | १,५९,१९९ | १,३४,३४० | १,७६,००१ | १,४३,५०७ |
| २००६ | १२,४११ | ११,६०९ | २१,७०५ | १४,१११ | ६,५१,४२३ | ६,०८,००६ | ६,८५,५३८ | ६,३३,७२५ |
| २००९ | १९,४२६ | १४,६१६ | ३३,७९२ | १८,५६० | ९,६६,८४७ | ८,३७,१५१ | १०,२०,०६५ | ८,७०,३२८ |
| २०१० | २३,५५५ | १७,४३७ | ४०,५२६ | २१,८७८ | ११,०३,४२३ | ९,५३,७९९ | ११,६७,५०४ | ९,९३,११४ |
| २०११ | २९,२३१ | २२,७०३ | ४९,१७४ | २७,६०४ | १३,२५,५५० | ११,२५,७८० | १४,०३,९५५ | ११,७६,०८७ |
| २०१२ | ३४,४५४ | २६,७१२ | ५८,५८६ | ३१,८२९ | १५,००,६५४ | १३,२९,२८७ | १५,९३,६९४ | १३,८७,८२७ |
| २०१३ # | ४१,११९ | ३१,५२७ | ७०,०५२ | ४१,१३५ | १६,७३,८७२ | १५,०३,८२७ | १७,८५,०४३ | १५,७६,४९० |

| वर्ष | दरडोई ठेवी (₹) | दरडोई कर्ज (₹) | एकूण बँक कार्यालयांची संख्या | | | दर लाख लोकसंख्येमागे बँकींग कार्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामीण व निमनागरी | नागरी / महानगर क्षेत्रातील | एकूण | |
| (१) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) |
| १९७१ | २९० | २५६ | २५६ | उ. ना. | १,४७१ | २.९ |
| १९८१ | १,२०४ | ९४० | उ. ना. | उ. ना. | ३,६२७ | ५.८ |
| १९९१ | ५,३४४ | ३,५८० | ३,३५३ | २,२३८ | ५,५९१ | ७.४ |
| २००१ | १८,१०६ | १४,७६३ | ३,३८० | २,९१४ | ६,२९४ | ६.५ |
| २००६ | ६४,११७ | ५९,२१७ | ३,२९५ | ३,४२५ | ६,७२० | ६.३ |
| २००९ | ९२,६६२ | ७९,०६० | ३,५६६ | ३,९५४ | ७,५२० | ६.८ |
| २०१० | १,०४,५७१ | ८८,९७८ | ३,७१८ | ४,३१९ | ८,०३७ | ७.२ |
| २०११ | १,२४,०४८ | १,०३,९११ | ३,९०२ | ४,६१३ | ८,५१५ | ७.५ |
| २०१२ | १,३९,५७२ | १,२१,५४३ | ४,१९६ | ४,८५७ | ९,०५३ | ७.९ |
| २०१३ # | १,५४,२८६ | १,३६,२६० | ४,५८५ | ५,१८९ | ९,७७४ | ८.५ |

आधार - भारतीय रिझर्व्ह बँक

टीप - † आकडे जून, १९७१ च्या दुसऱ्या शुक्रवारचे आहेत. # ३१ मार्च रोजी उ. ना. - उपलब्ध नाही

# परिशिष्ट ६.२
## जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना (२०१३-१४)

(₹ कोटी)

| अ. क्र. | जिल्हा | प्राधान्य क्षेत्र | | | | | बिगर प्राधान्य क्षेत्र | एकूण योजना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कृषि व संलग्न कार्ये | | बिगर शेती क्षेत्र | इतर प्राधान्य क्षेत्र | एकूण | | |
| | | एकूण कर्ज | त्यापैकी, पीक कर्ज | | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | ठाणे | ६७३ | ३४२ | १,४६० | ३,०६१ | ५,१९५ | १,५४७ | ६,७४२ |
| २ | रायगड | ४११ | १८४ | ७४ | ६२२ | १,१०६ | १३५ | १,२४१ |
| ३ | रत्नागिरी | ६२२ | ३१८ | १३६ | ८४० | १,५९९ | २६३ | १,८६१ |
| ४ | सिंधुदुर्ग | ३७५ | १६४ | १०७ | ३७६ | ८५८ | ३२५ | १,१८३ |
| ५ | नाशिक | ४,२९८ | २,९७९ | ७२० | १,४५७ | ६,४७५ | ९६१ | ७,४३७ |
| ६ | धुळे | १,०४० | ७२६ | १९७ | २८७ | १,५२४ | ७५ | १,५९९ |
| ७ | नंदुरबार | ६३९ | ४८२ | ३२ | ८४ | ७५६ | ६१ | ८१७ |
| ८ | जळगाव | २,५४९ | २,११४ | १,०२८ | ५८३ | ४,१५९ | ११० | ४,२६९ |
| ९ | अहमदनगर | ३,८७८ | २,४१६ | ५६२ | १,०९४ | ५,५३४ | १,५१२ | ७,०४५ |
| १० | पुणे | ३,२७४ | १,९१८ | ९७३ | २,१४५ | ६,३९२ | १,३५७ | ७,७४९ |
| ११ | सातारा | २,७२१ | १,५०६ | ४२८ | १,१३६ | ४,२८४ | ४३३ | ४,७१७ |
| १२ | सांगली | २,९२८ | १,४८३ | ३७४ | ४७८ | ३,७८० | ६२१ | ४,४०१ |
| १३ | सोलापूर | ३,३०१ | २,२९६ | ४७४ | ७४५ | ४,५१९ | ६०० | ५,११९ |
| १४ | कोल्हापूर | ३,७८३ | २,४७९ | १,०३९ | ९२३ | ५,७४५ | ७४९ | ६,४९४ |
| १५ | औरंगाबाद | १,३७६ | ८१९ | ९४२ | ८९८ | ३,२१६ | ५६४ | ३,७८० |
| १६ | जालना | १,०७२ | ८०१ | २१२ | २३९ | १,५२३ | ११० | १,६३३ |
| १७ | परभणी | १,०६० | ९४१ | ८० | १३० | १,२७० | ९१ | १,३६१ |
| १८ | हिंगोली | ५४३ | ४५२ | २६ | ७१ | ६४० | ० | ६४० |
| १९ | बीड | १,४७९ | १,३२० | ६६ | २६४ | १,८१० | ० | १,८१० |
| २० | नांदेड | १,६१३ | १,३११ | ५७ | ३७७ | २,०४७ | ० | २,०४७ |
| २१ | उस्मानाबाद | १,१७२ | ७४९ | ९२ | ३१० | १,५७४ | ० | १,५७४ |
| २२ | लातूर | १,३९३ | १,१६१ | २७१ | ५१२ | २,१७७ | २७१ | २,४४७ |
| २३ | बुलढाणा | १,१४२ | ९५५ | ५५ | १४४ | १,३४१ | ६४ | १,४०५ |
| २४ | अकोला | ८९२ | ६२८ | १७० | २७६ | १,३३७ | ११० | १,४४८ |
| २५ | वाशिम | ७९० | ६४६ | ३७ | १३९ | ९६६ | ३२ | ९९८ |
| २६ | अमरावती | १,९६२ | १,७२१ | १०९ | २८५ | २,३५५ | १५१ | २,५०६ |
| २७ | यवतमाळ | १,६८५ | १,३८८ | ११६ | ४९६ | २,२९६ | २२७ | २,५२३ |
| २८ | वर्धा | ७९६ | ५७१ | ४३ | १५२ | ९९२ | ७७ | १,०६९ |
| २९ | नागपूर | १,०९१ | ८४० | १०४ | २६० | १,४५५ | १९८ | १,६५३ |
| ३० | भंडारा | ४५१ | ४०६ | १३४ | ११५ | ६९९ | १०० | ७९९ |
| ३१ | गोंदिया | २६८ | १९१ | ६६ | ८३ | ४१७ | ५० | ४६६ |
| ३२ | चंद्रपूर | ६३१ | ४६८ | ९४ | ४४५ | १,१६९ | १७६ | १,३४६ |
| ३३ | गडचिरोली | १५७ | ११३ | ६८ | ६५ | २९० | ३० | ३२० |
| | **महाराष्ट्र** | **५०,०६५** | **३४,८८८** | **१०,३४६** | **१९,०९२** | **७९,५०३** | **११,०००** | **९०,५०३** |

आधार - राज्यस्तरीय बँकर्स समिती, बँक ऑफ महाराष्ट्र

७

# कृषि व संलग्न कार्ये



# ७. कृषि व संलग्न कार्ये

७.१ कृषि व संलग्न कार्ये क्षेत्राचा चालू किंमतींनुसार सन २०१२-१३ च्या स्थूल राज्य उत्पन्नात १०.९ टक्के वाटा होता. बाराव्या पंचवार्षिक योजनेत कृषि व संलग्न कार्ये क्षेत्राच्या विकासाचे उद्दिष्ट चार टक्के निश्चित करण्यात आले आहे. सन २०१२-१३ मध्ये स्थिर किंमतींनुसार (२००४-०५) या क्षेत्राच्या विकासाचा दर (-) १.० टक्के होता. जनगणना २०११ नुसार कृषि व संलग्न कार्ये या क्षेत्राचा राज्यातील एकूण रोजगारामध्ये ५२.७ टक्के वाटा आहे. राज्यातील अन्नधान्याचे उत्पादन हे प्रामुख्याने हवामानाच्या स्थितीवर अवलंबून असून त्यामुळे शेतकऱ्यांसाठी आर्थिक अनिश्चितता निर्माण होते.

## मान्सून २०१३

७.२ राज्यात मान्सून पूर्व पावसाचे आगमन दिनांक १ जून, २०१३ रोजी दक्षिण कोकण, दक्षिण व मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ भागात झाले, तथापि, त्याचा जोर कमी होता. नैऋत्य मोसमी पावसाचे आगमन दिनांक ७ जून, २०१३ रोजी झाले व तो राज्याच्या सर्व भागांत सर्वदूर पसरला.

७.३ राज्यात जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर या महिन्यांत सरासरीच्या तुलनेत अनुक्रमे १६४.३ टक्के, १४० टक्के, ८७.१ टक्के, ९६.५ टक्के व १५३.३ टक्के पाऊस पडला. राज्यातील एकूण पाऊस सरासरीच्या १२४.६ टक्के होता. राज्यातील ३५५ तालुक्यांपैकी (मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांतील तालुके वगळून) ५० टक्क्यांहून जास्त तालुक्यांमध्ये प्रमाणाबाहेर पाऊस पडला. पडलेल्या पावसाच्या स्थूल वर्गवारीनुसार जिल्हे व तालुक्यांचे वर्गीकरण तक्ता ७.१ मध्ये तर पडलेल्या पावसाच्या प्रमाणानुसार तालुक्यांचे महिनानिहाय वर्गीकरण तक्ता ७.२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१ पडलेल्या पावसाच्या स्थूल वर्गवारीनुसार जिल्हे व तालुक्यांचे वर्गीकरण**

| पावसाची स्थूल वर्गवारी (सरासरीशी टक्केवारी) | जिल्ह्यांची संख्या# | | | तालुक्यांची संख्या# | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०११ | २०१२ | २०१३ | २०११ | २०१२ | २०१३ |
| प्रमाणाबाहेर (१२० व अधिक) | ४ | १ | १८ | ४६ | ३० | १८६ |
| सरासरी (८० - १२०) | २७ | २२ | १५ | २०९ | १८९ | १५३ |
| अपुरा (४० - ८०) | २ | १० | ० | १०० | १३३ | १६ |
| तुरळक (० - ४०) | ० | ० | ० | ० | ३ | ० |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

# मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे आणि त्यांच्यातील तालुके वगळून

**तक्ता ७.२ पडलेल्या पावसाच्या प्रमाणानुसार तालुक्यांचे महिनानिहाय वर्गीकरण**

(२०१३)

| पावसाची वर्गवारी (सरासरीशी टक्केवारी) | तालुक्यांची संख्या# | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर |
| १२० व अधिक | २५२ | २३१ | ७० | ७३ | २१९ |
| १०० - १२० | ४३ | ६५ | ६१ | ६८ | २८ |
| ८० - १०० | २८ | ४२ | ६५ | ६६ | २४ |
| ६० - ८० | २५ | १३ | ६६ | ८४ | २६ |
| ४० - ६० | ७ | ४ | ७० | ४७ | २९ |
| २० - ४० | ० | ० | २२ | १७ | २० |
| ० - २० | ० | ० | १ | ० | ९ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

# मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांतील तालुके वगळून




**तक्ता ७.३ प्रमुख पिकांचे उत्पादन**

(लाख मे. टन)

| प्रमुख पिके | २०१२-१३ (अंतिम अंदाज) | २०१३-१४ (अस्थायी) | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| तृणधान्ये | ८८.५९ | १२०.१४ | ३६ |
| कडधान्ये | २३.६० | ३४.४६ | ४६ |
| **एकूण अन्नधान्ये@** | **११२.१९** | **१५४.६०** | **३८** |
| तेलबिया @ | ५१.०५ | ५३.८४ | ५ |
| कापूस $ | ६७.९३ | ७५.४३ | ११ |
| ऊस ** | ७७५.९२ | ७५३.८४ | (-)३ |

*आधार*: कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन
@ खरीप, रब्बी व उन्हाळी पिकांचा समावेश
$ लाख गासड्या (प्रत्येकी १७० किग्रॅ)
** तोडणी क्षेत्र

## संभाव्य कृषि उत्पादन २०१३-१४

७.४ पूर्वानुमानानुसार २०१३-१४ मध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत अन्नधान्ये, तेलबिया आणि कापूस यांच्या उत्पादनात अनुक्रमे ३८ टक्के, पाच टक्के व ११ टक्के वाढ अपेक्षित आहे. ही वाढ प्रामुख्याने राज्यातील सर्व भागात पेरणीच्या कालावधीत तसेच खरीप पिकांच्या वाढीच्या वेळेस पडलेल्या समाधानकारक पावसामुळे आहे. प्रमुख पिकांचे उत्पादन तक्ता ७.३ मध्ये दिले आहे. प्रमुख पिकांचे क्षेत्र, उत्पादन व प्रति हेक्टर उत्पादन यांची समय शृंखला परिशिष्ट ७.१ मध्ये दिली आहे.

## खरीप पिके

७.५ सन २०१३-१४ च्या खरीप हंगामामध्ये १५०.३४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली असून ती मागील वर्षाच्या (१४६.९९ लाख हेक्टर) तुलनेत दोन टक्के जास्त होती. मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्यांच्या व कडधान्यांच्या पिकांखालील क्षेत्रात अनुक्रमे एक टक्का व चार टक्के घट तर तेलबियांखालील क्षेत्रात २२ टक्के वाढ झाली आहे. सोयाबीन पिकाखालील क्षेत्रात झालेल्या भरघोस वाढीमुळे तेलबियांखालील क्षेत्रात वाढ झाली आहे. तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया आणि कापूस यांच्या उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे २१ टक्के, पाच टक्के, तीन टक्के आणि ११ टक्के वाढ तर ऊसाच्या उत्पादनात तीन टक्के घट अपेक्षित आहे. प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.४ मध्ये दिले आहे.

**आलेख ७.१ : सोयाबीन लागवडीखालील क्षेत्र**



**तक्ता ७.४ प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे. टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२-१३ | २०१३-१४ (तात्पुरते) | शेकडा बदल | २०१२-१३ | २०१३-१४ (तात्पुरते) | शेकडा बदल |
| तांदूळ | १,५२८ | १,५१३ | (-)१ | ३,००२ | २,८७८ | (-)४ |
| ज्वारी | ८८९ | ६१८ | (-) ३० | ११९७ | ७५८ | (-) ३७ |
| बाजरी | ७८८ | ८१२ | ३ | ५०२ | ७७८ | ५५ |
| नाचणी | १२५ | १०२ | (-)१८ | १३९ | १२३ | (-)१२ |
| मका | ६८९ | ९५५ | ३९ | १,५८२ | ३,२२१ | १०४ |
| इतर तृणधान्ये | ५४ | ५१ | (-)६ | २३ | २७ | १७ |
| **एकूण तृणधान्ये** | **४,०७३** | **४,०५१** | **(-) १** | **६,४४५** | **७,७८५** | **२१** |
| तूर | १,२१४ | १,०९६ | (-) १० | १,००६ | १,०३६ | ३ |
| मूग | ४३१ | ४४८ | ४ | २११ | २३७ | १२ |
| उडीद | ३६० | ३२९ | (-) ९ | २१४ | २०२ | (-) ६ |
| इतर कडधान्ये | ६५ | १०५ | ६२ | १८ | ४४ | १४४ |
| **एकूण कडधान्ये** | **२,०७०** | **१,९७८** | **(-) ४** | **१,४४९** | **१,५१९** | **५** |
| **एकूण अन्नधान्ये** | **६,१४३** | **६,०२९** | **(-) २** | **७,८९४** | **९,३०४** | **१८** |
| सोयाबीन | ३,०६४ | ३,९१७ | २८ | ४,६९० | ४,८७३ | ४ |
| भुईमुग | २३८ | १९६ | (-) १८ | २३६ | २२९ | (-) ३ |
| तीळ | ३९ | २३ | (-) ४१ | ११ | ७ | (-) ३६ |
| कारळे | ४० | २२ | (-) ४५ | १२ | १० | (-)१७ |
| सूर्यफूल | ३५ | २४ | (-) ३१ | १४ | १४ | ० |
| इतर तेलबिया | १८ | १४ | (-)२२ | ५ | ५ | ० |
| **एकूण तेलबिया** | **३,४३४** | **४,१९६** | **२२** | **४,९६८** | **५,१३८** | **३** |
| कापूस (रुई) @ | ४,१८७ | ३,८७२ | (-) ८ | ६,७९३ | ७,५४३ | ११ |
| ऊस ** | ९३५ | ९३७ | ० | ७७,५९२ | ७५,३८४ | (-)३ |
| **एकूण** | **१४,६९९** | **१५,०३४** | **२** | -- | -- | -- |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन @ १७० किलोची एक गासडी याप्रमाणे कापसाचे उत्पादन '००० गासड्यांमध्ये ** तोडणी क्षेत्र

## रब्बी पिके

७.६ सन २०१३-१४ च्या खरीप हंगामात पडलेल्या समाधानकारक पावसामुळे व रब्बी हंगामातील आर्द्रतेमुळे रब्बी क्षेत्रात मागील वर्षाच्या तुलनेत १५ टक्के वाढ झाली आहे. तृणधान्ये व तेलबिया पिकांखालील उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत अनुक्रमे ७६ टक्के व ३४ टक्के वाढ अपेक्षित आहे. तसेच कडधान्ये पिकांखालील क्षेत्रात झालेल्या वाढीमुळे कडधान्यांच्या उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत १११ टक्के वाढ अपेक्षित आहे. प्रमुख रब्बी पिकांचे क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.५ प्रमुख रब्बी पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे. टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२-१३ | २०१३-१४ (तात्पुरते) | शेकडा बदल | २०१२-१३ | २०१३-१४ (तात्पुरते) | शेकडा बदल |
| ज्वारी | २,४०१ | २,२१८ | (-)८ | ९११ | १,९८१ | ११७ |
| गहू | ७८५ | ९९१ | २६ | १,१९९ | १,६३२ | ३६ |
| मका | १२१ | २१६ | ७९ | २२९ | ५१८ | १२६ |
| इतर तृणधान्ये | २० | ६ | (-)७० | ६ | ३ | (-)५० |
| **एकूण तृणधान्ये** | **३,३२७** | **३,४३१** | **३** | **२,३४५** | **४,१३४** | **७६** |
| हरभरा | १,१३५ | १,७३७ | ५३ | ८६८ | १,८७८ | ११६ |
| इतर कडधान्ये | ११८ | ११० | (-)७ | ४४ | ५० | १४ |
| **एकूण कडधान्ये** | **१,२५३** | **१,८४७** | **४७** | **९१२** | **१,९२८** | **१११** |
| **एकूण अन्नधान्ये** | **४,५८०** | **५,२७८** | **१५** | **३,२५७** | **६,०६२** | **८६** |
| तीळ | १ | २ | १०० | ०.२ | ०.५ | १५० |
| करडई | १०५ | १०६ | १ | ५८ | ७९ | ३६ |
| सूर्यफूल | ४२ | ३५ | (-)१७ | १९ | २६ | ३७ |
| जवस | २७ | ३१ | १५ | ८ | ८ | ० |
| सरसू व मोहरी | ९ | ८ | (-)११ | २ | ३ | ५० |
| **एकूण तेलबिया** | **१८४** | **१८२** | **(-)१** | **८७** | **११७** | **३४** |
| **एकूण** | **४,७६४** | **५,४६०** | **१५** | -- | -- | -- |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## उन्हाळी पिके

७.७ सन २०१३-१४ मधील उन्हाळी पिकांचे अंदाज सरासरीवर (पाच वर्षांची सरासरी) आधारित आहेत. प्रमुख उन्हाळी पिकांचे क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.६ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.६ प्रमुख उन्हाळी पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे. टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२-१३ (तात्पुरते) | २०१३-१४ (सरासरी) | शेकडा बदल | २०१२-१३ (तात्पुरते) | २०१३-१४ (सरासरी) | शेकडा बदल |
| तांदूळ | २९ | ३१ | ७ | ५५ | ७० | २७ |
| मका | १२ | १७ | ४२ | १३ | २५ | ९२ |
| **एकूण तृणधान्ये** | **४१** | **४८** | **१७** | **६८** | **९५** | **४०** |
| भुईमूग | ३३ | ८१ | १४५ | ५० | ११९ | १३८ |
| सूर्यफूल | १ | ९ | ८०० | १ | ८ | ७०० |
| **एकूण तेलबिया** | **३४** | **९०** | **१६५** | **५१** | **१२७** | **१४९** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## तृणधान्ये व कडधान्यांची गरज

७.८ राष्ट्रीय नमुना पाहणीच्या (रानपा) ६८ व्या फेरीनुसार (२०११-१२) तृणधान्ये व कडधान्यांचा अंदाजित दरडोई मासिक वापर अनुक्रमे ९.०८ किलो आणि ०.९७ किलो आहे. राज्यातील जनतेकरिता तृणधान्ये व कडधान्यांची अंदाजित वार्षिक गरज अनुक्रमे सुमारे

१३० लाख मे.टन व सुमारे १४ लाख मे.टन आहे. रानपा ६८ व्या फेरीतील (२०११-१२) राज्य नमुन्यातील आकडेवारीवर आधारित तृणधान्ये व कडधान्यांचा दरडोई मासिक वापर तक्ता ७.७ मध्ये दिला आहे.

## कृषि उत्पादनाचे निर्देशांक

७.९ कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन यांच्याद्वारे राज्याकरिता परिगणित करण्यात आलेले कृषि उत्पादनाचे निर्देशांक (पाया : १९७९-८२ त्रैवार्षिक) तक्ता ७.८ मध्ये व समय श्रृंखला परिशिष्ट ७.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.७ रानपा ६८ व्या फेरीतील (२०११-१२) राज्य नमुन्यातील आकडेवारीवर आधारित तृणधान्ये व कडधान्यांचा दरडोई वापर**

| पीक | दरडोई वापर @ | | वार्षिक गरज (लाख मे.टन ) |
|---|---|---|---|
| | मासिक (किलो) | वार्षिक (किलो) | |
| तांदूळ | २.९७ | ३६.१४ | ४२.३९ |
| गहू | ४.७६ | ५७.९१ | ६७.९४ |
| ज्वारी | ०.९२ | ११.१९ | १३.१३ |
| बाजरी | ०.३८ | ४.६२ | ५.४२ |
| इतर तृणधान्ये | ०.०५ | ०.६१ | ०.७१ |
| **एकूण तृणधान्ये** | **९.०८** | **११०.४७** | **१२९.५९** |
| **एकूण कडधान्ये** | **०.९७** | **११.८१** | **१३.८४** |

@अंदाजित

**तक्ता ७.८ कृषि उत्पादनाचे निर्देशांक**

| पीक | भार | २०११-१२ | २०१२-१३ | शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| तृणधान्ये | ४२.२२ | ११०.१ | ९४.३ | (-) १४.३ |
| कडधान्ये | १०.४४ | २३४.७ | २४५.६ | ४.६ |
| **एकूण अन्नधान्ये** | **५२.६६** | **१३४.८** | **१२४.३** | **(-) ७.८** |
| तेलबिया | ९.१६ | ५९.३ | ३७.३ | (-) ३७.१ |
| तंतू पिके | ९.९३ | ४६५.७ | ४६४.० | (-) ०.४ |
| संकीर्ण | २८.२५ | ३१०.१ | २६८.९ | (-) १३.३ |
| **एकूण अन्नधान्येतर** | **४७.३४** | **२९४.२** | **२६५.०** | **(-) ९.९** |
| **सर्व** | **१००.००** | **२१०.३** | **१९०.९** | **(-) ९.२** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## जमिनीचा वापर

७.१० जमीन वापराबाबतच्या २०११-१२ च्या आकडेवारीनुसार राज्याच्या एकूण ३०७.५८ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी, पिकांखालील स्थूल क्षेत्र २३१.०६ लाख हेक्टर तर निव्वळ पेरणी क्षेत्र १७३.८६ लाख हेक्टर होते. वनांखालील क्षेत्र ५२.११ लाख हेक्टर, मशागतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र ३१.७९ लाख हेक्टर, मशागत न केलेले इतर क्षेत्र २४.१३ लाख हेक्टर आणि पडीत जमिनीखालील क्षेत्र २५.७० लाख हेक्टर होते. सन २००७-०८ ते सन २०११-१२ या पाच वर्षांच्या कालावधीत बिगर कृषि वापरासाठीच्या जमिनीचे प्रमाण १.६ टक्क्यांनी वाढले आहे. जमीन वापराची समय श्रृंखला परिशिष्ट ७.३ मध्ये दिली आहे.

## वहिती खातेदार

७.११ कृषि गणना २०१०-११ नुसार, राज्यात एकूण १.३७ कोटी वहिती खातेदार होते, त्यापैकी ७८.६ टक्के वहिती खातेदार दोन हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जमीन धारणा असलेले सीमांतिक शेतकरी होते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या वहिती खातेदारांचे प्रमाण अनुक्रमे ७.५ टक्के व ६.३ टक्के होते आणि त्यांनी धारण केलेले क्षेत्र अनुक्रमे ६.६ टक्के व ७.९ टक्के होते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींकरिता सरासरी जमीन धारणा आकार अनुक्रमे १.२७ हेक्टर व १.८० हेक्टर होता. कृषि गणना २०१०-११ नुसार राज्यातील वहिती खातेदार व क्षेत्र तक्ता ७.९ मध्ये आणि समय श्रृंखला परिशिष्ट ७.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.९ कृषि गणना २०१०-११ नुसार राज्यातील वहिती खातेदार व क्षेत्र**

| आकार वर्ग (हेक्टर) | वहिती खातेदारांची संख्या ('०००) | वहितीचे क्षेत्र ('००० हेक्टर) | वहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) | |
|---|---|---|---|---|
| | | | २००५-०६ | २०१०-११ |
| १.० पर्यंत | ६,७०९ | ३,१८६ | ०.४६ | ०.४७ |
| १.० - २.० | ४,०५२ | ५,७३९ | १.२६ | १.४२ |
| २.० - ५.० | २,४७३ | ७,१५५ | २.७३ | २.८९ |
| ५.० - १०.० | ३९६ | २,६०३ | ६.१६ | ६.५७ |
| १०.० - २०.० | ५९ | ७५२ | १०.८९ | १२.७५ |
| २०.० व अधिक | ९ | ३३२ | ३२.५२ | ३६.८९ |
| **एकूण** | **१३,६९८** | **१९,७६७** | **१.४६** | **१.४४** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

# सिंचन

७.१२ राज्यातील सिंचनाखालील क्षेत्राची समय शृंखला परिशिष्ट ७.५ मध्ये दिली आहे.

## सिंचन प्रकल्प

७.१३ राज्यात जास्तीत जास्त सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने विविध मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प हाती घेतले आहेत. जून, २०१२ अखेर एकूण ४९.२६ लाख हेक्टर निर्मित सिंचन क्षमतेपैकी २७.१९ लाख हेक्टर मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांद्वारे, ८.६७ लाख हेक्टर मध्यम पाटबंधारे प्रकल्पांद्वारे आणि उर्वरित १३.४० लाख हेक्टर लघुपाटबंधारे (राज्यस्तर) प्रकल्पांद्वारे निर्माण झाली होती. सन २०१२-१३ मध्ये पुरेशा पावसाअभावी राज्यास तीव्र दुष्काळी परिस्थितीस सामोरे जावे लागले. अत्यंत कमी प्रमाणात शिल्लक असलेला उपयुक्त पाणीसाठा, पिण्यासाठी राखून ठेवावा लागल्यामुळे मागील वर्षाच्या तुलनेत २०१२-१३ मध्ये एकूण सिंचन क्षमतेचा वापर कमी दिसून येतो. महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील लाभक्षेत्रातील २०११-१२ मधील ३२.५२ लाख हेक्टर सिंचित क्षेत्रात घट होऊन ते २०१२-१३ मध्ये २४.४८ लाख हेक्टर झाले. पाटबंधारे प्रकल्पांची संख्या आणि निर्मित सिंचन क्षमता तक्ता ७.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.१० पाटबंधारे प्रकल्पांची संख्या आणि निर्मित सिंचन क्षमता**

| बाब | जलसंपदा विभागाचे प्रकल्प | | | | लघु प्रकल्प (स्थानिक स्तर) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मोठे | मध्यम | लघु (राज्य स्तर)[#] | एकूण | कोल्हापूर बंधारे | पाझर तलाव | उपसा जलसिंचन | लघु पाट बंधारे | इतर | एकुण लघु (स्थानिक) |
| **(अ) ३० जून, २०१३ रोजी प्रकल्पांची संख्या** | | | | | | | | | | |
| (i) पूर्ण | १०५[$] | २९८[$] | ३,४८४[$] | ३,८८७[$] | १०,२४७ | २१,०२९ | २,६२२ | ३,१६९ | २९,६९६ | ६६,७६३ |
| (ii) प्रगतीपथावरील | | | | | १,५३२ | १,२७९ | ९४ | ५५७ | ३,५०७ | ६,९६९ |
| **(ब) सिंचन क्षमता (लाख हेक्टर)** | | | | | | | | | | |
| (i) जून, २०१२ पर्यंत निर्मित | २७.१९ | ८.६७ | १३.४० | ४९.२६ | ३.०३[+] | ६.३०[+] | ०.३६[+] | २.३१[+] | ३.५३[+] | १५.५३[+] |
| (ii) २०१२-१३ मधील प्रत्यक्ष वापर | ९.५२[++] | २.२५[++] | ४.१४[++] | १५.९१[++] | १.०२ | -- | ०.१२ | ०.९८ | -- | २.१२ |
| (iii) लाभ क्षेत्रातील विहिरींद्वारे २०१२-१३ मधील अतिरिक्त सिंचन क्षेत्र | ६.४६ | १.१८ | ०.९३ | ८.५७ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| एकूण वापरलेली सिंचन क्षमता | १५.९८ | ३.४३ | ५.०७ | २४.४८ | १.०२ | -- | ०.१२ | ०.९८ | -- | २.१२ |

आधार : १) जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन २) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक), महाराष्ट्र शासन

$ पूर्ण व प्रगतीपथावरील घटकांची अस्थायी संख्या # उपसा योजना समाविष्ट

++ प्रकल्प कालव्यांवरील उपसा व धरणातून नदी नाल्यांमध्ये सोडलेल्या पाण्यामुळे प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र समाविष्ट + जून, २०१३ पर्यंत

## पाटबंधारे क्षेत्रातील सुधारणा

७.१४ जलनीतीची घोषणा, जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाची स्थापना आणि शेतकरी व पाणी वापर संस्थांकडून सिंचन प्रणालीचे व्यवस्थापन या सिंचन क्षेत्रात सुरु केलेल्या काही सुधारणा आहेत. एकूण १७.२४ लाख हेक्टर लाभ क्षेत्रासाठी ४,३५३ पाणी वापर संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी यांची समय शृंखला परिशिष्ट ७.६ मध्ये दिली आहे.

## जलाशयांतील साठ्यांची स्थिती

७.१५ मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्य क्षेत्र) जलाशयांमध्ये मिळून एकत्रितपणे १५ ऑक्टोबर, २०१२ रोजीचा एकूण उपयुक्त जलसाठा २०,४०६ दशलक्ष घनमीटर (दलघमी) होता व तो प्रकल्प आराखड्यानुसार जलसाठा क्षमतेच्या जवळपास ५७ टक्के होता. जलाशयातील उपयुक्त साठा आणि पाण्याचा वापर तक्ता ७.११ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.११ जलाशयांतील उपयुक्त साठा आणि पाण्याचा वापर**

(दलघमी)

| वर्ष | प्रकल्प आराखड्या नुसार जलसाठा क्षमता | १५ ऑक्टोबर रोजीचा उपयुक्त जलसाठा | उपयुक्त जलसाठ्याची टक्केवारी | बाष्पी भवन व्यय | सिंचनासाठी वापरलेले पाणी | बिगर सिंचनासाठी /इतर कारणांसाठी पाणी वापर | एकूण पाणी वापर | पाणी वापराची १५ ऑक्टोबर रोजीच्या उपयुक्त जलसाठ्याशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००८-०९ | ३३,०७१ | २४,८०३ | ७५ | ४,०७४ | १५,५१७ | ५,७७५ | २५,३६६ | १०२ |
| २००९-१० | ३३,२११ | १९,३६६ | ५८ | ३,९७२ | १२,११३ | ४,७६३ | २०,८४८ | १०८ |
| २०१०-११ | ३३,३८५ | २७,३०९ | ८२ | ५,३८३ | १५,४४७ | ५,८७६ | २६,७०६ | ९८ |
| २०११-१२ | ३४,११९ | २६,९८९ | ७९ | ५,२९८ | १८,६१७ | ६,६९३* | ३०,६०८ | ११३ |
| २०१२-१३ | ३५,८३८ | २०,४०६ | ५७ | ४,५४१ | १२,५०० | ७,४८८* | २४,५२९ | १२० |

*आधार* : जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन   * अस्थायी

## तुषार व ठिबक सिंचन

७.१६ राज्य शासन तुषार व ठिबक सिंचन संच खरेदी करण्यासाठी अल्पभूधारक व सीमांतिक शेतकऱ्यांना ६० टक्के व इतर शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान देते. वर्षनिहाय तुषार व ठिबक सिंचन संचांचे वितरण आणि झालेला खर्च तक्ता ७.१२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१२ वर्षनिहाय तुषार व ठिबक सिंचन संचांचे वितरण आणि झालेला खर्च**

(₹ कोटी)

| वर्ष | तुषार | | ठिबक | | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | संचांची संख्या | क्षेत्र (हेक्टर) | संचांची संख्या | क्षेत्र (हेक्टर) | |
| २००८-०९ | ३४,७०१ | ४१,८५१ | ५८,०१४ | ७४,७८२ | १९७.५५ |
| २००९-१० | ३६,३२९ | ३७,५५२ | ९१,०५८ | ८१,६६० | १९२.११ |
| २०१०-११ | ३८,०३० | ३८,०२९ | १,४०,७६४ | १,२७,९६७ | ४०७.८८ |
| २०११-१२ | ३८,९५९ | ३७,९०४ | १,७७,१५० | १,५०,९९५ | ४४८.०४ |
| २०१२-१३ | ७९,६३० | ७९,६३० | १,७८,३१० | १,६२,१०० | ५७४.८५ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## कृषि पंपांना अनुदान

७.१७ राज्यात सुमारे ३९ लाख कृषि पंप आहेत. कृषि पंपांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यात येतो, त्यासाठी २०१३-१४ मध्ये ₹ ३,२१७.०९ कोटी तरतूद करण्यात आली आहे.

## कृषि पंपांचे विद्युतीकरण

७.१८ सन २०१२-१३ मध्ये महावितरण कंपनीने १,५८,९३७ कृषि पंपांना वीज जोडणी उपलब्ध करुन दिली. सन २०१३-१४ मध्ये डिसेंबर पर्यंत कृषि पंपांच्या विद्युतीकरणाच्या १,७०,१८६ उद्दिष्टापैकी ७०,०५१ कृषि पंपांचे विद्युतीकरण करण्यात आले. अनुशेष-अधिसूचित जिल्ह्यांमधील कृषि पंपांच्या विद्युतीकरणाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासनाकडून २०१३-१४ करिता ₹ १९३.४७ कोटी अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

## सुधारित बियाण्यांचा वापर

७.१९ महाबीज व राष्ट्रीय बीज निगम या दर्जेदार बियाण्यांचे उत्पादन व वितरण करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख संस्था आहेत. याशिवाय, विविध पिकांच्या बियाण्यांची किरकोळ विक्री खाजगी बियाणे उत्पादकांकडून केली जाते. केंद्र शासनाने स्वपरागसिंचित (तांदुळ, गहू, तूर, मूग, उडीद, इ.) पिकांच्या बाबतीत ३५ टक्के, परपरागसिंचित (मका, ज्वारी, बाजरी, सूर्यफूल, इ.) पिकांसाठी ५० टक्के व संकरित पिकांसाठी (संकरित ज्वारी, बाजरी, कापूस, तांदूळ, इ.) १०० टक्के याप्रमाणे बियाणे बदलाचे लक्ष्य निर्धारित केले आहे. राज्याने भुईमूग, रब्बी ज्वारी, हरभरा, तूर व मूग ही पिके वगळता बहुतेक सर्व पिकांकरिता बियाणे बदलाचे लक्ष्य साध्य केले आहे. सुधारित बियाण्यांचे वितरण तक्ता ७.१३ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१३ सुधारित बियाण्यांचे वितरण**

('००० क्विंटल)

| क्षेत्र | पीक | वर्ष | | | | | २०१२ च्या तुलनेत २०१३ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३* | |
| सार्वजनिक | खरीप | ७२७ | ८४५ | ८५९ | ७४७ | ७७८ | ४ |
| | रब्बी | ३९३ | ४१४ | २४२ | ३४१ | ३७० | ९ |
| | **एकूण** | **१,१२०** | **१,२५९** | **१,१०१** | **१,०८८** | **१,१४८** | ६ |
| खाजगी | खरीप | १,१८६ | ९७७ | १,०६१ | १,१२८ | १,२८३ | १४ |
| | रब्बी | ३१८ | ३३२ | ३१० | २८९ | ४०१ | ३९ |
| | **एकूण** | **१,५०४** | **१,३०९** | **१,३७१** | **१,४१७** | **१,६८४** | **१९** |
| **एकूण** | खरीप | १,९१३ | १,८२२ | १,९२० | १,८७५ | २,०६१ | १० |
| | रब्बी | ७११ | ७४६ | ५५२ | ६३० | ७७१ | २२ |
| | **एकूण** | **२,६२४** | **२,५६८** | **२,४७२** | **२,५०५** | **२,८३२** | **१३** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन     * रब्बी हंगामासाठी अस्थायी

## रासायनिक खतांचा वापर

७.२० सन २०१३-१४ करिता राज्यातील रासायनिक खतांचा एकूण वापर ६४.७ लाख मे. टन अपेक्षित असून प्रति हेक्टर वापर १२८.४ किलो अपेक्षित आहे. सन २०१२-१३ मध्ये रासायनिक खतांचा एकूण वापर ५४.७ लाख मे. टन होता व प्रति हेक्टर वापर ११६.१ किलो होता. सन २०१२-१३ मध्ये एकूण ६५,७२३ खत वितरण केंद्रांमार्फत खतांचे वितरण करण्यात आले, त्यापैकी ७,५३८ (११.५ टक्के) सहकारी क्षेत्रात, ४०७ (०.६ टक्के) सार्वजनिक क्षेत्रात व ५७,७७८ (८७.९ टक्के) केंद्रे खाजगी क्षेत्रात होती. रासायनिक खतांचा वर्षनिहाय वापर तक्ता ७.१४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१४ रासायनिक खतांचा वर्षनिहाय वापर**

| वर्ष | एकूण वापर (लाख मे. टन) | प्रति हेक्टरी वापर (किलो) |
|---|---|---|
| २००९-१० | ६०.९ | १५३.४ |
| २०१०-११ | ७०.३ | १६३.८ |
| २०११-१२ | ६५.८ | १५५.२ |
| २०१२-१३ | ५४.७ | ११६.१ |
| २०१३-१४$ | ६४.७ | १२८.४ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन   $ अपेक्षित वापर

## रासायनिक व जैविक किटकनाशकांचा वापर

७.२१ रासायनिक व जैविक किटकनाशकांचा वापर तक्ता ७.१५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१५ रासायनिक व जैविक किटकनाशकांचा वापर**

(मे.टन)

| वर्ष | किटक नाशके | |
|---|---|---|
| | रासायनिक | जैविक |
| २००९-१० | ७,१८९ | १,७८८ |
| २०१०-११ | ८,३१७ | २,२०० |
| २०११-१२ | ८,९२६ | १,०४६ |
| २०१२-१३ | १०,५६३ | २,६५० |
| २०१३-१४$ | १०,९६९ | १,४३३ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन   $ अंदाजित

## फ्लॅगशिप कार्यक्रम

७.२२ केंद्र शासनाने कृषि क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजना, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम, इ. फ्लॅगशिप कार्यक्रम सुरु केले आहेत. शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करणे व अधिक चांगल्या कृषि निविष्ठांचा पुरवठा करुन तसेच प्रगतीपथावरील सिंचन प्रकल्प जलद गतीने पूर्ण करुन अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ करणे ही या कार्यक्रमांची मुख्य उद्दिष्टे आहेत.

## राष्ट्रीय कृषि विकास योजना

७.२३ जमीन सुधारणांसह राज्यांच्या विशिष्ट गरजांवर आधारित व्यूहरचनेवर लक्ष देणारी राष्ट्रीय कृषि विकास योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजनेची वित्तीय कामगिरी तक्ता ७.१६ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१६ राष्ट्रीय कृषि विकास योजनेची वित्तीय कामगिरी**

(₹ कोटी)

| वर्ष | राज्यस्तरीय निवड समितीने मंजूर केलेल्या प्रकल्पांची किंमत | केंद्र सरकारने दिलेल्या प्रशासकीय मान्यता | केंद्रशासनाकडून प्राप्त अनुदान | खर्च |
|---|---|---|---|---|
| २००९-१० | ५२२.७९ | ४०७.२४ | ४०४.३९ | ४०४.३९ |
| २०१०-११ | १,१९१.७८ | ६५३.०० | ६५३.०० | ६५३.०० |
| २०११-१२ | १,३३०.०५ | ७२७.६७ | ७२७.६७ | ७२७.६७ |
| २०१२-१३ | ७४२.८९ | १,०५८.५८ | १,०५८.५८ | १,०१३.३२ |
| २०१३-१४+ | ९४८.२२ | १,१५४.५४ | ५७७.४७ | ३५४.७३ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + जानेवारीपर्यंत

## राष्ट्रीय फलोत्पादन अभियान

७.२४ राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय फलोत्पादन अभियान राबविण्यात येत आहे. ही ८५ : १५ या प्रमाण तत्वावर आधारित केंद्र पुरस्कृत योजना आहे. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान आणि राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या योजना राबविण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळास राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत सुरुवातीपासून डिसेंबर, २०१३ पर्यंत ₹ १,२१८.७३ कोटी व राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या योजनांसाठी ₹ १८.९९ कोटी अनुदान प्राप्त झाले आहे आणि राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत व राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या योजनांवर अनुक्रमे ₹ १,१८३.४४ कोटी व ₹ ८.७६ कोटी खर्च झाले आहेत.

७.२५ राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत सुरुवातीपासून ते डिसेंबर, २०१३ पर्यंतची साध्ये खाली दिली आहेत.

- ८५ रोपवाटिकांची स्थापना
- ५.१४ लाख हेक्टर क्षेत्रावर फळबागा, फुले, मसाले, इ. ची लागवड
- सुमारे १,०२,७०० हेक्टर क्षेत्रावरील जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन
- ८,८३४ सामुहिक शेततळ्यांची बांधकामे पूर्ण तर ५,५७३ सामुहिक शेततळ्यांची कामे प्रगतीपथावर
- ०.१५ लाख हेक्टर क्षेत्रावर सेंद्रिय शेती
- २,५३२ बंदिस्त गृहे व कापणीपश्चात व्यवस्थापनासाठी पायाभूत सुविधा, इ.
- ५९८.५ हेक्टर क्षेत्रावर औषधी वनस्पतींची लागवड पूर्ण व लाभार्थ्यांची संख्या १,७४७

७.२६ राज्यात २०१२-१३ मध्ये अंदाजित १८.१४ लाख हेक्टर क्षेत्र विविध फळपिकांखाली होते. त्यापैकी आंबा फळाखालील ५.४२ लाख हेक्टर, संत्री फळाखालील १.६८ लाख हेक्टर, मोसंबी फळाखालील १.४५ लाख हेक्टर, डाळिंब फळाखालील १.७१ लाख हेक्टर, केळी फळाखालील ०.८३ लाख हेक्टर, चिकू फळाखालील ०.८५ लाख हेक्टर आणि द्राक्षे फळाखालील ०.९० लाख हेक्टर क्षेत्र होते.

७.२७ राज्य शासनाने फलोत्पादन विकासाला चालना देण्यासाठी फळ रोपवाटिकांची स्थापना करणे आणि सीमांतिक व अल्पभूधारक तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे शेतकरी यांना निवडक फळझाडे वाढविण्यासाठी भांडवली सहाय्य देणे हा कार्यक्रम हाती घेतला आहे. हा कार्यक्रम १९९०-९१ पासून रोजगार हमी योजनेशी निगडीत करण्यात आला आहे. परिणामी १९९०-९१ मध्ये फळपिकांखाली असलेल्या २.४२ लाख हेक्टर क्षेत्रात वाढ होऊन ते मार्च, २०१३ पर्यंत १८.४२ लाख हेक्टर झाले आहे. सन २०१३-१४ मध्ये दुष्काळग्रस्त १४ जिल्ह्यांतील १५,००० हेक्टर क्षेत्रावर सुकलेल्या बागांच्या पुनरुज्जीवनाचे उद्दिष्ट ठेवले आहे. सन २०१३-१४ मध्ये डिसेंबरपर्यंत या योजने अंतर्गत ₹ ९८.३० कोटी खर्च झाला आहे.

## वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम

७.२८ वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत २००५-०६ पर्यंत केंद्र शासनाकडून कर्ज देण्यात येत होते. सन २००६-०७ पासून केंद्र शासनाकडून राज्यातील सिंचन प्रकल्पांसाठी अनुदान स्वरुपात अर्थसहाय्य दिले जात आहे. वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत सिंचन प्रकल्प व प्राप्त अनुदान तक्ता ७.१७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१७ वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत सिंचन प्रकल्प व प्राप्त अनुदान**

(₹ कोटी)

| वर्ष | मोठे आणि मध्यम (संख्या) | लघु (संख्या) | प्राप्त अनुदान |
|---|---|---|---|
| २००८-०९ | ३७ | १२१ | २,२५७.८३ |
| २००९-१० | २३ | ० | १,३९५.४० |
| २०१०-११ | १६ | ४६ | २,०६९.०६ |
| २०११-१२ | २३ | १५ | १,१९९.८९ |
| २०१२-१३ | १५ | ३३ | १,०१९.०२ |

*आधार :* जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान

७.२९ राष्ट्रीय विकास परिषदेने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - कडधान्य या अंतर्गत २०१३-१४ मधील रब्बी हंगामामध्ये कडधान्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी अतिरिक्त क्षेत्र व्याप्ती कार्यक्रम सुरु केला. या कार्यक्रमांतर्गत राज्यासाठी ₹ ४४.०९ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून राज्यातील ३३ जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. सन २०१३-१४ मध्ये ₹ ३८.४२ कोटी खर्च झाला आहे.

## मृद व जलसंधारण

७.३० प्रगतीपथावरील व पूर्ण झालेली पाणलोटांची कामे तक्ता ७.१८ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.१८ प्रगतीपथावरील व पूर्ण झालेली पाणलोटांची कामे**

(₹ कोटी)

| योजना | पाणलोट कामांची संख्या | | | निवडलेल्या पाणलोट कामांवरील खर्च | |
|---|---|---|---|---|---|
| | निवडलेले | प्रगतीपथावरील | पूर्ण | अपेक्षित | झालेला + |
| राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम (सूक्ष्म पाणलोट) | ३२४ | ३२४ | ९८ | २१०.०० | ११०.०२ |
| नदी खोरे विकास कार्यक्रम (सूक्ष्म पाणलोट) | २७१ | २७१ | २२६ | ३५४.८६ | २९४.२९ |
| पश्चिम घाट विकास कार्यक्रम (अतिविशाल पाणलोट) | १६ | १६ | ० | ७४१.१० | १०२.०२ |
| एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम (सूक्ष्म पाणलोट) | ५,८५० | ३,४०० | २,९१६ | १,६८९.५० | १,२५६.०४ |
| नाबार्ड सहाय्यित पाणलोट (अतिविशाल पाणलोट) | ६८ | ११ | ० | १,३५९.३० | ७०.९८ |
| एकूण | **६,५२९** | **४,०२२** | **३,२४०** | **४,३५४.७६** | **१,८३३.३५** |

*आधार :* कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबर, २०१३ पर्यंत

७.३१ सन २००९-१० पासून एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम हा ९०:१० प्रमाणतत्वावर आधारित केंद्र पुरस्कृत कार्यक्रम राबविला जात आहे. केंद्र शासनाने राज्यातील ४५.२१ लाख हेक्टर क्षेत्रावर पाणलोट विकासाच्या कामांकरिता ₹ ५,७४० कोटी रकमेच्या १,०४९ प्रकल्पांना मंजूरी दिली असून प्रत्येक प्रकल्पाचा कालावधी पाच वर्षांचा आहे. केंद्र व राज्य शासनाने एकत्रितरित्या या योजनेकरिता डिसेंबर, २०१३ अखेर ₹ १,४६५.०२ कोटी निधी उपलब्ध करून दिला असून ₹ ९८०.१५ कोटी खर्च झाला आहे.

## सेंद्रिय शेती

७.३२ पर्यावरणाचा समतोल राखण्यास उपयुक्त ठरणाऱ्या पद्धतींपैकी एक पद्धत सेंद्रिय शेती ही आहे. 'गांडूळ खत उत्पादन' या केंद्र पुरस्कृत योजनेची पुनर्रचना 'गांडूळ खत उत्पादन व वापर' आणि 'सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देणे' या दोन उप योजनांत करण्यात आली आहे. यात खतांचा एकात्मिक वापर, सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन व प्रमाणीकरण, मृद परिक्षण व मृद आरोग्य पत्रिका वितरण योजना आणि हरित खतांचा वापर हे घटक कालांतराने समाविष्ट करण्यात आले आहेत. डिसेंबर, २०१२ पर्यंत, पारंपारिक शेतीच्या या योजनेद्वारे ७.५१ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणण्यात आले आहे. त्यापैकी प्रमाणीकरणांतर्गत १.५ लाख हेक्टर क्षेत्र आहे. सन २०१२-१३ पर्यंत या योजने अंतर्गत झालेला संचित खर्च ₹ ६६ कोटी होता. सन २०१३-१४ मध्ये या योजनेसाठी ₹ ६.५० कोटी अनुदान मंजूर करण्यात आले असून डिसेंबरपर्यंत ₹ १.७७ कोटी खर्च झाला आहे.

## कृषि वित्तपुरवठा

७.३३ शेतकऱ्यांना शासनाकडून विविध बँका तसेच सहकारी संस्थांमार्फत अल्पमुदतीची कर्ज, पतपुरवठा, इत्यादींच्या माध्यमातून वित्तिय सहाय्य केले जाते. देशातील राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) ही संस्था कृषि व ग्रामीण विकासासाठी कार्य करणारी शिखर बँक आहे. वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (मरासबँ), जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (जिमसबँ) आणि भूविकास बँका यांच्यामार्फत कर्ज वितरित केले जाते. वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व मरासबँ/ जिमसबँ/भूविकास बँकांनी दिलेले कर्ज तक्ता ७.१९ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१९ वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व मरासबँ/जिमसबँ/भूविकास बँकांनी दिलेली कर्ज**

(₹ कोटी)

| कार्य | वाणिज्यिक बँका$ | | प्रादेशिक ग्रामीण बँका | | मरासबँ/ जिमसबँ/ भूविकास बँक | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०११-१२ | २०१२-१३ | २०११-१२ | २०१२-१३ | २०११-१२ | २०१२-१३ | २०११-१२ | २०१२-१३ |
| पीक कर्ज | ८,८७१ | ११,७७६ | ७८८ | १,४०१ | ९,५१९ | ११,०७६ | १९,१७८ | २४,२५३ |
| कृषि मुदत कर्ज | ४,३५८ | ५,४४४ | १५० | ८७ | ७४० | ८८३ | ५,२४८ | ६,४१४ |
| **एकूण** | **१३,२२९** | **१७,२२०** | **९३८** | **१,४८८** | **१०,२५९** | **११,९५९** | **२४,४२६** | **३०,६६७** |

*आधार* : राष्ट्रीय कृषि व ग्रामविकास बँक $ राष्ट्रीयकृत बँका धरुन

७.३४ राज्यात सर्वात निम्न स्तरावर कृषि वित्तपुरवठा करण्याशी थेट संबंधित अशा वित्तिय संस्था म्हणजे शेतकरी सभासदांना अल्प मुदतीची पिक कर्जे देणाऱ्या प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था आहेत. प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांकडून शेतकऱ्यांना करण्यात आलेले कर्जवाटप तक्ता ७.२० मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.२० प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांकडून शेतकऱ्यांना करण्यात आलेले कर्जवाटप**

(₹ कोटी)

| बाब | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३* |
|---|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | २१,२८५ | २१,३९२ | २१,४५१ | २१,४४३ | २१,२३८ |
| सदस्य (लाख) | १४८ | १५० | १५० | १६१ | १६८ |
| एकूण कर्ज | ५,२८६ | ६,९९१ | ८,०६० | ८,५८७ | ८,३२४ |
| पैकी लहान व सीमांतिक शेतकऱ्यांना | २,७२१ | ३,२८४ | ३,६४० | ४,१६३ | ४,७६१ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## किसान क्रेडिट कार्ड योजना

७.३५ राज्यात मार्च, २०१३ अखेर ८४.६६ लाख किसान क्रेडिट कार्ड वाटप करण्यात आली. त्यापैकी ६१.९० लाख सहकारी बँकांमार्फत, ३.७० लाख प्रादेशिक ग्रामीण बँकांमार्फत व १९.०६ लाख वाणिज्यिक बँकांमार्फत वाटप करण्यात आली आणि त्यांचेकडून अनुक्रमे ₹ ९,४७८ कोटी, ₹ ९१३ कोटी व ₹ १७,१३५ कोटी रकमेचे कर्ज मंजूर करण्यात आले. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने शेतकऱ्यांना दिलेली किसान क्रेडिट कार्ड संलग्नित कृषि कर्ज तक्ता ७.२१ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.२१ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने शेतकऱ्यांना दिलेली किसान क्रेडीट कार्ड संलग्नित कृषि कर्ज**

(₹ कोटी)

| वर्ष | लघु मुदतीचे कर्ज | | दीर्घ मुदतीचे कर्ज | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या ('०००) | रक्कम | लाभार्थ्यांची संख्या ('०००) | रक्कम |
| २००९-१० | ३,४७० | ६,३५३ | २०.३ | ५०९ |
| २०१०-११ | ३,४९९ | ७,११० | २६.८ | ५४६ |
| २०११-१२ | ३,६४९ | ९,०६९ | १४.७ | २५८ |
| २०१२-१३ | ३,०८७ | ९,०२२ | ७.२ | ११४ |
| २०१३-१४ | ३,३२२ | १३,०१२ | ५.२ | ६८ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या.

## कृषि पणन

७.३६ महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांच्याकडे मुख्यत्वे राज्यातील बाजार समित्यांच्या कामांमध्ये आवश्यक समन्वय साधणे, कृषि उत्पन्न बाजार समितीचा विकास व प्रसार, कृषि निर्यात क्षेत्राची स्थापना, फलोत्पादन प्रशिक्षण केंद्र आणि प्रतवारी व संवेष्टन सुविधांची स्थापना करणे इत्यादी कार्ये सोपविली आहेत. राज्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये झालेली आवक व त्यांचे मूल्य तक्ता ७.२२ मध्ये दिलेआहे.

७.३७ महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात २००५ मध्ये सुधारणा करण्यात आली असून त्यामध्ये थेट पणन, खाजगी बाजार, शेतकरी ग्राहक बाजार, एकल परवाने व कंत्राटी शेतीचा अंतर्भाव करण्यात आला आहे. कायद्यातील या बदलानंतर जानेवारी, २०१४ पर्यंत १६५ थेट पणन परवाने दिले असून त्यापैकी ६१ कार्यरत आहेत. या व्यतिरिक्त, ३३ खाजगी बाजारांना परवाने देण्यात आले असून त्यापैकी २७ बाजार कार्यरत आहेत, तर नॅशनल स्पॉट एक्सचेन्ज आणि नॅशनल कमोडिटी अँन्ड डेरिव्हिटिव्हज एक्सचेन्ज या दोघांचे कामकाज इंटरनेटच्या माध्यमातून सुरु आहे.

७.३८ आशिया विकास बँकेच्या सहाय्याने राज्यात कृषि उद्योग पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम सुरु केला आहे. कृषिबाजार समित्यांची / सहकारी संस्थांच्या मालकीची जमीन खाजगी गुंतवणूकदारांना २५ वर्षांच्या बांधा, वापरा व हस्तांतरित करा या करारावर कृषि उत्पादनांच्या एकात्मिक मूल्य श्रृंखला विकसित करण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर दिली जाते. खाजगी गुंतवणूकदाराने किमान ६० टक्के गुंतवणूक करणे अपेक्षित असून शासनाद्वारे जास्तीत जास्त ४० टक्के रक्कम 'व्हाएबिलिटी गॅप फंडिग' (व्हीजीएफ) म्हणून दिली जाते. ₹ ४०० कोटी व्हीजीएफद्वारे या प्रकल्पातून ₹ ६०० कोटी खाजगी गुंतवणूक होणे अपेक्षित आहे.

**तक्ता ७.२२ सर्व बाजार समित्यांमध्ये झालेली आवक व त्याचे मूल्य**

| वर्ष | आवक (लाख मे. टन) | मूल्य (₹ कोटी) |
|---|---|---|
| २००८-०९ | २१०.९७ | ३२,५१५.५२ |
| २००९-१० | २२५.८७ | ३७,०७९.९५ |
| २०१०-११ | २५७.९८ | ४०,५९६.८६ |
| २०११-१२ | २४०.६९ | ३३,८६८.४२ |
| २०१२-१३ | ३२६.२७ | ३७,६४६.५६ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

**तक्ता ७.२३ प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किंमती**

| पीक | किमान आधारभूत किंमती (₹ / क्विंटल) | |
|---|---|---|
| | २०१२-१३ | २०१३-१४ |
| तांदुळ / धान(साधारण वाजवी प्रत) | १,२५० | १,३१० |
| तांदुळ / धान (प्रत-अ) | १,२८० | १,३४५ |
| ज्वारी (संकरित) | १,५०० | १,५०० |
| ज्वारी (मालदांडी) | १,५२० | १,५२० |
| गहू | १,२८५ | १,३५० |
| मका | १,१७५ | १,३१० |
| बाजरी | १,१७५ | १,३१० |
| हरभरा | २,८०० | ३,००० |
| तूर | ३,८५० | ४,३०० |
| मूग | ४,४०० | ४,५०० |
| उडीद | ४,३०० | ४,३०० |
| सूर्यफूल | ३,७०० | ३,७०० |
| सोयाबीन (पिवळा) | २,२४० | २,५६० |
| सोयाबीन (काळा) | २,२०० | २,५०० |
| भूईमुगाच्या शेंगा | ३,७०० | ४,००० |
| कापूस | ३,९०० | ४,००० |
| करडई | २,५०० | २,८०० |
| मसूर | २,८०० | २,९०० |
| नाचणी | १,५०० | १,५०० |
| तीळ | ४,२०० | ४,५०० |
| कारळे | ३,५०० | ३,५०० |
| मोहरी | २,५०० | ३,००० |

*आधार* : १. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ,
२. महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघ

## किमान आधारभूत किंमत योजना

७.३९ नैसर्गिक आपत्ती व व्यापारी देऊ करत असलेल्या कमी किंमतींपासून शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्यासाठी तसेच कृषि कार्ये आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी केंद्र शासन काही निवडक पिकांसाठी किमान आधारभूत किंमती जाहीर करते. या योजनेअंतर्गत शेतमालाची खरेदी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, राष्ट्रीय कृषि सहकारी पणन महासंघ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघ यांच्यामार्फत केली जाते. प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किंमती तक्ता ७.२३ मध्ये दिल्या आहेत.

## राष्ट्रीय कृषि विमा योजना

७.४० राष्ट्रीय कृषि विमा योजनेमध्ये १६ खरीप आणि आठ रब्बी पिकांचा समावेश आहे. वर्षनिहाय राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत समाविष्ट शेतकरी तक्ता ७.२४ मध्ये देण्यात आले आहेत.

**तक्ता ७.२४ वर्षनिहाय राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत समाविष्ट शेतकरी**

(₹ कोटी)

| वर्ष | समाविष्ट शेतकरी | | | नुकसान भरपाई | |
|---|---|---|---|---|---|
| | शेतकरी संख्या (लाख) | विमा रक्कम | विमा हप्ता | शेतकरी संख्या (लाख) | रक्कम |
| २००८-०९ | ३५.०२ | १,६६५.४५ | ७४.८१ | १७.२३ | ४७३.९१ |
| २००९-१० | ३१.८३ | २,५०७.१६ | १०३.०५ | १३.२९ | ३७६.२६ |
| २०१०-११ | २२.०४ | १,३२४.६४ | ५१.७२ | ०.८५ | १४.८४ |
| २०११-१२ | २५.११ | १,८२४.९६ | ९१.०६ | ४.४६ | १७४.८९ |
| २०१२-१३ | २३.१८ | २,४०८.२६ | १८८.२१ | १३.१२ | ७६३.५६ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## शेतकरी जनता अपघात विमा योजना

७.४१ अपघातग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या दु:खी कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यासाठी राज्य शासनाने २००५-०६ मध्ये शेतकरी जनता व्यक्तिगत अपघात विमा योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत १३ प्रकारच्या अपघातांसाठी विमा संरक्षण देण्यात येते. आता या योजनेचे ‘शेतकरी जनता अपघात विमा योजना’ असे नामाभिधान करण्यात आले आहे. सन २०१२-१३ मध्ये विमा हप्त्यापोटी शासनाने ₹ ३१.५१ कोटी रक्कम विमा कंपन्यांना अदा केली आहे. शेतकरी जनता अपघात विमा योजनेचा तपशील तक्ता ७.२५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.२५ शेतकरी जनता अपघात विमा योजनेचा तपशील**

(₹ कोटी)

| वर्ष | शासनाने भरलेला विमा हप्ता | एकूण प्राप्त विमा प्रस्ताव (संख्या) | मंजूर विमा प्रस्ताव (संख्या) | शेतकऱ्यांना दिलेली नुकसान भरपाई |
|---|---|---|---|---|
| २००८-०९ | ९.५३ | २,७३९ | १,७२३ | १७.२३ |
| २००९-१० | १०.९६ | ३,०९७ | २,०९६ | २०.८५ |
| २०१०-११ | १९.१८ | ३,२३६ | २,५३८ | २५.२३ |
| २०११-१२ | १९.१८ | ३,०८० | २,०९६ | २०.७९ |
| २०१२-१३* | ३१.५१ | २,९५३ | १,८५१ | १८.५१ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

# पशुसंवर्धन

७.४२ पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय हे रोजगार निर्मितीद्वारे कुटुंबाच्या उत्पन्नास हातभार लावण्याबरोबरच स्वस्त व पोषक आहार पुरवून राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्वाची भूमिका बजावतात. अठराव्या पशुधन गणना २००७ च्या अस्थायी माहितीनुसार राज्यात एकूण पशुधन सुमारे ३६० लाख असून दर लाख लोकसंख्येमागे ते सुमारे ३७,००० इतके होते. भारतातील एकूण कुक्कुटपालनामध्ये राज्याचा हिस्सा १० टक्के होता. पशुधन व कुक्कुटपालन या दोन्हींमध्ये देशात राज्याचा सहावा क्रमांक आहे. एकोणविसाव्या पशुधन गणना २०१२ चे निष्कर्ष लवकरच उपलब्ध होणे अपेक्षित आहे. पशुधन गणना २००७ नुसार पशुधन व कुक्कुटपालनाची आकडेवारी परिशिष्ट ७.७ मध्ये दिली आहे.

## पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा

७.४३ क्षेत्रनिहाय पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा तक्ता ७.२६ मध्ये दर्शविल्या आहेत.

**तक्ता ७.२६ क्षेत्रनिहाय पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा**

( मार्च, २०१३ पर्यंत)

| क्षेत्र | पशुधन (गणना २००७) (लाखात) | जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रे | सर्वचिकित्सालये$ | लघु सर्वचिकित्सालये | पशुवैद्यकीय दवाखाने | फिरते पशुवैद्यकीय दवाखाने | प्राथमिक पशुवैद्यकीय उपचार केंद्रे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कोकण | २१.३६ | ४ | ५ | २० | १४२ | १२ | ३५४ |
| नाशिक | ८४.१६ | ५ | ५ | २५ | ३४५ | ६ | ५१५ |
| पुणे | ८२.५२ | ५ | ५ | २६ | ४६० | ७ | ५५९ |
| औरंगाबाद | ४०.९३ | ४ | ४ | २० | १६० | २ | २८८ |
| लातूर | ३५.०६ | ४ | ४ | २० | १६५ | ३ | २९० |
| अमरावती | ४५.६८ | ५ | ५ | २७ | १९३ | १७ | ३७९ |
| नागपूर | ४९.८४ | ६ | ७ | ३० | २८३ | १८ | ४६३ |
| **महाराष्ट्र** | **३५९.५५** | **३३** | **३५** | **१६८** | **१,७४८** | **६५** | **२,८४८** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

$ महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाची तीन सर्वचिकित्सालये समाविष्ट

७.४४ राज्यात विविध पशुआजारांकरीता वैद्यकीय सुविधा पुरविल्या जाण्याबरोबरच लसीकरण कार्यक्रमही राबविले जातात. क्षेत्रनिहाय उपचार व लसीकरणाबाबत माहिती तक्ता ७.२७ मध्ये दिली आहे.

## कृत्रिम रेतन

७.४५ कृत्रिम रेतन सुविधा ४,८६४ वैद्यकीय सुविधा केंद्रांमध्ये उपलब्ध आहे. पुणे, नागपूर आणि औरंगाबाद येथील तीन गोठीत वीर्य प्रयोगशाळांमध्ये वीर्यनळ्यांची निर्मिती केली जाते आणि ३३ जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रांना व राज्यातील सर्व कृत्रिम रेतन केंद्रांना त्यांचा पुरवठा केला जातो. क्षेत्रनिहाय कृत्रिम रेतनाचे वर्ष २०१३-१४ साठी (नोव्हेंबर पर्यंतचे) कार्यविवरण तक्ता ७.२८ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.२७ क्षेत्रनिहाय उपचार व लसीकरण २०१३-१४ (नोव्हेंबर पर्यंत)**

('०००)

| क्षेत्र | उपचार केलेले (संख्या) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सामान्य उपचार | खच्चीकरण | शस्त्रक्रिया | | लसीकरण (कुक्कुटांसह) |
| | | | मोठी | गौण | |
| कोकण | ७०० | ४७ | १ | ३८ | ५,८०७ |
| नाशिक | २,३०६ | १२५ | ५ | १२२ | १४,३६८ |
| पुणे | ३,३६० | ६० | ९ | ५४ | १२,८०२ |
| औरंगाबाद | ९४१ | ३६ | २ | ३५ | ५,८९९ |
| लातूर | ९९१ | ३२ | ३ | ४३ | ५,०३३ |
| अमरावती | १,२३२ | ४८ | २ | ५० | ६,५९९ |
| नागपूर | १,२०९ | ५६ | ४ | ५७ | ८,३३४ |
| **महाराष्ट्र** | **१०,७३८** | **४०६** | **२५** | **४००** | **५८,८४१** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

**तक्ता ७.२८ क्षेत्रनिहाय करण्यात आलेले कृत्रिम रेतन २०१३-१४ (नोव्हेंबर पर्यंत)**

('०००)

| क्षेत्र | केलेले कृत्रिम रेतन | | | | | जन्मलेल्या वासरांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बाह्यगत | संकरित | स्थानिक | म्हैस | एकूण | संकरित | स्थानिक | म्हैस | एकूण |
| कोकण | १७ | १२ | नगण्य | २० | ५० | ११ | ० | ८ | १९ |
| नाशिक | १०४ | १३९ | ६ | ४६ | २९४ | ८३ | २ | १५ | १०१ |
| पुणे | २५ | २८२ | ५८ | २१० | ५७६ | १०७ | २१ | ७१ | १९८ |
| औरंगाबाद | २८ | ५१ | १२ | २५ | ११६ | २५ | ३ | ८ | ३६ |
| लातूर | १४ | ३० | ४२ | ४४ | १३० | १२ | १२ | १४ | ३९ |
| अमरावती | २६ | २१ | ९ | २६ | ८२ | १६ | १ | १० | २८ |
| नागपूर | ३५ | ५६ | ५ | १० | १०७ | २८ | १ | ४ | ३३ |
| महाराष्ट्र | **२४९** | **५९२** | **१३३** | **३८२** | **१,३५५** | **२८२** | **४१** | **१३१** | **४५४** |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन टीप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

## राष्ट्रीय गुरे व म्हैस पैदास प्रकल्प

७.४६ राष्ट्रीय गुरे व म्हैस पैदास प्रकल्प हा १०० टक्के केंद्र पुरस्कृत कार्यक्रम असून तो पशु प्रजनन सेवेचे बळकटीकरण व विस्तारीकरण, देशी जातीचे संवर्धन तसेच ग्रामीण युवकांच्या स्वयंरोजगार निर्मितीसाठी महाराष्ट्र पशुधन विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

७.४७ सन २०१२-१३ मध्ये ₹ ७.०६ कोटी इतका निधी केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिला होता व मागील वर्षाच्या अखर्चित निधीसह ₹ ११.६७ कोटी खर्च झाले आहे. हा खर्च मुख्यत: एक गोठीत वीर्य प्रयोगशाळा, तीन वळू-माता प्रक्षेत्र व चार जिल्हा कृत्रिम रेतनकेंद्रांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण यावर करण्यात आला. राष्ट्रीय गुरे व म्हैस पैदास प्रकल्पांतर्गत देशी जातीच्या जनावरांच्या नैसर्गिक संयोगासाठी शेतकऱ्यांना ५१२ मुऱ्हा नरवासरे व १०८ देशी नरवासरांचे १०० टक्के अनुदानावर वाटप करण्यात आले. गोठीत वीर्यमात्रा उत्पादनासाठी पुणे, औरंगाबाद व नागपूर येथील तीन गोठीत वीर्य प्रयोगशाळांकरिता १०२ वळू खरेदी करण्यात आले. कृत्रिम रेतनाची अधिक चांगली सेवा उपलब्ध होण्यासाठी सध्या कार्यरत ९०० कृत्रिम रेतनाशी निगडीत कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले. सन २०१२-१३ मध्ये १,११४ पशुवंध्यत्व निवारण शिबीरांचे आयोजन करण्यात आले व १,०९४ शेतकरी/पशुपालकांना दुग्ध उत्पादन व पशुव्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले.

७.४८ सन २०१३-१४ मध्ये डिसेंबर अखेर पर्यंत चार जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रे, दोन गोठीत वीर्य प्रयोगशाळा व तीन वळू-माता प्रक्षेत्र यांचे आधुनिकीकरण व बळकटीकरणासाठी ₹ ३.३३ कोटी खर्च करण्यात आले. नोव्हेंबर, २०१३ पर्यंत देशी जनावरांचे जतन व संवर्धनाकरिता ३६३ मुऱ्हा नरवासरे व ४६ देशी नरवासरांचे १०० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. याशिवाय १७५ सेवादात्यांना कृत्रिम रेतन विषयक एक महिन्याचे प्रशिक्षण देण्यात आले. डिसेंबर, २०१३ पर्यंत ३९८ शेतकऱ्यांना/पशुपालकांना दुग्ध उत्पादन व पशुव्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले.

## पशुधन विमा योजना

७.४९ पशुधन विमा ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र पशुधन विकास महामंडळामार्फत राज्यात २००६-०७ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचा प्रमुख उद्देश पशुपालकांकडे उपलब्ध असलेल्या जनावरांच्या नैसर्गिक आपत्ती, अपघात अथवा रोगराईमुळे होणाऱ्या आकस्मिक मृत्यूमुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण देणे हा आहे. सदर योजना ५० टक्के अनुदान तत्वावर राबवली जाते. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या ₹ २.२५ कोटी निधीतून सन २०१२-१३ मध्ये ₹ १.२२ कोटी व सन २०१३-१४ मध्ये डिसेंबर अखेर ₹ ०.९८ कोटी खर्च करण्यात आले. सन २०१२-१३ मध्ये १८,७७४ जनावरांचा विमा उतरविण्यात आला असून १,०५४ दावे निकाली काढण्यात आले आणि ₹ २.७२ कोटी लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आले. सन २०१३-१४ मध्ये नोव्हेंबर अखेर पर्यंत ६,०९६ जनावरांचा विमा उतरविण्यात आला असून ८०९ दावे निकाली काढण्यात आले आणि ₹ २.२१ कोटी लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आले.

# कुक्कुट विकास

७.५० राज्यात कुक्कुटपालन प्रामुख्याने खाजगी कुक्कुटपालकांकडून केले जाते. राष्ट्रीय पोषण संस्थेने प्रति वर्ष प्रति व्यक्ति १८० अंडी व ११ किलो कोंबडीचे मांस सेवनाची शिफारस केली आहे. ह्या क्षेत्राच्या विकासाची क्षमता विचारात घेऊन राज्य शासनाने कंत्राटी पध्दतीद्वारे कुक्कुटपालनास चालना देण्याचे ठरविले आहे. यासाठी सन २०१२-१३ मध्ये ₹ ७.०५ कोटी तरतुदीपैकी ₹ ४.७७ कोटी खर्च करण्यात आले. राज्याच्या मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांमधून पुरवठा केलेले पक्षी आणि अंड्यांची वार्षिक दरडोई उपलब्धता तक्ता ७.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२९ मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांमधून पुरवठा केलेले पक्षी व अंड्यांची उपलब्धता**

| वर्ष | पुरवठा करण्यात आलेल्या पक्षांची संख्या (लाख) | अंड्यांची उपलब्धता (वार्षिक दरडोई) | |
|---|---|---|---|
| | | राज्य | देश |
| २००९-१० | ५.७१ | ३५ | ५१ |
| २०१०-११ | ३.८७ | ३८ | ५३ |
| २०११-१२ | ८.८४ | ३९ | ५५ |
| २०१२-१३ | ८.६८ | ४० | उ.ना. |
| २०१३-१४+ | २.५६ | उ.ना. | उ.ना. |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन उ.ना. उपलब्ध नाही
+ नोव्हेंबरपर्यंत

## दुग्ध विकास

७.५१ दूध उत्पादनामध्ये राज्याचा राष्ट्रीय स्तरावर सातवा क्रमांक आहे. दुधाचे उत्पादन व दरडोई उपलब्धता तक्ता ७.३० मध्ये दर्शविली आहे.

**आलेख ७.२ : सहकारी व शासकीय दुग्धशाळांचे एकत्रित सरासरी दैनिक दूध संकलन**




**तक्ता ७.३० दुधाचे उत्पादन व दरडोई उपलब्धता**

| वर्ष | दुधाचे उत्पादन (दशलक्ष मे.टन) | | दरडोई उपलब्धता (ग्रॅम प्रति दिन) | |
|---|---|---|---|---|
| | राज्य | भारत | राज्य | भारत |
| २००९-१० | ७.७ | ११२.५ | १९० | २६४ |
| २०१०-११ | ८.० | १२१.८ | १९६ | २८१ |
| २०११-१२ | ८.५ | १२७.९ | २०६ | २९० |
| २०१२-१३ | ८.७ | १३२.० | २१० | उ.ना. |
| २०१३-१४# | ९.१ | १३९.७ | २२३ | उ.ना. |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन # अपेक्षित
उ.ना. उपलब्ध नाही

७.५२ राज्यात सन २०१२-१३ मध्ये शासकीय व सहकारी क्षेत्रात एकूण ७३ दूधप्रक्रिया प्रकल्प व १४१ दूधशीतकरण केंद्रे कार्यरत होती व त्यांची प्रतिदिन क्षमता अनुक्रमे ७४.७३ लाख लिटर व २५.१७ लाख लिटर होती. राज्यातील शासकीय व सहकारी दुग्धशाळांचे एकत्रित सरासरी दैनिक दूधसंकलन २०१२-१३ मध्ये ४०.७४ लाख लिटर आणि २०१३-१४ मध्ये ३९.१६ लाख लिटर होते. राज्यात १६८ शीतगृहे असून त्यांची क्षमता ४,४३१ मे.टन इतकी आहे, त्यापैकी १४४ शीतगृहे खाजगी क्षेत्रात असून त्यांची क्षमता ३,६५१ मे.टन आहे. शासकीय व सहकारी दूध योजनेतील दुग्ध उपउत्पादनांबाबत माहिती तक्ता ७.३१ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ७.३१ शासकीय आणि सहकारी दुग्ध शाळांमधील दुग्ध उपउत्पादने**

| उप उत्पादन | परिमाण | २०११-१२ | २०१२-१३ | शेकडा बदल | २०१३-१४+ |
|---|---|---|---|---|---|
| दूध भुकटी | मे.टन | ६६७.७७ | १,२११.५६ | ८१.४ | २,०४०.५० |
| पांढरे लोणी | मे.टन | ३९७.६८ | ६८५.८४ | ७२.५ | १,१८६.४८ |
| तूप | मे.टन | २९.८४ | ५४.२५ | ८१.८ | ५६.११ |
| एनर्जी | लाख बाटल्या | ५६.१० | २५.४६ | (-)५४.६ | ५१.२९ |
| लस्सी | लाख बाटल्या | ३५.०५ | १८.१६ | (-)४८.२ | ३४.३२ |
| मसाला दूध | लाख बाटल्या | ५.४९ | ६.१२ | ११.५ | ९.९६ |
| गायीचे टिकाऊ दूध | लाख बाटल्या | १.१० | ०.४९ | (-)५५.५ | १.०९ |

*आधार* : दुग्धव्यवसाय आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन +डिसेंबरपर्यंत

## मत्स्यव्यवसाय

७.५३ राज्याला ७२० किलोमीटर सागरी किनारा लाभला असून १.१२ लाख चौरस किलोमीटर क्षेत्र सागरी मासेमारीसाठी योग्य आहे. या व्यतिरिक्त, राज्यात ३.०१ लाख हेक्टर क्षेत्र गोड्यापाण्यातील व ०.१९ लाख हेक्टर क्षेत्र निमखा-या पाण्यातील मासेमारीस योग्य आहे. सन २०१२-१३ मध्ये कृषि आणि संलग्न क्षेत्राच्या स्थूल राज्य उत्पन्नात (चालू किंमतीनुसार) मत्स्यव्यवसायाचा ०.३ टक्के वाटा होता. राज्याच्या सागरीतटावर मासळी उतरविण्याची १६२ केंद्रे आहेत. राज्यात २९ मत्स्यबीज उत्पादन केंद्रे असून अंत:क्षेत्रीय मत्सव्यवसायासाठी दरवर्षी १२,३५० लाख अंडी उत्पादनाची क्षमता आहे. तसेच मासेमारीसाठी १५,०८३ सागरी नौका कार्यरत असून त्यापैकी १२,५३६ यांत्रिक नौका आहेत. मत्स्योत्पादन व निर्यात तक्ता ७.३२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३२ मत्स्योत्पादन व निर्यात**

| बाब | परिमाण | २०११-१२ | २०१२-१३ | शेकडा बदल | २०१३-१४*+ |
|---|---|---|---|---|---|
| **मत्स्य उत्पादन** | लाख मे.टन | | | | |
| सागरी | | ४.३४ | ४.४९ | ३.५ | ३.१० |
| गोडया पाण्यातील | | १.४५ | १.३७ | (-)५.५ | १.०५ |
| **एकूण** | | **५.७९** | **५.८६** | **१.२** | **४.१५** |
| **मत्स्य उत्पादनाचे स्थूल मूल्य** | ₹ कोटी | | | | |
| सागरी | | २,४२८ | ३,१२२ | २८.६ | २,३२५ |
| गोडया पाण्यातील | | १,१०५ | १,१९१ | ७.८ | १,३५० |
| **एकूण** | | **३,५३३** | **४,३१३** | **२२.१** | **३,६७५** |
| **मत्स्य उत्पादनाची निर्यात** | | | | | |
| उत्पादन | लाख मे.टन | १.५२ | १.४९ | (-)२.० | उ.ना. |
| मूल्य | ₹ कोटी | २,४२० | २,७२४ | १२.६ | उ.ना. |

*आधार* : मत्स्यव्यवसाय आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत * अस्थायी उ.ना. उपलब्ध नाही

## रेशीम उत्पादन

७.५४ रेशीम उत्पादन व्यवसाय हा एक महत्वाचा कृषि-कुटीर उद्योग आहे. यामध्ये मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती करुन त्यायोगे ग्रामीण भागातील गरिबांची आर्थिक उन्नती करण्याची क्षमता आहे. रेशीम उत्पादन म्हणजे रेशीम किड्यांद्वारे रेशीम धाग्यांचे उत्पादन करणे होय. यात रेशीम किड्यांच्या संगोपनासाठी तुतीच्या झाडांची लागवड, कोषनिर्मितीसाठी रेशीम किड्यांचे संगोपन आणि प्रक्रिया व विणकाम या मूल्य वृध्दीच्या लाभांसाठी तंतू निर्मिती यांचा समावेश होतो. तुती रेशीम विकास कार्यक्रम राज्यातील २४ जिल्हयात राबविला जातो. राज्यातील हवामान हे जरी रेशीम उद्योगास पोषक आहे तरी तुती वृक्ष लागवडीचे क्षेत्र सातत्याने कमी होत आहे. सन २०१२-१३ मध्ये १,७५४ हेक्टर क्षेत्र तुती वृक्ष लागवडी खाली होते, जे मागील वर्षाच्या तुलनेत २४.६ टक्क्यांनी कमी होते. तसेच कच्च्या रेशमाचे उत्पादन ८७.५ मे. टन झाले, जे २०११-१२ च्या तुलनेत ४३ टक्के कमी होते. सन २०१३-१४ मध्ये डिसेंबरपर्यंत कच्च्या रेशमाचे उत्पादन ६३.९ मे. टन झाले. टसर रेशीम विकास कार्यक्रम गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा व गोंदिया या चार जिल्ह्यांमध्ये राबविला जातो. टसर रेशीम किड्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक ऐन वृक्षाचे या चार जिल्ह्यातील लागवडीखालील क्षेत्र १८,८६६ हेक्टर आहे. सन २०१२-१३ मध्ये कच्च्या टसर रेशमाचे उत्पादन ९.७५ मे.टन इतके झाले, जे २०११-१२ च्या तुलनेत २१.१ टक्के कमी होते. सन २०१३-१४ मध्ये डिसेंबरपर्यंत १.५७ मे.टन इतक्या कच्च्या टसर रेशमाचे उत्पादन झाले.

## वने

७.५५ राज्यात कृषिव्याप्त क्षेत्रा खालोखाल दुसरे मोठे क्षेत्र वनाखाली आहे. कृषि व संलग्न कार्य क्षेत्राच्या स्थूल राज्य उत्पन्नात वने या क्षेत्राचा २०१२-१३ मधील वाटा १.९ टक्के होता. राज्याचे एकूण वनक्षेत्र ६१,३६९ चौकिमी (अस्थायी) आहे. राष्ट्रीय वन धोरण, १९८८ नुसार वनक्षेत्राचे प्रमाण ३३ टक्के असावे या उद्दिष्टाच्या तुलनेत राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या १९.९ टक्के एवढे वनक्षेत्र आहे.

**आलेख ७.३ : वनाच्या व वृक्षाच्छादनाच्या घनतेनुसार क्षेत्र (२०१०-११)**



राज्यातील वनक्षेत्र वन विभाग (५५,४३१ चौकिमी), महाराष्ट्र वन विकास महामंडळ (मवविम) (३,६०४ चौकिमी), वन विभागाच्या अधिपत्याखाली आणण्यात आलेले खाजगी वनक्षेत्र (७२१ चौकिमी, अस्थायी) व महसूल विभाग (१,६१३ चौकिमी) यांच्या प्रशासकीय अधिपत्याखाली आहे. राज्यातील वनांच्या वृक्षाच्छादनाची वर्गवारी उपग्रहाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे करण्यात आली असून त्यानुसार वृक्षाच्छादन घनतेची वर्गवारी अति घनदाट जंगल (जेथे वृक्षाच्छादनाची घनता ७० टक्क्यांपेक्षा जास्त आहे), मध्यम दाट जंगल (जेथे ही घनता ४० ते ७० टक्क्यांपर्यंत आहे), खुले वन (जेथे ही घनता १० ते ४० टक्के इतकी आहे) व खुरटे वन (जेथे ही घनता १० टक्क्यांपेक्षा कमी आहे) अशा चार वर्गात केली आहे. उर्वरित वनक्षेत्र जलाशयानी व्याप्त आहे अथवा वृक्ष विरहीत आहे.

## वृक्षारोपण

७.५६ वृक्षारोपण हा २० कलमी कार्यक्रमाचा एक भाग असून त्याची अंमलबजावणी मुख्यत: वन विभाग, मवविम व सामाजिक वनीकरण संचालनालय यांचेमार्फत करण्यात येते. राज्य शासनाने दरवर्षी जिल्हा परीषद (कृषि आणि शिक्षण विभाग) तसेच इतर विभाग (वन, उद्योग, साबांवि, जलसंपदा इ.) यांच्या मदतीने १०० कोटी वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. वृक्षारोपणांतर्गत क्षेत्र व खर्च तक्ता ७.३३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.३३ वृक्षरोपणांतर्गत क्षेत्र व खर्च**

| वर्ष | वन विभाग | | मवविम | | सामाजिक वनीकरण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | पुरवलेली रोपे (कोटी) |
| २००९-१० | ४८,०९९ | ४३.४९@ | २,९०७ | - | ६,५४० | ७.३७ | २.५७ |
| २०१०-११ | ३०,१९० | ३१.८८ | ३,२२३ | ५.९८ | ४,८४७ | ७.५४ | १.९४ |
| २०११-१२ | ३१,३६९ | ६७.९० | ४,०११ | ९.४७ | ३,९१६ | १३.६७ | १.३२ |
| २०१२-१३ | ७०,१५७ | १०७.३३ | ४,८४७ | ८.६५ | २,१०६ | १४.२९ | ०.७७ |
| २०१३-१४+ | ५८,६४६ | ६३.८० | ३,९६९ | ५.८० | २,५२८ | १६.०६ | २.१४ |

*आधार* : अप्रामुवसं, महाराष्ट्र शासन @ मवविमसह +नोव्हेंबरपर्यंत

## सामाजिक वनीकरण

७.५७ ग्रामीण जनतेसाठी जळाऊ लाकडाची व वैरणाची गरज भागविण्यामध्ये तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यामध्ये सामाजिक वनीकरण विभागाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. सामाजिक वनीकरण संचालनालय वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी विविध योजना राबविते. महत्वाच्या योजनांतर्गत वृक्षारोपणाची माहिती तक्ता ७.३४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३४ महत्वाच्या योजनांतर्गत वृक्षारोपणाची माहिती**

(क्षेत्र हेक्टर)

| योजना | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|
| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४+ |
| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | ८२ | १३२ | ६२८ | ६०३ |
| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना रस्त्यांच्या बाजूला वृक्षारोपण (किमी) | १,१०८ | १,००४ | १,१७९ | १,३४६ |
| एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम | १७९ | ३१२ | १८५ | ३१० |
| राष्ट्रीय बांबू अभियान | २२१ | १०६ | १३० | २४१ |
| निवडक पाणलोट क्षेत्रातील सामुदायिक जमिनीवर वृक्ष लागवड कार्यक्रम | उ.ना. | ३८६ | २३१ | ३३८ |
| पश्चिम घाट विकास कार्यक्रम | उ.ना. | उ.ना. | ४५ | ७४ |
| रोजगार हमी योजनेअंतर्गत खाजगी पडीक जमिनीवर वृक्ष लागवड कार्यक्रम | २,९४३ | १,१०४ | १३४ | ० |

*आधार* : सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र शासन. +डिसेंबरपर्यंत उ.ना. उपलब्ध नाही

## वन उत्पादने

७.५८ राज्यातील वनांद्वारे इमारती लाकूड, जळाऊ लाकूड ही प्रमुख व बांबू, तेंदू पत्ता, डिंक, गवत, इत्यादी गौण वन उत्पादने मिळतात. ही सर्व वन उत्पादने राज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी व स्थानिकांना उपजीविका पुरविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. वन उत्पादने व त्यांचे मूल्य तक्ता ७.३५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.३५ वन उत्पादने व त्यांचे मूल्य**

(₹ कोटी)

| वन उत्पादने | उत्पादनाचे परिमाण | २०११-१२ | | २०१२-१३* | | २०१३-१४ ++ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य |
| **(अ) मुख्य वन उत्पादने** | | | | | | | |
| इमारती लाकूड | लाख घन मीटर | १.१५ | २४३.५१ | ०.९२ | २२८.६० | १.२४ | १९०.५१ |
| जळाऊ लाकूड | लाख घन मीटर | ३.७९ | २८.१० | ३.२२ | ३२.७४ | २.४३ | ३९.८८ |
| **एकूण (अ)** | | ४.९४ | २७१.६१ | ४.१४ | २६१.३४ | ३.६७ | २३०.३९ |
| **(ब) गौण वन उत्पादने** | | | | | | | |
| बांबू | लाख मे. टन | १.९३ | ३९.०५ | १.२७ | ३०.७४ | १.५२ | ३०.७६ |
| तेंदू | लाख स्टँडर्ड बॅग्ज | ६.२९ | १०२.६३ | ६.४६ | १३६.८१ | ४.४८ | ६३.६२ |
| गवत | मे. टन | १,५८४ | ०.१८ | ७७४ | ०.१२ | -- | उ.ना. |
| डिंक | क्विंटल | ६,०७६ | १.३९ | १०,२६४ | २.९८ | -- | उ.ना. |
| इतर (लाख, हिरडा, शिकेकाई, इतर) | | -- | ९.७९ | -- | १२.७६ | -- | १.८८ |
| **एकूण (ब)** | | | १५३.०४ | | १८३.४१ | | ९६.२६ |
| **एकूण (अ+ब)** | | | ४२४.६५ | | ४४४.७५ | | ३२६.६५ |

*आधार :* मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, उ.ना. उपलब्ध नाही * अस्थायी ++ अपेक्षित

## संत तुकाराम वनग्राम योजना

७.५९ या योजनेचा मुख्य उद्देश वन आणि प्राण्यांच्या संरक्षणामध्ये स्थानिक लोकांना सामील करुन घेणे हा आहे. या योजनेअंतर्गत एकूण १२,५९५ संयुक्त वन व्यवस्थापन समित्या गठित करण्यात आल्या आहेत. सन २०१२-१३ मध्ये, सुमारे ₹ ६३ लाख खर्च झाला आहे.

## वन्यजीव आणि राष्ट्रीय उद्याने/अभयारण्ये

७.६० राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणानुसार महाराष्ट्रातील वाघांची अंदाजित संख्या १६० ते १९६ च्या दरम्यान आहे. वन्यजीवांच्या संवर्धन व रक्षणाकरिता शासनाने पाच नवीन अभयारण्ये मंजूर केली आहेत. i) ग्रेट इंडीयन बस्टर्ड (माळढोक), जिल्हा उस्मानाबाद आणि सोलापूर (क्षेत्र १.९८ चौकिमी), ii) बोर, जिल्हा नागपूर आणि वर्धा (क्षेत्र ६०.६९ चौकिमी), iii) नागझिरा, जिल्हा गोंदिया (क्षेत्र १५१.३३ चौकिमी), iv) नवेगाव, जिल्हा गोंदिया (क्षेत्र १२२.७६ चौकिमी) आणि v) उमरेड कऱ्हांडला, जिल्हा नागपूर आणि भंडारा (क्षेत्र १८९.२९ चौकिमी). प्रकल्पनिहाय वन्यजीव आणि राष्ट्रीय उद्याने/अभयारण्ये यांचे क्षेत्र व त्यावरील खर्च तक्ता ७.३६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.३६ प्रकल्पनिहाय वन्यजीव आणि राष्ट्रीय उद्याने/अभयारण्ये यांचे क्षेत्र व त्यावरील खर्च**

(₹ कोटी)

| योजना | क्षेत्र (चौकिमी) | खर्च | | शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | | २०११-१२ | २०१२-१३ | |
| **व्याघ्र प्रकल्प** | | | | |
| मेळघाट | १,६७७ | ११.७२ | ५.१६ | (-)५६.० |
| ताडोबा अंधारी | ६२० | २६.७५ | ३.९१ | (-)८५.४ |
| पेंच | २५७ | २.१२ | ३.४८ | ६४.२ |
| सहयाद्री | ७४१ | ०.२९ | १.०७ | २६९.० |
| **राष्ट्रीय उद्याने/अभयारण्ये यांचा विकास** | १४,०५१ | २.६२ | ५.०७ | ९३.५ |
| हत्ती प्रकल्प कोल्हापूर | उ.ना. | ०.२० | ०.२० | ०.० |
| **एकूण** | | **४३.७०** | **१८.८९** | **(-)५६.८** |

*आधार:* मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, उ.ना. उपलब्ध नाही

* * * * *

## परिशिष्ट ७.१
## राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, पीक आणि प्रति हेक्टर उत्पादन

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**अन्नधान्ये**

| अनु. क्रमांक | वर्ष | | तांदूळ | | | गहू | | | ज्वारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन |
| (१) | (२) | | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | ... | १,३०० | १,३६९ | १,०५४ | ९०७ | ४०१ | ४४२ | ६,२८४ | ४,२२४ | ६७२ |
| २ | १९७०-७१ | ... | १,३५२ | १,६६२ | १,२२९ | ८१२ | ४४० | ५४२ | ५,७०३ | १,५५७ | २७३ |
| ३ | १९८०-८१ | ... | १,४५९ | २,३१५ | १,५८७ | १,०६३ | ८८६ | ८३४ | ६,४६९ | ४,४०९ | ६८१ |
| ४ | १९९०-९१ | ... | १,५९७ | २,३४४ | १,४६७ | ८६७ | ९०९ | १,०४९ | ६,३०० | ५,९२९ | ९४१ |
| ५ | २०००-०१ | ... | १,५१२ | १,९३० | १,२७७ | ७५४ | ९४८ | १,२५६ | ५,०९४ | ३,९८८ | ७८३ |
| ६ | २००९-१० | ... | १,४७१ | २,१८६ | १,४८६ | १,०८१ | १,७४० | १,६१० | ४,१७६ | ३,५६५ | ८५४ |
| ७ | २०१०-११ | ... | १,५१६ | २,६९१ | १,७७५ | १,३०७ | २,३०१ | १,७६१ | ४,०६० | ३,४५२ | ८५० |
| ८ | २०११-१२ | ... | १,५४४ | २,८४९ | १,८४५ | ८७८ | १,४९९ | १,७०७ | ३,२२९ | २,६२७ | ८१४ |
| ९ | २०१२-१३ | ... | १,५५७ | ३,०५७ | १,९६३ | ७८५ | १,१९९ | १,५२७ | ३,२९० | २,१०८ | ६४१ |

| अनु. क्रमांक | वर्ष | | बाजरी | | | इतर तृणधान्ये | | | सर्व तृणधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन |
| (१) | (२) | | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) |
| १ | १९६०-६१ | ... | १,६३५ | ४८९ | २९९ | ४८० | २७२ | ५६७ | १०,६०६ | ६,७५५ | ६३७ |
| २ | १९७०-७१ | ... | २,०३९ | ८२४ | ४०४ | ४१४ | २५४ | ६१४ | १०,३२० | ४,७३७ | ४५९ |
| ३ | १९८०-८१ | ... | १,५३४ | ६९७ | ४५४ | ४५१ | ३४० | ७५४ | १०,९७६ | ८,६४७ | ७८८ |
| ४ | १९९०-९१ | ... | १,९४० | १,११५ | ५७५ | ४३२ | ४४३ | १,०२५ | ११,१३६ | १०,७४० | ९६४ |
| ५ | २०००-०१ | ... | १,८०० | १,०८७ | ६०४ | ६६४ | ५४४ | ८१९ | ९,८२४ | ८,४९७ | ८६५ |
| ६ | २००९-१० | ... | १,०३४ | ७६६ | ७४२ | ९७४ | १,९६१ | २,०१४ | ८,७३५ | १०,२१८ | १,१७० |
| ७ | २०१०-११ | ... | १,०३५ | १,१२३ | १,०८६ | १,०६९ | २,७४९ | २,५७५ | ८,९८५ | १२,३१७ | १,३७१ |
| ८ | २०११-१२ | ... | ८३८ | ८२३ | ९८२ | १,०७५ | २,६२९ | २,४४६ | ७,५६४ | १०,४२७ | १,३७८ |
| ९ | २०१२-१३ | ... | ७८८ | ५०२ | ६३७ | १,०२० | १,९९३ | १,९५४ | ७,४४० | ८,८५९ | १,१९१ |

| अनु. क्रमांक | वर्ष | | तूर | | | हरभरा | | | मूग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन |
| (१) | (२) | | (२१) | (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) | (२७) | (२८) | (२९) |
| १ | १९६०-६१ | ... | ५३० | ४६८ | ८८३ | ४०२ | १३४ | ३३३ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ... | ६२७ | २७१ | ४३२ | ३१० | ८७ | २८१ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | ... | ६४४ | ३१९ | ४९५ | ४१० | १३७ | ३३५ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | ... | १,००४ | ४१९ | ४१७ | ६६८ | ३५५ | ५३२ | ० | ० | ० |
| ५ | २०००-०१ | ... | १,०९६ | ६६० | ६०२ | ६७६ | ३५१ | ५१९ | ७१४ | २४४ | ३४१ |
| ६ | २००९-१० | ... | १,०९३ | ९१९ | ८४१ | १,२९१ | १,११४ | ८६३ | ४२८ | १४२ | ३३२ |
| ७ | २०१०-११ | ... | १,३०२ | ९७६ | ७५० | १,४३८ | १,३०० | ९०४ | ५५४ | ३७२ | ६७२ |
| ८ | २०११-१२ | ... | १,२३३ | ८७१ | ७०६ | १,०७५ | ८५७ | ७९७ | ४३३ | २५४ | ५८६ |
| ९ | २०१२-१३ | ... | १,२१४ | १,००६ | ८२९ | १,१३५ | ८६८ | ७६५ | ४३१ | २११ | ४९० |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ७.१ (पुढे चालू)

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**अन्नधान्ये**

| अनु. क्रमांक | वर्ष | | उडिद | | | इतर कडधान्ये | | | सर्व कडधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन |
| (१) | (२) | | (३०) | (३१) | (३२) | (३३) | (३४) | (३५) | (३६) | (३७) | (३८) |
| १ | १९६०-६१ | ... | ० | ० | ० | १,४१७ | ३८७ | २७३ | २,३४९ | ९८९ | ४२१ |
| २ | १९७०-७१ | ... | ० | ० | ० | १,६२९ | ३१९ | १९६ | २,५६६ | ६७७ | २६४ |
| ३ | १९८०-८१ | ... | ० | ० | ० | १,६६१ | ३६९ | २२२ | २,७१५ | ८२५ | ३०४ |
| ४ | १९९०-९१ | ... | ० | ० | ० | १,५८५ | ६६७ | ४२१ | ३,२५७ | १,४४१ | ४४२ |
| ५ | २०००-०१ | ... | ५७४ | २०५ | ३५७ | ४९७ | १७७ | ३५६ | ३,५५७ | १,६३७ | ४६० |
| ६ | २००९-१० | ... | ३५४ | ११७ | ३३२ | २०९ | ७९ | ३७८ | ३,३७५ | २,३७२ | ७०३ |
| ७ | २०१०-११ | ... | ४८२ | ३२९ | ६८२ | २६२ | ११९ | ४५५ | ४,०३८ | ३,०९६ | ७६७ |
| ८ | २०११-१२ | ... | ३६४ | २४९ | ६८५ | १९२ | ७९ | ४१२ | ३,२९७ | २,३१० | ७०१ |
| ९ | २०१२-१३ | ... | ३६० | २१४ | ५९३ | १८२ | ६१ | ३३५ | ३,३२२ | २,३६० | ७१० |

| अनु. क्रमांक | वर्ष | | सर्व अन्नधान्ये | | | भूईमूग | | | सोयाबिन | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन |
| (१) | (२) | | (३९) | (४०) | (४१) | (४२) | (४३) | (४४) | (४५) | (४६) | (४७) |
| १ | १९६०-६१ | ... | १२,९५५ | ७,७४४ | ५९८ | १,०८३ | ८०० | ७३९ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ... | १२,८८६ | ५,४१४ | ४२० | ९०४ | ५८६ | ६४९ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | ... | १३,६९१ | ९,४७२ | ६९२ | ६९५ | ४५१ | ६४८ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | ... | १४,३९३ | १२,१८१ | ८४६ | ८६४ | ९७९ | १,१३२ | २०१ | १९० | ९४७ |
| ५ | २०००-०१ | ... | १३,३८२ | १०,१३३ | ७५७ | ४९० | ४७० | ९५८ | १,१४२ | १,२६६ | १,१०९ |
| ६ | २००९-१० | ... | १२,१०९ | १२,५९० | १,०४० | ३२२ | ३६५ | १,१३३ | ३,०१९ | २,१९७ | ७२८ |
| ७ | २०१०-११ | ... | १३,०२३ | १५,४१३ | १,१८३ | ३९५ | ४७० | १,२९० | २,७२९ | ४,३१६ | १,५८१ |
| ८ | २०११-१२ | ... | १०,८६१ | १२,७३७ | १,१ ७३ | ३२३ | ३७५ | १,१६२ | ३,०१० | ३,९६९ | १,३१९ |
| ९ | २०१२-१३ | ... | १०,७६२ | ११,२१९ | १,०४२ | २७१ | २८६ | १,०५५ | ३,०६४ | ४,६९० | १,५३१ |

| अनु. क्रमांक | वर्ष | | करडई | | | इतर तेलबिया | | | सर्व तेलबिया | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन |
| (१) | (२) | | (४८) | (४९) | (५०) | (५१) | (५२) | (५३) | (५४) | (५५) | (५६) |
| १ | १९६०-६१ | ... | ३३१ | ० | ० | ४५४ | ० | ० | १,८६८ | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ... | ४०६ | १०२ | २५२ | ४०८ | ६५ | १५९ | १,७१८ | ७५३ | ४३८ |
| ३ | १९८०-८१ | ... | ४८० | १७४ | ३६३ | ६०५ | १०३ | १७० | १,७८० | ७२८ | ४२६ |
| ४ | १९९०-९१ | ... | ६३४ | २५८ | ४०८ | १,१२७ | ४५५ | ४०४ | २,८२६ | १,८८२ | ६६६ |
| ५ | २०००-०१ | ... | २९६ | १२२ | ४१२ | ६३१ | २४१ | ३८२ | २,५५९ | २,०९९ | ८२० |
| ६ | २००९-१० | ... | १८८ | १०९ | ५७९ | ३५४ | १४३ | ४०५ | ३,८८३ | २,८१४ | ७२४ |
| ७ | २०१०-११ | ... | १७३ | ९४ | ५४४ | ३३१ | १७६ | ५३२ | ३,६२८ | ५,०५६ | १,३९४ |
| ८ | २०११-१२ | ... | १३१ | ७१ | ५४२ | २३८ | १०३ | ४३५ | ३,७०२ | ४,५१८ | १,२२१ |
| ९ | २०१२-१३ | ... | १०५ | ५८ | ५४९ | २१२ | ७२ | ३३८ | ३,६५२ | ५,१०६ | १,३९८ |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ७.१ (समाप्त)

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**नगदी पिके**

| अनु. क्रमांक | वर्ष | | ऊस | | | | कापूस (रुई) | | | तंबाखू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | तोडणी क्षेत्र | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन (मे. टनांत) | क्षेत्र | उत्पादन (गासड्यात ) | प्रति हेक्टर उत्पादन | क्षेत्र | उत्पादन | प्रति हेक्टर उत्पादन |
| (१) | (२) | | (५७) | (५८) | (५९) | (६०) | (६१) | (६२) | (६३) | (६४) | (६५) | (६६) |
| १ | १९६०-६१ | ... | १५५ | १५५ | १०,४०४ | ६६.९२ | २,५०० | १,६७३ | ११४ | २५ | १२ | ४८० |
| २ | १९७०-७१ | ... | १६७ | २०४ | १४,४३३ | ८६.५३ | २,७५० | ४८४ | ३० | १२ | ५ | ४४८ |
| ३ | १९८०-८१ | ... | २५८ | ३१९ | २३,७०६ | ९१.७४ | २,५५० | १,२२४ | ८२ | १२ | ८ | ६४८ |
| ४ | १९९०-९१ | ... | ४४२ | ५३६ | ३८,१५४ | ८६.४० | २,७२१ | १,८७५ | ११७ | ८ | ८ | १,०३९ |
| ५ | २०००-०१ | ... | ५९५ | ६८७ | ४९,५६९ | ८३.२७ | ३,०७७ | १,८०३ | १०० | ८ | ९ | १,१४८ |
| ६ | २००९-१० | ... | ७५६ | ८१७ | ६४,१५९ | ८४.८८ | ३,३९२ | ५,१११ | २५६ | २ | २ | १,१३४ |
| ७ | २०१०-११ | ... | ९६५ | १,०४१ | ८५,६९१ | ८८.८५ | ३,९४२ | ७,४७३ | ३२२ | १ | १ | ९९४ |
| ८ | २०११-१२ | ... | १,०२२ | १,१७२ | ८९,४५६ | ८७.५३ | ४,१६७ | ६,८२० | २७८ | १ | १ | १,१५६ |
| ९ | २०१२-१३ | ... | ९३५ | १,०६७ | ७७,५९२ | ८३.०० | ४,१८७ | ६,७९३ | २७६ | १ | १ | १,०५० |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

उ.ना. - उपलब्ध नाही.

टीप - (१) माहिती अंतिम अनुमानावर आधारित आहे.
(२) कापसाचे उत्पादन १७० किलो/गासडी याप्रमाणे '००० गासड्यांमध्ये.

## परिशिष्ट ७.२
## राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक

(त्रैवर्षीय सरासरी - पाया : १९७९-८२ = १००)

| गट/पिके | भार | १९८२-८३ | १९९०-९१ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **१. अन्नधान्ये** | | | | | | | | |
| **(अ)तृणधान्ये** | | | | | | | | |
| (१) तांदुळ | ९.४९ | ८७.४ | १०६.१ | ८७.४ | १२०.९ | १२२.१ | १२९.० | १३८.४ |
| (२) गहू | ५.९२ | ८०.६ | ९३.९ | ९७.९ | १३४.४ | २३७.७ | १५४.८ | १२३.९ |
| (३) ज्वारी | २२.१६ | ९५.५ | १२१.१ | ८१.४ | ७५.८ | ७०.५ | ५३.६ | ४३.० |
| (४) बाजरी | ३.०८ | ६४.२ | १५४.३ | १५०.५ | १२९.० | १५५.५ | ११३.९ | ६९.५ |
| (५) बार्ली | ०.०२ | ३७.७ | १७.० | १३.२ | ११.३ | १८८.७ | उ.ना. | उ.ना. |
| (६) मका | ०.४६ | ३६.९ | १०५.२ | २५३.८ | ८२८.६ | २,१८०.५ | १,७८२.४ | १,५२८.५ |
| (७) नाचणी | ०.८५ | ९२.० | ९८.४ | ६०.८ | ६२.५ | ५५.५ | ६५.२ | ६५.७ |
| (८) कोदरा | ०.०५ | ७३.७ | ६६.६ | ४३.६ | २७.१ | २३.६ | उ.ना. | उ.ना. |
| (९) इतर तृणधान्ये | ०.१९ | ७६.७ | १५०.८ | १६२.५ | ५७.२ | २६.१ | ७५.८ | ४८.२ |
| **एकूण - तृणधान्ये** | **४२.२२** | **८८.५** | **११५.७** | **९१.९** | **१०५.८** | **१३४.२** | **११०.१** | **९४.३** |
| **(ब)कडधान्ये** | | | | | | | | |
| (१) हरभरा | १.४७ | ७८.४ | २१५.८ | २१३.३ | ४२८.९ | ७९०.७ | ५२१.२ | ५२७.९ |
| (२) तूर | ५.४५ | ९६.१ | १०५.२ | १६६.० | १९९.१ | २४५.३ | २१८.९ | २५२.९ |
| (३) इतर कडधान्ये | ३.५२ | ११२.५ | १६०.० | १५०.० | ११८.६ | १९६.५ | १३९.५ | ११६.५ |
| **एकूण - कडधान्ये** | **१०.४४** | **९९.२** | **१३९.२** | **१६७.३** | **२०४.३** | **३०५.६** | **२३४.७** | **२४५.६** |
| **एकूण - अन्नधान्ये** | **५२.६६** | **९०.६** | **१२०.४** | **१०६.८** | **१२५.३** | **१६८.२** | **१३४.८** | **१२४.३** |
| **२. अन्नधान्येतर** | | | | | | | | |
| **(अ)गळिताची धान्ये** | | | | | | | | |
| (१) भूईमूग | ७.२३ | ७१.४ | १५८.९ | ७६.२ | ७१.३ | ७४.३ | ६०.९ | ३८.३ |
| (२) तीळ | ०.५७ | ९४.२ | २२३.७ | ८८.९ | ८४.२ | ५८.९ | ४४.२ | ३२.४ |
| (३) मोहरी, राई आणि जवस | ०.७८ | ७३.४ | ८६.५ | ३०.८ | ३८.९ | ५.१ | ६.८ | ३.४ |
| (४) एरंडी | ०.०१ | २५.० | १६६.७ | ३५८.३ | ५००.० | ३३३.३ | २५०.० | ४१६.७ |
| (५) सूर्यफूल | ०.५७ | ७६.८ | ६०९.८ | ३५२.३ | ४१५.१ | २६७.३ | १२२.६ | ६८.३ |
| **एकूण - गळिताची धान्ये** | **९.१६** | **७३.३** | **१८४.८** | **९०.६** | **९१.२** | **७९.८** | **५९.३** | **३७.३** |
| **(ब) तंतू पिके** | | | | | | | | |
| (१) कापूस | ९.८९ | ११०.४ | १२८.६ | १२३.६ | २१६.७ | ५१२.३ | ४६७.६ | ४६५.७ |
| (२) मेस्टा | ०.०४ | ४४.५ | ३८.० | ३६.५ | २७.७ | २६.४ | १.८ | २९.२ |
| **एकूण - तंतू पिके** | **९.९३** | **११०.१** | **१२८.२** | **१२३.२** | **२१५.९** | **५१०.४** | **४६५.७** | **४६४.०** |
| **(क)संकीर्ण** | | | | | | | | |
| (१) ऊस | २५.९७ | ११४.३ | १५८.२ | १८६.९ | १४६.३ | २९७.२ | ३३७.३ | २९२.५ |
| (२) तंबाखू | ०.१४ | ६८.३ | ११७.३ | १३८.१ | ९०.६ | ३२.७ | १६.३ | ०.० |
| (३) बटाटा | ०.२२ | ८४.२ | १२०.९ | १२१.९ | ९६.५ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| (४) मिरची | १.९२ | १०७.१ | १०२.२ | ८२.० | ६८.९ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| **एकूण - संकीर्ण** | **२८.२५** | **११३.३** | **१५३.९** | **१७९.०** | **१४०.४** | **२७३.४** | **३१०.१** | **२६८.९** |
| **एकूण - अन्नधान्येतर** | **४७.३४** | **१०४.९** | **१५४.५** | **१५०.२** | **१४६.७** | **२८५.६** | **२९४.२** | **२६५.०** |
| **सर्व पिके** | **१००.००** | **९७.४** | **१३६.५** | **१२७.४** | **१३५.४** | **२२३.८** | **२१०.३** | **१९०.९** |

*आधार*- कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - २००५-०६ ते २०१२-१३ चे निर्देशांक अस्थायी आहेत.

## परिशिष्ट ७.३
## राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी

(क्षेत्र '००० हेक्टर)

| वर्ष | भौगोलिक क्षेत्र | वनां-खालील क्षेत्र | मशागतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | मशागत न केलेले इतर क्षेत्र | | | पडीत जमिनी | | पिकांखालील क्षेत्र | | पिकां-खालील स्थूल क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नापीक व मशागतीस अयोग्य जमीन | बिगर-शेती वापराखाली आणलेली जमीन | मशागत-योग्य पडीत जमीन | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | किरकोळ झाडे, झुडपे यांच्या समूहा खालील क्षेत्र | चालू पड | इतर पड | निव्वळ पेरणी क्षेत्र | दुसोटा / तिसोटा क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १९८६-८७ | ३०,७५८ | ५,३५० | १,६७९ | १,१५२ | १,०४४ | १,३६७ | १९६ | ९०९ | १,०५७ | १८,००४ | २,३२० | २०,३२४ |
| १९९०-९१ | ३०,७५८ | ५,१२८ | १,६२२ | १,०९१ | ९६६ | १,१२५ | ३०१ | ८९८ | १,०६३ | १८,५६५ | ३,२९५ | २१,८५९ |
| १९९५-९६ | ३०,७५८ | ५,१४८ | १,५४४ | १,३४९ | ९६० | १,१६६ | २९२ | १,०७२ | १,२४८ | १७,९८० | ३,५२४ | २१,५०४ |
| २०००-०१ | ३०,७५८ | ५,१५० | १,५४४ | १,३६४ | ९५९ | १,१६८ | ३२७ | १,१२६ | १,२७६ | १७,८४४ | ३,७७५ | २१,६१९ |
| २००१-०२ | ३०,७५८ | ५,१५० | १,५४४ | १,३६८ | ९५९ | १,१६८ | ३२७ | १,७१७ | १,३०३ | १७,२२२ | ३,७६९ | २०,९९१ |
| २००२-०३ | ३०,७५८ | ५,१५० | १,५४४ | १,३७१ | ९५८ | १,१६८ | ३२८ | १,७३६ | १,३०८ | १७,१९५ | ३,७२० | २०,९१५ |
| २००३-०४ | ३०,७५८ | ५,२१४ | १,७२५ | १,३९० | ९१७ | १,२४९ | २५१ | १,३६४ | १,२१६ | १७,४३२ | ४,७५८ | २२,१९० |
| २००४-०५ | ३०,७५८ | ५,२१३ | १,७२६ | १,३९३ | ९१८ | १,२५१ | २४९ | १,३१६ | १,२०४ | १७,४९० | ४,८७८ | २२,३६८ |
| २००५-०६ | ३०,७५८ | ५,२१२ | १,७२० | १,४०७ | ९१४ | १,२५२ | २४९ | १,३२७ | १,२०४ | १७,४७३ | ५,०८३ | २२,५५६ |
| २००६-०७ | ३०,७५८ | ५,२१३ | १,७१९ | १,४१२ | ९१५ | १,२५२ | २४९ | १,३२४ | १,१९६ | १७,४७८ | ५,०७९ | २२,५५७ |
| २००७-०८ | ३०,७५८ | ५,२१३ | १,७१८ | १,४२७ | ९१६ | १,२४८ | २४८ | १,३२७ | १,१८८ | १७,४७३ | ५,१८२ | २२,६५५ |
| २००८-०९ | ३०,७५८ | ५,२१३ | १,७१८ | १,४३३ | ९१८ | १,२४६ | २४८ | १,३७२ | १,१८८ | १७,४२२ | ५,०३२ | २२,४५४ |
| २००९-१० | ३०,७५८ | ५,२१४ | १,७२९ | १,४४३ | ९१७ | १,२४२ | २५० | १,३७३ | १,१८९ | १७,४०१ | ५,२११ | २२,६१२ |
| २०१०-११ | ३०,७५८ | ५,२१६ | १,७३१ | १,४४९ | ९१९ | १,२४२ | २५० | १,३६६ | १,१७९ | १७,४०६ | ५,७६९ | २३,१७५ |
| २०११-१२ | ३०,७५८ | ५,२११ | १,७२८ | १,४५० | ९१९ | १,२४४ | २५० | १,३७८ | १,१९२ | १७,३८६ | ५,७२० | २३,१०६ |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - २००३-०४ ते २०११-१२ चे आकडे अस्थायी आहेत.

# परिशिष्ट ७.४
## कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, वहितीचे एकूण क्षेत्र व सरासरी क्षेत्र

| अनु. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती खातेदारांची संख्या ('००) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ६,८३४ | ९,९१४ | १६,६७२ | २२,४०९ | २७,४६२ | ३१,६५८ | ३६,४५७ |
| २ | ०.५ - १.० | ५,५८५ | ९,३४५ | १६,०७५ | २०,२५२ | २५,५९५ | २९,५२५ | ३०,६३३ |
| ३ | १.० - २.० | ८,७८३ | १५,४०९ | २७,२७६ | ३१,७५५ | ३६,०५६ | ४१,५०३ | ४०,५२३ |
| ४ | २.० - ३.० | ६,२६६ | १०,२७५ | १३,९६९ | १४,७४५ | १५,७९१ | १७,०२० | १५,४६३ |
| ५ | ३.० - ४.० | ४,६०६ | ६,५८३ | ७,२८९ | ६,७७४ | ६,९४९ | ७,४९६ | ६,१२८ |
| ६ | ४.० - ५.० | ३,५७६ | ४,६०१ | ४,४६९ | ३,८७४ | ३,७८० | ४,०३७ | ३,१४२ |
| ७ | ५.० - १०.० | ८,७१५ | ९,३१६ | ७,२४१ | ५,५५८ | ४,८७३ | ५,२१४ | ३,९६४ |
| ८ | १०.० - २०.० | ४,१८० | २,८१९ | १,५३० | १,०२९ | ७७३ | ६२२ | ५९० |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | ९६१ | ३६३ | १७६ | १३२ | ९७ | ८१ | ८९ |
| | **एकूण** | **४९,५०६** | **६८,६२५** | **९४,६९७** | **१,०६,५२८** | **१,२१,३७६** | **१,३७,१५६** | **१,३६,९८९** |

| अनु. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती एकूण क्षेत्र ('०० हेक्टर) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ |
| (१) | (२) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | १,६३४ | २,६३० | ४,११९ | ५,७४६ | ७,३२८ | ७,७४० | ९,१८० |
| २ | ०.५ - १.० | ४,१४२ | ७,१०३ | १२,०५७ | १५,१२० | १९,१५९ | २०,२७४ | २२,६८० |
| ३ | १.० - २.० | १२,८४२ | २३,३३७ | ३९,८३३ | ४६,०५९ | ५१,२७१ | ५२,४७६ | ५७,३९० |
| ४ | २.० - ३.० | १५,३८६ | २५,३६३ | ३३,६८९ | ३५,४२० | ३७,४१४ | ३७,५४२ | ३६,६८१ |
| ५ | ३.० - ४.० | १५,९२० | २२,८१५ | २५,१०८ | २३,३०३ | २३,६७६ | २३,७५६ | २०,९७४ |
| ६ | ४.० - ५.० | १५,९६१ | २०,५५६ | १९,८६४ | १७,२१० | १६,७१७ | १६,७१७ | १३,९०१ |
| ७ | ५.० - १०.० | ६१,२१३ | ६३,९३७ | ४८,७०० | ३७,१५० | ३२,०८४ | ३२,१३५ | २६,०२७ |
| ८ | १०.० - २०.० | ५६,३०२ | ३७,२१३ | १९,७४९ | १३,५१४ | ९,९६१ | ६,७७६ | ७,५२४ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २८,३९४ | १०,६६२ | ६,१२९ | ५,२७४ | ३,४१८ | २,६३४ | ३,३१४ |
| | **एकूण** | **२,११,७९४** | **२,१३,६१६** | **२,०९,२४८** | **१,९८,७९६** | **२,०१,०२८** | **२,००,०५०** | **१,९७,६७१** |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ७.४ (समाप्त)

| अनु. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती सरासरी क्षेत्र (हेक्टर) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ |
| (१) | (२) | (१७) | (१८) | (१९) | (२०) | (२१) | (२२) | (२३) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ०.२४ | ०.२७ | ०.२५ | ०.२६ | ०.२७ | ०.२४ | ०.२५ |
| २ | ०.५ - १.० | ०.७४ | ०.७६ | ०.७५ | ०.७५ | ०.७५ | ०.६९ | ०.७४ |
| ३ | १.० - २.० | १.४६ | १.५१ | १.४६ | १.४५ | १.४२ | १.२६ | १.४२ |
| ४ | २.० - ३.० | २.४६ | २.४७ | २.४१ | २.४० | २.३७ | २.२१ | २.३७ |
| ५ | ३.० - ४.० | ३.४६ | ३.४७ | ३.४४ | ३.४४ | ३.४१ | ३.१७ | ३.४२ |
| ६ | ४.० - ५.० | ४.४६ | ४.४७ | ४.४४ | ४.४४ | ४.४२ | ४.१४ | ४.४२ |
| ७ | ५.० - १०.० | ७.०२ | ६.८६ | ६.७३ | ६.६८ | ६.५८ | ६.१६ | ६.५७ |
| ८ | १०.० - २०.० | १३.४७ | १३.२० | १२.९१ | १३.१३ | १२.८९ | १०.८९ | १२.७५ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २९.५५ | २९.३७ | ३४.८२ | ३९.९५ | ३५.२४ | ३२.५२ | ३७.२४ |
| | **एकूण** | **४.२८** | **३.११** | **२.२१** | **१.८७** | **१.६६** | **१.४६** | **१.४४** |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ७.५
## राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र

('००० हेक्टर)

| अ. क्र. | वर्ष | सिंचित क्षेत्र | | | | ओलिताखालील पिकांची सघनता | सिंचन विहिरींची संख्या (हजारात) | दर विहिरीमागे सिंचित निव्वळ क्षेत्र (हेक्टरमध्ये) | पिकांखालील एकूण क्षेत्र | स्थूल सिंचित क्षेत्राची पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विहिरी | इतर साधने | निव्वळ क्षेत्र | एकूण क्षेत्र | | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | ५९५ | ४७७ | १,०७२ | १,२२० | ११४ | ५४२ | १.१० | १८,८२३ | ६.५ |
| २ | १९७०-७१ | ७६८ | ५७९ | १,३४७ | १,५७० | ११७ | ६९४ | १.११ | १८,७३७ | ८.४ |
| ३ | १९८०-८१ | १,०५५ | ७८० | १,८३५ | २,४१५ | १३२ | ८२६ | १.२८ | १९,६४२ | १२.३ |
| ४ | १९९०-९१ | १,६७२ | ९९९ | २,६७१ | ३,३१९ | १२४ | १,०१७ | १.६४ | २१,८५९ | १५.२ |
| ५ | १९९५-९६ | १,८७० | १,०१० | २,८८० | ३,५५० | १२३ | १,२२९ | १.५२ | २१,५०४ | १६.५ |
| ६ | २०००-०१ | २,२६२ | ९८७ | ३,२४९ | ३,८५२ | ११९ | १,३१८ | १.७२ | २१,६१९ | १७.८ |
| ७ | २००१-०२ | २,१४६ | ९९० | ३,१३६ | ३,७२७ | ११९ | १,३२२ | १.५२ | २०,९९१ | १७.८ |
| ८ | २००२-०३ | २,१४५ | १,०७१ | ३,२१६ | ३,८०६ | ११८ | १,३३१ | १.६१ | २०,९१५ | १८.२ |
| ९ | २००३-०४ | १,९१४ | १,०३० | २,९४४ | ३,६३६ | १२३ | उ.ना. | उ.ना. | २२,१९० | १६.४ |
| १० | २००४-०५ | १,९४२ | १,००१ | २,९९३ | ३,६६५ | १२५ | उ.ना. | उ.ना. | २२,३७६ | १६.४ |
| ११ | २००५-०६ | २,०७७ | १,०७० | ३,१४७ | ३,८१० | ११८ | उ.ना. | उ.ना. | २२,५५६ | १६.९ |
| १२ | २००६-०७ | २,१०९ | १,१३७ | ३,२४६ | ३,९५८ | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,५५७ | १७.६ |
| १३ | २००७-०८ | २,१५१ | १,१६० | ३,३११ | ४,०३७ | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,६५५ | १७.८ |
| १४ | २००८-०९ | २,११५ | १,१४० | ३,२५५ | ३,९७० | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,४५४ | १७.७ |
| १५ | २००९-१० | २,१५९ | १,१६२ | ३,३२१ | ४,०५० | १२२ | उ.ना. | उ.ना. | २२,६१२ | १७.९ |
| १६ | २०१०-११ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २३,१७५ | उ.ना. |
| १७ | २०११-१२ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २३,१०६ | उ.ना. |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

उ.ना. - उपलब्ध नाही.

टीप - (१) आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

(२) स्तंभ क्र.७ मध्ये (स्तंभ क्र.६ ÷ स्तंभ क्र.५) x १०० हे सूत्र वापरून सघनता काढली आहे.

(३) २००३ -०४ ते २०११-१२ चे आकडे अस्थायी आहेत.

## परिशिष्ट ७.६

## सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी आकारणी, वसुली व थकबाकी

(₹ कोटी)

| वर्ष | पाणीपट्टी आकारणी | | | वसुली | | | वर्ष अखेर शिल्लक थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| २०००-०१ | ७४.४८ | ३६२.६० | ४३७.०८ | ४१.२३ | १५३.९९ | १९५.२२ | २२३.३९ | ५७१.३० | ७९४.६९ |
| २००१-०२ | ८४.७२ | ३६८.८३ | ४५३.५५ | ४३.५७ | २०८.१२ | २५१.६९ | २६४.५४ | ७३२.०१ | ९९६.५५ |
| २००२-०३ | ८३.१७ | ३६०.६८ | ४४३.८५ | ४२.०२ | ३३५.५० | ३७७.५२ | ३०३.७९ | ७५१.९९ | १,०५५.७८ |
| २००३-०४ | ९३.०३ | ३६०.२६ | ४५३.२९ | ४२.८९ | ३३५.२० | ३७८.०९ | ३७६.६३ | ३५३.०६ | ७२९.६९ |
| २००४-०५ | ७८.६९ | ४१८.४४ | ४९७.१३ | ४५.७८ | ४०२.५७ | ४४८.३५ | ४१५.५९ | ३७८.५९ | ७९४.१८ |
| २००५-०६ | ६८.२५ | ३५०.२८ | ४१८.५३ | ६४.०३ | ३४९.४५ | ४१३.४८ | ४१०.१८ | २८२.०९ | ६९२.२७ |
| २००६-०७ | ९०.७० | ४०८.७५ | ४९९.४५ | ७४.७२ | ४२०.२६ | ४९४.९८ | ४२७.०१ | २४५.८२ | ६७२.८२ |
| २००७-०८ | ११०.३५ | ५६३.८९ | ६७४.२४ | ७०.४७ | ५५६.५४ | ६२७.०१ | ४७३.७० | २७५.२० | ७४८.९० |
| २००८-०९ | ११२.९५ | ६९५.३७ | ८०८.३२ | ७१.०५ | ६०२.११ | ६७३.१६ | ५३१.१० | ४६६.३८ | १,००४.६१ |
| २००९-१० | ९५.०० | ७१५.११ | ८१०.११ | ६९.९४ | ७३२.६९ | ८०२.६३ | ५६१.७७ | ४६६.३८ | १,०२८.१५ |
| २०१०-११ | ९६.२४ | ६७०.४६ | ७६६.७० | ७९.०३ | ६६६.८७ | ७४५.९० | ७४५.९० | ४६८.६२ | १,०४७.९० |
| २०११-१२ | १०९.७३ | ५४१.०६ | ६५०.७९ | ७९.१३ | ५४१.१३ | ६२०.२६ | ६०८.८७ | ४६१.७४ | १,०७०.६१ |
| २०१२-१३ | ८२.९८ | ६७०.१२ | ७५३.१० | ६३.१० | ४४३.०५ | ५०६.१५ | ६१८.७८ | ६५६.५२ | १,२७५.३० |

*आधार* - जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

# परिशिष्ट ७.७
# महाराष्ट्र राज्यातील पशुधन आणि कोंबड्या व बदके

('०००)

| अनु. क्रमांक | वर्ष | गाई-बैल | म्हशी-रेडे | मेंढ्या व शेळ्या | इतर पशुधन+ | एकूण पशुधन | दर शंभर हेक्टर चराई क्षेत्रामागे शेळ्या, मेंढ्या (संख्या) | पिकांखालील दर शंभर हेक्टर निव्वळ क्षेत्रामागे पशुधन (संख्या) | दर लाख लोकसंख्येमागे पशुधन | एकूण कोंबड्या व बदके |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६१ | १५,३२८ | ३,०८७ | ७,२७३ | ३६० | २६,०४८ | ५१२ | १४४ | ६६ | १०,५७८ |
| २ | १९६६ | १४,७२९ | ३,०४२ | ७,३२६ | ३५२ | २५,४४९ | ५२२ | १४० | ५७ | ९,९०२ |
| ३ | १९७२ | १४,७०५ | ३,३०१ | ८,०३८ | ३१७ | २६,३६१ | ४९१ | १६४ | ५२ | १२,२१७ |
| ४ | १९७८ | १५,२१८ | ३,८९९ | १०,१९९ | ३२६ | २९,६४२ | ६५० | १६२ | ५१ | १८,७९१ |
| ५ | १९८२ | १६,१६२ | ३,९७२ | १०,३७६ | ४०९ | ३०,९१९ | ६७३ | १७५ | ४८ | १९,८४५ |
| ६ | १९८७ | १६,९८३ | ४,७५५ | १२,०६८ | ४४९ | ३४,२५५ | ९५० | १८९ | ४८ | २४,८३९ |
| ७ | १९९२ | १७,४४१ | ५,४४७ | १३,०१६ | ४८९ | ३६,३९३ | ९४० | २०२ | ४५ | ३२,१८७ |
| ८ | १९९७ | १८,०७१ | ६,०७३ | १४,८०२ | ६९२ | ३९,६३८ | १,१०४ | २२३ | ५० | ३५,३९२ |
| ९ | २००३ | १६,७३८ | ६,०८४ | १३,६२४ | ६१२ | ३७,०५८ | १,०१६ | २१३ | ३९ | ३४,५९६ |
| १० | २००७* | १६,१८४ | ६,०७३ | १३,३०१ | ३९७ | ३५,९५५ | १,०६४ | २०६ | ३७ | ६४,७५६ |

*आधार* - पशुधन गणना

टीप - * अस्थायी

+ इतर पशुधन या बाबीमध्ये डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट, गाढवे यांचा समावेश करण्यात आला आहे.

८

# उद्योग आणि सहकार



# ८. उद्योग आणि सहकार

## उद्योग

८.१ देशाच्या औद्योगिक उत्पादन, गुंतवणूक व आर्थिक वाढीमध्ये राज्याचे प्रमुख स्थान आहे. राज्याने १९९३ मध्ये पहिल्या औद्योगिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर आणि त्यामध्ये कालानुरुप सुधारणा केल्यामुळे खाजगी गुंतवणूक आकर्षित करणे, परकीय उद्योजकांशी तांत्रिक व आर्थिक सहकार्य, उच्च प्रतीच्या पायाभूत सुविधांची निर्मिती, कृषि व अन्न प्रक्रिया केंद्रांचा विकास, पर्यटन व मनोरंजन उद्योगामध्ये गुंतवणूक, इत्यादि बाबींचे सुलभीकरण होऊन परिणामी राज्यातील आद्योगिक क्षेत्राचा अधिक विकास व वाढ होण्यामध्ये झाला आहे. राज्यातील विकसित पायाभूत सुविधा, विविध कौशल्य आणि साधनांची मुबलकता, औद्योगिक क्षेत्राच्या वाढीसाठी पोषक असलेले कार्यक्षम सेवाक्षेत्र, मोठ्या प्रमाणातील शहरीकरण, महत्वाच्या सर्व प्रदेशांशी संपर्क सुविधा, सामाजिक - आर्थिक विकास, इत्यादि बाबी राज्यात गुंतवणूक व नवीन उद्योग उभारणीसाठी अनुकूल आहेत.

८.२ गतीशील, शाश्वत व समतोल प्रादेशिक विकास, रोजगार निर्मितीस चालना देण्यास आणि स्थानिक उद्योगांची कार्यक्षमता सुधारण्यास राज्य कटीबद्ध आहे. महाराष्ट्रास जागतिक स्तरावरील एक गतीशील व टिकाऊ गुंतवणुकीचे आणि सर्वसमावेशक वाढीचे स्पर्धात्मक उत्पादन केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून राज्याने २२ फेब्रुवारी, २०१३ रोजी राज्याचे औद्योगिक धोरण, २०१३ जाहीर केले असून हे धोरण मार्च, २०१८ पर्यंत वैध राहील.

### औद्योगिक धोरण, २०१३

८.३ धोरणाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- देशातील औद्योगिक गुंतवणुकीतील महाराष्ट्राचे अग्रस्थान कायम राखणे.
- औद्योगिकदृष्ट्या मागास भागात गुंतवणुकीचा ओघ वाढविण्यास अधिक चालना देणे.
- रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करणे.

८.४ धोरणामधील उद्दिष्टांना अनुसरुन शासनाने खालील लक्ष्ये निर्धारीत केली आहेत.

- वस्तुनिर्माण क्षेत्रात १२ ते १३ टक्के वार्षिक वाढ साध्य करणे.
- स्थूल राज्य उत्पन्नामध्ये वस्तुनिर्माण क्षेत्राचा वाटा २८ टक्क्यांपर्यंत वाढविणे.
- २० लाख नवीन रोजगार निर्माण करणे.
- ₹ पाच लाख कोटी गुंतवणूक आकर्षित करणे.

## औद्योगिक गुंतवणूक

### आवेदनपत्रे, इरादा पत्रे आणि निर्यातीभिमुख प्रकल्प

८.५ राज्याने रोजगार निर्मितीची सर्वाधिक क्षमता असलेले सर्वात जास्त प्रस्ताव प्राप्त केले आहेत. ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०१३ या कालावधीत एकूण ₹ १०,२१,६३३ कोटी गुंतवणुकीच्या १८,४०६ औद्योगिक प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. पैकी ₹ १,८२,२७३ कोटी गुंतवणुकीचे (१७.८ टक्के) ७,८१२ प्रकल्प (४२.४ टक्के) कार्यान्वित झाले असून त्यामधुन ९.६१ लाख रोजगार निर्माण झाला आहे, तर ₹ ७९,४०६ कोटी गुंतवणुकीच्या २,०६१ प्रकल्पांची अंमलबजावणी सुरु असून त्यामधुन २.९२ लाख रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. गुंतवणुकीसाठी देशामध्ये प्राप्त झालेले एकूण औद्योगिक प्रस्ताव आणि गुंतवणूक यामध्ये राज्याचा अनुक्रमे १८ आणि १० टक्के वाटा आहे. निवडक राज्यातील मंजूर औद्योगिक प्रस्ताव (आवेदनपत्रे, इरादा पत्रे आणि १०० टक्के निर्यातीभिमुख) याबाबत माहिती तक्ता ८.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१ निवडक राज्यातील मंजूर औद्योगिक प्रस्ताव (आवेदन पत्रे, इरादा पत्रे आणि १०० टक्के निर्यातीभिमुख)**

(ऑगस्ट, १९९१ ते ऑक्टोबर, २०१३)

| | महाराष्ट्र | गुजरात | तामिळनाडू | आंध्र प्रदेश | उत्तर प्रदेश | अखिल-भारत |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रस्ताव (संख्या) | १८,४०६ | १२,२३० | ९,१९१ | ८,३४१ | ७,८९२ | १,०२,१५७ |
| | (१८.०२) | (११.९७) | (९.००) | (८.१६) | (७.७३) | |
| गुंतवणूक (₹ कोटी) | १०,२१,६३३ | १२,७०,१७२ | ४,९३,३६९ | ९,०९,७९२ | ३,०३,२३३ | १,०५,२०,२३६ |
| | (९.७१) | (१२.०७) | (४.६९) | (८.६५) | (२.८८) | |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

टीप : कंसातील आकडे अखिल-भारताशी टक्केवारी दर्शवितात

## थेट विदेशी गुंतवणूक

८.६ ऑगस्ट, १९९१ ते मार्च, २०१२ या कालावधीत राज्यात थेट विदेशी गुंतवणुकीच्या ४,२४६ प्रकल्पांना (अखिल-भारत स्तरावर २०,६४३) मान्यता देण्यात आली असून त्यातील गुंतवणूक ₹ ९७,७९९ कोटी आहे (अखिल-भारत स्तरावर ₹ ४,२५,८११ कोटी). त्यापैकी ४५ टक्के प्रकल्प कार्यान्वित झाले असून १० टक्के प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येत आहे व त्यातील गुंतवणूक अनुक्रमे ५१ टक्के व आठ टक्के आहे. सन २०११-१२ मध्ये ₹ ५,४५४ कोटी गुंतवणुकीच्या १०५ प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. राज्याच्या औद्योगिक क्षेत्रात विदेशी गुंतवणूक करणा-या देशांमध्ये अमेरिका आणि मॉरिशस हे प्रमुख दोन देश असून या देशांचा एकूण थेट विदेशी गुंतवणुकीत अनुक्रमे १४ व १३ टक्के वाटा आहे.

८.७ राज्यामध्ये माहिती तंत्रज्ञान व वित्तीय सेवा ह्या उद्योग गटांनी मोठ्या प्रमाणात थेट विदेशी गुंतवणूक प्राप्त करण्यात सातत्य राखले आहे. उद्योग गटनिहाय मंजूर विदेशी थेट गुंतवणुकीचे प्रस्ताव याबाबतची माहिती तक्ता ८.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२ उद्योग गटनिहाय मंजूर विदेशी थेट गुंतवणुकीचे प्रस्ताव**

(ऑगस्ट, १९९१ ते मार्च, २०१२)

| उद्योग गट | प्रकल्प (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) |
|---|---|---|
| माहिती तंत्रज्ञान | ७६२ | १२,७६५ |
| वित्तीय सेवा | ६६७ | ११,८५८ |
| हॉटेल आणि पर्यटन उद्योग | ९५ | ६,३२६ |
| व्यवसाय व्यवस्थापन सल्ला | ३६९ | ४,९६२ |
| परिवहन | १०८ | ४,१२४ |
| सिमेंट आणि सिरॅमिक्स | ५८ | ३,७२७ |
| उर्जा व इंधन | ३९ | २,८४१ |
| रसायने व खते | १९७ | २,६६६ |
| विद्युत सामुग्री आणि इलेक्ट्रॉनिक्स | २१२ | १,४६७ |
| कागद व कागदाचा लगदा | ३१ | १,३२३ |
| वस्त्रोद्योग | १२२ | १,०५१ |
| अन्न प्रक्रिया | १७३ | १,०३९ |
| औषधे व औषधी द्रव्ये | १२१ | १,०१२ |
| मोटार वाहने | ११२ | ८९५ |
| दूरसंचार उद्योग | ५१ | ८७६ |
| औद्योगिक यंत्रसामुग्री | २६१ | ७७१ |
| प्लॅस्टिक आणि रबर वस्तू | २७ | ७६७ |
| यंत्रसामुग्री / औद्योगिक उपकरणे | ८९ | ७१७ |
| रत्ने व आभुषणे आणि काच उद्योग | ५८ | ६३१ |
| इतर | ६९४ | ३७,९८१ |
| **एकूण** | **४,२४६** | **९७,७९९** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## विशाल व मोठ्या प्रकल्पांमधील गुंतवणूक

८.८ राज्यामध्ये ऑगस्ट, १९९१ ते १५ जुलै, २०१३ पर्यंत ३८९ विशाल व मोठ्या प्रकल्पांना सामंजस्य कराराच्या माध्यमातून मान्यता देण्यात आली असून त्यामधून ₹ ३,१५,०१० कोटींची गुंतवणूक व ३.५० लाख रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. यापैकी ₹ ६४,००९ कोटी गुंतवणुकीचे १२० प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्यामधून ०.९० लाख रोजगार निर्माण झाला आहे. तर ₹ ९२,५९० कोटी गुंतवणुकीच्या १२१ प्रकल्पांची अंमलबजावणी सुरु असून १.१४ लाख रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे.

## सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमधील गुंतवणूक

८.९ वस्तुनिर्माण आणि सेवा पुरविणाऱ्या उपक्रमांपैकी वस्तुनिर्माण उपक्रमांचे त्यांच्या यंत्रसामग्रीतील गुंतवणुकीच्या आधारे व सेवा पुरविणाऱ्या उपक्रमांचे साधनसामग्रीच्या मूल्याच्या आधारे सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम असे वर्गीकरण करण्यात आले आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम चौथी गणना २००६-०७, अनुसार राज्यात ३१ मार्च, २००७ रोजी एकूण ८६,६३५ उद्योग कार्यरत होते, त्यामधील गुंतवणूक ₹ १४,८५९ कोटी होती व रोजगार १०.९५ लाख होता. डिसेंबर, २०१३ पर्यंत एकूण ₹ ४३,६२४ कोटी गुंतवणुकीचे १,८१,११९ सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम कार्यरत असून त्यामधून २३.३६ लाख रोजगार निर्माण झाला आहे. वर्षनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमधील गुंतवणूक व रोजगार आणि विभागनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती तक्ता ८.३ व तक्ता ८.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.३ वर्षनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांमधील गुंतवणूक व रोजगार**

| वर्ष | सूक्ष्म,लघु व मध्यम | गुंतवणूक (₹ कोटी) | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|
| २००७-०८ | १०,२४४ | २,२८१ | १.३९ |
| २००८-०९ | ११,६८२ | ३,२९५ | १.७१ |
| २००९-१० | ११,८९६ | ३,०२८ | १.५० |
| २०१०-११ | १४,४९६ | ५,५६३ | १.८७ |
| २०११-१२ | १५,६०६ | ४,४४३ | २.०७ |
| २०१२-१३ | १६,१३६ | ५,४५५ | २.०६ |
| २०१३-१४ + | १४,४२४ | ४,७०० | १.८१ |

*आधार*: उद्योग संचालनालय,महाराष्ट्र शासन +डिसेंबरपर्यंत

**तक्ता ८.४ विभागनिहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती**

डिसेंबर, २०१३ पर्यंत

| विभाग | सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | टक्केवारी | रोजगार (लाख) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| मुंबई | १८,३८१ | १०.१ | २.८५ | १२.२ |
| कोकण (मुंबई वगळून) | २९,६०३ | १६.३ | ४.६३ | १९.८ |
| नाशिक | २१,४६७ | ११.९ | २.७० | ११.६ |
| पुणे | ७५,०८० | ४१.५ | ८.६८ | ३७.२ |
| औरंगाबाद | ११,९५४ | ६.६ | १.४९ | ६.४ |
| अमरावती | ७,४२६ | ४.१ | ०.९० | ३.८ |
| नागपूर | १७,२०८ | ९.५ | २.११ | ९.० |
| **एकूण** | **१,८१,११९** | **१००.०** | **२३.३६** | **१००.०** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्रातून निर्यात

८.१० राज्यातून मुख्यत्वे रत्ने व आभूषणे, सॉफ्टवेअर, वस्त्र, तयार कपडे, सुती धागे, धातू व धातू उत्पादने, शेतमालावर आधारित उत्पादने, अभियांत्रिकी उपकरणे, औषधे व औषधी द्रव्ये आणि प्लास्टिक व प्लास्टिकच्या वस्तू यांची निर्यात होते. निर्यातदारांनी केलेल्या प्रयत्नांची दखल घेऊन राज्यातील निर्यात वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी ‘निर्यातदारांना निर्यात कामगिरीबाबत पुरस्कार’ देणे, आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या लघु उद्योग घटकांना भुई भाडे अनुदान देणे याबाबत शासन पुढाकार घेत आहे. महाराष्ट्र आणि भारतातून झालेली निर्यात तक्ता ८.५ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता ८.५ महाराष्ट्र आणि भारतातून निर्यात**

( ₹ कोटी)

| वर्ष | महाराष्ट्र | भारत |
|---|---|---|
| २००८-०९ | २,२६,७९४ | ८,३९,९७७ |
| २००९-१० | २,२८,१८४ | ८,४५,१२५ |
| २०१०-११ | ३,०८,५१५ | ११,४२,६४९ |
| २०११-१२ | ३,९४,००५ | १४,५९,२८० |
| २०१२-१३ | ४,१७,६२६ | १५,४६,७६६ |
| २०१३-१४+ | २,८८,३८४ | १०,६८,०८९ |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन + ऑक्टोबरपर्यंत

## उद्योगांना वित्तीय सहाय्य

८.११ सिकॉम लि., महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यासारख्या राज्यस्तरीय वित्तीय संस्था आणि भारतीय आयुर्विमा महामंडळ, भारतीय साधारण विमा महामंडळ, आयएफसीआय लि., भारतीय लघु उद्योग विकास बँक यासारख्या केंद्रस्तरीय वित्तीय संस्थांद्वारे राज्यातील उद्योगांना वित्तीय सहाय्य पुरविले जाते. याबाबतची माहिती परिशिष्ट ८.१ मध्ये दिली आहे.

## विशेष आर्थिक क्षेत्रे

८.१२ आर्थिक वाढीस चालना मिळण्यासाठी राज्याने फेब्रुवारी, २००६ पासून विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) धोरण स्विकारले आहे. डिसेंबर, २०१३ पर्यन्त राज्यात २३६ विशेष आर्थिक क्षेत्रांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. या प्राप्त प्रस्तावांपैकी १२४ प्रस्तावांना केंद्र शासनाकडून मान्यता (१०४ औपचारिकरित्या व २० तत्वत:) देण्यात आली असून त्यापैकी ६५ प्रस्ताव अधिसूचित झाले आहेत. राज्यामध्ये ३१ डिसेंबर, २०१३ रोजी ₹ १६,५२४ कोटी गुंतवणुकीच्या १८ विशेष आर्थिक क्षेत्रांची अंमलबजावणी २,५२८ हेक्टर क्षेत्रावर झाली असून त्यामधून सुमारे ८.६० लाख रोजगार निर्माण झाला आहे. मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रे याबाबतची माहिती तक्ता ८.६ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ८.६ मंजूर व अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रे**

(डिसेंबर, २०१३ पर्यंत)

| विभाग | विशेष आर्थिक क्षेत्रांची संख्या | | | क्षेत्र (हेक्टर) | | | प्रस्तावित रोजगार (लाख) | | | प्रस्तावित गुंतवणूक ( ₹ कोटी ) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित | मंजूर | अधिसूचित | कार्यान्वित |
| कोंकण | ६० | २८ | ३ | १५,४३२ | २,४१८ | १९२ | ३५.५६ | ९.५४ | १.३४ | ८२,८१४ | ३२,८४६ | ३,३६१ |
| पुणे | ३७ | २१ | ११ | ५,११७ | २,६१९ | ४१२ | १०.८१ | ६.१७ | ३.५० | ४२,८४३ | ३४,९८० | ८,७७६ |
| नाशिक | ६ | १ | ० | १,४२८ | १,१५९ | ० | २.१२ | १.२५ | ० | २,८८२ | १,३८० | ० |
| औरंगाबाद | ११ | ७ | २ | ३,३९६ | ७८६ | २२५ | १.३७ | ०.३१ | ०.१५ | ३,६५५ | १,७७५ | ६०० |
| अमरावती | २ | २ | ० | १,११० | १,११० | ० | ०.३५ | ०.३५ | ० | २,३६० | २,३६० | ० |
| नागपूर | ८ | ६ | २ | ३,२०६ | २,०९६ | १,६९९ | ५.५१ | ३.९७ | ३.६१ | ९,२३५ | ४,५८८ | ३,७८७ |
| **एकूण** | **१२४** | **६५** | **१८** | **२९,६८९** | **१०,१८८** | **२,५२८** | **५५.७२** | **२१.५९** | **८.६०** | **१,४३,७८९** | **७७,९२९** | **१६,५२४** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## माहिती तंत्रज्ञान संकुले

८.१३ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (मऔविम), सिडको व सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया यांनी सार्वजनिक क्षेत्रात एकूण ३७ माहिती तंत्रज्ञान संकुले विकसित केली आहेत. खाजगी क्षेत्राला सहभागी करुन माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता ४९४ खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले मंजूर करण्यात आली. त्यापैकी २९ विकासकांनी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील जागतिक मंदीमुळे प्रकल्प उभारणीमधून माघार घेतली. उर्वरीत ४६५ माहिती तंत्रज्ञान संकुलांपैकी १४४ कार्यरत झाली आहेत व त्यामधील गुंतवणूक ₹ ३,३३२ कोटी इतकी असून त्यामधून सुमारे ४.४४ लाख रोजगार निर्माण झाला आहे. उर्वरित ३२१ माहिती तंत्रज्ञान संकुलांना इरादापत्रे दिली असून त्याद्वारे ₹ ८,९५५ कोटींची गुंतवणूक व ११.९४ लाख रोजगाराच्या संधी निर्माण होणे अपेक्षित आहे. खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले पुणे (१६६) या पाठोपाठ बृहन्मुंबई (१५८), ठाणे (१२८), नागपूर (५), नाशिक (४), औरंगाबाद (३) आणि वर्धा (१) या जिल्ह्यांमध्ये स्थापित झाली आहेत. सन २०१३-१४ मध्ये १५ खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले मंजूर करण्यात आली आहेत.

## जैव-तंत्रज्ञान संकुले

८.१४ राज्याने २००१ मध्ये जैव-तंत्रज्ञान धोरण जाहीर केले. राज्यात मऔविम परिसरात, जालना आणि हिंजेवाडी (पुणे) येथे सार्वजनिक क्षेत्रातील दोन जैव-तंत्रज्ञान संकुले विकसित करण्यात आली आहेत. सुमारे ₹ ३०५ कोटी गुंतवणुकीची पाच खाजगी जैव-तंत्रज्ञान संकुले विकसित करण्यात येत आहेत. राज्यामध्ये आठ सार्वजनिक क्षेत्रातील जैव-तंत्रज्ञानाची विशेष आर्थिक क्षेत्रे प्रस्तावित असून त्याद्वारे अंदाजे ₹ ४,००९ कोटीची गुंतवणूक व सुमारे ०.९४ लाख रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. नोंदणीकृत जैव-तंत्रज्ञान घटकांची माहिती तक्ता ८.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.७ नोंदणीकृत जैव-तंत्रज्ञान घटक**

(मार्च, २०१४ पर्यंत)

| जैव तंत्रज्ञान घटक | एकूण घटक | | गुंतवणूक (₹ कोटी) | | रोजगार | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नोंदणीकृत | इरादा पत्रे | नोंदणीकृत | इरादा पत्रे | नोंदणीकृत | इरादा पत्रे |
| सूक्ष्म, लघु व मध्यम | ५० | १५ | २६१.०० | १७९.५४ | ८७२ | ३३८ |
| मोठे | १६ | ७ | १,११९.८६ | ५३१.२० | ७१२ | ९३१ |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## सहकारी औद्योगिक वसाहती

८.१५ मऔविम क्षेत्राव्यतिरिक्त औद्योगिक वसाहती सहकारी तत्वावर विकसित करण्याचा कार्यक्रम राज्याने हाती घेतला आहे. उद्योग स्थापित करण्यासाठी भाग भांडवलातील हिस्सा व तांत्रिक सल्ला राज्य शासनाकडून देण्यात येतो. सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी राज्य शासन एकूण प्रकल्प खर्चाच्या २० टक्के इतके भांडवल देते तसेच वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के रकमेची हमी देते आणि उर्वरित २० टक्के रक्कम उद्योग स्थापन करणाऱ्या सभासदांना भाग भांडवल म्हणून जमा करावी लागते. ३१ डिसेंबर, २०१३ अखेर एकूण १४२ सहकारी औद्योगिक वसाहतींना मंजूरी दिली असून त्यापैकी १०१ वसाहती कार्यरत असून, ३४ वसाहती अद्याप कार्यान्वित व्हावयाच्या आहेत आणि उर्वरीत ७ अवसायनात गेल्या आहेत. शासनाने ९३ सहकारी वसाहतींना अर्थसहाय्य पुरविले आहे. डिसेंबर,२०१३ अखेर एकूण ७,२२२ घटक १०१ सहकारी औद्योगिक वसाहतींमध्ये कार्यरत असून त्यामधील रोजगार १.३७ लाख आहे. सहकारी औद्योगिक वसाहतींची स्थिती तक्ता ८.८ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ८.८ सहकारी औद्योगिक वसाहतींची स्थिती**

(डिसेंबर, २०१३ पर्यंत)

| विभाग | नोंदणीकृत | कार्यरत | कार्यरत उद्योग घटक | भाग भांडवल (₹ कोटी) | रोजगार |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई | ४ | ३ | १,२४८ | नगण्य | १७,२३० |
| कोंकण (मुंबई वगळून) | १४ | १२ | ५१० | १.०१ | ११,१५५ |
| नाशिक | ३३ | २८ | १,४५५ | ४.९२ | ४२,२९५ |
| पुणे | ४५ | ३८ | ३,१५० | ७.८४ | ५७,१५० |
| औरंगाबाद | २६ | १३ | ४६२ | १.०३ | ५,२६० |
| अमरावती | १० | ३ | ९२ | ०.२३ | ६७७ |
| नागपूर | १० | ४ | ३०५ | ०.९७ | ३,३१५ |
| **एकूण** | **१४२** | **१०१** | **७,२२२** | **१६.००** | **१,३७,०८२** |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## सामुहिक प्रोत्साहन योजना

८.१६ औद्योगिकदृष्ट्या कमी विकसित भागात उद्योगांच्या प्रसारास उत्तेजन देऊन या भागात नविन / विस्तारीत उद्योग घटक स्थापन करण्यासाठी राज्य शासन प्रोत्साहन पॅकेज देत आहे. सदर योजनेमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली असून राज्याने 'सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३' जाहीर केली आहे व ती एप्रिल, २०१३ ते मार्च, २०१८ पर्यंत अंमलात राहील. राज्याच्या खाजगी, सार्वजनिक / संयुक्त, सहकारी क्षेत्रातील आणि केंद्रिय सार्वजनिक क्षेत्रातील फक्त विशाल उद्योग घटक 'सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३' अंतर्गत प्रोत्साहन देण्यासाठी विचारात घेतले जातात. या योजनेअंतर्गत २०१३-१४ मध्ये ₹ २,२५० कोटी इतकी प्रोत्साहन रक्कम पात्र सुक्ष्म, लघु व मध्यम, मोठे आणि विशाल उद्योगांना वितरीत करण्यात आली. सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत वितरीत अनुदान तक्ता ८.९ मध्ये दिले आहे.

**तक्ता ८.९ सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत वितरीत अनुदान**

(₹ कोटी)

| वर्ष | वितरीत अनुदान |
|---|---|
| २००९-१० | ७५० |
| २०१०-११ | ७०० |
| २०११-१२ | २,३६६ |
| २०१२-१३ | २,४८० |
| २०१३-१४ | २,२५० |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## औद्योगिक समूह विकास कार्यक्रम

८.१७ सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांची उत्पादकता व स्पर्धा क्षमता उंचावण्यासाठी केंद्र शासनाने क्षमता असलेल्या समूहांच्या विकासासाठी मार्च, २००६ मध्ये योजना जाहीर केली असून त्यामध्ये उपलब्ध साधनसंपत्तीचा वापर करुन मध्यम ते दीर्घ कालावधीसाठी प्रभावी अंमलबजावणी व अधिकाधिक सातत्यपूर्ण विकास साधण्यावर भर दिला आहे.

८.१८ **सूक्ष्म, लघु उपक्रमांसाठी - औद्योगिक समूह विकास कार्यक्रम :** केंद्र शासनाने फेब्रुवारी, २०१० मध्ये सूक्ष्म, लघु उपक्रम-समूह विकास योजना सुधारित केली आहे. या योजनेखाली समूहांची उत्पादकता व स्पर्धात्मक क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी सामायिक सुविधा केंद्रांची स्थापना आणि पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाकडून सहाय्यक अनुदान स्वरुपात आर्थिक मदत देण्यात येते. सामायिक सुविधा केंद्रामध्ये संशोधन व विकाससंबंधी सुविधा, तयार माल आवेष्टीत करण्यासाठी केंद्र, चाचणी केंद्र, प्रशिक्षण केंद्र, सामायिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे, सामायिक प्रक्रिया केंद्र, इत्यादि बाबींचा समावेश आहे. सार्वजनिक खाजगी भागीदारीतून (PPP) विशेष हेतू सुविधा (SPV) द्वारे योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे, सामायिक सुविधा केंद्रांसाठी उपकरणांची खरेदी, सामायिक सुविधा केंद्र कार्यान्वित करणे, इत्यादि मध्यस्थी करण्यायोग्य विविध टप्प्यावरील ३३ समूह प्रकल्पांना केंद्र शासनाने प्राथमिक मंजूरी दिली आहे. केंद्र शासनाने २०१३-१४ मध्ये ₹ ६.४२ कोटी आणि मार्च, २०१४ पर्यंत एकूण ₹ २३.४३ कोटी अनुदान या योजनेखाली वितरीत केले आहे.

८.१९ **औद्योगिक पायाभूत सुविधा श्रेणीवाढ योजना :** केंद्र शासन २००३ पासून औद्योगिक पायाभूत सुविधा श्रेणीवाढ योजना राबवित आहे. दर्जेदार पायाभूत सुविधा सार्वजनिक खाजगी भागीदारीमधून (PPP) पुरवून निवडलेल्या कार्यरत उद्योग समुहांची स्पर्धात्मक क्षमता वृद्धिंगत करण्याचे योजनेचे उद्दिष्ट आहे. सद्य:स्थितीत पाच प्रस्ताव केंद्र शासनाने मंजूर केले असून तेथील काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. या प्रकल्पांमध्ये ॲटो क्लस्टर, पुणे, टेक्सटाईल क्लस्टर, इचलकरंजी, इंजिनिअरिंग क्लस्टर, नाशिक, ॲटोमोबाईल क्लस्टर, औरंगाबाद आणि फॉन्ड्री व इंजिनिअरिंग क्लस्टर, कोल्हापूर यांचा समावेश आहे. या प्रकल्पांची मंजूर किंमत ₹ ३१६ कोटी आहे. यामध्ये केंद्र शासनाचा सहभाग ₹ २०७ कोटी असून त्यापैकी ₹ १६३ कोटी वितरीत करण्यात आले आहेत. राज्य शासनाने या पुढाकारास हातभार लावण्याच्या उद्देशाने १० टक्के अनुदान देऊ केले असून त्यामुळे या प्रकल्पांची व्यवहार्यता आणखी वृद्धिंगत होईल. मार्च, २०१३ पर्यंत राज्य शासनाने यासाठी ₹ ७.२५ कोटी अनुदान वितरीत केले आहे.

८.२० **एकत्रित वस्त्र संकुल योजना :** वस्त्र प्रावरणे व तत्संबंधी उपक्रमांना जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने 'एकत्रित वस्त्र संकुल योजना' सुरु केली आहे. ही योजना वस्त्र घटकांना जागतिक दर्जा साध्य करण्यास सहाय्यभूत आहे. सदर योजना सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) तत्त्वावर आधारीत असून सर्व मान्यताप्राप्त वस्त्र संकुलांच्या अंमलबजावणीसाठी व्यावसायिक यंत्रणेचे (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) सहकार्य घेण्यावर भर देते. या योजनेअंतर्गत वस्त्र संकुलांना ६०:४० या तत्वावर वित्तीय सहाय्य देण्यात येते. यामध्ये केंद्र शासनाकडून ₹ ४० कोटीच्या उच्चतम मर्यादेपर्यंत मंजूर रकमेच्या ४० टक्के सहाय्यक अनुदान दिले जाते. उर्वरित रक्कम प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेने विशेष हेतू सुविधेद्वारे (SPV) उभारावयाची आहे. या योजनेखाली नऊ वस्त्र संकुलांच्या ₹ ९७० कोटी किंमतीस मंजूरी देण्यात आली असून त्यामध्ये केंद्र शासनाचा वाटा ₹ ३२८ कोटी इतका आहे.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

८.२१ मऔविमची स्थापना रस्ते, पाणी, वीजपुरवठा व उद्योजकांसाठी इतर अंतर्गत सेवा यासारख्या अत्यावश्यक पायाभूत सोयी उपलब्ध करुन औद्योगिक क्षेत्राचा विकास करण्याकरिता करण्यात आली आहे. ३१ मार्च, २०१३ अखेर विकसित भूखंडाच्या ८८ टक्के भूखंड उद्योजकांना वितरीत करण्यात आले. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटकांची माहिती तक्ता ८.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१० महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटक**

(३१ मार्च, २०१३ रोजी)

| विभाग | घटक (संख्या) | | गुंतवणूक (₹ कोटी) | | रोजगार (लाख) | | भूखंड (संख्या) | | वितरीत भूखंडांची विकसित भूखंडांशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३ | २०१२ | २०१३ | २०१२ | २०१३ | विकसित | वितरीत | |
| मुंबई | ३०५ | ३०५ | ३,९१५ | ३,९०८ | ०.६५ | ०.५० | ३६८ | ३६५ | ९९.२ |
| कोकण (मुंबई वगळून) | ११,०७२ | ११,६४२ | १९,५४९ | २०,३०२ | २.७९ | २.८७ | १९,५२७ | १७,३६८ | ८८.९ |
| नाशिक | ६,७४७ | ७,००० | १०,६८३ | १६,२७७ | ०.६७ | ०.७१ | १०,९१३ | ९,९९७ | ९१.६ |
| पुणे | ९,५५४ | ९,९९८ | ३८,७७१ | ३९,०३१ | ३.६३ | ३.७४ | १९,४७६ | १७,२२८ | ८८.५ |
| औरंगाबाद | ५,९५५ | ६,१७४ | ५,०९२ | ५,९३६ | ०.५८ | ०.६४ | ११,१२० | १०,०६५ | ९०.५ |
| अमरावती | १,६७१ | १,८१० | ३,०७९ | ३,१२६ | ०.२३ | ०.२४ | ४,९१४ | ३,६०७ | ७३.४ |
| नागपूर | ३,०२४ | ३,१७१ | ८,६०५ | ८,८४९ | ०.६७ | ०.६९ | ७,५३७ | ६,४२९ | ८५.३ |
| **एकूण** | **३८,३२८** | **३९,३००** | **८९,६९४** | **९७,४२९** | **९.२१** | **९.३८** | **७३,८५५** | **६५,०५९** | **८८.१** |

*आधार*: मऔविम महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ

८.२२ महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लघु उद्योगाचा विकास करणेसाठी उद्योजकांना मदत करते. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची उलाढाल तक्ता ८.११ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ८.११ महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची उलाढाल**

(₹ कोटी)

| बाब | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४+ |
|---|---|---|---|
| कच्चा माल खरेदी | ९०.३९ | ३०.१९ | -- |
| पणन सहाय्य | ४५७.७९ | १८६.५४ | १०४.७६ |
| इतर | ५.६४ | ६.०९ | ५.११ |
| **एकूण** | ५५३.८२ | २२२.८२ | १०९.८७ |

*आधार*: महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ + डिसेंबरपर्यंत

## महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ

८.२३ राज्यातील खादी आणि ग्रामोद्योग उपक्रमांचे संघटन, विकास व विस्तार करणे हे महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे प्रमुख कार्य आहे. राज्यातील खादी व ग्रामोद्योग घटकांना २०१२-१३ मध्ये ₹ २५.१७ कोटी वित्तीय सहाय्य अनुदानाच्या स्वरुपात देण्यात आले आणि २०१३-१४ मध्ये ₹ ४०.०४ कोटी वाटप करणे प्रस्तावित आहे. खादी व ग्रामोद्योग घटकांची प्रगती तक्ता ८.१२ मध्ये दिली आहे.

८.२४ कारागीर रोजगार हमी योजनेअंतर्गत २०१२-१३ मध्ये २.७५ लाख कारागीरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. सन २०१३-१४ मध्ये ३.०६ लाख कारागीरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील असे अपेक्षित आहे.

**तक्ता ८.१२ खादी व ग्रामोद्योग घटकांची प्रगती**

| वर्ष | सहाय्यित घटक (लाख) | उत्पादन मूल्य (₹ कोटी) | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|
| २००८-०९ | २.६५ | १,६६१ | ६.६ |
| २००९-१० | २.७४ | १,९०८ | ६.९ |
| २०१०-११ | २.१८ | १,४७० | ४.३ |
| २०११-१२ | २.१५ | १,५०६ | ४.३ |
| २०१२-१३ | १.९१ | १,३७६ | ३.७ |

*आधार*: महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ

## महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

८.२५ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ राज्यात पर्यटन धोरण राबविणारी प्रमुख संस्था आहे. सन २०११-१२ मध्ये केंद्र शासन पुरस्कृत (१०० टक्के) सहा प्रकल्पांकरिता ₹ ८६.६४ कोटी मंजूर करण्यात आले असून त्यापैकी ₹ ४६.५३ कोटी केंद्र शासनाने वितरीत केले आहेत व ₹ ३४ कोटी इतका खर्च झाला आहे. सन २०१२-१३ मध्ये केंद्र पुरस्कृत (१०० टक्के) दोन प्रकल्पांकरिता ₹ ६७.३० कोटी मंजूर करण्यात आले असून त्यापैकी ₹ ९.०७ कोटी वितरीत केले आहेत व ₹ ३.५० कोटी इतका खर्च झाला आहे. सन २०१२-१३ मध्ये राज्य शासनाने १० प्रकल्पांसाठी ₹ ५९.४६ कोटी मंजूर केले असून ₹ ४१.५० कोटी वितरीत केले आहेत व ₹ ४०.०६ कोटी इतका खर्च झाला आहे. राज्याने मंजूर केलेला निधी व झालेला खर्च याबाबतची माहिती तक्ता ८.१३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१३ राज्याने मंजूर केलेला निधी व झालेला खर्च**

( ₹ लाख)

| वर्ष | प्रकल्प (संख्या) | मंजूर निधी | प्राप्त निधी | खर्च |
|---|---|---|---|---|
| २०११-१२ | ४३ | १२,५३७.६६ | ७,२९१.८० | ३,३२०.३४ |
| २०१२-१३ | १० | ५,९४५.६६ | ४,१५०.०० | ४,००६.३५ |
| २०१३-१४+ | ६ | २८,२४५.२६ | ७,२९०.०० | ४,०९३.३९ |

*आधार* : महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ + डिसेंबरपर्यंत

## खनिजे

८.२६ राज्यातील खनिज साठा क्षेत्र विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर आणि यवतमाळ, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व ठाणे या जिल्ह्यांमध्ये विखुरलेले असून तेथे कोळसा, चुनखडी, कच्चे मँगेनिज, बॉक्साईट, कच्चे लोखंड, डोलोमाईट, लॅटराईट, कायनाईट, फ्लोराईट (ग्रेडेड), क्रोमाईट, इत्यादी खनिजांचे साठे आढळून येतात. राज्यात उत्पादनक्षम खनिज साठा असणारे सुमारे ५८ हजार चौ.कि.मी. इतके क्षेत्र असून हे क्षेत्र राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या १९ टक्के आहे. ३१ मार्च, २०१३ पर्यंत राज्यात ०.६ लाख रोजगार असलेल्या प्रमुख खनिजांच्या २९१ खाणी कार्यरत आहेत. राज्यातील २०१२-१३ मध्ये उत्खनन केलेल्या खनिजांचे एकूण मूल्य ₹ ६,९५७ कोटी होते, यापैकी उत्खनन केलेल्या कोळशाचे मूल्य ₹ ५,६०३ कोटी (८० टक्के) होते. राज्यातील महत्वाच्या खनिजांचे उत्पादन व मूल्य परिशिष्ट ८.२ मध्ये दिले आहे.

## औद्योगिक उत्पादन निर्देशांक

८.२७ औद्योगिक क्षेत्राची वाढ औद्योगिक उत्पादन निर्देशांकाद्वारे मोजली जाते. सध्याच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकामध्ये खाणकाम व दगड खाणकाम, वस्तुनिर्माण व विद्युत या क्षेत्रांचा समावेश आहे. केंद्रीय सांख्यिकी कार्यालय अखिल-भारतीय स्तरावर मासिक औद्योगिक उत्पादन निर्देशांक संकलित करुन प्रसृत करते. अखिल-भारतीय स्तरावरील औद्योगिक उत्पादन निर्देशांक (पायाभूत वर्ष २००४-०५) एप्रिल, २०१२ - फेब्रुवारी, २०१३ मधील १७०.२ वरुन एप्रिल, २०१३ - फेब्रुवारी, २०१४ मध्ये १७०.० इतका कमी झाला. या निर्देशांकातील वाढ एप्रिल, २०१३ - फेब्रुवारी, २०१४ या कालावधीत (-) ०.१ टक्के होती, जी गतवर्षाच्या तत्सम कालावधीत ०.९ टक्के होती. अखिल-भारतीय औद्योगिक निर्देशांकांचा विस्तृत तपशील परिशिष्ट ८.३ मध्ये दिला आहे. गटनिहाय अखिल-भारतीय औद्योगिक उत्पादन निर्देशांकांचा तपशील तक्ता ८.१४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.१४ गटनिहाय अखिल-भारतीय औद्योगिक उत्पादन निर्देशांक**

(पायाभूत वर्ष २००४-०५ = १००)

| बाब | भार | औद्योगिक उत्पादन निर्देशांक एप्रिल ते फेब्रुवारी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | | २०१२-२०१३ | २०१३-२०१४ @ | |
| सर्वसाधारण निर्देशांक | १००.०० | १७०.२ | १७०.० | (-) ०.१ |
| खाणकाम व दगड खाणकाम | १४.१६ | १२३.६ | १२२.२ | (-) १.१ |
| वस्तुनिर्माण | ७५.५३ | १८१.१ | १७९.८ | (-) ०.७ |
| विद्युत | १०.३१ | १५४.४ | १६३.९ | ६.२ |

*आधार* : केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार @ शीघ्र अंदाज

## वार्षिक उद्योग पाहणी

८.२८ वार्षिक उद्योग पाहणीत (वाउपा) कारखाना अधिनियम, १९४८ खाली नोंद झालेल्या सर्व कारखान्यांचा आणि विडी व सिगारेट कामगार (रोजगाराच्या अटी) अधिनियम, १९६६ खाली नोंद झालेल्या विडी व सिगारेट आस्थापनांचा समावेश आहे. वार्षिक उद्योग पाहणी २०११-१२ च्या आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, स्थूल मूल्यवृद्धी व कामगार वेतन यामध्ये अखिल-भारतीय स्तरावर राज्याचा वाटा अनुक्रमे १८.३ टक्के व २०.३ टक्के असून इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. एकूण उद्योग, स्थिर भांडवल आणि रोजगार याबाबतीत राज्य देशामध्ये दुसऱ्या क्रमांकावर असून याबाबतीत राज्याचा वाटा अनुक्रमे १३.०, १३.४ आणि १२.७ टक्के होता.

८.२९ देशातील एकूण उत्पादन मूल्यामध्ये राज्याचा वाटा १७.४ टक्के आणि निव्वळ मूल्यवृद्धी मध्ये १८.७ टक्के होता. उद्योगांचे निवडक निर्देशक तक्ता ८.१५ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ८.१५ उद्योगांचे निवडक निर्देशक**

( ₹ कोटी)

| तपशील | २०१०-११ | | | २०११-१२ * | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | भारताशी टक्केवारी | महाराष्ट्र | भारत | भारताशी टक्केवारी |
| उद्योग (संख्या) | २७,८९२ | २,११,६६० | १३.२ | २८,२१५ | २,१७,५५४ | १३.० |
| स्थिर भांडवल | २,३२,६१२ | १६,०७,००७ | १४.५ | २,६०,९६६ | १९,४९,५५१ | १३.४ |
| खेळते भांडवल | ६७,१०३ | ६,२०,३६३ | १०.८ | ८६,९३२ | ५,८८,७९४ | १४.८ |
| एकूण उत्पादन | ७,८५,३६३ | ४६,७६,२१७ | १६.८ | १०,०५,३७८ | ५७,७६,०२४ | १७.४ |
| एकूण निविष्टी | ६,१६,८९५ | ३८,५१,०८४ | १६.० | ८,२६,१५६ | ४७,९८,६६६ | १७.२ |
| स्थूल मूल्यवृद्धी | १,६८,४६८ | ८,२५,१३३ | २०.४ | १,७९,२२२ | ९,७७,३५८ | १८.३ |
| निव्वळ मूल्यवृद्धी | १,४९,६९६ | ७,०४,५७६ | २१.३ | १,५६,७६६ | ८,३६,७०३ | १८.७ |
| रोजगार (लाखात) | १२.०३ | ९९.०१ | १२.२ | १३.२१ | १०४.३८ | १२.७ |
| नफा | ९१,८६८ | ३,९०,१६२ | २३.६ | ७८,४८८ | ४,५१,६३० | १७.४ |

*आधार:* केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार * अस्थायी

८.३० निव्वळ मूल्यवृध्दीच्या बाबतीत २०११-१२ मध्ये i) रसायने आणि रासायनिक उत्पादने (१८.४ टक्के), ii) कोळसा, शुध्द पेट्रोलियम यांची उत्पादने इत्यादी (१८.४ टक्के) आणि iii) यंत्रे व यंत्रसामुग्री, दुरुस्ती व उभारणी (१३.४ टक्के) हे प्रमुख उद्योग होते. या उद्योग गटांचे २०११-१२ मध्ये निव्वळ मूल्यवृध्दीमधील प्रमाण ५०.२ टक्के होते, तर स्थिर भांडवलातील प्रमाण २५.१ टक्के होते. वार्षिक उद्योग पाहणीनुसार राज्यातील उद्योगांबाबतची महत्वाची वैशिष्ट्ये परिशिष्ट ८.४ मध्ये दिली आहेत.

८.३१ राज्यातील २०११-१२ मधील प्रति कारखाना रोजगार, स्थिर भांडवलातील गुंतवणूक आणि उत्पादित वस्तू व सेवा यांचे मूल्य २०१०-११ च्या तुलनेत अनुक्रमे ९.३, १०.९ व २६.५ टक्क्यांनी जास्त आहे. महत्वाचे निर्देशक तक्ता ८.१६ मध्ये दिले असून त्यांचा भारत व राज्यांतील कल अनुक्रमे आलेख ८.१ व आलेख ८.२ मध्ये दर्शविला आहे.

## तक्ता ८.१६ महत्त्वाचे निर्देशक

(₹ लाख)

| निर्देशक | २०१०-११ | | २०११-१२ * | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| **अ) प्रति कारखाना** | | | | |
| स्थिर भांडवलातील गुंतवणूक | ८३४ | ७५९ | ९२५ | ८९६ |
| उत्पादित वस्तू व सेवा यांचे मूल्य | २,८१६ | २,२०९ | ३,५६३ | २,६५५ |
| निव्वळ मूल्यवृद्धी | ५३७ | ३३३ | ५५६ | ३८५ |
| रोजगार (संख्या) | ४३ | ४७ | ४७ | ४८ |
| **ब) प्रति कामगार** | | | | |
| कामगार उत्पादकता ** | १०.६५ | ८.२३ | ९.१९ | ८.३८ |
| निव्वळ मूल्यवृद्धी | १२.४४ | ७.१२ | ११.८७ | ८.०२ |
| वार्षिक मजुरी | १.१७ | ०.८६ | १.२९ | ०.९६ |

*आधार* : केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार    टीप : * अस्थायी    ** निव्वळ मूल्यवृध्दी प्रति वेतन

**आलेख ८.१ : महाराष्ट्र व भारतातील प्रति कारखाना निव्वळ मूल्यवृध्दी**




**आलेख ८.२ : महाराष्ट्र व भारतातील प्रति कामगार निव्वळ मूल्यवृध्दी**




८.३२ राज्यातील नोंदणीकृत उद्योग क्षेत्राच्या संरचनेत कालानुक्रमे लक्षणीय बदल झाले आहेत. राज्यातील ग्राहक वस्तू उद्योगांचे सापेक्ष महत्व सातत्याने कमी होऊन पुनर्निर्माण वस्तू उद्योगाचे महत्व वाढले आहे. ग्राहक वस्तू, भांडवली वस्तू व पुनर्निर्माण वस्तू उद्योग यांचा २०१०-११ मध्ये एकूण निव्वळ मूल्यवृद्धीमध्ये वाटा अनुक्रमे १२, ३० आणि ५८ टक्के होता. नोंदणीकृत उद्योग क्षेत्राची संरचना आलेख ८.३ मध्ये दर्शविली आहे.

**आलेख ८.३ : नोंदणीकृत उद्योग क्षेत्राची संरचना**



# सहकार

८.३३ देशामध्ये सहकार चळवळ सुरू करणारे महाराष्ट्र हे अग्रणी राज्य आहे. सामाजिक व आर्थिक विकासात विशेषत: रोजगार निर्मिती आणि सामाजिक ऐक्य यासाठी सहकार चळवळीने लक्षणीय योगदान दिले आहे. सहकार चळवळ सुरवातीला कृषि पतपुरवठा क्षेत्रापूरतीच मर्यादित होती. कालांतराने ती कृषि प्रक्रिया, कृषि पणन, ग्रामीण उद्योग, ग्राहक वस्तू भांडार, इत्यादी क्षेत्रामध्ये जलदगतीने पसरली.

८.३४ सहकारी संस्थांच्या आर्थिक कार्यांना चालना देण्याच्या दृष्टीने केंद्रशासनाने घटना दुरुस्ती करून "घटना (९७ वी सुधारणा) कायदा २०११" फेब्रुवारी, २०१२ पासून लागू केला. या अनुषंगाने राज्यानेदेखील "महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१३" निर्गमित केला आहे. त्याशिवाय राज्याने नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांचे मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी महाराष्ट्र अधिनियम १९६३ मध्ये सुधारणा केल्या.

**आलेख ८.४: सहकारी संस्थांतील खेळते भांडवल व येणे कर्ज**




**आलेख ८.५ : गटनिहाय सहकारी संस्थांचे वर्गीकरण व त्यांचे खेळते भांडवल**




८.३५ राज्यात ३१ मार्च, २०१३ रोजी सुमारे ५८१ लाख सभासद असलेल्या २.३१ लाख सहकारी संस्था कार्यरत होत्या. सहकारी संस्थांची प्रगती तक्ता ८.१७ मध्ये दिली आहे व दशवार्षिक मालिका परिशिष्ट ८.५ मध्ये दिली आहे.

## कृषि पतपुरवठा

८.३६ कृषि सहकारी पत संस्था, पतपुरवठा तसेच कृषि व संलग्न कार्यांना चालना देण्यात प्रमुख भूमिका बजावतात. राज्यातील कृषि सहकारांची संरचना त्रिस्तरीय असून राज्यस्तरावर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ही शिखर संस्था, जिल्हा स्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व ग्राम पातळीवर प्राथमिक सहकारी पत संस्था आहेत. कृषि सहकारी बँकांची प्रगती तक्ता ८.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१७ सहकारी संस्थांची प्रगती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३* | |
| संस्था (संख्या) | २,२७,९३८ | २,३०,६७३ | १.२ |
| सभासद (लाख) | ५५१ | ५८१ | ५.४ |
| भरणा भाग भांडवल | १६,३७९ | १७,४७७ | ६.७ |
| *या पैकी,* राज्य शासनाचे | २,९७४ | ३,११६ | ४.८ |
| खेळते भांडवल | २,५५,०४० | २,५८,७९९ | १.५ |
| ठेवी | १,३३,८०८ | १,५०,७२६ | १२.६ |
| स्थूल कर्ज | १,१२,७१० | १,१७,८७६ | ४.६ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ६०,४६० | ६०,२३६ | (-)०.४ |
| तोट्याची रक्कम | ६,४७८ | ७,१७५ | १०.८ |
| येणे कर्जे | १,१७,१२८ | १,१९,७६८ | २.३ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

**तक्ता ८.१८ कृषि सहकारी बँकांची प्रगती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३* | |
| **महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या.** | | | |
| सभासद ( संख्या) | २,००० | २,००० | ०.० |
| खेळते भांडवल | २४,२९० | २३,९२३ | (-) १.५ |
| ठेवी | १५,८६२ | १५,४२६ | (-) २.७ |
| स्थूल कर्ज | १२,३४७ | १३,७३३ | ११.२ |
| येणे कर्ज | १०,२८५ | ११,६०५ | १२.८ |
| थकीत कर्ज | १,८५६ | १,८२५ | (-) १.७ |
| **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (३१)** | | | |
| सभासद (लाखात) | १.५८ | १.६३ | ३.२ |
| खेळते भांडवल | ६७,१७३ | ७२,६१० | ८.१ |
| ठेवी | ४९,२३१ | ५३,३८२ | ८.४ |
| स्थूल कर्ज | ३३,४२३ | ४०,८७२ | २२.२ |
| येणे कर्ज | ३६,००६ | ४०,१९५ | ११.६ |
| थकीत कर्ज | ६,८०४ | ७,१६६ | ५.३ |
| **महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या.** @ | | | |
| सभासद (संख्या) | ८२७ | ८२७ | ०.० |
| खेळते भांडवल | २,०७३ | २,२०८ | ६.५ |
| ठेवी | ०.०१ | ०.०१ | ०.० |
| स्थूल कर्ज | - | - | - |
| येणे कर्ज | १,१३३ | १,१५५ | १.९ |
| थकीत कर्ज | १,११२ | १,१३९ | २.४ |
| **जिल्हास्तरीय सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका (२९)** | | | |
| सभासद (लाखात) | ११.१८ | ११.४३ | २ |
| खेळते भांडवल | १,३४९ | १,३१५ | (-)२.५ |
| ठेवी | ०.४४ | ०.३९ | (-)११.४ |
| स्थूल कर्ज | - | - | - |
| येणे कर्ज | ३२३ | ३०४ | (-)५.९ |
| थकीत कर्ज | ३०३ | २७८ | (-)८.३ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

@ अवसायनात गेल्याने कर्ज देणे बंद केले आहे

८.३७ प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था (प्राकृपसं) मुख्यत: शेतीच्या हंगामी कामांकरिता अल्प मुदतीसाठी कृषि पतपुरवठा करतात. प्राकृपसं मध्ये कृषि सेवा संस्था व आदिवासी सहकारी संस्थांचा समावेश आहे. ३१ मार्च, २०१३ अखेर तोट्यातील प्राकृपसंच्या संख्येत गतवर्षीच्या तुलनेत ७.२ टक्क्यांनी वाढ झाली असून कर्ज घेणा-यांच्या संख्येत १०.७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. प्राकृपसंची प्रगती तक्ता ८.१९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१९ प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांची प्रगती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३* | |
| संस्था (संख्या) | २१,४४३ | २१,२३८ | (-)१.० |
| सभासद (लाख) | १६१ | १६८ | ४.३ |
| खेळते भांडवल | १५,९०४ | १७,४४६ | ९.७ |
| स्वनिधी | २,९७२ | ३,३६२ | १३.१ |
| भाग भांडवल | २,०३९ | २,२३९ | ९.८ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ६ | ६ | ०.० |
| कर्जदार सभासद (लाख) | ३७.८१ | ४१.८६ | १०.७ |
| *त्यापैकी,* १) अत्यल्प भूधारक (१ हेक्टर पर्यंत) @ | २८.३ | २६.१ | लागू नाही |
| २) अल्पभूधारक (१ ते २ हेक्टर पर्यंत) @ | २३.९ | २२.५ | लागू नाही |
| स्थूल कर्ज | ८,५८७ | ८,३२४ | (-)३.१ |
| येणे कर्ज | १०,७१२ | १०,००९ | (-)६.६ |
| कर्ज वसुली | ७,६७२ | ७,२१८ | (-)५.९ |
| थकीत कर्ज | ३,९२३ | ४,४११ | १२.४ |
| तोट्यातील संस्था | ११,७४५ | १२,५८५ | ७.२ |
| तोटा | २,०४४ | २,३११ | १३.१ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन @ एकूण कर्जदार सभासदांशी टक्केवारी * अस्थायी

## डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना

८.३८ अल्प मुदतीच्या पीक कर्जाचा परतावा वेळेवर करण्यासाठी व्याज सवलत देवून शेतक-यांना प्रेरीत केले जाते. या योजनेअंतर्गत ₹ ०.२५ लाखापर्यंत कर्जावर चार टक्के' व ₹०.२५ लाखापेक्षा अधिक व रूपये तीन लाखांपर्यंतच्या कर्जावर दोन टक्के' व्याज सवलत दिली जाते. शेतकऱ्यांनी दरवर्षी ३० जून पर्यंत कर्जाची परतफेड करणे आवश्यक आहे. या योजनेवर सन २०१२-१३ मध्ये एकूण ₹ २१४.८६ कोटी इतका खर्च झाला होता आणि २४.७५ लाख लाभार्थी होते. त्याचप्रमाणे सन २०१३-१४ मध्ये २६.१८लाख लाभार्थ्यांवर ₹ २४९.९५ कोटी खर्च झाला.

## सहकारी उपसा जलसिंचन संस्थांना अर्थसहाय्य

८.३९ सहकारी उपसा जलसिंचन संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी शासन ₹ एक कोटी अथवा प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के यापैकी कमी असलेली रक्कम अनुदान स्वरूपात अर्थसहाय्य म्हणून देते. सन २०१२-१३ मध्ये ₹ २.३३ कोटी इतके अर्थसहाय्य ११ संस्थांना वितरीत करण्यात आले, तर सन २०१३-१४ मध्ये ₹ २.१२ कोटी इतके अर्थसहाय्य १४ संस्थांना वितरीत करण्यात आले.

**आलेख ८.६ : प्रमुख कृषि प्रक्रिया सहकारी संस्थेतील सभासद**




## कृषि प्रक्रिया सहकारी संस्था

८.४० कृषि प्रक्रिया सहकारी संस्था शेतकऱ्यांना उत्पादनाचा वाजवी मोबदला व ग्रामीण उद्योगांच्या वाढीला चालना देऊन त्याद्वारे रोजगार निर्मिती करून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्वाची भूमिका पार पाडतात. राज्य शासन सहकारी संस्थांना कृषि प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यासाठी अर्थ सहाय्य पुरविते. कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांचे सहकारी साखर कारखाने, कापूस पिंजणी व गासड्या बांधणी, सूत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग संस्था, दुग्ध संस्था व दुग्ध संघ आणि मत्स्य संस्था हे प्रमुख घटक आहेत. राज्यात ३१ मार्च, २०१३ रोजी ४८,९६५ कृषि प्रक्रिया सहकारी संस्था कार्यरत होत्या व त्यामध्ये ७८.५ लाख सभासद होते.

८.४१ राज्यात ३१ मार्च, २०१३ अखेर १४२ कापूस पिंजणी व गासड्या बांधणा-या सहकारी संस्था होत्या. या संस्थांच्या भाग भांडवलामध्ये राज्य शासनाचा २५ टक्के हिस्सा होता. सुमारे ५५ टक्के संस्था तोट्यात होत्या. कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्थांची प्रगती तक्ता ८.२० मध्ये दिली आहे.

८.४२ राज्यात ३१ मार्च, २०१३ रोजी १४८ सहकारी सूत गिरण्या होत्या. या सूत गिरण्यांच्या भाग भांडवलामध्ये राज्य शासनाचा ९० टक्के हिस्सा होता. सुमारे ३४ टक्के सूत गिरण्या तोट्यात होत्या. सहकारी सूत गिरण्यांची प्रगती तक्ता ८.२१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२० कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्थांची प्रगती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३* | |
| संस्था (संख्या) | १६१ | १४२ | (-)११.८ |
| *त्यापैकी,* उत्पादन चालू असलेल्या | १३१ | १२९ | (-)१.५ |
| सभासद ('००) | २,०२७ | १,९९७ | (-)१.५ |
| भाग भांडवल | ८ | ८ | ० |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | २ | २ | ० |
| खेळते भांडवल | ९० | ९५ | ५.६ |
| पिंजणी केलेला कापूस (मे. टन) | १५७ | १६० | १.९ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ९८ | ७८ | (-)२०.४ |
| तोट्याची रक्कम | २ | २ | ०.० |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

**तक्ता ८.२१ सहकारी सूत गिरण्यांची प्रगती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३* | |
| गिरण्यांची संख्या | १५३ | १४८ | (-)३.३ |
| *त्यापैकी,* उत्पादन चालू असलेल्या | ५९ | ६३ | ६.८ |
| सभासद ('००) | ५.३९४ | ५,४५३ | १.१ |
| भाग भांडवल | १,५६९ | १,६८३ | ७.३ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | १,४१२ | १,५१५ | ७.३ |
| चात्यांची संख्या (लाख) | १३.९ | १४.२ | २.२ |
| उत्पादित सूताचे मूल्य | २,३१८ | २,५७१ | १०.९ |
| तोट्यातील गिरण्या (संख्या) | ४६ | ५० | ८.७ |
| तोट्याची रक्कम | ८६९ | १,०२५ | १८.० |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

८.४३ राज्यात ३१ मार्च, २०१३ रोजी ६७० सहकारी हातमाग व १,८८० यंत्रमाग संस्था होत्या. सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांमधील भाग भांडवलात राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ७.५ व ७७.९ टक्के होता. सुमारे ५५.२ टक्के सहकारी हातमाग व ८.६ टक्के यंत्रमाग संस्था तोट्यात होत्या. सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांची प्रगती तक्ता ८.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२२ सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांची प्रगती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हातमाग | | शेकडा बदल | यंत्रमाग | | शेकडा बदल |
| | २०१२ | २०१३* | | २०१२ | २०१३* | |
| संस्था (संख्या) | ६८८ | ६७० | (-)२.६ | १,५७३ | १,८८० | १९.५ |
| सभासद ('००) | ८८७ | ८३० | (-)६.४ | ५२६ | ५६८ | ८.० |
| भाग भांडवल | ७६.५ | ८०.० | ४.६ | १२४.५ | १२१.२ | (-)२.७ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ४.५ | ६.० | ३४.२ | ९५.६ | ९४.४ | (-)१.३ |
| मागांची संख्या ('०००) | २४० | ३२६ | ३५.८ | २५६ | ३०२ | १७.९७ |
| उत्पादनाचे मूल्य | ६९ | ५० | (-)२७.५ | ६५ | ८५ | ३०.८ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ३१० | ३७० | १९.४ | ५७३ | १६२ | (-)७१.७ |
| तोट्याची रक्कम | १६ | १४ | (-)१२.५ | ६.५ | ७.३ | १२.४ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## साखर कारखाने

८.४४ देशातील एकूण साखर कारखान्यांपैकी ३१ टक्के कारखाने राज्यात असून त्या खालोखाल २३ टक्के कारखाने उत्तर प्रदेशात आहेत. मार्च, २०१४ अखेर देशातील एकूण गाळप झालेल्या साखरेच्या उत्पादनात राज्याचा हिस्सा ३२ टक्के होता, त्या खालोखाल उत्तर प्रदेश राज्याचा हिस्सा २७ टक्के होता. सहकारी साखर कारखान्यांची प्रगती तक्ता ८.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२३ सहकारी साखर कारखान्यांची प्रगती**

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३* | |
| नोंदणीकृत कारखाने (संख्या) | २०२ | २०२ | ०.० |
| उत्पादन चालू असलेले कारखाने (संख्या) | ११९ | १०८ | (-)९.२ |
| सभासद ('००) | २४,९८० | २४,५०० | १.३ |
| राज्य शासनाचे भाग भांडवल (लाख ) | १,०७६ | १,०८८ | १.१ |
| प्रतिदिन सरासरी गाळप क्षमता (लाख मे. टन) @ | ३.४ | ३.३ | (-)०.३ |
| गाळप झालेला ऊस (लाख मे. टन) | ५९१.४ | ५०४.६ | (-)१४.७ |
| उसाची किंमत (₹ प्रति टन ) | | | |
| अ) खरेदी | १,७०० | २,२१० | ३०.० |
| ब) कारखान्यांनी अदा केलेली | २,०२५ | २,४५० | २१.० |
| साखर उत्पादन (लाख मे. टन) | ६९.४ | ५८.४ | (-)१५.९ |
| सरासरी उतारा (टक्के) | ११.७ | ११.६ | (-)१.५ |
| मळी (लाख मे. टन) | २३.७ | ३६.४ | ५३.९ |
| कारखान्यांची संख्या | | | |
| अ) आसवनी प्रकल्प असलेल्या (KLPD) | ६८ | ६८ | ०.० |
| ब) सह-वीज निर्मिती प्रकल्प असलेल्या | ३७ | ३९ | ५.४ |
| वीज निर्मिती (दशलक्ष युनिट) | ६११ | ६२८ | २.८ |
| तोट्यातील कारखाने (संख्या) | ३५ | ३८ | ८.६ |

*आधार* : साखर आयुक्त, निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन  *अस्थायी  @ ऑक्टोबर ते सप्टेंबर करीता

## दूग्ध व्यवसाय

८.४५ राज्यात मार्च, २०१३ अखेर २६,५२७ सहकारी दुग्ध संस्था व ७६ सहकारी दुग्ध संघ होते. सुमारे ५१ टक्के सहकारी दुग्ध संस्था व ५३ टक्के दुग्ध संघ तोट्यात होते. सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ यांची प्रगती तक्ता ८.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२४ सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ यांची प्रगती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सहकारी दुग्ध संस्था | | शेकडा बदल | सहकारी दुग्ध संघ | | शेकडा बदल |
| | २०१२ | २०१३* | | २०१२ | २०१३* | |
| संस्था (संख्या) | २६,५७७ | २६,५२७ | (-)०.२ | ७९ | ७६ | (-)३.८ |
| सभासद (लाख) | ११.८४ | १०.४४ | (-)११.८ | ०.८० | ०.८१ | १.३ |
| भाग भांडवल | १२.९६ | ९.८१ | (-)२४.३ | ८२.७७ | ८६.३५ | ४.३ |
| खेळते भांडवल | २०.४० | २३.४७ | १५.१ | ६७.३४ | ७३.४९ | ९.१ |
| दूध खरेदी (किंमत) | २१८.७७ | २८७.२० | ३१.३ | ५७१.६३ | ६५९.६३ | १५.४ |
| दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री (किंमत) | २८४.४० | ३८१.९७ | ३४.३ | ७१४.८२ | ८९०.५० | २४.६ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | १२,९१४ | १३,५८६ | २०.७ | ३२ | ४० | २५.० |
| तोटा | १८.४२ | १९.०९ | ३.६ | ७५.८१ | ८०.५६ | ६.३ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन  * अस्थायी

## मत्स्यव्यवसाय

८.४६ राज्यात मार्च, २०१३ अखेर ३,११३ प्राथमिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था, ३७ मत्स्यव्यवसाय सहकारी संघ आणि दोन महासंघ कार्यरत होते. या संस्थांतील सभासदांची संख्या ३.३३ लाख असून त्यांचेकडील खेळते भांडवल ₹ २४७.३६ कोटी आहे. या संस्थांनी सन २०११-१२ मध्ये ₹ ५२०.०४ कोटी तर सन २०१२-१३ मध्ये ₹ ४४१.४८ कोटी किंमतीचे मासे व मत्स्योत्पादनाची विक्री केली.

## सहकारी पणन संस्था

८.४७ सहकारी पणन संस्थांची संरचना त्रिस्तरीय आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. ही शिखर संस्था असून जिल्हास्तरावर जिल्हा सहकारी पणन संस्था तर ग्रामस्तरावर प्राथमिक सहकारी पणन संस्था कार्यरत आहेत. मार्च, २०१३ अखेर सुमारे ३४ टक्के सहकारी पणन संस्था तोट्यात होत्या तर मार्च, २०१२ अखेर ४२ टक्के संस्था तोट्यात होत्या. सहकारी पणन संस्थांची प्रगती तक्ता ८.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२५ सहकारी पणन संस्थांची प्रगती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०११ | २०१२* | |
| संस्था (संख्या) | १,७६८ | १,७६२ | (- )०.३ |
| सभासद (लाखात) | १५ | १७ | १३.३ |
| भाग भांडवल | ७४ | ७९ | ६.८ |
| *त्यापैकी*, राज्य शासनाचे | २५ | २५ | ०.० |
| खेळते भांडवल | १४०६ | १३५३ | (-)३.८ |
| विक्री | | | |
| (अ) शेतमाल | ९०३ | ११२२ | २४.३ |
| (ब) खते | ३६५ | १६९ | (-)५३.७ |
| (क) बियाणे | ४४ | ४६ | ४.५ |
| (ड) ग्राहकपयोगी वस्तू | ४०६ | ४२४ | ४.४ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ७३७ | ५९० | (-)१९.९ |
| तोटा | २१ | २० | (-)४.८ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
* *अस्थायी*

## बिगर कृषि पतसंस्था

८.४८ राज्यात मार्च, २०१३ रोजी ५१७ नागरी सहकारी बँका, १४,९७१ नागरी सहकारी पतपुरवठा संस्था व ७,४११ पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था होत्या. एकूण बिगर कृषि पतपुरवठा संस्थांपैकी १६ टक्के संस्था तोट्यात होत्या. बिगर कृषि पतपुरवठा संस्थांची प्रगती तक्ता ८.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२६ बिगर कृषि पतपुरवठा संस्थांची प्रगती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३* | |
| संस्था (संख्या) | २२,८४७ | २२,८९९ | ०.२ |
| सभासद (लाख) | २२९ | २४३ | ६.१ |
| ठेवी | ६६,८४० | ७७,८०३ | १६.४ |
| स्वनिधी | १८,४१२ | २३,१०८ | २५.५ |
| भाग भांडवल | ६,५१३ | ७,०७९ | ८.७ |
| *त्यापैकी*, राज्य शासनाचे | ०.५ | ०.६ | २०.० |
| खेळते भांडवल | १,११,५६७ | १,०८,१९१ | (-)३.० |
| कर्ज वाटप- आगाऊ कर्ज | ५६,७८२ | ५३,३४४ | (-)६.१ |
| येणे कर्ज | ५०,८१२ | ४९,५४२ | (-)२.५ |
| थकित कर्ज | ७,४२७ | ७,१५९ | (-)३.६ |
| कर्ज वसुली | ४८,६४८ | ४७,४६९ | (-)२.४ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ५,४०५ | ५,१३३ | (-) ५.० |
| तोटा | ६३८ | ६३७ | (-)०.२ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
* *अस्थायी*

## नागरी सहकारी बँका

८.४९ देशातील एकूण १,६०६ नागरी सहकारी बँकांपैकी ३२.२ टक्के बँका राज्यात स्थित आहेत. दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी एकूण १०१ बँका अवसायनात आहेत. विमा उतरविलेल्या ९६ बँकांतील ₹ एक लाखा पेक्षा कमी रकमेच्या ठेवींना परतावा देण्यासाठी 'ठेवी विमा पत हमी महामंडळ' यांनी मान्यता दिली असून ठेवीच्या वितरणाची प्रक्रिया सुरू आहे. दोन बँकांनी न्यायालयाकडून स्थगिती मिळविली असून एका बँकेने केंद्र सरकारकडे अपिल केले आहे तर उर्वरीत दोन बँकांचे लेखा परिक्षण सुरू आहे.

## इतर सहकारी संस्था

८.५० राज्यात ३१ मार्च, २०१३ रोजी ९१,४५७ सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या, त्यातील सभासद संख्या २४ लाख होती. या संस्थांमध्ये एकूण ४२,२६७ कर्मचारी होते. तसेच ११,३९१ कंत्राटी मजूर संस्था होत्या त्यातील सभासद संख्या ६.९१ लाख होती. एकूण ६८,२०९ सदस्य संख्या असलेल्या ३३६ श्रमिक वन संस्था होत्या, त्यापैकी, १३० संस्था (३८.७ टक्के) नफ्यात होत्या.

## सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ

८.५१ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्या. ही राज्यातील गृहनिर्माण पतपुरवठा करणारी मध्यवर्ती संस्था आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्या. संस्थेची प्रगती तक्ता ८.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२७ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्या. संस्थेची प्रगती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३* | |
| सभासद (संख्या) | १०,८१५ | १०,६९० | (-)१.२ |
| ठेवी | ०.०२ | ०.०२ | ०.० |
| खेळते भांडवल | १०९.५३ | १०३.५२ | (-)५.५ |
| स्थूल कर्ज | ६४४ | ६४४ | ०.० |
| येणे कर्ज | ७७.८६ | ७१.७१ | (-)७.९ |
| थकीत कर्ज | २५.०३ | २६.०७ | ४.२ |
| कर्ज वसुली | १२.२५ | ६.१५ | (-)४९.८ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण महामंडळ मर्यादित * अस्थायी

## सहकारी ग्राहक महासंघ

८.५२ महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ ही शिखर संस्था असून ती जिल्हास्तरावर कार्यरत असलेल्या घाऊक ग्राहक भांडारांच्या कार्यावर नियंत्रण ठेवते. ही घाऊक ग्राहक भांडारे गाव पातळीवर कार्यरत असणाऱ्या प्राथमिक ग्राहक भांडारांना माल वितरीत करतात. राज्यात ३१ मार्च, २०१३ रोजी शिखर ग्राहक महासंघाव्यतिरिक्त १६७ घाऊक ग्राहक भांडारे व २,६६२ प्राथमिक ग्राहक भांडारे कार्यरत होती. ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची प्रगती तक्ता ८.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२८ ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची प्रगती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्राहक महासंघ | | घाऊक ग्राहक भांडार | | प्राथमिक ग्राहक भांडार | |
| | २०१२ | २०१३* | २०१२ | २०१३* | २०१२ | २०१३* |
| संख्या | १ | १ | १७३ | १६७ | २,७८७ | २,६६२ |
| सभासद ('००) | ६ | ६ | ३,४८० | ३,४३९ | १७,१६१ | १६,८१६ |
| भाग भांडवल | १.६५ | १.६५ | १९.४४ | २१.१५ | ३१.७६ | ३३.०२ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | १.१४ | १.१४ | ३.८८ | ५.०० | १.५६ | २.९३ |
| तोटा | ०.६६ | १.२३ | ३.९१ | ३.६० | ६.५३ | ७.६१ |
| तोट्यातील ग्राहक भांडारे (संख्या) | ६# | ७# | ७५ | १०२ | १,०२४ | १,००८ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी # शाखा

## खाजगी सावकार

८.५३ कृषि व बिगर-कृषि पतपुरवठा संस्थांव्यतिरिक्त खाजगी सावकारांना, वैयक्तिक कर्जाचे वाटप करण्यास राज्य शासनाने अनुमती दिली आहे. यासाठी परवाने सहकार आयुक्तालयामार्फत दिले जातात. खाजगी सावकारांची माहिती तक्ता ८.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२९ खाजगी सावकारांची माहिती**

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३* | |
| परवाना धारक (संख्या) | ९,७८० | ११,४५० | १७.१ |
| पारित केलेले नवीन परवाने (संख्या) | १,५९५ | २,५२९ | ५८.६ |
| नुतनीकरण केलेले परवाने (संख्या) | ८,१८५ | ८,९२१ | ९.० |
| रद्द केलेले परवाने (संख्या) | १७९ | ३३७ | ८८.३ |
| कर्जदार सभासद (व्यापारी / बिगर व्यापारी / शेतकरी ) | ८,५६,४७२ | ८,४६,५९३ | (-)१.२ |
| वाटप केलेले कर्ज (₹ कोटी) | ६७६ | ६५४ | (-)३.३ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
* अस्थायी

* * * * *

## परिशिष्ट ८.१
## महाराष्ट्र राज्यातील उद्योगांना वित्तीय संस्थांनी मंजूर केलेले व वितरित केलेले अर्थसहाय्य

(₹ कोटी)

| अनु. क्र. | वित्तिय संस्था | १९९०-९१ | | २०००-०१ | | २०१०-११ | | २०१२-१३* | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | वाटप | मंजूर | वाटप | मंजूर | वाटप | मंजूर | वाटप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ मर्यादित | ४०७.७७ | २५१.९३ | २७५.६० | २८८.४९ | ३,६१०.०० | २९३७.०१ | ४४१.५७ | १४६.८५ |
| २ | भारतीय लघु उद्योग विकास बँक | ३०६.७३ | २२७.२४ | २,०८१.८७ | १,३२०.७९ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| ३ | भारतीय उद्योग गुंतवणूक बँक मर्या. | ३३.५४ | २५.५४ | ५७६.५९ | ५६०.२७ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| ४ | भारतीय आयात - निर्यात बँक | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | ८,३६२.०० | ७,२३५.०० | ६,७८१.६३ | ७,८६१.५७ |
| ५ | भारतीय आयुर्विमा महामंडळ | २५४.५५ | ११०.५८ | ५,१५०.६५ | ३,९१९.१२ | २०,७४६.९४ | १९,३४५.२७ | २७,४१०.७६ | २५,३६६.१४ |
| ६ | भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ $ | १०८.३४ | ५२.२५ | ६१.४१ | ८८.६० | ६२७.४० | ६२७.४० | उ.ना. | ८७०.६५ |
| ७ | महाराष्ट्र राज्य वित्तिय महामंडळ | १५७.९७ | ९४.६१ | ६८.६३ | ४७.१२ | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ८ | सिकॉम मर्यादित | ८५.४० | ६८.८७ | ५९३.०० | ४६३.०० | ४,९४७.०० | ५,३४०.०० | ३,४८९.०० | ३,७९१.०० |
| ९ | इतर # | ३,३९१.३८ | १,९६१.०३ | ६१,२२०.०९ | ३५,८८६.७५ | --- | --- | --- | --- |
| | **एकूण** | **४,७४५.६८** | **२,८१२.०५** | **७०,०२७.८४** | **४२,५७४.१४** | **३८,२९३.३४** | **३५,४८४.६८** | **३८,१२२.९६** | **३८,९९३.६१** |

आधार - ह्या तक्त्यात उल्लेखिलेल्या वित्तीय संस्था

टीप - (१) # आयसीआयसीआय, भारतीय औद्योगिक विकास बँक व युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया या वित्तीय संस्थांनी केलेल्या अर्थसहाय्याचा यात समावेश आहे. या संस्थांनी उद्योगांना अर्थसहाय्य देणे बंद केले आहे.

(२) $ यामध्ये वित्तीय संस्थांची रोखे हमी व शासकीय रोखे हमीचा अंतर्भाव आहे.

* अस्थायी उ.ना. - उपलब्ध नाही.

# परिशिष्ट ८.२
# महाराष्ट्र राज्यातील खनिजांचे उत्पादन

(उत्पादन : हजार टनात)
(मूल्य : ₹ लाख)

| अ. क्र. | खनिज पदार्थ | उत्पादन / मूल्य | १९६१$ | १९७१$ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१२-१३ * |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मीठ | उत्पादन | ३८४ | ४७२ | ५४० | २२९ | १४८ | १८० | १६२ |
| २ | कोळसा | उत्पादन | ८५६ | २,०८५ | ५,७७० | १६,८४८ | २८,७५४ | ३६,९३२ | ३९,१८७ |
| | | मूल्य | १८६ | ७४५ | ६,६८१ | ४७,२४४ | २,१०,१९२ | ५,०८,२४९ | ५,६०,३२२ |
| ३ | क्रोमाईट | उत्पादन | १ | ३ | २ | ... | ०.६ | ... | ... |
| | | मूल्य | १ | ५ | ५ | ... | ८ | ... | ... |
| ४ | कच्चे लोखंड | उत्पादन | ३६२ | ६१३ | १,४५६ | ६४५ | २२ | १,०१८ | १,७७७ |
| | | मूल्य | ५१ | ६९ | ६५७ | ३८४ | ३१ | ७,१५४ | १४,२३२ |
| ५ | चुनखडी | उत्पादन | ५५ | ३६३ | ७१५ | ५,१३५ | ६,०६६ | १०,४३१ | १२,०९३ |
| | | मूल्य | २ | ३३ | १६३ | १,९६८ | ५,२६६ | १५,६४७ | २६,७२७ |
| ६ | कच्चे मँगनीज | उत्पादन | १७९ | २१८ | २३२ | २७६ | ३६३ | ५८९ | ७०० |
| | | मूल्य | २०६ | १४८ | ५५३ | १,६१५ | ६,२८० | ५४,१०९ | ७९,५४८ |
| ७ | केओलिन (नैसर्गिक) | उत्पादन | २ | ३ | ५ | ३ | ०.२ | ... | ... |
| | | मूल्य | ०.१३ | ०.१६ | १ | १ | ०.२९ | ... | ... |
| ८ | बॉक्साईट | उत्पादन | २७ | ३०२ | ३६५ | ५४३ | १,०२७ | २,४९२ | ३,०१५ |
| | | मूल्य | २ | २१ | १३७ | ४४३ | १,७०५ | ४,५८५ | १०,८३६ |
| ९ | डोलोमाईट | उत्पादन | ६ | ५ | २७ | २८ | ६५ | ७९ | १८५ |
| | | मूल्य | ०.३८ | १ | ८ | २७ | १४५ | ७१ | ४३६ |
| १० | सिलिका सँड | उत्पादन | ५ | २७ | ८९ | १९७ | १६८ | ३२७ | २८३ |
| | | मूल्य | ०.३४ | ३ | ३ | ८७ | २२८ | ९८२ | १,००७ |
| ११ | फ्लोराईट (ग्रेडेड) | उत्पादन | ... | ... | ... | ३ | ३ | २८४ | ४ |
| | | मूल्य | ... | ... | ... | ... | २४ | १२,४५७ | ४५५ |
| १२ | लॅटेराईट | उत्पादन | ... | ... | ... | ८५ | ८३ | ४९ | ३१७ |
| | | मूल्य | ... | ... | ... | ७६ | १०७ | ५८ | ३८० |
| १३ | कायनाईट | उत्पादन | ... | ५ | २२ | १५ | ०.२ | ३ | ... |
| | | मूल्य | ... | ११ | ५३ | ८५ | १ | २४ | ... |
| १४ | इतर $$ | उत्पादन | ... | ४ | ५४४ | ९१२ | ३०६ | ४,०३४ | १,८३४ |
| | | मूल्य | ... | ०.३६ | २७ | १९६ | ४९ | ५,२५८ | १,८१३ |

**आधार** - (१) भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, नागपूर

(२) सहाय्यक मीठ आयुक्त, भारत सरकार, मुंबई (फक्त मीठाकरिता).

* अस्थायी

$ आकडे कॅलेन्डर वर्षाकरिता आहेत.

$$ कोरंडम, क्ले, पायरोफायलाईट, स्फटिक, वाळू (इतर), सिलीमानाईट, फायर क्ले आणि शेल हे इतर खनिजांमध्ये अंतर्भूत आहेत.

## परिशिष्ट ८.३
## भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष २००४-०५ = १००)

| अ.क्र. | बाब | **भार** | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २०१०-११ | २०१२-१३ | २०१३-१४ + |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (९) | (९) | (१०) |
| **I** | **सर्वसाधारण निर्देशांक** | **१००.००** | **१०८.६** | **१२२.६** | **१४१.७** | **१४५.२** | **१६५.५** | **१७०.२** | **१७०.०** |
| **II** | **खाणकाम व दगड खाणकाम** | **१४.१६** | **१०२.३** | **१०७.५** | **११२.५** | **११५.४** | **१३१.०** | **१२३.६** | **१२२.२** |
| **III** | **वस्तुनिर्माण** | **७५.५३** | **११०.३** | **१२६.८** | **१५०.१** | **१५३.८** | **१७५.७** | **१८१.१** | **१७९.८** |
| | **उद्योग गट** | | | | | | | | |
| १ | खाद्य उत्पादने व पेय | ७.२८ | ११३.२ | १३१.२ | १४७.५ | १३५.४ | १४२.९ | १६५.३ | १६१.४ |
| २ | तंबाखू उत्पादने | १.५७ | १०१.० | १०२.९ | ९८.४ | १०२.७ | १०४.१ | १०७.५ | १०९.५ |
| ३ | कापड उत्पादने | ६.१६ | १०८.३ | ११६.८ | १२४.६ | १२०.१ | १३५.९ | १४१.७ | १४८.२ |
| ४ | परिधान करावयाची वस्त्रे व रंगाई करणे | २.७८ | ११४.१ | १३७.२ | १४९.९ | १३४.६ | १४२.२ | १४०.५ | १७१.६ |
| ५ | प्रवास सामान पिशव्या, पादत्राणे, चामडे कमावणे, साफ करणे आणि चामडयाचे उत्पादन | ०.५८ | ९०.९ | १०४.० | ११०.० | १०४.४ | ११४.३ | १२५.९ | १३२.५ |
| ६ | लाकुड व लाकडाची उत्पादने (लाकडी बूच सोडून) | १.०५ | १०६.८ | १२६.० | १४८.० | १५५.३ | १५६.५ | १४६.८ | १४४.७ |
| ७ | कागद आणि कागदाची उत्पादने | १.०० | १०६.३ | १११.० | ११२.६ | ११८.० | १३१.४ | १३७.८ | १३८.३ |
| ८ | प्रकाशने, छपाई आणि प्रसार माध्यमे यांची प्रतिलिपी नोंद ठेवणे | १.०८ | ११३.७ | १२२.८ | १४०.२ | १४२.४ | १४८.८ | १८२.६ | १८३.८ |
| ९ | कोक, रिफाईन्ड पेट्रोलियम उत्पादने आणि न्युक्लीक इंधन | ६.७२ | १००.६ | ११२.६ | ११९.६ | १२३.४ | १२१.५ | १३४.९ | १४२.३ |
| १० | रसायने व रासायनिक उत्पादने | १०.०६ | १०१.० | ११०.४ | ११८.४ | ११५.० | १२३.१ | १२७.० | १३९.१ |
| ११ | रबर आणि प्लॅस्टिक उत्पादने | २.०३ | ११२.३ | ११९.६ | १३५.७ | १४२.६ | १८५.२ | १८४.१ | १७८.५ |
| १२ | अधातू खनिज उत्पादने | ४.३१ | १०७.८ | ११९.५ | १३०.६ | १३४.९ | १५१.४ | १५९.३ | १६१.१ |
| १३ | मूलभूत धातू | ११.३४ | ११५.५ | १३२.६ | १५६.३ | १५९.० | १७६.७ | १९५.० | १९३.९ |
| १४ | फेब्रीकेटेड धातू उत्पादने (यंत्र व सामग्री सोडून) | ३.०९ | १११.१ | १३३.३ | १४३.८ | १४४.० | १८२.८ | १८७.१ | १७४.० |
| १५ | यंत्रे व यंत्रसामग्री | ३.७६ | १२६.१ | १५०.९ | १८५.० | १७१.० | २५६.३ | २२२.५ | २१०.३ |
| १६ | कार्यालयीन लेखा आणि संगणक सामुग्री | ०.३१ | १४५.३ | १५५.५ | १६४.८ | १४८.८ | १४६.३ | १२२.३ | १०५.० |
| १७ | विद्युत सामुग्री आणि उपकरणे | १.९८ | ११६.८ | १३१.६ | ३७३.० | ५३०.८ | ४७२.१ | ३५६.७ | ४१७.५ |
| १८ | रेडीओ, टि.व्ही. आणि दळण- वळणाची साधने आणि उपकरणे | ०.९९ | १२२.७ | ३१२.८ | ६०४.२ | ७२६.७ | ९११.५ | १,०१५.३ | ७४३.२ |
| १९ | औषधे, चष्म्याची उपकरणे, भिंतींवरील घडयाळे व मनगटी घडयाळे | ०.५७ | ९५.४ | १०४.८ | १११.४ | ११९.८ | १०७.८ | १११.८ | १०८.८ |
| २० | मोटार वाहने, ट्रेलर्स, सेमी ट्रेलर्स | ४.०६ | ११०.१ | १३८.० | १५१.२ | १३८.० | २३३.३ | २४२.० | २२०.० |
| २१ | इतर परिवहन सामग्री | १.८३ | ११५.३ | १३२.९ | १२९.० | १३४.० | २१०.७ | २३३.९ | २४७.६ |
| २२ | फर्निचर, वस्तूनिर्माण व्यतिरिक्त | ३.०० | ११६.२ | १११.७ | १३२.७ | १४२.५ | १४१.२ | १३०.८ | ११२.५ |
| **IV** | **विद्युत** | **१०.३२** | **१०५.२** | **११२.८** | **१२०.०** | **१२३.३** | **१३८.०** | **१५४.४** | **१६३.९** |

आधार - केंद्रीय सांख्यिकी संघटना, भारत सरकार

\+ एप्रिल, २०१३ ते फेब्रुवारी, २०१४

# परिशिष्ट ८.४
## महाराष्ट्र राज्यातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी

(₹ कोटी)

| उद्योग गट (दोन अंकी) एनआयसी २००८ | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्टी | मूल्यवृद्धी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१) सरकी काढणे, वटणी, सफाई | २०१०-११ | ९२७ | ८९४ | १,४८५ | ५८ | १२,०४९ | ८,३७२ | ९,७२६ | २,२२० |
| इत्यादी (०१) | २०११-१२ | ९०८ | १,०२८ | १,८९९ | ७५ | १३,५०९ | १०,१५८ | १२,८२८ | ५७२ |
| (२) मिठाचे उत्पादन (०८) | २०१०-११ | ४४ | १ | ४ | ४ | १० | ० | ३ | ८ |
| | २०११-१२ | ५८ | १ | ३ | ३ | ९ | १ | २ | ७ |
| (३) खाद्य उत्पादने व पेये (१०, ११) | २०१०-११ | २,९४८ | २१,३८९ | ५,७३२ | १,४६८ | ८९,५४१ | ६९,२५४ | ८०,०९३ | ८,०३१ |
| | २०११-१२ | ३,११३ | २३,७०४ | ८,२०३ | १,६६२ | १,१०,७७२ | ८१,३२८ | १,००,८३४ | ८,०२५ |
| (४) तंबाखू उत्पादने (१२) | २०१०-११ | १२८ | ११७ | १७० | ९९ | १,१३४ | ६९६ | ८१० | ३०८ |
| | २०११-१२ | १३८ | ७७१ | ६३७ | १३६ | ३,४६५ | १,६५० | २,०८५ | १,३११ |
| (५) वस्त्रोद्योग (१३) | २०१०-११ | १,९७४ | १३,१९७ | ४,६५६ | ९७५ | ३१,१८४ | १७,८०२ | २५,९१४ | ३,९५७ |
| | २०११-१२ | १,९३१ | १४,६८६ | ३,२३२ | १,१७५ | ३८,२८४ | २२,४७४ | ३२,४३६ | ४,२७६ |
| (६) परिधान करण्याची वस्त्रे (१४) | २०१०-११ | १,१०४ | १,००४ | १,५७५ | २८३ | ८,११७ | ३,६२२ | ६,३०५ | १,६९९ |
| | २०११-१२ | १,१०५ | १,१३० | १,२७८ | २७९ | ६,८५२ | ३,४३४ | ५,४७४ | १,२६९ |
| (७) कातडी कमावणे व चामड्याची | २०१०-११ | १३८ | १३१ | (-)३१ | २६ | ७७९ | ३८७ | ६०३ | १६१ |
| उत्पादने (१५) | २०११-१२ | १४५ | १०७ | ७६ | २६ | ५१३ | २१५ | ३३८ | १६५ |
| (८) लाकूड व लाकडाची उत्पादने (१६) | २०१०-११ | २९२ | २५६ | १३६ | ३४ | १,५६१ | १,१६४ | १,३८२ | १५७ |
| | २०११-१२ | २८३ | ८७२ | ७८३ | ६५ | २,२२० | १,१९२ | १,७८७ | ३७४ |
| (९) कागद व कागदाची उत्पादने (१७) | २०१०-११ | ९५५ | ५,८०१ | १,३२९ | १९८ | ७,५७८ | ४,९२३ | ६,०६१ | १,१९३ |
| | २०११-१२ | ९३७ | ५,१६४ | १,५०१ | २४७ | ९,१९२ | ६,०३५ | ७,७३८ | १,११३ |
| (१०) प्रकाशन आणि मुद्रण (१८) | २०१०-११ | ९९८ | ३,९९९ | (-)१५ | २२२ | ७,९१५ | ३,४०३ | ५,२७२ | २,१८२ |
| | २०११-१२ | ९५४ | ३,९७६ | (-)२६७ | २७७ | ७,४५३ | ३,८८५ | ५,५४३ | १,४८७ |
| (११) कोळसा, शुद्ध पेट्रोलियम यांची | २०१०-११ | २१६ | १०,५०१ | ३,७११ | ३३६ | १,०७,२५९ | ६८,६७६ | ७१,८४८ | ३४,७५० |
| उत्पादने इत्यादी (१९) | २०११-१२ | १९० | ९,९९२ | ३,१२० | ४२५ | १,३५,०५७ | १,००,३११ | १,०५,६४२ | २८,७८३ |
| (१२) रसायने व रासायनिक उत्पादने | २०१०-११ | २,७०६ | ३०,४८७ | १९,१४६ | १,६०९ | ८५,६१४ | ४४,१३९ | ६३,५२९ | १८,९७८ |
| इत्यादी (२०,२१) | २०११-१२ | २,६३५ | ३८,५२५ | १३,७७४ | २,१६९ | १,२४,१३६ | ६५,६०७ | ९१,३८६ | २८,९०५ |
| (१३) रबर आणि प्लॅस्टिक उत्पादने (२२) | २०१०-११ | १,८०१ | ८,९५५ | ३,२१३ | ५७५ | ३२,२७९ | १७,८९७ | २१,८५३ | ९,५९३ |
| | २०११-१२ | १,८५८ | १०,८२८ | ४,३११ | ७३८ | ३५,५६६ | २०,६६२ | २५,७४७ | ५,८३९ |
| (१४) इतर अधातू खनिज उत्पादने (२३) | २०१०-११ | १,०४१ | ६,४३४ | ९१६ | २७१ | ९,५१८ | ४,२७७ | ६,७८८ | २,३२४ |
| | २०११-१२ | १,०९५ | ७,८१३ | ३,२२३ | ३४१ | १३,६४९ | ६,६५४ | ९,७५३ | ३,३४८ |
| (१५) मूलभूत धातू (२४) | २०१०-११ | १,४९९ | ४१,६३० | ११,८७९ | १,००५ | ८९,४२८ | ६४,१२१ | ७७,९३२ | ९,१३५ |
| | २०११-१२ | १,४६३ | ३६,९५९ | ९,१३० | १,३०७ | १,३३,४९१ | ८४,०५१ | १,२१,५६४ | ९,२८६ |
| (१६) धातूच्या तयार वस्तू (२५) | २०१०-११ | ३,०६५ | १०,१९४ | ६,१५३ | १,१३३ | ४२,२७२ | २३,३९० | ३१,३७५ | ९,७९७ |
| | २०११-१२ | ३,२९२ | १२,३६० | ७,४३३ | १,३९६ | ५७,८४३ | ३२,९६६ | ४६,००३ | १०,७५७ |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.४ (समाप्त)
## महाराष्ट्र राज्यातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी

| | उद्योग गट (दोन अंकी) (एनआयसी २००८ ) | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्टी | मूल्यवृद्धी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१७) | कार्यालयीन लेखांकन व संगणना यंत्रसामग्री , रेडिओ, दूरदर्शन, दळणवळण सामग्री आणि उपकरणे, वैद्यकीय, अचूक मोजमापनाची व ऑप्टीकल साधने इत्यादी (२६) | २०१०-११ | ४८२ | ४,१७१ | ७,२१६ | २६६ | १७,५१८ | ११,१३४ | १३,७७० | ३,३०९ |
| | | २०११-१२ | ४८८ | ४,६६९ | ९,४२३ | ३९२ | २०,३०४ | १२,८२१ | १५,७२८ | ४,०५८ |
| (१८) | विद्युत यंत्रसामग्री व उपकरणे (२७) | २०१०-११ | १,३८३ | ६,४४६ | ६,५३५ | ६३१ | ३५,९६१ | २२,९७६ | २७,२६२ | ७,९७५ |
| | | २०११-१२ | १,३६६ | ८,३१४ | ३,७८२ | ७७८ | ४०,२८७ | २४,४३७ | ३२,९३७ | ६,४२० |
| (१९) | यंत्रे व यंत्रसामग्री दुरुस्ती व उभारणी (२८,३३) | २०१०-११ | २,३३१ | १३,६९८ | १०,३१५ | १,६१३ | ६१,०२० | ३१,७८८ | ४५,३८२ | १४,३२१ |
| | | २०११-१२ | २,२३५ | १६,९२१ | १४,४३५ | १,६८४ | ७२,१०३ | ३४,७१८ | ४९,५३९ | २१,०२१ |
| (२०) | मोटार वाहने, ट्रेलर्स (२९) | २०१०-११ | १,२०६ | २५,५७७ | (-)२६,९९८ | २,००७ | ६५,६५९ | ४६,५५६ | ५६,३७३ | ६,८६८ |
| | | २०११-१२ | १,२९९ | २८,६९२ | (-)६,८२६ | २,३९९ | ८२,२७५ | ६२,०९७ | ७५,४५२ | ३,९७५ |
| (२१) | इतर परिवहन सामग्री (३०) | २०१०-११ | ३४० | ४,०६० | ३,४४१ | ४२५ | २६,६१३ | १८,३०४ | २०,५३३ | ५,६९८ |
| | | २०११-१२ | ३३३ | ४,२५६ | (-)१,४११ | ४६१ | २८,५४० | २०,०८७ | २३,०८५ | ५,०६३ |
| (२२) | फर्निचर (इतरत्र वर्गीकरण न केलेले) (३१,३२) | २०१०-११ | १,२७८ | २,८४९ | ६,४३८ | ५७६ | २८,५४६ | १८,३६१ | २४,३२८ | ३,९७६ |
| | | २०११-१२ | १,२९५ | २,९४४ | ८,६३७ | ६०१ | ३१,१८१ | १९,१२२ | २७,२८२ | ३,६२३ |
| (२३) | इतर | २०१०-११ | १,०३४ | २०,८२३ | ९६ | २३४ | २३,८०४ | ३,३८० | १९,७५४ | ३,०५७ |
| | | २०११-१२ | १,०९६ | २७,२५४ | ५५७ | ४२९ | ४१,६७७ | ९,००१ | ३२,९७१ | ७,०९२ |
| | **एकूण** | **२०१०-११** | **२७,८९०** | **२,३२,६१२** | **६७,१०३** | **१४,०५१** | **७,८५,३६३** | **४,८४,६२३** | **६,१६,८९५** | **१,४९,६९६** |
| | | **२०११-१२** | **२८,२१७** | **२,६०,९६६** | **८६,९३२** | **१७,०६५** | **१०,०५,३७८** | **६,२२,९०६** | **८,२६,१५६** | **१,५६,७६६** |

आधार - वार्षिक उद्योग पाहणी, केंद्रीय सांख्यिकी संघटना, भारत सरकार

## परिशिष्ट ८.५
## महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांची महत्त्वाची वैशिष्ट्ये

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०११-१२ | २०१२-१३* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१. सहकारी संस्थांची संख्या** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ३९ | २९ | ३१ | ३४ | ३४ | ३४ | ३४ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था $ | २१,४०० | २०,४२० | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४४३ | २१,२३८ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १,६३० | २,९६४ | ५,४७४ | ११,२९१ | २२,०१४ | २२,८४७ | २२,८९९ |
| (४)पणन संस्था | ३४४ | ४१० | ४२३ | ९३१ | १,११५ | १,७६८ | १,७६२ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम @ | ४,३०६ | ६,८१० | १४,३२७ | २८,९५४ | ३९,०७० | ४८,५२९ | ४८,९६५ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था @ | ३,८४६ | ११,९६४ | २१,९९५ | ४३,८४५ | ७५,२३२ | १,३३,३१७ | १,३५,७७५ |
| **एकूण** | **३१,५६५** | **४२,५९७** | **६०,७४७** | **१,०४,६२०** | **१,५८,०१६** | **२,२७,९३८** | **२,३०,६७३** |
| **२. सभासदांची संख्या (०००')** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था $$ | ७६ | ७० | १,०१४ | १,४८५ | १,३७१ | १७२ | १६६ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २,१७० | ३,७९४ | ५,४१६ | ७,९४२ | १०,१२५ | १६,०६६ | १६,८१३ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १,०८७ | २,४३८ | ३,७५९ | ९,३०२ | १८,४६७ | २२,९०० | २४,३४२ |
| (४) पणन संस्था | १४१ | २८२ | ४७१ | ७४५ | ८४० | १,४६३ | १,६०५ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ३२३ | ९५९ | २,१२४ | ३,९७४ | ६,३३९ | ७,४६२ | ७,८५० |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ३९४ | १,०३८ | १,९९९ | ३,४५५ | ५,८८० | ७,००७ | ७,२८२ |
| **एकूण** | **४,१९१** | **८,५८१** | **१४,७८३** | **२६,९०३** | **४३,०२२** | **५५,०७०** | **५८,०५८** |
| **३. खेळते भांडवल (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ११९ | ६१३ | १,८३१ | ८,८०६ | ३९,२६७ | ९३,६३९ | ९८,७४१ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ५८ | ३४३ | ५२७ | १,८५१ | ६,९८८ | १५,९०४ | १७,४४६ |
| (३)बिगर-कृषि पतसंस्था | ४६ | १६८ | १,२०९ | ७,५०८ | ६६,८८७ | १,११,५६७ | १,०८,१९१ |
| (४)पणन संस्था | ६ | ३९ | १८८ | ३४० | १,५१८ | १,४०७ | १,३५३ |
| (५)शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ४१ | २१९ | १,०२९ | ४,५८८ | १३,२८८ | २७,८२४ | २८,२७० |
| (६)सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | २१ | १०७ | ४२६ | १,१९१ | ६,४९२ | ४,६९९ | ४,७९८ |
| **एकूण** | **२९१** | **१,४८९** | **५,२१०** | **२४,२८४** | **१,३४,४४०** | **२,५५,०४०** | **२,५८,७९९** |
| **४. स्थूल कर्ज (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | १७५ | ७५१ | १,५२८ | ९,०८५ | २८,७०९ | ४६,४१४ | ५४,६०५ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ४३ | १३३ | २५० | ८०० | ३,७३४ | ८,५८७ | ८,३२४ |
| (३)बिगर-कृषि पतसंस्था | ४७ | २०४ | १,१२९ | ५,१७८ | ३९,२६८ | ५६,७८२ | ५३,३४४ |
| (४)पणन संस्था | ३ | ३ | ३ | ८ | १८ | २२ | १७ |
| (५)शेतमाल प्रक्रिया उपक्रम | १ | ३ | १२ | १७ | १०३ | ६८८ | १,३७० |
| (६)सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १ | ४ | १२ | ६० | २३५ | २१८ | २१६ |
| **एकूण** | **२७०** | **१,०९८** | **२,९३४** | **१५,१४८** | **७२,०६७** | **१,१२,७११** | **१,१७,८७६** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.५ (समाप्त)

## महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांची महत्त्वाची वैशिष्ट्ये

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०११-१२ | २०१२-१३* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **५. येणे कर्जे (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ८७ | ४७८ | १,१३७ | ५,८८९ | २३,१२० | ४७,४९७ | ५२,९५४ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ४८ | २८४ | ३८४ | १,३१० | ५,३०८ | १०,७१२ | १०,००९ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ३२ | १०५ | ७३१ | ४,५९४ | ३५,९०८ | ५०,८१२ | ४९,५४२ |
| (४) पणन संस्था | १ | २ | ४ | ९ | १८२ | ५,०३२ | ५,०३३ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | १ | ६ | ३० | ६९ | २३६ | २,४०१ | १,६७२ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | २ | ८ | २५ | १९१ | २,८९९ | ६७५ | ५५९ |
| **एकूण** | **१७१** | **८८३** | **२,३११** | **१२,०६२** | **६७,६५३** | **१,१७,१२८** | **१,१९,७६८** |
| **६. उलाढाल-तयार मालाच्या विक्रीचे मूल्य (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | १० | ५१ | १४६ | २३९ | १,०१२ | ७६१ | ९८७ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २ | ३ | १० | . . | ३८ | ला.ना. | ला.ना. |
| (४) पणन संस्था | ४८ | २१४ | ९७९ | २,६०२ | ३,२०५ | १,३१३ | १,६६२ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ३६ | १९४ | १,०३१ | ३,४६७ | ७,४९६ | ९,७०१ | २३,८८१ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ११ | ६९ | १८७ | ३३० | १,५८८ | ३,०८६ | ३,६६७ |
| **एकूण** | **१०७** | **५३१** | **२,३५३** | **६,६३८** | **१३,३३९** | **१४,८६०** | **३०,१९८** |

**आधार** - सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

टीप - १९९०-९१ पर्यंतची आकडेवारी जून अखेरपर्यंतची आहे.

* अस्थायी

$ यात प्राथमिक कृषि पतसंस्था, प्राथमिक भू-विकास बँका आणि धान्य बँका यांचा १९७०-७१ पर्यंत समावेश आहे.

$$ नाममात्र सभासद वगळून

@ २०००-०१ या वर्षापासून उपसा सिंचन संस्थांचा समावेश उत्पादक ऐवजी सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था या प्रकारात करण्यात आला आहे.

ला.ना. - लागू नाही

९

# पायाभूत सुविधा



# ९. पायाभूत सुविधा

९.१ पायाभूत सुविधांचा दर्जा आर्थिक वाढीच्या तसेच या सुविधांचा वापर करणाऱ्या घटकांच्या कार्यक्षमतेवर थेट परिणाम करतो. पायाभूत सुविधांद्वारे उपलब्ध होणाऱ्या सेवांमुळे भांडवलाच्या उत्पादकतेत वृध्दी होऊन उत्पादनखर्च कमी होतो आणि नफा, उत्पादन, उत्पन्न व रोजगार यात वाढ होते व परिणामी आर्थिक वाढीस चालना मिळते. पायाभूत सुविधांचा वापर विकास साध्य करण्यात महत्वाची भूमिका बजावतो. राज्यातील काही महत्वाच्या भौतिक पायाभूत सुविधांबाबतची माहिती संक्षिप्त स्वरुपात खाली देण्यात आली आहे.

## ऊर्जा

९.२ ऊर्जा क्षेत्रात पारंपरिक/अ-पुनर्नवीकरणीय (कोळसा, लिग्नाईट, पेट्रोलियम, नैसर्गिक वायू, इ.) आणि अ-पारंपरिक/ पुनर्नवीकरणीय/अक्षय (पवन, सौर, लघु-जलऊर्जा, जैविक, चिपाडांपासून वीज सहनिर्मिती, इ.) ऊर्जा स्त्रोतांचा समावेश होतो. अ-पुनर्नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांचे अंदाजित साठे व पुनर्नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांची संभाव्य क्षमता तक्ता ९.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१ अ-पुनर्नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांचे अंदाजित साठे व पुनर्नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांची संभाव्य क्षमता**

(३१ मार्च रोजी)

| ऊर्जास्त्रोताचा प्रकार | परिमाण | २०११ | | २०१२ | |
|---|---|---|---|---|---|
| | | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र |
| **अ-पुनर्नवीकरणीय** | | | | | |
| कोळसा | (अब्ज टन) | २८५.८६ | १०.५३ | २९३.५० | १०.८८ |
| लिग्नाईट | (अब्ज टन) | ४०.९१ | -- | ४१.९६ | -- |
| क्रुड ऑईल | (दशलक्ष टन) | ७५७.४० | -- | ७५९.५९ | -- |
| नैसर्गिक वायू | (अब्ज घन मीटर) | १,२७८.०६ | -- | १,३३०.२६ | -- |
| **पुनर्नवीकरणीय** | मेगावॅट | ८९,७६० | ३,३०२ | ८९,७७४ | ४,०२१ |

*आधार :*'केंद्रिय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार द्वारा प्रकाशित 'ऊर्जा सांख्यिकी २०१३' व महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण

९.३ कृषि व संलग्न कार्ये, उद्योग आणि सेवा या क्षेत्रांचा विकास हा प्रामुख्याने खात्रीशीर व वाजवी दरात वीज उपलब्धतेवर अवलंबून असतो. वीज क्षेत्रावरील राज्य शासनाचा खर्च राज्याच्या स्थुल उत्पन्नाच्या सुमारे पाच टक्के आहे. राज्यातील दरडोई विजेचा वापर व दरडोई उत्पन्न तक्ता ९.२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ९.२ दरडोई वीज वापर व दरडोई उत्पन्न**

| वर्ष | दरडोई वीज वापर (युनिटस्) | दरडोई उत्पन्न (₹) |
|---|---|---|
| १९६०-६१ | ७० | ४०९ |
| १९७०-७१ | १५५ | ७८३ |
| १९८०-८१ | २२५ | २,४३५ |
| १९९०-९१ | ३८३ | ७,४३९ |
| २०००-०१ | ४९२ | २२,७७७ |
| २०१०-११ | ७८० | ८४,८५८ |

*आधार*: महावितरण, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बेस्ट

### स्थापित क्षमता

९.४ मागील वर्षाच्या तुलनेत स्थापित क्षमतेत २०१२-१३ मध्ये २२.१ टक्क्यांनी वाढ झाली, तर केंद्रिय क्षेत्रातील राज्यासाठीचा वाटा १२.६ टक्क्यांनी वाढला. ३१ मार्च, २०१३ रोजी राज्याच्या स्थापित क्षमतेत सार्वजनिक क्षेत्राचा ४३.२ टक्के, खाजगी क्षेत्राचा ४७.९ टक्के (पारंपरिक २८.६ टक्के व अक्षय ऊर्जा १९.३ टक्के) आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून साकारलेल्या प्रकल्पाचा (रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट लि.- आरजीपीपीएल) ८.९ टक्के इतका वाटा होता. स्त्रोतनिहाय स्थापित क्षमता तक्ता ९.३ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.१ राज्यातील स्थापित क्षमता (३१ मार्च, २०१३ रोजी)**




**तक्ता ९.३ स्त्रोतनिहाय स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्त्रोत | ३१ मार्च रोजी | | ३१ डिसेंबर, २०१३ रोजी | २०१२-१३ मध्ये २०११-१२ च्या तुलनेतील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३ | | |
| **राज्यामधील** | **२०,३७०** | **२४,८७३** | **२६,४९३** | **२२.१** |
| औष्णिक | १०,३६६ | १३,९४६ | १४,९०६ | ३४.५ |
| अक्षय ऊर्जा $ | ४,१९८ | ४,७८९ | ५,४५२ | १४.१ |
| जलजन्य | ३,०६६ | ३,०६६ | ३,०६६ | ०.० |
| नैसर्गिक वायुजन्य @ | २,७४० | ३,०७२ | ३,०७२ | १२.१ |
| **केंद्रिय क्षेत्राकडून वाटप #** | **५,७९२** | **६,५२१** | **६,६२७** | **१२.६** |

*आधार* : महानिर्मिती, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, $ महाऊर्जा,
@ महावितरण ( आरजीपीपीएल नैसर्गिक वायुजन्य मधील राज्याचा वाटा ),
# केंद्रिय विद्युत प्राधिकरण/ डब्ल्युआरपीसी [केंद्रिय क्षेत्राकडून (आरजीपीपीएल, एनटीपीसी व एनपीसीआयएल ) वाटप आणि खाजगी कंपन्याच्या आकडेवारीसाठी ]

## विद्युत निर्मिती

९.५ राज्यात २०१२-१३ मध्ये एकूण वीज निर्मिती (अक्षय ऊर्जेसह) ८८,१३९ दशलक्ष युनिटस् इतकी होती, जी मागील वर्षापेक्षा १.५ टक्क्यांनी कमी होती. केंद्रिय क्षेत्रातून राज्याला २०१२-१३ मध्ये ३४,३८२ दशलक्ष युनिटस् इतकी वीज उपलब्ध झाली.

९.६ एकूण विद्युत निर्मितीमध्ये महानिर्मितीचा वाटा ५३.६ टक्के, त्याखालोखाल टाटा पॉवर १२.७ टक्के, जेएसडब्ल्यू एनर्जी १०.५ टक्के, अक्षय ऊर्जा ६.२ टक्के, आरजीपीपीएल ५.६ टक्के, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर पाच टक्के, वर्धा पॉवर कंपनी मर्या. (डब्ल्युपीसीएल) ३.९ टक्के आणि इतर २.६ टक्के असा होता.

९.७ राज्यात २०१३-१४ मध्ये डिसेंबर अखेर ६६,३९६ दशलक्ष युनिटस् वीज निर्मिती झाली व ती २०१२-१३ मधील तत्सम कालावधीतील वीज निर्मितीपेक्षा दोन टक्क्यांनी कमी होती. केंद्रिय क्षेत्राकडून २०१३-१४ मध्ये डिसेंबर अखेर २४,७२९ दशलक्ष युनिटस् वीज उपलब्ध झाली. स्त्रोतनिहाय विद्युत निर्मिती तक्ता ९.४ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.२ :राज्यातील विद्युत निर्मिती २०१२-१३**




**तक्ता ९.४ स्त्रोतनिहाय विद्युत निर्मिती**

(दशलक्ष युनिट)

| स्त्रोत | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४+* | २०१२-१३ मध्ये २०११-१२ च्या तुलनेतील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| **राज्यामधील** | **८९,४६५** | **८८,१३९** | **६६,३९६** | **(-) १.५** |
| औष्णिक | ५९,४८२ | ६६,०७५ | ५१,६०० | ११.१ |
| नैसर्गिक वायुजन्य | १७,२०७ | १०,२४२ | ४,९५७ | (-) ४०.५ |
| जलजन्य | ६,८५१ | ५,९८० | ४,८१४ | (-) १२.७ |
| अक्षय ऊर्जा $ | ५,९२५ | ५,८४२ | ५,०२५ | (-) १.४ |
| **केंद्रिय क्षेत्रातून राज्यास उपलब्ध** | **३६,७५५** | **३४,३८२** | **२४,७२९** | **(-) ६.९** |

*आधार* : महानिर्मिती, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर,
महावितरण ( आरजीपीपीएल केंद्रिय क्षेत्राकडूनची वीज आणि अक्षय उर्जा ),
केंद्रिय विद्युत प्राधिकरण/ डब्ल्युआरपीसी (खाजगी कंपन्यांच्या आकडेवारीसाठी),
+ डिसेंबर पर्यंत. * अस्थायी $ बंदिस्त विजेसह

टिप : १ युनिट = १ किलो वॅट तास

## वीज खरेदी

९.८ महावितरण कंपनीने २०१२-१३ मध्ये एकूण ₹ ३८,८५८ कोटी किंमतीची ९९,०६८ दशलक्ष युनिटस् इतकी वीज खरेदी केली, तर २०११-१२ मध्ये ₹ ३५,१२० कोटी किंमतीची ९८,६६२ दशलक्ष युनिटस् इतकी वीज खरेदी केली होती. २०१३-१४ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ २९,७२० कोटी किंमतीची ७२,९०१ दशलक्ष युनिटस् इतकी वीज खरेदी केली. 'बेस्ट' ने २०१२-१३ मध्ये ₹ २,९२८ कोटी किंमतीची ४,७०४ दशलक्ष युनिटस् व २०१३-१४ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ २,२४३ कोटी किंमतीची ३,६०५ दशलक्ष युनिटस् वीज खरेदी केली.

## विजेचा वापर

९.९ राज्यातील २०१२-१३ मधील विजेचा एकूण वापर १,००,६६५ दशलक्ष युनिटस् इतका असून तो मागील वर्षापेक्षा ४.२ टक्क्यांनी अधिक होता, तर २०१३-१४ मध्ये डिसेंबर पर्यंत ६८,०३३ दशलक्ष युनिटस् वापर हा २०१२-१३ मधील तत्सम कालावधीतील वापरापेक्षा ५.१ टक्क्यांनी कमी होता. राज्यातील विजेचा सर्वाधिक वापर औद्योगिक क्षेत्रात (३७.९ टक्के), तर त्या खालोखाल घरगुती क्षेत्रात (२२.७ टक्के) आणि कृषि क्षेत्रात (२०.९ टक्के) होता. या तीन क्षेत्रांचा एकत्रित वापर एकूण वीज वापराच्या ८१.५ टक्के होता. क्षेत्रनिहाय विजेचा वापर तक्ता ९.५ मध्ये दिला आहे, तर मागील पाच वर्षात वीज वापरात झालेला बदल आलेख ९.३ मध्ये दर्शविला आहे.

**आलेख ९.३ : वीज वापरात झालेला बदल**




**तक्ता ९.५ क्षेत्रनिहाय विजेचा वापर**

(दशलक्ष युनिट)

| क्षेत्र | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४+* | २०१२-१३ मध्ये २०११-१२ च्या तुलनेतील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| औद्योगिक | ३६,४८६ | ३८,११० | २५,०९२ | ४.५ |
| घरगुती | २१,०४१ | २२,८३१ | १८,४४२ | ८.५ |
| कृषि | २१,६९३ | २०,९८४ | ९,६०३ | (-) ३.३ |
| वाणिज्यिक | ११,७६८ | १२,६३५ | ९,५७० | ७.४ |
| सार्वजनिक सेवा@ | ३,२७० | ३,५७६ | २,६२५ | ९.४ |
| रेल्वे | २,२२९ | २,३८९ | १,७९० | ७.२ |
| संकीर्ण | १५७ | १४० | ९११ | (-) १०.८ |
| **एकूण** | **९६,६४४** | **१,००,६६५** | **६८,०३३** | **४.२** |

*आधार : महावितरण, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बेस्ट*

@ सार्वजनिक दिवाबत्ती व पाणी पुरवठा + डिसेंबरपर्यंत * अस्थायी

**तक्ता ९.६ दरडोई विजेचा वापर**

(युनिट)

| क्षेत्र | भारत | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|
| | २०११-१२ | २०११-१२ | २०१२-१३ |
| **सर्व क्षेत्र** | ५५९.९ | ८५१.० | ८७४.७ |
| औद्योगिक | १९९.७ | ३२१.३ | ३३१.२ |
| घरगुती | १४२.४ | १८५.३ | १९८.४ |
| कृषि | ११७.३ | १९१.० | १८२.३ |

*आधार :* केंद्रिय विद्युत प्राधिकरण, भारत सरकार
महावितरण, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, टाटा पॉवर, बेस्ट

९.१० प्रमुख क्षेत्र निहाय भारतातील (२०११-१२) आणि महाराष्ट्रातील (२०११-१२ व २०१२-१३) दरडोई विजेचा वापर तक्ता ९.६ मध्ये दिला आहे. स्थापित क्षमता, विद्युत निर्मिती, क्षेत्रनिहाय विजेचा वापर आणि दरडोई विजेचा वापर यासंबंधीची मालिका परिशिष्ट ९.१ मध्ये दिली आहे.

## महाराष्ट्र वीज नियामक आयोग

९.११ विद्युत कायदा-२००३ अन्वये महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगास (एम इ आर सी) वीज दर नियमनाअंतर्गत वीज दराच्या सुसूत्रीकरणासाठी उपाययोजना राबविणे, आर्थिक व्यवस्थापन आणि ऊर्जा क्षेत्रातील सुधारणा यासाठीचे अधिकार दिलेले आहेत. २०१३-१४ साठीचे वीज दर तक्ता ९.७ मध्ये दिलेले आहेत. कृषि सिंचन व सार्वजनिक पाणीपुरवठा यासाठी फक्त महावितरण कडून वीज पुरवठा होतो. कृषि सिंचनासाठी उच्च दाब, लघु दाब (मीटरसह) व लघु दाब (मीटरशिवाय) करीता अनुक्रमे ₹ ३.१०, ₹ २.३३ व ₹ २.४५ प्रति युनिट आणि सार्वजनिक पाणीपुरवठ्यासाठी उच्च दाब व लघु दाब करीता अनुक्रमे ₹ ५.५३ व ₹ २.९६ प्रति युनिट इतके दर निश्चित केले आहेत.

**तक्ता ९.७ २०१३-१४ मधील वीज दर**

(₹ प्रति युनिट)

| ग्राहकाचा प्रकार | महावितरण | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर | टाटा पॉवर | बेस्ट |
|---|---|---|---|---|
| घरगुती | ४.८९ | ६.३९ | ५.२५ | ६.७० |
| वाणिज्यिक (लघु दाब) | ९.७८ | १०.१४ | ८.५५ | १२.४० |
| उद्योग (लघु दाब) | ७.१९ | ९.५० | ७.६७ | ११.०० |
| उद्योग (उच्च दाब) | ७.४९ | ९.५४ | ७.३० | १०.१२ |
| सार्वजनिक दिवाबत्ती | ४.६७ | १०.४० | -- | १०.०३ |
| रेल्वे | ७.८१ | १०.२८ | ७.१३ | -- |

*आधार*: महाराष्ट्र वीज नियामक आयोग -- लागू नाही

## विजेची मागणी व पुरवठा

९.१२ विविध स्रोताद्वारे झालेली क्षमता वाढ, पायाभूत जाळ्यातील सुधारणा, पारेषण व वितरण हानीत झालेली घट आणि ऊर्जा संवर्धनाच्या उपाययोजनांमुळे वीज पुरवठ्यात सुधारणा झाली आहे. महावितरणची २०१२-१३ मध्ये विजेची १४,०३२ मेगावॅटची सरासरी कमाल मागणी ७२३ मेगावॅट इतक्या तुटीचे भारनियमन करुन भागविण्यात आली. तसेच २०१३-१४ मध्ये डिसेंबरपर्यंतची १३,८७९ मेगावॅटची सरासरी कमाल मागणी ४९२ मेगावॅट इतक्या तुटीचे भारनियमन करुन भागविण्यात आली. सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व तूट तक्ता ९.८ व आलेख ९.४ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.४ : सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व तूट**




**तक्ता ९.८ सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व तूट**

(मेगावॅट )

| वर्ष | सरासरी कमाल मागणी $ | पुरवठा | तूट |
|---|---|---|---|
| २००८-०९ | १२,५०७ | १०,२०३ | २,३०४ |
| २००९-१० | १२,६२४ | १०,९२१ | १,७०३ |
| २०१०-११ | १३,१५७ | ११,९१७ | १,२४० |
| २०११-१२ | १४,०४३ | १२,८४१ | १,२०२ |
| २०१२-१३ | १४,०३२ | १३,३०९ | ७२३ |
| २०१३-१४+ | १३,८७९ | १३,३८७ | ४९२ |

*आधार*: महावितरण + डिसेंबरपर्यंत

$ कृषि भार व्यवस्थापन योजनेद्वारे (सिंगल फेजिंग व फिडर सेपरेशन योजनांसह) कमी झालेला भार (भारमुक्ती /लोड रिलिफ) वगळून

## पारेषण व वितरणाचे पायाभूत जाळे

९.१३ राज्यातील वीज वितरण यंत्रणांमध्ये २०१२-१३ करीता महावितरणचा वाटा ८२.९ टक्के इतका असून त्या पाठोपाठ टाटा पॉवरचा ६.५ टक्के, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरचा ६.२ टक्के आणि 'बेस्ट'चा ४.४ टक्के होता.

९.१४ मागणी व पुरवठ्यातील तूट कमी करण्यासाठी पारेषण व वितरणाच्या पायाभूत जाळ्यामध्ये सुधारणा आणि पारेषण व वितरण हानी (तांत्रिक व अतांत्रिक दोन्ही) कमी करणे या प्रमुख उपाययोजना करण्यात येत आहेत. महापारेषण कंपनीने अति उच्च दाब (इएचव्ही) उपकेंद्रांच्या आधुनिकीकरणाद्वारे पारेषण हानी कमी करण्याच्या उपाययोजना सुरु केलेल्या आहेत. महावितरण कंपनीने विविध योजनांतर्गत सदोष मीटर बदलणे, अत्याधिक भार असलेल्या उच्च व कमी दाबाच्या वाहिन्यांवरील भार अतिरिक्त रोहित्र पुरवून कमी

करणे, नवीन उपकेंद्रे उभारणे व कार्यान्वित करणे, तारा टाकणे यांसह वीजचोरी विरुध्द मोहीम अशा उपाययोजना हाती घेतलेल्या आहेत. याबाबतचा तपशील तक्ता ९.९ व ९.१० आणि आलेख ९.५ मध्ये दिला आहे.

९.१५ बेस्ट कंपनीची वितरण हानी २०११-१२ मध्ये ७.५ टक्के व २०१२-१३ मध्ये ६.६ टक्के इतकी तर एकूण तांत्रिक व व्यावसायिक (एटी ॲन्ड सी) हानी २०११-१२ मध्ये ५.५ टक्के व २०१२-१३ मध्ये ७.७ टक्के इतकी होती. बेस्ट कडून २०१२-१३ मध्ये १,९२४ व २०१३-१४ मध्ये डिसेंबर पर्यंत १,३४८ वीज चोरीची प्रकरणे पकडण्यात आली आणि त्यापोटी अनुक्रमे ₹ ६.८५ कोटी व ₹ ४.४२ कोटी इतकी रक्कम वसूल करण्यात आली. २०१२-१३ मधील टाटा पॉवर कंपनीची पारेषण व वितरण हानी अनुक्रमे ४.२ व १.३ टक्के तर रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरची अनुक्रमे ४.२ आणि ९.५ टक्के इतकी होती.

**आलेख ९.५ : पारेषण व वितरण हानी**




**तक्ता ९.९ पारेषण व वितरण जाळे आणि एकूण तांत्रिक व व्यावसायिक (एटी ॲन्ड सी) हानी**

| वर्ष | पारेषण जाळे (संचयी) | | | वितरण जाळे (संचयी) | | | एकूण तांत्रिक व व्यावसायिक (एटी ॲन्ड सी) हानी (टक्के)@ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | उपकेंद्रांची संख्या | परिवर्तन क्षमता (एमव्हीए) | तारा (सर्कीट कि.मी.) | उपकेंद्रांची संख्या | वितरण रोहित्रांची संख्या | तारा (सर्कीट कि.मी.) | |
| २००८-०९ | ५१५ | ६६,११८ | ३६,७१६ | १,९४७ | ३,२७,३१४ | ७,५८,०९३ | २४.७ |
| २००९-१० | ५२० | ७३,७९२ | ३७,१३३ | २,०३३ | ३,५१,२४३ | ७,९२,७८५ | २१.४ |
| २०१०-११ | ५३६ | ८२,६१९ | ३८,०६८ | २,२३४ | ३,९१,५७४ | ८,३३,४७० | १८.५ |
| २०११-१२ | ५६० | ९१,४४४ | ३९,७६२ | २,५१४ | ४,३९,६५३ | ८,७०,८३० | १८.४ |
| २०१२-१३ | ५८५ | ९९,७१६ | ४१,३८९ | २,६८० | ४,७१,७६६ | ९,०५,९७९ | १८.७ |

*आधार* : महापारेषण, महावितरण @ महावितरण

**तक्ता ९.१० वितरण हानी कमी करणेसाठीच्या उपाययोजना**

| वर्ष | मीटर बसविणे | | जुने मीटर बदलून नवीन बसविणे | वीज-चोरी विरुध्द मोहिम | |
|---|---|---|---|---|---|
| | फिडर्स (संचयी संख्या) | वितरण रोहित्र केंद्र (संचयी संख्या) | (संख्या) | पकडण्यात आलेली प्रकरणे (संख्या) | वसूल केलेली रक्कम (₹ कोटी) |
| २००८-०९ | ६,८५१ | १,०५,२३६ | ८,७५,५११ | ५७,०६५ | ४४.४८ |
| २००९-१० | ७,७५८ | १,२२,०८३ | १२,५७,३०८ | ५०,६९८ | ५४.२८ |
| २०१०-११ | ८,३७७ | १,८७,४४८ | १२,०५,३६४ | १७,२६९ | १४.२४ |
| २०११-१२ | १०,५३६ | २,३३,७५४ | १२,९५,७७५ | ४७,६३३ | २८.२६ |
| २०१२-१३ | १२,४४१ | २,४०,६८२ | २२,५७,१८० | ७३,८५७ | ३८.०९ |
| २०१३-१४ + | १३,७३६ | २,५१,३९२ | १९,६६,७६४ | ३०,२७५ | १४.१० |

*आधार* : महावितरण + डिसेंबरपर्यंत

९.१६ **ग्रामीण विद्युतीकरण आणि जाळ्यांची सुधारणा** – ग्रामीण विद्युतीकरण आणि जाळ्यांच्या सुधारणेसाठी राबविण्यात येत असलेल्या महत्वाच्या योजना तक्ता ९.११ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ९.११ ग्रामीण विद्युतीकरण आणि जाळ्यांची सुधारणा**

| योजना | उद्दिष्टे | साध्य | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१२-१३ | २०१३-१४ + | संचयी + |
| **भारत निर्माण - राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना (आरजीजीव्हीवाय)** | • विद्युतीकरण न झालेल्या ४,७०९ खेड्यांचे विद्युतीकरण (संख्या) | -- | -- | ४,७०९ |
| | • दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटुंबाना मोफत वीज जोडणी (संख्या) | १९,४१२ | १७,८८९ | १२,०५,६७९ |
| अक्षय ऊर्जेद्वारा ग्राम विद्युतीकरण योजना (राज्य योजनांतर्गत योजना) | • केंद्र शासनाच्या ग्रामीण विद्युतीकरण योजनेत समाविष्ट नसलेल्या (३०० पेक्षा कमी लोकसंख्येच्या) लहान वाड्या/पाडे यांचे विद्युतीकरण (संख्या) | ६१ | २५ | ७८० |
| कृषि पंपांचे विद्युतीकरण | • कृषि पंपांचे विद्युतीकरण (संख्या) | १,५८,९३७ | ७०,०५१ | ३९,७२,१८६ |
| सिंगल फेजिंग योजना | • खेड्यातील गावठाणांना आठ तास थ्री फेजची वीज व एकूण १८ तास (सिंगल फेज व थ्री फेज एकत्रित) वीज पुरवठा (संख्या) | १,१०५ | ० | १४,९४७ |
| स्वतंत्र फिडर योजना | • गावठाण व कृषि पंपांसाठी स्वतंत्र फिडर्स (संख्या) | २,१६५ | ४८७ | १६,५७९ |
| ***पुनर्रचित गतिमान ऊर्जा विकास व सुधारणा कार्यक्रम (आर-एपीडीआरपी)*** | | | | |
| ३०,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेली नगरे व शहरे यांचा समावेश.<br>भारत सरकारच्या अभियानाचा मुख्य उद्देश<br>• भाग-अ- पायाभूत माहिती यंत्रणा प्रस्थापित करणे, जबाबदारी निश्चिती. | • ऊर्जा वित्त महामंडळ (पीएफसी) कडून वितरीत रक्कम (भाग-अ, ब आणि पर्यवेक्षी नियंत्रण व माहिती प्राप्ती (स्काडा)/माहिती व्यवस्थापन पध्दती (डीएमएस) नियंत्रण केंद्र) (₹ कोटी) | १२५.०० | -- | ७६३.४२ # |
| • भाग-ब - एकुण तांत्रिक व व्यावसायिक हानी (एटी ॲन्ड सी ) मध्ये कपात. | • भागअ, ब आणि स्काडा/डीएमएस नियंत्रण केंद्रावर झालेला खर्च (₹ कोटी) | २२५.९४ | ४६९.७५ # | ७९५.५७ # |

*आधार* : महावितरण , महाऊर्जा + डिसेंबर , २०१३ पर्यंत # जानेवारी, २०१४ पर्यंत

९.१७ राज्यातील एकूण ४१,०९५ वस्ती असलेल्या गावांपैकी (जनगणना, २००१ नुसार- १०० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेली) डिसेंबर, २०१३ पर्यंत महावितरणद्वारे पारंपरिक विजेद्वारे ४०,७१९ गावांचे विद्युतीकरण झाले आहे.

## क्षमता वाढ

९.१८ **औष्णिक ऊर्जा** – बाराव्या पंचवार्षिक योजनेत महानिर्मितीद्वारा प्रस्तावित प्रकल्पांची माहिती तक्ता ९.१२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१२ बाराव्या पंचवार्षिक योजनेत महानिर्मितीद्वारा प्रस्तावित प्रकल्प**

(मेगावॅट)

| प्रकल्प | क्षमता | कार्यान्वित होण्याचा अपेक्षित दिनांक व सद्यस्थिती |
|---|---|---|
| परळी संच-८ | २५० | मे, २०१४ |
| चंद्रपूर संच-८ व ९ (प्रत्येकी ५०० मेगावॅट) | १,००० | संच-८ मार्च, २०१४ मध्ये कार्यान्वित<br>संच-९ फेब्रुवारी, २०१५ |
| कोराडी संच-८,९ व १० (प्रत्येकी ६६० मेगावॅट) | १,९८० | संच-८ मे,२०१४, संच-९ सप्टेंबर, २०१४ आणि संच-१० जानेवारी, २०१५ |
| भुसावळ संच-६ | ६६० | जून, २०१८ (निविदांची छाननी प्रगतीपथावर) |
| नाशिक संच-६ | ६६० | मार्च, २०१९ (पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून परवाना मिळण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर) |
| पारस संच-५ | २५० | डिसेंबर, २०१७ (प्रस्ताव राज्यशासनास सादर. पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून परवाना मिळण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर) |
| उरण - गॅसवर आधारीत संयुक्त सायकल विद्युत केंद्र | १,२२० | २०१६-१७ ब्लॉक १ व २ (अनुक्रमे ४०६ व ८१४ मेगावॅट) |
| दोंडाईचा औष्णिक विद्युत केंद्र संच-१ ते ५ (प्रत्येकी ६६० मेगावॅट) | ३,३०० | प्रकल्प अंमलबजावणी महानिर्मितीद्वारा वा राष्ट्रीय औष्णिक विद्युत कंपनी (एनटीपीसी) सोबत संयुक्त उपक्रमाद्वारे. भू-संपादन व पर्यावरण मंजूरी घेण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर) |

*आधार* : महानिर्मिती

९.१९ **अक्षय ऊर्जा** - पवन, सौर, जैविक, बायोगॅस, सागरी लाटा, भू-औष्णिक इ. स्वच्छ आणि पर्यावरण पूरक अक्षय ऊर्जेचे स्त्रोत आहेत. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या संस्थेस ऊर्जा संवर्धन कायदा, २००१ च्या तरतुदींचे समन्वयन, विनियमन व अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त यंत्रणा म्हणून राज्य शासनाने घोषित केले आहे. अक्षय ऊर्जेचा प्रसार व विकास आणि ऊर्जा संवर्धन कार्यक्रमांची अंमलबजावणी यासाठी महाऊर्जा सक्रीयपणे कार्यरत आहे.

९.२० केंद्र शासनाच्या धर्तीवर अक्षय ऊर्जा स्त्रोतांमधून १० टक्के वीज खरेदीचे उद्दिष्ट गाठण्याचे धोरण राज्य शासनाने स्विकारले आहे. त्यास अनुसरुन अक्षय ऊर्जा स्त्रोतांद्वारे ग्रीड संलग्न वीज निर्मितीसाठी धोरणे व प्रोत्साहने जाहीर करण्यात आली आहेत. अक्षय ऊर्जा स्त्रोतांद्वारे वीज निर्मिती प्रकल्पांच्या स्थापित क्षमतेनुसार राज्याचा देशात दुसरा क्रमांक आहे. ३१ डिसेंबर, २०१३ अखेर एकूण ५,२७२ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प स्थापित करण्यात आले आहेत. राज्यातील अक्षय ऊर्जेची क्षमता व त्यापैकी स्थापित क्षमता तक्ता ९.१३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१३ अक्षय ऊर्जेची क्षमता व त्यापैकी स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| अक्षय ऊर्जा स्त्रोत | क्षमता | स्थापित क्षमता (संचयी) | | |
|---|---|---|---|---|
| | | ३१ मार्च अखेर | | ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत |
| | | २०१२ | २०१३ | |
| पवन | ५,९६१ | २,७१७ | ३,००६ | ३,३९६ |
| लघु जल विद्युत प्रकल्प # | ७३२ | २६५ | २७१ | २७१ |
| साखर कारखान्यांकडून विजेची सहनिर्मिती | १,२५० | ८४९ | १,०८८ | १,२१६ |
| कृषि अवशेषांवर आधारित ऊर्जा निर्मिती प्रकल्प | ७८१ | १५५ | १७० | १८० |
| शहरी घनकचरा | २८७ | ० | ० | ३ |
| कारखान्यांचा कचरा | ३५० | १५ | २४ | २६ |
| सौर औष्णिक | ३५/चौ.मी. $ | २० | ५० | १८० |
| सौर फोटोव्होल्टाईक (पीव्ही ) | ४९/चौ.मी. $ | | | |
| **एकूण** | **९,३६१** | **४,०२१** | **४,६०९** | **५,२७२** |

*आधार* : महाऊर्जा # जलसंपदा विभागाने स्थापित केलेले २५ मेगावॅट पेक्षा कमी क्षमतेचे प्रकल्प.

$ एकूण संभाव्य क्षमतेत समाविष्ट नाही.

९.२१ अक्षय उर्जा स्रोतनिहाय राज्यातील प्रकल्पांची माहिती पुढील परिच्छेदांत दिली आहे.

- **पवन ऊर्जा** – सेंटर फॉर विंड एनर्जी टेक्नॉलॉजी (सी-वेट), चेन्नई च्या समन्वयाने महाऊर्जाद्वारा राज्यात वारा मापन अभ्यास मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. फेब्रुवारी, २०१४ पर्यंत राज्यातील २८१ जागांवर वारा मापन अभ्यास घेण्यात आला असून त्यापैकी ४६ ठिकाणे या पवन ऊर्जा प्रकल्पासाठी योग्य असल्याचे आढळले आहे. शासनाची आकर्षक धोरणे व प्रोत्साहने यामुळे पवन ऊर्जा क्षेत्रात ₹ २०,००० कोटीपेक्षा अधिक खाजगी गुंतवणूक झाली आहे. वर्ष २०१२-१३ मध्ये सहा वारा मापन केंद्रे उभारण्यात आली असून पाच केंद्रांची उभारणी २०१३-१४ मध्ये अपेक्षित आहे. महाऊर्जाद्वारे ११.०९ मेगावॅट क्षमतेचे प्रदर्शक प्रकल्प राज्यात उभारण्यात आले आहेत.

- **सौर औष्णिक व सौर फोटो व्होल्टाईक ऊर्जा** – सन २०२२ पर्यंत ग्रीड संलग्न २०,००० मेगावॅट व २०१३ पर्यंत १,००० मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचे उद्दीष्ट गाठणे या प्रमुख उद्देशाने *जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय सौर अभियान* (जेएनएनएसएम) घोषित करण्यात आले. या राष्ट्रीय उद्दिष्टाच्या १० टक्के लक्ष्य गाठण्याचे राज्याने प्रस्तावित केले आहे. राज्यात ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत १७९.९५ मेगावॅट क्षमतेचे ग्रीड संलग्न सौर फोटो व्होल्टाईक उर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. महाऊर्जामार्फत केंद्र शासनाद्वारे पंढरपूर, शेगाव व कराड येथे सौर प्रारण मापन केंद्र उभारण्यात आले असून राज्य शासनाद्वारे आणखी चार केंद्र उभारण्याचे प्रस्तावित आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेदरम्यान महानिर्मितीद्वारा प्रस्तावित सौर उर्जा प्रकल्पांची माहिती तक्ता ९.१४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१४ बाराव्या पंचवार्षिक योजनेत महानिर्मितीद्वारा प्रस्तावित सौर ऊर्जा प्रकल्प**

(मेगावॅट)

| प्रकल्प | क्षमता | कार्यान्वित होण्याचा अपेक्षित दिनांक व सद्यस्थिती |
|---|---|---|
| शिवाजीनगर, साकरी, जि.धुळे | १२५ | मार्च, २०१३ मध्ये कार्यान्वित. |
| साकरी, जि.धुळे | २५ | २०१४-१५ |
| शिर्शुफळ, ता.बारामती, जि.पुणे | ५० | २०१४-१५ |
| कौडगाव, जि.उस्मानाबाद (टप्पा १ व २ प्रत्येकी ५० मेगावॅट) | १०० | २०१४-१५ पर्यंत टप्पा १<br>२०१५-१६ पर्यंत टप्पा २ |
| पोखरणी ता.गंगाखेड, जि.परभणी | ४० ते ५० | २०१५-१६ |
| अंतर्वेली, सेलमोहा व कड्याची वाडी ता.गंगाखेड, जि.परभणी | १५ | २०१५-१६ |
| मांगलादेवी-पिंपरी- मालखेड ता.नेर, जि.यवतमाळ | ८० | २०१५-१६ |

*आधार* : महानिर्मिती

- **चिपाडांपासून वीज सह-निर्मिती** –राज्यात ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत चिपाडांपासून वीज सह-निर्मितीचे एकुण ७१ प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. या क्षेत्रात गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी केंद्र शासनाकडून बॉयलर संरचनेवर आधारीत वीज सह-निर्मिती प्रकल्पांना भांडवली अर्थसहाय्य देण्यात येते. राज्य शासनाकडून देखील सोयी सवलती देण्यात येतात. यासाठी सार्वजनिक-खाजगी भागिदारी तत्वावर राज्य शासनाद्वारे *ऊर्जांकूर निधी* ट्रस्ट स्थापन करण्यात आला आहे.

- **कृषि अवशेषांवर आधारित ऊर्जा निर्मिती** – खाजगी सहभागाबाबत आकर्षक धोरणामुळे १८० मेगावॅट क्षमतेचे १७ कृषि अवशेषावर आधारित ऊर्जा निर्मिती प्रकल्प डिसेंबर, २०१३ अखेर कार्यान्वित झाले आहेत व २२०.५ मेगावॅट क्षमतेचे १९ प्रकल्प फेब्रुवारी, २०१४ अखेर मंजूर करण्यात आले आहेत. नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या आर्थिक मदतीतून महाऊर्जाद्वारे राज्यातील ३९ तालुक्यांमध्ये कृषि अवशेषाच्या उपलब्धतेबाबतअभ्यास घेण्यात आले आहेत.

- **लघु जलविद्युत प्रकल्प** –राज्यातील एकुण ७३२ मेगावॅट संभाव्य क्षमतेपैकी जलसंपदा विभागाकडून २७१ मेगावॅट क्षमतेचे लघु जलविद्युत प्रकल्प स्थापित करण्यात आले आहेत. लहान जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणातून विकसित करण्यास चालना देण्यासाठीच्या राज्य शासनाच्या धोरणांतर्गत २८३.२ मेगावॅट क्षमतेच्या १०४ प्रकल्पांसाठी विकासक निश्चित करण्यात आले असून मार्च,२०१३ पर्यंत ८७.८ मेगावॅट क्षमतेचे २० प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. उर्वरित ८४ प्रकल्प विकासाच्या विविध टप्प्यांत असून त्यापैकी ७.४ मेगावॅट क्षमतेचे दोन प्रकल्प डिसेंबर, २०१३ पर्यंत कार्यान्वित झाले आहेत.

# वाहतूक व दळणवळण

९.२२ मालासाठी बाजारपेठ, उद्योगासाठी कामगार व जनतेसाठी सेवासुविधा तसेच, बाजारपेठेची व्याप्ती वाढविण्यास व व्यापार- व्यवसायास चालना देण्यास परिवहन व दूरसंचार या पायाभूत सुविधा सहाय्यभूत ठरतात. परिवहन प्रणाली मध्ये रस्ते वाहतूक, लोहमार्ग, जलवाहतूक व हवाई वाहतूक यांचा समावेश आहे. टपालसेवा, दूरध्वनी व इंटरनेट या सेवा दूरसंचार प्रणालीचे मुख्य घटक आहेत.

## वाहतूक

### वाहतूकीचे जाळे

९.२३ राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख राज्य महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा रस्ते, इतर जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते व अंतर्गत शहर रस्ते मिळून रस्त्यांचे जाळे बनते. राज्यातील रस्त्यांचा विकास राज्य शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपरिषदा, नगर पंचायती, कटक मंडळे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वन विभाग, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांच्या मार्फत केला जातो.

९.२४ राज्यात ३,३६,९९४ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या विकासाचे उद्दिष्ट ठेवून रस्ते विकास आराखडा २००१-२१ ची अंमलबजावणी सुरु आहे. मार्च, २०१३ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची एकत्रित लांबी (स्थानिक स्वराज्य संस्थांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी वगळून) २.४३ लाख किमी असून त्यापैकी पृष्ठांकित रस्त्यांची लांबी २.२३ लाख किमी (९१.९ टक्के) होती. दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी (जनगणना २००१ च्या ग्राम निर्देशिकेनुसार), ९९ टक्क्यापेक्षा जास्त गावे बारमाही व हंगामी रस्त्यांनी जोडलेली होती. तथापि, २७८ गावे कोणत्याही रस्त्यांनी जोडलेली नव्हती. सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी तक्ता ९.१५ मध्ये आणि वर्षनिहाय व रस्त्यांच्या प्रकारानुसार रस्त्यांच्या लांबीची माहिती परिशिष्ट ९.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१५ सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी**

(किमी)

| वैधानिक विकास मंडळ | ३१ मार्च रोजी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग# | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | **एकूण** |
| विदर्भ | २०१२ | ८८३ | - | ९,८८४ | ११,४०५ | १३,४५१ | २६,१२६ | ६१,७४९ |
| | २०१३ | ८८३ | २,१४२ | ७,७४२ | ११,४०५ | १३,४९५ | २६,१८५ | ६१,८५२ |
| मराठवाडा | २०१२ | ७९५ | - | ८,०७३ | १३,७७५ | ८,७७९ | २२,३१५ | ५३,७३७ |
| | २०१३ | ७९५ | १,७५७ | ६,३१६ | १३,७७५ | ८,७७९ | २२,३७० | ५३,७९२ |
| उर्वरित महाराष्ट्र | २०१२ | २,६९८ | - | १६,२०० | २५,०७६ | २५,२९९ | ५८,१६० | १,२७,४३३ |
| | २०१३ | २,६९८ | २,७९५ | १३,४७० | २५,०७६ | २५,२९९ | ५८,१९० | १,२७,५२८ |
| **एकूण** | **२०१२** | **४,३७६** | **-** | **३४,१५७** | **५०,२५६** | **४७,५२९** | **१,०६,६०१** | **२,४२,९१९** |
| | **२०१३** | **४,३७६** | **६,६९४** | **२७,५२८** | **५०,२५६** | **४७,५७३** | **१,०६,७४५** | **२,४३,१७२** |

*आधार* : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन # २०१२ करिता प्रमुख राज्य महामार्गासह

९.२५ सन २०१३-१४ मध्ये ₹ ४,४५० कोटी नियतव्यय मंजूर असून फेब्रुवारी पर्यंत ₹ २,००० कोटी इतका खर्च झाला आहे.

९.२६ सन २०१२ व २०१३ मधील जिल्हानिहाय रस्त्यांच्या रुंदीनुसार लांबीची माहिती परिशिष्ट ९.३ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.६ : रस्ते विकास आराखड्यानुसार (२००१-२१) साध्य**




## प्रधान मंत्री ग्रामसडक योजना

९.२७ प्रधान मंत्री ग्रामसडक योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना असून, सन २००० पासून राज्यात तमहाराष्ट्र राज्य ग्रामीण रस्ते विकास मंडळामार्फत राबविली जाते. प्रधान मंत्री ग्रामसडक योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील ५०० व अधिक लोकसंख्या (आदिवासी भागासाठी २५० व अधिक) असलेल्या व रस्त्याने न जोडलेल्या वस्त्यांना बारमाही रस्त्यांनी जोडणे हा आहे. या योजनेंतर्गत २४,५३१ कि.मी. लांबीच्या रस्त्यांनी ८,३११ लोकवस्त्यांना जोडण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. एकूण उद्दिष्टापैकी ३१ मार्च, २०१४ पर्यंत ७,८४३ वाडया/वस्त्यांना २२,४४१ किमी लांबीच्या रस्त्यांनी जोडण्यात आले आहे. प्रधान मंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बांधलेल्या रस्त्यांची संचित लांबी व जोडलेल्या लोकवस्त्यांची संख्या तक्ता ९.१६ मध्ये आणि सन २०१२-१३ व २०१३-१४ मधील भौतिक व आर्थिक साध्य तक्ता ९.१७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ९.१६ प्रधान मंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बांधलेल्या रस्त्यांची संचित लांबी व जोडलेल्या लोकवस्त्यांची संख्या**

| वैधानिक विकास मंडळ | भौतिक लक्ष्य | | भौतिक साध्य + | |
|---|---|---|---|---|
| | रस्त्याची लांबी (किमी) | लोकवस्त्यांची संख्या | रस्त्यांची संचित लांबी (किमी) | लोकवस्त्यांची संचित संख्या |
| विदर्भ | ७,७८२ | २,९२१ | ७,०८३ | २,६३२ |
| मराठवाडा | ५,०२७ | १,८६३ | ४,८८१ | १,७५२ |
| उर्वरित महाराष्ट्र | ११,७२२ | ३,५२७ | १०,४७७ | ३,४५९ |
| **एकूण** | **२४,५३१** | **८,३११** | **२२,४४१** | **७,८४३** |

*आधार* : ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन + ३१ मार्च, २०१४ पर्यंत

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

९.२८ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या स्थापनेपासून महामंडळाने २० कामे पूर्ण केली असून त्यावर ₹ ६,९९३ कोटी इतका खर्च झाला. ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण झालेल्या व अंशत: पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या टोल वसूलीची एकूण रक्कम ₹ ८,४०९ कोटी इतकी होती. महामंडळाचे प्रगतीपथावरील प्रकल्प तक्ता ९.१८ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ९.१७ प्रधान मंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१२-१३ व २०१३-१४ मधील भौतिक व आर्थिक साध्य**

| वर्ष | जोडलेल्या लोकवस्त्यांची संख्या | साध्य रस्त्याची लांबी (किमी) | झालेला खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | २८७ | ६५० | १५३.४३ |
| २०१३-१४ | २०३ | ४४९ | ३८४.२० |

*आधार* : ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन

**तक्ता ९.१८ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे प्रगतीपथावरील प्रकल्प**

३१ डिसेबंर, २०१३ पर्यंत

| प्रकल्पाचे नांव | प्रकल्पाची अंदाजे किंमत (₹ कोटी ) | खर्च (₹ कोटी ) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|
| नागपूर-औरंगाबाद-सिन्नर-घोटी रस्ता सुधार | ७२२ | ७६७.७४ | २०१४-१५ |
| नागपूर येथील रस्त्यांची कामे | ४२२ | ४३६.६० | २०१४-१५ |
| औरंगाबाद येथील रस्त्यांची कामे | १४२ | १६६.७७ | २०१५-१६ |
| नागपूर-काटोल-जलालखेडा रस्त्याचे रुंदीकरण | ३१ | ३.२३ | २०१३-१४ |
| एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प - अचलपूर | ४० | ०.११ | उ.ना. |
| सार्वजनिक जलद प्रवास प्रणाली - नागपूर | उ.ना. | २.३९ | उ.ना. |
| सार्वजनिक जलद प्रवास प्रणाली - ठाणे | उ.ना. | ७.३६ | उ.ना. |
| वर्सोवा - वांद्रे सागरी सेतू प्रकल्प | ४,४३० | ११.२९ | उ.ना. |
| सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण | १,००० | ३६.४९ | उ.ना. |
| जल वाहतूक प्रकल्प | १,३९० | १२.४२ | उ.ना. |
| पश्चिम मुक्तमार्ग सागरी सेतू | ४,१४३ | १४.१३ | उ.ना. |
| मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प (एमयुटीपी) | ४७२ | ३२१.०६ | २०१३-१४ |
| मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (एमयुआयपी) | ३९३ | १६४.८५ | २०१३-१४ |
| विस्तारीत - एमयुटीपी | २,०६५ | ३८९.५६ | २०१३-१४ |
| मुंबई - पुणे द्रूतगती महामार्गाची क्षमता वाढ | ५,००० | ३.१७ | २०१३-१४ |
| मुंबई - पुणे द्रूतगती महामार्गाशी संलग्न सोई-सुविधा | २०० | १.६८ | २०१४-१५ |
| पेडर रोड उड्डाणपूल | ३९० | - | २०१५-१६ |
| वरोरा येथील रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम | ३१ | ३०.०० | २०१३-१४ |

*आधार :* महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ   उ. ना. उपलब्ध नाही

## मुंबई महानगर क्षेत्रातील वाहतूक

९.२९ मुंबई महानगर क्षेत्रात आठ महानगरपालिका, नऊ नगरपरिषदा आणि ठाणे व रायगड जिल्ह्यातील सुमारे एक हजार गावांचा समावेश आहे. मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मुंबई महानगर क्षेत्रांत (एमएमआर) विविध प्रकल्प हाती घेतले आहेत. मुंबई मेट्रो रेल प्रकल्प हा सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर राबविण्यात येणारा सामुहिक वाहतूक प्रणाली प्रकल्प आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील वाहतूक प्रकल्पांची माहिती तक्ता ९.१९ मध्ये दिली आहे.

## तक्ता ९.१९ मुंबई महानगर क्षेत्रातील वाहतूक प्रकल्प

(₹ कोटी )

| प्रकल्पाचे नांव | प्रकल्पाची किंमत | ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंतचा खर्च | सद्य:स्थिती | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|---|
| **एमयुटीपी : रेल्वेची कामे** | | | | |
| **टप्पा-१:** नवीन मार्ग : माहिम-सांताक्रुझ, कुर्ला-ठाणे, डीसी चे एसी मध्ये रुपांतर, इ. नवीन रेक्ससह | ३,७७८ | ३,७७८.०० | • काम पूर्ण. | |
| पूर्व व पश्चिम उपनगरांना जोडणाऱ्या जोगेश्वरी-विक्रोळी आणि सांताक्रुझ-चेंबूर या दोन प्रमुख रस्त्यांचा विकास करणे. | ४९१ | ८२१.३४ | • जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. | मार्च, २०१४ |
| **मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प :** (तीन टप्पे, ७५ किमी) | | | | |
| **टप्पा -१** : वर्सोवा - अंधेरी- घाटकोपर (१४ किमी) | २,३५६ | ३,३५९.०० | • ९८ टक्के स्थापत्य काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर. | २०१४ |
| **टप्पा -२** : चारकोप - बांद्रे - मानखुर्द (३२ किमी) | ७,६६० | -- | • प्राथमिक काम पूर्ण. | उ.ना. |
| **टप्पा -३** : कुलाबा - बांद्रे (२९ किमी) | २३,१३६ | ३९.६८ | • सर्वसाधारण सल्लागाराच्या नियुक्तीकरिता संक्षिप्त सुचीतील सल्लागारांकडून निविदा प्रस्ताव मागविण्यात आला आहे. | २०२० |
| **मुंबई मोनो रेल प्रकल्प :** वडाळा ते चेंबूर आणि संत गाडगेमहाराज चौक (जेकब सर्कल) ते वडाळा (२० किमी) | २,४६० | १,९५०.०० | • टप्पा १ (वडाळा-चेंबुर) चे काम पूर्ण.<br>• टप्पा २ [संत गाडगेमहाराज चौक (जेकब सर्कल) ते वडाळा] ७७ टक्के काम पूर्ण. | <br>२०१५ |
| **एमयूआयपी :** रस्ते, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, इ. | ३,२०७ | ३,३५१.८५ | • एकूण १५ रस्त्यांची कामे पूर्ण (पूर्व मुक्त मार्गासह) झाली असून बृहन्मुंबई म.न.पा./ सां.बा.वि. यांचेकडे हस्तांतरीत केली आहेत. उर्वरित कामे प्रगतीपथावर. | २०१४ |
| **विस्तारित एमयूआयपी :** एमयूआयपीचा सह प्रकल्प. या प्रकल्पाअंतर्गत ३४ उप प्रकल्प (१६ रस्ते, १३ उड्डाणपूल, ३ खाडीपूल व २ रेल्वे मार्गावरील पूल) हाती घेण्यात आले आहेत. | २,६०७ | ९७८.४५ | • चार रस्ते व चार उड्डाणपूल पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. | २०१५ |
| **मल्टी मोडल कॉरिडोर विरार ते अलिबाग :** वाहनांसाठी ८ मार्गिका व फक्त बसेस करिता राखीव मार्गिका असलेला खुला मार्ग बांधणे (१४० किमी) | ९,५००@ | ६.२६ | • बहुउद्देशीय मार्गांपैकी विरार (नवघर) ते चिरनेर (७९ किमी) पर्यंतचा तांत्रिक-आर्थिक अभ्यास पूर्ण केला आहे. | २०१६ |
| **मुंबई ट्रान्स हार्बर लिंक :** शिवडी ते न्हावा सागरी सेतू (२२ किमी) | ९,६३० | ५.०० | • निविदा मागविण्यात येत आहेत. | उ.ना. |

*आधार*: मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण एमयूटीपी मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प, @ भूसंपादनासाठीचा खर्च वगळून एमयुआयपी मुंबई शहर पायाभुत सुविधा प्रकल्प उ.ना. उपलब्ध नाही

# भूपृष्ठ वाहतूक

## मोटार वाहने

९.३० राज्यात १ जानेवारी, २०१४ रोजी एकूण २२८ लाख मोटार वाहने (दर लाख लोकसंख्येमागे २०,५०४ वाहने) वापरात होती, जी मागील वर्षाच्या तुलनेत ९.४ टक्क्यांनी जास्त होती. राज्यातील एकूण वाहनांपैकी २३.४ लाख (१०.२ टक्के) इतकी वाहने बृहन्मुंबईत होती. राज्यात प्रति किमी रस्त्यावर वाहनांची संख्या ९४ आहे. वापरात असलेल्या मोटार वाहनांची प्रवर्गनिहाय संख्या तक्ता ९.२० मध्ये आणि वापरात असलेल्या मोटार वाहनांची वर्षनिहाय मालिका परिशिष्ट ९.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२० वापरात असलेल्या मोटार वाहनांची प्रवर्गनिहाय संख्या**

('000)

| प्रवर्ग | १ जानेवारी रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र # | | | बृहन्मुंबई | | |
| | २०१३ | २०१४* | शेकडा बदल | २०१३ | २०१४* | शेकडा बदल |
| दुचाकी (मोटार सायकली, स्कूटर्स, मोपेड्स) | १४,९७६.५ | १६,४१८.९ | ९.६ | १,२१७.५ | १,३१४.९ | ८.० |
| ऑटो रिक्षा | ६६१.६ | ६९७.७ | ५.५ | ११६.२ | १३०.३ | १२.१ |
| हलकी मोटार वाहने (कार, जीप्स, स्टेशन वॅगन्स व टॅक्सी) | ३,१६२.० | ३,४८१.६ | १०.१ | ७४८.४ | ८१०.६ | ८.३ |
| बसेस (स्टेज कॅरेजेस, कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस, स्कुल बसेस आणि पीएसव्ही) | ९६.६ | १०७.५ | ११.३ | ११.९ | १२.३ | ३.२ |
| माल मोटारी {आर्टीक्युलेटेड/मल्टी ऍक्सल वाहने, ट्रक्स व लॉरीज, टँकर्स, डिलेव्हरी व्हॅन्स (३ व ४ चाकी), इ.} | १,१४०.९ | १,२४२.७ | ८.९ | ६४.२ | ६७.० | ४.४ |
| ट्रॅक्टर्स | ४४९.२ | ४९४.८ | १०.१ | ०.७ | ०.७ | ०.० |
| ट्रेलर्स | ३३८.७ | ३४५.३ | २.० | ०.२ | ०.२ | ०.० |
| रूग्णवाहिका | ११.३ | १२.४ | १०.२ | १.४ | १.५ | ३.६ |
| इतर वाहने | ३५.३ | ३८.७ | ९.५ | १.५ | १.५ | १.३ |
| **सर्व** | **२०,८७२.१** | **२२,८३९.६** | **९.४** | **२,१६२.०** | **२,३३९.०** | **८.२** |

*आधार :* परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी # बृहन्मुंबईसह पीएसव्ही जन सेवा वाहने

९.३१ मार्च, २०१३ अखेर पर्यंत मोटार वाहने चालविण्याच्या वैध परवान्यांची संख्या २५८.७ लाख होती व ती मागील वर्षाच्या तुलनेत ७.६ टक्क्यांनी जास्त आहे. राज्यात २०१२-१३ मध्ये २७ लाख शिकाऊ परवाने देण्यात आले.

९.३२ "रस्त्यावर असताना नेहमी *'पहले आप'* म्हणा" या ब्रीद वाक्यासह जानेवारी, २०१४ मध्ये रस्ता सुरक्षा पंधरवडा पाळण्यात आला. ब्रीद वाक्याच्या अनुषंगाने राज्यामध्ये रस्ता सुरक्षाविषयक विविध पथनाट्ये आणि व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. राज्यात व बृहन्मुंबईत प्रति दहा हजार वाहनांमागे २०१२ व २०१३ मध्ये झालेल्या अपघातांची संख्या अनुक्रमे ३० व १०९ होती. राज्य व बृहन्मंबईतील अपघात, मृत व जख्मी व्यक्ती विषयक आकडेवारी तक्ता ९.२१ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.७ : दर लाख लोकसंख्येमागे बृहन्मुंबई व उर्वरित महाराष्ट्रातील वाहनांची संख्या**



**तक्ता ९.२१ राज्य व बृहन्मुंबईतील अपघात, मृत व जखमी व्यक्ती विषयक आकडेवारी**

| वर्ष | अपघातांची संख्या | | | मृत व्यक्तींची संख्या | | | जखमी व्यक्तींची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य # | बृहन्मुंबई | टक्केवारी @ | राज्य # | बृहन्मुंबई | टक्केवारी @ | राज्य # | बृहन्मुंबई | टक्केवारी @ |
| २००९ | ७१,९९५ | २९,४४० | ४०.९ | ११,३९६ | ६२० | ५.४ | ४७,८७८ | ६,५८९ | १३.८ |
| २०१० | ६९,५७३ | २३,४९९ | ३३.८ | १२,२८७ | ५४९ | ४.५ | ४६,५२८ | ४,८९६ | १०.५ |
| २०११ | ६८,४३८ | २५,४७१ | ३७.२ | १३,०५७ | ५६३ | ४.३ | ४५,६१६ | ५,०५९ | ११.१ |
| २०१२ | ६६,३१६ | २४,५९२ | ३७.१ | १३,३३३ | ४८८ | ३.७ | ४३,८४७ | ४,५४३ | १०.४ |
| २०१३ | ६१,८९० | २३,५१२ | ३८.० | १२,१९४ | ४९६ | ४.१ | ४१,१०६ | ४,२५० | १०.३ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मोटार वाहतूक सांख्यिकी @ बृहन्मुंबईची राज्याशी टक्केवारी # बृहन्मुंबईसह

# सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.३३ रस्ते वाहतूक सेवेची कार्यक्षम, पुरेशी, किफायतशीर व योग्यरित्या समन्वित प्रणाली पुरविणे हे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (मरामाप) महामंडळाचे ध्येय आहे. मरामाप महामंडळातर्फे सेवा पुरविण्यात आलेली खेडी आणि लोकसंख्येची टक्केवारी तक्ता ९.२२ मध्ये दिली आहे

९.३४ मरामाप महामंडळाने २०१२-१३ या वर्षात प्रतिदिन सरासरी ७१.६१ लाख प्रवासी वाहतूक केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत सार्थ किमी वाहतूक सुमारे ०.८ टक्क्यांनी वाढली असून मार्गस्थ गाड्यांचे सरासरी भारमाण १.२ टक्के अंकानी कमी झाले आहे. मरामाप महामंडळाची वाहतूक विषयक आकडेवारी तक्ता ९.२३ मध्ये आणि वाहनांच्या अपघातांची आकडेवारी व मरामाप महामंडळाने दिलेली भरपाई तक्ता ९.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२२ मरामाप महामंडळातर्फे सेवा पुरविण्यात आलेली खेडी आणि लोकसंख्येची टक्केवारी**

(टक्के)

| तपशील | सेवा पुरविण्यात आलेली | | | |
|---|---|---|---|---|
| | खेडी | | लोकसंख्या | |
| | २०११-१२ | २०१२-१३ | २०११-१२ | २०१२-१३ |
| थेट | ७१.२८ | ७१.९४ | ९०.४७ | ९०.६५ |
| ३ किमी पर्यंत | १८.०७ | १७.१५ | ६.१५ | ५.९१ |
| ३ ते ५ किमी पर्यंत | ६.५९ | ६.५७ | २.१५ | २.१४ |
| ५ किमी च्या पुढे | ४.०७ | ४.३४ | १.२३ | १.२९ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

**तक्ता ९.२३ मरामाप महामंडळाची वाहतूक विषयक आकडेवारी**

| बाब | २०११-१२ | २०१२-१३ | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| एकूण धारित वाहने (संख्या) | १६,८०१ | १७,४९७ | ४.१ |
| मार्गस्थ असणाऱ्या बसगाड्यांची प्रतिदिन सरासरी संख्या | १५,८९१ | १६,२१४ | २.० |
| एकूण कर्मचारी | १,०४,५९६ | १,००,१६९ | (-) ४.२ |
| वाहतूक केलेले प्रतिदिन सरासरी सार्थ किमी (लाख) | ५४.२० | ५४.६१ | ०.८ |
| वाहतूक केलेल्या प्रवाशांची प्रतिदिन सरासरी संख्या (लाख) | ७१.०५ | ७१.६१ | ०.८ |
| वाहन उत्पादकता (किमी) | ३२२.६० | ३१२.०९ | (-) ३.३ |
| प्रति दहा लिटर तेलामागे (डिझेल) किमीचे प्रमाण | ४९.१० | ४८.६६ | (-) ०.९ |
| चालक-वाहक उत्पादकता (किमी) | २२५.४० | २३४.९४ | ४.२ |
| प्रति वाहन कर्मचाऱ्यांचे प्रमाण (नियताप्रमाणे) (दि. ३१ मार्च रोजी) | ६.९३ | ६.६४ | (-) ४.२ |
| मार्गस्थ गाड्यांचे सरासरी भारमाण (लोड फॅक्टर टक्के) | ६१.७० | ६०.४६ | (-) १.२@ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ @ अंक

**तक्ता ९.२४ वाहनांच्या अपघातांची आकडेवारी व मरामाप महामंडळाकडून दिलेली भरपाई**

| तपशील | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
|---|---|---|---|---|---|
| अपघातांची संख्या | ३,२२० | ३,२०४ | ३,४०७ | ३,४३७ | ३,०७८ |
| मृत व्यक्तींची संख्या | ५५३ | ४५८ | ५४७ | ५७० | ४४५ |
| जखमी व्यक्तींची संख्या | ६,८४८ | ६,४१२ | ६,५२३ | ७,०६२ | ५,८४६ |
| दर लाख किमी मागे अपघातांचा दर | ०.१८ | ०.१७ | ०.१८ | ०.१७ | ०.१५ |
| घटनास्थळी दिलेली रक्कम (₹ लाख) | २६.४८ | ३४.३८ | ३२.०० | ३९.५९ | ४९.९३ |
| अंतिम भरपाई (₹ लाख) | ३,०४१.० | ३,३१८.८ | ३,५४९.२ | ४,३८८.० | ४,०२२.८ |

*आधार*: महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.३५ मरामाप महामंडळ विद्यार्थी, वरिष्ठ नागरिक (६५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेले), कॅन्सरचे रुग्ण, स्वातंत्र्यसैनिक, इ. प्रवाशांना बस भाड्यात सवलत देत असते. सवलतीच्या रकमेची प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून केली जाते. मार्च, २०१३ अखेर एकूण ₹ १,०४९ कोटी इतक्या सवलतीच्या रकमेपैकी राज्य शासनाकडून ₹ ७९४ कोटी रकमेची प्रतिपूर्ती करण्यात आली. याशिवाय, दुर्गम भागात अल्प उत्पन्न देणाऱ्या 'क' वर्गाच्या फेऱ्या (ज्या फेऱ्यांपासून होणारे उत्पन्न हे निव्वळ चल खर्चापेक्षा कमी असते) चालविल्या जातात (ज्या प्रामुख्याने सामाजिक बांधिलकी स्वरुपाच्या आहेत), त्यामुळे मरामाप महामंडळाला २०१२-१३ मध्ये सुमारे ₹ ३३१.१३ कोटी तोटा झाला. २०१२-१३ मध्ये मरामाप महामंडळाचे एकूण उत्पन्न व खर्च यांचे प्रमाण मागील वर्षापेक्षा अनुक्रमे ८.९ टक्क्यांनी व १७.० टक्क्यांनी जास्त होते. ग्रामीण, वातानुकूलित व शहरी वाहतुकीच्या प्रवासी उत्पन्नावर ३१ मार्च, २०१३ रोजी प्रवासी कराचा दर अनुक्रमे १७.५ टक्के, ५.५ टक्के व ३.५ टक्के होता. मरामाप महामंडळाची वित्तीय सांख्यिकी तक्ता ९.२५ मध्ये दिली आहे

**तक्ता ९.२५ महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची वित्तीय सांख्यिकी**

(₹ कोटी)

| तपशील | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
|---|---|---|---|
| अ) प्राप्ती | | | |
| प्रवासी महसूल | ४,८४०.८६ | ५,४८२.६१ | ५,९२१.०७ |
| इतर महसूल | १३८.८१ | ११७.६४ | १७४.७२ |
| **एकूण प्राप्ती** | **४,९७९.६७** | **५,६००.२५** | **६,०९५.७९** |
| ब) खर्च | | | |
| प्रवासी कर व मोटार वाहने कर | ६७१.५१ | ७४९.६७ | ७९६.९७ |
| घसारा | ३२९.१८ | ३५१.९२ | ३६४.५७ |
| इतर खर्च | ३,९३७.९८ | ४,४३९.५१ | ५,३२२.४२ |
| **एकूण खर्च** | **४,९३८.६७** | **५,५४१.१०** | **६,४८३.९६** |
| नफा (अ - ब) | ४१.०० | ५९.१५ | (-) ३८८.१७ |
| मागील ताळमेळ | (-) ११.७१ | ४.८२ | (-) ४०.६६ |
| निव्वळ नफा | २९.२९ | ६३.९७ | (-) ४२८.८३ |

*आधार*: महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.३६ मरामाप महामंडळात ३१ मार्च, २०१३ रोजी केंद्र व राज्य शासनाचे भागभांडवल अनुक्रमे ₹ ५६.७७ कोटी व ₹ १,३४१.२१ कोटी (प्रवासी कर ₹ ८३७.७४ कोटी समाविष्ट) होते.

## शहरी सार्वजनिक वाहतूक

९.३७ शहरातील सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक व्यवस्था हे वाहतुकीचे प्रमुख साधन आहे. राज्यातील २३ शहरात ही सुविधा उपलब्ध आहे. यापैकी सात शहरांत (औरंगाबाद, नांदेड, नाशिक, सांगली-मिरज, रत्नागिरी, चंद्रपूर, आणि वसई-विरार) मरामाप महामंडळ वाहतूक सेवा पुरविते. बृहन्मुंबईत बेस्ट, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर परिवहन महामंडळ आणि उर्वरित १३ शहरात संबंधित नगररिषद / महानगरपालिका वाहतूक सेवा पुरवितात. शहरी सार्वजनिक वाहतूक विषयक आकडेवारी तक्ता ९.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२६ शहरी सार्वजनिक वाहतूक विषयक आकडेवारी**

(३१ मार्च रोजी)

| वाहतूक सेवा पुरविणारी यंत्रणा | मार्गस्थ बसेसची प्रतिदिन सरासरी संख्या | | प्रतिदिन सरासरी प्रवासी वाहतूक (लाख) | | प्रतिदिन सरासरी सार्थ वाहतूक (लाख कि. मी.) | | निव्वळ नफा /तोटा (₹ लाख) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३ | २०१२ | २०१३ | २०१२ | २०१३ | २०१२ | २०१३ |
| बृहन्मुंबई विद्युत पुरवठा उपक्रम (बेस्ट) | ३,९२३ | ३,७९९ | ३९.३३ | ३८.६२ | ७.०० | ७.२७ | (-) ८४,७७६ | (-) ५०,८०९ |
| पुणे महानगर परिवहन महामंडळ | १,१८३ | १,२५४ | ११.७७ | १२.०८ | २.७४ | २.८९ | (-) २,२८७ | (-) ६,२६२ |
| ठाणे महानगरपालिका परिवहन | ३६४ | ३३६ | २.४३ | २.४१ | ०.३९ | ०.४१ | (-) १,५३० | उ.ना. |
| नवी मुंबई महानगरपालिका परिवहन | ३३६ | ३३६ | २.३४ | २.३५ | ०.७३ | ०.७० | (-) १,३६१ | उ.ना. |
| नागपूर महानगरपालिका परिवहन | २४० | २४० | १.४० | १.४९ | ०.६४ | ०.४४ | (-) २,०१५ | (-) २,०३९ |
| कोल्हापूर महानगरपालिका परिवहन | १२० | १२९ | ०.९७ | १.०० | ०.२८ | ०.३० | (-) ७९ | (-) २५१ |
| सोलापूर महानगरपालिका परिवहन | ६८ | ६९ | ०.४८ | ०.४८ | ०.१४ | ०.१४ | (-) ३०७ | (-) ४६० |
| कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन | ६३ | ६० | ०.५९ | ०.५५ | ०.१२ | ०.११ | (-) २९२ | (-) ५५२ |
| मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन | ५५ | ५० | ०.६० | ०.६५ | ०.१० | ०.१० | (-) २ | (-) ६० |
| अमरावती महानगरपालिका परिवहन | २५ | २८ | ०.०२ | ०.०२ | ०.०५ | ०.०६ | २० | २३ |
| अहमदनगर महानगरपालिका परिवहन | २५ | २३ | ०.१७ | ०.१५ | ०.०५ | ०.०५ | (-) ४६ | (-) ७६ |
| उल्हासनगर महानगरपालिका परिवहन | २५ | ५ | ०.२४ | $ | ०.०४ | ०.०१ | ६ | ० |
| जळगाव महानगरपालिका परिवहन | २५ | १८ | ०.०७ | ०.०५ | ०.०४ | ०.०४ | (-) ३२ | (-) ६५ |
| अकोला महानगरपालिका परिवहन | १३ | १३ | ०.०६ | ०.०७ | ०.०३ | ०.०३ | (-) # | (-) १६ |
| खोपोली नगरपालिका परिवहन | ६ | २ | ०.०४ | ०.०२ | ०.०१ | $ | (-) ४९ | (-) ८० |
| मरामाप महामंडळ (शहर वाहतूक) | ५०६ | ५५१ | ३.८३ | ३.५१ | १.०६ | १.०६ | (-)२,९९३ | (-) ४,००० |

*आधार :* संबधित नगरपालिका, महानगरपालिका, पुणे माहानगर परिवहन महामंडळ व मरामाप महामंडळ उ.ना. उपलब्ध नाही. # ₹ दहा हजारपेक्षा कमी, $ पाचशेपेक्षा कमी

## रेल्वे

९.३८ भारतात रेल्वे ही अतिशय परिणामकारक अशी मोठ्या प्रमाणावरील वाहतूक व्यवस्था आहे. प्रवासी व मालवाहतूक ही रेल्वेची दोन प्रमुख अंगे आहेत. ३१ मार्च, २०१३ रोजी राज्यातील लोहमार्गाची एकूण लांबी ६,१०७ किमी (३८२ किमी कोकण रेल्वेसह) होती. ती भारतातील एकूण ६५,४३६ किमी लांबीच्या ९. ३ टक्के एवढी होती. राज्यात चालू असलेल्या रेल्वे कामांची स्थिती तक्ता ९.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२७ राज्यात चालू असलेल्या रेल्वे कामांची स्थिती**

(३१ डिसेंबर, २०१३ रोजी)

| मार्गाचे नांव | मार्गाची लांबी (किमी) | एकूण अंदाजित किंमत (₹ कोटी) | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ | २६१ | ३,३३४.६८ | ११.७ किमी पर्यंतचे रुळ जोडणीचे काम पूर्ण, उर्वरित काम प्रगतीपथावर. भौतिक प्रगती ५ टक्के |
| बारामती - लोणंद (नवीन मार्ग) | ५४ | १३८.४८ | लोणंद-फलटण (२७ किमी) चे काम पूर्ण (लोणंद यार्डाची पुनर्बांधणी वगळून). फलटण-बारामती (२७ किमी) ५० टक्के |
| बेलापूर - सीवूड- उरण (नवीन मार्ग) | २७ | ५९८.६५ | १५ टक्के |
| वर्धा - नांदेड (नवीन मार्ग) | २८४ | ३,०००.३५ | १० टक्के |
| पनवेल - पेण (दुपदरीकरण) | ३५ | १९०.९९ | ७८ टक्के |
| पेण - रोहा (दुपदरीकरण) | ४० | २०३.०० | ६९ टक्के |
| गोधानी-कलमुना (दुपदरीकरण) | १३ | ५९.१३ | २५ टक्के |

*आधार :* दक्षिण पूर्व, मध्य, दक्षिण मध्य व पश्चिम रेल्वे आणि कोंकण रेल्वे महामंडळ

## मुंबई उपनगर रेल्वे

९.३९ स्थानिक रेल्वे हे मुंबई मध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे प्रमुख साधन आहे. मुंबईची उपनगरीय रेल्वे सेवा पश्चिम रेल्वे (३६ स्थानके) आणि मध्य रेल्वे (६२ स्थानके हार्बर मार्ग वगळून) या दोन क्षेत्रीय रेल्वेद्वारे चालविली जाते. हार्बर मार्ग (३८ स्थानके) हा मध्य रेल्वेचा भाग आहे. दर दिवशी एकूण २०१ गाड्या २,७७८ फेऱ्यांद्वारे ८.५० दशलक्ष प्रवाशांची ने-आण करतात. उपनगरी रेल्वे गाड्यांची वर्षनिहाय संख्या तक्ता ९.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२८ उपनगरी रेल्वे गाड्यांची वर्षनिहाय संख्या**

| वर्ष | ९ डब्बे | १२ डब्बे | १५ डब्बे | एकूण |
|---|---|---|---|---|
| १९७०-७१ | ७३ | - | - | ७३ |
| १९८०-८१ | ९८ | - | - | ९८ |
| १९९०-९१ | १२८ | १ | - | १२९ |
| २०००-०१ | ११८ | ३९ | - | १५७ |
| २०१०-११ | ५६ | १३६ | १ | १९३ |
| २०११-१२ | ४७ | १४७ | १ | १९५ |
| २०१२-१३ | ४१ | १५७ | ३ | २०१ |

*आधार* : मुंबई रेल्वे विकास महामंडळ

९.४० मुंबई रेल्वे विकास महामंडळ (मुंरेविम), एमयुटीपी II मधील रेल्वे घटकांची अंमलबजावणी करीत आहे. एमयुटीपी II मधील प्रगतीपथावरील प्रकल्पांचा तपशील तक्ता ९.२९ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.२९ एमयुटीपी- II मधील प्रगतीपथावरील प्रकल्पांचा तपशील**

(३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत)

| प्रकल्पाचे नाव | अंदाजित किंमत (₹ कोटी) | खर्च (₹ कोटी) | भौतिक प्रगती | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|---|
| सीएसटी-कुर्ला दरम्यान अतिरिक्त ५वा व ६वा मार्ग | ६५९ | ६.२८ | काम प्रगतीपथावर | २०१७-१८ |
| ठाणे-दिवा दरम्यान अतिरिक्त ५वा व ६वा मार्ग | २८८ | ७२.६६ | ४५ टक्के | डिसेंबर, २०१५ |
| मुंबई सेंट्रल-बोरीवली दरम्यान अतिरिक्त ६वा मार्ग | ५२२ | ८८.३५ | ३ टक्के | २०१७-१८ |
| अंधेरी - गोरेगाव दरम्यान हार्बर मार्गाचा विस्तार | १४८ | १३१.१३ | ९२ टक्के | नोव्हेंबर, २०१४ |

*आधार* : मुंबई रेल्वे विकास महामंडळ

## नवी मुंबई मेट्रो रेल प्रकल्प

९.४१ सिडकोने प्रस्तावित सेझ व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (एनएमआयए) वाहतूक जोडणीच्या बृहत आराखड्याचा आढावा घेण्याचा निर्णय घेतला. पाच मेट्रोरेल मार्गिकांचा तीन चरणांत विकास करण्याचे निश्चित केले आहे. पहिल्या चरणातील सीबीडी बेलापूर - पेंधर - कळंबोली - खांदेश्वर - एनएमआयए मार्गिकेचे काम तीन टप्प्यात अंमलात येईल. यापैकी पहिल्या टप्प्याचे सीबीडी बेलापूर - पेंधर (११.१ किमी) चे काम प्रगतीपथावर असून, प्रकल्पाचा अंदाजित खर्च ₹ २,१११.५१ कोटी इतका आहे. फेब्रुवारी, २०१४ पर्यंत त्यावर ₹ ३३८.३ कोटी इतका खर्च झाला आहे. सीबीडी बेलापूर-पेंधर (पहिला टप्पा) २०१६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

## जलवाहतूक

### मोठी बंदरे

९.४२ राज्यास ७२० किमी लांबीची समुद्र किनारपट्टी लाभली असून, दोन मोठी बंदरे आहेत. जी मुंबई पोर्ट ट्रस्ट (एमबीपीटी) व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) द्वारे परिचालित केली जातात. २०१३-१४ मध्ये, ३१ डिसेंबर पर्यंत एमबीपीटी व जेएनपीटी यांनी अनुक्रमे ४३६.४४ व ४५९.९० लाख टन मालाची वाहतूक केली. एमबीपीटीचे वर्ष २०१२-१३ चे कार्यान्वयीन आधिक्य/नफा ₹ २०९.३५ कोटी होते जे मागील वर्षापेक्षा ३.८५ टक्क्यांनी अधिक होते. जेएनपीटीचे वर्ष २०१२-१३ साठी कार्यान्वयीन आधिक्य

₹ ४८९.१७ कोटी होते जे मागील वर्षापेक्षा २६.७ टक्क्यांनी कमी होते. मोठया बंदरांची वाहतूक विषयक आकडेवारी तक्ता ९.३० मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३० मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक आकडेवारी**

| बाब | एमबीपीटी | | शेकडा बदल | जेएनपीटी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०११-१२ | २०१२-१३ | | २०११-१२ | २०१२-१३ | |
| एकूण माल वाहतूक क्षमता (लाख टन) | ४८७.०० | ४८७.०० | ०.०० | ६४०.०० | ६४०.०० | ०.०० |
| कर्मचारी संख्या | १२,७२६ | ११,९५५ | (-) ६.०६ | १,७१८ | १,७०६ | (-) ०.७० |
| माल वाहतूक (लाख टन) | | | | | | |
| अ) आयात | ३८८.७२ | ४००.६० | ३.०६ | ३३२.१८ | ३३६.९९ | १.४५ |
| ब) निर्यात | १७३.१४ | १७९.७८ | ३.८४ | ३२५.१२ | ३०७.८९ | (-) ५.३० |
| **क) एकूण** | **५६१.८६** | **५८०.३८** | **३.३०** | **६५७.३०** | **६४४.८८** | **(-) १.८९** |
| प्रवासी वाहतूक (हजारात) | ४.७० | ५.६१ | १९.३६ | ला.ना. | ला.ना. | ला.ना. |
| बंदरात आलेल्या बोटींची संख्या | ५,७५८ | ५,२१२ | (-) ९.४८ | २,९२९ | २,५८८ | (-) ११.६ |
| परिचालन उत्पन्न (₹ कोटी) | १,०२३.०५ | १,१५४.४४ | १२.८४ | १,१६७.१५ | १,०९७.८७ | (-) ५.९४ |
| परिचालन खर्च (₹ कोटी) | ८२१.४७ | ९४५.०९ | १५.०५ | ४९९.६३ | ६०८.७० | २१.८३ |
| परिचालन आधिक्य / नफा (₹ कोटी) | २०१.५८ | २०९.३५ | ३.८५ | ६६७.५२ | ४८९.१७ | (-) २६.७२ |

*आधार* : एमबीपीटी व जेएनपीटी    ला.ना. लागू नाही

## लहान बंदरे

९.४३ शासनाने हरित क्षेत्र बंदरे, बहुउद्देशीय धक्के व मालवाहतूक स्थानके यांच्या जलद विकासासाठी बंदर धोरण २०१० जाहीर केले आहे. महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड (एमएमबी) सहा लहान बंदरे विकसित करणार आहे. या सहा बंदरांपैकी धामणखोल-जयगड, दिघी आणि लवगण-जयगड (आंग्रे बंदर) ही बंदरे कार्यान्वित झाली आहेत. रेवस-आवरे, विजयदुर्ग आणि रेडी या बंदरांच्या बांधकामाची पूर्व तयारी प्रगतीपथावर आहे. याशिवाय, लहान बंदरांच्या परिसरात अनेक बंदिस्त व बहुउद्देशीय थांबे असून तेथेदेखील मालाची वाहतूक केली जाते. सर्व लहान बंदरांनी मिळून २०१३-१४ मध्ये नोव्हेंबर पर्यंत १५३.०३ लाख टन माल वाहतूक आणि ११०.९० लाख प्रवासी वाहतूक केली आहे. लहान बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३१ लहान बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | २०११-१२ | २०१२-१३ | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| **माल वाहतूक (लाख टन)** | | | |
| अ) आयात | १६३.९६ | २०३.८९ | २४.३५ |
| ब) निर्यात | ३५.५१ | ३८.०९ | ७.२७ |
| **एकूण** | **१९९.४७** | **२४१.९८** | **२१.३१** |
| **प्रवासी वाहतूक (लाख)** | | | |
| अ) यांत्रिकी बोटीतून | १५९.०३ | १६८.८९ | ६.२० |
| ब) बिगर - यांत्रिकी बोटीतून | २०.२२ | १५.२६ | (-)२४.५३ |
| **एकूण** | **१७९.२५** | **१८४.१५** | **२.७३** |

*आधार* : महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड

## विमान वाहतूक

९.४४ राज्यात तीन आंतरराष्ट्रीय व सात देशांतर्गत विमानतळे आहेत. विमानतळनिहाय प्रवासी व मालवाहतूक तक्ता ९.३२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३२ विमानतळनिहाय प्रवासी व माल वाहतूक**

| विमानतळ | प्रवासी वाहतूक (लाख) | | शेकडा बदल | माल वाहतूक (टन) | | शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२ | २०१३ | | २०१२ | २०१३ | |
| **देशांतर्गत** | | | | | | |
| मुंबई | २१०.४४ | २०२.७७ | (-) ३.६४ | १,९०,२८८ | १,८२,४२२ | (-) ४.१३ |
| पुणे | ३२.२९ | ३२.३५ | ०.१९ | २४,१३४ | १९,८६१ | (-) १७.७१ |
| नागपूर | १३.७७ | १२.१९ | (-) ११.४७ | ४,५८८ | ४,८०० | ४.६२ |
| औरंगाबाद | ४.०१ | ४.३६ | ८.७३ | १,२२७ | ७२४ | (-) ४४.९९ |
| कोल्हापूर | ०.०८ | # | (-) ९९.०९ | ० | ० | ० |
| जुहू | १.४५ | १.६७ | १५.१७ | ३७१ | ४२९ | १५.६३ |
| नांदेड | ०.५७ | ०.४९ | (-) १४.०४ | ० | ० | ० |
| **क) एकूण** | **२६२.६१** | **२५३.८३** | **(-) ३.३४** | **२,२०,६०८** | **२,०८,२३६** | **(-) ५.६१** |
| **आंतरराष्ट्रीय** | | | | | | |
| मुंबई | ९४.९३ | ९७.३० | २.५० | ४,६७,१८२ | ४,५२,७४१ | (-) ३.०९ |
| नागपूर | ०.३९ | ०.४४ | १२.८२ | ३८८ | ४०६ | ४.६४ |
| पुणे | ०.६४ | ०.६० | (-) ६.२५ | ० | ० | ० |
| औरंगाबाद@ | ०.०३ | ०.०३ | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **९५.९९** | **९८.३८** | **२.४९** | **४,६७,५७०** | **४,५३,१४७** | **(-) ३.०८** |

*आधार :* भारतीय विमानतळ प्राधिकरण @ चार्टर्ड विमानाने प्रवासी वाहतूक

९.४५ जेव्ही पाटनर, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादित यांच्यासह भारतीय विमानतळ प्राधिकरणाने (एएआय) छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई (सीएसआयए) च्या आधुनिकीकरणांतर्गत एकात्मिक नवीन टी २ टर्मिनल बांधण्याचा महाप्रकल्प हाती घेतला आहे. नवीन टी २ टर्मिनल हे जागतिक दर्जाचे सुसज्ज टर्मिनल असून, त्यांची प्रतिवर्ष ४० दशलक्ष प्रवासी वाहतूक हाताळण्याची क्षमता आहे. प्रकल्पाचा खर्च ₹ १२,५०० कोटी असून त्यापैकी ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत ₹ १०,४३३ कोटी खर्च झाला आहे आणि जवळपास ८४ टक्के काम पूर्ण झाले आहे.

९.४६ नागपूर येथील बहुआयामी आंतरराष्ट्रीय प्रवासी व कार्गो हब विमानतळ (मिहान) प्रकल्पामध्ये सध्याच्या विमानतळाला आंतरराष्ट्रीय प्रवासी व कार्गो हब विमानतळामध्ये विकसीत करण्याचा समावेश आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (एमएडीसी) व एएआय यांच्या मिहान इंडीया लि. (एमआयएल) या संयुक्त भांडवली कंपनीद्वारे सदर प्रकल्प राबविण्यात येत आहे. एमएडीसी ने जवळपास २,९६२ हेक्टर जमीन अधिग्रहीत केली आहे. महाराष्ट्र शासनाने आतापर्यंत ₹ ४७३.९ कोटी इतके अनुदान दिले आहे. सन २०१३-१४ मध्ये एमएडीसीने ११०.३ एकर जमीन सुमारे ₹ १११ कोटी इतक्या किंमतीस विकली. टीएएल व कॅलिबर पॉईट यांचे प्रकल्प कार्यांवित झाले असून, बोईंग व टीसीएस या कंपन्यांनी त्यांचे प्रकल्प जून, २०१४ पासून कार्यांवित करण्याचे नियोजित केले आहे.

९.४७ मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई येथे अतिरिक्त विमानतळ उभारण्याचे प्रस्तावित असून चार चरणातील या प्रकल्पाचा खर्च ₹ १४,५७४ कोटी इतका आहे. पहिल्या टप्याचा प्रकल्प खर्च ₹ ६,१४७ कोटी इतका असून, त्यात उभारणीपूर्व खर्चाचा समावेश आहे. विमानतळ विकासासाठी एकूण २,२६८ हेक्टर क्षेत्र आरक्षित केले आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) रिलायन्स विमानतळ प्राधिकरणास ९५ वर्षाच्या भाडे कराराने विकास, सुधारणा, कार्यान्वयन, व्यवस्थापन व देखरेख करण्यासाठी नोव्हेंबर, २००९ पासून राज्यातील नांदेड, लातूर, उस्मानाबाद, यवतमाळ आणि बारामती ही पाच विमानतळे दिली आहेत. या विमानतळांवरून केवळ अनियोजित विमानांची उड्डाणे होतात.

९.४८ हलकॉन यांनी ओझर विमानतळ, नाशिक येथे विमान मालवाहतूक सेवेस सप्टेंबर, २०११ पासून सुरुवात केली आहे. ओझर विमानतळावरुन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये अनुक्रमे ५९,३८९ मे. टन आणि ४२,४५० मे. टन मालाची वाहतूक केली आहे.

## दळणवळण

९.४९ दळणवळण प्रणालीमध्ये टपाल, दुरध्वनी, दृकश्राव्य व माहिती दूरसंचार यांचा समावेश होतो. डाक सेवेबाबतची आकडेवारी तक्ता ९.३३ मध्ये दिली आहे.

९.५० सप्टेंबर, २०१३ अखेर राज्यात एकूण दूरध्वनी जोडण्यांची संख्या ५४.२१ लाख होती. राज्यात दर लाख लोकसंख्येमागे सप्टेंबर, २०१३ अखेर भ्रमणध्वनी धारकांची संख्या ८४,८९९ होती. चालकनिहाय दूरध्वनी जोडण्यांची व भ्रमणध्वनी धारकांची आकडेवारी तक्ता ९.३४ मध्ये दिली आहे.

९.५१ राज्यात (गोव्यासह) ३१ मार्च, २०१३ आणि ३० सप्टेंबर, २०१३ रोजी ब्रॉडबॅन्ड वापरणाऱ्यांची संख्या अनुक्रमे २५.०६ लाख व २५.६५ लाख होती.

**तक्ता ९.३३ डाक सेवेबाबतची आकडेवारी**

( संख्या )

| बाब | क्षेत्र | २०११-१२ | २०१२-१३ |
|---|---|---|---|
| डाक कार्यालये | ग्रामीण | ११,३३९ | ११,३४६ |
| | नागरी | १,२६१ | १,२४९ |
| | **एकूण** | **१२,६००** | **१२,५९५** |
| टपाल पेट्या | ग्रामीण | ४२,०१२ | ४०,२६६ |
| | नागरी | ८,४१७ | ८,६२५ |
| | **एकूण** | **५०,४२९** | **४८,८९१** |
| डिलिव्हरी पोस्टमेन (ग्रामीण मध्ये डाक - सेवकांची संख्या मिळवून) | ग्रामीण | २०,३८५ | २०,९९९ |
| | नागरी | ७,२८६ | ६,२५५ |
| | **एकूण** | **२७,६७१** | **२७,२५४** |

*आधार :* मुख्य डाक कार्यालय, मुंबई

**तक्ता ९.३४ चालकनिहाय दूरध्वनी जोडण्या व भ्रमणध्वनी धारकांची आकडेवारी**

(संख्या लाखात)

| चालक | २०११-१२ | | २०१२-१३ | | २०१३-१४+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी |
| एमटीएनएल | १८.९५ | २९.४६ | १८.६६ | २४.०५ | १९.४४ | ११.८४ |
| बीएसएनएल | २२.४० | ६२.२६ | २०.४६ | ६८.७६ | १९.४३ | ६६.१२ |
| भारती | ४.०१ | १३५.७० | ४.०३ | १३९.२१ | ४.१९ | १४३.३४ |
| आयडीया/स्पाईस | ... | १८०.२५ | ... | १९४.९७ | ... | २०६.५९ |
| रिलायंस | ३.३३ | १९७.२७ | ३.३२ | १४१.०४ | ३.३३ | १३१.१६ |
| टाटा | ७.८१ | १३३.४६ | ७.९४ | ९७.३९ | ७.७१ | ९४.९५ |
| होडाफोन | ०.०६ | १८७.५४ | ०.१० | १९८.६१ | ०.११ | २०९.०८ |
| एअरसेल-डिशनेट | ... | २४.७० | ... | २७.३८ | ... | ३०.१६ |
| सिस्टेमा | ... | १२.६० | ... | १०.४१ | ... | ... |
| व्हिडिवोकॉन | ... | ९.३९ | ... | ... | ... | ... |
| इस्टीसॅलेट | ... | १.५९ | ... | ... | ... | ... |
| यूनिटेक | ... | ६०.७२ | ... | ५५.८२ | ... | ५७.७१ |
| लूप | ... | ३२.६१ | ... | ३०.०८ | ... | २८.८७ |
| **एकूण** | **५६.५६** | **१,०६७.५५** | **५४.५१** | **९८७.७२** | **५४.२१** | **९७९.८२** |

*आधार :* टेलिफोन रेग्यूलेटरी ऍथॉरिटी ऑफ इंडिया + ३० सप्टेंबरपर्यंत

* * * * *

# परिशिष्ट ९.१

## राज्यातील विजेचा पुरवठा व वापर

| बाब<br>(१) | १९६०-६१<br>(२) | १९७०-७१<br>(३) | १९८०-८१<br>(४) | १९९०-९१<br>(५) | २०००-०१<br>(६) | २०१०-११<br>(७) | २०१२-१३<br>(८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. स्थापित क्षमता (मेगावॅट)** | | | | | | | |
| अ-१ राज्यातील स्थापित क्षमता- | | | | | | | |
| (१) औष्णिक | ४७७$ | १,०६५$ | २,७७१ | ६,४६२ | ८,०७५ | ९,६६५ | १३,९४६ |
| (२) अक्षय ऊर्जा | --- | --- | --- | --- | --- | ३,४०८ | ४,७८९ |
| (३) जलजन्य | २८२ | ८४४ | १,३१७ | १,५५२ | २,८७४ | ३,०६६ | ३,०६६ |
| (४) नैसर्गिक वायुजन्य | --- | --- | --- | ६७२ | १,८२० | २,७१४ | ३,०७२ |
| **एकूण (अ-१). .** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१२,७६९** | **१८,८५३** | **२४,८७३** |
| अ-२ स्थापित क्षमतेत महाराष्ट्राचा हिस्सा | | | | | | | |
| (१)राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २,०४८@ | ४,६८६ | ५,८३१ |
| (२)अणुशक्ती महामंडळ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | १३७ | ६९० | ६९० |
| **एकूण (अ-२)** | **उ.ना.** | **उ.ना.** | **उ.ना.** | **उ.ना.** | **२,१८५** | **५,३७६** | **६,५२१** |
| **एकूण (अ-१ + अ-२)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१४,९५४** | **२४,२२९** | **३१,३९४** |
| **ब. निर्मिती (दशलक्ष युनिट)** | | | | | | | |
| (१) औष्णिक | १,९०३$ | ३,३९२ | ११,४१६ | २८,०८५ | ४९,३७७ | ५२,७९६ | ६६,०७५ |
| (२) नैसर्गिक वायुजन्य | --- | --- | --- | २,७३० | ६,९४३ | १८,७२९ | १०,२४२ |
| (३) जलजन्य | १,३६५ | ४,५३३ | ६,४४८ | ५,६१५ | ४,८८९ | ६,३७४ | ५,९८० |
| (४) अक्षय ऊर्जा # | --- | --- | --- | --- | --- | ५,११८ | ५,८४२ |
| **एकूण . .** | **३,२६८** | **७,९२५** | **१७,८६४** | **३६,४३०** | **६१,२०९#** | **८३,०१७** | **८८,१३९** |
| **क. वापर (दशलक्ष युनिट)** | | | | | | | |
| (१) औद्योगिक | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ३८,११० |
| (२) घरगुती | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४६ | २२,८३१ |
| (३) कृषि | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | २०,९८४ |
| (४) वाणिज्यिक | १९८ | ५४७ | ९४९ | २,०६८ | ४,१०५ | ११,५२७ | १२,६३५ |
| (५) रेल्वे | ३३९ | ४२१ | ७६६ | ९७० | १,५८१ | २,१८८ | २,३८९ |
| (६) सार्वजनिक पाणी पुरवठा | ३५ | १४६ | ३३० | उ.ना. | १,१९९ | १,९८३ | २,२६३ |
| (७) सार्वजनिक दिवाबत्ती | २० | ७४ | १५९ | २९१ | ५५१ | ८४६ | १,३१३ |
| (८) संकीर्ण | --- | ६२ | १९८ | २६७ | ३७८ | ६३३ | १४० |
| **एकूण . .** | **२,७२०** | **७,६५०** | **१४,०३४** | **२९,९७१** | **४७,२८९** | **८७,३९६** | **१,००,६६५** |
| **ड. दरडोई विजेचा वापर (युनिट)** | | | | | | | |
| (१) औद्योगिक | ४६.८ | १०५.४ | १२९.५ | १९५.४ | १९१.२ | ३०७.२ | ३३१.२ |
| (२) वाणिज्यिक | ५.० | १०.९ | १५.१ | २७.५ | ४२.७ | १०२.९ | १०९.८ |

*आधार* - (१) केंद्रीय विद्युत प्राधिकरण, भारत सरकार, नवी दिल्ली.
(२) पश्चिम विभागीय ऊर्जा समिती, मुंबई (डब्लू.आर.पी.सी.)
(३) महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, मुंबई.(महानिर्मिती)
(४) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मुंबई.(महावितरण)
(५) बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (बेस्ट)
(६) टाटा पॉवर
(७) रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर

टीप - (१) उपलब्ध आकडेवारी केवळ सार्वजनिक विद्युत व्यवसायी यंत्रणेची आहे.
(२) @ यात राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ व अणुशक्ती महामंडळाकडील वाटप न झालेला तसेच गोवा राज्याचा शिलकी ३२३ मेगावॅटचा अतिरिक्त हिस्सा समाविष्ट आहे.
(३) # यात बंदिस्त वीज व अक्षय ऊर्जेची (महावितरणला विकलेली वीज) आकडेवारी समाविष्ट आहे.
(४) $ यात तेलजन्य ऊर्जेची आकडेवारी औष्णिक ऊर्जेत समाविष्ट आहे.
(५) टाटा पॉवर व रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर वगळून इतर खाजगी कंपन्यांची स्थापित क्षमता व निर्मिती डब्ल्यूपीआरसी/सीइएच्या वेबसाईट अहवालानुसार दिली आहे.
(६) १ युनिट = एक किलो वॅट तास

उ.ना. - उपलब्ध नाही.

## परिशिष्ट ९.२
## महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी
(सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील)

(किलोमीटरमध्ये)

| अ.क्र. | वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | रस्ते | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रमुख जिल्हा | इतर जिल्हा | ग्रामीण | एकूण |
| (१) | (२) | (३) | | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | १९६५-६६ | २,३६४ | ...... | १०,५२८ | १२,६२८ | ८,७४४ | १७,५२४ | ५१,७८८ |
| २ | १९७०-७१ | २,४४५ | ...... | १४,२०३ | १७,६८४ | ११,०१२ | २०,०२० | ६५,३६४ |
| ३ | १९८०-८१ | २,९४५ | ...... | १८,९४९ | २५,२३३ | २५,४०४ | ६८,६०० | १,४१,१३१ |
| ४ | १९९०-९१ | २,९५९ | ...... | ३०,९७५ | ३८,९३६ | ३८,५७३ | ६१,५२२ | १,७२,९६५ |
| ५ | २०००-०१ | ३,६८८ | ...... | ३३,२१२ | ४६,७५१ | ४३,६९६ | ८९,५९९ | २,१६,९४६ |
| ६ | २००५-०६ | ४,३६७ | ...... | ३३,५७१ | ४८,९८७ | ४५,२२६ | ९९,२७९ | २,३१,४३० |
| ७ | २००६-०७ | ४,३६७ | ...... | ३३,६७५ | ४९,१४७ | ४५,६७४ | १,००,८०१ | २,३३,६६४ |
| ८ | २००७-०८ | ४,३६७ | ...... | ३३,८०० | ४९,३९३ | ४५,८८६ | १,०२,१४९ | २,३५,५९५ |
| ९ | २००८-०९ | ४,३६७ | ...... | ३३,९३३ | ४९,६२१ | ४६,१४३ | १,०३,६०४ | २,३७,६६८ |
| १० | २००९-१० | ४,३७६ | ...... | ३४,१०२ | ४९,९०१ | ४६,८१७ | १,०४,८४४ | २,४०,०४० |
| ११ | २०१०-११ | ४,३७६ | ...... | ३४,१०३ | ४९,९३६ | ४६,८९७ | १,०६,४०० | २,४१,७१२ |
| १२ | २०११-१२ | ४,३७६ | ...... | ३४,१५७ | ५०,२५६ | ४७,५२९ | १,०६,६०१ | २,४२,९१९ |
| १३ | २०१२-१३ | ४,३७६ | ६,६९४ | २७,५२८ | ५०,२५६ | ४७,५७३ | १,०६,७४५ | २,४३,१७२ |

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - (१) १९८७ पर्यंतच्या रस्ते लांबीची विभागणी १९६१-८१ रस्ते विकास योजनेनुसार आणि १९८७-८८ पासून ही विभागणी १९८१-२००१ रस्ते विकास योजनेनुसार केली आहे .

(२) सन १९६५-६६ ते २०११-१२ करिता राज्य महामार्गात प्रमुख राज्य महामार्गाचा समावेश आहे.

(३) सन २०१२-१३ मधील रस्ते लांबीची विभागणी २००१-२१ रस्ते विकास योजनेनुसार आहे.

# परिशिष्ट ९.३
## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील जिल्हानिहाय साध्य केलेली रूंदीनुसार रस्त्यांची लांबी

(किमी)

| अ. क्र. | जिल्हा / रूंदी (मीटर) | साध्य लांबी २०१२ | | | | | साध्य लांबी २०१३ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण | ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | बृहन्मुंबई | ० | ० | ० | ४९ | ४९ | ४९ | ० | ० | ० | ४९ |
| २ | ठाणे | ३८१ | ७९४ | ५,१७२ | ८१५ | ७,१६२ | ४७१ | ७७९ | ५,०८१ | ८३१ | ७,१६२ |
| ३ | रायगड | ४९६ | ५७८ | ४,१८१ | १४४ | ५,३९९ | ६३१ | ५४५ | ४,०७९ | १४४ | ५,३९९ |
| ४ | रत्नागिरी | ३७५ | ४३५ | ६,५५८ | ० | ७,३६८ | ६०४ | ६३८ | ६,१२६ | ० | ७,३६८ |
| ५ | सिंधुदुर्ग | १३१ | ६५७ | ५,३९३ | ० | ६,१८१ | २७७ | ५७० | ५,३३४ | ० | ६,१८१ |
| | **कोकण** | **१,३८३** | **२,४६४** | **२१,३०४** | **१,००८** | **२६,१५९** | **२,०३२** | **२,५३२** | **२०,६२०** | **९७५** | **२६,१५९** |
| ६ | पुणे | ७५६ | ९३७ | १२,१४४ | २३९ | १४,०७६ | ९५९ | ८३४ | १२,१०६ | २३७ | १४,१३६ |
| ७ | सातारा | २१३ | ९०० | ७,१४० | १,७९४ | १०,०४७ | २१३ | ९०० | ७,१५५ | १,७७९ | १०,०४७ |
| ८ | सांगली | ३९४ | १,३८१ | ७,२४७ | ३० | ९,०५२ | ४३४ | १३११ | ७,२४७ | ६० | ९,०५२ |
| ९ | कोल्हापुर | ३३८ | १,५२१ | ५,२५५ | ३३६ | ७,४५० | ३३८ | १,४६३ | ५,२५५ | ३९४ | ७,४५० |
| १० | सोलापूर | १,२२५ | ९२२ | ११,२१६ | २२ | १३,३८५ | १,३२० | ८३२ | ११,२१६ | २२ | १३,३९० |
| | **पश्चिम महाराष्ट्र** | **२,९२६** | **५,६६१** | **४३,००२** | **२,४२१** | **५४,०१०** | **३,२६४** | **५,३४०** | **४२,९७९** | **२,४९२** | **५४,०७५** |
| ११ | अहमदनगर | ९१९ | १,९२० | ९,१३५ | ९१४ | १२,८८८ | ९६४ | १९०२ | ९,१०८ | ९१४ | १२,८८८ |
| १२ | नाशिक | ७३९ | १,३०९ | ११,४६२ | ६७४ | १४,१८४ | ९८२ | १,०६६ | ११,४९२ | ६७४ | १४,२१४ |
| १३ | धुळे | ३३७ | ४१० | ४,५७३ | ११८ | ५,४३८ | ४१९ | ३४० | ४,६४७ | ३२ | ५,४३८ |
| १४ | नंदुरबार | १७० | ४४८ | ४,०५४ | ० | ४,६७२ | ४१६ | २१६ | ४,०४० | ० | ४,६७२ |
| १५ | जळगाव | ५१७ | १,०७४ | ६,८०३ | १,६८८ | १०,०८२ | ५२४ | १०६७ | ६,८३० | १,६६१ | १०,०८२ |
| | **उत्तर महाराष्ट्र** | **२,६८२** | **५,१६१** | **३६,०२७** | **३,३९४** | **४७,२६४** | **३,३०५** | **४,५९१** | **३६,११७** | **३,२८१** | **४७,२९४** |
| १६ | औरंगाबाद | ४७७ | ६८३ | ७,२९१ | १,३८६ | ९,८३७ | ४९५ | ६५९ | ७,२४९ | १,४३४ | ९,८३७ |
| १७ | जालना | २४४ | ६७४ | ३,७४८ | ८ | ४,६७४ | २९८ | ८५२ | ३,५१६ | ६३ | १,७२९ |
| १८ | परभणी | १६५ | ४४१ | ३,३५३ | ८५६ | ४,८१५ | २४० | ५०६ | ३,१५१ | ९१८ | ४,८१५ |
| १९ | हिंगोली | ११९ | ४१४ | २,६९१ | ० | ३,२२४ | २४२ | २३० | २,७४५ | ७ | ३,२२४ |
| २० | बीड | ७०० | ७४९ | ६,३७५ | १,६२६ | ९,४५० | ८१६ | ३५२ | ८,४९५ | ५३९ | १०,२०२ |
| २१ | नांदेड | ४३८ | ६१४ | ८,७७४ | ३७६ | १०,२०२ | ७०१ | ५५२ | ६,५१६ | १,६८१ | ९,४५० |
| २२ | उस्मानाबाद | ३७२ | ७९६ | ४,४४९ | १८६ | ५,८०३ | ३८६ | ७६८ | ४,४४६ | २०३ | ५,८०३ |
| २३ | लातूर | ३६९ | ८५७ | ४,४४६ | ६० | ५,७३२ | ४०० | ८६४ | ४,३८४ | ८४ | ५,७३२ |
| | **मराठवाडा** | **२,८८४** | **५,२२८** | **४१,१२७** | **४,४९८** | **५३,७३७** | **३,५७८** | **४,७८३** | **४०,५०२** | **४,९२९** | **५३,७९२** |
| २४ | बुलढाणा | ३२८ | ७३४ | ३,६२० | ७५ | ४,७५७ | ३९६ | ६६३ | ३,५१७ | १८१ | ४,७५७ |
| २५ | अकोला | २४३ | ४४० | २,१३३ | १० | २,८२६ | २४८ | ३९६ | २,१७२ | १० | २,८२६ |
| २६ | वाशिम | १७६ | ४७९ | २,५११ | ४ | ३,१७० | २९१ | ४०१ | २,४७७ | १ | ३,१७० |
| २७ | अमरावती | ४५५ | ८२७ | ५,३५२ | १२५ | ६,७५९ | ५६५ | ७५० | ५,३१९ | १४९ | ६,७८३ |
| २८ | यवतमाळ | ५७४ | ७८५ | ५,८८४ | ८३ | ७,३२६ | ५८७ | ७८० | ५,७१३ | २४६ | ७,३२६ |
| | **अमरावती** | **१,७७६** | **३,२६५** | **१९,५००** | **२९७** | **२४,८३८** | **२,०८७** | **२,९९०** | **१९,१९८** | **५८७** | **२४,८६२** |
| २९ | वर्धा | २१७ | ३५४ | ३,०११ | ५६१ | ४,१४३ | ३५४ | २२७ | २,८६६ | ७१६ | ४,१६३ |
| ३० | नागपूर | ५६९ | ५१९ | ६,५४३ | ३५५ | ७,९८६ | ६१७ | ४७१ | ६,३१३ | ६३५ | ८,०३६ |
| ३१ | भंडारा | ९२ | ३३८ | ४,१८६ | १३४ | ४,७५० | १०६ | ३३१ | ३,९२६ | ३९६ | ४,७५९ |
| ३२ | गोंदिया | ४२ | ३०७ | ५,०८१ | ३७५ | ५,८०५ | १२८ | २२६ | ४,८९६ | ५५५ | ५,८०५ |
| ३३ | चंद्रपुर | ४०१ | ५०२ | ५,७६९ | ९७४ | ७,६४६ | ४९७ | १,१९१ | ४,९४६ | १०१२ | ७,९४६ |
| ३४ | गडचिरोली | २६३ | ५७० | ४,७११ | १,०३७ | ६,५८१ | ४२९ | ४२७ | ४,६९१ | १०३४ | ६,५८१ |
| | नागपूर | **१,५८४** | **२,५९०** | **२९,३०१** | **३,४३६** | **३६,९११** | **२,१३१** | **२,८७३** | **२७,६३८** | **४,३४८** | **३६,९९०** |
| | **महाराष्ट्र** | **१३,२३५** | **२४,३३९** | **१,९०,२६१** | **१५,०५४** | **२,४२,९१९** | **१६,३९७** | **२३,१०९** | **१,८७,०५४** | **१६,६१२** | **२,४३,१७२** |

आधार - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

# परिशिष्ट ९.४
# महाराष्ट्र राज्यातील वापरात असलेली मोटार वाहने

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०१३ | २०१४* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | मोटार सायकली, स्कूटर व मोपेड | ८३,९३० | ३,४६,८२६ | १६,९६,१५७ | ४४,०९,९०६ | १,४९,७६,४८७ | १,६४,१८,९०८ |
| २ | मोटार गाड्या, जीप आणि स्टेशन वॅगन्स् | १,२२,५०८ | २,२४,७५२ | ४,२३,५०५ | ९,०१,२७८ | २९,७३,४५९ | ३२,७६,३४७ |
| ३ | टॅक्सी कॅब्ज | १७,८०६ | ३१,३०२ | ४३,१६८ | ८६,४३८ | १,८८,५४४ | २,०५,२२६ |
| ४ | स्वयंचलित रिक्शा | ३,०४९ | २९,४७४ | १,२६,०४९ | ४,०७,६६० | ६,६१,६६० | ६,९७,७२० |
| ५ | स्टेज कॅरेजेस् | १०,२५० | १३,७८९ | १८,२०३ | २७,२८६ | ३४,८२६ | ३८,०६९ |
| ६ | कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस | .. | १,४९८ | ३,९८० | १३,९७५ | ३२,६६५ | ३६,०४० |
| ७ | मालमोटारी - | | | | | | |
| | (१)डिझेल इंजिन | ३४,९८७ | ८७,०७९ | १,८०,८८३ | ३,४१,३४४ | १०,७५,४०६ | ११,५२,३८१ |
| | (२)पेट्रोल इंजिन | २१,७९१ | १८,००५ | १३,७७४ | ५७,३१७ | ५३,५२८ | ६०,७७४ |
| | (३ ) इतर (सीएनजी, एलपीजी, इ.) | .. | .. | .. | उ.ना. | ११,९७७ | २९,५५५ |
| ८ | रुग्णवाहिका | ४४१ | ९२५ | २,२३३ | ४,०२५ | ११,२५० | १२,३९३ |
| ९ | शाळेच्या बसेस | ४९१ | ५९४ | १,०२५ | १,७१४ | १९,२१३ | २२,६६३ |
| १० | खाजगी प्रवासी वाहने | ८१० | २,१७१ | ४,६२२ | ५,८१५ | ९,९२७ | १०,७५३ |
| ११ | जोड वाहने (ट्रेलर) | ७,०७५ | २३,१७३ | ६०,८५८ | १,६७,८५६ | ३,३८,६३५ | ३,४५,३३१ |
| १२ | ट्रॅक्टर्स | ७,८२१ | २४,०७९ | ६१,०८८ | १,७२,५७८ | ४,४९,२०८ | ४,९४,७९२ |
| १३ | इतर | ८१० | १,३१९ | ५,०४० | ९,८७२ | ३५,३४५ | ३८,६९८ |
| | **एकूण** | **३,११,६६९** | **८,०४,९८६** | **२६,४०,५८५** | **६६,०७,०५४** | **२,०८,७२,१००** | **३९,६५०** |
| | दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या | ६१८ | १,३०९ | ३,३५३ | ७,१८६ | १८,५६९ | २०,५०४ |
| | दर किमी रस्तेलांबीमागे मोटार वाहनांची संख्या | ५ | ६ | १५ | ३१ | ८६ | ९४ |
| | दर लाख लोकसंख्येमागे रुग्णवाहिकांची संख्या | ०.९ | १.५ | २.८ | ४.४ | ९.९ | १०.७ |

*आधार* - परिवहन आयुक्त, महाराष्ट्र शासन, मुंबई

* अस्थायी

टीप - वरील आकडे दर वर्षीच्या १ जानेवारीचे आहेत.

# १०

# सामाजिक क्षेत्र



# १०. सामाजिक क्षेत्र

१०.१ सामाजिक विकास हा आर्थिक विकासाचा एक प्रमुख व सक्षम घटक आहे. निरोगी, शिक्षित व कुशल कार्यबलाचे आर्थिक विकासामध्ये महत्वपूर्ण व परिणामकारक योगदान असते. सामाजिक क्षेत्राचा केंद्रबिंदू मुख्यत्वे दुर्बल घटक, प्रतिकूल परिस्थितीत असणारे व नि:शक्त यांच्या स्थितीत सुधारणा करणे हा आहे.

## शिक्षण

१०.२ शिक्षण हे राष्ट्रीय तसेच वैयक्तिक विकास साधण्याचे एक महत्त्वाचे साधन असल्याचे सर्वत्र मानले जाते. राज्याने शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी केली असल्याचे दिसून येते. जनगणना २०११ नुसार राज्याचा साक्षरता दर ८२.९ टक्के असून तो राष्ट्रीय साक्षरतेच्या सरासरीपेक्षा बराच जास्त आहे. सामाजिक व आर्थिक विकासातील शिक्षणाचे महत्त्व विचारात घेऊन तसेच शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन राज्यात विविध योजना राबवित आहे.

### शालेय शिक्षण

१०.३ प्राथमिक आणि उच्च प्राथमिक असे घटक असलेले मूलभूत शिक्षण हे शिक्षण पध्दतीच्या मनोऱ्याचा पाया असल्याने त्यावर राज्य शासनामार्फत विशेष भर देण्यात येत आहे. सर्वांना शिक्षणाची संधी हा शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा अत्यावश्यक घटक असल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणविषयक सुविधा घरापासून कमी अंतरावर उपलब्ध असणे गरजेचे आहे. शैक्षणिक संस्था व त्यातील पटसंख्या तक्ता १०.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१ शैक्षणिक संस्था आणि त्यातील पटसंख्या**

(शिक्षक आणि पटसंख्या हजारात)

| प्रकार | २०१२-१३ | | | | | २०१३-१४* | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शाळांची संख्या | पटसंख्या | पैकी मुली | शिक्षकांची संख्या | विशिप्र | शाळांची संख्या | पटसंख्या | पैकी मुली | शिक्षकांची संख्या | विशिप्र |
| १) प्राथमिक (१ ली ते ८ वी) | १,०२,१२८ | १६,२२७ | ७,५९९ | ५२५ | ३०.८९ | १,०३,२६२ | १६,१५९ | ७,५६४ | ४९९ | ३२.३९ |
| २) माध्यमिक व उच्च माध्यमिक (९ वी ते १२ वी) | १८,५०५ | ५,६२५ | २,५९४ | १६६ | ३३.९५ | २३,७५२ | ५,९११ | २,७१२ | २१३ | २७.७८ |

आधार : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई युडाईस -२०१२-१३ व प्लॅनिंग टूल प्रोव्हायडेड बाय एमएचआरडी - २०१३-१४ * अस्थायी
विशिप्र – विद्यार्थी शिक्षक प्रमाण

### मुलींचे शिक्षण

१०.४ शासनाच्या दृष्टीने मुलींचे शिक्षण ही एक प्राथम्याची बाब आहे. मूलभूत शिक्षणातील सामाजिक व लिंगभेदावर आधारित विषमतेची दरी कमी करणे हे सर्व शिक्षा अभियानाच्या चार उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट आहे. मुलींच्या शिक्षणासाठी शासन अनेक योजनांद्वारे पुढाकार घेत आहे. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या काही योजना खालीलप्रमाणे आहेत :

- **उपस्थिती भत्ता योजना :** प्राथमिक शाळेतील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून राज्य शासन मुलींना '*उपस्थिती भत्ता* ' देण्याची योजना जानेवारी, १९९२ पासून राबवित आहे. या योजनेंतर्गत शालेय कामकाजाचे दिवसांपैकी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त दिवस शाळेत उपस्थित असणाऱ्या १ ली ते ४ थी पर्यंतच्या मुलींच्या पालकांना एक रुपया प्रतिदिवस आणि शैक्षणिक वर्षात जास्तीत जास्त ₹ २२० इतका उपस्थिती भत्ता दिला जातो. या योजनेमध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सर्व मुली व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील अजा, अज आणि दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील मुलींचा समावेश असतो. सन २०१२-१३ मध्ये ₹ ९.९५ कोटी इतका खर्च झाला व सुमारे ४.५२ लाख मुलींना लाभ देण्यात आला. सन २०१३-१४ मध्ये लाभार्थ्यांची संख्या ४.९१ लाख इतकी अपेक्षित आहे.
- **अहिल्याबाई होळकर योजना :** ही योजना सन १९९६-९७ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. गावात शाळा उपलब्ध नसल्यास, या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील इ. ५ वी ते १० मध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींना शाळेत उपस्थित राहण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमध्ये मोफत प्रवास करण्याची सवलत देण्यात येते. सन २०१२-१३ मध्ये सुमारे १८.४१ लाख मुलींनी या योजनेचा लाभ घेतला व या योजनेवरील एकूण खर्चाच्या एक तृतियांश हिस्सा म्हणजेच ₹ १४७.१५ कोटी एवढा खर्च राज्य शासनाने केला आहे.

- **कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय :** ही योजना २००४ मध्ये शैक्षणिकदृष्ट्या मागास गटातील अजा, अज, इमाव व अल्पसंख्यांक कुटुंबातील शाळाबाह्य मुलींना दर्जेदार शिक्षणाची संधी निश्चित करण्याच्या हेतूने उच्च प्राथमिक स्तरावरील वस्तीशाळा स्थापन करण्यासाठी सुरु करण्यात आली. राज्यातील १० जिल्ह्यांत प्रत्येकी १०० मुली इतकी प्रवेशक्षमता असलेली ४३ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये कार्यरत आहेत. वर्ष २०१२-१३ मध्ये ₹ ११.७३ कोटी इतका खर्च झाला व ४,२६९ मुलींना लाभ मिळाला. वर्ष २०१३-१४ मध्ये फेब्रुवारी पर्यंत ₹ ८.३१ कोटी इतका खर्च झाला व ४,२०२ मुलींना लाभ मिळाला.

- **मुलींच्या प्राथमिक स्तरावरील शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम :** मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने हा कार्यक्रम सुरु केला आहे. राज्यात ही योजना १७ जिल्हे, १८ महापालिका आणि दोन नगरपरिषदांमधील ३६ शैक्षणिकदृष्ट्या मागास गट आणि ५२३ आदर्श समूहशाळांमध्ये राबवली जाते. शैक्षणिकदृष्ट्या मागास गटातील अजा, अज, इमाव, अल्पसंख्यांक आणि दारिद्रिय रेषेखालील कुटुंबातील उच्च प्राथमिक स्तरावरील मुलींना व्यावसायिक प्रशिक्षण, जीवनोपयोगी कौशल्य विकास, बाल्यावस्थेतील संगोपन आणि शिक्षण, इत्यादी नाविन्यपूर्ण कार्यक्रमाद्वारे गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी मध्ये वाढ करण्यावर भर दिला जातो. वर्ष २०१२-१३ मध्ये ६.४४ लाख मुलींची नोंदणी झाली असून ₹ १.९९ कोटी इतका खर्च झाला. हा कार्यक्रम आर्थिक वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्यात आला आहे.

## शिक्षणासाठी प्रोत्साहनात्मक योजना

१०.५ शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या सहभागाला उत्तेजन देण्यासाठी आणि पालकांवरील आर्थिक भार हलका करण्यासाठी राज्य शासन विविध योजनांद्वारे विद्यार्थ्यांना सवलती देत आहे. योजनानिहाय लाभार्थ्यांची संख्या व झालेला खर्च तक्ता १०.२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.२ योजनानिहाय लाभार्थ्यांची संख्या व झालेला खर्च**

| योजना | २०११-१२ | | २०१२-१३ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाखात) | खर्च (₹ कोटीत) | लाभार्थी (लाखात) | खर्च (₹ कोटीत) |
| १ ली ते ४ थी इयत्तेतील गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे | १३.८४ | ११.७९ | १५.२३ | १२.१९ |
| १ ली ते १० वी च्या शासन अनुदानित तसेच विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत | ३८.५३ | ४.९३ | २८.६१ | ४.६२ |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण (११ वी आणि १२वी) | २.८० | १.५७ | १.९४ | १.५१ |
| ११ वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण | ३.०१ | २.१८ | ३.२४ | २.२४ |
| आदिवासी विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता | ०.०९ | ०.४१ | ०.०६ | ०.२९ |

आधार : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन

## मध्यान्ह भोजन योजना

१०.६ पटनोंदणी वाढविणे, उपस्थिती वाढविणे व गळतीचे प्रमाण कमी करणे याबरोबरच प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांची पोषणस्थिती सुधारणे यासाठी केंद्र शासनाने १९९५ मध्ये 'मध्यान्ह भोजन योजना' सुरू केली. वर्ष २००८-०९ मध्ये ' राष्ट्रीय मध्यान्ह भोजन योजना' या नावाखाली उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरिता या योजनेचा विस्तार करण्यात आला. वर्ष २०१२-१३ मध्ये इयत्ता १ ली ते ५ वी व ६ वी ते ८ वी मधील अनुक्रमे ७२ लाख व ४० लाख विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असून ₹ १,२४४.२८ कोटी इतका खर्च झाला. वर्ष २०१३-१४ मध्ये डिसेंबर पर्यंत एकूण ₹ ५८३.४८ कोटी खर्च झाला.

१०.७ राज्य शासनाचा प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणावरील खर्च आलेख १०.१ मध्ये दर्शविला आहे.

**आलेख १०.१ : राज्य शासनाचा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणावरील खर्च**



## महाराष्ट्र छात्र सेना

१०.८ या योजनेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांत नेतृत्व, बंधुत्व, खिलाडूवृत्ती, राष्ट्रीय ऐक्य, समाजसेवा, इत्यादि गुणांचे संवर्धन करणे हा आहे. सर्व शाळांमधील इयत्ता ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी वैकल्पिक स्वरूपात ही योजना राबविली जाते. सन २०१२-१३ मध्ये या योजनेमध्ये सुमारे १९.०२ लाख विद्यार्थ्यांचा समावेश होता.

## सैनिकी शाळा

१०.९ राज्यात ३३ जिल्ह्यांमध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तराच्या ४२ सैनिकी शाळा असून त्यांपैकी पाच शाळा फक्त मुलींसाठी, ३३ शाळा फक्त मुलांसाठी आणि चार सह- शिक्षणासाठी आहेत. दोन शाळा विनाअनुदानित आहेत. सन २०१३-१४ मध्ये या सर्व शाळांमधील पटावरील विद्यार्थी संख्या १७,२८७ आहे.

## क्रीडा शिक्षण

१०.१० खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी व क्रीडापटूंचे नैपुण्य विकसित करण्यासाठी राज्य शासनाने १९९५ मध्ये पुणे येथे 'शिव छत्रपती क्रीडापीठाची' स्थापना केली. या क्रीडापीठाकडून ८ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांकरिता क्रीडा कौशल्य चाचण्या घेतल्या जातात आणि १७ विविध खेळांमधील निवडक विद्यार्थ्यांना सुमारे ८ ते १० वर्षे आवश्यक प्रशिक्षण दिले जाते. राज्यात ११ क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. आतापर्यंत या प्रबोधिनीच्या १७ विद्यार्थ्यांनी 'शिव छत्रपती राज्य क्रीडा सन्मान' प्राप्त केला आहे आणि ४६ खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये देशाचे प्रतिनिधीत्व केले आहे. शासन दरमहा प्रति प्रशिक्षणार्थी सरासरी ₹ ६,००० खर्च करते. सन २०१३-१४ मध्ये ७७२ प्रशिक्षणार्थींची निवड झाली. क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या यशाचा तपशील तक्ता १०.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.३ क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या यशाचा तपशील**

| वर्ष | एकूण प्रशिक्षणार्थी | आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदके | | | | राष्ट्रीय स्तरावरील पदके | | | | राज्य स्तरावरील पदके | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण |
| २०१०-११ | ५८६ | ३ | २ | ० | ५ | ६७ | ७० | ४६ | १८३ | १७० | १११ | ९० | ३७१ |
| २०११-१२ | ५९८ | १ | ० | ० | १ | ५९ | ५२ | ४८ | १५९ | १३५ | १०३ | ९२ | ३३० |
| २०१२-१३ | ७७२ | २ | ७ | ७ | १६ | १२६ | ८० | ४६ | २५२ | १५२ | १२४ | ६९ | ३४५ |

आधार : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

## सर्व शिक्षा अभियान

१०.११ सर्व शिक्षा अभियान हा केंद्र शासनाचा पथदर्शी कार्यक्रम असून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे ध्येय कालबद्ध पद्धतीने गाठण्यासाठी राज्यांच्या सहभागाने राबविण्यात येतो. शाळा नसलेल्या भागांमध्ये नवीन शाळा सुरु करणे आणि असलेल्या शाळांत अतिरिक्त वर्गखोल्या, प्रसाधनगृहे, पेयजल, देखभाल अनुदान, इत्यादी बाबत तरतूद करुन पायाभूत सुविधा मजबूत करणे हे या कार्यक्रमाचे ध्येय आहे. सर्व शिक्षा अभियानावर २०१२-१३ मध्ये ₹ १,४८८.८२ कोटी तर २०१३-१४ मध्ये फेब्रुवारी पर्यंत ₹ ८६०.९७ कोटी इतका खर्च झाला. सर्व शिक्षा अभियानाची कामगिरी तक्ता १०.४ मध्ये दिली आहे :

**तक्ता १०.४ सर्व शिक्षा अभियानाची कामगिरी**

| वर्ष | बांधण्यात आलेल्या वर्गखोल्यांची संख्या | प्रशिक्षित शिक्षकांची संख्या (लाखात) | स्थापन करण्यात आलेल्या संगणक प्रयोगशाळांची संख्या | मोफत पुस्तके प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या (लाखात) |
|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | ५,३१९ | ३.६५ | ७४३ | १३३.४९ |
| २०१३-१४ | ० | ३.५६ | १२९ | १२८.४२ |

आधार : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

१०.१२ विशेष गरज असलेल्या मुलांना सर्वसाधारण परिस्थितीत सर्वसाधारण मुलांसोबत चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे व त्यांना सामाजिकदृष्ट्या सामावून घेण्यासाठी आणि त्यांच्या भावनिक उन्नतीसाठी राज्यात 'विकलांग समावेशक शिक्षण' कार्यक्रम राबविण्यात येत आहे. विकलांग समावेशक शिक्षण कार्यक्रमामध्ये विशेष गरज असलेल्या मुलांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना आवश्यकतेनुसार

पुनर्वसन व ब्रेल लिपीतील पुस्तके, चष्मे, श्रवणयंत्रे आदी उपकरणे, वाचा प्रशिक्षक, इत्यादी शैक्षणिक आधार सुविधा पुरविणे यांचा समावेश आहे. सन २०१२-१३ मध्ये ३.२६ लाख मुलांनी लाभ घेतला असून एकूण ₹ ५४.०२ कोटी खर्च झाला. सन २०१३-१४ मध्ये ३.४२ लाख मुलांनी लाभ घेतला असून एकूण ₹ ६६.०२ कोटी खर्च झाला.

## शिक्षण विकास निर्देशांक

१०.१३ राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन विद्यापीठ आणि मानव संसाधन व विकास मंत्रालय (शालेय शिक्षण व साक्षरता विभाग) यांच्या मार्फत प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरांवरील शिक्षण विकास निर्देशांकाची परिगणना करण्यात येते तसेच संपूर्ण मूलभूत शिक्षणाकरिता केवळ 'जिल्हा शैक्षणिक माहिती प्रणाली' ह्या माहितीवर आधारित संयुक्त निर्देशांक परिगणित करण्यात येतो. शिक्षण विकास निर्देशांक हा राज्याच्या विशिष्ट निर्देशकांबरोबरच मूलभूत शिक्षणाचे नवीन पैलू दर्शवितो. शिक्षण विकास निर्देशांकाची गणना करतांना उपलब्धता, पायाभूत सुविधा, शिक्षक आणि फलनिष्पत्ती अशा चार उपविभागांमध्ये एकत्रित केलेल्या एकूण २४ निर्देशांकांचा वापर करण्यात आला आहे.

१०.१४ 'भारतातील मूलभूत शिक्षण आणि सार्वत्रिक मूलभूत शिक्षणाच्या दिशेने प्रगती (फ्लॅश सांख्यिकी २०१२-१३)' अहवालानुसार महाराष्ट्र प्राथमिक स्तराकरिता १० व्या क्रमांकावर, उच्च प्राथमिक आणि संयुक्त या दोन्ही स्तराकरिता ८ व्या क्रमांकावर असून शिक्षण विकास निर्देशांक अनुक्रमे ०.५८, ०.६९ आणि ०.६४ इतका आहे. राज्यांकरिता प्राथमिक, उच्च प्राथमिक आणि संयुक्त स्तराकरिता सन २०११-१२ व २०१२-१३ करीताचे शिक्षण विकास निर्देशांक परिशिष्ट १०.१ मध्ये दर्शविले आहेत. राज्यातील मूलभूत शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक तक्ता १०.५ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.५ राज्यातील मूलभूत शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक**

| निर्देशक | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३+ |
|---|---|---|---|
| दर १० चौ किमी मागील शाळांची/तुकड्यांची घनता (अ) प्राथमिक | २.५७ | २.६३ | २.६९ |
| (ब) उच्च प्राथमिक | १.५७ | १.४३ | १.४७ |
| दर हजार मुलांच्या लोकसंख्येमागे (६ ते ११ वर्ष) प्राथमिक शाळा/तुकड्यांची संख्या | ८ | ८ | ८ |
| दर हजार मुलांच्या लोकसंख्येमागे (११ ते १४ वर्ष) उच्च प्राथमिक शाळा/तुकड्यांची संख्या | ८ | ७ | ७ |
| सरासरी विद्यार्थी-वर्ग प्रमाण (सर्व शाळा) | ३१ | ३१ | ३३ |
| **सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी (सर्व शाळा)** | | | |
| पिण्याचे पाणी | ९२.२ | ९४.३ | ९८.४ |
| संरक्षक भिंत | ५८.६ | ५९.१ | ६८.३ |
| मुलींकरिता शौचालय | ७१.५ | ७७.३ | ७७.० $ |
| संगणक | ४०.८ | ४४.५ | ४७.४ |
| नि:शक्तांसाठी उतरंड | ६५.१ | ६५.० | ८६.७ @ |
| विद्युत जोडणी | ७४.१ | ७५.९ | ८५.० |
| खाजगी शाळांची एकूण शाळांशी टक्केवारी | २९.० | २९.९ | २६.३ |

आधार : एलीमेंटरी एज्युकेशन इन इंडिया प्रोग्रेस टुवर्डस युईई रिपोर्ट @ उतरंड आवश्यक व उपलब्ध असणाऱ्या शाळा
+ ३० सप्टेंबर रोजी $ कार्यरत

## उच्च व तंत्र शिक्षण

१०.१५ उच्च शिक्षणात सर्वसाधारण उच्च शिक्षणाबरोबरच कृषि, पशुवैद्यक, वैद्यकीय, औषध निर्माणशास्त्र, अभियांत्रिकी, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण, इत्यादिंचा समावेश होतो. मूलभूत शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाबरोबरच, उच्च शिक्षणातील संधींचादेखील विस्तार करण्यासाठी शासन परिश्रम घेत आहे. राज्यात एकूण २० विद्यापीठे असून त्यापैकी चार कृषि विद्यापीठे, एक आरोग्य विज्ञान विद्यापीठ, एक पशुवैद्यक विद्यापीठ, एक तंत्रज्ञान विद्यापीठ आणि १३ अन्य सर्वसाधारण विद्यापीठे असून त्यामध्ये केवळ महिलांसाठी असणारे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई, अनौपचारिक शिक्षणासाठी असलेले यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि संस्कृत भाषेचा अभ्यास, संशोधन, विकास व प्रसार करण्यासाठी कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठ, नागपूर यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, राज्यात २१ अभिमत विद्यापीठे आहेत. संस्था आणि त्यांची प्रवेशक्षमता तक्ता १०.६ मध्ये दिली आहे. सन २०१३-१४ ची शाखानिहाय विस्तृत माहिती परिशिष्ट १०.२ व १०.३ मध्ये दिली आहे.

## तक्ता १०.६ संस्था आणि त्यांची प्रवेशक्षमता

| विद्याशाखा | २०१२-१३* | | | २०१३-१४* | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संस्थाची संख्या | प्रवेश क्षमता | पटसंख्या | संस्थाची संख्या | प्रवेश क्षमता | पटसंख्या |
| **सर्वसाधारण शिक्षण $** | | | | | | |
| कला, विज्ञान, वाणिज्य आणि विधी | २,३८७ | १२० प्रति तुकडी | १५,०६,२७५ | २,३८७ | १२० प्रति तुकडी | १५,३४,९८० |
| बी.एड /एम.एड. | ४६८ | १०० प्रति तुकडी | २७,६८० | ४६८ | १०० प्रति तुकडी | ४२,०६७ |
| इतर बिगर-कृषि अभ्यासक्रम (नॉन एआयसीटीई अभ्यासक्रमासह) | ४२२ | १०० प्रति तुकडी | २,९५,२१२ | ४२२ | १०० प्रति तुकडी | २,९०,३१४ |
| **तांत्रिक शिक्षण @** | | | | | | |
| अभियांत्रिकी (पदविका, पदवी, पदव्युत्तर) | १,००४ | ३,२३,५३३ | ६,३७,०६१ | १,०७४ | ३,४५,३४३ | ६,२०,९४६ |
| स्थापत्यशास्त्र (पदवी, पदव्युत्तर) | ६८ | ३,९३७ | ५,९२१ | ७५ | ४,१५३ | ७,०३५ |
| व्यवस्थापन शास्त्र (एमबीए/एमएमएस आणि पीजीडीएम) | ५०८ | ६०,१०० | ५१,७३५ | ५१६ | ५७,३९२ | २७,६८९ |
| हॉटेल व्यवस्थापन आणि खाद्यपेय तंत्रज्ञान (पदविका, पदवी, पदव्युत्तर) | २७ | १,५५४ | २,७६८ | २३ | १,२९८ | २,११५ |
| औषध निर्माण शास्त्र (पदविका, पदवी, पदव्युत्तर) | ४६५ | २७,१९८ | ५१,८२६ | ४६२ | २७,५५० | ३७,३५८ |
| मास्टर इन कम्प्यूटर ॲप्लिकेशन | १४५ | १३,३५० | २१,०७३ | १४८ | १३,३८५ | २३,६१४ |
| औद्यागिक प्रशिक्षण संस्था | ७६६ | १,५४,७१० | १,५७,५२३ | ७८१ | १,१७,७४७ | १,२३,०६० |
| **वैद्यकीय शिक्षण ^** | | | | | | |
| ॲलोपॅथी | ४३ | ५,६९२ | १०,२७४ | ४४ | ६,३४६ | ८,२९८ |
| आयुर्वेदिक | ६० | ३,६७६ | ६,०८९ | ६२ | ३,९४१ | ६,४०२ |
| दंतचिकित्सा | २९ | २,४९५ | ७,२०१ | ३५ | २,६३४ | ७,७४६ |
| होमियोपॅथी | ४५ | ३,६५७ | ६,६५४ | ४५ | ३,५४५ | ६,६४३ |
| युनानी | ६ | ३३५ | ५३५ | ५ | ३३९ | ६०४ |
| डी.एम.एल.टी. | २४ | ३८३ | १४१ | १० | ३६८ | १८१ |
| फिजिओथेरपी | ४१ | १,०२५ | २,०९० | ३५ | १,०९५ | २,१०३ |
| ऑक्युपेशनल थेरपी | ९ | १९० | २४६ | ६ | २२५ | २०० |
| ऑडियोलॉजी अँड स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजी | ५ | ११३ | १५७ | ३ | १४३ | १६२ |
| प्रोस्थेटिक्स व ऑर्थोटिक्स | १ | ३५ | ७१ | १ | ३५ | ७४ |
| परिचर्या | ४७ | ३,१४३ | ५,४०७ | ४७ | ३,०१२ | २,७३८ |
| **पशु विज्ञान आणि मत्स्य विज्ञान £** | | | | | | |
| पशुविज्ञान शास्त्र | ६ | ५७३ | १,४०४ | ६ | ५८७ | १,४८१ |
| दुग्ध तंत्रज्ञान | २ | ८० | २१२ | २ | ९० | २४४ |
| मत्स्य विज्ञान | २ | ७२ | १५३ | २ | ८२ | १६४ |
| **कृषि §** | | | | | | |
| कृषि | ८९ | ८,४१३ | ८,३८२ | ९५ | ८,९८३ | ८,८५९ |
| फलोत्पादन | १९ | ५९० | ५७४ | २२ | ७१६ | ६८८ |
| वन संवर्धन | ४ | ८५ | ८४ | ४ | ८५ | ८१ |
| मत्स्य विज्ञान | ३ | ७७ | ६६ | ३ | ७७ | ६६ |
| कृषि अभियांत्रिकी | १७ | ८१८ | ७९५ | १९ | ८६६ | ८५८ |
| अन्न तंत्रज्ञान | १७ | १,१३६ | १,०७६ | २० | १,२८९ | ९९१ |
| गृह विज्ञान | ३ | ५४ | ३६ | ३ | ५४ | ५० |
| जैव -तंत्रज्ञान | १९ | ९१५ | ७९४ | २३ | १,११५ | १,०४३ |
| कृषि व्यवसाय व्यवस्थापन | १३ | ६१५ | ५१६ | १४ | ६४५ | ६१५ |
| काढणी पश्चात तंत्रज्ञान | १ | ३० | २१ | १ | ३० | १६ |
| पशुसंवर्धन शास्त्र | - | - | - | १ | ३० | ६ |

*आधार :* $ उच्च शिक्षण संचालनालय, पुणे   * अस्थायी   @ तंत्र शिक्षण संचालनालय आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई

^ महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक   £ महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ , नागपूर   § महाराष्ट्र कृषि व संशोधन परिषद, पुणे

टिप: १) प्रवेश क्षमता फक्त प्रथम वर्षासाठीची आहे.   २) कृषि विद्याशाखेसाठी दिलेली पटसंख्या फक्त पहिल्या वर्षासाठीची आहे.

३) सर्व वैद्यकीय शिक्षण विद्याशाखेंसाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता फक्त प्रथम वर्षासाठीची आहे.

# सार्वजनिक आरोग्य

१०.१६ जनतेचे राहणीमान आणि आरोग्य स्थितीतील वृद्धी ही राज्यशासनाच्या दृष्टीने एक महत्वपूर्ण बाब आहे. सुलभ व किफायतशीर वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी केंद्र आणि राज्यसरकार यांच्यामार्फत अनेक कार्यक्रम व योजना राबविण्यात येत आहेत.

१०.१७ सर्व स्तरांवर आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विषयक पायाभूत सुविधा असणे ही प्राथमिक गरज आहे. लोकसंख्येच्या पूर्वनिश्चित निकषांवर आधारित त्रिस्तरीय सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा राज्यात विकसित करण्यात आल्या आहेत. उप केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र व सामाईक आरोग्य केंद्रांद्वारे प्राथमिक स्तरावर, जिल्हा आणि उपजिल्हा रूग्णालये द्वितीय स्तरावर तर नागरी भागात आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज रूग्णालायांमार्फत तृतीय स्तरांवर आरोग्य सेवा पुरविल्या जातात. राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य सेवा संस्थांची माहिती तक्ता १०.७ मध्ये तर राज्यात उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधांबाबतची (सार्वजनिक आणि शासन सहाय्यित) मालिका परिशिष्ट १०.४ मध्ये दिली आहे.

१०.१८ नियोजनातील सामुहिक सहभाग, आरोग्यसेवा सुविधांचे व्यवस्थापन, कार्यक्रम व्यवस्थापनातील सुधारणा, लवचिक आर्थिक पुरवठा, खुल्या निधीची तरतूद, नियोजनाचे विकेंद्रीकरण, इ. च्या परिणामी आरोग्यविषयक निर्देशांकात सुधारणा झाली आहे. आरोग्यविषयक निवडक निर्देशकांची मालिका परिशिष्ट १०.५ मध्ये दिली आहे.

१०.१९ सध्या अस्तित्वात असलेली आरोग्यकेंद्रांची रचना ही त्या भागातील लोकसंख्येवर आधारित आहे. ग्रामीण भागातील लोकसंख्येच्या घनतेतील तफावतीमुळे आरोग्यसेवांच्या उपलब्धतेत बराच फरक आढळतो. त्यामुळे जनगणना २००१ ची लोकसंख्या, सध्या अस्तित्वात असलेल्या आरोग्य संस्थांमधील अंतर, भौगोलिक संरचना आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागण्या विचारात घेऊन आरोग्य संस्था पुरविण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. राज्य शासनाने जनगणना १९९१ वर आधारित नियोजिलेल्या १०७ प्राथमिक आरोग्य केंद्रांचे बांधकाम प्राथम्याने करण्याचे ठरविले आहे. विविध जिल्ह्यांत १४७ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे, ८८१ नवीन उपकेंद्रे, राष्ट्रीय व राज्य महामार्गांवर ४२ ट्रॉमा केअर केंद्रे, ग्रामीण भागात ३० खाटांची ४७ नवीन रुग्णालये आणि महिला व नवजात शिशुंसाठी १५ रुग्णालये स्थापन करण्याच्या बृहत्त आराखड्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. ग्रामीण रुग्णालयांचा स्तर उंचावण्याचाही या आराखड्यात समावेश आहे.

**तक्ता १०.७ राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य सेवा संस्था**

(फेब्रुवारी, २०१४ अखेर)

| संस्थेचा प्रकार | संख्या |
|---|---|
| जिल्हा रुग्णालये | २३ |
| क्षमतेनुसार उप जिल्हा रुग्णालये | |
| अ) ५० खाटा | ५८ |
| ब) १०० खाटा | २८ |
| सामान्य रुग्णालये | ४ |
| स्त्री रुग्णालये | ११ |
| अस्थिरोग रुग्णालय | १ |
| ग्रामीण रुग्णालये | ३६० |
| ट्रॉमा केअर युनिट | ६८ |
| विभागीय संदर्भसेवा रुग्णालये | २ |
| मनोरुग्णालये | ४ |
| एकूण रुग्णालये | ५५९ |
| उप केंद्र | १०,५८० |
| प्राथमिक आरोग्य केंद्र | १,८११ |
| फिरती आरोग्य पथके | १३ |
| सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा | ३४ |
| उपविभागीय सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा | १३८ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

**आलेख १०.२ : निवडक आरोग्यविषयक निर्देशांक**



## राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

१०.२० सर्वसामान्य विशेषत: दुर्लक्षित व वंचित ग्रामीण जनतेवर लक्ष केंद्रित करुन सहज उपलब्ध, किफायतशीर, प्रभावी, जबाबदार तसेच विश्वसनीय आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाकडून संपूर्ण देशात २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे

- अर्भक व माता मृत्यू कमी करणे
- ग्रामीण भागात आरोग्य सेवांची उपलब्धता वाढविणे
- स्थानिक पातळीवरील साथींच्या आजारांसह सांसर्गिक व असांसर्गिक आजारांचे पुर्वानुमान, प्रतिबंध व नियंत्रण करणे
- लोकसंख्या नियमन व स्त्री-पुरुष प्रमाणाचा समतोल साध्य करणे
- आरोग्यदायी जीवनशैलीबद्दल जनजागृती करणे
- आरोग्यसेवेमध्ये आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिध्द व होमिओपॅथी (आयुष) या घटकांचा समावेश करणे

१०.२१ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम

- टेलीमेडिसीन तंत्रज्ञानाचा वापर
- आरोग्य सल्ला संपर्क केंद्र ( HACC) स्थापना
- फिरत्या वैद्यकीय पथकांची (आरोग्यवाहिनी) स्थापना
- सिकल सेल आजार नियंत्रण
- अधिकृत सामाजिक आरोग्य कार्यकर्त्यांची (आशा) नियुक्ती
- रेफरल ट्रान्सपोर्ट
- आपत्कालीन वैद्यकीय सेवा

## प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - दुसरा टप्पा

१०.२२ प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - दुसरा टप्पा या कार्यक्रमाचा उद्देश मातामृत्यू प्रमाण, अर्भक मृत्यू व एकूण जनन दर कमी करून त्याद्वारे बाल आरोग्याचा दर्जा वाढविणे व लोकसंख्या स्थिर करणे हा आहे. प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - दुसरा टप्पा अंतर्गत झालेला खर्च तक्ता १०.८ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.८ प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - दुसरा टप्पा अंतर्गत झालेला खर्च**

( ₹ कोटी )

| वर्ष | नियतव्यय | खर्च | खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००९-१० | २२४.६४ | १५८.९७ | ७०.८ |
| २०१०-११ | २४५.६३ | २१४.५७ | ८७.४ |
| २०११-१२ | ४००.२२ | ३४१.३५ | ८५.३ |
| २०१२-१३ | ४५३.३७ | ३६८.०० | ८१.२ |
| २०१३-१४+ | ५८२.६९ | २९६.२६ | ५०.८ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## कुटुंब कल्याण कार्यक्रम

१०.२३ लोकसंख्या स्थिर करणे हे कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. नसबंदी आणि दोन अपत्यांच्या जन्मात अंतर राखणे हे या कार्यक्रमाचे महत्वाचे पैलू आहेत. तांबी, इन्ट्रायुटेरीन साधने (आययुडी), पारंपारिक संततिप्रतिबंधक साधने, इत्यादी पध्दतींच्या प्रसारावर जास्त भर दिला जातो. कुटुंब कल्याण कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९ कुटुंब कल्याण कार्यक्रमाची प्रगती**

(हजारात)

| वर्ष | नसबंदी | | | | तांबी | | खर्च (₹ कोटी ) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | | | लक्ष्य | साध्य | |
| | | पुरुष | स्त्री | एकूण | | | |
| २००९-१० | ६५० | ३४.५ | ४९९.४ | ५३३.९ (८२.१) | ४५० | ३८१.९ (८४.९) | ३९.६५ |
| २०१०-११ | ५५० | २४.३ | ४६८.० | ४९२.४ (८९.५) | ४५० | ३७४.१ (८३.१) | ३८.३१ |
| २०११-१२ | ५५० | २०.३ | ४७४.३ | ४९४.६ (८९.९) | ४५० | ३६६.८ (८१.५) | ३२.६७ |
| २०१२-१३ | ५५० | १८.९ | ४८६.२ | ५०५.१ (९१.८) | ४५० | ३७६.९ (८३.८) | ३७.०० |
| २०१३-१४+ | ५६० | १३.६ | ३४४.० | ३५७.६ (६३.९) | ४५० | ३०५.३ (६७.८) | २२.५९ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन टीप : कंसातील आकडे साध्याची लक्ष्याशी टक्केवारी दर्शवितात. + डिसेंबरपर्यंत

## जननी सुरक्षा योजना

१०.२४ ग्रामीण व नागरी भागात संस्थात्मक प्रसूतीला प्रोत्साहन देऊन त्याद्वारे ज्यांचे वय १९ वर्षांच्या वर अशा दारिद्र्य रेषेखालील, तसेच अनुसूचित जाती व जमातीच्या कुटुंबांतील स्त्रियांमधील माता मृत्यू प्रमाण व अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी राज्यात जननी सुरक्षा योजना राबविली जात आहे. सर्व प्रसूती कुशल दाईंमार्फत होऊन त्याद्वारे माता मृत्यू प्रमाण कमी करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत संस्थेमधील प्रसूतीनंतर सात दिवसांच्या आत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांस ₹ ७०० व शहरी भागातील लाभार्थ्यांस ₹ ६०० दिले जातात, तर कुशल दाईच्या मदतीने घरी प्रसूत होणाऱ्या ग्रामीण तसेच नागरी भागातील लाभार्थ्यास (जीवित अपत्यांची संख्या दोनपर्यंत) ₹ ५०० दिले जातात. सिझेरियनद्वारे प्रसूती झालेल्या लाभार्थ्यास ₹ १,५०० दिले जातात. राज्यातील २००७-०९ या कालावधीतील माता मृत्यू प्रमाण १०४ वरुन कमी होऊन २०१०-१२ मध्ये ८७ इतके झाले आहे. जननी सुरक्षा योजनेचा तपशील तक्ता १०.१० मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता १०.१० जननी सुरक्षा योजनेचा तपशील**

( ₹ कोटी )

| वर्ष | लाभार्थ्यांची संख्या (लाख) | नियतव्यय | खर्च |
|---|---|---|---|
| २००९-१० | ३.४८ | २८.९० | २७.४१ |
| २०१०-११ | ३.५४ | २६.८० | ३१.८२ |
| २०११-१२ | ४.०५ | ३४.९४ | ३५.२८ |
| २०१२-१३ | ३.६४ | ३०.२३ | ३४.४१ |
| २०१३-१४+ | २.४१ | ४४.८२ | २८.६६ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## नवसंजीवनी योजना

१०.२५ आदिवासी भागातील माता मृत्यू प्रमाण आणि अर्भक मृत्यूदर कमी व्हावेत या उद्देशाने १५ जिल्ह्यांतील आदिवासी भागातील ८,४१९ गावांमध्ये नवसंजीवनी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येकी एक वैद्यकीय अधिकारी, निम वैद्यकीय कर्मचारी व वाहन अशा १७२ फिरत्या वैद्यकीय पथकांची निर्मिती करण्यात आली आहे. ही पथके सर्व गावे व वाड्यांना भेटी देऊन कुपोषित व आजारी बालकांचा शोध घेऊन त्यांच्या घरी वैद्यकीय सेवा पुरवितात, तसेच आवश्यकता भासल्यास आजारी बालकांना नजीकच्या स्वास्थ्य केंद्रात दाखलही करतात.

१०.२६ आदिवासी भागातील गरोदर महिलांची नोंदणी, नियमित आरोग्य तपासणी व आवश्यक त्या औषधांचा पुरवठा व्हावा यासाठी नवसंजीवनी योजनेअंतर्गत मातृत्व अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रसूतीपूर्व आरोग्य तपासणीकरिता वैद्यकीय केंद्राला भेट देण्यासाठी प्रत्येक लाभार्थ्याला ₹ ४०० रोख व ₹ ४०० ची औषधे पुरविण्यात येतात. या योजनेअंतर्गत लाभार्थी मातांची संख्या व खर्च तक्ता १०.११ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.११ मातृत्व अनुदान योजनेअंतर्गत लाभार्थी मातांची संख्या व खर्च**

( ₹ कोटी )

| वर्ष | लाभार्थी माता | नियतव्यय | खर्च |
|---|---|---|---|
| २००९-१० | ५९,८५५ | ६.२० | ५.०१ |
| २०१०-११ | ४४,९८५ | ७.९७ | ३.८० |
| २०११-१२ | ८१,४९६ | ८.२७ | ७.७७ |
| २०१२-१३ | ६६,३०० | ९.५१ | ५.३८ |
| २०१३-१४+ | १९,१३४ | ४.१३ | ७.६५ |

आधार : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम

१०.२७ क्षयरोग, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ व गोवर यांसारख्या लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येण्याजोग्या आजारांमुळे गर्भवती स्त्रिया, अर्भके व विविध वयोगटातील बालके यांच्या मृत्यूंचे, रोगग्रस्ततेचे व अपंगत्वाचे प्रमाण कमी करणे यासाठी उत्तम दर्जाच्या लसीकरण सेवा पुरविणे हा सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाचा उद्देश आहे. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची संख्या आणि खर्च तक्ता १०.१२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१२ सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची संख्या व खर्च**

(लाखात)

| लस | २००९-१० | | २०१०-११ | | २०११-१२ | | २०१२-१३ | | २०१३-१४+ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| बीसीजी | १८.८० | १९.७३ | १९.२३ | २०.०६ | १९.८१ | १९.९७ | १९.१८ | १९.५७ | १८.८५ | १५.९७ |
| डीपीटी III | १८.८० | १९.५१ | १९.२३ | १९.२१ | १९.८१ | १९.१० | १९.१८ | १९.११ | १८.८५ | १४.७५ |
| पोलिओ III | १८.८० | १९.५७ | १९.२३ | १९.२५ | १९.८१ | १८.९५ | १९.१८ | १९.१० | १८.८५ | १४.७५ |
| काविळ बी III | १८.८० | १५.५६ | १९.२३ | १७.३४ | १९.८१ | १४.५५ | १९.१८ | १८.६५ | १८.८५ | १४.५३ |
| गोवर | १८.८० | १८.८० | १९.२३ | १८.५३ | १९.८१ | १८.६३ | १९.१८ | १८.८१ | १८.८५ | १४.८६ |
| डीपीटी (बुस्टर) | १९.२७ | १८.२४ | १९.७३ | १८.२६ | १९.०४ | १७.६२ | १८.७८ | १७.४३ | १८.८१ | १३.५६ |
| पोलिओ (बुस्टर) | १९.२७ | १८.३३ | १९.७३ | १८.२२ | १९.०४ | १७.४६ | १८.७८ | १७.४१ | १८.८१ | १३.५३ |
| डीटी (५ वर्ष) | २१.८४ | १८.१२ | १९.१४ | १६.६३ | १८.७८ | १६.०० | १९.९८ | १६.२४ | २०.०६ | १२.१३ |
| टीटी (१० वर्ष) | २१.८४ | २०.५८ | १९.९९ | २०.२० | १९.९३ | १९.१६ | २०.६६ | १८.६३ | २०.७६ | १५.१४ |
| टीटी (१६ वर्ष) | २३.१७ | १९.८२ | १९.९९ | १९.४९ | २०.७२ | १९.०४ | २१.३५ | १८.६९ | २१.४५ | १५.२९ |
| टीटी (गरोदर माता) | २१.३० | २०.२५ | २१.८७ | २१.११ | २१.७९ | १७.९४ | २१.१० | १८.०८ | २०.७३ | १२.९५ |
| खर्च (₹ कोटी ) | १४.७४ | | १५.४३ | | १५.८० | | ३०.०४ | | १९.५६ | |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## पल्स पोलिओ कार्यक्रम

१०.२८ मागील सलग ११ वर्षांपासून पल्स पोलिओ लसीकरण अभियान राबविले जात आहे. या कार्यक्रमांतर्गत पाच वर्षांखालील सर्व मुलांना तोंडाद्वारे पोलिओ मात्रा देण्यात येते. सन २०१०-११ मध्ये पोलिओचे पाच रुग्ण आढळून आले (मालेगांव येथे चार व बीड येथे एक), त्यानंतर जानेवारी, २०१४ पर्यंत पोलिओचा एकही रुग्ण आढळलेला नाही. पल्स पोलिओ कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.१३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१३ पल्स पोलिओ कार्यक्रमाची प्रगती**

| वर्ष | मुलांची संख्या (लाखात) | खर्च ( ₹ कोटी ) |
|---|---|---|
| २००९-१० | १२०.०८ | ४१.०१ |
| २०१०-११ | १२०.७२ | ४६.६८ |
| २०११-१२ | ११९.९८ | १५.६० |
| २०१२-१३ | १२०.८३ | ३४.४३ |
| २०१३-१४+ | १२१.२३ | ७.७६ |

*आधार* : राज्य आरोग्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + जानेवारीपर्यंत

## शालेय आरोग्य कार्यक्रम

१०.२९ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत शालेय आरोग्य कार्यक्रम सर्व शिक्षा अभियानाच्या समन्वयाने राबविला जातो. या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील सर्व तर नागरी भागातील महानगरपालिका व नगरपरिषदेच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची दरवर्षी आरोग्य तपासणी केली जाते व गरजू विद्यार्थ्यांना हृदय शस्त्रक्रियेसारख्या मोठ्या वैद्यकीय सेवा मोफत पुरविल्या जातात. एप्रिल, २०१३ पासून राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये शालेय आरोग्य कार्यक्रम राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमात अंतर्भूत करण्यात आला आहे. सन २०१३-१४ मध्ये जानेवारीपर्यंत राज्यातील ८४,११५ शाळांमधील अंदाजे ११३.६८ लाख विद्यार्थ्यांची तपासणी व उपचार करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांमध्ये सर्वसाधारणपणे दंतरोग, जंत, रातांधळेपणा, त्वचारोग व डोळ्यांचे विकार इ. आजार दिसून येतात. शालेय आरोग्य कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.१४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१४ शालेय आरोग्य कार्यक्रमाची प्रगती**

| वर्ष | शाळा | विद्यार्थी (लाखात) | | | मोठया शस्त्रक्रिया | हृदय शस्त्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|---|
| | | तपासलेले | उपचार केलेले | संदर्भसेवेसाठी पाठविलेले | | |
| २००९-१० | ७७,५०० | १०४.९५ | २४.९९ | १.५१ | ४,१७३ | १,०१० |
| २०१०-११ | ८०,९९८ | १११.९० | २०.३५ | ०.९५ | ५,६१० | १,४२८ |
| २०११-१२ | ८०,६३२ | १०८.२० | १७.९६ | ०.७४ | ९,२५० | २,१०० |
| २०१२-१३ | ८२,००३ | ११२.८२ | १८.११ | ०.८३ | ५,७३० | ८२३ |
| २०१३-१४+ | ८४,११५ | ११३.६८ | १३.८० | ०.९९ | ६,७८५ | ३६६ |

*आधार* : राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, महाराष्ट्र शासन + जानेवारीपर्यंत

## जीवनदायी आरोग्य योजना

१०.३० जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना त्यांच्या आवाक्याबाहेरील मोठ्या शस्त्रक्रियांसाठी ₹ १.५ लाख पर्यंत अर्थसहाय्य पुरविण्यात येते. तक्ता १०.१५ मध्ये जीवनदायी आरोग्य योजनेची प्रगती दिली आहे.

**तक्ता १०.१५ जीवनदायी आरोग्य योजनेची प्रगती**

| वर्ष | केलेल्या शस्त्रक्रिया | | | | | खर्च (₹ कोटी ) |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुत्रपिंड | हृदय | मेंदू | कर्करोग | एकुण | |
| २००९-१० | ७० | ७,२०५ | २०३ | २,३४५ | ९,८२३ | ४२.२७ |
| २०१०-११ | ७९ | ९,५४६ | ३८१ | ३,६१० | १३,६१६ | १११.२२ |
| २०११-१२ | ११३ | १५,५२६ | ५०१ | ४,०३० | २०,१७० | १०४.०६ |
| २०१२-१३ | ४३७ | १४,१४७ | ५४४ | ३,५६२ | १८,६९० | १८२.३४ |
| २०१३-१४+ | ३० | ७,१७२ | १६१ | २,१७९ | ९,५४२ | ६६.४० |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

१०.३१ राज्याने जीवनदायी आरोग्य योजनेची पुनर्रचना करुन व्यापक व सर्वसमावेशक अशी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सर्व जिल्ह्यांमध्ये सुरू केली आहे. राष्ट्रीय विमा कंपनीच्या सहयोगाने जुलै, २०१२ पासून या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली असून ही योजना दारिद्र्य रेषेखालील तसेच दारिद्र्य रेषेवरील वार्षिक उत्पन्न रुपये एक लाखापर्यंत असलेल्या कुटुंबाना लागू आहे. यात हृदयरोग, मुत्रपिंड प्रत्यारोपण, मेंदू, कर्करोग व मणक्याचे आजार समाविष्ट केले आहेत. ही योजना रोखरक्कमरहित (cashless) वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी सुरु करण्यात आली आहे. प्रतिवर्षी प्रति कुटुंबाचा विम्याचा पूर्ण हप्ता शासन अदा करते व रुपये दीड लाखाची हमी दिली जाते.

## राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम

१०.३२ हिवताप, हत्तीरोग, मेंदूज्वर, डेंग्युताप, चिकुनगुनीया, चंडीपूरा, इत्यादी किटकजन्य रोगांचा प्रतिबंध, रोगनिदान, उपचार व नियंत्रणासाठी राज्यात राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचा तपशील तक्ता १०.१६ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१६ राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचा तपशील**

| रोग | २००९-१० | | २०१०-११ | | २०११-१२ | | २०१२-१३ | | २०१३-१४+ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू |
| हिवताप | ९५,६५३ | २३२ | १,४६,०८८ | १९१ | ८५,०६९ | ११२ | ५६,५११ | १०२ | ३७,८६६ | ६८ |
| हत्तीरोग | ५,६९४ | ० | ४,४३९ | ० | ४,२०३ | ० | ४,१७२ | ० | ३,१४५ | ० |
| डेंग्यू ताप | ६,९५० | २० | ३,७४६ | ८ | ९,१२६ | २५ | २७,३६६ | १२३ | ३६,७७७ | १२४ |
| मेंदूज्वर | ३ | ० | ७ | १ | ६ | ० | १३ | ० | ० | ० |
| चिकुनगुनिया ज्वर | १,७०३ | ० | ७,५७४ | ० | ४,६१३ | ० | २,५३४ | ० | १,४१० | ० |
| एईएस/चंडीपुरा | ८८ | ३० | ६६ | ३२ | २४ | १४ | ५९ | २७ | ५ | ५ |
| एकूण झालेला खर्च (₹ कोटी ) | **१९.७४** | | **२१.१३** | | **२४.२३** | | **२५.९४** | | **२३.६५** | |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन +जानेवारीपर्यंत

## इतर राष्ट्रीय कार्यक्रम

१०.३३ राज्यात इतर अनेक आरोग्य कार्यक्रम राबविले जात आहेत. काही कार्यक्रमांची प्रगती खालीलप्रमाणे

- सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम: एक लाख लोकसंख्येमागे संशयीत रुग्णांची संख्या वर्ष २०११ मधील १५८ च्या तुलनेत वर्ष २०१२ मध्ये १६७ होती तर रोग मुक्ततेचे प्रमाण दोन्ही वर्षी ८५ टक्के होते.
- राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम: २०१३-१४ मधील मोतीबिंदू शस्त्रक्रियांचे ६.५१ लाखांपैकी डिसेंबर पर्यंत ८८ टक्के उद्दिष्ट साध्य करण्यात आले तर २०१२-१३ मध्ये पूर्णत: साध्य करण्यात आले (१२३ टक्के).
- राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम : सन २०१३-१४ मध्ये डिसेंबर अखेर नव्याने सापडलेले रुग्ण व एकूण ग्रस्त रूग्णांची संख्या अनुक्रमे १२,४१६ व ११,६६६ होती. सन २०१२-१३ मध्ये नव्याने सापडलेले रुग्ण व एकूण ग्रस्त रूग्णांची संख्या अनुक्रमे १८,७१५ व १२,६५९ इतकी होती.

## राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम

१०.३४ राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम हा राज्यात महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेमार्फत राबविण्यात येतो. राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाद्वारे जागृती अभियान आणि विशिष्ट गटातील लोकांचे प्रबोधन व तपासणी करणे यावर भर दिला जातो. त्याकरिता सेक्शुअली ट्रान्समिटेड डिसीज (STD) चिकित्सालयातील रोग्यांची व गर्भवती महिलांच्या रक्ताची नमुना तपासणी केली जाते. एचआयव्ही / एड्स विषयक आकडेवारी तक्ता १०.१७ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता १०.१७ एचआयव्ही / एड्स विषयक आकडेवारी**

| निर्देशक | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ |
|---|---|---|---|---|---|
| जोखीम गटातील तपासणी केलेल्या व्यक्ती (हजारात) | २,०४२ | २,४६७ | २,८१८ | ३,०६७ | ३,२७४ |
| तीन चाचण्यांवरुन एचआयव्ही बाधित (हजारात) | ७२ | ७१ | ५७ | ६१ | ४६ |
| एचआयव्ही बाधितांचे प्रमाण (टक्के) | ३.५ | २.९ | २.० | २.० | १.० |
| एड्स रुग्ण | १०,१३० | १३,१८२ | १०,७५० | १९,३८९ | १०,६७० |
| एड्सने मृत्यू | १,१८३ | १,५७४ | १,५८० | ३,२७० | ३,१६८ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था

## राज्य रक्त संक्रमण परिषद

१०.३५ राज्यात सुरक्षित रक्ताचा व त्याच्या घटकांचा पुरेसा पुरवठा वाजवी दरात करणे हे राज्य रक्त संक्रमण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट आहे. सन २००० पासून सीकल सेल ग्रस्त बालके, थॅलेसेमिया व हेमोफिलियाने पीडित रूग्णांना मोफत रक्तपुरवठा केला जातो. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लोकसंख्येच्या एक टक्का इतके रक्तसंकलनाचे प्रमाण असले पाहिजे. नोंदणीकृत रक्तपेढ्यांचा तपशील तक्ता १०.१८ मध्ये दिला असून रक्त संकलनाचा तपशील तक्ता १०.१९ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.१८ नोंदणीकृत रक्तपेढ्यांचा तपशील**

(वर्ष २०१३)

| नोंदणीकृत रक्तपेढ्या | संख्या | पैकी संगणकीकृत |
|---|---|---|
| शासकीय | ७६ | ७३ |
| रेडक्रॉस सोसायटी | १२ | १२ |
| सेवाभावी संस्था (चॅरीटेबल ट्रस्ट) | १९७ | ० |
| खाजगी | १५ | ० |
| एकूण | ३०० | ८५ |

*आधार* : राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र शासन

**तक्ता १०.१९ रक्त संकलनाचा तपशील**

(लाख युनिटमध्ये)

| वर्ष | रक्तपेढ्यांची संख्या | एकूण संकलन | पैकी ऐच्छिकपणे केलेले |
|---|---|---|---|
| २००९ | २६४ | ११.५० | ९.७४ |
| २०१० | २७३ | १२.६६ | १०.८६ |
| २०११ | २८२ | १३.४४ | ११.९२ |
| २०१२ | २९१ | १४.४१ | १३.२९ |
| २०१३ | ३०० | १४.७५ | १३.९० |

*आधार* : राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र शासन

## साथरोग नियंत्रण कार्यक्रम

१०.३६ या कार्यक्रमांतर्गत गॅस्ट्रो, कॉलरा, अतिसार, काविळ आणि विषमज्वर अशा जलजन्य आजारांचा साथउद्रेक तसेच अचानक उद्‌भवणाऱ्या आजारांचे संनियंत्रण केले जाते. या आजारांमुळे होणारी लागण व मृत्यू कमी करणे याकरिता प्रतिबंधात्मक उपाय योजना केल्या जातात. साथउद्रेक व अचानक उद्‌भवणाऱ्या आजारांमुळे होणारी लागण व मृत्यूंची संख्या तक्ता १०.२० मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.२० साथउद्रेक व अचानक उद्‌भवणाऱ्या आजारांमुळे होणारी लागण व मृत्यूंची संख्या**

| आजार | २००९-१० | | २०१०-११ | | २०११-१२ | | २०१२-१३ | | २०१३-१४+ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू |
| कॉलरा | १८,३७८ | २५ | ९,७७४ | ० | ६,०७० | २ | १,९९१ | ० | ४,०९३ | ६ |
| गॅस्ट्रो | २,२९,२०३ | ५९ | २,३७,५०२ | ७५ | १,३०,५४८ | ११ | १,०१,८५५ | १४ | २,६५,४४८ | ५ |
| अतिसार | १६,२३,३५७ | १३ | १७,५९,१०८ | १९ | ७,०३,३६१ | २ | ३,६८,१९८ | ३ | १०,३३,५१९ | ६ |
| काविळ | ८,१८१ | ३७ | ८,७१५ | ४१ | ५,५२९ | ३१ | ९,४९५ | ४२ | ६,३२३ | ३ |
| विषमज्वर | १,२४,५२८ | १ | १,१८,२४३ | ० | ६८,७३५ | ० | ५१,६९३ | ० | २,०१,६८० | ० |
| लेप्टोस्पायरोसिस | ४९१ | ४० | ७४५ | ७५ | ४५४ | २९ | ४९७ | १४ | ३३८ | २० |
| **एकूण** | **२०,०४,१३८** | **१७५** | **२१,३४,०८७** | **२१०** | **९,१४,६९७** | **७५** | **५,३३,७२९** | **७३** | **१५,११,४०१** | **४०** |

*आधार* : राज्य आरोग्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम, १९९४

१०.३७ मानवी उपचाराकरिता तसेच मानवी अवयवांची व्यावसायिक विक्री होऊ नये याकरिता मानवी अवयव काढणे, जतन करणे, प्रत्यारोपण करणे याकरिता भारत सरकारने मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम, १९९४ लागू केला आहे. राज्यात एक-अवयव प्रत्यारोपणाकरिता ९५ केंद्रे, एकापेक्षा जास्त अवयवांच्या प्रत्यारोपणाकरिता १८ आणि नेत्रदान, नेत्रपेढी व केरॅटोप्लास्टीसाठी (नेत्रपटल प्रत्यारोपण) २६० केंद्रांची नोंदणी झाली आहे. सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये करण्यात आलेल्या प्रत्यारोपणांची संख्या तक्ता १०.२१ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.२१ प्रत्यारोपणांची संख्या**

| प्रत्यारोपण | २०१२-१३ | २०१३-१४+ |
|---|---|---|
| लाइव्ह मुत्रपिंड | ६९३ | ६१५ |
| लाइव्ह यकृत | ५ | ४८ |
| कॅडेव्हर अवयव प्रत्यारोपण | | |
| अ) मुत्रपिंड | ४९ | ५९ |
| ब) यकृत | १९ | २६ |
| क) फुफ्फुस | २ | ० |
| केरॅटोप्लॉस्टी नेत्रपटल | २,८०९ | २,३४६++ |

*आधार* : राज्य आरोग्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

++ फेब्रुवारीपर्यंत

# महिला व बाल कल्याण

१०.३८ महाराष्ट्र हे १९९४ साली महिला धोरण तयार करणारे देशातील पहिले राज्य असून त्यानंतर २००१ साली ते सुधारित करण्यात आले आणि २०१३ मध्ये नवीन महिला धोरण जाहीर करण्यात आले. महिलांसाठी काही विशिष्ट योजना आखून महिलांच्या सक्षमीकरणासाठी पाऊले उचलण्यात आली आहेत. स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराविरूध्द कायदा बळकट करण्यासाठी भारत सरकारने न्यायमूर्ती वर्मा समिती गठीत केली होती. राज्य शासन महिलांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवित असून त्यापैकी काही महत्त्वाच्या योजना पुढीलप्रमाणे आहेत.

- **शासकीय महिला वसतिगृहे :** १६ ते ६० वर्ष या वयोगटातील निराश्रीत, अनाथ, परित्यक्त्या, कुमारीमाता, पीडित तथा संकटग्रस्त महिलांना आश्रय देण्यासाठी शासकीय वसतिगृहे स्थापन करण्यात आली आहेत. राज्यात अशा प्रकारची २० शासकीय महिला वसतिगृहे असून त्यांची प्रवेशक्षमता २,००० आहे. 'सुधारित माहेर योजना' याअंतर्गत संस्थेत ३० दिवस वास्तव्य केल्यानंतर महिलांना दरमहा ₹ २५० इतके अनुदान दिले जाते.
- **संरक्षणगृहे (महिला संरक्षणगृह) :** अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ अन्वये अनैतिक व्यवसायातून पोलिसांनी सोडवून आणलेल्या स्त्रियांचे व मुलींचे संरक्षण व त्यांच्या पुनर्वसनासाठी संरक्षणगृहे स्थापन करण्यात आली आहेत. राज्यात मुंबई व नागपूर येथे प्रत्येकी एक याप्रमाणे दोन संरक्षणगृहे असून त्यांची प्रवेशक्षमता २०० आहे. तसेच स्वयंसेवी संस्थांमार्फत विना अनुदान तत्वावर पाच संरक्षणगृहे चालविण्यात येत असून त्यांची एकूण प्रवेशक्षमता २६५ आहे.
- **स्वयंसेवी आधारगृहे :** राज्यात सहा जिल्ह्यांमध्ये नऊ स्वयंसेवी आधारगृहे असून त्यांची प्रवेशक्षमता ५९० इतकी आहे. शासन दरमहा दरडोई ₹ ९५० इतके सहाय्यक अनुदान देते. याशिवाय ' सुधारित माहेर योजना ' या योजनेमधूनही लाभ देण्यात येतात.
- **व्यावसायिक प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी महिला मंडळाना अर्थसहाय्य:** या योजनेअंतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत राज्यात एकूण २६२ महिला प्रशिक्षण केंद्रे चालविली जात आहेत.
- **विद्यावेतन :** आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबांतील मुलींना शासन मान्य संस्थांमधून व्यावसायिक प्रशिक्षण घेण्यासाठी दरमहा ₹ १०० (१० महिन्यांपर्यंत) विद्यावेतन दिले जाते.
- **स्वयंरोजगार :** गरीब, परित्यक्त्या, अविवाहित माता, पीडित स्त्रिया यांना स्वत:चा छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी या योजनेमधून एक रकमी ₹ ५०० अर्थसहाय्य दिले जाते.
- **दारिद्र्य रेषेखालील विधवा स्त्रियांना त्यांच्या मुलींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य :** या योजनेमधून दारिद्र्य रेषेखालील विधवा महिलेला तिच्या मुलीच्या विवाहासाठी ₹ २,००० इतके अर्थसहाय्य दिले जाते.
- **देवदासी पुनर्वसन योजना :** देवदासींच्या कल्याणासाठी राज्य शासनामार्फत निवृत्ती वेतन, विवाहासाठी सहाय्य, शिक्षणासाठी सहाय्य, मुला मुलींकरिता वसतिगृह, इ. विविध योजना राबविल्या जात आहेत. देवदासींच्या कल्याणाकरिता कार्य करीत असलेल्या व्यक्तींना व नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांना राज्यस्तरीय पुरस्कारही दिले जातात.
- **समुपदेशन केंद्र :** कौटुंबिक हिंसा, कलह, फूट, महिलांवरील अत्याचार, इ. बाबत सल्ला व मार्गदर्शन करण्याकरिता राज्यातील पोलिस ठाण्यांमध्ये महिला समुपदेशन केंद्रे स्थापन केली आहेत. या योजनेअंतर्गत राज्यात अशी ८५ समुपदेशन केंद्रे कार्यान्वीत झाली असून, या केंद्रांना वार्षिक ₹ २.३५ लाख इतके अनुदान देण्यात येते.
- **शुभमंगल सामुहिक विवाह योजना :** शेतकरी व शेतमजूर यांच्या आत्महत्यांना आळा बसावा म्हणून त्यांच्या मुलींच्या लग्नासाठी राज्य शासनामार्फत सामुहिक विवाह योजना राबविण्यात येते. या योजनेखाली सामुहिक विवाह आयोजित करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेस प्रति जोडपे ₹ २,००० आणि वधूपित्यास गृहपयोगी वस्तू व वधूकरिता मंगळसूत्र खरेदी करण्यासाठी ₹ १०,००० इतकी रक्कम देण्यात येते.
- **हुंडा पद्धतीचे निर्मूलन :** समाजातील हुंडा प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 'हुंडा निर्मूलन समिती' स्थापन करण्यात आली असून, या समितीच्या कार्यासाठी प्रतिवर्ष ₹ ४५,००० अर्थसहाय्य देण्यात येते.
- **मनोधैर्य योजना :** बलात्कार / लैंगिक अत्याचार पीडित (महिला/ बालक) यांना न्याय देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यात मनोधैर्य ही नवीन योजना ऑक्टोबर, २०१३ पासून सुरु केली आहे. या योजनेंतर्गत बलात्कार व बालकांवरील लैंगिक अत्याचार पीडितांना किमान ₹ दोन लाख व विशेष प्रकरणामध्ये कमाल ₹ तीन लाख अर्थसहाय्य देण्यात येते. ॲसिड हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्यांना ₹ तीन लाख आणि इतर जखमांसाठी ₹ ५०,००० इतके अर्थसहाय्य देण्यात येते.

१०.३९ महिला कल्याण योजनांची माहिती तक्ता १०.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२२ महिला कल्याण योजनांची माहिती**

(₹ कोटी)

| योजना | २०११-१२ | | २०१२-१३ | | २०१३-१४ + | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी | खर्च | लाभार्थी | खर्च | लाभार्थी | खर्च |
| शासकीय महिला वसतिगृहे / स्वयंसेवी आधार गृहे / संरक्षण गृहे | १,४०० | ६.२७ | १,४४५ | ८.९६ | १,३६८ | ६.७२ |
| महिला मंडळांना अर्थसहाय्य | ८८ | ०.९९ | १३६ | ०.६१ | १२० | ०.८१ |
| विद्यावेतन | ९७६ | ०.०५ | १,४२३ | ०.१४ | १२८ | ०.१३ |
| स्वयंरोजगार | १,५९२ | ०.०८ | ६,७५४ | ०.३४ | ६३० | ०.३१ |
| विधवांच्या मुलींच्या विवाहाकरिता अर्थसहाय्य | २७१ | ०.०५ | २९९ | ०.६० | १८१ | ०.३६ |
| देवदासी पुनर्वसन योजना | १०३ | ०.१३ | १३० | ०.१४ | ८६ | ०.६० |
| समुपदेशन केंद्रे | ३९ | १.०१ | ८५ | १.४४ | ८५ | ०.१४ |

*आधार* : महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

१०.४० महिलांसाठी विशिष्ट केंद्रपुरस्कृत योजना राज्यात राबविण्यात येत असून त्या खालीलप्रमाणे आहेत.

- **नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे :** या योजनेमध्ये सुधारणा करण्यात आली असून, त्यानुसार सार्वजनिक जागेवर वसतिगृहाची इमारत बांधण्यासाठी बांधकाम खर्चाच्या ७५ टक्के अनुदान ५०:४०:१० अशा तीन हप्त्यात स्वयंसेवी संस्थांना देण्यात येते. भाड्याच्या इमारतीत वसतिगृह चालविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग ठरवून देईल त्या दरानुसार भाडे अनुज्ञेय आहे. वसतिगृह पाच वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी समाधानकारकपणे चालविले असल्यास, वसतिगृहाच्या दुरुस्ती व रंगरंगोटीसाठी ₹ पाच लाखापर्यंत अनुदान अनुज्ञेय आहे. केंद्र शासनाने वसतिगृहात प्रवेशासाठी उत्पन्नाची मर्यादा महानगरांसाठी वार्षिक ₹ ३०,००० पेक्षा कमी व इतर शहरांसाठी वार्षिक ₹ २५,००० पेक्षा कमी घालून दिलेली आहे. राज्यात महिलांसाठी १२७ वसतिगृहे असून त्यात ९,१७२ महिला राहतात.
- **महिलांकरिता अल्पमुदती निवासस्थान :** संकटात सापडलेल्या महिलांकरिता एकूण ९,६०२ इतकी प्रवेश क्षमता असलेली ३२ निवासस्थाने कार्यरत आहेत.
- **प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रमासाठी आधार (स्टेप) :** या योजनेची मुख्य उद्दिष्टे महिलांच्या छोट्या गटांना चालना देणे, स्वयंरोजगार व कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण देणे आणि स्वयंरोजगार तथा उत्पन्न निर्मितीचे प्रकल्प सुरू करण्यासाठी अनुषंगिक सहाय्य करणे ही आहेत. या योजनेंतर्गत १३ प्रकल्प कार्यरत असून ११,००० महिलांना त्याचा लाभ प्राप्त झालेला आहे.
- **स्वाधार :** या योजनेंतर्गत संकटग्रस्त महिलांच्या पुनर्वसनासाठी संरक्षण, संगोपन, शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येते. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या एकूण ४८ प्रकल्पांमध्ये २,५०० लाभार्थी आहेत.
- **उज्वला :** महिलांच्या अनैतिक शोषणाच्या व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी उज्वला ही सर्वसमावेशक योजना असून या योजनेअंतर्गत पीडितांची सुटका, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करण्यात येते. या योजनेअंतर्गत ४० संस्था कार्यरत असून, त्यापैकी १४ संस्था निवासी आहेत.

## निर्णय प्रक्रियेत सहभाग

१०.४१ भारतीय महिलांनी स्वातंत्र्य चळवळीत जरी महत्त्वाची भूमिका बजावली असली तरी, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालखंडात महिलांचा सार्वजनिक जीवनातील सातत्यपूर्ण सहभागाच्या स्वरुपात त्याचे रूपांतर मात्र झाले नाही. केंद्र शासनाने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये एक-तृतियांश आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थातील हे आरक्षण ५० टक्क्यांपर्यंत वाढविले आहे. सदर ५० टक्के आरक्षण हे राज्यातील जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, तालुका पंचायतींचे सभापती व ग्रामपंचायतींचे सरपंच या पदांसाठीदेखील लागू आहे.

## महिला आर्थिक विकास महामंडळ

१०.४२ केंद्र व राज्य पुरस्कृत विविध विकास योजना राबविण्याकरिता, राज्य शासनाने महिला आर्थिक विकास महामंडळास (माविम) राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून घोषित केले आहे. स्व-सहाय्यित गट, वित्तिय संस्था, स्वयंसेवी संस्था आणि शासनाचे संबंधित विभाग यांमधील समन्वय संस्था म्हणूनही माविम काम करते.

१०.४३ आर्थिकदृष्ट्या सक्षमीकरणासाठी महिलांना उत्पादित संसाधनांची उपलब्धता व त्यावर त्यांचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. तसेच त्यांना काही प्रमाणात आर्थिक स्वायत्तता असणे आवश्यक आहे. महिला सक्षमीकरणामध्ये महिलांनी एकत्र येणे याची महत्वाची भूमिका आहे. महिलांनी एकत्र येण्यासाठी स्व-सहायता गट हे एक चांगले माध्यम आहे. डिसेंबर, २०१३ अखेर १०,४९५ गावांमध्ये ९.१९ लाख महिला ६८,१६२ स्व-सहाय्यित गटांमध्ये सहभागी होत्या. या महिलांची एकूण बचत सुमारे ₹ २३७.१३ कोटी होती आणि एकूण अंतर्गत वितरीत कर्ज ₹ ६५६.२३ कोटी होते. स्व-सहाय्यित गटांना विविध वित्तीय संस्थांकडून ₹ ५७६.९० कोटी कर्ज मिळाले. योजनानिहाय महिला स्व-सहाय्यित गटांचा तपशील तक्ता १०.२३ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.२३ योजनानिहाय महिला स्व-सहाय्यित गट**

(३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत)

| योजना | स्व-सहाय्यित गट | सभासद | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर मागासवर्गीय | अल्पसंख्यांक | भटक्या जमाती | इतर | एकूण |
| स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना | ८,४१३ | २०,४२८ | १७,७११ | २८,९१२ | ३,७६८ | १०,१३४ | २१,५९९ | १,०२,५५२ |
| स्वयंसिध्दा | २,७५९ | ३,४४९ | १४,५१६ | ९,१९७ | १,९२६ | ३,०८८ | ५,५८४ | ३७,७६० |
| माविम-अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत निधीतून | १६,४६१ | १,८५,८५२ | ५,८२२ | ८,४६३ | ३,११६ | ३,९३४ | ३,८१९ | २,११,००६ |
| स्वयंसेवी संस्था-अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत निधीतून | ३,८९७ | ४३,९७२ | ६४३ | १,०८७ | ३८० | १,०३४ | ५४५ | ४७,६६१ |
| माविम-आदिवासी उपयोजना अंतर्गत निधीतून | ५,८८० | ६,१८८ | ६२,२९७ | २,१९२ | १,४८९ | ९१४ | ३१० | ७३,३९० |
| रमाई महिला सक्षमीकरण योजना | १,८०२ | ३,०६३ | ३,५९८ | १२,८५९ | ६०० | १,९९१ | १,६६२ | २३,७७३ |
| कृषि सप्तक योजना | २७९ | ४७३ | ५०८ | १,८७६ | १२९ | ६२८ | १,९०६ | ५,५२० |
| महिला स्वावलंबन निधी | १६० | १,१५६ | २०८ | ४५३ | ३२१ | ३१५ | १,३०५ | ३,७५८ |
| तेजस्विनी | २४,७१९ | ३९,२४४ | ३५,७९९ | १,१०,६३५ | २७,७४२ | ३२,७०२ | १,११,५७७ | ३,५७,६९९ |
| इतर | ५,२०० | ८,१०३ | ८,४९५ | २२,६७४ | २,१९७ | ४,४१७ | ९,९३१ | ५५,८१७ |
| एकूण | **६९,५७०** | **३,११,९२८** | **१,४९,५९७** | **१,९८,३४८** | **४१,६६८** | **५९,१५७** | **१,५८,२३८** | **९,१८,९३६** |

*आधार* : माविम, महाराष्ट्र शासन

## बाल कल्याण योजना

१०.४४ बाल कल्याण व विकासासाठी राज्य शासनामार्फत राज्यात विविध योजना राबविण्यात येत असून त्या पुढीलप्रमाणे आहेत:

### राज्य शासनाच्या योजना

- **निरीक्षण गृहे :** राज्यात एकूण १२ शासकीय निरीक्षण गृहे ११ जिल्ह्यांत कार्यरत असून त्यांची प्रवेश क्षमता ६०० इतकी आहे. याशिवाय स्वयंसेवी संस्थांमार्फत ४८ निरीक्षण गृहे (२९ मुलींसाठी व १९ मुलांसाठी) कार्यरत असून, त्यांची प्रवेश क्षमता ४,२७५ इतकी आहे. अनाथ, निराधार, हरवलेली व काम करणाऱ्या मुलांना, बाल कल्याण समिती / बाल न्याय मंडळ यांच्या शिफारसीने निरीक्षणगृहात प्रवेश दिला जातो. राज्य शासनाकडून प्रति लाभार्थी दरमहा ₹ ९०० सहाय्यक अनुदान दिले जाते.

- **बालगृहे :** वय वर्ष १८ पर्यंतच्या मुलांना या गृहात प्रवेश दिला जातो. राज्यात २८ शासकीय बालगृहे असून त्यांची प्रवेश क्षमता २,९९० इतकी आहे. याशिवाय स्वयंसेवी संस्थांमार्फत ९९४ अनुदानित बालगृहे कार्यरत असून त्यांची प्रवेश क्षमता ८२,८५९ इतकी आहे तसेच विनाअनुदानित ८९ बालगृहे कार्यरत असून, त्यांची प्रवेश क्षमता ५,०१० इतकी आहे. राज्य शासनाकडून दरमहा प्रति लाभार्थी ₹ १,२१५ इतके सहाय्यक अनुदान दिले जाते तर एड्सग्रस्त मुलांसाठी दरमहा प्रति लाभार्थी ₹ १,३०५ सहाय्यक अनुदान देण्यात येते.
- **अनुरक्षण गृहे :** ही योजना बाल गृहामधील वास्तव्य काळ पूर्ण केलेल्या १८ वर्षे वयाच्या मुलांच्या पुनर्वसनासाठी बनविण्यात आलेली आहे. प्रवेशितांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत किंवा त्यांना रोजगार मिळेपर्यंत अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, वैद्यकिय सुविधा, समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन, इ. सुविधा पुरविण्यात येतात. सद्यस्थितीत सहा शासकीय व तीन स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुरक्षण गृहे चालविण्यात येत असून त्यांची प्रवेश क्षमता अनुक्रमे ६०० व ११० इतकी आहे. राज्य शासनाकडून दरमहा प्रति लाभार्थी ₹ १,२९५ इतके सहाय्यक अनुदान देण्यात येते.
- **बाल संगोपन योजना :** गरज असलेल्या बेघर मुला-मुलींना पर्यायी कुटूंब उपलब्ध करुन देण्यासाठी ही योजना राज्यात राबविण्यात येते. या योजनेंतर्गत सन २०१२-१३ मध्ये ₹ ८९८.६२ लाख इतका खर्च झाला असून, सन २०१३-१४ च्या डिसेंबर अखेर ₹ २८१.०३ लाख इतका खर्च झालेला आहे.
- **सुकन्या :** या योजनेंतर्गत १ जानेवारी, २०१४ व त्यानंतर दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांमध्ये जन्मलेल्या मुलीच्या नावावर ₹ २१,२०० भारतीय आयुर्विमा महामंडळ (LIC) मध्ये जमा करण्यात येतात आणि मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला ₹ एक लाख प्राप्त होतात. याशिवाय तिच्या इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या शिक्षणासाठी दरमहा ₹ १०० शिष्यवृत्ती देण्यात येते.

  वरील योजनांशिवाय बाल कल्याणासाठी राज्यात पुढील योजना राबविण्यात येतात :

  १. दत्तक योजना

  २. चाचा नेहरु बाल महोत्सव योजना

  ३. कर्मवीर भाऊराव पाटील स्वावलंबन पुनर्वसन योजना

  ४. स्पर्धात्मक परिक्षेच्या पूर्व तयारीसाठी मोफत मार्गदर्शन योजना

  ५. एकात्मिक बाल संरक्षण योजना

## एकात्मिक बाल विकास सेवा

१०.४५ ग्रामीण, आदिवासी व झोपडपट्टी भागातील शालेयपूर्व बालकांची योग्य वाढ व विकास साधण्यासाठी, एकात्मिक सेवा पुरविणे ही एकात्मिक बाल विकास सेवा या योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत. या योजनेअंतर्गत शालेयपूर्व बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा मातांचे आरोग्य व पोषण स्थिती सुधारण्यासाठी लसीकरण, पूरक पोषण आहार, आरोग्य तपासणी, संदर्भ सेवा, पोषण व आरोग्य शिक्षण आणि शालेय पूर्व शिक्षण अशा मूलभूत सेवा पुरविल्या जातात. हा कार्यक्रम ९७,४७५ अंगणवाड्या, ११,१७५ मिनी अंगणवाड्या आणि तालुका/गट पातळीवर स्थापन करण्यात आलेले ५५३ बालविकास प्रकल्प यांमार्फत राबविला जातो.

## पोषण कार्यक्रम

१०.४६ बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांच्या पोषण विषयक किमान गरजा भागविण्यासाठी व त्यांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी पूरक पोषण आहार हा कार्यक्रम एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत राबविण्यात येतो. पोषण कार्यक्रमांतर्गत समाजातील मागासलेल्या घटकांतील सहा वर्षापेक्षा कमी वयाच्या बालकांना पोषण आहार देणे, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांचे आरोग्य सुधारणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. दुर्गम व संवेदनशील भागातील कुपोषणाची परिस्थिती नियंत्रित करुन अर्भक मृत्यूदर कमी करणे हे सुध्दा या योजनेचे एक उद्दिष्ट आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार, सन २०१०-११ पासून बालकांचे सर्वसाधारण, साधारण कमी वजनाची व अति कमी वजनाची बालके असे वर्गीकरण करण्यात आले आहे. बालकांची (० ते ५ वर्षे) पोषण श्रेणीनिहाय टक्केवारी तक्ता १०.२४ मध्ये दिली आहे. पूरक पोषण आहार कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२४ बालकांची (० ते ५ वर्षे) पोषण श्रेणीनिहाय टक्केवारी**

| वर्ष | क्षेत्र | सर्वसाधारण बालके | साधारण कमी वजनाची | अति कमी वजनाची |
|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | ग्रामीण | ९३.२ | ५.९ | ०.९ |
| | आदिवासी | ८२.५ | १४.६ | २.९ |
| | नागरी | ७९.० | १९.४ | १.७ |
| | **एकूण** | **८९.३** | **९.४** | **१.३** |
| २०१३-१४ + | ग्रामीण | ९२.४ | ६.५ | १.१ |
| | आदिवासी | ८०.७ | १५.७ | ३.६ |
| | नागरी | ८१.५ | १६.९ | १.६ |
| | **एकूण** | **८८.९** | **९.६** | **१.५** |

*आधार* : आयुक्तालय, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र शासन
+ नोव्हेंबरपर्यंत

**तक्ता १०.२५ पूरक पोषण आहार कार्यक्रमाची प्रगती**

| क्षेत्र | वर्ष | लाभार्थी (लाखात) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| ग्रामीण (आदिवासी भागासह) | २०१२-१३ | ६२.१० | १,०६९.४४ |
| | २०१३-१४ + | ५९.५९ | ५३८.६९ |
| नागरी | २०१२-१३ | १२.२२ | ९५७.९२ |
| | २०१३-१४ + | ११.९७ | १३४.६८ |

*आधार* : आयुक्तालय, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र शासन
+ नोव्हेंबरपर्यंत

१०.४७ एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत राज्यात राबविल्या जाणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजना खालीलप्रमाणे आहेत.

- **राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण (सबला) :** ही योजना सन २०११ पासून किशोरवयीन मुलींच्या (११ ते १८ वर्षे वयोगट) सक्षमीकरणासाठी राज्यातील ११ जिल्ह्यांमध्ये २०७ प्रकल्पांमार्फत प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे. पूरक पोषण आहार कार्यक्रमांतर्गत या योजनेखाली सन २०१२-१३ मध्ये ८.२० लाख व सन २०१३-१४ मध्ये नोव्हेंबर अखेर ७.७२ लाख इतक्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.
- **इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना :** गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांचे आरोग्य व पोषणाचा दर्जा सुधारावा या उद्देशाने ही योजना भंडारा व अमरावती या दोन जिल्ह्यांमध्ये सन २०११ पासून प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे. लाभधारक गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांना तीन हप्त्यांमध्ये ₹ ४,००० रोख रक्कम दिली जाते. या योजनेंतर्गत सन २०१२-१३ मध्ये ०.३९ लाख व सन २०१३-१४ मध्ये फेब्रुवारी अखेर ०.५३ लाख इतक्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

## महिला व बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे

१०.४८ विशेषत्वेकरून महिलांविरुध्द घडणाऱ्या गुन्ह्यांना महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे समजले जातात. राज्यातील महिलांविरोधात घडलेल्या गुन्ह्यांची आकडेवारी तक्ता १०.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२६ राज्यात महिलांविरोधात घडलेले गुन्हे**

(संख्या)

| अत्याचाराचा प्रकार | २०१० | २०११ | २०१२ |
|---|---|---|---|
| बलात्कार | १,५९९ | १,७०१ | १,८३९ |
| अपहरण आणि पळवून नेणे | १,१२४ | १,२५२ | १,१४० |
| हुंडाबळी | ३९३ | ३३९ | ३२९ |
| पती आणि पतीच्या नातेवाईकांकडून झालेले अत्याचार | ७,४३४ | ७,१३६ | ७,४१५ |
| विनयभंग | ३,६६१ | ३,७९४ | ३,९३५ |
| लैंगिक अत्याचार (छेडछाड) | १,१८० | १,०७१ | १,२९४ |
| अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा | ३०६ | ३९० | ३६६ |
| इतर | १,७६५ | १,५२६ | १,४८२ |
| एकूण | १७,४६२ | १७,२०९ | १७,८०० |

*आधार* : गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र शासन

१०.४९ सामान्यत: बालकांवरील अत्याचार किंवा ज्या गुन्ह्यात बालक पीडित असतात असे गुन्हे बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे म्हणून संबोधले जातात. राज्यातील बालकांविरोधातील गुन्ह्यांची आकडेवारी तक्ता १०.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२७ राज्यातील बालकांविरोधातील गुन्ह्यांची आकडेवारी**

(संख्या)

| गुन्ह्याचा प्रकार | २०१० | २०११ | २०१२ |
|---|---|---|---|
| खून (एकूण) | २१४ | २०४ | २१२ |
| १) गर्भातील जीव | ३ | ३ | ११ |
| २) इतर | २११ | २०१ | २०१ |
| बालकांवरील बलात्कार | ७४७ | ८१८ | ९१७ |
| अपहरण आणि पळवून नेणे | ७४९ | ८५८ | ८९३ |
| परित्याग | १९८ | १८९ | १९९ |
| इतर | १,३५६ | १,२९३ | १,०२३ |
| **एकूण** | **३,४७८** | **३,५६६** | **३,४५६** |

*आधार* : राज्य गुन्हे अभिलेख केंद्र, महाराष्ट्र शासन

# रोजगार व दारिद्र्य

## रोजगार

१०.५० रोजगार निर्मितीचा दारिद्र्य निर्मूलनाशी थेटपणे संबंध असल्याने ती नेहमीच भारताच्या विकासाच्या नियोजनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट राहिले आहे. शासनाद्वारे रोजगाराच्या स्थितीचा नियमितपणे आढावा घेउन रोजगार निर्मितीस व रोजगारास चालना देण्याच्या उद्दिष्टाने धोरणांची आखणी केली जाते.

१०.५१ रोजगार व बेरोजगार यासंबंधीच्या आकडेवारीचे मुख्य स्रोत पुढीलप्रमाणे आहेत.

- जनगणना
- आर्थिक गणना
- राष्ट्रीय नमुना पाहणी (रानपा) कार्यालयाने घेतलेल्या पाहण्या
- कारखाना अधिनियम-१९४८ खालील नोंदणीकृत कारखान्यांची अनिवार्य विवरणपत्रे
- श्रम केंद्र (भारत सरकार) कार्यालयाने घेतलेल्या पाहण्या
- रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम

### जनगणना

१०.५२ सन २०११ च्या जनगणनेनुसार, राज्यात एकूण कामगार ४.९४ कोटी असून त्यापैकी ३.२६ कोटी हे पुरुष कामगार होते. अखिल-भारतीय स्तरावरील ३९.१ या कार्य सहभाग दराच्या तुलनेत राज्याचा कार्य सहभाग दर ४४.० आहे. मुख्य कामगारांचा कार्य सहभाग दर अहमदनगर मध्ये सर्वात जास्त (४४.९) तर सिंधुदुर्ग मध्ये सर्वात कमी (२६.७) होता. सीमांतिक कामगारांचा कार्य सहभाग दर गडचिरोली मध्ये सर्वात जास्त (१७.८) होता, तर मुंबई उपनगरमध्ये सर्वात कमी (२.३) होता. क्षेत्रनिहाय व स्त्री-पुरुषनिहाय राज्यातील कार्य सहभाग दर तक्ता १०.२८ मध्ये दिला आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार कामगारांचे आर्थिक वर्गीकरण परिशिष्ट १०.६ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.२८ क्षेत्रनिहाय व स्त्री-पुरुषनिहाय राज्यातील कार्यबल सहभाग दर**

| | ग्रामीण | नागरी | एकत्रित |
|---|---|---|---|
| एकूण व्यक्ती | | | |
| व्यक्ति | ४९.८ | ३७.० | ४४.० |
| पुरुष | ५६.७ | ५५.२ | ५६.० |
| स्त्री | ४२.५ | १६.८ | ३१.१ |
| मुख्य कामगार | | | |
| व्यक्ति | ४३.१ | ३४.० | ३८.९ |
| पुरुष | ५१.३ | ५१.७ | ५१.५ |
| स्त्री | ३४.४ | १४.३ | २५.४ |
| सीमांतिक कामगार | | | |
| व्यक्ति | ६.७ | ३.० | ५.० |
| पुरुष | ५.४ | ३.५ | ४.५ |
| स्त्री | ८.१ | २.५ | ५.६ |

*आधार :*भारताचे महानिबंधक

### आर्थिक गणना

१०.५३ आर्थिक गणना म्हणजे देशाच्या भौगोलिक सीमांतर्गत सर्व आस्थापनांची संपूर्ण गणना होय. नुकतीच भारतात सहावी आर्थिक गणना घेण्यात आली. सहाव्या आर्थिक गणनेत अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन सहभागी झाले असून २०१३-१४ या कालावधीत क्षेत्रिय काम पूर्ण करण्यात आले. सहाव्या आर्थिक गणनेत पीक उत्पादन व लागवड, लोकप्रशासन, संरक्षण, अनिवार्य सामाजिक सुरक्षा सेवा, घरगुती कामगारांचे मालक म्हणून कुटुंबांची कार्ये, विदेशी संघटना व संस्थांची कार्ये तसेच सर्व अनधिकृत कार्ये वगळता सर्व आस्थापनांचा समावेश करण्यात आला आहे. सहाव्या आर्थिक गणनेवर आधारित शीघ्र निष्कर्ष लवकरच प्रसिद्ध करण्यात येतील. आर्थिक गणनेवर आधारित आर्थिक कार्यानुसार रोजगारासंबंधी विस्तृत माहिती परिशिष्ट १०.७ व १०.८ मध्ये दिली आहे.

## राष्ट्रीय नमुना पाहणी

१०.५४ राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालय सर्वसमावेशक रोजगार व बेरोजगारविषयक पाहण्या घेत असते. सन २०११-१२ मध्ये नित्य कार्यरत व्यक्तींची टक्केवारी ५३.६ टक्के होती. प्रमुख उद्योग गटानुसार नित्य कार्यरत व्यक्तींची टक्केवारी तक्ता १०.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२९ प्रमुख उद्योग गटानुसार नित्य कार्यरत व्यक्तींची टक्केवारी**

| प्रमुख गट | ६१ वी फेरी (जुलै, २००४- जून, २००५) | | | ६६ वी फेरी (जुलै, २००९ - जून, २०१०) | | | ६८ वी फेरी (जुलै, २०११ - जून, २०१२)* | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकत्रित | ग्रामीण | नागरी | एकत्रित | ग्रामीण | नागरी | एकत्रित |
| कृषि | ७९.४ | ५.६ | ५५.८ | ७९.१ | ५.५ | ५१.३ | ७५.७ | ४.४ | ४९.३ |
| खाणकाम आणि दगड खाणकाम | ०.२ | ०.४ | ०.३ | ०.५ | ०.२ | ०.४ | ०.३ | ०.२ | ०.२ |
| वस्तूनिर्माण | ५.४ | २१.८ | १०.७ | ५.४ | २१.९ | ११.६ | ५.५ | २१.७ | ११.५ |
| वीज ,वायू ,पाणी पुरवठा | ०.१ | ०.३ | ०.२ | ०.१ | ०.५ | ०.३ | ०.१ | ०.४ | ०.२ |
| बांधकाम | २.६ | ८.४ | ४.४ | ३.० | १०.४ | ५.८ | ४.५ | ११.० | ६.९ |
| व्यापार | ५.३ | २५.४ | ११.८ | ४.८ | २४.४ | १२.२ | ५.८ | २१.३ | ११.५ |
| वाहतूक | १.९ | १०.१ | ४.५ | २.२ | ११.३ | ५.६ | २.१ | ९.४ | ४.९ |
| सेवा | ५.१ | २८.० | १२.३ | ४.९ | २५.८ | १२.८ | ६.० | ३१.६ | १५.५ |

* अस्थायी

## राज्य शासनातील नागरी सेवेमधील रोजगार

१०.५५ ३१ डिसेंबर, २०१२ रोजी राज्य शासनाच्या नागरी सेवेमध्ये एकूण ६,६६,७२८ इतकी मंजूर पदे होती व त्यापैकी १५.८ टक्के पदे रिक्त होती. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची गटनिहाय पदे तक्ता १०.३० मध्ये दिली आहेत.

**तक्ता १०.३० राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची गटनिहाय पदे**

(३१ डिसेंबर, २०१२ रोजी )(हजारात)

| गट | पदे | | |
|---|---|---|---|
| | मंजूर | भरलेली | रिक्त |
| अ | ३८.८० | २८.६२ | १०.१८ |
| ब | ५४.२८ | ३७.७७ | १६.५१ |
| क | ४७६.०८ | ४१७.२५ | ५८.८३ |
| ड | ९७.५७ | ७७.९९ | १९.५८ |
| एकूण | ६६६.७३ | ५६१.६३ | १०५.१० |

*आधार* : सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन
टिप : आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## कारखान्यातील रोजगार

१०.५६ कारखाना अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत सर्व कारखाने मिळून संघटित क्षेत्र तयार होते. सन २०१२ मध्ये, कार्यरत असलेल्या एकूण ३६,८०८ कारखान्यातील सरासरी दैनिक रोजगार सुमारे २०.६ लाख होता. सन २०११ मध्ये ३५,८७६ कारखाने कार्यरत होते व त्यातील रोजगार १८.१ लाख होता. सन २०१२ मध्ये कार्यरत कारखान्यांपैकी ५० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांचे प्रमाण २३ टक्के होते. सर्वाधिक कामगार 'मूलभूत धातू व धातू उत्पादनांचे उत्पादन' (१७.८ टक्के) व त्यापाठोपाठ 'यंत्रे व उपकरणे' (परिवहन उपकरणांशिवाय) (१२.८ टक्के) या कारखान्यांमध्ये कार्यरत होते. कारखान्यांतील सरासरी दैनिक रोजगाराची टक्केवारी तक्ता १०.३१ मध्ये दिली आहे आणि महत्वाची औद्योगिक सांख्यिकी परिशिष्ट १०.९ व १०.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३१ कारखान्यातील सरासरी दैनिक रोजगाराची टक्केवारी**

| उद्योग प्रकार | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|
| | २००९ | २०१० | २०११ | २०१२* |
| ग्राहक वस्तू | ३१.१ | २९.७ | २८.५ | २८.५ |
| पुनर्निर्माण वस्तू | ३५.७ | ३६.३ | ३६.६ | ३५.७ |
| भांडवली वस्तू | २५.५ | २६.० | २७.७ | २८.३ |
| इतर | ७.७ | ८.० | ७.२ | ७.५ |

*आधार :* औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन *अस्थायी

## रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम

१०.५७ रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक व खाजगी आस्थापना व त्यातील रोजगार यांच्याबाबतची माहिती रोजगार स्थिती बदलाचे संनियंत्रण करण्यासाठी दर तीन महिन्यांनी गोळा करण्यात येते. ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबविण्यात येते. सदर कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक क्षेत्रातील आकारमान विचारात न घेता सर्व आस्थापना व १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या बिगर-कृषि खाजगी क्षेत्रातील आस्थापना तर बृन्हमुंबईतील २५ किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या बिगर-कृषि खाजगी आस्थापनांचा समावेश आहे. डिसेंबर, २०१३ अखेर रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमानुसार राज्यातील एकूण अंदाजित रोजगार ५८.८१ लाख असून त्यापैकी २४.४६ लाख रोजगार सार्वजनिक क्षेत्रातील आहे. एकूण रोजगारात महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण ३१.५ टक्के आहे. रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमांतर्गत रोजगार माहिती आलेख १०.३ मध्ये दिली आहे.

**आलेख १०.३ : रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमांतर्गत रोजगार**




## रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे

१०.५८ बेरोजगार उमेदवारांची नोंदणी तसेच त्यांना स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. राज्यात ३५ जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रे, सहा विद्यापीठ स्तरीय रोजगार व स्वयंरोजगार केंद्रे, आठ अनुसूचित जमातीकरिता प्रशिक्षण तथा मार्गदर्शन केंद्रे आणि शारिरीकदृष्ट्या नि:शक्त व्यक्तींसाठी एक विशेष केंद्र कार्यरत आहे.

१०.५९ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राच्या चालू नोंदवहीत ३१ डिसेंबर, २०१३ रोजी नोंद असलेल्या व्यक्तींची संख्या ३०.३५ लाख होती. सन २०१३ मध्ये या केंद्रामध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या ६.३० लाख इतकी असून अधिसूचित १.१८ लाख रिक्त पदांपैकी १.१४ लाख व्यक्तींना रोजगार पुरविण्यात आला. अधिसूचित केलेल्या पदावर भरलेली पदे आणि चालू नोंदवहीत असलेल्या व्यक्तींचा शैक्षणिक पात्रतेनुसार तपशील अनुक्रमे परिशिष्ट १०.११ व परिशिष्ट १०.१२ मध्ये दिला आहे.

## रोजगार प्रोत्साहनाकरिता कार्यक्रम

१०.६० राज्य शासनामार्फत खालील विविध रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम राबविण्यात येतात आणि रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांचा तपशील तक्ता १०.३२ मध्ये दिला आहे.

- **रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम :** शिक्षित बेरोजगार व्यक्तींना प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण अथवा इतर प्रात्यक्षिक प्रशिक्षण देणे.
- **शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण कार्यक्रम :** शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षण देऊन उद्योगास प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविणे.
- **उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम :** शिक्षित बेरोजगार युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रेरित व प्रशिक्षित करणे.

**तक्ता १०.३२ विविध रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांतर्गत लाभार्थी**

| कार्यक्रम | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|---|
| रोजगार प्रोत्साहन@ | १३,३७९ | १९,५८२ | १८,९५६ | १८,४६६ | १५,८६८ |
| शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण $ | ३७,०८१ | ४१,२०७ | ४४,७३७ | ४६,७०६ | ४५,९७२ |
| उद्योजकता विकास प्रशिक्षण # | ४३,३२९ | ३२,८८६ | ३५,०७६ | ४२,००२ | ४०,०५१ |

*आधार* : @ रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र शासन $ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन
# उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.६१ उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे या उद्देशाने राज्य शासनाने सन २००९-१० पासून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये रोजगार मेळावे आयोजनास सुरुवात केली आहे. वर्षनिहाय आयोजित रोजगार मेळावे व त्याद्वारे पुरविण्यात आलेला रोजगार तक्ता १०.३३ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.३३ वर्षनिहाय आयोजित रोजगार मेळावे व त्याद्वारे पुरविण्यात आलेला रोजगार**

(संख्या)

| वर्ष | रोजगार मेळावे | उपस्थित उद्योजक | रोजगार मेळाव्यात उपस्थित असलेले बेरोजगार युवक | त्यापैकी रोजगार पुरविलेले |
|---|---|---|---|---|
| २००९-१० | १४४ | उ.ना. | ५१,२८३ | १०,९९४ |
| २०१०-११ | १९० | १,१३९ | ८९,५०० | २०,९०८ |
| २०११-१२ | १५९ | ९८१ | ६३,१८५ | २१,७६७ |
| २०१२-१३ | १४५ | ९०६ | ६१,९८६ | १९,३१२ |
| २०१३-१४+ | ११५ | ७४५ | ५०,२८१ | १६,४४७ |

*आधार* : रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र शासन
उ.ना. उपलब्ध नाही + डिसेंबरपर्यंत

## रोजगार निर्मिती व दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम

१०.६२ दारिद्र्य निर्मूलन हे विकासाच्या धोरणाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. सर्वसमावेशक विकास साध्य करण्यासाठी, विविध दारिद्र्य निर्मूलन व रोजगार निर्मिती कार्यक्रम, केंद्र तसेच राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहेत. ह्यापैकी काही कार्यक्रमांबाबतची माहिती खाली दिली आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

१०.६३ महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सन २००६ मध्ये सुधारणा केल्याप्रमाणे) राज्यातील ३३ जिल्ह्यातील ग्रामीण भागात राबविण्यात येत असून या कायद्यांतर्गत खालील दोन योजना कार्यरत आहेत.

अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र : या योजनेंतर्गत ज्या कुटुंबातील प्रौढ व्यक्ती अकुशल काम करण्यास इच्छुक आहे, अशा कुटुंबाला केंद्र शासन १०० दिवसांच्या रोजगाराची हमी देते व १०० दिवसाच्या मजुरीच्या खर्चासाठी निधी पुरविते. एकूण १०० दिवसावरील मजूरीच्या खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते.

ब) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ कलम (७) (दहा) नुसार राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजना राज्याच्या निधीमधून राबविण्यात येतात.

उदा. १) जवाहर/धडक सिंचन विहिर योजना

२) रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड योजना

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र या योजनेची प्रगती तक्ता १०.३४ मध्ये तर प्रकारानुसार कामाची संख्या व त्यावर झालेला खर्च परिशिष्ट १०.१३ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.३४ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र या योजनेची प्रगती**

| तपशील | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ + |
|---|---|---|---|---|---|
| रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या (लाखात) | ५.३६ | ४.५१ | १३.७६ | १६.२४ | ८.७३ |
| एकूण खर्च (₹ कोटी) | ३२५.६३ | ३५८.१२ | १,५८८.१४ | २,१८८.८३ | ८९६.७६ |
| पूर्ण झालेल्या कामांची संख्या | १०,६१३ | १८,७०७ | ६,४३३ | ७५,०१७ | ३६,४८८ |
| रोजगार दिवस (कोटी) | २.७४ | २.० | ६.५१ | ८.७२ | ३.३९ |
| प्रति कुटुंब सरासरी रोजगार (दिवस) | ५१ | ४४ | ४७ | ५४ | ३९ |
| रोजगारामध्ये वाटा (टक्केवारी) | | | | | |
| (i) अजा | २५.६ | २२.० | ५.८ | ८.९ | ९.३ |
| (ii) अज | ३३.२ | २५.६ | १७.१ | १६.९ | १८.१ |
| (iii) महिला | ३९.७ | ४५.९ | ४६.० | ४४.६ | ४३.४ |
| एक दिवस रोजगार निर्मितीची किंमत (₹) | ११९ | १७९ | २४४ | २५१ | २६५ |

*आधार* : नियोजन विभाग (रोहयो ), महाराष्ट्र शासन + डिसेंबर २०१३ पर्यंत

## राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान

१०.६४ 'राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान' राज्य शासनाने सन २०११ पासून सुरु केले आहे. गरीबांसाठी तळागाळातील स्तरावर बळकट संस्थांची निर्मिती करुन त्याद्वारे दारिद्र्य निर्मूलन करणे, ज्यामुळे त्यांना समृध्द स्वयंरोजगाराची संधी व कुशल वेतनी रोजगाराची संधी मिळण्यास मदत होते, ज्याच्या परिणामस्वरुपी शाश्वत आधारावर त्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होईल, असा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. सदर अभियान कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या १० जिल्ह्यांतील ३६ तालुक्यांमध्ये ‘प्रकर्षाने’ म्हणून तर उर्वरीत जिल्ह्यात ‘अप्रकर्षाने’ म्हणून राबविण्यात येत आहे. सन २०१३-१४ मध्ये फेब्रुवारी पर्यंत एकूण ₹ १४८.४३ कोटींचा पतपुरवठा १५,६३६ स्वयंसहायता गटांना देण्यात आला. या अभियानाची प्रगती परिशिष्ट १०.१४ मध्ये दिली आहे.

## स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना

१०.६५ स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून ७५:२५ या प्रमाण तत्त्वावर राबविली जाते. स्वर्णजयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत सन २०१२-१३ मध्ये १३,०४३ लाभार्थ्यांवर ₹ ३१.७२ कोटी खर्च झाला, तर सन २०१३-१४ मध्ये डिसेंबर पर्यंत ४,४७९ लाभार्थ्यांवर ₹ १३.१३ कोटी खर्च झाला. या योजनेची प्रगती परिशिष्ट १०.१४ मध्ये दिली आहे.

## पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम

१०.६६ पंतप्रधान रोजगार निर्मिती हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम राज्यामध्ये सन २००८-०९ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- शहरी भागात होणारे स्थलांतर कमी करण्यासाठी पारंपारिक कारागीर / बेरोजगार युवकांच्या स्वयंरोजगार उद्योगांची उभारणी करुन रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
- कारागिरांच्या मजुरी अर्जनाच्या क्षमतेत वाढ करुन रोजगाराच्या संधीत वाढ करणे.

सन २०१२-१३ मध्ये ३,६१७ प्रकल्पांना ₹ ६८.२८ कोटी तारण वितरीत करण्यात आला व त्याद्वारे २२,७३६ इतका रोजगार निर्माण झाला. सन २०१३-१४ मध्ये डिसेंबर पर्यंत २२४ प्रकल्पांना ₹ ४.२६ कोटी तारण वितरित करण्यात आला व त्याद्वारे १,७९१ इतका रोजगार निर्माण झाला. या कार्यक्रमाची प्रगती परिशिष्ट १०.१४ मध्ये दिली आहे.

## बीज भांडवल योजना

१०.६७ उद्योग, सेवा व व्यापार यासारखे स्वयंरोजगार सुरु करण्याच्यादृष्टीने तारण भागविण्यासाठी वित्तिय संस्थांकडून कमी व्याज दराचे कर्ज पुरवून बेरोजगार व्यक्तींना प्रोत्साहित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाद्वारे ही योजना राबविण्यात येते. स्थानिक बेरोजगार व्यक्ति किंवा १८ ते ५० वर्षे वयोगटातील सातवी उत्तीर्ण व्यक्तींचा गट या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. सन २०१२-१३ मध्ये एकूण २,०२८ प्रकल्पांना ₹ १४.१० कोटी तर सन २०१३-१४ मध्ये डिसेंबर अखेर एकूण ८८० स्वंरोजगार प्रकल्पांना ₹ ६.४२ कोटी इतके बीज भांडवल वितरीत करण्यात आले. बीज भांडवल योजनेची प्रगती तक्ता १०.३५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३५ बीज भांडवल योजनेची प्रगती**

| वर्ष | उद्दिष्ट | | साध्य | |
|---|---|---|---|---|
| | प्रकल्पांची संख्या | वितरीत करावयाचे बीज भांडवल (₹ लाखात) | प्रकल्पांची संख्या | वितरीत केलेले बीज भांडवल (₹ लाखात) |
| २००९-१० | १,६७८ | ९८८.७३ | १,८५५ | ९६३.८३ |
| २०१०-११ | १,०२८ | ७०१.२३ | १,९७१ | १,०९६.३० |
| २०११-१२ | १,९४९ | १,१६८.९५ | १,७३४ | १,१६१.९६ |
| २०१२-१३ | २,२२५ | १,३१२.७० | २,०२८ | १,४१०.२७ |
| २०१३-१४+ | २,२८८ | १,३७१.४६ | ८८० | ६४२.०५ |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

### औद्योगिक संबंध

१०.६८ सन २०१३ मध्ये काम थांबलेली प्रकरणे (संप व टाळेबंदी) २२ होती, त्यामुळे १६,३०० कामगार प्रभावित झाले. मागील वर्षापासून चालत असलेल्या काम थांबण्याच्या प्रकरणांसहित चालू वर्षातील संप व टाळेबंदीमुळे वाया गेलेल्या मनुष्य दिवसांची संख्या १२.९७ लाख होती. राज्यातील औद्योगिक विवादाबाबतचा तपशील परिशिष्ट १०.१५ मध्ये दिला आहे.

## दारिद्र्य

१०.६९ राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालय, भारत सरकार यांच्याकडून दर पाच वर्षांनी घेतल्या जाणाऱ्या 'कुटुंबाच्या उपभोग्य बाबीवरील खर्च' या विषयावरील राष्ट्रीय नमुना पाहणीच्या आधारे नियोजन आयोगाकडून दारिद्र्य रेषा आणि दारिद्र्याचे दर यांचे अंदाज तयार करण्यात येतात. नियोजन आयोगाने तेंडुलकर समितीच्या शिफारशींनुसार राष्ट्रीय नमुना पाहणी ६८ व्या फेरीच्या कुटुंबाचा उपभोग्य बाबींवरील खर्च या पाहणीतील माहितीच्या आधारे सन २०११-१२ मध्ये दारिद्र्याचे अंदाज सुधारित केले.

१०.७० सन २०११-१२ साठी अखिल-भारतीय स्तरावरील दारिद्र्य रेषा ग्रामीण भागासाठी ₹ ८१६ प्रति व्यक्ति प्रति महिना आणि नागरी भागासाठी ₹ १,००० प्रति व्यक्ति प्रति महिना अशी निश्चित करण्यात आली. महाराष्ट्राकरिता ग्रामीण भागासाठी ₹ ९७६ प्रति व्यक्ति प्रति महिना आणि नागरी भागासाठी ₹ १,१२६ प्रति व्यक्ति प्रति महिना अशी ठरविण्यात आली. काही प्रमुख राज्यांतील सन २०११-१२ साठीच्या राज्यनिहाय दारिद्र्य रेषा तक्ता १०.३६ मध्ये दिल्या आहेत. प्रमुख राज्यांचे शिरगणती गुणोत्तर व दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची संख्या तक्ता १०.३७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३६ सन २०११-१२ साठीच्या राज्यनिहाय दारिद्र्य रेषा#**

| राज्य | मासिक दरडोई खर्च ( ₹ ) | |
|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी |
| आंध्र प्रदेश | ८६० | १,००९ |
| बिहार | ७७८ | ९२३ |
| गुजरात | ९३२ | १,१५२ |
| कर्नाटक | ९०२ | १,०८९ |
| केरळ | १,०१८ | ९८७ |
| मध्य प्रदेश | ७७१ | ८९७ |
| महाराष्ट्र | ९६७ | १,१२६ |
| पंजाब | १,०५४ | १,१५५ |
| राजस्थान | ९०५ | १,००२ |
| तामिळनाडू | ८८० | ९३७ |
| उत्तर प्रदेश | ७६८ | ९४१ |
| पश्चिम बंगाल | ७८३ | ९८१ |
| अखिल-भारत | ८१६ | १,००० |

*आधार* : नियोजन आयोग, भारत सरकार

# तेंडुलकर समितीच्या शिफारशींनुसार

**तक्ता १०.३७ प्रमुख राज्यातील शिरगणतीचे गुणोत्तर आणि दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची संख्या #**

| राज्य | शिरगणतीचे गुणोत्तर | | | | | व्यक्तींची संख्या (लाखात) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९७३-७४ | १९८३ | १९९३-९४ | २००४-०५# | २०११-१२# | १९७३-७४ | १९८३ | १९९३-९४ | २००४-०५# | २०११-१२# |
| आंध्र प्रदेश | ४८.९ | २८.९ | २२.२ | २९.६ | ९.२ | २२५.७ | १६४.६ | १५४.० | २३५.१ | ७८.८ |
| बिहार | ६१.९ | ६२.२ | ५५.० | ५४.४ | ३३.७ | ३७०.६ | ४६२.१ | ४९३.४ | ४९३.८ | ३५८.२ |
| गुजरात | ४८.२ | ३२.८ | २४.२ | ३१.६ | १६.६ | १३८.४ | ११७.९ | १०५.२ | १७१.४ | १०२.२ |
| कर्नाटक | ५४.५ | ३८.२ | ३३.२ | ३३.३ | २०.९ | १७०.७ | १४९.८ | १५६.५ | १८६.५ | १२९.८ |
| केरळ | ५९.८ | ४०.४ | २५.४ | १९.६ | ७.१ | १३५.५ | १०६.८ | ७६.४ | ६२.० | २४.० |
| मध्य प्रदेश | ६१.८ | ४९.८ | ४२.५ | ४८.६ | ३१.७ | २७६.३ | २७८.० | २९८.५ | ३१५.७ | २३४.१ |
| महाराष्ट्र | ५३.२ | ४३.४ | ३६.९ | ३८.२ | १७.४ | २८७.४ | २९०.९ | ३०५.२ | ३९२.४ | १९७.९ |
| पंजाब | २८.२ | १६.२ | ११.८ | २०.९ | ८.३ | ४०.५ | २८.६ | २५.१ | ५३.६ | २३.२ |
| राजस्थान | ४६.१ | ३४.५ | २७.४ | ३४.४ | १४.७ | १२८.५ | १२६.८ | १२८.५ | २०९.८ | १०३.० |
| तामिळनाडू | ५४.९ | ५१.७ | ३५.० | २९.४ | ११.३ | २३९.५ | २६०.१ | २०२.१ | १९४.१ | ८२.७ |
| उत्तर प्रदेश | ५७.१ | ४७.१ | ४०.९ | ४०.९ | २९.४ | ५३५.७ | ५५६.७ | ६०४.५ | ७३०.७ | ५९८.२ |
| पश्चिम बंगाल | ६३.४ | ५४.९ | ३५.७ | ३४.२ | २०.० | २९९.३ | ३१८.७ | २५४.६ | २८८.३ | १८५.० |
| अखिल-भारत | ५४.९ | ४४.५ | ३६.० | ३७.२ | २१.९ | ३,२१३.४ | ३,२२९.० | ३,२०३.७ | ४,०७२.२ | २,६९७.८ |

*आधार* : नियोजन आयोग, भारत सरकार

# तेंडुलकर समितीच्या शिफारशींनुसार

# गृहनिर्माण

१०.७१ गरीब व दुर्बल घटकातील नागरिकांना पुरेशी घरे उपलब्ध करून देण्याकरिता राज्य शासनाने विशेष पुढाकार घेतला आहे. नागरी भागांमध्ये गृहविषयक समस्यांवर मात करण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) आणि शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) मर्यादित यांची स्थापना केली आहे. याखेरीज नागरी भागातील झोपडपट्टीवासीयांकरिता घरे बांधण्यासाठी राज्यात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची (झोपुप्रा) स्थापना केली आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे व समाजाच्या दुर्बल घटकांमधील लोकांना दर्जेदार घरे उपलब्ध करून देण्याच्या हेतूने राज्यातील ग्रामीण भागात इंदिरा आवास योजना, राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना, इ. योजना राबविण्यात येत आहेत.

## नागरी गृहनिर्माण

### महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

१०.७२ मुंबई तसेच राज्याच्या काही भागात किफायतशीर घरे उपलब्ध करुन देण्यात म्हाडाची गृहनिर्माण विकासात महत्वाची भूमिका आहे. म्हाडाने स्थापनेपासून मार्च, २०१३ अखेरपर्यंत एकूण ४,३४,५३८ सदनिकांचे बांधकाम व पुर्नविकास केला आहे. म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या सदनिका व मालकीचे भूखंड तक्ता १०.३८ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.३८ म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या सदनिका व मालकीचे भूखंड**

| वर्ष | आर्थिक दुर्बल गट | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | इतर | एकूण सदनिका | भूखंडांची संख्या | खर्च@ (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००८-०९ | १,५७० | ७८३ | ४६१ | २१६ | २७ | ३,०५७ | १,१३१ | ४९०.७६ |
| २००९-१० | २,५६१ | ७,२१३ | ४३३ | ३९६ | २८ | १०,६३१ | ३,१७२ | ७८९.६९ |
| २०१०-११ | ३,२०४ | ३,८२९ | ८३६ | २७० | १०५ | ८,२४४ | १,०४८ | ८५९.३३ |
| २०११-१२ | ८१५ | २,९४१ | २३८ | ३८८ | १२२ | ४,५०४ | ७९४ | ९२८.९४ |
| २०१२-१३ | १२४ | १,२९८ | ३१८ | १९७ | ३७८ | २,३१५ | २२४ | ४६५.४५ |
| २०१३-१४+ | १,३४९ | २,३२१ | ३६८ | १४८ | ८३० | ५,०१६ | १३८ | २३४.९५ |

*आधार* : म्हाडा, मुंबई + डिसेंबर पर्यत @ भूखंडांसह

१०.७३ सन २०१२-१३ मध्ये म्हाडाच्या विविध गृहनिर्माण मंडळांमार्फत बांधलेल्या सदनिका व मालकीचे भूखंड तक्ता १०.३९ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.३९ सन २०१२-१३ मध्ये विविध गृहनिर्माण मंडळांमार्फत बांधलेल्या सदनिका व मालकीचे भूखंड**

| मंडळ | आर्थिक दुर्बल गट | | अल्प उत्पन्न गट | | मध्यम उत्पन्न गट | | उच्च उत्पन्न गट | | इतर | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सदनिका | भूखंड | सदनिका | भूखंड | सदनिका | भूखंड | सदनिका | भूखंड | | सदनिका | भूखंड |
| मुंबई | १०० | ० | ३१८ | ० | १४२ | ० | १४५ | ० | ३५९ | ७०५ | ० |
| कोकण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पुणे | ० | ० | ० | ५६ | १८ | ३२ | १८ | ० | ० | ३६ | ८८ |
| नाशिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| औरंगाबाद | ० | ० | १४७ | ० | ८० | २४ | ० | ० | ० | २२७ | २४ |
| अमरावती | २४ | ० | ३० | ० | २८ | ० | २० | १७ | ० | १०२ | १७ |
| नागपूर | ० | ० | १४७ | ६८ | ५० | २७ | १४ | ० | १९ | २११ | ९५ |
| मुंइदुवपुमं# | ० | ० | ६५६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ६५६ | ० |
| **एकूण** | **१२४** | **०** | **१,२९८** | **१२४** | **३१८** | **८३** | **१९७** | **१७** | **३७८** | **१,९३७** | **२२४** |

*आधार* : म्हाडा , मुंबई # मुंइदुवपुमं मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

### शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित

१०.७४ शाळा, रुग्णालये, समाज केंद्र, इ. सारख्या मूलभूत सुविधांसह समाजातील सर्व घटकांना घरे देण्याचा विकास कार्यक्रम सिडको राबवित आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील ओरोस जिल्हा मुख्यालय, वसई-विरार प्रकल्प, नागपूर जवळील बुटीबोरी क्षेत्रातील मेघदूतनगर तसेच पनवेल येथील प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरातील १० ते २५ कि.मी. परिघामध्ये येणाऱ्या क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून राज्य शासनाने सिडकोची नियुक्ती केली आहे. सिडकोने स्थापनेपासून डिसेंबर, २०१३ पर्यंत

एकूण १,७८,१२८ सदनिका नवी मुंबई, औरंगाबाद, नाशिक आणि नांदेड येथे बांधल्या आहेत. सिडकोव्दारे बांधण्यात आलेल्या एकूण सदनिकांची माहिती (स्थापनेपासून डिसेंबर,२०१३ पर्यंत ) तक्ता १०.४० मध्ये दिली आहे .

**तक्ता १०.४० सिडकोव्दारे बांधण्यात आलेल्या एकूण सदनिकांची माहिती (स्थापनेपासून डिसेंबर,२०१३ पर्यंत )**

| ठिकाण | आर्थिक दुर्बल गट/ अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | एकूण सदनिका | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| नवी-मुंबई | ६०,८८३ | ३४,४२३ | २८,३३४ | १,२३,६४० | १,६३८ |
| औरंगाबाद | १९,५०१ | २,१२७ | ४३२ | २२,०६० | ५६ |
| नाशिक | २१,३४३ | २,६१९ | ५८२ | २४,५४४ | ४२ |
| नांदेड | ७,७५८ | १२६ | ० | ७,८८४ | ९ |
| **एकूण** | **१,०९,४८५** | **३९,२९५** | **२९,३४८** | **१,७८,१२८** | **१,७४५** |

*आधार* : सिडको

## जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान

१०.७५ जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान (जेएनएनयुआरएम) हा शहर आधुनिकीकरणाचा मोठा कार्यक्रम आहे. या अभियानांतर्गत 'शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा' (बीएसयुपी) व 'एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम' (आयएचएसडीपी) या दोन योजना राज्यात म्हाडामार्फत राबविण्यात येत आहेत.

## १) शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा

१०.७६ नागरी भागातील गरीब लोकांसाठी वसाहतींचा विकास करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. सदर योजनेचा कार्यकाळ मार्च, २०१२ पर्यंत होता. तथापि, केंद्र शासनाने त्याची मुदत मार्च, २०१५ पर्यंत वाढवली आहे. ही योजना मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, नाशिक, नांदेड, कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर, उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर तसेच भगूर या १३ शहरांमध्ये राबविण्यात येत आहे.

## २) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम

१०.७७ जेएनएनयुआरएम-बीएसयुपी कार्यक्रमांतर्गत समाविष्ट केलेली १३ शहरे वगळून इतर १२७ शहरांमध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाची प्रगती (डिसेंबर, २०१३ पर्यंत) तक्ता १०.४१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४१ शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाची प्रगती (डिसेंबर, २०१३ पर्यंत)**

| तपशील | शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम |
|---|---|---|
| केंद्र सरकारने मंजूर केलेले प्रकल्प (संख्या) | ६२ | १२७ |
| सदनिकांचे लक्ष्य (संख्या) | १,४०,७३६ | १,०७,०३२ |
| प्रकल्पाची एकूण किंमत (₹ कोटी) | ५,८३८ | २,५२५ |
| पूर्ण झालेल्या सदनिका (संख्या) | ५९,१७७ | २६,०१४ |
| प्रगतीपथावर असलेल्या सदनिका (संख्या) | २४,४०२ | २३,६५९ |

*आधार* : म्हाडा, मुंबई

## झोपडपट्टी पुनर्वसन योजना

१०.७८ झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत गरीबांना मोठ्या प्रमाणात निवारा पुरविण्यात आला आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने स्थापनेपासून (१९९५) फेब्रुवारी, २०१४ अखेरपर्यंत एकूण १,४०५ प्रकल्पाची कामे पूर्ण केली असून १,५७,३५७ झोपडपट्टीतील कुटुंबांचे पुनर्वसन केले आहे.

## शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

१०.७९ झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम जलदगतीने होण्याच्या उद्देशाने १९९८ मध्ये "शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित" ची स्थापना करण्यात आली. स्थापनेपासून नोव्हेंबर, २०१३ पर्यंत १०,६७३ सदनिका असलेल्या १११ इमारती बांधण्यात आल्या (त्यापैकी १०,१६५ सदनिका वितरीत करण्यात आल्या ) व त्यावर ₹ ४५८ कोटी खर्च झाला.

### बिडी कामगार घरकुल योजना

१०.८० बिडी कामगारांसाठी सोलापूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नांदेड, औरंगाबाद मधील गारखेडा व नागपूरमधील कामठी येथे घरे बांधण्यासाठी ही योजना जुलै, २००१ पासून राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेतर्गत प्रति घरकुल ₹ ४०,००० केंद्र शासनाकडून व ₹ २५,००० राज्य शासनाकडून आर्थिक सहाय्य पुरविण्यात येते. सात बिडी कामगार संघटनांना एकूण १९,८४७ घरकुल बांधण्याकरिता ₹ ४२.०७ कोटी रक्कम वितरित करण्यात आली आहे. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता या योजनेसाठी ₹ २.० कोटी रक्कम अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

## ग्रामीण गृहनिर्माण

### इंदिरा आवास योजना

१०.८१ इंदिरा आवास योजना राज्यात एप्रिल, १९८९ पासून ग्रामीण भागातील घरे नसलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी घरे बांधण्यासाठी राबविली जाते. ही योजना केंद्र पुरस्कृत असून यात केंद्र व राज्याचा हिस्सा ७५:२५ असा आहे. केंद्र शासनाने १ एप्रिल, २०१३ पासून घराच्या बांधकामाची किंमत प्रत्येकी ₹ ७०,००० इतकी निश्चित केली आहे. तथापि, राज्य शासनाने प्रत्येक घराच्या बांधकामाची किंमत वाढवून ती ₹ एक लाख इतकी केली असून बांधकामासाठी लागणारी वाढीव रक्कम राज्य शासनातर्फे पुरविण्यात येते.

१०.८२ सन २०१३-१४ या वर्षासाठी १,३७,३१४ घरे बांधण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. त्यासाठी केंद्र शासनाने ₹ ७२०.९० कोटी मंजूर केले असून, राज्य शासनाने ₹ ६८९.९४ कोटीची तरतूद केली आहे. जानेवारी, २०१४ अखेरपर्यंत ५४,६६६ घरांचे बांधकाम पूर्ण झाले असून त्यासाठी ₹ ७३२.८९ कोटी इतका खर्च झाला. सन २०१२-१३ मध्ये १,४५,७६४ घरे बांधण्यात आली असून त्यासाठी ₹ १,१३८.६० कोटी खर्च झाला. विभाग निहाय भौतिक व आर्थिक प्रगती तक्ता १०.४२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४२ विभागनिहाय भौतिक व आर्थिक प्रगती** (₹ कोटी)

| विभाग | २०११-१२ | | | २०१२-१३* | | | २०१३-१४ + | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | खर्च | लक्ष्य | साध्य | खर्च | लक्ष्य | साध्य | खर्च |
| कोकण | २२,३२४ | २२,९८५ | १५०.७१ | २५,७२६ | २३,०३८ | १९२.५९ | २१,७०८ | ७,४३८ | ११०.४७ |
| नाशिक | ३८,९२७ | ३७,१०५ | २४१.९७ | ४४,६३२ | ४३,१८८ | २९३.३९ | ५०,५०३ | २६,७५७ | २७४.४४ |
| पुणे | ३१,९१३ | ३२,७६३ | २०२.९३ | ३६,७७६ | २०,७७२ | १९१.७६ | ६,४४३ | ४,६८७ | ४१.४५ |
| औरंगाबाद | २५,६६६ | २४,३९५ | १८३.९३ | २९,४९९ | २६,३८२ | २१८.९९ | १९,५३५ | ५,८९८ | ८४.९५ |
| अमरावती | १४,६२६ | १४,०७५ | १०१.५२ | १६,८५५ | १३,०४८ | १०७.९६ | २१,३८१ | १,९५० | ९७.१७ |
| नागपूर | १७,६०७ | २१,८६२ | ११६.०९ | २०,१०३ | १९,३३६ | १३३.९१ | १७,७४४ | ७,९३६ | १२४.४१ |
| **एकूण** | **१,५१,०६३** | **१,५३,१८५** | **९९७.१५** | **१,७३,५९१** | **१,४५,७६४** | **११३८.६०** | **१,३७,३१४** | **५४,६६६** | **७३२.८९** |

*आधार* : ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी + जानेवारीपर्यत

### राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-१

१०.८३ राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना-१ ही राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांसाठी राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्याला स्वत:चे घर बांधण्यासाठी ₹ ६८,५०० इतके अनुदान दिले जाते. ही योजना ३३ जिल्हा परिषदांच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांमार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सन २०११-१२ मध्ये १३,६०७ घरकुलांसाठी ₹ ९३.२१ कोटी व सन २०१२-१३ मध्ये ५५,४२८ घरकुलांसाठी ₹ ३८०.२४ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

### राजीव गांधी ग्रामीण निवारा सुधारित योजना-२

१०.८४ राजीव गांधी ग्रामीण निवारा सुधारित योजना-२ अंतर्गत दारिद्र्य रेषेवरील परंतु अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांसाठी १,२५,००० घरे बांधण्याचे राज्याने ठरविले आहे. सदर योजनेतंर्गत प्रत्येक घरकुलाची किंमत ₹ एक लाख इतकी निर्धारित करण्यात आली असून लाभार्थ्यांना जिल्ह्यातील अग्रणी बँकेकडून ₹ ९०,००० कर्ज पुरविले जाते व उर्वरित ₹ १०,००० लाभार्थ्याने भरावयाचे आहे. कर्जावरील व्याज अनुदानाच्या स्वरुपात राज्य शासनाकडून दिले जाते. राजीव गांधी ग्रामीण निवारा सुधारित योजना-२ ची प्रगती (नोव्हेंबर, २०१३ पर्यंत) तक्ता १०.४३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४३ राजीव गांधी ग्रामीण निवारा सुधारित योजना-२ ची प्रगती ***

(नोव्हेंबर, २०१३ पर्यंत)

| मंडळ | घरकुलांची संख्या | बँकांना वितरित व्याजाची रक्कम (₹ कोटी) |
|---|---|---|
| कोकण | २,५६६ | १.७२ |
| पुणे | २,७६४ | १.०७ |
| नाशिक | २५,०६२ | २.०४ |
| औरंगाबाद | ८७९ | १.४५ |
| अमरावती | ४,८७१ | ०.७७ |
| नागपूर | २,१६१ | २.४५ |
| **एकूण** | **३८,३०३** | **९.५०** |

*आधार* : म्हाडा, मुंबई * अस्थायी

# पाणी पुरवठा आणि स्वच्छता

१०.८५ निरोगी मानवी जीवनाकरिता पिण्यायोग्य पाण्याची उपलब्धता व सुयोग्य स्वच्छता या मूलभूत गरजा आहेत. पिण्याचे पाणी व सुयोग्य स्वच्छता पुरविण्याकरिता शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत.

## पाणी पुरवठा

१०.८६ राज्याने टंचाईग्रस्त परिस्थिती हाताळण्याकरिता सन २०१३-१४ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ ३६५.६९ कोटी निधी वितरीत केला आहे. यापैकी कोकण विभागाला ₹ ३.२० कोटी, पुणे विभागाला ₹ ११०.२१ कोटी, नाशिक विभागाला ₹ ६०.६० कोटी, औरंगाबाद विभागाला ₹ १६६.०२ कोटी, अमरावती विभागाला ₹ १७.६६ कोटी व नागपूर विभागाला ₹ आठ कोटी निधी वितरीत केला आहे. राज्याने टंचाईग्रस्त ४,२८२ गावे आणि १०,७०७ वाड्यांकरिता तात्पुरत्या नळ पाणी योजना, कुपनलिका व इतर पाण्याचे स्रोत पुनरुज्जीवित करणे, टँकरने पाणी पुरवठा करणे, इत्यादी सारख्या विविध उपाययोजना केल्या आहेत. टँकरने करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठयाची माहिती तक्ता १०.४४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४४ टँकरने करण्यात येणारा पाणी पुरवठा#**

(संख्या)

| विभाग | बाधित | | कार्यरत टँकर्स |
|---|---|---|---|
| | गावे | वाड्या | |
| पुणे | १,१६२ | ६,६८८ | १,५२४ |
| नाशिक | १,००९ | ३,१०२ | १,२२६ |
| औरंगाबाद | १,८७५ | ९१३ | २,३७१ |
| अमरावती | २३६ | ४ | २७९ |
| **एकूण** | ४,२८२ | १०,७०७ | ५,४०० |

*आधार* : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन

# ३ जून, २०१३ पर्यंतची माहिती

### राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम

१०.८७ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा केंद्र शासनाचा फ्लॅगशीप कार्यक्रम असून सदर कार्यक्रम राज्यामध्ये एप्रिल, २००९ पासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा उद्देश ग्रामीण भागात पिण्यायोग्य, पुरेसे व कायमस्वरुपी पाणी पुरवठा करणे हा आहे. सन २०१२-१३ मध्ये या कार्यक्रमांतर्गत ५,९४० गावे/वाड्यांच्या उद्दिष्टापैकी ४,६३७ गावे/वाड्यांची कामे पूर्ण झाली असून त्यावर ₹ १,१६९.२७ कोटी इतका खर्च झाला आहे. सन २०१३-१४ मध्ये डिसेंबर, २०१३ पर्यंत या योजनेंतर्गत निर्धारीत केलेल्या ५,०६६ गावे/वाड्यांच्या उद्दिष्टापैकी १,७०७ गावे/वाड्यांची कामे पूर्ण झाली आहेत. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.४५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४५ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची प्रगती**

| सन | हाताळलेली गावे /वाड्या | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | |
| २००९-१० | ११,६३९ | ७,४६५ | १,०३३.६३ |
| २०१०-११ | ९,७४५ | ८,९८७ | १,२७५.४८ |
| २०११-१२ | ६,५०२ | ६,३६४ | १,२५२.९२ |
| २०१२-१३ | ५,९४० | ४,६३७ | १,१६९.२७ |
| २०१३-१४+ | ५,०६६ | १,७०७ | ५३०.७२ |

*आधार* : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

### पाणी टंचाई निवारण कार्यक्रम

१०.८८ पाणी टंचाईग्रस्त गावे/वाड्यांमध्ये दरवर्षी ऑक्टोबर ते जून या कालावधीत पाणी टंचाई निवारण कार्यक्रम राबविला जातो. सन २०१२-१३ मध्ये राज्यात पडलेल्या असमान पावसामुळे पाणी टंचाई निवारण कार्यक्रम, जुलै, २०१३ पर्यंत वाढविला गेला. सन २०१२-१३ मध्ये या कार्यक्रमावर ₹ ४००.९७ कोटी खर्च झाला. पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत गावे/वाड्यांची संख्या तक्ता १०.४६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४६ पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत गावे /वाड्या**

(संख्या)

| उपाययोजना / कामे | गावे | | वाड्या | |
|---|---|---|---|---|
| | २०११-१२@ | २०१२-१३+ | २०११-१२@ | २०१२-१३+ |
| नवीन विंधण विहिरी | २,०९६ | ४,४२३ | २,१९९ | २,७६७ |
| तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजनेची विशेष दुरुस्ती | ४६३ | १,३०९ | ४९ | १२५ |
| विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती | १,०३५ | १,५६४ | १,७८५ | ६१९ |
| तात्पुरती पुरक नळयोजना | १३८ | ४४० | ४४ | ९७ |
| टँकर / बैलगाडीने पाण्याचा पुरवठा | १,४०४ | ४,५९० | ४,७६८ | ८,६४० |
| खाजगी विहिरींचे अधिग्रहण | २,१८२ | ४,८१९ | १,८५९ | ९०३ |
| विहिरी खोल करणे / गाळ काढणे | ३३६ | १६६ | १२२ | २८ |
| बुडक्या विहिरींचे बांधकाम | ० | ४ | ० | ० |

*आधार :* पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन @ ऑक्टोबर, २०११ ते ऑगस्ट, २०१२ + ऑक्टोबर, २०१२ ते जुलै, २०१३

## शिवकालीन पाणी साठवण योजना

१०.८९ शिवकालीन पाणी साठवण योजना हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचा घटक असून पारंपरिक व अपारंपरिक उपाययोजनांद्वारे पाण्याचे संधारण करण्याच्या उद्देशाने, पाण्याच्या स्रोतांचे बळकटीकरण, छतावरील पावसाच्या पाण्याची साठवणूक, पावसाचे पाणी साठविण्यासाठी डोंगराळ भागात तलाव बांधणी आणि या सारख्या इतर उपाययोजनांद्वारे पिण्याचे पाणी सातत्याने उपलब्ध होण्याच्या उद्देशाने राज्यात शिवकालीन पाणी साठवण योजना राबविण्यात येत आहे. योजनेच्या सुरुवातीपासून (२००२) ते फेब्रुवारी,२०१४ पर्यंत १२,१०४ वस्त्यांची निवड करुन ३१,६१० उपाययोजना निश्‍चित करण्यात आल्या असून १०,४१० वस्त्यांमधील २८,०१२ उपाययोजना पूर्ण झाल्या आहेत व त्यावर एकूण ₹ ४२१.२६ कोटी खर्च झाला.

१०.९० पावसाच्या पाण्याची साठवण ही उपाययोजना जल संधारणासाठी लोकप्रिय झाली आहे. शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात फेब्रुवारी, २०१४ पर्यंत पावसाच्या पाण्याच्या साठवणीसाठी ८,८११ बांधकामे करण्यात आली. त्यापैकी ९६५ कोकण, ९१३ पुणे, २५७ नाशिक, ३,०७३ औरंगाबाद , १,७२० अमरावती आणि १,८८३ नागपूर विभागात झाली आहेत.

## स्वच्छता

१०.९१ कार्यक्षम आणि प्रतिष्ठित जीवन जगण्यासाठी तसेच वैयक्तिक आणि सामाजिक आरोग्याचे संरक्षण व वर्धन करण्यासाठीही पुरेशा प्रमाणात स्वच्छतेची आवश्यकता आहे. स्वच्छतेच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य शासनकडून विविध योजना राबविण्यात येत आहेत.

## महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियान

१०.९२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता विषयक सुविधा सर्व नागरिकांना उपलब्ध करुन देऊन पाणी टंचाई व पाण्याच्या वाढत्या मागणीवर मात करणे हा महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियानाचा प्राथमिक उद्देश आहे. या अभियानांतर्गत राज्याने पाणी पुरवठा व स्वच्छतेसंदर्भात विशिष्ठ व दर्जेदार सेवा सुरु केली आहे. यास्तव तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय सुधारणा करण्याच्या दृष्टीने सेवा शुल्क आकारण्यात येत आहे. योजनेच्या सुरवातीपासून (२००८-०९) पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या ₹ १२०६.३८ कोटी खर्चाच्या २५७ कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून ₹ ५३३.७९ कोटी निधी वितरित केला आहे. सन २०१२-१३ मध्ये ₹ १०५.५१ कोटी व सन २०१३-१४ मध्ये ₹ १०४.०५ कोटी खर्च झाला आहे.

## नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना

१०.९३ 'महाराष्ट्र गोल्डन ज्युबली नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना' ही महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियानांतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या कुटुंबांना घरगुती नळजोडणी व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करुन देण्याकरिता राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत ९० टक्के अनुदान राज्य शासनाकडून व उर्वरीत १० टक्के हिस्सा लाभार्थी किंवा नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांचा असतो. नळ जोडणी व शौचालय बांधकामासाठी अनुक्रमे ₹ ४,००० व ₹ १२,००० इतके अनुदान मिळण्यास लाभार्थी कुटुंब पात्र आहे. या योजनेंतर्गत १२६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ₹ १७३.१४ कोटीच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली असून १,०३,३७७ लाभार्थी आहेत.

## ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना

१०.९४ ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील कुटुंबांना नळ पाणी जोडणी व वैयक्तिक शौचालय उपलब्ध करुन देण्याकरिता नोव्हेंबर, २०११ पासून 'ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना' सुरु करण्यात आली. या योजनेंतर्गत सन २०११-१२ मध्ये ₹ ४८.४५ कोटी तर सन २०१२-१३ मध्ये ₹ ४८ कोटी निधी खर्च झाला. सन २०१३-१४ करिता ₹ ६० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

## निर्मल भारत अभियान

१०.९५ 'संपूर्ण स्वच्छता अभियान' या योजनेला एप्रिल, २०१२ पासून 'निर्मल भारत अभियान' असे संबोधले जात आहे. या योजनेतंर्गत स्वतंत्र कौटुंबिक शौचालये बांधण्याकरिता दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना प्रोत्साहनपर मदत दिली जाते. आता दारिद्र्य रेषेवरील अनुसूचित जाती/ जमातीतील कुटुंबे, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी, घर असलेले भूमिहीन मजूर, नि:शक्त व्यक्ति, स्त्री कुटुंब प्रमुख असलेली कुटुंबे यांच्यासाठी ही योजना लागू केली आहे. प्रति शौचालय बांधकामाची किंमत ₹ ५,५०० (डोंगराळ व अतिदुर्गम भागासाठी ₹ ६,०००) निर्धारित केली आहे व त्यातील केंद्रशासनाचा वाटा ₹ ३,२०० (डोंगराळ व अतिदुर्गम भागासाठी ₹ ३,७००), राज्य शासनाचा वाटा ₹ १,४०० व लाभार्थ्यांचे योगदान ₹ ९०० याप्रमाणे आहे. या अभियानातंर्गत डिसेंबर, २०१३ पर्यंत ७५.२८ लाख स्वतंत्र कौटुंबिक शौचालयांचे बांधकाम करण्यात आले आहे.

१०.९६ केंद्र व राज्य शासन यांचा शाळा व अंगणवाड्यांच्या शौचालयाच्या खर्चातील हिस्सा ७०:३० या प्रमाणात आहे. शाळेकरिता प्रति शौचालयाची किंमत ₹ ३५,००० (दुर्गम भागासाठी ₹ ३८,५००) व अंगणवाडीकरिता ₹ ८,००० (दुर्गम भागासाठी ₹ १०,०००) निर्धारित केली आहे. शौचालय बांधकामविषयक माहिती तक्ता १०.४७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४७ शौचालय बांधकामविषयक माहिती**

| प्रकार | २०१२-१३ | २०१३-१४ | |
|---|---|---|---|
| | | लक्ष्य | साध्य+ |
| दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी स्वतंत्र शौचालय | ९२,१०३ | २,२९,२४३ | ९३,१५६ |
| दारिद्र्य रेषेवरील कुटुंबासाठी स्वतंत्र शौचालय | ९७,२०३ | ४,५३,७९२ | १,७४,१०७ |
| सार्वजनिक शौचालय | ७२८ | १,५२४ | १६१ |
| अंगणवाडी शौचालय | ५,८०० | -- | -- |

*आधार* : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान

१०.९७ राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये हे अभियान २००२-०३ पासून राबविले जात आहे. या अभियानामुळे पाणीपुरवठ्याचे बळकटीकरण, मल:निस्सारण, घनकचरा व्यवस्थापन या क्षेत्रात सातत्याने सुधारणा होण्यास मदत झाली आहे. या अभियानांतर्गत सन २०१२-१३ मध्ये ₹ दोन कोटी खर्च झाला आणि तितकीच तरतूद सन २०१३-१४ साठी करण्यात आली आहे.

## एकात्मिक कमी खर्चाची स्वच्छता योजना

१०.९८ एकात्मिक कमी खर्चाची स्वच्छता योजना ही झोपटपट्टी व अनधिकृत वसाहतीसह जेथे शौचकूपे नाहीत किंवा कोरडी शौचालये आहेत अशा सर्व कुटुंबांना शौचकूप सुविधा मागणी प्रमाणे देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेतंर्गत नागरी भागातील आर्थिकदृष्ट्या मागास गटातील (ज्याचे सर्व स्रोतापासून मासिक उत्पन्न ₹ ३,३०० पेक्षा कमी आहे ) अशा व्यक्ती अनुदान मिळण्यास पात्र आहेत. शौचकूपांच्या बांधकामाकरिता राज्य व केंद्र शासनाकडून अनुदान पुरविले जाते. त्यामध्ये केंद्र शासनाकडून ७५ टक्के, राज्य शासनाकडून १५ टक्के आणि लाभार्थ्यांकडून १० टक्के असे प्रमाण तत्व आहे. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने १६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २१ प्रस्तावांना मान्यता दिलेली आहे व त्या अंतर्गत ३९,६६३ वैयक्तिक शौचालये बांधण्यात येणार असून त्यापैकी २६,१२७ शौचालये बांधण्यात आली आहेत, तर २,९९६ शौचालयांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सन २०१३-१४ साठी ₹ १.४० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

# पर्यावरण संवर्धन

१०.९९ मानवी हस्तक्षेपामुळे संपूर्ण जीवसृष्टी बदलांना सामोरी जात असून हे बदल वातावरणातील भौतिक तसेच रासायनिक घटकांवरदेखील होत आहेत. ही समस्या अत्यंत गंभीर असून या विषारी घटकांची अन्नसाखळीत तसेच सजीवांच्या शरीरात साठवणूक झाल्याने जैविक बदल होत आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे पुढील पिढ्यांकरिता जतन करण्यासाठी पर्यावरण संवर्धन म्हणजेच नैसर्गिक साधनसंपत्तीचे काळजीपूर्वक व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

१०.१०० पर्यावरणाचे व्यवस्थापन, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण तसेच खालील महत्त्वाच्या कायद्यांच्या व नियमांच्या अंमलबजावणीकरिता राज्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना केली आहे.

- जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४
- जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) उपकर अधिनियम, १९७७
- वायू (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१
- पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६
- ध्वनि प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम, २०००

## वायू प्रदूषण

१०.१०१ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ १७ जिल्ह्यांतील ७७ ठिकाणी वायुच्या गुणवत्तेचे संनियंत्रण करीत आहे. वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी कमी गंधक असलेले डिझेल वापरणे, शिसेरहीत पेट्रोल वापरणे, सीएनजी/एलपीजी हे पर्यायी इंधन वापरणे, पीयुसी अनिवार्य करणे, १५ वर्षे झालेल्या वाहनांवर बंदी घालणे आणि आठ वर्षे पूर्ण झालेल्या वाहनांना सीएनजी/एलपीजी वापरण्यासाठी रुपांतरित करणे अशा उपाय योजना करण्यात येत आहेत. राज्यात ३१ मार्च, २०१३ रोजी सीएनजी/एलपीजी मध्ये रूपांतरित करता येण्याजोग्या एकूण ५३.२७ लाख वाहनांपैकी १.४६ लाख वाहनांवर एलपीजी संच आणि ३.२३ लाख वाहनांवर सीएनजी संच बसविण्यात आले आहेत. जानेवारी ते डिसेंबर, २०१३ या कालावधीत प्रमुख संनियंत्रण स्थानकांनी निवासी परिसरात नोंदविलेली वायू गुणवत्ता माहिती तक्ता १०.४८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४८ जानेवारी ते डिसेंबर, २०१३ या कालावधीत प्रमुख संनियंत्रण स्थानकांनी निवासी परिसरात नोंदविलेली वायू गुणवत्ता**

| | वायू प्रदुषित करणाऱ्या पदार्थांची तीव्रता (µg/m³) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थानक | सल्फर डायऑक्साईड ($SO_2$), | | | नायट्रोजन ऑक्साईड्स ($NO_x$), | | | अधांतरी दूषित कण | | |
| मर्यादा | ८० | | | ८० | | | १०० | | |
| | किमान | कमाल | सरासरी | किमान | कमाल | सरासरी | किमान | कमाल | सरासरी |
| मुंबई (सायन) | २<br>(३) | ८१<br>(५०) | ९.१<br>(९.३) | २४<br>(४) | २६८<br>(२६९) | ११६.९<br>(८१.०) | २०<br>(४) | ४२८<br>(५३५) | १३७.९<br>(१२४.५) |
| नवी मुंबई (वाशी) | ६<br>(४) | १०६<br>(८२) | ३५.०<br>(२२.७) | ११<br>(४) | १२५<br>(२९०) | ४५.४<br>(५३.६) | १२<br>(१८) | ४७०<br>(३९८) | १३०.३<br>(१०३.०) |
| पुणे (स्वारगेट) | १०<br>(११) | ४५<br>(४५) | १९.४<br>(१९.३) | १४<br>(१४) | ११४<br>(११४) | ४४.४<br>(५०.१) | १३<br>(६) | १८८<br>(२०९) | ७१.१<br>(८१.४) |
| नाशिक (नवीन मनपा इमारत) | २१<br>(१८) | ४३<br>(३२) | २७.९<br>(२४.०) | २२<br>(२०) | ४४<br>(३५) | २८.८<br>(२६.७) | ३५<br>(३९) | १८२<br>(२३१) | ८६.२<br>(९२.५) |
| औरंगाबाद (कडा कार्यालय) | ७<br>(७) | १६<br>(२३) | १०.१<br>(१०.१) | २८<br>(२५) | ५१<br>(६६) | ३६.७<br>(३३.७) | २३<br>(२०) | १२९<br>(१२९) | ७०.०<br>(७०.०) |
| अमरावती (शास. अभि. महाविद्या.) | ५<br>(६) | १५<br>(१४) | १०.५<br>(१०.६) | ६<br>(९) | १६<br>(१६) | १२.२<br>(१२.६) | ३५<br>(५२) | ११०<br>(११०) | ८१.८<br>(८०.४) |
| नागपूर (मप्रनिमं यांचे प्रादेशिक कार्यालय) | ५<br>(४) | २१<br>(२२) | ९.०<br>(९.४) | १२<br>(१२) | ६९<br>(९१) | २४.५<br>(३०.२) | १५<br>(१५) | २१६<br>(१२८) | ५८.६<br>(५४.७) |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ µg/m³ मायक्रोग्रॅम / घन मीटर

टिप : कंसातील आकडे जानेवारी ते डिसेंबर, २०१२ करिता वायू गुणवत्ता दर्शवितात.

## जल प्रदूषण

१०.१०२ पाण्यापासून उद्‌भवणारे रोग मानवी विशेषत:, बालमृत्यूस कारणीभूत ठरतात. राष्ट्रीय जल गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जागतिक पर्यावरण संनियंत्रण यंत्रणा व भारतीय राष्ट्रीय जलस्रोत नियंत्रण प्रकल्प राबवित आहे. सदर कार्यक्रमांतर्गत भूपृष्ठावरील पाण्याचे मासिक किंवा त्रैमासिक आधारावर आणि भूगर्भिय पाण्याचे सहामाही आधारावर संनियंत्रण केले जाते. राज्यातील १५६ नद्या, ३४ खाड्या/समुद्रजल, १० नाले / कारखान्यांचे सांडपाणी आणि ५० विहिरींचा समावेश या संनियंत्रणात आहे. सदर २५० संनियंत्रण केंद्रांमध्ये २०० भूपृष्ठीय आणि ५० भूगर्भिय ठिकाणांचा समावेश आहे. पाण्याचे नमुने नऊ मूळ (गाभा) आणि एकोणीस सर्वसाधारण प्रमाणकांसाठी तपासले जातात. सनियंत्रण यंत्रणा काही ठिकाणी धातुंच्या अवशिष्टांचे विश्लेषणदेखील करतात. सन २०१२-१३ करिता नद्यांवरील विशिष्ट स्थानांची जल गुणवत्ता तक्ता १०.४९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४९ सन २०१२-१३ करिता नद्यांवरील विशिष्ट स्थानांची जल गुणवत्ता**

| प्रमाणक | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| pH मूल्य | | जैवरासायनिक प्राणवायूची मागणी (BOD)# | | विघटीत प्राणवायू (DO) | | फिकल कॉलिफॉर्म | |
| विस्तार | स्थाने | विस्तार | स्थाने | विस्तार | स्थाने | विस्तार | स्थाने |
| ६.८-७.३ | ३ | २ - ८ | १०३ | ० - ३ | १२ | ०-१०० | ८८ |
| ७.३-७.८ | ६१ | ८ - १४ | ३४ | ३ - ६ | ७७ | १००-२०० | २० |
| ७.८-८.३ | ६९ | १४-२० | ७ | ६ - ९ | ५४ | २००-३०० | १८ |
| ८.३-९.० | १२ | २०-२६ | ० | ९ आणि त्यापेक्षा अधिक | २ | ३०० आणि त्यापेक्षा अधिक | १९ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

pH मूल्य वगळता उर्वरित सर्व परिमाणे मिली ग्रॅम / लिटर मध्ये  BOD बायोकेमिकल ऑक्सिजन डिमांड  DO डिझॉल्व्हड ऑक्सिजन

# जैवरासायनिक प्राणवायूची मागणीकरिता एका स्थानकाची माहिती देण्यात आली नाही.

१०.१०३ प्रक्रिया विरहीत सांडपाणी नद्या, तलाव आणि तळ्यांमध्ये प्रवाहित केल्याने जल स्रोत प्रदूषित होतात. ३१ मार्च, २०१३, अखेर १८ महानगरपालिका आणि १० नगरपरिषदांकडून सांडपाणी प्रक्रिया आणि निचऱ्याबाबतची व्यवस्था करण्यात आली आहे.

## ध्वनि प्रदूषण

१०.१०४ ध्वनि प्रदूषण हे देखील एक घातक पर्यावरणीय प्रदूषण आहे. सणासुदीच्या काळातील ध्वनि प्रदूषण कमी करण्याकरिता १२५ डेसिबल्सपेक्षा जास्त आवाज करणाऱ्या फटाक्यांवर बंदी तसेच ध्वनिवर्धक लावणे व मोठ्या आवाजाचे फटाक्यांवर वेळेचे बंधन घालण्यात आले आहे. ध्वनि प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, २००० अन्वये क्षेत्रनिहाय ध्वनि स्तर प्रमाणाच्या मर्यादा तक्ता १०.५० मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता १०.५० क्षेत्रनिहाय ध्वनि स्तर प्रमाणाच्या मर्यादा**

(डेसिबल्समध्ये)

| क्षेत्र संकेतांक | क्षेत्राचा प्रकार | मर्यादा | |
|---|---|---|---|
| | | दिवस | रात्र |
| अ | औद्योगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| ब | वाणिज्यिक क्षेत्र | ६५ | ५५ |
| क | निवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| ड | शांतता प्रभाग | ५० | ४० |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

१०.१०५ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त ध्वनि प्रदूषणाचा प्रभाव अभ्यासण्याकरिता २२ व २३ डिसेंबर, २०१३ रोजी सहा प्रमुख शहरांमध्ये (मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व कोल्हापूर) २४ तासांच्या कालावधीकरिता परिसर ध्वनि स्तर संनियंत्रण कार्यक्रम आयोजित केला होता. दोन्ही दिवशी त्याच ठिकाणी त्याच कालावधीकरिता संनियंत्रण करण्यात आले होते. प्रमाणित मर्यादेशी तुलना करता असे आढळून आले की, २२ डिसेंबर (सुट्टीचा दिवस) व २३ डिसेंबर (कामकाजाचा दिवस) या दोनही दिवशी सर्व सहा शहरांमध्ये ध्वनि स्तर अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त होता. प्रमुख शहरांमधील निवासी क्षेत्रातील दिवस-रात्रीचे ध्वनि स्तर तक्ता १०.५१ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.५१ प्रमुख शहरांमधील निवासी क्षेत्रातील दिवस-रात्रीचे ध्वनि स्तराचे प्रमाण**

(डेसिबल्समध्ये)

| ठिकाण | सुट्टीचा दिवस | | कामकाजाचा दिवस | |
|---|---|---|---|---|
| | दिवस | रात्र | दिवस | रात्र |
| मुंबई (अँटॉप हिल) | ६७.१ | ६३.४ | ६३.६ | ६०.१ |
| मुंबई (शिवाजी पार्क) | ६७.९ | ५७.० | ६८.३ | ५७.० |
| पुणे ( काकडे आंगण) | ५७.१ | ४९.० | उ. ना. | उ. ना. |
| नाशिक (पंडित कॉलनी) | ६७.३ | ६६.० | ६८.१ | ६५.८ |
| नाशिक (पवन नगर) | ७६.५ | ६९.० | ६९.३ | ६७.९ |
| औरंगाबाद (सिडको एन-४) | ६५.१ | ५५.१ | ६४.५ | ५५.० |
| नागपूर (शिवाजी नगर) | ६२.७ | ५४.४ | ६४.१ | ५५.२ |
| कोल्हापूर (जिल्हाधिकारी कार्यालय) | ५२.८ | ४४.३ | ६८.६ | ४४.३ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ     उ. ना. उपलब्ध नाही

## औद्योगिक प्रदूषण

१०.१०६ मार्च, २०१३ अखेर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यक्षेत्रातील एकूण ८०,७२५ उद्योगांपैकी २३ टक्के वायू प्रदूषण प्रवण, २१ टक्के जलप्रदूषण प्रवण तर आठ टक्के घातक टाकाऊ पदार्थ निर्माण करणारे होते. सन २०१२-१३ मध्ये जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४ च्या कलम ३३ अ अंतर्गत १,१३१ उद्योगांना याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

१०.१०७ सामायिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्र या योजनेंतर्गत लघु औद्योगिक समुहातील कारखान्यांना सांडपाणी प्रक्रिया करणे, घातक घनकच-यावर प्रक्रिया करणे आणि विल्हेवाट लावण्यासाठी सढळ आर्थिक मदत देऊन प्रोत्साहित केले जाते. सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे २६ औद्योगिक वसाहतीतील ७,९२७ कारखान्यांसाठी कार्यान्वीत करण्यात आले आहेत. ३१ मार्च, २०१३ अखेर प्रति दिवस २००.२ दशलक्ष लिटर्स दूषित सांडपाणी निर्माण झाले व त्यावर प्रक्रिया करण्यात आली.

## घातक कचरा

१०.१०८ राज्यातील घातक कचऱ्याचे व्यवस्थापन आणि संनियंत्रण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केले जाते. राज्यात ३१ मार्च, २०१३ रोजी ६,६५६ घातक कचरा निर्माण करणारे कारखाने आहेत. राज्यात ठाणे जिल्ह्यातील तळोजा व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे ठाणे खाडी किनारपट्टीवरील औद्योगिक क्षेत्र, पुणे जिल्ह्यातील रांजणगाव आणि नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी या चार प्रमुख ठिकाणी घातक टाकाऊ कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी सामाईक सुविधा असणाऱ्या चार प्रमुख केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. निर्माण झालेला घातक कचरा तक्ता १०.५२ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता १०.५२ निर्माण झालेला घातक कचरा**

(लाख मे.टन)

| वर्ष | कचऱ्याचा प्रकार | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | जमिनीत पुरण्याजोगे | पुन: प्रक्रिया करण्याजोगे | भस्मीकरण करण्याजोगे | |
| २०१०-११ | १.१९ | ०.७६ | ०.२३ | २.१८ |
| २०११-१२ | ३.१३ | ०.९९ | ०.३७ | ४.४९ |
| २०१२-१३ | २.२९ | ०.०० | ०.४५ | २.७४ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

१०.१०९ घातक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली गेली आहे याची खात्री करण्यासाठी घातक कचरा वाहून नेणाऱ्या वाहनांमध्ये ग्लोबल पोजिशनिंग सिस्टम (जीपीएस) लावणे राज्याने अनिवार्य केले आहे. आतापर्यंत १०२ घातक कचरा वाहतूकदारांनी ही प्रणाली आपल्या वाहनांवर स्थापित केली आहे.

## ई-कचरा

१०.११० ई-कचऱ्याचे व्यवस्थापन ही जागतिक स्तरावरील चिंतेची बाब बनली आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने परिपूर्ण तंत्रज्ञान असलेल्या २० उद्योगांना ई-कचरा पुन:प्रक्रियेसाठी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने अधिकृत केले असून त्यांची कचरा पुन:प्रक्रिया/मोडतोड क्षमता प्रतिवर्ष २४,३२० मे. टन इतकी आहे. मंडळाने प्रतिवर्ष ०.५ लक्ष टन एवढा ई-कचरा निर्माण होण्याचा अंदाज वर्तविला असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासोबत सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर ई-कचरा पुन:प्रक्रिया सुविधा केंद्र सुरु करण्याचे निश्चित केले आहे.

## जैव-वैद्यकीय कचरा

१०.१११ राज्यात एकूण ३७ सामुहिक जैव-वैद्यकीय कचरा प्रकिया व विल्हेवाट केंद्रे असून त्यापैकी ३० केंद्रे भस्मीकरण पध्दतीवर व उर्वरीत केंद्रे जमिनीत खोलवर पुरण्याच्या पद्धतीवर आधारित आहेत. सन २०११-१२ मध्ये प्रति दिवशी सुमारे ३७,९८१ किलो इतक्या जैव-वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली.

## पर्यावरणविषयक अनुमती

१०.११२ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत केंद्र शासनाने महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण २००८, राज्य स्तर पर्यावरण प्रभाव मूल्यमापन प्राधिकरण २००८ आणि पर्यावरणविषयक मान्यता प्रदान करण्यासाठी राज्य स्तर तज्ञ मूल्यांकन समिती गठीत केल्या आहेत.

१०.११३ सन २००८ ते २०१३ या कालावधीत पर्यावरणविषयक अनुमतीसाठी १,७०० प्रस्ताव बांधकाम क्षेत्रातून, ४०० उद्योग क्षेत्रातून आणि ३,००० इतर क्षेत्रातून (विद्युत संयंत्र, खाणकाम, सिंचन, इ.) प्राप्त झाले होते. राज्याने या प्रस्तावांचा जलद निपटारा करण्याकरिता तीन राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन समित्या गठीत केल्या आहेत.

## राष्ट्रीय नदी कृती योजना

१०.११४ राष्ट्रीय नदी कृती आराखड्याचा मुख्य उद्देश देशातील प्रमुख नद्यांचे प्रदूषण कमी करणे आणि नदीच्या काठावरील शहरांमधून निघणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन जल प्रदूषण कमी करणे हा आहे. राष्ट्रीय नदी कृती योजनेंतर्गत ७० टक्के निधी केंद्र शासनाकडून व उर्वरित ३० टक्के निधी संबंधित राज्य शासन / महानगरपालिका / नगरपालिका यांचेकडून उपलब्ध करुन दिला जातो. पैठण, वाई, मलकापूर, नागपूर, पुणे, मालेगांव व इचलकरंजी शहरांकरिता अंदाजित किंमत ₹ ५,९६५ लाख खर्चाचे प्रस्ताव केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाकडे सादर करण्यात आले आहेत.

## सरोवर संवर्धन योजना

१०.११५ सरोवरांची अवनती रोखणे हा या योजनेचा उद्देश आहे. राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून त्यामध्ये केंद्र शासनाचा ७० टक्के तर राज्य शासनाचा ३० टक्के इतका वाटा आहे.या योजनेअंतर्गत १४ तलावांचा समावेश करण्यात आला आहे. एकूण मंजूर निधी ₹ २६.२६ कोटी असून त्यापैकी ₹ २४.८७ कोटी निधी खर्च झाला आहे. कोल्हापूर येथील रंकाळा तलाव संवर्धनाकरिता केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाने ₹ ४० लाख अतिरिक्त निधी वितरीत केला आहे.

१०.११६ राज्य शासनदेखील अवनती झालेल्या सरोवरांच्या संवर्धनाकरिता निधी उपलब्ध करुन देते. राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत २१ तलावांचा समावेश करण्यात आला आहे. सदर योजनेसाठी जुलै, २०१३ अखेरपर्यंत ₹ ७१.५१ कोटी निधी मंजूर करण्यात आला तर ₹ १३.६२ कोटी निधी खर्च झाला आहे.

# सामाजिक न्याय

१०.११७ 'सामाजिक न्याय' म्हणजेच समाजातील सर्व घटकांना, विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्यांक, नि:शक्त जेष्ठ नागरीक व मादक द्रव्य दुरुपयोग पिडित यांना न्याय्य वागणूक आणि सामाजिक लाभांमध्ये समान वाटा मिळणे हा होय. सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट हे सर्वसाधारणपणे मानव विकासाच्या धर्तीवर आहे. शैक्षणिक तसेच सामाजिक व आर्थिक विकासातील प्रत्येक टप्प्यावर व स्तरांवर दुर्बल घटकांना समाजातील इतर घटकांच्या समान पातळीवर आणण्यासाठी शासनाने विविध विकास कार्यक्रम हाती घेतले आहेत. राज्य शासन अनुसूचित जातींकरिता 'अनुसूचित जाती उपयोजना' व अनुसूचित जमातींकरिता 'आदिवासी उपयोजना' अशा दोन स्वतंत्र उपयोजना तयार करते. सर्वसाधारण योजनांतर्गत उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या निधी व लाभांव्यतिरिक्त, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजनांद्वारे त्या समुदायातील लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो.

## अनुसूचित जाती उपयोजना

१०.११८ बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ₹ २८,०५० कोटी नियतव्यय निश्चित केला असून या नियतव्ययाची राज्याच्या एकूण नियतव्ययाशी टक्केवारी १०.२ इतकी आहे. सन २०१३-१४ करिता अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ₹ ४,९९८ कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करुन दिला असून, त्यापैकी राज्यस्तरीय योजनांकरिता ₹ ३,३९८ कोटी (६८ टक्के) तर जिल्हास्तरीय योजनांकरिता ₹ १,६०० कोटी (३२ टक्के) इतका आहे. सामाजिक व सामुहिक सेवा क्षेत्रावरील खर्चाचा (सन २०१३-१४ मध्ये ८७ टक्के) वाटा मोठा आहे. या क्षेत्राची शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण, पाणीपुरवठा, महिला व बालविकास, मागासवर्गीयांचे कल्याण, इत्यादी प्रमुख उपक्षेत्रे आहेत. सन २०१२-१३ मध्ये अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत एकूण १७२ योजना (८९ राज्यस्तरीय व ८३ जिल्हास्तरीय) राबविण्यात आल्या असून, सन २०१३-१४ मध्ये एकूण १९७ योजनांची (११४ राज्यस्तरीय व ८३ जिल्हास्तरीय) अंमलबजावणी करण्यात येत आहे. अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत नियतव्यय व खर्च तक्ता १०.५३ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.५३ अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | १२ व्या पंचवार्षिक योजनेचा नियतव्यय | २०१२-१३ | | | २०१३-१४ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नियतव्यय | खर्च (प्रत्यक्ष) | नियतव्ययाशी खर्चाची टक्केवारी | नियतव्यय | खर्च (अंदाजित) |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **१७,८२६.००** | **२,९९०.००** | **१,९२०.६१** | **६४.२** | **३,३९७.६८** | **१,३५९.४६** |
| कृषि व संलग्न सेवा | ५१९.०६ | ८१.२३ | ३५.४२ | ४३.६ | ५९.०० | ३१.०६ |
| ग्राम विकास | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.० | २५.०७ | ६.२२ |
| उद्योग व खनिजे | २८७.५५ | ४५.०० | ३.०२ | ६.७ | १६.०६ | १६.०० |
| सामान्य आर्थिक सेवा | ३८३.४० | ६०.०० | ४८.०० | ८०.० | ६०.०० | ४५.३९ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | १६,६३५.९९ | २,८०३.७७ | १,८३४.१७ | ६५.४ | ३,२२७.५५ | १,२५८.४३ |
| सामान्य सेवा | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.० | १०.०० | २.३६ |
| **ब) जिल्हास्तरीय योजना** | **१०,२२४.००** | **१,६००.००** | **१,३६३.५५** | **८५.२** | **१,६००.००** | **९४६.९८** |
| कृषि व संलग्न सेवा | १,६१९.४९ | २५३.४४ | २०६.२३ | ८१.४ | २४०.२७ | १७८.०५ |
| ग्राम विकास | १४५.६५ | २२.७९ | १३.०३ | ५७.२ | ०.०० | ०.०० |
| उर्जा | ३४४.७३ | ५३.९५ | ४३.१६ | ८०.० | ७१.१३ | ०.०० |
| उद्योग व खनिजे | १०२.१९ | १५.९९ | १०.५४ | ६५.९ | १३.५९ | ५.४९ |
| वाहतूक व दळणवळण | २३०.७८ | ३६.१२ | २५.१२ | ६९.६ | ३५.०९ | १६.४५ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | ७,७८१.१६ | १,२१७.७१ | १,०६५.४७ | ८७.५ | १,२३९.९२ | ७४६.९९ |
| **एकूण (अ + ब)** | **२८,०५०.००** | **४,५९०.००** | **३,२८४.१६** | **७१.६** | **४,९९७.६८** | **२,३०६.४४** |

*आधार* : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन

## आदिवासी उपयोजना

१०.११९ राज्यातील आदिवासी लोकसंख्या ही धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक व ठाणे या पश्चिमेकडील डोंगरी जिल्ह्यांमध्ये (सह्याद्री प्रदेश) आणि चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ या पूर्वेकडील जंगलव्याप्त जिल्ह्यांमध्ये (गोंडवाना प्रदेश) मोठ्या प्रमाणात केंद्रित आहे. भारत सरकारच्या निर्देशानुसार राज्यातील आदिवासी समाजाच्या घनतेवर आधारित २४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, ४३ सुधारित क्षेत्र विकास खंड (माडा) व २४ लघु सुधारित क्षेत्र विकास खंड (मिनीमाडा) तयार करण्यात आले आहेत. आदिवासी उपयोजनेअंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, माडा क्षेत्र व मिनीमाडा क्षेत्रांमध्ये तसेच आदिवासी क्षेत्राअंतर्गत व क्षेत्राबाहेर असणाऱ्या आदिवासी समाजाला मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

१०.१२० आदिवासी उपयोजनेकरिता बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ₹ २४,४७५ कोटी इतका नियतव्यय निश्चित केलेला असून तो राज्याच्या एकूण नियतव्ययाच्या ८.९ टक्के आहे. सन २०१३-१४ साठी ₹ ४,३६० कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करुन दिला असून, त्यापैकी राज्यस्तरीय योजनांकरिता ₹ १,९५७ कोटी (४५ टक्के) तर जिल्हास्तरीय योजनांकरिता ₹ २,४०३ कोटी (५५ टक्के) इतका नियतव्यय आहे. सन २०१२-१३ मध्ये आदिवासी उपयोजनेअंतर्गत एकूण ४०५ योजना (१०० राज्यस्तरीय व ३०५ जिल्हास्तरीय) राबविण्यात आल्या असून, सन २०१३-१४ मध्ये एकूण ४०२ योजनांची (१०६ राज्यस्तरीय व २९६ जिल्हास्तरीय) अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०१३-१४ च्या खर्चात सामाजिक व सामुहिक सेवांचा (६४ टक्के) त्या खालोखाल वाहतूक व दळणवळण (१३ टक्के) आणि कृषि व संलग्न सेवा (१० टक्के) यांचा प्रमुख वाटा होता. आदिवासी उपयोजनेअंतर्गत नियतव्यय व खर्च तक्ता १०.५४ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.५४ आदिवासी उपयोजनेअंतर्गत नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | १२ व्या पंचवार्षिक योजनेचा नियतव्यय | २०१२-१३ | | | २०१३-१४ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नियतव्यय | खर्च (प्रत्यक्ष) | नियतव्ययाशी खर्चाची टक्केवारी | नियतव्यय | खर्च (अंदाजित) |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **९,७९०.००** | **१,७८८.९०** | **१,७२७.९९** | **९६.६** | **१,९५७.४८** | **२,०२३.८९** |
| कृषि व संलग्न सेवा | ४१८.८० | ८०.०४ | ५४.४२ | ६८.० | ७१.८८ | २७४.७५ |
| ग्राम विकास | ०.०० | ०.०० | १०.०० | ०.० | २१.७७ | ३१.२० |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | ६०६.९६ | ९५.०० | १२९.२६ | १००.० | ९५.०० | १२४.६० |
| उर्जा | ६३.९५ | १०.०० | ८.९२ | ८९.२ | ८.०० | ८.०० |
| उद्योग व खनिजे | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.० | ०.०७ | ०.०७ |
| वाहतूक व दळणवळण | ६०७.४९ | ९५.०० | ४८.७० | ५१.३ | २००.०० | ३२५.०० |
| सामान्य आर्थिक सेवा | १२५.०० | ५.०० | ४.०० | ८०.० | १५.०० | १५.०० |
| सामाजिक व सामुहिक सेवा | ७,९५१.३० | १,५००.८६ | १,४७२.७१ | ९८.१ | १,५४५.७७ | १,२४५.२६ |
| इतर कार्यक्रम | १६.५० | ३.०० | ०.०० | ०.० | ०.०० | ०.०० |
| **ब) जिल्हास्तरीय योजना** | **१४,६८५.००** | **२,२१६.१०** | **१,६२५.७७** | **७३.४** | **२,४०३.००** | **२,१२२.५०** |
| कृषि व संलग्न सेवा | १,०७६.१७ | १७०.०३ | १९६.२१ | १००.० | १९२.०२ | १७७.५१ |
| ग्राम विकास | ६३८.४२ | ११०.८३ | ५७.४२ | ५१.८ | ११४.०९ | ७९.४९ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | ९९९.११ | १४६.८३ | १२३.७० | ८४.३ | १४०.५९ | १२१.२७ |
| उर्जा | ४०८.२६ | ७०.४३ | ४६.०९ | ६५.४ | ७४.६० | ६८.२१ |
| उद्योग व खनिजे | ४.६८ | ०.७९ | ०.५९ | ७४.७ | १.१७ | १.०९ |
| वाहतूक व दळणवळण | १,५५५.४४ | २६५.१५ | २३०.३२ | ८६.९ | २४०.८४ | २२८.३४ |
| सामान्य आर्थिक सेवा | ६५.६८ | ११.३२ | ८.२९ | ७३.२ | ७.५५ | ६.५१ |
| सामाजिक व सामुहिक सेवा | ९,९३७.२५ | १,४४०.७० | ९६३.१४ | ६६.९ | १,६३२.१६ | १,४४०.०८ |
| **एकूण (अ + ब)** | **२४,४७४.९९** | **४,००५.००** | **३,३५३.७६** | **८३.७** | **४,३६०.४८** | **४,१४६.३८** |

*आधार:* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

## विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागासवर्गीयांचे कल्याण

१०.१२१ विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग या समाजघटकांच्या कल्याणार्थ शासनाने स्वतंत्र संचालनालय स्थापित केले आहे. या समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी विविध विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. सन २०१२-१३ मध्ये ₹ ३२८.९९ कोटी नियतव्यय उपलब्ध केला असून त्यापैकी ₹ २८७.५३ कोटी निधी खर्च झाला. सन २०१३-१४ करिता ₹ २७१.८९ कोटी नियतव्यय उपलब्ध करण्यात आला.

## नि:शक्त व्यक्तींचे कल्याण

१०.१२२ नि:शक्त व्यक्तींच्या क्षमता ओळखणे, कौशल्य विकास, समान संधी देणे, अधिकारांचे रक्षण करून सक्षमीकरण करणे, त्याचबरोबर त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी राज्य शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. शासन सेवेत गट क व ड मधील पदावर नियुक्ती तसेच सेवांतर्गत बढतीमध्ये नि:शक्त व्यक्तींना तीन टक्के आरक्षण दिले जाते. सरकारी नोकऱ्यांमध्ये नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षेपर्यंत शिथिल करण्यात आली आहे. सन २०१२-१३ मध्ये ₹ ८.७५ कोटी नियतव्यय उपलब्ध केला असून त्यापैकी ₹ ६.७५ कोटी निधी खर्च झाला. सन २०१३-१४ करिता ₹ ८.७५ कोटी नियतव्यय उपलब्ध करण्यात आला.

## अल्पसंख्यांक विकास

१०.१२३ राज्य शासनामार्फत अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी सन २००८ मध्ये स्वतंत्र अल्पसंख्यांक विकास विभाग स्थापन करण्यात आला. बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये अल्पसंख्यांक विकास विभागाच्या विविध योजनांकरिता ₹ १,६८५ कोटी इतका नियतव्यय निश्चित केला आहे. सन २०१२-१३ मध्ये ₹ २७५ कोटी नियतव्यय उपलब्ध केला असून त्यापैकी ₹ २२६ कोटी निधी खर्च झाला. सन २०१३-१४ करिता ₹ ३६२.०५ कोटी नियतव्यय उपलब्ध करण्यात आला.

१०.१२४ सच्चर समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने व मदरशांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण देण्याच्या दृष्टीने, शासनाने डॉ. झाकिर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना राबविण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील नोंदणीकृत मदरसे खालील तीन उद्देशांसाठी वित्तीय सहाय्य मिळण्यास पात्र राहतील.

- मदरशांमध्ये पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अनुदान
- मदरशांमध्ये आधुनिक विषय शिकवणाऱ्या शिक्षकांच्या वेतनासाठी अनुदान
- मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या मदरशांमधील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी अनुदान

सन २०१३-१४ मध्ये २०० पात्र मदरशांना अनुदान देण्यासाठी ₹ १० कोटी इतक्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

# सामाजिक सुरक्षेच्या महत्त्वपूर्ण योजना

## संजय गांधी निराधार अनुदान योजना

१०.१२५ वय वर्षे ६५ खालील निराधार व्यक्ति, अनाथ मुले, सर्व प्रकारच्या नि:शक्त व्यक्ति, क्षयरोग, कर्करोग, एड्स व कुष्ठरोग यांसारख्या दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्ति, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवांसह निराधार विधवा, घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळणाऱ्या निराधार महिला, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून सुटका केलेल्या महिला, यांना ही योजना लागू आहे. या योजनेखाली ₹ २१,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पात्र कुटुंबातील एक लाभार्थी असल्यास दरमहा ₹ ६०० तर दोन किंवा त्यापेक्षा अधिक लाभार्थी असल्यास दरमहा ₹ ९०० इतके आर्थिक सहाय्य दिले जाते .

## श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना

१०.१२६ या योजनेअंतर्गत ६५ वर्षे व त्यावरील निराधार व्यक्ति ज्यांचे वार्षिक उत्पन्न ₹ २१,००० पेक्षा कमी असलेल्या व दारिद्र्य रेषेखालील पात्र कुटुंबाच्या यादीमध्ये नांव समाविष्ट नसलेल्या व्यक्तींना शासनाकडून दरमहा ₹ ६०० निवृत्तीवेतन देण्यात येते. तसेच ६५ वर्षे व त्यावरील दारिद्र्य रेषेखालील निराधार व्यक्तींनादेखील राज्य शासनाकडून दरमहा ₹ ४०० निवृत्तीवेतन देण्यात येते.

## इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना

१०.१२७ इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील ६५ वर्षे व त्यावरील निराधार व्यक्ति पात्र ठरतात. या व्यक्तींना दरमहा एकूण ₹ ६०० निवृत्तीवेतन देण्यात येते, त्यापैकी केंद्र शासनाकडून या योजनेखाली दरमहा ₹ २०० व राज्य शासनाकडून श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेखाली दरमहा ₹ ४०० निवृत्तीवेतन देण्यात येते.

## इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना

१०.१२८ दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील ४० ते ६४ वर्षे या वयोगटातील विधवा या योजनेसाठी पात्र असून इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून दरमहा ₹ २०० व राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत दरमहा ₹ ४०० इतकी रक्कम मिळते.

## इंदिरा गांधी राष्ट्रीय नि:शक्त निवृत्तीवेतन योजना

१०.१२९ या योजनेखाली ८० टक्के व अधिक नि:शक्त असलेल्या १८ ते ६४ वर्षे या वयोगटातील आणि दारिद्र्य रेषेखालील यादीमध्ये समाविष्ट असलेली व्यक्ति केंद्र शासनाकडून इंदिरा गांधी राष्ट्रीय नि:शक्त निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत दरमहा ₹ २०० आणि राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत दरमहा ₹ ४०० इतकी रक्कम मिळण्यास पात्र ठरतात.

## राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना

१०.१३० या योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील १८ ते ५९ वर्षे वयोगटातील प्रमुख कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, बाधित कुटुंबास एक रकमी ₹ २०,००० चे सहाय्य देण्यात येते.

## आम आदमी विमा योजना

१०.१३१ ही योजना ग्रामीण भागातील १८ ते ५९ वर्षे वयोगटातील भूमिहीन मजूरांसाठी आहे. ₹ २०० इतका प्रति सदस्य वार्षिक हप्ता भरण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्रत्येकी ५० टक्के अनुदान स्वरुपात दिले जातात. ही योजना भारतीय आयुर्विमा महामंडळामार्फत राबविण्यात येते. नैसर्गिक मृत्यू झाल्यास आश्वासित रक्कम ₹ ३०,००० इतकी आहे आणि अपघात झाल्यास शारिरीक हानीच्या तीव्रतेनुसार ₹ ३७,५०० ते ₹ ७५,००० च्या दरम्यान लाभ मिळतो. याशिवाय, विमा संरक्षित मृत व्यक्तीच्या इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या दोन मुलांना दरमहा प्रत्येकी ₹ १०० इतकी शिष्यवृत्ती मिळते.

महत्त्वाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभार्थी व झालेला खर्च तक्ता १०.५५ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.५५ महत्वाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभार्थी व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| योजनेचे नांव | २०१२-१३ | | २०१३-१४ + | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या (लाखात) | खर्च | लाभार्थ्यांची संख्या (लाखात) | खर्च |
| संजय गांधी निराधार अनुदान योजना | ५.६७ | ४४२.९४ | ६.६६ | ३९५.०९ |
| श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना | १३.६० | ६६१.२२ | १५.२६ | ६८२.५२ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना | १०.९१ | २६२.१० | ११.१८ | १९२.९१ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना | ०.२५ | ४.९४ | ०.३१ | ५.४४ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना | ०.०४ | ०.९१ | ०.०५ | १.३३ |
| राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना | ०.०९ | १५.७८ | ०.०८ | १६.९२ |
| आम आदमी विमा योजना | ३३.०० | ३३.९७ | ४६.५९ | ५.४० |

*आधार:* सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

# क्षेत्र विकास कार्यक्रम

१०.१३२ राज्य शासन खालीलप्रमाणे विविध क्षेत्र विकास कार्यक्रम राबवित आहे.

## नागरी दलित वस्ती सुधार योजना

१०.१३३ नागरी क्षेत्रातील मागासवर्गीय व नवबौध्दांची संख्या जास्त असलेल्या वस्त्यांसाठी राज्य शासन सन १९९५-९६ पासून ही योजना राबवित आहे. या योजनेअंतर्गत जोडरस्ता बांधणी, गटारे, पिण्याच्या पाण्यासाठी सुविधा, दवाखाने, पथदिवे, सार्वजनिक स्वच्छतागृहे व शौचालये, समाजमंदिर, वाचनालय, व्यायामशाळा, सांस्कृतिक केंद्र, इत्यादी विकास कामे हाती घेतली जातात.

## नागरी आदिवासी वस्ती सुधार योजना

१०.१३४ नागरी क्षेत्रातील आदिवासींची संख्या जास्त असलेल्या वस्त्यांसाठी राज्य शासन सन २००७ पासून ही योजना राबवित आहे. या योजनेअंतर्गत जोडरस्ता बांधणी, गटारे, पिण्याच्या पाण्यासाठी सुविधा, दवाखाने, पथदिवे, सार्वजनिक स्वच्छतागृहे व शौचालये, समाजमंदिर, वाचनालय, व्यायामशाळा, सांस्कृतिक केंद्र, इत्यादी विकास कामे हाती घेतली जातात.

## ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम

१०.१३५ आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रामधील परंतु, मिनीमाडा/माडा पॉकेटमध्ये समावेश नसलेल्या छोटया आदिवासी वस्त्या तसेच ५० टक्क्यांच्या आसपास आदिवासी लोकसंख्या असलेल्या वस्त्या/गावांमध्ये राज्य शासन सन २००४-०५ पासून ही योजना राबवित आहे. या योजनेअंतर्गत जोड/अंतर्गत रस्ता बांधणी, गटारे, पिण्याच्या पाण्यासाठी सुविधा, रोगनिदान शिबिरे, पथदिवे, सार्वजनिक स्वच्छतागृहे व शौचालये, समाजमंदिर, वाचनालय, व्यायामशाळा, सांस्कृतिक केंद्र, घरकुल बांधकाम, इत्यादी विकास कामे हाती घेतली जातात.

## तांडा/वस्ती सुधार योजना

१०.१३६ ग्रामीण भागातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग बहुल वाडया/वस्त्यांसाठी राज्य शासन सन २००३-०४ पासून ही योजना राबवित आहे. या योजनेअंतर्गत जोड/अंतर्गत रस्ता बांधणी, गटारे, पिण्याच्या पाण्यासाठी सुविधा, विद्युतीकरण, सार्वजनिक स्वच्छतागृहे व शौचालये, वाचनालय, इत्यादी विकास कामे घेतली जातात.

## अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रविकास कार्यक्रम

१०.१३७ अल्पसंख्यांकांची १० टक्के लोकसंख्या असलेल्या महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत क्षेत्रात राज्य शासन सन २००८-०९ पासून ही योजना राबवित आहे. या योजनेअंतर्गत जोडरस्ता बांधणी, गटारे, पिण्याच्या पाण्यासाठी सुविधा, अंगणवाडी/बालवाडी, पथदिवे, सार्वजनिक स्वच्छतागृहे व शौचालये, समाजमंदिर, अंत्यविधीच्या जागेची दुरुस्ती, इत्यादी विकास कामे घेतली जातात.

## अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रविकास कार्यक्रम

१०.१३८ अल्पसंख्यांकांची किमान १०० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायत क्षेत्रात राज्य शासनाने सन २०१३-१४ पासून ही योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत जोडरस्ता बांधणी, गटारे, पिण्याच्या पाण्यासाठी सुविधा, अंगणवाडी/बालवाडी, पथदिवे, सार्वजनिक स्वच्छतागृहे व शौचालये, समाजमंदिर, अंत्यविधीच्या जागेची दुरुस्ती, इत्यादी विकास कामे घेतली जातात.

क्षेत्र विकास कार्यक्रमांचे नियतव्यय व झालेला खर्च तक्ता १०.५६ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.५६ क्षेत्र विकास कार्यक्रमांचे नियतव्यय व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| योजनेचे नांव | २०१२-१३ | | २०१३-१४+ | |
|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च |
| नागरी दलित वस्ती सुधार योजना @ | ४०३.२० | ३२७.५५ | ४९३.५५ | १५६.४७ |
| नागरी आदिवासी वस्ती सुधार योजना @ | ५.०० | ४.०० | ६.०० | ०.०० |
| ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम # | २२६.०३ | २१४.१५ | २४५.२४ | ०.०० |
| तांडा/वस्ती सुधार योजना ++ | ३७.९२ | ३०.३४ | ३०.०० | ०.०० |
| अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रविकास कार्यक्रम $ | १८.०० | १४.४० | २५.०० | ७.७५ |
| अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रविकास कार्यक्रम $ | - | - | २६.०० | ०.०० |

*आधार* : @ नगर विकास विभाग, # आदिवासी विकास विभाग ++ सामाजिक न्याय विभाग $ अल्पसंख्यांक विकास विभाग + डिसेंबरपर्यंत

## विकास महामंडळे

१०.१३९ समाजातील आर्थिकदृष्टया मागास वर्गाच्या आर्थिक विकासास चालना देण्यासाठी राज्य शासनाने खालील महामंडळांची स्थापना केली असून त्यांच्यामार्फत विविध योजना राबविल्या जातात.

## संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

१०.१४० चर्मकार समाजाच्या विकासासाठी हे महामंडळ स्थापन करण्यात आले असून, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळाच्या (एनएसएफडीसी) विविध योजना राबविण्यासाठी या महामंडळास राज्याची वाहिनीकृत यंत्रणा म्हणून प्राधिकृत केले आहे. महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ₹ ७३.२१ कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ २८१.२१ कोटी आहे, त्यात राज्य शासनाचा १०० टक्के हिस्सा आहे. संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या महत्वाच्या योजनांची प्रगती तक्ता १०.५७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५७ संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या महत्वाच्या योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१२-१३ | | २०१३-१४ + | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| वीस टक्के बीज भांडवल | २०७ | १८.१४ | ९२ | ७.५० |
| मुदत कर्ज | ७०० | ६०.६० | ३७८ | ३१.९० |
| पन्नास टक्के अनुदान | ६२४ | ६२.२८ | २९६ | २९.४६ |
| सुक्ष्म पतपुरवठा | १,६६३ | १६६.३० | ९१५ | ९१.५० |
| *महिला समृध्दी योजना* | १६७ | १६.७० | २८४ | २८.४० |
| *महिला किसान योजना* | ८७ | ८.७० | ५२ | ४.९० |

*आधार* : संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित

१०.१४१ राज्य शासनाने मातंग समाजातील १२ उपजातींच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची स्थापना केली आहे. महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ₹ ३०० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ३३८.९१ कोटी आहे, त्यापैकी राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि केंद्र शासनाचा हिस्सा ४९ टक्के इतका आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ हे एनएसएफडीसी ची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणूनही काम करते. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या महत्वाच्या योजनांची प्रगती तक्ता १०.५८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५८ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या महत्वाच्या योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१२-१३ | | २०१३-१४ + | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| बीज भांडवल योजना | ८२२ | ६०३.३२ | ५५२ | ७१४.०० |
| अनुदान योजना | ३,४३२ | ५११.२५ | १,२०९ | ७५९.७४ |
| एनएसएफडीसी योजना @ | ६८१ | ३९४.२३ | ५,८०३ | २,३९१.४४ |

*आधार* : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

@ मुदत कर्ज, महिला समृध्दी, सुक्ष्म पतपुरवठा व शैक्षणिक कर्ज योजना.

## महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित

१०.१४२ अनुसूचित जाती आणि नवबौध्दांच्या आर्थिक विकासासाठी राज्य शासनाने महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाची स्थापना केली. सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५०० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ६११.६४ कोटी आहे, त्यापैकी राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि केंद्र शासनाचा हिस्सा ४९ टक्के इतका आहे. या महामंडळामार्फत मार्जिन मनी योजना, विशेष केंद्र सहाय्यित योजनेअंतर्गत योजना तसेच एनएसएफडीसी व राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ (एनएसकेएफडीसी) यांच्या योजना राबविल्या जातात. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या महत्वाच्या योजनांची प्रगती तक्ता १०.५९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५९ महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१२-१३ | | २०१३-१४ + | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| बीज भांडवल योजना | १,४६१ | ५७६.४३ | ८२० | ३३८.९७ |
| पन्नास टक्के अनुदान योजना | ९,०६३ | ९०६.७७ | ९४६ | ९४.४३ |
| एनएसएफडीसी योजना @ | २,४७२ | ५५८.०० | १,३१९ | २६८.८१ |
| एनएसकेएफडीसी योजना @ | १,०२१ | १,४८६.०३ | १,२०४ | १,३५५.७७ |

*आधार* : महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

@ मुदत कर्ज, महिला समृध्दी, सूक्ष्म पतपुरवठा व शैक्षणिक कर्ज योजना.

## शबरी आदिवासी  वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.१४३     आदिवासी समाजाच्या आर्थिक कल्याणासाठी राज्य शासनाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना केली आहे.  सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २०० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ७१.३६ कोटी आहे, त्यापैकी राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि केंद्र शासनाचा हिस्सा ४९ टक्के इतका आहे. महामंडळामार्फत राष्ट्रीय आदिवासी  वित्त व विकास महामंडळाच्या (एनएसटीएफडीसी) विविध योजना राबविल्या जातात.  शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची प्रगती तक्ता  १०.६० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६०    शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नाव | २०१२-१३ | | २०१३-१४+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी संख्या | वितरित कर्जे | लाभार्थी संख्या | वितरित कर्जे |
| एनएसटीएफडीसी योजना | ८२ | २८९.४४ | २९ | १६३.१९ |
| एनएसटीएफडीसी महिला सबलीकरण योजना | १७ | ७.०० | ० | ०.०० |
| शबरी महामंडळाच्या स्वत:च्या योजना | ९ | ८.६५ | ११ | ११.३८ |

*आधार* : शबरी आदिवासी  वित्त व विकास महामंडळ  मर्यादित .                + डिसेंबरपर्यंत

## वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित

१०.१४४     विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आर्थिक उन्नतीसाठी व विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.  या महामंडळास राष्ट्रीय मागासवर्ग व वित्तीय विकास महामंडळ (एनबीसीएफडीसी) कडील योजनांच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील वाहिनीकृत यंत्रणा म्हणून प्राधिकृत करण्यात आले आहे. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २०० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ १७७.६८ कोटी आहे, त्यात राज्य शासनाचा १०० टक्के हिस्सा आहे. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची प्रगती तक्ता १०.६१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६१    वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची प्रगती**

(₹  लाख)

| योजनेचे नांव | २०१२-१३ | | २०१३-१४ + | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| वसंतराव नाईक महामंडळाच्या स्वत:च्या योजना $ | ६,६२८ | ३,२०० | २,३०४ | १,४४० |
| एनबीसीएफडीसी योजना @ | ६२० | २०० | ० | ० |

*आधार* : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित                + डिसेंबरपर्यंत

$  मार्जिन मनी, थेट कर्ज, अनुदान योजना, इत्यादी

@  मुदत कर्ज, महिला समृध्दी, सुक्ष्म पतपुरवठा व शैक्षणिक कर्ज योजना.

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित

१०.१४५     राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २५० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ७२.४६ कोटी आहे, त्यात राज्य शासनाचा १०० टक्के हिस्सा आहे. हे महामंडळ राष्ट्रीय मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाची (एनबीसीएफडीसी) राज्यातील वाहिनीकृत यंत्रणा म्हणूनही कार्य करते. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या महत्वाच्या योजनांची प्रगती तक्ता १०.६२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६२ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या महत्वाच्या योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नाव | २०१२-१३ | | २०१३-१४ + | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| वीस टक्के बीज भांडवल | ३६३ | १४६.३१ | २१६ | २०४.८७ |
| मुदत कर्ज | ७५४ | १,१०२.६५ | ४५७ | ६६२.६६ |
| मार्जिन मनी | १५ | २७.७८ | १२ | १७.८१ |
| सुक्ष्म पतपुरवठा | ० | ० | ० | ० |
| महिला समृद्धी | ० | ० | ५० | ५.८१ |
| स्वर्णिमा | १३ | ७.०० | २१ | १३.२५ |
| शैक्षणिक कर्ज | १६८ | ४७.८१ | ३८२ | १२६.५९ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित + डिसेंबरपर्यंत

## महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.१४६ अपंगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्यात महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. हे महामंडळ राष्ट्रीय अपंग वित्त व विकास महामंडळाची (एनएचएफडीसी) राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ३२.०९ कोटी आहे, त्यात राज्य शासनाचा १०० टक्के हिस्सा आहे. या महामंडळामार्फत महिला समृद्धी, सूक्ष्म पतपुरवठा, मुदत कर्ज, शैक्षणिक कर्ज, थेट कर्ज, कृषि संजीवनी, इत्यादी योजना राबविल्या जातात. महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची प्रगती तक्ता १०.६३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६३ महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१२-१३ | | २०१३-१४ + | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळाच्या स्वत:च्या योजना | ४४५ | ८९.०० | १४२ | २८.४० |
| एनएचएफडीसी योजना @ | ४०१ | ४८२.६१ | ५८६ | ६५३.९३ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित . + डिसेंबरपर्यंत

@ मुदत कर्ज, महिला समृध्दी, सुक्ष्म पतपुरवठा व कृषि संजीवनी योजना.

## मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित

१०.१४७ राज्य शासनामार्फत अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. सदर महामंडळ अल्पसंख्यांकांना स्वयंरोजगार, शिक्षण, इत्यादी साठी कर्ज पुरविण्याचे काम करते. सध्या या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५०० कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ २६८.१९ कोटी आहे, त्यात राज्य शासनाचा १०० टक्के हिस्सा आहे. हे महामंडळ राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाची (एनएमडीएफसी) राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणूनही कार्य करते. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या महत्वाच्या योजनांची प्रगती तक्ता १०.६४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६४ मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादितमार्फत राबविल्या जाणाऱ्या महत्वाच्या योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजनेचे नांव | २०१२-१३ | | २०१३-१४ + | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| थेट कर्ज | ० | ० | २८ | १२.६६ |
| शैक्षणिक कर्ज | १,१८१ | ७४९.८९ | २,४७० | १,५६९.२० |

*आधार* : मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित + मार्चपर्यंत

* * * * *

## परिशिष्ट १०.१

## राज्यनिहाय संयुक्त शिक्षण विकास निर्देशांक
## सर्व शाळा : सर्व व्यवस्थापन

| अ. क्र. | राज्य / केंद्रशासित प्रदेश | प्राथमिक स्तर | | | | उच्च प्राथमिक स्तर | | | | संयुक्त स्तर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०११-१२ | | २०१२-१३ | | २०११-१२ | | २०१२-१३ | | २०११-१२ | | २०१२-१३ | |
| | | शिविनि | श्रेणी | शिविनि | श्रेणी | शिविनि | श्रेणी | शिविनि | श्रेणी | शिविनि | श्रेणी | शिविनि | श्रेणी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | अंदमान व निकोबार | ०.५१८ | २३ | ०.५३९ | २६ | ०.६६९ | १० | ०.६५८ | १३ | ०.५९३ | १६ | ०.५९८ | १६ |
| २ | आंध्र प्रदेश | ०.५५८ | १४ | ०.५५३ | २१ | ०.६३५ | १७ | ०.६०४ | २२ | ०.५९७ | १५ | ०.५७९ | २३ |
| ३ | अरुणाचल प्रदेश | ०.४४९ | ३४ | ०.५५० | २५ | ०.५३६ | २५ | ०.६२३ | २१ | ०.४९२ | ३१ | ०.५८७ | १९ |
| ४ | आसाम | ०.४६० | ३३ | ०.५१५ | ३१ | ०.४४२ | ३४ | ०.५३९ | ३१ | ०.४५१ | ३५ | ०.५२७ | ३२ |
| ५ | बिहार | ०.४७७ | ३२ | ०.५२९ | २७ | ०.४५३ | ३२ | ०.५३६ | ३२ | ०.४६५ | ३३ | ०.५३२ | ३० |
| ६ | चंदिगड | ०.५४७ | १८ | ०.५२६ | २९ | ०.६९७ | ६ | ०.६६९ | ११ | ०.६२२ | १० | ०.५९७ | १७ |
| ७ | छत्तीसगड | ०.५१७ | २४ | ०.५८७ | ८ | ०.५०९ | ३० | ०.५७७ | २५ | ०.५१३ | २८ | ०.५८२ | २२ |
| ८ | दादरा व नगर हवेली | ०.५८८ | ९ | ०.५८३ | ११ | ०.६०८ | १८ | ०.६४१ | १८ | ०.५९८ | १४ | ०.६१२ | १३ |
| ९ | दमण व दिव | ०.६१२ | ७ | ०.५७८ | १२ | ०.७३७ | ३ | ०.७१२ | ३ | ०.६७५ | ५ | ०.६४५ | ७ |
| १० | दिल्ली | ०.६२६ | ४ | ०.५९९ | ६ | ०.६९६ | ७ | ०.६५४ | १६ | ०.६६१ | ६ | ०.६२७ | ११ |
| ११ | गोवा | ०.५२७ | २१ | ०.४८२ | ३४ | ०.५९७ | २० | ०.५५७ | २९ | ०.५६२ | २१ | ०.५२० | ३३ |
| १२. | गुजरात | ०.५६८ | १२ | ०.५२७ | २८ | ०.६८२ | ८ | ०.६५६ | १४ | ०.६२५ | ९ | ०.५९१ | १८ |
| १३ | हरियाणा | ०.५१७ | २५ | ०.५१६ | ३० | ०.६६६ | १२ | ०.६५५ | १५ | ०.५९१ | १७ | ०.५८५ | २० |
| १४ | हिमाचल प्रदेश | ०.५९३ | ८ | ०.५७६ | १६ | ०.६४५ | १५ | ०.६७५ | १० | ०.६१९ | ११ | ०.६२६ | १२ |
| १५ | जम्मू व काश्मीर | ०.५५० | १७ | ०.५७६ | १४ | ०.६०६ | १९ | ०.६२८ | २० | ०.५७८ | १८ | ०.६०२ | १५ |
| १६ | झारखंड | ०.४४७ | ३५ | ०.४३७ | ३५ | ०.४५७ | ३१ | ०.४६७ | ३४ | ०.४५२ | ३४ | ०.४५२ | ३५ |
| १७ | कर्नाटक | ०.६३६ | ३ | ०.६१५ | ५ | ०.७५१ | २ | ०.७०७ | ६ | ०.६९३ | २ | ०.६६१ | ५ |
| १८ | केरळ | ०.६१६ | ६ | ०.५५५ | २० | ०.६५८ | १३ | ०.६५१ | १७ | ०.६३७ | ७ | ०.६०३ | १४ |
| १९ | लक्षद्विप | ०.६६१ | २ | ०.६५३ | २ | ०.७७१ | १ | ०.७७० | १ | ०.७१६ | १ | ०.७१२ | १ |
| २० | मध्य प्रदेश | ०.५२४ | २२ | ०.५५३ | २२ | ०.५१९ | २८ | ०.५५१ | ३० | ०.५२१ | २६ | ०.५५२ | २८ |
| २१ | महाराष्ट्र | ०.५८७ | १० | ०.५८३ | १० | ०.६६७ | ११ | ०.६८७ | ८ | ०.६२७ | ८ | ०.६३५ | ८ |
| २२ | मणिपूर | ०.४९८ | २८ | ०.५९९ | ७ | ०.५६७ | २२ | ०.६६५ | १२ | ०.५३३ | २४ | ०.६३२ | ९ |
| २३ | मेघालय | ०.५१० | २७ | ०.५७६ | १७ | ०.५२० | २७ | ०.५७५ | २६ | ०.५१५ | २७ | ०.५७६ | २४ |
| २४ | मिझोराम | ०.५१३ | २६ | ०.५७६ | १५ | ०.६३६ | १६ | ०.६७८ | ९ | ०.५७५ | १९ | ०.६२७ | १० |
| २५ | नागालँड | ०.४७९ | ३१ | ०.५५१ | २४ | ०.५०९ | २९ | ०.५८८ | २४ | ०.४९४ | ३० | ०.५६९ | २६ |
| २६ | ओरिसा | ०.५५४ | १६ | ०.५५९ | १९ | ०.५३२ | २६ | ०.५७२ | २८ | ०.५४३ | २२ | ०.५६५ | २७ |
| २७ | पॉन्डेचरी | ०.६२४ | ५ | ०.६४५ | ३ | ०.७२५ | ४ | ०.७४६ | २ | ०.६७५ | ४ | ०.६९६ | २ |
| २८ | पंजाब | ०.५५७ | १५ | ०.५८६ | ९ | ०.६५४ | १४ | ०.७०८ | ५ | ०.६०६ | १३ | ०.६४७ | ६ |
| २९ | राजस्थान | ०.४९७ | २९ | ०.५१० | ३३ | ०.५७५ | २१ | ०.६३३ | १९ | ०.५३६ | २३ | ०.५७२ | २५ |
| ३० | सिक्कीम | ०.५६७ | १३ | ०.६३३ | ४ | ०.६७० | ९ | ०.७१२ | ४ | ०.६१९ | १२ | ०.६७२ | ४ |
| ३१ | तामिळनाडू | ०.६८० | १ | ०.६६२ | १ | ०.६९९ | ५ | ०.७०४ | ७ | ०.६८९ | ३ | ०.६८३ | ३ |
| ३२ | त्रिपुरा | ०.४८४ | ३० | ०.५१४ | ३२ | ०.५६१ | २४ | ०.५७५ | २७ | ०.५२२ | २५ | ०.५४५ | २९ |
| ३३ | उत्तर प्रदेश | ०.५२७ | २० | ०.५५१ | २३ | ०.४१२ | ३५ | ०.४६४ | ३५ | ०.४७० | ३२ | ०.५०८ | ३४ |
| ३४ | उत्तराखंड | ०.५७३ | ११ | ०.५७७ | १३ | ०.५६५ | २३ | ०.५९२ | २३ | ०.५६९ | २० | ०.५८५ | २१ |
| ३५ | पश्चिम बंगाल | ०.५३६ | १९ | ०.५६३ | १८ | ०.४५३ | ३३ | ०.४९१ | ३३ | ०.४९५ | २९ | ०.५२७ | ३१ |

आधार - एलीमेंटरी एज्युकेशन इन इंडीया प्रोग्रेस टुवर्डस् युईई रिपोर्ट (३० सप्टेंबर रोजी) शिविनि — शिक्षण विकास निर्देशांक

## परिशिष्ट १०.२

## राज्यातील वर्ष २०१३-१४ मधील आरोग्य विज्ञान महाविद्यालये/संस्थांची संख्या व त्यातील प्रवेशित विद्यार्थी

| | | शासकीय | | शासन अनुदानित | | विना अनुदानित | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | विद्याशाखा | संस्था | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेशित विद्यार्थी |
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १. | **ॲलोपॅथी** | | | | | | | | |
| | १.१ पदवी | १९ | २,६८९ | १ | १०० | १४ | १,४७० | ३४ | ४,२५९ |
| | १.२ पदव्युत्तर | १९ | १,४९५ | १ | ५८ | १४ | २९१ | ३४ | १,८४४ |
| २. | **आयुर्वेदिक** | | | | | | | | |
| | २.१ पदवी | ४ | २१९ | १५ | ७६५ | ३६ | १,८७३ | ५५ | २,८५७ |
| | २.२ पदव्युत्तर | ४ | १०२ | ११ | १०९ | १४ | ४९२ | २९ | ७०३ |
| ३. | **होमिओपॅथी** | | | | | | | | |
| | ३.१ पदवी | - | - | - | - | ४४ | ३,१९५ | ४४ | ३,१९५ |
| | ३.२ पदव्युत्तर | - | - | - | - | १४ | २३१ | १४ | २३१ |
| ४. | **युनानी** | | | | | | | | |
| | ४.१ पदवी | - | - | ३ | १६३ | ३ | १३४ | ६ | २९७ |
| | ४.२ पदव्युत्तर | - | - | - | - | २ | १७ | २ | १७ |
| ५. | **दंत चिकित्सा** | | | | | | | | |
| | ५.१ पदवी | ४ | २११ | - | - | २१ | १,८८५ | २५ | २,०९६ |
| | ५.२ पदव्युत्तर | ५ | ६३ | - | - | १७ | ३१९ | २२ | ३८२ |

आधार - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## परिशिष्ट १०.३
## राज्यातील वर्ष २०१३-१४ मधील तंत्र, कला शिक्षणाची महाविद्यालये/संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रवेश दिलेले विद्यार्थी

| अ.क्र. | विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित | | | विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी |
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **१.** | **अभियांत्रिकी** | | | | | | | | | | | | |
| | १.१ पदविका | ४३ | २०,८९५ | १७,४४१ | १८ | ५,०३० | ४,४०१ | ४४२ | १,४७,८७७ | ९२,१५८ | ४८३ | १,७३,८०२ | १,१४,००० |
| | १.२ पदवी | ७ | २,७४० | २,७२४ | ११ | ३,२९४ | ३,०३२ | ३४७ | १,४८,७९३ | ९६,६८४ | ३६५ | १,५४,८२७ | १,०२,४४० |
| | १.३ पदव्युत्तर | ५ | १,०३९ | ७६२ | १२ | १,३२१ | १,१५० | २०९ | १४,३५४ | १३,३६५ | २२६ | १६,७१४ | १५,२७७ |
| **२.** | **वास्तुशास्त्र** | | | | | | | | | | | | |
| | २.१ पदविका | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | २.२ पदवी | - | - | - | ३ | १६७ | १६६ | ५६ | ३,४४० | २,४९८ | ५९ | ३,६०७ | २,६६४ |
| | २.३ पदव्युत्तर | - | - | - | १ | ४० | ४० | १५ | ५०६ | १३४ | १६ | ५४६ | १७४ |
| **३.** | **व्यवस्थापन शास्त्र** | | | | | | | | | | | | |
| | ३.१ एमएमएस/ एमबीए | २ | १८० | १८० | १३ | १,०२० | ८०३ | ३९६ | ४४,०९७ | २६,५७४ | ४११ | ४५,२९७ | २७,५५७ |
| | ३.२ पीजीडीएम | १ | ६० | ६० | ३ | २५५ | - | १०१ | ११,७८० | ३४४ | १०५ | १२,०९५ | ४०४ |
| **४.** | **हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान** | | | | | | | | | | | | |
| | ४.१ पदविका | २ | १२० | १२० | - | - | - | १० | ६६० | ३८ | १२ | ७८० | १५८ |
| | ४.२ पदवी | - | - | - | १ | ६० | ६० | ८ | ४१० | २६५ | ९ | ४७० | ३२५ |
| | ४.२ पदव्युत्तर | - | - | - | १ | २४ | ११ | १ | २४ | ५ | २ | ४८ | १६ |
| **५.** | **औषध निर्माणशास्त्र** | | | | | | | | | | | | |
| | ५.१ पदविका | ४ | २१० | २०९ | १९ | १,२४० | १,२३९ | १७० | १०,६८६ | १०,००५ | १९३ | १२,१३६ | ११,४५३ |
| | ५.२ पदवी | ४ | २२० | १८९ | ६ | ३०० | २५० | १४३ | ९,४३५ | ७,९११ | १५३ | ९,९५५ | ८,३५० |
| | ५.३ पदव्युत्तर | ३ | ८२ | ६९ | ६ | ३३६ | २१६ | १०५ | ४,९८१ | १,६३२ | ११४ | ५,३९९ | १,९१७ |
| | ५.४फार्मा. डी. | २ | ६० | ६० | - | - | - | - | - | - | २ | ६० | ६० |
| **६.** | **मास्टर इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन** | २ | ९० | ९० | ८ | ४५० | ३०८ | १३८ | १२,८४५ | ३,०५५ | १४८ | १३,३८५ | ३,४५३ |
| **७.** | **औद्योगिक प्रशिक्षण संस्था** | ४१७ | ७५,००७ | ८२,०३३ | - | - | - | ३६४ | ४२,७४० | ४१,०२७ | ७८१ | १,१७,७४७ | १,२३,०६० |

(पुढे चालू)

## परिशिष्ट १०.३ (समाप्त)

## राज्यातील वर्ष २०१३-१४ मधील तंत्र, कला शिक्षणाची महाविद्यालये/संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रवेश दिलेले विद्यार्थी

| अ.क्र. | विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित / विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेश दिलेले विद्यार्थी |
| | (१) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) | (२१) | (२२) |
| **८.** | **ललित कला** | | | | | | | | | |
| | ८.१ पदविका | ३ | २६० | २३१ | २०३ | १८,२६० | १०,३३६ | २०६ | १८,५२० | १०,५६७ |
| | मूलभूत, कला शिक्षक प्रशिक्षण, रेखाकला व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला व प्रतिमानबंध इंटिरिअर डेकोरेशन, वस्त्रकाम, धातूकाम, मातकाम, ए.एम. व डीप.ए.एड. | | | | | | | | | |
| | ८.२ पदवी | ४ | १,२०० | १,११५ | -- | -- | -- | ४ | १,२०० | १,११५ |
| | रेखाकला व रंगकला, शिल्पकला, कला व शिल्प, उपयोजित कला | | | | | | | | | |
| | ८.३ पदव्युत्तर | ४ | २०८ | १३४ | -- | -- | -- | ४ | २०८ | १३४ |
| | एम.एफ.ए. (पेंटिंग), एम.एफ.ए. (उपयोजित कला) | | | | | | | | | |

आधार - (१) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
(२) व्यवसाय शिक्षण संचालनालय, मुंबई
(३) कला संचालनालय, मुंबई

## परिशिष्ट १०.४

## महाराष्ट्र राज्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधा
## (सार्वजनिक आणि शासन सहाय्यित)

| अ. क्र. | वर्ष | रुग्णालये (संख्या) | दवाखाने (संख्या) | प्राथमिक आरोग्य केंद्रे (संख्या) | प्राथमिक आरोग्य पथके (संख्या) | क्षयरोग रुग्णालये आणि रुग्ण चिकित्सालये (संख्या) | संस्थांतील@@ खाटा (संख्या) | दर लाख @ लोकसंख्येमागे खाटा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | १९७१ | २९९ | १,३७२ | ३८८ | १ | ७२ | ४३,८२३ | ८८ |
| २ | १९८१ | ५३० | १,७७६ | ४५४ | ४०० | ९० | ७१,३८५ | ११४ |
| ३ | १९९१ | ७६८ | १,८९६ | १,६७२ | ८१ | १,९७७ | १,०९,२६७ | १४४ |
| ४ | २००१ | ९८१ | १,६२९ | १,७६८ | १६९ | २,५२० | १,०१,६७० | १०५ |
| ५ | २००६ | १,०५४ | २,०७२ | १,८१२ | १७७ | २,५२० | ९५,११५ $$ | ९० |
| ६ | २०११ | १,३६८ | ३,०१२ | १,८१६ | १९१ | २,५२० | १,१८,११६ | १०३ |
| ७ | २०१२ | १,३९३ | ३,०८७ | १,८१६ | १९३ | २,५२० | १,१९,३५५ | १०६ |
| ८ | २०१३ | ८५२# | उ.ना. | १,८११ | उ.ना. | ३,०६२## | ३२,१३०+ | उ.ना. |

आधार - (१) राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, महाराष्ट्र शासन

(२) आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

@@ फक्त सार्वजनिक व शासन सहाय्यित रुग्णालयातील खाटांचा समावेश आहे. खाजगी रुग्णालयातील खाटांचा समावेश केलेला नाही.

@ संबंधित वर्षाच्या मध्याकरिता अंदाजित लोकसंख्येवर आधारित आहे.

$$ बृहन्मुंबई महानगरपालिकेची काही प्रसूतीगृहे व राज्यातील काही प्रसूतीपश्चात दक्षता केंद्रे बंद झाल्यामुळे.

# शासन सहाय्यित ग्रामीण रुग्णालये वगळून.

## क्षयरोग रुग्णालये, केंद्रे, उपचार पथके, DMC and non DMC इ. सार्वजनिक आरोग्य संस्थांचा यात समावेश आहे.

\+ शासन सहाय्यित रुग्णालये वगळून.

## परिशिष्ट १०.५

## महाराष्ट्र राज्याचे नमुना नोंदणी पाहणीवर आधारित जन्मदर, मृत्युदर, अर्भकमृत्युदर व एकूण जननदर

| वर्ष | जन्मदर | | | मृत्युदर | | | अर्भकमृत्युदर | | | एकूण जननदर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १९७१ | ३३.७ | २९.० | ३२.२ | १३.५ | ९.७ | १२.३ | १११ | ८८ | १०५ | ४.९ | ३.९ | ४.६ |
| | (३८.९) | (३०.१) | (३६.९) | (१६.४) | (९.७) | (१४.९) | (१३८) | (८२) | (१२९) | (५.४) | (४.१) | (५.२) |
| १९८१ | ३०.४ | २४.५ | २८.५ | १०.६ | ७.४ | ९.६ | ९० | ४९ | ७९ | ४.० | ३.० | ३.७ |
| | (३५.६) | (२७.०) | (३३.९) | (१३.७) | (७.८) | (१२.५) | (११९) | (६२) | (११०) | (४.८) | (३.३) | (४.५) |
| १९९१ * | २८.० | २२.९ | २६.२ | ९.३ | ६.२ | ८.२ | ६९ | ३८ | ६० | ३.४ | २.५ | ३.० |
| | (३०.९) | (२४.३) | (२९.५) | (१०.६) | (७.१) | (९.८) | (८७) | (५३) | (८०) | (३.९) | (२.७) | (३.६) |
| २००१ | २१.१ | २०.२ | २०.७ | ८.५ | ५.९ | ७.५ | ५५ | २८ | ४५ | २.६ | २.२ | २.४ |
| | (२७.१) | (२०.३) | (२५.४) | (९.१) | (६.३) | (८.४) | (७२) | (४२) | (६६) | (३.४) | (२.३) | (३.१) |
| २००७ | १८.७ | १७.३ | १८.१ | ७.३ | ५.७ | ६.६ | ४१ | २४ | ३४ | २.२ | १.८ | २.० |
| | (२४.७) | (१८.६) | (२३.१) | (८.०) | (६.०) | (७.४) | (६१) | (३७) | (५५) | (३.०) | (२.०) | (२.७) |
| २००८ | १८.४ | १७.२ | १७.९ | ७.४ | ५.६ | ६.६ | ४० | २३ | ३३ | २.१ | १.७ | २.० |
| | (२४.४) | (१८.५) | (२२.८) | (८.०) | (५.९) | (७.४) | (५८) | (३६) | (५३) | (२.९) | (२.०) | (२.६) |
| २००९ | १८.१ | १६.९ | १७.६ | ७.६ | ५.५ | ६.७ | ३७ | २२ | ३१ | २.१ | १.७ | १.९ |
| | (२४.१) | (१८.३) | (२२.५) | (७.८) | (५.८) | (७.३) | (५५) | (३४) | (५०) | (२.९) | (२.०) | (२.६) |
| २०१० | १७.६ | १६.४ | १७.१ | ७.५ | ५.३ | ६.५ | ३४ | २० | २८ | २.० | १.७ | १.९ |
| | (२३.७) | (१८.०) | (२२.१) | (७.७) | (५.८) | (७.२) | (५१) | (३१) | (४७) | (२.८) | (१.९) | (२.५) |
| २०११ | १७.३ | १५.८ | १६.७ | ७.३ | ५.१ | ६.३ | ३० | १७ | २५ | १.९ | १.६ | १.८ |
| | (२३.३) | (१७.६) | (२१.८) | (७.६) | (५.७) | (७.१) | (४८) | (२९) | (४४) | (२.७) | (१.९) | (२.४) |
| २०१२ | १७.४ | १५.५ | १६.६ | ७.३ | ५.० | ६.३ | ३० | १७ | २५ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |
| | (२३.१) | (१७.४) | (२१.६) | (७.६) | (५.६) | (७.०) | (४६) | (२८) | (४२) | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |

आधार - नमुना नोंदणी पाहणी पत्रिका, महानिबंधक, भारत सरकार, नवी दिल्ली

*टीप* - (१) कंसातील आकडे भारताकरिता आहेत (२) * जम्मू व काश्मिर वगळून

(३) जन्मदर व मृत्युदर दर हजार लोकसंख्येमागे (४) अर्भकमृत्युदर दर हजार जीवित जन्मामागे आहेत

उ.ना. - उपलब्ध नाही.

# परिशिष्ट १०.६

## काम करणाऱ्या लोकांची जनगणना २०११ अनुसार आर्थिक वर्गवारी

(हजारात)

| काम करणाऱ्यांची वर्गवारी | मुख्यत: / सीमांतिक / एकूण | महाराष्ट्र | | | भारत # | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| (अ) काम करणारे | | | | | | | |
| १. शेतकरी | मुख्यत: | ७,१८१ | ४,२९७ | ११,४७८ | ७३,०१८ | २२,८२३ | ९५,८४१ |
| | सीमांतिक | ४११ | ६८० | १,०९१ | ९,६८९ | १३,१६३ | २२,८५१ |
| | एकूण | ७,५९२ | ४,९७७ | १२,५६९ | ८२,७०७ | ३५,९८६ | १,१८,६९२ |
| २. शेतमजूर | मुख्यत: | ५,८४७ | ५,२२२ | ११,०६९ | ५५,२५५ | ३०,९१२ | ८६,१६७ |
| | सीमांतिक | ९२८ | १,४८९ | २,४१७ | २७,४८५ | ३०,६७८ | ५८,१६३ |
| | एकूण | ६,७७५ | ६,७११ | १३,४८६ | ८२,७४० | ६१,५९० | १,४४,३३० |
| ३. घरगुती उद्योग | मुख्यत: | ६०७ | ३८५ | ९९१ | ७,५४० | ४,७९१ | १२,३३१ |
| | सीमांतिक | ८४ | १५० | २३४ | २,२३६ | ३,७६९ | ६,००५ |
| | एकूण | ६९१ | ५३५ | १,२२५ | ९,७७६ | ८,५६० | १८,३३६ |
| ४. इतर | मुख्यत: | १६,३५५ | ३,८७० | २०,२२५ | १,३७,३३६ | ३०,७७१ | १,६८,१०७ |
| | सीमांतिक | १,२०४ | ७१८ | १,९२२ | १९,३०७ | १२,९७१ | ३२,२७८ |
| | एकूण | १७,५५९ | ४,५८८ | २२,१४७ | १,५६,६४३ | ४३,७४२ | २,००,३८५ |
| एकूण (अ) | मुख्यत: | २९,९८९ | १३,७७४ | ४३,७६३ | २,७३,१४९ | ८९,२९७ | ३,६२,४४६ |
| | सीमांतिक | २,६२८ | ३,०३७ | ५,६६५ | ५८,७१७ | ६०,५८० | १,१९,२९७ |
| | एकूण | ३२,६१७ | १६,८११ | ४९,४२८ | ३,३१,८६६ | १,४९,८७७ | ४,८१,७४३ |
| (ब) काम न करणारे | एकूण | २५,६२६ | ३७,३२० | ६२,९४६ | २,९१,२५६ | ४,३७,५७० | ७,२८,८२६ |
| **एकूण (अ + ब )** | | ५८,२४३ | ५४,१३१ | १,१२,३७४ | ६,२३,१२२ | ५,८७,४४७ | १२,१०,५६९ |

आधार - १) महानिबंधक व गणना आयुक्त, भारत सरकार, नवी दिल्ली.

२) संचालक, जनगणना कार्यालय, महाराष्ट्र, मुंबई.

\# मणिपूर राज्यातील सेनापती जिल्ह्यातील माओ-मारम, पाओमाटा आणि पुरुल हे उपविभाग वगळून.

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

# परिशिष्ट १०.७

## दृष्टिक्षेपात आर्थिक गणना १९९८ आणि २००५

(हजारात)

| बाब | ग्रामीण | | | नागरी | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९९८ | २००५ | शेकडा वाढ | १९९८ | २००५ | शेकडा वाढ | १९९८ | २००५ | शेकडा वाढ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. आस्थापनांची संख्या | | | | | | | | | |
| (अ) स्व-कार्यरत आस्थापना | १,२९५ | १,४४२ | ११.३७ | ९६९ | १,०७८ | ११.२५ | २,२६३ | २,५१९ | ११.३२ |
| (ब) किमान एक व्यक्ती मजुरीवर असणाऱ्या आस्थापना | ३१९ | ६६८ | १०९.६६ | ६५२ | १,०३७ | ५९.१३ | ९७१ | १,७०६ | ७५.७२ |
| (क) एकूण | १,६१३ | २,११० | ३०.८० | १,६२१ | २,११५ | ३०.५० | ३,२३४ | ४,२२५ | ३०.६५ |
| २. काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या | | | | | | | | | |
| (अ) स्व-कार्यरत आस्थापना | २,००८ | १,९२३ | (-) ४.२५ | १,३०५ | १,२९६ | (-) ०.७१ | ३,३१३ | ३,२१९ | (-) २.३६ |
| (ब) किमान एक व्यक्ती मजुरीवर असणाऱ्या आस्थापना | १,६८० | २,५०१ | ४८.८९ | ५,४५२ | ५,५८९ | २.५२ | ७,१३२ | ८,०९० | १३.४४ |
| (क) एकूण | ३,६८८ | ४,४२४ | १९.९५ | ६,७५७ | ६,८८५ | १.८९ | १०,४४५ | ११,३०९ | ८.२७ |
| ३. प्रति आस्थापना काम करणाऱ्यांची सरासरी संख्या | २.३ | २.१ | .. | ४.२ | ३.३ | .. | ३.२ | २.७ | .. |
| ४. प्रति आस्थापना (किमान एक व्यक्ती मजुरीवर असणाऱ्या) काम करणाऱ्यांची सरासरी संख्या | ५.३ | ६.६ | .. | ८.४ | ५.४ | .. | ७.४ | ४.७ | .. |
| ५. एकूण आस्थापनांमधील मजुरीवरील व्यक्ती | १,४९५ | २,०८२ | ३९.२६ | ४,७८२ | ४,६१९ | (-) ३.४० | ६,२७७ | ६,७०१ | ६.७५ |
| ६. प्रमुख वैशिष्ट्यांनुसार आस्थापनांची संख्या-- | | | | | | | | | |
| (१) हंगामी | १३७ | १९३ | ४०.८८ | २३ | ४७ | १०४.३५ | १६० | २४० | ५०.०० |
| (२) परिसर नसलेले | २१८ | ४०५ | ८५.७८ | २२६ | ३१६ | ३९.८२ | ४४४ | ७२१ | ६२.३९ |
| (३) शक्ती /इंधन वापरणारे | २३९ | ४७० | ९६.६५ | ३६३ | ६४४ | ७७.४१ | ६०२ | १,११४ | ८५.०५ |
| (४)मालकाचा सामाजिक गट | | | | | | | | | |
| (अ)अनुसूचित जाती | १२४ | १४८ | १९.३५ | १०० | १५१ | ५१.०० | २२४ | २९९ | ३३.४८ |
| (ब) अनुसूचित जमाती | ९२ | १०२ | १०.८७ | ४८ | ८५ | ७७.०८ | १४० | १८७ | ३३.५७ |
| (५) मालकीचा प्रकार -- | | | | | | | | | |
| (अ) खाजगी | १,४७२ | १,८७६ | २७.४५ | १,५६८ | २,०३२ | २९.५९ | ३,०४० | ३,९०८ | २८.५५ |
| (ब) सहकारी | २१ | ३० | ४२.८६ | १२ | २१ | ७५.०० | ३३ | ५१ | ५४.५५ |
| (क) शासकीय आणि सार्वजनिक उपक्रम | १२१ | २०४ | ६८.६० | ४० | ६२ | ५५.०० | १६१ | २६६ | ६५.२२ |

आधार - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने टक्केवारी जुळतीलच असे नाही.

## परिशिष्ट १०.८

## प्रमुख उद्योग गटांनुसार आस्थापनांची आणि कामगारांची संख्या (आर्थिक गणना २००५)

(हजारात)

| प्रमुख उद्योग गट | आस्थापनांची संख्या | | | कामगारांची संख्या | | | मजुरीवरील कामगारांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १. कृषि | ५८० | २४ | ६०४ | ९९९ | ५२ | १,०५१ | १७५ | १९ | १९४ |
| २. खाणकाम व दगड खाणकाम | ३ | २ | ५ | २१ | १४ | ३५ | १७ | १३ | ३० |
| ३. वस्तुनिर्माण | ३०९ | ३८५ | ६९३ | ८६० | १,५७४ | २,४३४ | ४९८ | १,१४४ | १,६४२ |
| ४. वीज, गॅस आणि पाणी पुरवठा | २ | २ | ४ | ११ | ३१ | ४२ | १० | ३० | ४० |
| ५. बांधकाम | २३ | २९ | ५२ | ४३ | ७६ | ११८ | १७ | ४५ | ८३ |
| ६. मोटार गाड्या / मोटार सायकल यांची विक्री, परिरक्षण व दुरुस्ती | २५ | ६१ | ८६ | ५४ | १८२ | २३७ | २७ | ११५ | १४२ |
| ७. घाऊक व्यापार | ४२ | ८९ | १३१ | ८३ | २२६ | ३०९ | ३८ | १२७ | १६५ |
| ८. किरकोळ व्यापार | ५६५ | ८५५ | १,४२० | ८९१ | १,८८३ | २,५७४ | २५९ | ७३२ | ९९० |
| ९. उपाहारगृहे आणि हॉटेल्स | ५४ | ८६ | १४० | १३४ | ३३६ | ४७० | ८८ | २३७ | ३०४ |
| १०. वाहतूक आणि साठवण | ५८ | १२२ | १८० | ११३ | ३२३ | ४३४ | ५५ | २०१ | २५७ |
| ११. टपाल व दूरसंचार | २७ | ५० | ७७ | ४६ | १८० | २०७ | २५ | ११० | १३५ |
| १२. वित्तीय सहाय्य देणाऱ्या संस्था | २४ | ३० | ५४ | १०८ | २५८ | ३६७ | ७९ | २३८ | ३१७ |
| १३. स्थावर मालमत्ता आणि सेवा | ५० | ९४ | १४४ | ९६ | ३८९ | ४६५ | ४२ | २७१ | ३१३ |
| १४. सार्वजनिक प्रशासन, संरक्षण, सामाजिक सुरक्षा | ५० | २२ | ७३ | १८९ | ५९२ | ७८१ | १७९ | ५८६ | ७६४ |
| १५. शिक्षण | १०० | ५३ | १५३ | ४४६ | ४०७ | ८५३ | ४३२ | ३६७ | ७९९ |
| १६. आरोग्य आणि सामाजिक कार्य | ३७ | ६० | ९७ | ९२ | २८६ | ३५७ | ६३ | २०४ | २६७ |
| १७. इतर सामाजिक व वैयक्तिक सेवा कार्य | १६२ | १५० | ३१२ | २४० | ३३३ | ५७३ | ९९ | १८० | २७९ |
| १८. इतर कार्ये (उल्लेख न केलेले उद्योग गट) | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य | नगण्य |
| **एकूण ...** | **२,११०** | **२,११५** | **४,२२५** | **४,४२४** | **६,८८५** | **११,३०९** | **२,०८२** | **४,६१९** | **६,७०१** |

आधार - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई .

टीप - स्तंभ क्रमांक ५ ते १० मधील आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

# परिशिष्ट १०.९

## महाराष्ट्र राज्यातील विविध उद्योगांतील रोजगार

(शंभरात)

| अ.क्र. | उद्योग गट | सरासरी दैनिक रोजगार | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २००६ | २०११ | २०१२* |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| **(अ)** | **ग्राहक वस्तू उद्योग** | **५,१०३** | **५,०२०** | **५,१६८** | **४,५३५** | **४,५३३** | **४,२२५** | **५,१६४** | **५,८६६** |
| १. | खाद्य उत्पादने, पेये व तंबाखूची उत्पादने | ९०२ | ९२१ | ९६५ | १,३३० | १,६६२ | १,५४२ | १,९९१ | २,२९४ |
| २. | वस्त्रोद्योग (परिधान करण्याची वस्त्रे धरुन) | ३,६९१ | ३,५१६ | ३,५५४ | २,५२७ | २,१६७ | १,८९२ | २,१८२ | २,४६५ |
| ३. | लाकूड व लाकडाची उत्पादने | १०९ | ७५ | ७५ | १५२ | १५४ | १६७ | २१७ | २१९ |
| ४. | कागद, कागदाची उत्पादने, मुद्रण व प्रकाशन इत्यादि | ३९० | ४९४ | ५४९ | ४९१ | ५२५ | ५९३ | ७३६ | ८१३ |
| ५. | कातडी कमावणे व चामड्याची उत्पादने | ११ | १४ | २५ | ३५ | २५ | ३१ | ३८ | ७५ |
| **(ब)** | **पुनर्निर्माण वस्तू उद्योग** | **१,२९७** | **२,४३५** | **३,१९३** | **३,४२१** | **३,४६२** | **४,१०५** | **६,६४८** | **७,३४२** |
| ६. | रसायने व रासायनिक उत्पादने | ३४० | ७६० | १,०५९ | १,२१५ | १,२९९ | १,४५५ | १,८०२ | १,९७४ |
| ७. | पेट्रोलियम, रबर, प्लास्टिक यांची उत्पादने | १७४ | ३४९ | ४२१ | ४८२ | ५३५ | ६५६ | १,०८७ | १,१२३ |
| ८. | अधातू खनिज उत्पादने | २८४ | ४०२ | ४०३ | ४२३ | ३१७ | ३२२ | ४६५ | ५८४ |
| ९. | मूलभूत धातू, धातूची उत्पादने | ४९९ | ९२४ | १,३१० | १,३०१ | १,३११ | १,६७२ | ३,२९४ | ३,६६१ |
| **(क)** | **भांडवली वस्तू उद्योग** | **१,२२०** | **२,११०** | **२,८९८** | **२,७१२** | **३,१४०** | **३,४४०** | **५,०३३** | **५,८२१** |
| १०. | यंत्रे व यंत्रसामग्री (परिवहन सामग्री वगळून) | ५९४ | १,३२२ | १,७८६ | १,६१४ | १,७२० | १,७८४ | २,४०७ | २,६३९ |
| ११. | परिवहन सामग्री | ४६९ | ६०८ | ९०३ | ८६७ | १,०२५ | ९५९ | १,७८५ | २,१९४ |
| १२. | इतर वस्तुनिर्माण उद्योग | १५७ | १८० | २०९ | २३१ | ३९५ | ६९७ | ८४१ | ९८८ |
| **(ड)** | **इतर** | **२५६** | **४१२** | **६६३** | **१,०१६** | **८७०** | **१,०३८** | **१,३०१** | **१,५५४** |
| | **एकूण** | **७,८७३** | **९,९७७** | **११,९२२** | **११,६८४** | **१२,००५** | **१२,८०८** | **१८,१४६** | **२०,५८३** |

आधार - औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

टीप - (१) आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

(२) १९७४ पासून विडी कारखान्यांची नोंद यातून काढून वेगळ्या अधिनियमात करण्यात आली.

* अस्थायी

# परिशिष्ट १०.१०

## महाराष्ट्र राज्यातील चालू कारखाने व त्यांतील रोजगार

रोजगार (हजारात)

| वर्ष | बाब ** | शक्तीवर चालणारे कारखाने | | | बिगर शक्तीवर चालणारे कारखाने | | | सर्व कारखाने | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५० पेक्षा कमी कामगार कामावर असलेले | ५० किंवा अधिक कामगार कामावर असलेले | शक्तीवर चालणारे एकूण कारखाने | ५० पेक्षा कमी कामगार कामावर असलेले | ५० किंवा अधिक कामगार कामावर असलेले | बिगर शक्तीवर चालणारे एकूण कारखाने | ५० पेक्षा कमी कामगार कामावर असलेले | ५० किंवा अधिक कामगार कामावर असलेले | एकूण सर्व कारखाने |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १९६१ | कारखाने | ५,०९७ | १,७८१ | ६,८७८ | १,००४ | ३५१ | १,३५५ | ६,१०१ | २,१३२ | ८,२३३ |
| | रोजगार | ९९ | ६२६ | ७२५ | २१ | ४१ | ६३ | १२० | ६६७ | ७८७ |
| १९७१ | कारखाने | ६,३४१ | २,७०१ | ९,०४२ | ८५६ | ३४३ | १,१९९ | ७,१९७ | ३,०४४ | १०,२४१ |
| | रोजगार | १२३ | ८२४ | ९४७ | १५ | ३६ | ५१ | १३८ | ८६० | ९९८ |
| १९८१ | कारखाने | १०,२३८ | ३,१३२ | १३,३७० | ३,१५४ | ७० | ३,२२४ | १३,३९२ | ३,२०२ | १६,५९४ |
| | रोजगार | १८३ | ९८३ | १,१६६ | २० | ६ | २६ | २०३ | ९८९ | १,१९२ |
| १९९१ | कारखाने | १३,१३९ | ३,१९९ | १६,३३८ | ७,७४३ | ३८ | ७,७८१ | २०,८८२ | ३,२३७ | २४,११९ |
| | रोजगार | २१५ | ९१० | १,१२४ | ४० | ४ | ४४ | २५४ | ९१४ | १,१६९ |
| २००१ | कारखाने | १५,९७७ | ३,९२९ | १९,९०६ | ८,३९३ | २५ | ८,४१८ | २४,३७० | ३,९५४ | २८,३२४ |
| | रोजगार | २६६ | ८९१ | १,१५७ | ४२ | २ | ४४ | ३०८ | ८९३ | १,२०१ |
| २००६ | कारखाने | १७,३२५ | ५,२१३ | २२,५३८ | ८,१४० | १९ | ८,१५९ | २५,४६५ | ५,२३२ | ३०,६९७ |
| | रोजगार | ३३० | ९०९ | १,२३९ | ४० | २ | ४२ | ३७० | ९११ | १,२८१ |
| २००९ | कारखाने | १८,६६८ | ६,११२ | २४,७८० | ९,२६३ | १७ | ९,२८० | २७,९३१ | ६,१२९ | ३४,०६० |
| | रोजगार | ३४५ | १,१०३ | १,४४८ | ५० | २ | ५२ | ३९५ | १,१०५ | १,५०० |
| २०१० | कारखाने | १९,१७३ | ६,५१७ | २५,६९० | ९,१८३ | १५ | ९,१९८ | २८,३५६ | ६,५३२ | ३४,८८८ |
| | रोजगार | ३६३ | १,२३१ | १,५९४ | ५२ | १ | ५३ | ४१५ | १,२३३ | १,६४७ |
| २०११ | कारखाने | १९,४१० | ७,३७३ | २६,७८३ | ९,०६७ | २६ | ९,०९३ | २८,४७७ | ७,३९९ | ३५,८७६ |
| | रोजगार | ३६७ | १,३९४ | १,७६१ | ५१ | ३ | ५४ | ४१८ | १,३९७ | १,८१५ |
| २०१२* | कारखाने | १९,५४२ | ८,५४५ | २८,०८७ | ८,६७७ | ४४ | ८,७२१ | २८,२१९ | ८,५८९ | ३६,८०८ |
| | रोजगार | ३९३ | १,६०७ | २,००० | ५४ | ४ | ५८ | ४४७ | १,६११ | २,०५८ |

आधार - औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

टीप - (१) रोजगारात प्रपत्र न पाठविणाऱ्या कारखान्यांतील दैनिक सरासरी रोजगारांचा समावेश आहे.

(२) वरील आकडे १९४८ च्या कारखाना अधिनियमांखाली येणाऱ्या कारखान्यासंबंधीचे आहेत.

(३) "बिगर शक्तीवर चालणारे कारखाने" यामध्ये कारखाना अधिनियम, १९४८ च्या विभाग ८५ खाली नोंदविलेल्या शक्तीवर चालणाऱ्या लहान कारखान्यांचा समावेश आहे.

(४) रोजगाराचे आकडे संक्षिप्तात लिहिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

* अस्थायी ** कारखाने - चालू कारखान्यांची संख्या रोजगार - रोजगारांची दैनिक सरासरी

१९७४ पासून विडी कारखान्यांची नोंद यातून काढून वेगळ्या अधिनियमाखाली समाविष्ट करण्यात आली आहे.

## परिशिष्ट १०.११

## राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या, अधिसूचित केलेली रिक्त पदे व भरलेली पदे

(हजारात)

| वर्ष | संदर्भ वर्षात नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या | अधिसूचित केलेल्या रिक्त पदांची संख्या | संदर्भ वर्षात भरलेल्या पदांची संख्या | वर्ष अखेरीस चालू नोंदवहीत असलेल्या व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १९९१ | ५९१.८ | ६४.८ | ३०.३ | ३,१५९.८ |
| १९९२ | ५९६.६ | ५५.९ | २९.१ | ३,३२०.५ |
| १९९३ | ५९९.७ | ५५.४ | २४.१ | ३,३४९.६ |
| १९९४ | ६३५.८ | ५२.१ | २४.७ | ३,४३९.२ |
| १९९५ | ७२०.१ | ४९.७ | १८.७ | ३,६३४.३ |
| १९९६ | ६८८.७ | ५३.७ | २२.६ | ३,७८७.२ |
| १९९७ | ६९२.८ | ४७.४ | २२.९ | ३,९३३.१ |
| १९९८ | ७२९.३ | ३७.९ | १६.८ | ४,१०९.६ |
| १९९९ | ८६१.१ | ५०.९ | १६.२ | ४,१८३.८ |
| २००० | ७५०.८ | ४३.९ | १८.१ | ४,३४८.८ |
| २००१ | ६२३.२ | ३२.३ | १२.५ | ४,४१९.७ |
| २००२ | ६२२.७ | ३०.९ | ९.५ | ४,२०३.३ |
| २००३ | ८१९.१ | ५९.६ | १६.४ | ४,०४४.१ |
| २००४ | ८८०.३ | ४३.४ | १५.१ | ४,१०५.७ |
| २००५ | ६४५.२ | ४४.२ | १३.९ | ४,०००.३ |
| २००६ | ६०८.१ | ६८.३ | १४.८ | ३,६०८.५ |
| २००७ | ६१६.७ | ९७.५ | ९.२ | ३,२१३.८ |
| २००८ | ७२१.५ | ९९.२ | ११.८ | ३,००७.२ |
| २००९ | ६९८.३ | १७६.६ | १७.२ | २,८७५.९ |
| २०१० | ८९२.९ | ३७८.८ | ३५३.९ | २,६८२.४ |
| २०११ | ७४७.५ | ३४६.२ | १९१.० | २,५९६.२ |
| २०१२ | ६१२.३ | २५९.२ | १३४.२ | २,४०४.० |
| २०१३ | ६३०.३ | ११८.९ | ११४.६ | ३,०३४.८ |

आधार - रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र शासन, नवी मुंबई.

## परिशिष्ट १०.१२

## रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांच्या चालू नोंदवहीत ३१ डिसेंबर, २०१३ अखेर असलेल्या व्यक्तींची संख्या

| अ. क्र. | शैक्षणिक पात्रता | व्यक्ती | पैकी स्त्रिया | स्त्रियांची टक्केवारी | एकूण बेरजेशी व्यक्तींची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | माध्यमिक शालांत परीक्षेपेक्षा कमी (निरक्षर धरुन ) | २,९९,५८७ | ६०,२१७ | २०.१ | ९.९ |
| २. | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण | ८,३६,७५३ | १,६५,६४० | १९.८ | २७.५ |
| ३. | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण | ८,७९,७९९ | २,११,१०३ | २४.० | २९.० |
| ४. | औ.प्र.सं. प्रशिक्षित व शिकाऊ उमेदवार | २,११,३३३ | १८,८४८ | ८.९ | ७.० |
| ५. | पदविकाधारक | | | | |
| | ५.१ अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | ५४,५७५ | ९,२८१ | १७.० | १.८ |
| | ५.२ वैद्यकीय, डी.एम.एल.टी. व फार्मसी | १०,६५३ | ३,३१७ | ३१.१ | ०.४ |
| | ५.३ इतर | १,३३,७२९ | ५९,०२२ | ४४.१ | ४.४ |
| | **एकूण (५.१ ते ५.३)** | **१,९८,९५७** | **७१,६२०** | **३६.०** | **६.६** |
| ६. | पदवीधर | | | | |
| | ६.१ अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | ३८,०१९ | ९,०४२ | २३.८ | १.३ |
| | ६.२ वैद्यकीय | ४,८०१ | १,९१७ | ३९.९ | ०.२ |
| | ६.३ इतर | ४,९२,५८४ | १,६६,५५७ | ३३.८ | १६.२ |
| | **एकूण (६.१ ते ६.३)** | **५,३५,४०४** | **१,७७,५१६** | **३३.२** | **१७.६** |
| ७. | पदव्युत्तर पदवीधर | | | | |
| | ७.१ अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | ५,३९० | १,९६१ | ३६.४ | ०.२ |
| | ७.२ वैद्यकीय | ७८८ | २४१ | ३०.६ | नगण्य |
| | ७.३ इतर | ६६,७८२ | २९,६९६ | ४४.५ | २.२ |
| | **एकूण (७.१ ते ७.३)** | **७२,९६०** | **३१,८९८** | **४३.७** | **२.४** |
| | **एकूण बेरीज** | **३०,३४,७९३** | **७,३६,८४२** | **२४.३** | **१००.०** |

आधार - रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, महाराष्ट्र शासन, नवी मुंबई

# परिशिष्ट १०.१३

## महाराष्ट्र राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेली प्रकारानुसार कामे व त्यावरील खर्च

(₹ लाखात)

| अ. क्र. | कामाचा प्रकार | २००९-१० | | २०१०-११ | | २०११-१२ | | २०१२-१३ | | २०१३-१४ + | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कामांची संख्या | खर्च | कामांची संख्या | खर्च | कामांची संख्या | खर्च | कामांची संख्या | खर्च | कामांची संख्या | खर्च |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | ग्रामीण बारमाही जोड रस्ते | ३५६ | १,३५२.४२ | ३६६ | ९५१.९१ | ६४४ | ५९४.४६ | ४,६८३ | १७,०५९.७४ | १,८१७ | २,२८६.४० |
| २ | पूरनियंत्रण व पूर संरक्षण | ३४६ | २३९.४० | ११५ | २९५.६१ | १७ | ४४.९८ | ९४ | २९४.०४ | १७२ | ४३६.६६ |
| ३ | जलसंधारण व जलसंवर्धन/ जलभरणा | ७,३०५ | ७,०३८.२५ | १६,४१२ | ४,५६०.८३ | ३,०१८ | १,४१६.७९ | २७,१५० | १९,७३७.२२ | ६,६५४ | २,९४३.४६ |
| ४ | दुष्काळ प्रतिबंधक काम | ६०२ | ६०६.२६ | ६९२ | १,२३६.५० | ५४८ | ३७.७१ | १५,५३० | १२,८४१.१७ | ९,६०१ | १,६५२.४५ |
| ५ | लघु व सूक्ष्म जलसिंचन | ४० | ४७.८१ | १० | १.१९ | १५ | ८.५५ | ८०२ | ३०२.७४ | २६५ | ६२.३६ |
| ६ | अनुसूचित जाती / जमाती व नवीन भूधारकांना सिंचन सुविधा | ६११ | ६८०.२९ | २६० | ५६६.५४ | १९२ | १०४.५० | ११,७६० | १२,९५८.०७ | ६,१९२ | २,६०६.८१ |
| ७ | पारंपारिक जलस्त्रोतांचे नुतनीकरण | ५५२ | ८३६.८३ | ४२२ | ९७२.६४ | १०६८ | २७१.७४ | ५,९९२ | ३,२३७.३३ | १,८१९ | १,०३४.४५ |
| ८ | भूविकास / शेतीविकास | ८०१ | १,००१.८६ | ४३० | २७६.६७ | ८०१ | १२५.९३ | ४,०९५ | २,२१५.९९ | १,२५७ | ८७३.७० |
| ९ | राजीव गांधी सेवा केंद्र | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ३३ | २४६.१४ | ३९ | ४३.७५ |
| १० | इतर कामे | ० | ०.०० | ० | ०.२४ | १३० | २२.७८ | ४,८७८ | ५४४.८२ | ८,६७२ | ३८४.०४ |
| | **एकूण** | **१०,६१३** | **११,८०३.१२** | **१८,७०७** | **८,८६२.१३** | **६,४३३** | **२,६२७.४४** | **७५,०१७** | **६९,४३७.२६** | **३६,४८८** | **१२,३२४.१०** |

आधार - नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - + डिसेंबरपर्यंत

## परिशिष्ट १०.१४

## महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत रोजगार कार्यक्रमांची प्रगती

| | रोजगार कार्यक्रम | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| **१.** | **स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना** | | | | | २०१३-१४$ |
| | *१.१ सहाय्यीत स्वसहाय्य गट(संख्या)* | १२,६५० | १४,३८१ | १४,४१५ | ५,६७७ | १५,६३६ |
| | *१.२ एकूण स्वरोजगारी (संख्या)* | १,५२,६५४ | १,७४,१५६ | १,६४,१९६ | ६०,८०१ | १,५६,३६० |
| | अ) स्वसहाय्य गट स्वरोजगारी (संख्या) | १,३२,७५५ | १,५०,०९१ | १,४९,३०९ | ५८,०३९ | १,५६,३६० |
| | ब) वैयक्तिक स्वरोजगारी (संख्या) | १९,८९९ | २४,०६५ | १४,८८७ | २,७६२ | -- |
| | *१.३ स्वरोजगारींना एकूण अनुदान (₹ कोटी)* | १४७.४२ | १६५.४३ | १६०.३८ | ७२.१९ | -- |
| | अ) स्वसहाय्य गट स्वरोजगारी (₹ कोटी) | १२३.१२ | १३७.२५ | १३८.०६ | ६७.९७ | -- |
| | ब) वैयक्तिक स्वरोजगारी (₹ कोटी) | २४.३० | २८.१८ | २२.३२ | ४.२२ | -- |
| | *१.४ स्वरोजगारींना एकूण कर्ज (₹ कोटी)* | ३००.८९ | ३७०.३० | ४०३.५० | २०७.९९ | १४८.६३ |
| | अ) स्वसहाय्य गट स्वरोजगारी (₹ कोटी) | २४२.४२ | २९८.३३ | ३४२.८३ | १९६.१७ | १४८.६३ |
| | ब) वैयक्तिक स्वरोजगारी (₹ कोटी) | ५८.४७ | ७१.९७ | ६०.६७ | ११.८२ | -- |
| | *१.५ एकूण खर्च (₹ कोटी)* | २३१.८७ | २५२.७६ | २५०.२८ | १६०.७२ | २०५.३४ |
| **२.** | **स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना** | | | | | २०१३-१४$$ |
| | *२.१ उपलब्ध निधी* | | | | | |
| | अ) केंद्र शासन (₹ कोटी) | ८०.७६ | ९०.२९ | १०३.०४ | ५१.३६ | ५०.२२ |
| | ब) राज्य शासन (₹ कोटी) | २६.९३ | ३०.१० | ३३.३२ | ०.०० | ०.०० |
| | *२.२ शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम* | | | | | |
| | अ) लक्ष्य (लाभधारकांची संख्या) | ४,५२७ | ४,५२७ | ९,९७९ | ३९,००० | ११,९०० |
| | ब) साध्य (लाभधारकांची संख्या) | ६,०७४ | ७,४४९ | ६,७०८ | ४,४७५ | ४,४७९ |
| | क) झालेला खर्च (₹ कोटी) | ९.९६ | १५.२१ | ३१.७६ | ७.५१ | १३.१३ |
| | *२.३ प्रशिक्षण* | | | | | |
| | अ) लक्ष्य (प्रशिक्षणार्थींची संख्या) | ३६,२०३ | ३६,२०३ | ३९,७७० | २,२०,००० | ७९,२०० |
| | ब) साध्य (प्रशिक्षणार्थींची संख्या) | ४०,६९३ | ३८,६६९ | ५६,१६८ | २७,९१३ | ३४,१०७ |
| | क) झालेला खर्च (₹ कोटी) | १३.०३ | १७.१५ | १.६ | १.२६ | ६.४१ |
| | *२.४ शहरी वेतनी रोजगार कार्यक्रम* | | | | | |
| | अ) लक्ष्य (लाख मनुष्यदिवस) | -- | -- | -- | १३.९२ | -- |
| | ब) साध्य (रोजगार निर्मिती लाख मनुष्यदिवस) | ५.४० | ५.३७ | ३.९ | ०.८९ | ०.०३ |
| | क) झालेला खर्च (₹ कोटी) | १८.१३ | १६.५८ | ११.४६ | ३.९० | ४.६७ |
| **३.** | **पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम** | | | | | |
| | अ) मंजूर कर्ज (₹ कोटी) | ३६.६८ | ५५.३३ | ४४.३७ | ६८.२८ | ४.२६ |
| | ब) प्रकल्पांची संख्या | ३,४१३ | ३,८९८ | २,६२४ | ३,६१७ | २२४ |
| | क) लाभधारक संख्या (निर्मित रोजगार) | ३१,४९४ | ३१,७५२ | २०,६२२ | २२,७३६ | १,७९१ |

*आधार* - (१) ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई
(२) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई
(३) उद्योग संचालनालय, मुंबई

$ फेब्रुवारी पर्यंत $$ डिसेंबर पर्यंत

# परिशिष्ट १०.१५

## महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक विवाद **

(भाग घेतलेले कामगार हजारात व वाया गेलेले श्रमदिन लाखात)

| बाब | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २००६ | २०११ | २०१२ | २०१३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १. **कापड गिरण्या** -- | | | | | | | | |
| (अ) संप व टाळेबंदीची संख्या | १५६ | ६६ | १० | १२ | ६ | ७ | ५ | ३ |
| (ब) भाग घेतलेले कामगार | ३,१९७ | ५६४ | ६१ | ८६ | १७ | २६ | १९ | ८२ |
| (क) वाया गेलेले मनुष्यदिन | ९.७० | ४७.३६ | २.३७ | ४.५३ | ०.९४ | १.७३ | २.४३ | १.३७ |
| २. **अभियांत्रिकी कारखाने** -- | | | | | | | | |
| (अ) संप व टाळेबंदीची संख्या | २११ | ११९ | ५९ | २८ | ७ | ८ | ८ | ५ |
| (ब) भाग घेतलेले कामगार | ४६९ | ४१२ | ११० | ६५ | २० | ७१ | ४७ | ३४ |
| (क) वाया गेलेले मनुष्यदिन | ५.६४ | १६.२१ | १४.४६ | २५.७९ | २.८९ | १२.९० | १२.५७ | ७.९८ |
| ३. **संकीर्ण** -- | | | | | | | | |
| (अ) संप व टाळेबंदीची संख्या | ३२३ | ४५१ | १४८ | १९ | १० | १८ | १४ | १४ |
| (ब) भाग घेतलेले कामगार | ८४१ | १,०३१ | ४२३ | ८५ | ३८ | ३८ | ३५ | ४७ |
| (क) वाया गेलेले मनुष्यदिन | ५.१८ | ३१.४९ | २९.६६ | १५.९० | ७.०२ | ७.८० | ८.४५ | ३.६२ |
| ४. **एकूण** -- | | | | | | | | |
| (अ) संप व टाळेबंदीची संख्या | ६९० | ६३६ | २१७ | ५९ | २३ | ३३ | २७ | २२ |
| (ब) भाग घेतलेले कामगार | ४,५०७ | २,००७ | ५९४ | २३७ | ७५ | १३५ | १०० | १६३ |
| (क) वाया गेलेले मनुष्यदिन | २०.५३ | ९५.०५ | ४६.४९ | ५२.३१ | १०.८५ | २२.४३ | २३.४५ | १२.९७ |

आधार - कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन, मुंबई

टीप - (१) बाब क्रमांक ४ (ब) व ४ (क) समोरील आकडे संक्षिप्तात दिल्याने प्रत्यक्ष बेरजेशी जुळतीलच असे नाही.

(२) ** राज्य औद्योगिक संबंध यंत्रणेखालील.

११

# मानव विकास



# ११. मानव विकास

११.१ मानव विकास म्हणजे अशा वातावरणाची निर्मिती, ज्यामध्ये व्यक्तींना त्यांच्या क्षमता विकसित करता येतील, त्यांच्या गरजा व इच्छेनुसार सर्जनशील व फलदायी आयुष्य जगता येईल तसेच समाज कल्याणाकरिता निर्णय प्रक्रियेत सहभागी होता येईल. मानव विकास मापनासाठी महत्त्वाचे मापदंड सातत्याने सुधारित होत आहेत.

## संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम

११.२ युएनडीपी मानव विकास अहवाल प्रकाशित करुन देशांचे गुणानुक्रम जाहीर करते. अलिकडील अहवाल मार्च, २०१३ मध्ये प्रकाशित झाला आहे. युएनडीपीने १८५ देशांची मानव विकास निर्देशांकांनुसार अत्युच्च विकसित, उच्च विकसित, मध्यम विकसित व अल्प विकसित अशी वर्गवारी केली आहे. या यादीत नॉर्वे प्रथम क्रमांकावर असून त्याचा मानव विकास निर्देशांक ०.९५५ आहे. भारताचा क्रमांक १३६ असून निर्देशांक ०.५५४ आहे व भारताचा समावेश मध्य विकसित वर्गात होतो. भारताच्या शेजारील देशांचे मानव विकास निर्देशांक तक्ता ११.१ मध्ये देण्यात आले आहेत.

**तक्ता ११.१ भारताच्या शेजारील देशांचे मानव विकास निर्देशांक**

| देश | निर्देशांक | क्रमांक | वर्गवारी |
|---|---|---|---|
| श्रीलंका | ०.७१५ | ९२ | उच्च |
| चीन | ०.६९९ | १०१ | मध्यम |
| भूतान | ०.५३८ | १४० | मध्यम |
| बांगलादेश | ०.५१५ | १४६ | अल्प |
| पाकिस्तान | ०.५१५ | १४६ | अल्प |
| नेपाळ | ०.४६३ | १५७ | अल्प |

*आधार* : मानव विकास अहवाल २०१३, युएनडीपी

## भारतातील मानव विकास निर्देशांक

११.३ नियोजन आयोग, भारत सरकार यांनी 'भारत मानव विकास अहवाल' २०११ मध्ये प्रकाशित केला असून यात आरोग्य, शिक्षण व उत्पन्न या तीन मितींच्या फलनिष्पत्ती निर्देशकांवर आधारित संयुक्त निर्देशांकाच्या स्वरुपात मानव विकास निर्देशांक परिगणित करण्यात आला आहे.

- आरोग्यदायी दीर्घायुचे प्रतीक म्हणून जन्माच्या वेळेची आयुर्मर्यादा
- शिक्षण व ज्ञान संपादन याचे प्रतीक म्हणून शिक्षणाची सरासरी वर्षे (शाळाबाह्य मुलांकरिता समायोजित) आणि साक्षरता दर (वय ७ वर्षे व अधिक)
- राहणीमानाचा दर्जा व संसाधनांचा वापर यांचे प्रतीक म्हणून चलनवाढ व असमानतेसाठी समायोजित दरडोई मासिक खर्च

११.४ अखिल भारताचा मानव विकास निर्देशांक ०.४६७ आहे. प्रमुख राज्यांमध्ये केरळ पहिल्या क्रमांकावर असून या राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.७९० आहे. यापाठोपाठ पंजाब आणि महाराष्ट्र असून त्यांचा मानव विकास निर्देशांक अनुक्रमे ०.६०५ व ०.५७२ आहे.

## राज्य मानव विकास अहवाल

११.५ राज्याने महाराष्ट्र मानव विकास अहवाल खालील निर्देशकांचा वापर करून २००२ मध्ये प्रकाशित केला आहे.

- अर्भक मृत्यूदराच्या स्वरुपात आयुर्मान
- साक्षरता दर व शिक्षणाची सरासरी वर्षे यांच्या स्वरुपात ज्ञान
- दरडोई जिल्हा उत्पन्नाच्या स्वरुपात आर्थिक साध्यता

११.६ प्रत्येक जिल्ह्यासाठी वंचितता निर्देशांक पद्धत वापरून मानव विकास निर्देशांक परिगणित करण्यात आला आहे. मानव विकास अहवालानुसार राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.५८ होता. राज्याचा दुसरा मानव विकास अहवाल तयार करण्याचे काम यशदा, पुणे यांच्याकडे सोपविले आहे. सदर अहवाल अंतिम टप्प्यात आहे.

## महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम

११.७ महाराष्ट्र मानव विकास अहवालानुसार निश्चित केलेल्या १२ अतिमागास जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक उंचविण्यासाठी शासनाने जून, २००६ मध्ये "महाराष्ट्र मानव विकास मिशन" ची स्थापना केली. मानव विकास मिशनने राबविलेल्या योजनांचे चांगले परिणाम लक्षात घेऊन, मानव विकास ही संकल्पना जिल्ह्याऐवजी तालुका स्तरावर जुलै, २०११ पासून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यानुसार मानव विकासाची व्याप्ती वाढविण्यासाठी हा कार्यक्रम राज्यातील १२५ अतिमागास तालुक्यांमध्ये राबविण्यात येत

आहे. मानव विकासाचे कार्यक्रम राबविण्यासाठी सन २०१२-१३ मध्ये एकूण ₹ ३५९.३३ कोटींच्या तरतूदींपैकी ₹ २५० कोटी निधी खर्च झाला. सन २०१३-१४ साठी एकूण ₹ २६९ कोटी नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

११.८ गरजेनुसार या कार्यक्रमात नवीन योजनांचा समावेश करण्यात येत आहे. सन २०१२-१३ पासून सदर कार्यक्रमात 'क' वर्ग नगरपालिकांचाही समावेश करण्यात आला आहे, तर सन २०१३-१४ मध्ये जिल्हा तसेच तालुक्यांच्या गरजा, सामाजिक व आर्थिक स्थिती तसेच भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन 'जिल्हा/तालुका यासाठी विशिष्ट योजना' राबविण्यात येतात. यास्तव तालुक्याला मिळणाऱ्या एकूण निधी पैकी २० टक्के पर्यंत निधी राखून ठेवण्यात आला आहे. तालुक्यांमध्ये राबविण्यात येत असलेल्या विविध कार्यक्रमांची भौतिक प्रगती (जानेवारी, २०१४ पर्यंत) खालील प्रमाणे आहे.

**शिक्षण**

- इयत्ता १० वी आणि १२ वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरु करणे : या योजनेंतर्गत सन २०१३-१४ मध्ये या वर्गात प्रवेश घेतलेल्या एकूण ३०,१६८ विद्यार्थ्यांपैकी २३,९९० विद्यार्थी परीक्षेस बसले व ६,६१५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

- माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये अभ्यासिका सुरु करणे : या योजनेंतर्गत २,७३३ मंजूर अभ्यासिकांपैकी २,७२२ अभ्यासिकांसाठी सौरदिवे, फर्निचर व पुस्तके पुरविण्यात आली आहेत. १,६०५ अभ्यासिकांना सुधारित अभ्यासक्रमाची पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली. ३८० अभ्यासिकांमध्ये स्पर्धात्मक परीक्षांची पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

- ग्रामीण भागातील मुलींना मोफत बस सेवा उपलब्ध करुन देणे : या योजनेंतर्गत ६२५ बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सन २०१३-१४ मध्ये ७७,३१४ मुलींनी या योजनेचा लाभ घेतला. प्रतिवर्ष प्रतिबस ₹ ७.०४ लाख रक्कम राज्य परिवहन महामंडळास अदा करण्यात आली आहे.

- अनुदानित शाळांमध्ये प्रयोगशाळांकरिता साहित्य पुरविणे : ३,४४४ मंजूर प्रयोगशाळांपैकी ३,३५० प्रयोगशाळांना साहित्य पुरविण्यात आले.

- बालभवन विज्ञानकेंद्र स्थापन करणे : या योजनेंतर्गत १२३ बालभवन विज्ञानकेंद्रे स्थापित करण्यात आली असून या केंद्रांना सन २०१३-१४ मध्ये २.२५ लाख विद्यार्थ्यांनी भेट दिलेली आहे.

- कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजनेची व्याप्ती इयत्ता १० वीपर्यंत वाढविणे : इयत्ता ९ वी व १० वी मधील अनुक्रमे ९८९ व ७७८ विद्यार्थिनी लाभ घेत आहेत.

**आरोग्य**

- गर्भवती महिला, स्तनदा माता तसेच ० ते ६ महिने वयोगटातील बालकांकरिता आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे : सन २०१३-१४ मध्ये ९,४२६ शिबिरे आयोजित करण्यात आली होती. या शिबिरांमध्ये ६,७०,३८२ महिला / बालकांनी लाभ घेतला.

- किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक बाबींचे प्रशिक्षण देणे : सन २०१३-१४ मध्ये प्रशिक्षण पूर्ण झालेल्या ३,४२४ प्रेरिकांमार्फत १,२७,९४१ किशोरींना प्रशिक्षण देण्यात येत आहे. सुधारित निकषांनुसार प्रशिक्षण पूर्ण झालेल्या १,३६७ प्रेरिकांमार्फत ७८,६४८ किशोरींना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

- अजा/अज/दारिद्रय रेषेखालील गर्भवती महिलांना बुडीत मजूरी देणे : सन २०१३-१४ मध्ये ८५,८८९ महिलांना बुडीत मजूरी देण्यात आली.

**उत्पन्न**

- फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा : सन २०१३-१४ मध्ये ३३ प्रयोगशाळांद्वारे १९,६२२ माती नमुने तपासण्यात आले आहेत.

- युवक/युवतींना स्वयंरोजगाराकरिता व्यवसाय कौशल्याचे प्रशिक्षण देणे : सन २०१३-१४ मध्ये २,८३२ युवक/युवतींना स्वयंरोजगाराकरिता व्यवसाय कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले असून ४,२६२ युवक/युवतींना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

* * * * *

## *व्याख्या सूची*

**देशांतर्गत स्थूल उत्पन्न** : कोणत्याही भौगोलिक सीमांकित क्षेत्रातील विशिष्ट कालावधीमध्ये (साधारणपणे एक वर्ष) निर्माण झालेल्या सर्व वस्तू व सेवांचे (द्विरुक्ती टाळून) चलनाच्या स्वरुपात केलेले मोजमाप. सर्वसाधारणपणे भौगोलिक क्षेत्र म्हणजे देश. जर भौगोलिक क्षेत्र राज्य असेल तर त्यास स्थूल राज्य उत्पन्न आणि जर भौगोलिक क्षेत्र जिल्हा असेल तर त्यास स्थूल जिल्हा उत्पन्न असे संबोधले जाते.

**निव्वळ उत्पन्नाची** जसे देशांतर्गत निव्वळ उत्पन्न, निव्वळ राज्य उत्पन्न व निव्वळ जिल्हा उत्पन्न परिगणना करतांना संबंधित स्थूल उत्पन्नातून स्थिर भांडवलाचा घसारा वजा करण्यात येतो.

**स्थूल राष्ट्रीय उत्पन्न** : देशांतर्गत स्थूल उत्पन्नात विदेश व्यवहारातील देवाण-घेवाणातील फरकाचा समावेश करुन स्थूल राष्ट्रीय उत्पन्न परिगणित करण्यात येते. यास राष्ट्रीय उत्पन्न असेही संबोधले जाते.

**निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न** : स्थूल राष्ट्रीय उत्पन्नामधून स्थिर भांडवलाचा घसारा वजा करुन निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न परिगणित करण्यात येते.

**दरडोई उत्पन्न** (राष्ट्रीय दरडोई उत्पन्न, राज्य दरडोई उत्पन्न आणि जिल्हा दरडोई उत्पन्न) हे संबंधित भौगोलिक क्षेत्राच्या निव्वळ उत्पन्नाला संबंधित वर्षाच्या मध्यावधी लोकसंख्येने भागून परिगणित करण्यात येते.

**आगाऊ अंदाज** म्हणजे उपलब्ध अनुरुप निर्देशांक वापरुन केलेले अंदाज.

**ग्रामीण विद्युतीकरण** (विद्युतीकरण केलेले खेडे) : ज्या खेड्यात (१) वस्ती असलेल्या भागात तसेच दलित वस्ती/ वाडी अस्तित्वात असल्यास तेथे वितरण रोहित्र आणि वितरण तारमार्ग यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविल्या असल्यास, (अक्षय ऊर्जा स्रोतांद्वारे विद्युतीकरणासाठी वितरण रोहित्राची आवश्यकता असेलच असे नाही); (२) शाळा, पंचायत कार्यालय, आरोग्य केंद्रे, दवाखाने, समाजमंदिर, इ. सारख्या सार्वजनिक ठिकाणी वीज पुरविली असल्यास आणि (३) गावातील एकूण कुटुंबांच्या संख्येपैकी वीजपुरवठा केलेल्या कुटुंबांची संख्या किमान १० टक्के इतकी असल्यास; त्या खेड्यास विद्युतीकरण झालेले खेडे घोषित करता येईल.

(उर्जा मंत्रालय, भारत सरकारने ग्रामीण विद्युतीकरण धोरण-२००६ अंतर्गत निश्चित केलेली व्याख्या)

**वाहन उत्पादकता** : प्रति वाहनाने वाहतूक केलेले प्रतिदिन सरासरी किमी.

